॥ विद्वान् एवम् सर्व सिध्दी ॥

PK

Foundation

Mission of Pratap Khandobharad

# पी के दीपोत्सव २०१३



# प्रेरणा

## शोध अंत: प्रेरणेचा...

" मानवी मनातील स्वप्नाला प्रेरणेचा स्पर्श
झाल्यास स्वप्नसिद्धीची ज्योत पेटली जाते.
त्याचक्षणी ध्येय व ध्यासाचा भडाग्नी पेटतो.
तोच कार्यसिद्धीच्या महायज्ञाचा आरंभ असतो.
त्याला वेळ, काळ व परिस्थितीचे भान नसते.
असतात फक्त आशेचे तरंग अन् उत्साहाचे किनारे.
त्यातून नवचैतन्याचा स्फुलिंग पेटून आत्मविश्वास
व जिद्दीच्या असंख्य वैचारिक लढा ऐकमेकांवर
जोरजोराने आदळू लागतात. त्या मंथनातुनच
कृतीला आरंभ होवून अथक प्रयत्न व परिश्रमांनी
संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी मनमोहक
कलाकृती जन्माला येत असते,
जी बनते पुन्हा या जगासाठी एक प्रेरणा "

किंमत : विनामूल्य

# राष्ट्रगीत

जन गन मन अधिनायक जय हे
भारत भाग्य विधाता

पंजाब सिंध गुजरात मराठा
द्राविड उत्कल बंगा

विंध्य हिमाचल जमुना गंगा
उच्छल जलधि तरंगा

तब शुभ नामे जागे
तब शुभ आशिष मांगे
गाए तब जय गाथा

जन गन मंगल दायक जय हे
भारत भाग्य विधाता

जय हे जय हे जय हे
जय जय जय जय हे





# प्रेरणा

मानवी मनातील स्वप्नाला प्रेरणेचा स्पर्श झाल्यास स्वप्नसिद्धिची ज्योत पेटली जाते. त्याचक्षणी ध्येय व ध्यासाचा भडाग्नी पेटतो. तोच कार्यसिद्धिच्या महायज्ञाचा आरंभ असतो. त्याला वेळ, काळ व परिस्थितीचे भान नसते. असतात फक्त आशेचे किरण अन् उत्साहाचे किनारे. त्यातूनच नवचैतन्याचा स्फुर्लिंग पेटून आत्मविश्वास व जिद्दीच्या असंख्य वैचारिक लाटा ऐकमेकांवर जोरजोराने आदळू लागतात. त्या मंथनातुनच कृतीला आरंभ होवून अथक प्रयत्न व परिश्रमांनी संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी मनमोहक कलाकृती जन्माला येत असते.

प्रेरणा बघण्यातून, ऐकण्यातून अथवा वाचनातून मिळणाऱ्या मौलिक धनातून मिळत असते. विशेषत: वाचनातुन प्रेरणा घेवून शुन्यातून विश्व निर्माण करणारी अत्यंत प्रेरणादायी व्यक्तिमत्वे या देशात आणि जगात होऊन गेली. हिच व्यक्तिमत्वे मनात नवीन कल्पना व सकारात्मक विचारांचा प्रचंड उत्स्फुर्त असा प्रवाह निर्माण करित असतात. तो आटू किंवा दबू न देता आपण नवनिर्मितीचा ध्यास घ्यायला हवा. प्रतिकुलतेचा न्यूनगंड मनात ठेवून आपल्या हृदयातून निघणारा बुलंद आवाज वाया घालविणे म्हणजे मनात जागृत झालेली अंत:प्रेरणा पायदळी तुडविण्यासारखे आहे.

दैनंदिन जीवनात वेग-वेगळ्या माध्यमांतून प्रेरणांचा लोटच्या लोट नेहमीच अंगावर येत असतो. आपण मात्र त्यांना नकळत बाजूला सारत मनाला क्षणमात्र सुखावणाऱ्या, हसव्या वाटणाऱ्या फसव्या गोष्टींच्या मागे धावण्यात धन्यता मानतो.

'तुझे आहे तूझपाशी, पण जागा चुकलाशी'

या संतवचनाप्रमाणे आजचे विद्वान लोकसुद्धा या प्रेरणास्थानांच्या भाऊगर्दीत दिसेनासे झाले. आजच्या शैक्षणिक माहोलात समर्पण दिसेनासे झाले. पत, प्रतिष्ठा, पैसा, भपकेबाजी हेच सर्वस्व बनलं. कर्तव्य व जबाबदारी यांचा विसर पडला. माणसांचे आदर्श बदलले, नियम बदलले म्हणुन अखंड प्रेरणेचा महास्त्रोत असणारी विशाल-हृदयी, देवत्वाला पोहोचलेली माणसंसुद्धा दुर्लक्षित झाली.

यश हे संकल्पना, स्वप्न, ध्येय, ध्यास अशा गोष्टींवर अवलंबुन असते. केवळ शिक्षणावर नव्हे ! प्रेरणादायी इतिहास त्यातुनच निर्माण होत असतो. उज्वल भविष्याची आस बाळगणाऱ्या महत्वकांक्षी लोकांसाठी असा इतिहासच यशाचा राजमार्ग असतो.

यशाचा भव्य-दिव्य मार्ग दाखविण्यासाठी खुणावणारं या दिपोत्सवातील प्रत्येक प्रेरणादायी व्यक्तीमत्व निश्चितच आपल्या उज्वल भविष्यासाठी **दिपस्तंभ** ठरेल.

प्रताप खांडेभराड

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | - श्री.सुर्यकांत मुंगसे | ७ |
| दिपावली | | ८-१४ |
| डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम | | १६-१९ |
| पद्मभुषण आण्णा हजारे / डॉ.जयंत नारळीकर | | २०-२७ |
| डॉ.रघुनाथ माशेलकर / डॉ.विजय भटकर | | २८-३७ |
| जरासे भान राहू द्या रे ...! | - ॲड.अपर्णा रामतिर्थकर | ४२-४५ |
| जागतिकीकरण व शिक्षण | - ॲड.राम कांडगे | ४६-४९ |
| उद्‌बोधन् शिक्षकांचे ...! | - श्री.विजय कोलते | ५४-५५ |
| शब्दावाचुन कळावे सारे ... | - श्री.नंदकुमार मांदळे | ५६-५७ |
| समतेचा झेंडा उंच धरा रे ! | - श्री.सुर्यकांत मुंगसे | ६०-६३ |
| सकारात्मक दृष्टीकोन - यशस्वी जीवनाचा मूलमंत्र | - श्री.रोहीदास गडदे | ६४-६६ |
| शिक्षणाचे सिंहावलोकन | - श्री.रामदास थिटे | ६८-७१ |
| आदर्श भागवत धर्माचा ... | - श्री.विनोद महाळुंगकर | ७२-७३ |
| माझिया जातीचे मज भेटो कोणी ...! | - श्री.रामचंद्र आवटे | ७४-७५ |
| विद्यार्थ्यांची मानसिकता ओळखण्याची गरज ... | - श्री.अविनाश दुधवडे | ७६-७७ |
| औद्योगिकीकरण आणि आर्थिक सुबत्ता | - श्री.अविनाश अरगडे | ७८-७९ |
| शिक्षण पद्धती - कालची व आजची | - श्री.आर.एम.भोर | ८२-८३ |
| शुन्यातून विश्व ... उद्योगाचे | - लोकमत आयकॉन | ८४-८५ |
| सेल्फ मेडचा प्रताप ... | - श्री.शिवाजी आतकरी | ८६-८७ |
| प्रेरणादायी व्यक्तीमत्व | | |
| कर्मवीर भाऊराव पाटील / बाबा आमटे / सावित्रीबाई फुले | | ९०-१०२ |
| यशवंतराव चव्हाण / डॉ.बाबासाहेब आंबेडकर / डॉ.होमी भाभा | | १०८-१२१ |
| जे.आर.डी.टाटा / मदर तेरेसा / लता मंगेशकर | | १२२-१३७ |
| किरण बेदी / रविंद्रनाथ टागोर / जे. कृष्णमुर्ती | | १३८-१५५ |
| हेन्री फोर्ड / स्टीव्ह जॉब्स् / विश्वेश्वरैय्या | | १५६-१६६ |
| हेलन केलर / आल्फ्रेड नोबेल / आईनस्टाईन | | १७०-१८३ |
| चार्ली चॅप्लीन / कल्पना चावला | | १८४-१९० |
| रस्ते सुरक्षा अभियान / महिला दक्षता कमिटी | | १९६-२०१ |
| बहुरंगी शरद पवार | - श्री.प्रताप खांडेभराड | २०३-२२७ |
| डायनॅमिक दादा | - श्री.प्रताप खांडेभराड | २२८-२३३ |
| प्रेरणा विद्यार्थ्यांसाठी | | २३४-२४७ |
| पी के फाऊंडेशन - संस्था आलेख | | २४९-२६४ |

संस्थापक-अध्यक्ष :
**श्री.प्रतापराव खांडेभराड**
पी के फाऊंडेशन

संपादक :
**श्री.सुर्यकांत गुलाबराव मुंगसे**
(सर)

सह-संपादक :
**सौ.नंदा प्रतापराव खांडेभराड**
सचिव, पी के फाऊंडेशन

छपाई :
**श्री.इक्बाल बबन शेख**
साई ग्राफिक आर्टस चाकण

मुखपृष्ठ सजावट :
**श्री.दिपक मांडेकर**
दिप फोटोज्

या अंकातील साहित्य विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने संकलित केलेले आहे.
लेखातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

हा अंक **प्रतापराव खांडेभराड** यांनी पी के फाऊंडेशनसाठी कडाचीवाडी (चाकण) येथे प्रसिद्ध केला.

www.pkinstitute.edu.in

**किंमत :** विनामूल्य



# संपादकीय

आदर्शांच्या शोधात असणारे विद्यार्थी, युवक-युवती आणि त्यांचे पालक यांच्यासाठी या दिपावलीची 'जरा हटके' भेट दयावी असा मानस पी.के.फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय प्रतापराव खांडेभराड यांनी व्यक्त केला.

आई, वडील, गुरुजन, समाजातील वडील-धाऱ्यांची आजच्या पिढीविषयी नेहमीच तक्रार असते. त्यांच्यासमोर ध्येय नाही. स्वप्न नाही, ते पूर्ण करण्याची जिद्द आणि चिकाटी नाही, कठोर परिश्रम करण्याची मानसिकता नाही. आपली मुले म्हणजे आपल्या पुढे नियतीने धरलेले आरसे असतात. त्यात दिसते ते आपलेच रुप, आपल्याच प्रतिमा असतात. त्यांच्या वर्तमान व भविष्याविषयी चिंता करण्याऐवजी गरज आहे चिंतनाची कारण चिंतेचा रस्ता चितेकडे तर चिंतनाचा रस्ता चैतन्याकडे जातो.

या उमलत्या पिढीच्या डोळ्यांपुढे विविध क्षेत्रातील पराक्रमाची शिखरे दिसली तर त्यांच्याही मनात जिज्ञासा निर्माण होईल. त्यांनाही त्या दिशेला धाव घेण्याची तीव्र इच्छा होईल. ही शिखरे, त्यांचे विचारधन या मुलांना, युवक-युवतींना खुणावतील. साद घालतील मुलांनी त्या दिशेला धावत जावे या प्रबळ इच्छेतूनच साकारला हा दिपावली अंक. प्रेरणा.... शोध अंतप्रेरणेचा ! हा अंक आपल्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे.

प्रस्तुतच्या अंकामध्ये आपल्या शब्द सामर्थ्याने समाज मनाला भुरळ घालणाऱ्या, संस्कार, प्रेरणेची दीक्षा देणाऱ्या मान्यवरांचे विचार संकलित केले आहेत. याशिवाय देशाचे नेते, महाराष्ट्राचे जाणते राजे आदरणीय पवार साहेब आणि दादा यांच्या जीवन कर्तृत्वाचा आलेख मांडण्याचा आणि विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या मान्यवरांचे लेख, पी.के. फाऊंडेशन संस्थेच्या कार्याचा परिचय करुन देण्याचा प्रयत्न केला आहे.

आपल्या वाणी आणि लेखणीने समाजाच्या जीवनात चैतन्याचे चांदणे निर्माण करणाऱ्या ज्या शब्दप्रभूंचे सहकार्य व आशिर्वाद मिळाले त्यां सर्वांचे आणि अल्पावधीत सुंदर छपाईची जबाबदारी बिनचूक पार पाडणारे संयमी व्यक्तीमत्व साई ग्राफीक आर्टस् चे श्री. इक्बाल शेख व त्यांचे सहकारी यांचे ऋण व्यक्त करणे शब्दातीत आहे.

ध्येयासाठी देह झिजविण्याची तयारी असणाऱ्यांसाठी देणाऱ्याने देत राहावे या न्यायाने दिले, घेणाऱ्याने घेतच राहावे हीच अपेक्षा.

पी.के.फाऊंडेशनच्या प्रत्येक उपक्रमांवर आपणां सर्वांचे प्रेम, स्नेह, जिव्हाळा आहेच तो उत्तरोत्तर वृध्दीगंत व्हावा हीच माऊलींचरणी प्रार्थना !



# दीपावली



**आकाश कंदिल लागले दारात**
**उजळल्या ज्योती दीप अंगणात**
**सडा सभार्जने सजल्या अंगणी**
**आली आली आली सणांची ही राणी**


होय .. दिवाळी म्हणजे खरोखरच सर्व सणांची महाराणीच. ती महाराणी म्हणूनज तिचा मोठा थाट आणि ती येते ही अखंड दिव्यांच्या झगमगाटात.

दिवाळीचे दुसरं नांव दीपावली. हा उत्सव म्हणजे दीपोत्सव. दिव्यांचा उत्सव असंख्य ओळी घराअंगणात लावल्या जातात. म्हणून तिचं नाव दीपावली.

ह्या सणाची सुरवात वसुबारसेपासून होते आणि भाऊबीज साजरी केल्यानंतर दिवाळीची सांगता होते. सर्व अबाल वृध्द, मुले, स्त्रीया ह्यांचा हा लाडका सण. दिवाळी येणार म्हटलं की आवराआवर, रंगरंगोटी, नव्या कपड्यांची, दागिन्यांची, घरातील वस्तूची खरेदीची ही पर्वणी. फटाक्यांची अतिषबाजी अन् चविष्ट दिवाळी फराळाचा स्वाद हे ह्या सणाच आणखी एक वैशिष्ट्य.

आपला भारत देश हा कृषीप्रधान देश. आपली थोर संस्कृती सुध्दा सर्वांवर प्रेम करायला शिकवणारी म्हणूनच की काय वसुबारस ह्या दिवशी आपण गाय आणि वासरु ह्यांची पूजा करतो. त्यांना गोडाचा घास खाऊ घालतो. दुध-दुभत्यासाठी होणारा गायीचा उपयोग शेतीच्या कामी बैलाची होणारी मदत ह्या गोष्टी लक्षांत घेऊन त्या गोधनाची केलेली ही कृतज्ञता पूजा.

## वसुबारस :



अश्विन कृष्ण द्वादशीस म्हणजेच गोवत्सद्वादशीस, वसुबारस हा सण साजरा केला जातो. वसुबारस ह्याचा अर्थ – वसु म्हणजे द्रव्य (धन) त्यासाठी असलेली बारस म्हणजे द्वादशी. या दिवसाला गोवत्स द्वादशी असेही म्हणतात. या दिवशी गाईची पाडसासह संध्याकाळी पूजा करतात. घरांत लक्ष्मीचे आगमन व्हावे या हेतूनेही या दिवशी सवत्स धेनूची पूजा करण्याची पध्दत आहे. ज्यांच्याकडे घरी गुरे, वासरे आहेत त्यांच्याकडे या दिवशी पुरणावरणाचा स्वयंपाक करतात. घरातील सवाष्ण बायका गाईच्या पायावर पाणी घालतात. नंतर हळद–कुंकू, फुले, अक्षता वाहून चाऱ्याच्या फुलांची माळ घालतात. निरंजनाने ओवाळून केळीच्या पानावर पुरणपोळी वगैरे पदार्थ वाढुन गाईला खाऊ घालतात. ह्या दिवसापासून अंगणात रांगोळी काढण्यास सुरुवात करतात. पुष्कळ स्त्रियांचा या दिवशी उपवास असतो. ह्या दिवशी गहू, मूग खात नाहीत. स्त्रिया बाजरीची भाकरी व गवारीच्या शेंगाची भाजी खाऊन उपवास सोडतात. आपल्या मुला–बाळांना चांगले आरोग्य मिळावे व सुख लाभावे म्हणून ही पूजा करतात.

## धनत्रयोदशी :



अश्विन कृष्ण त्रयोदशीस धनत्रयोदशी हा सण साजरा केला जातो. धनत्रयोदशी या सणामागे एक मनोवेधक कथा आहे. कथित भविष्यवाणी प्रमाणे हेमा राजाचा पुत्र आपल्या सोळाव्या वर्षी मृत्युमुखी पडणार असतो. आपला पुत्राने जीवनाची सर्व सुखे उपभोगावीत म्हणून राजा व राणी त्याचे लग्न करतात. लग्नानंतर चवथा दिवस हा तो मृत्युमूखी पडण्याचा असतो. या रात्री त्याची पत्नी त्यास झोपू देत नाही. त्याच्या अवतीभवती सोन्या–चांदीच्या मोहरा ठेवल्या जातात. महालाचे प्रवेशद्वारही असेच सोन्या चांदीने भरुन रोखले जाते. सर्व महालात मोठमोठ्या दिव्यांनी लखलखीत प्रकाश केला जातो. वेगवेगळी गाणी व गोष्टी सांगून पत्नी त्याला जागे ठेवते. तेव्हा यम राजकुमाराच्या खोलीत सर्परुपात प्रवेश करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याचे डोळे सोन्या–चांदीने दिपतात. या कारणास्तव यम आपल्या जगात (यमलोकात) परततो. अशाप्रकारे राजकुमारचे प्राण वाचतो म्हणुनच या दिवसास यमदीपदान असेही म्हणतात. या दिवशी सायंकाळी घराबाहेर दिवा लावून त्याच्या वातीचे टोक दक्षिण दिशेस करतात. त्यानंतर त्या दिव्यास नमस्कार करतात. याने अपमृत्यु टळतो असा समज आहे.



आयुर्वेदाच्या दृष्टीने हा दिवस धन्वंतरी जयंतीचा आहे. वैद्य मंडळी या दिवशी धन्वंतरीचे (देवांचा वैद्य) पूजन करतात. प्रसादास कडूलिंबाच्या पानांचे बारीक केलेले तुकडे व साखर असे लोकांना देतात. यात मोठा अर्थ आहे. कडुलिंबाची उत्पत्ति अमृतापासून झाली आहे. धन्वंतरी हा अमृतत्व देणारा आहे, हे त्यातून प्रतीत होते. कडुलिंबाची पाच-सहा पाने जर रोज खाल्ली तर व्याधि होण्याचा संभव नाही. एवढे कडुलिंबाचे महत्व आहे. म्हणून या दिवशी तोच धन्वंतरीचा प्रसाद म्हणून देण्यात येतो.

## नरक चतुर्दशी :



अश्विन कृष्ण चतुर्दशीस नरक चतुर्दशी हा सण केला जातो. नरकचतुर्दशीच्या दिवशी अलक्ष्मीचे पहाटे मर्दन करुन आपल्यातील नरकरुपी पापवासनांचा नायनाट व अहंकाराचे उच्चाटन करायचे आहे. तेव्हाच आत्म्यावरील अहंचा पडदा दूर होऊन आत्मज्योत प्रकाशित होईल. नरकचतुर्दशीच्या दिवशी पहाटे उठून सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान केले जाते.

## लक्ष्मीपूजन :



अश्विन अमावास्येस लक्ष्मीपूजन हा सण साजरा केला जातो.


या दिवशी प्रदोषकाळी (संध्याकाळी) लक्ष्मीचे पूजन केले जाते. लक्ष्मी ही फार चंचल असते असा समज आहे. त्यामुळे शक्यतोवर हिंदू शास्त्राप्रमाणे लक्ष्मीपूजन हे स्थिर लग्नावर करतात. त्याने लक्ष्मी स्थिर राहते असा समज आहे. अनेक घरांत श्रीसूक्तपठणही केले जाते. या दिवशी बळी पाताळात गाडला गेला, सर्व देवतांची सुटका झाली व लक्ष्मीचे वर्चस्व अबाधित झाले याची आठवण म्हणून या दिवशी लक्ष्मीपूजन करतात. व्यापारी लोकांचे हिशोबाचे नवीन वर्ष लक्ष्मीपूजनानंतर सुरु होते. या दिवशी सर्व अभ्यंग स्नान करतात. पाटावर रांगोळी काढून तांदूळ ठेवतात. त्यावर वाटी किंवा तबक ठेवतात.



त्यात सोन्याचे दागिने, चांदीचा रुपया, दागिने ठेवून त्यांची पूजा करतात. हा दिवस व्यापारी लोक फार उत्साहात साजरा करतात. या दिवशी स्वच्छता करण्यासाठी लागणारी नवी केरसुणी विकत घेतात. तिलाच लक्ष्मी मानुन तिच्यावर पाणी घालून हळद-कुंकू वाहून घरात वापरण्यास सुरुवात करतात.

कृष्णाने नरकासुराचा वध केला तेव्हापासून नरकचतुर्दशी साजरी करतात. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी अलक्ष्मीचा नाश व्हावा, यासाठी धार्मिक कृती करतात. बलिप्रतिपदा बळी राजाचा नाश झाल्याचे प्रतीक आहे. तर भाऊबीज ही शकटासूर या असुराचा नाश करुन असंख्य भगिनींना त्यांचा बंधु कृष्ण याने सोडवल्याचा आनंद म्हणून साजरी करतात. अशा तऱ्हेने दीपावलीचा प्रत्येक दिवस हा असुरांचा संहार केल्याच्या धर्माने अधर्मावर विजय मिळवल्याच्या दिवसाची आठवण म्हणून मंगलमय दीपांनी उजळवायचा, असं आपली संस्कृती सांगते.

## बलिप्रतिपदा



कार्तिक शुध्द प्रतिपदेस बलिप्रतिपदा हा सण साजरा केला जातो.

बळीराजाची दानशूरता पाहून वामनाने त्याला पाताळाचे राज्य दिले आणि दात्याची सेवा करण्यास वामनाने बळीराजाचे द्वारपाल होण्याचे काम स्वीकारले. तो दिवस म्हणजे कार्तिक शुध्द प्रतिपदा होय. या दिवशी विक्रम संवत सुरु होते. पाडवा हा साडेतीन मुहूर्तापैकी एक आहे. आर्थिक हिशोबाच्या दृष्टीने व्यापारी लोक दिवाळीत पाडवा ही नववर्षाची सुरुवात मानतात.

लक्ष्मीप्राप्तीसाठी नव्या वह्यांचे पूजन करुन व्यापारी लोक वर्षाचा प्रारंभ करतात. व्यापारी लोकांच्या जमा-खर्चाच्या कीर्द खतावणीच्या नवीन वह्या ह्या दिवशी सुरु होतात. कीर्द खतावणीच्या नवीन वह्या सुरु करण्यापूर्वी वह्यांना हळद-कुंकू, गंध, फूल, अक्षता वाहून पूजा करतात. घरोघरी सायंकाळी पाटाभोवती रांगोळी काढून पत्नी पतीला औक्षण करते व पती पत्नीला ओवाळणी घालतो. नवविवाहीत दांपत्याची पहिली दिवाळी पत्नीच्या माहेरी साजरी करतात. यालाच दिवाळसण म्हणतात. त्यानिमित्त यादिवशी जावयांस आहेर करतात.

## भाऊबीज :



कार्तिक शुध्द द्वितीयेस भाऊबीज हा सण साजरा केला जातो.

हा दिवस म्हणजे शरद ऋतूतील कार्तिक मासातील द्वितीया. द्वितीयेचा चंद्र आकर्षक व वर्धमानता दाखवणारा आहे. तेव्हा 'बीजेच्या कोरीप्रमाणे बंधुप्रेमाचे वर्धन होत राहो,' ही त्यामागची भूमिका आहे. आपल्या मनातील द्वेष व असूया निघाल्यामुळे सर्वत्र बंधुभावनेची कल्पना जागृत होते, म्हणून त्याकरिता भाऊबीजेच्या सण बंधू-भगिनींचा प्रेमसंवर्धनाचा हा दिवस आहे. ज्या समाजात भगिनींना समाजातील व राष्ट्रातील पुरुष वर्ग भगिनी समजून त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी घेऊन त्यांना अभय देतील व त्यामूळे त्या समाजात निर्भयतेने फिरु शकतील. तो दिवस, म्हणजे दीपावलीतील भाऊबीज पूजनाचा दिवस. या दिवशी बहिणीच्या घरी भाऊ गोडधोड भोजन करतो आणि सायंकाळी चंद्राची कोर दिसल्यानंतर बहीण प्रथम चंद्रकोरीस व नंतर भावाला ओवाळते. भाऊ मग ओवाळणीच्या ताटात 'ओवाळणी' देऊन बहिणीचा सत्कार करतो.

## आकाश कंदील :



हा दिव्यांच्या आराशीचाच एक भाग आहे. आश्विन शुध्द एकादशी ते कार्तिक शुध्द एकादशीपर्यंत घराच्या बाहेर एक उंच खांब पुरुन त्यावर दोरीच्या सहाय्याने जो दिवा टांगतात, त्याला आकाशदिवा असे म्हणतात. त्याचा विधी पुढीलप्रमाणे असतो. घरापासून जवळच थोडी जमीन गोमयाने सारवावी. ती वर चंदनयुक्त जलाने प्रोक्षण करुन अष्टदल कमळ काढावे. मध्यभागी वीस हात, नऊ हात किंवा पाच हात लांबीचा खांब पुरावा. तो वस्त्र, पताका, अष्टघंटा, कलश यांनी सुशोभित करावा. त्यावर अष्टदलाकृति दीप (कंदील) करुन अडकवावा. त्या दीपात (कंदिलात) मोठा दिवा लावावा. त्याभोवती कमळाच्या प्रत्येक पाकळीत एक असे आठ दिवे धर्म, हर, भूति, दामोदर, धर्मराज, प्रजापति, पितर (तम:स्थित) व प्रेत यांना उद्देशून लावावे. दिव्यात तिळाचे तेल घालावे. नंतर दीपाची पंचोपचार पूजा करुन तो पुढील मंत्राने वर चढवावा.

दामोदराय नभसि तुलायां लोलया सह ।
प्रदीपं ते प्रयच्छामि नमोऽनन्ताय वेधसे ।।

अर्थ : श्रेष्ठ असा परमेश्वर जो दामोदर, त्याला हा ज्योतीसह दीप अर्पण करतो. त्याने माझे कल्याण करावे. याचे फल लक्ष्मीप्राप्तिच हे आहे.

## रांगोळी :



मूळ संस्कृत शब्द रंगवल्ली. सौंदर्याचा साक्षात्कार व मंगलाची सिध्दि हे रांगोळीचे दोन उद्देश होत. विशिष्ट शुभ्र चूर्ण चिमटीतून जमिनीवर सोडून रेखाटलेल्या आकृतीला रांगोळी असे म्हणतात. रांगोळी ही मूर्तीकला आणि चित्रकला यांच्याही आधीची आहे. कुठल्याही धार्मिक किंवा मांगलिक कृत्यात रांगोळी आवश्यक आणि प्राथमिक गोष्ट आहे. कोणत्याही सण, उत्सव, मंगल समारंभ, पूजा, व्रत इत्यादि शुभप्रसंगी प्रथम धर्मकृत्याच्या जागी रांगोळी काढण्याची प्रथा आहे. एखाद्याला किंवा एखादीला ओवाळतांना ती व्यक्तीला बसलेल्या पाटाभोवती आणि पुढेही रांगोळी काढतात. समारंभाच्या भोजनप्रसंगीही पाटाभोवती व पानाभोवती रांगोळी काढतात. दिवाळीच्या सणात दारापुढे किंवा अंगणात विविध प्रकारच्या रांगोळ्या काढून त्या विविध रंगांनी भरतात. जुन्या काळी प्रत्येक घरी रोज दारापुढे सडासंमार्जन करुन रांगोळी काढण्याची प्रथा होती.

## फटाके :



दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी लहान-मोठे सर्वच जण रात्री फटाके वाजवतात व आतषबाजी करतात.

## दिवाळीचे महत्व :



दिवाळी हा शब्द दीपावली या शब्दापासून बनला आहे. दिवाळी या सणाविषयी अधिक महिती जाणून घेऊया. दिवाळीला सर्वत्र दिवे लावतात. अश्विन वद्य त्रयोदशी (धनत्रयोदशी), अश्विन वद्य चतुर्दशी (नरक चतुर्दशी), अमावस्या (लक्ष्मीपूजन) व कार्तिक शुध्द प्रतिपदा (बलिप्रतिपदा) असे चार दिवस दिवाळी साजरी केली जाते. काही जण त्रयोदशीला दिवाळीत न धरता, दिवाळी उरलेल्या तीन दिवसांची आहे असे समजतात. वसुबारस आणि भाऊबीज हे दिवस दिवाळीला जोडून येतात, म्हणून त्यांचा समावेश दिवाळीत केला जातो. पण वस्तुत: ते सण वेगवेगळे आहेत.

जीवन हा एक उत्सव आहे असे लक्षात घेतले, तर ज्या वेळी प्राणशक्ती विकसित होऊन टाळूच्या जागी ब्रम्हरंध्रामध्ये प्रकाशते, तो



जीवनाचा महोत्सव म्हणायचा. दीपावली साजरी करण्यासाठी जशी घराची रंगरंगोटी, आरास केली जाते तसे हा महोत्सव साजरा करताना शरीराकडे लक्ष का दिले जात नाही ? शरद ऋतूत पित्त वाढणे प्रकृतीचा नियम आहे. वाढलेले पित्त शरीरातून बाहेर काढण्यासाठी, पोट साफ करण्यासाठी विरेचनासारखी योजना आयुर्वेदाने केली आहे. पंचतत्त्वांच्या शुध्दीसाठी, तसेच त्रिदोषांच्या शुध्दीसाठी पंचकर्माची योजना केली, तर मग पंचकर्मासारखे वा विरेचनासारखे आयुर्वेदिक उपचार मनुष्य का करुन घेत नाही ?

## दिवाळी साजरी करण्यामागील शास्त्र :



कृष्णाने नरकासुराचा वध केला तेव्हापासून नरकचतुर्दशी साजरी करतात. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी अलक्ष्मीचा नाश व्हावा, यासाठी धार्मिक कृती करतात. बलिप्रतिपदा बली राजाचा नाश झाल्याचे प्रतीक आहे. तर भाऊबीज ही शकटासूर या असुराचा नाश करुन असंख्य भगिनींना त्यांचा बंधू कृष्ण याने सोडवल्याचा आनंद म्हणून साजरी करतात. अशा तऱ्हेने दीपावलीचा प्रत्येक दिवस हा असुरांचा संहार केल्याच्या, धर्माने अधर्मावर विजय मिळवल्याच्या दिवसाची आठवण म्हणून मंगलमय दीपांनी उजळवायचा असं आपली संस्कृती सांगते. चातुर्मासाच्या काळात तेजतत्वाचा अभाव असल्यामुळे तेजोमय शक्तीतून विघटित होत असलेले घटक जास्त प्रमाणात वाढण्यास सुरुवात होते. दिवाळीच्या काळापर्यंत या घटकांची विपुल प्रमाणात वृध्दी झालेली असते. त्यामुळे पूर्वीच्या काळी मोठमोठ्या राक्षसांचे साम्राज्य या काळात वाढायचे. या सर्व घटकांचे सूक्ष्म स्तरावर क्षमन व्हावे ; म्हणून दिवाळी केली जाते, म्हणजेच तेजतत्त्वावर आधारित उपासना केली जाते. या प्रकारच्या उपासनेमुळे तेजाच्या अभावी वाढलेल्या त्रासदायक घटकांचा तेजाच्या बलावर नाश होतो.




शेवटी संस्कृती म्हणजे बाजरीची भाकरी .... वाग्यांचे भरीत ....
गणपती बाप्पा मोरयाची मुक्त आरोळी.
केळीच्या पानातली भाताची मूद आणि त्यावरील वरण ...
उघड्या पायांनी तुडविलेला पंचगंगेचा काठ ...
मारुतीच्या देवळात एक दमात फोडलेल्या
नारळातले उडालेले पाणी ...
दुसऱ्याचा पाय चुकून लागल्यावर देखील
आपण प्रथम केलेला नमस्कार ...
दिव्या दिव्या दिपत्कार ...
आजीने सांगितलेल्या भुतांच्या गोष्टी ....
मारुतीची न जळणारी आणि वाटेल
तेव्हा लहान मोठी होणारी शेपटी ...
दसऱ्याला वाटायची आपट्याची पाने ...
पंढरपूरचे धुळ आणि अबीर यांच्या समप्रमाणात मिसळून
खाल्लेले डाळे आणि साखरफुटाणे...
सिंहगडावर भरुन आलेली छाती आणि दिवंगत आप्तांच्या
मुठभर अस्थींचा गंगापर्णाच्या वेळी झालेला स्पर्श ....
कुंभाराच्या चाकावर फिरणाऱ्या गोळ्याला
त्याचे भिजलेले नाजुक हात लागुन घाटदार मडके घडावे
तसा ह्या अदृश्य पण भावनेने भिजलेल्या हातांनी पिंड घडत असतो.
कुणाला देशी मडक्याचा आकार येतो. कुणाला विदेशी कपबशीचा ...

पुण्य जयांच्या उजवाडाने फुलले अन् परिमळले हो ..जीवन त्यांना कळले हो ...
मी पण ज्यांचे पक्व फळापरी सहजपणाने गळले हो ... जीवन त्यांना कळले हो ...



\- पु. ल. देशपांडे


Confidence and Hard-work
is the best medicine to kill
the disease called failure.
It wil make u a successful person





# ऋजु स्वभावाचे संशोधक राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम

जुलै २००२, भारताच्या राष्ट्रपती निवडी विषयीची शोधमोहीम उच्च पातळीवर सुरु होती. दिवसेंदिवस कुतूहल वाढत होते. अनेक नावे चर्चेत येत होती. या शोध मोहिमेची सांगता एका महान संशोधकाच्या नावापाशी झाली. आणि डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम भारताचे राष्ट्रपती झाले. ही घटना साऱ्या भारतीयांना दिलासा देणारी तर ठरलीच, पण ज्ञान–विज्ञान, संस्कृतीचाही गौरव करणारी ठरली.

तामिळनाडूतील रामेश्वरम हे डॉ. अब्दुल कलाम यांचे गाव. जैनुलबदीन आशियम्मा दांम्पत्याच्या पोटी ते जन्माला आले. एक आदर्श जोडपे म्हणून परिसरात त्यांचा नावलौकिक होता. डॉ. कलाम यांचे वडील नावाडी होते. त्यांना शिक्षणाचा गंध नव्हता, पण उपजत शहाणपणाचा सुगंध लाभला होता. आपल्या मुलाने 'कलेक्टर' व्हावे, ही त्यांची आंतरिक इच्छा होती. परिस्थिती बेताची, पण मनाची श्रीमंती दांडगी होती. डॉ. कलामांच्या प्रत्येक यशामागे जिद्द दिसते. लहानपणी कष्टाची कामे करुन त्यांनी शाळेची फी भागविली आहे. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात चिंचोके गोळा करुन ते एका दुकानात देत असत. त्या बदल्यात एक आणा त्यांना मिळत असे. चालत्या रेल्वेगाडीतून फेकलेले वर्तमानपत्रांचे गठ्ठे गोळा करण्याचे काम त्यांनी केले आहे. कष्टाच्या कमाईत धन्यता असते हे खरे, पण ज्या वयात त्यांना हे कष्ट उपसावे लागले, ते पाहिले म्हणजे डॉ. कलामांच्या खडतर बालपणाची कल्पना येते. शाळेमध्ये कुशाग्र असणाऱ्या अब्दुलांना याच वयात वर्गश्रेष्ठत्वाचे चटके सोसावे लागले.

अब्दुलांचे वडील प्रेमळ होते, पण वेड्या प्रेमापायी त्यांनी मुलांच्या कर्तृत्वाला घराचे कुंपण घातले नाही. 'सिगल पक्षी घरटे सोडून एकटे दूरवर उडत जातात. आणि नवे प्रदेश शोधतात. तसे या मातीचा आणि इथल्या स्मृतींचा मोह सोडून तुझ्या इच्छाआकांक्षा जिथे पूर्ण होतील, तिथे तुला जायला हवे' ही जाणीव वडिलांनी करुन दिली. रामनाथपुरममधल्या 'श्वार्झ' हायस्कूलचे शिक्षण पूर्ण करुन अब्दुल कलाम १९५० मध्ये त्रिचीच्या सेंट जोसेफ कॉलेजमध्ये दाखल झाले. तिथे बी.एस्सी झाले. नंतर मद्रास इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी या अभियांत्रिकी कॉलेजमध्ये प्रवेशासाठी अर्ज केला. तिथे निवड झाली खरी, पण निवडीचा आनंद व्यक्त करावा अशी परिस्थिती नव्हती. महागडे शिक्षण पदरात पाडून घेण्यासाठी कोणापुढे हात पसरावा समजत नव्हते. अशा वेळी त्यांची बहीण पुढे आली. लाडक्या भावासाठी आपल्या सोन्याच्या बांगड्या, गळ्यातील साखळी बँकेत गहाण ठेवून तिने फीची सोय केली. याच क्षणी अब्दुलांनी शपथ घेतली, स्वकमाईतून दागिने सोडविण्याची नि अथक अभ्यास करुन शिष्यवृत्ती मिळवण्याची ! आपले सोन्याचे दागिने देताना डॉ. कलामांच्या बहिणीला त्यावेळी हे वाटले असेल की आपला भाऊ एक दिवस भारतमातेच्या गळ्यातला दागिना व्हावा ! बहिणीच्या डोळ्यांतले स्वप्न त्यांनी जिद्दीने साकार केले.

अनेक निष्णात शास्त्रज्ञांसमवेत डॉ.कलाम यांनी अवकाशयाने, क्षेपणास्त्रांची निर्मिती केली. अवकाशशास्त्र तंत्रज्ञानाचा पाया घालणारे ते स्फूर्तिस्त्रोत झाले. जादवपूर विद्यापीठाने डॉ. नेल्सन मंडेलांसमवेत डॉ. कलामांना 'डॉक्टर ऑफ सायन्स' पदवी प्रदान केली. आय.आय.टी. मुंबईनेही असाच गौरव केला. 'पद्मभुषण', 'भारतरत्न' किताब त्यांच्या दिशेने धावत आले. त्यापूर्वी म्हणजे १९९० मध्ये प्रजासत्ताकदिनी त्यांना 'पद्मविभुषण' देण्याची घोषणा झाली, तेव्हा ते त्रिवेंद्रमच्या दहा बाय बाराच्या खोलीत पुस्तकांच्या गराड्यात हरविले होते. डामडौल त्यांच्या रक्तात नाही. तरुणांना लाजवेल असा सळसळता उत्साह व खळखळते हास्य त्यांनी वयाच्या ७४ व्या वर्षीही जपले आहे.

भारत हा जागतिक महासत्ता होण्यासाठी गरज आहे ती, देशप्रेम व अथक परिश्रम व सकारात्मक दृष्टिकोनाची. देशातील आबाल वृध्दांच्या मनात प्रेरणा व स्फूर्तीचे स्फुल्लिंग चेतविणाऱ्या डॉ. कलामांच्या भाषणाचा हा गोषवारा.

आपल्याकडची प्रसारमाध्यमे एवढी नकारात्मक का असतात ? भारतामध्ये आपल्याला आपल्याच क्षमता आणि उपलब्धता ओळखण्यात कमीपणा का वाटतो ? आपला देश खूप महान आहे, आपल्याकडे कितीतरी आपली यशोगाथा

सांगतील अश्या गोष्टी आहेत पण आपणच त्यांची दखल घेत नाही. असं का?

दुग्ध व्यवसायात आपला जागतिक क्रमवारीत प्रथम क्रमांक लागतो. आपण रिमोट सेन्सिंग उपग्रह तयार करण्यामध्ये सुध्दा प्रथम क्रमांकावर आहोत. गव्हाचे आणि तांदळाचे उत्पादन यात जागतिक क्रमवारीत आपला द्वितीय क्रमांक लागतो. डॉ. सुदर्शन यांच्याकडे बघा, त्यांनी एका आदिवासी खेड्याचे रुपांतर एका स्वबळावर आणि स्वयं प्रेरणेवर चालणाऱ्या चांगल्या गावात केलं आहे. अश्या उपलब्धतांची आपल्याकडे लक्षावधी उदाहरणे आहेत. पण प्रसारमाध्यमांना फक्त वाईट बातम्या, अपयश आणि आपत्ती या सगळ्याचंच आकर्षण आहे. मी तेल अवीव मध्ये असताना तिथले वर्तमानपत्र वाचत होतो. त्याच्या आदल्याच दिवशी तिथे खूप बॉम्ब हल्ले झाले होते आणि त्या हल्ल्यात खूप व्यक्ती मरण पावल्या होत्या. ते हल्ले 'हमास' या अतिरेकी संघटनेने केलेले होते. पण त्या वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर मात्र अश्या एका ज्यु गृहस्थाचं चित्र होतं कि ज्याने पाच वर्षात वाळवंटात बाग फुलवून हिरवाई निर्माण केली होती. या प्रेरणादायी चित्राने सगळ्यांच्या दिवसाची सुरुवात त्या वृत्तपत्राने करुन दिली होती. बॉम्ब हल्ले आणि त्यात मेलेली माणसे, हल्ले कसे झाले त्याविषयीच्या कथा हे सगळे आतील पानांवर, इतर बातम्यांमध्ये प्रकाशित केले होते.

भारतामध्ये आपण वृत्तपत्रांमध्ये रोज, पहिल्या पानांवर फक्त मृत्यू, दहशतवाद, गुन्हे, आजारपणे अश्याच बातम्या वाचतो. आपण इतके नकारात्मक का आहोत ?

अजून एक प्रश्न, एक देश म्हणून आपल्याला कायम परदेशी वस्तूंचे आकर्षण का आहे? आपल्याला परदेशातील टी.व्ही. हवेत, परदेशी कपडे हवेत, आपल्याला परदेशी तंत्रज्ञान हवे एवढ्या आयात केलेल्या वस्तूंचे आपल्याला आकर्षण का आहे? आपल्या हे लक्षात कसे येत नाही कि स्वाभिमान हा स्वयंपूर्णते मधून येत असतो. मी हैदराबादमध्ये एक व्याख्यान देण्यासाठी गेलो असताना एका १४ वर्षाच्या मुलीने मला स्वाक्षरी मागितली. मी तिला तिच्या आयुष्यातील ध्येय विचारलं, ती उत्तरली ''मला प्रगत भारतात रहायचं आहे'' तिच्यासाठी तुम्हाला आणि मला प्रगत भारताची निर्मिती करायची आहे. तुम्ही घोषणा केलीच पाहिजे की, भारत हा काही अप्रगत देश नाही, तर तो एक प्रगत देश आहे.

तुमच्याकडे १० मिनिटे आहेत ? मला काही कटू सत्य घेऊन तुमच्या समोर येऊ द्यात. आहेत का तुमच्याकडे तुमच्या देशासाठी १० मिनिटे? जर असतील तरच पुढे ऐका, पर्याय तुम्ही निवडायचा आहे.

तुम्ही म्हणता की, आपलं शासन तत्पर नाही.

तुम्ही म्हणता की, आपले कायदे खूप जुने आहेत.

तुम्ही म्हणता की, दूरध्वनी काम करत नाहीत, आपल्याकडे रेल्वे हा एक विनोद आहे, हवाईमार्ग सेवा तर अत्यंत वाईट आहे, कोणतीही पत्र वेळेवर आपल्या गंतव्य स्थानापर्यंत पोहोचत नाहीत.

तुम्ही म्हणता की, आपला देश हा एक कुत्र्याचे जेवण आणि एक मोठी कचराकुंडी आहे. तुम्ही म्हणता...म्हणता आणि फक्त म्हणता...पण त्यासाठी तुम्ही काय करता ? समजा, एक सिंगापूरला जाणारा प्रवासी आहे. त्याला ''तुम्ही'' हे नाव द्या, त्याला तुमचा चेहरा द्या. आता तुम्ही विमानतळाच्या बाहेर पडता आहात आणि तुम्ही आंतरराष्ट्रीयस्तरावरील उत्तम व्यक्ती आहात. सिंगापूरमध्ये तुम्ही रस्त्यावर सिगारेटचे थोटूक फेकत नाही आणि रस्त्यावर असलेल्या दुकानात खात पण नाही. तुम्हाला त्यांच्या इतकाच त्यांच्या जमिनीखालील रेल्वेचा अभिमान आहे. तुम्ही साधारणपणे संध्याकाळी ५ ते ८ च्या दरम्यान Orchard Road वरुन (आपल्या माहीम कॉजवे किंवा पेडर रोड सारखा) वाहन चालविण्यासाठी $5 (अंदाजे रु. ६०) खर्च करता. जर तुम्ही एखाद्या उपहारगृहात किंवा खरेदीच्या मोठ्या दुकानात अपेक्षित वेळेपेक्षा जास्त वेळ थांबला असाल तर स्वतःचा हुद्दा किंवा स्वतःचे समाजातील स्थान याची ओळख करुन न देता वाहनतळामध्ये येऊन जास्तीचे तिकीट काढता. सिंगापूरमध्ये तुम्ही काही सुध्दा बोलत नाही. हो कि नाही ?

दुबईमध्ये रमजानच्या महिन्यात सार्वजनिक ठिकाणी खाण्याची हिम्मत पण तुम्ही करणार नाही.

जेद्दाहमध्ये तुमच्या डोक्याला फडकं बांधल्याशिवाय तुम्ही बाहेर जाण्याची हिम्मत करणार नाही.

तुम्ही लंडनमध्ये दूरभाष केंद्रातील एखाद्या व्यक्तीला आपल्या एस.टी.डी. आणि आय.एस.डी. कॉल्स चे बिल दुसऱ्याच्या नावे पाठवण्याची व्यवस्था करण्यासाठी १० पौंड (अंदाजे रु. ६५०) लाच देण्याची हिम्मत करणार नाही. तुम्ही वॉशिंग्टन मध्ये गाडी चालवताना ५५ मैल प्रति तास (८८ कि.मी.) हा वेग न पाळण्याची हिम्मत करणार नाही आणि जर तो न पाळताना पकडले गेलात तर वाहतूक पोलीसाला 'तुला माहित नाही का मी कोण आहे ते?' 'मी अमक्या अमक्याचा मुलगा आहे.' 'तुझे दोन पौंड घे आणि गप्प बस.' असं बोलण्याची हिम्मत करणार नाही.

ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये तुम्ही नारळाच्या रिकाम्या करवंटया कचराकुंडी शिवाय इतरत्र फेकायची हिम्मतच करणार नाही. टोकियोच्या रस्त्यावर तुम्ही तोंडातील पानाची पिंक का टाकत नाही? बोस्टनमध्ये तुम्ही परीक्षेत कॉपी का करत नाही ? तसेच खोटी प्रमाणपत्रे पण का मिळवत नाही? आपण अजुनही त्या 'तुम्ही या व्यक्ती विषयीच बोलत आहोत.'

तुम्ही परदेशातील व्यवस्था पाळता त्यांचा आदर करता मग आपल्या देशातील व्यवस्थांच्या बाबतीत का नाही? ज्या क्षणी तुम्ही भारताच्या भूमीवर पाय ठेवता त्या क्षणापासून कागद आणि सिगारेटची थोटकं तुम्ही रस्त्यावर टाकायला सुरुवात करता. जर तुम्ही एका अनोळखी देशाचे मान्यवर नागरिक म्हणून वावरु शकता तर तेच तुम्ही भारत देशाचे का नाही बनत ?

एकदा एका मुलाखतीच्या वेळी मुंबईतील माजी महापालिका आयुक्त श्री.तिन्हईकर यांनी एक मुद्दा मांडला होता ''श्रीमंत लोकांची कुत्री रस्त्यावरुन त्यांची अमूल्य अशी सामग्री सगळीकडे टाकत जातात.'' ते म्हणाले ''आणि नंतर हेच लोक मागाहून अधिकाऱ्यांना दोष देतात की ते तत्पर नाहीत, रस्ते घाण असतात. अधिकाऱ्यांकडून त्यांची अपेक्षा तरी काय आहे? प्रत्येक वेळी जेव्हा त्यांच्या कुत्र्याला बहिर्दिशेला जायची इच्छा होईल तेव्हा हातात झाडू घेऊन रस्त्यावर उतरावे काय? अमेरिकेमध्ये प्रत्येक कुत्र्याच्या मालकाला त्याच्या कुत्र्याने शी केल्यावर ताबडतोब स्वच्छ करण्याचे नियमच आहेत. अगदी जपानमध्ये सुध्दा तेच नियम आहेत. भारतीय नागरिक हे करतील काय?'' त्यांचं बरोबर आहे. आपण सरकार निवडण्यासाठी मतदान करतो आणि नंतर आपल्या जबाबदारी पासून पळून जातो.

आपण मागे बसून लाड करुन घेण्याची आणि शासनानेच सगळं करण्याची वाट बघत असतो, आणि आपला सहभाग केवळ नकारात्मकच असतो. आपण शासनाकडून स्वच्छतेची अपेक्षा करतो पण आपण रस्त्यावर कचरा टाकण्याचे कधीच थांबवणार नाही आणि रस्त्यावर पडलेला कागदाचा तुकडा उचलून कचऱ्याच्या टोपलीत कधीच टाकणार नाही, आपण रेल्वेकडून स्वच्छ अशा स्वच्छतागृहांची अपेक्षा करतो पण आपण स्वच्छतागृहांचा योग्यरित्या वापर करायला कधीच शिकणार नाही, आपल्याला इंडिअन एअर लाईन्स, एअर इंडिया कडून उत्तम जेवण आणि स्वच्छतागृहांची अपेक्षा करतो पण आपण चोरी करण्याची एक सुध्दा संधी सोडणार नाही.

हे अगदी सेवक वर्गालासुध्दा लागू आहे की ज्यांना त्या सेवा सार्वजनिक करण्याची मुभा नाही. जेव्हा आपल्या समोर मुली आणि स्त्रियांवरील अन्याय, अत्याचार, हुंडाबळी या सारखे ज्वलंत प्रश्न येतात तेव्हा आपण मोठ्याने त्यांचा सार्वजनिकरित्या निषेध व्यक्त करतो, पण स्वत:च्या घरात त्याच्या बरोबर उलट वागतो. या मागचं आपलं कारण काय?'' सगळी व्यवस्थाच बदलायला हवी, मी एकट्यानेच माझ्या मुलाचा हुंडा घेण्याचा हक्क का सोडायचा ? मी एकट्याने बदलून काय फरक पडणार?'' मग, कोण बदलणार ही व्यवस्था? एखाद्या व्यवस्थेमध्ये नेमकं कोण असतं? अतिशय सोयीस्कररित्या या व्यवस्थेमध्ये आपण सोडून सगळे असतात. आपले शेजारी, इतर घरे, इतर शहरे, इतर समाज आणि शासन. पण तुम्ही आणि मी नक्कीच नाही.

पण जेव्हा आपल्यावर काही सकारात्मक योगदान देण्याची वेळ येते तेव्हा आपण आपल्या कुटुंबासह एका सुरक्षित कोशामध्ये स्वत:ला बदिस्त करुन घेतो आणि दूर असलेल्या देशांकडे पाहतो. आणि कोणीतरी 'श्री.सभ्य' येतील आणि आपल्यासाठी त्यांच्या जादूच्या हातानी जादुई काम करतील याची वाट बघत बसतो किंवा आपण या देशाला सोडून पळून जातो. एखाद्या आळशी माणसासारखे, एखाद्या कुत्र्याच्या भितीने जीव खाऊन पळाल्यासारखे आपण अमेरिका या देशात आणि त्यांच्या वैभवाचे, त्यांच्या व्यवस्थेचे गोडवे गायला लागतो. पण तेच न्यूयॉर्क जेव्हा असुरक्षित बनते तेव्हा आम्ही तिथून सुध्दा पळून जातो आणि इंग्लंड मध्ये येतो. जेव्हा इंग्लंडमध्ये बेकारी अनुभवतो तेव्हा आपण ताबडतोब पुढची विमानसेवा पकडून तिथून बाहेर पडतो गल्फमध्ये जाण्यासाठी. जेव्हा गल्फमध्ये युध्द होतं तेव्हा आपण भारत सरकार कडून संरक्षणाची आणि परत स्वगृही आणण्याची मागणी करतो. प्रत्येकजण आपल्या देशाला दुषणे देणे आणि त्याचे वस्त्रहरण करणे एवढेच करतो. कोणी आपल्या व्यवस्थेला उर्जितावस्था आणण्याविषयी विचार करत नाही. आपलं मन, बुध्दी फक्त पैशाशी जोडली आहे.

प्रिय भारतीयांनो,

मी जे.एफ.केनेडी यांनी त्यांच्या अमेरिकेतील बांधवाना उद्देशून उच्चारलेल्या शब्दांचा भारतीयांच्या संदर्भात पुनरुच्चार करतो.....

''विचारा की तुम्ही भारतासाठी काय करु शकता?
चला अश्या गोष्टी करु ज्यांची भारताला गरज आहे.''



# सामान्यातील असामान्य
# अण्णा हजारे

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात पचनापासून श्वसनापर्यंत अभिसरणापासू उत्सर्जनापर्यंत अनेक क्रिया-प्रतिक्रियांचा समावेश होतो. या क्रिया प्रतिक्रियांचे संगीत म्हणजेच जीवन या संगिताची मैफल कधी रंगते तर कधी भंगते. व्यक्तीजीवनाची मैफल रंगते तेव्हा तिला आपण आरोग्य नाव देतो. परंतू जेव्हा समाज जीवनाचा तोल ढळतो तत्वांना ग्लानी येते, नितीचा विपर्यास होतो तेव्हा या समाजाला सावरणाऱ्या, त्याच्या उन्नतीसाठी संपूर्ण देह, जीवन चंदनासम झिजविणाऱ्या व्यक्तीमत्त्वांचा जन्म होतो. असेच गरीबांच्या आर्तरवाने व्यथित चित्त होणारे व्यक्तीमत्व म्हणजे थोर समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे माहितीचा अधिकार, भ्रष्टाचार विरोधी आंदोलन, लोकपाल विधेयकाच्या माध्यमातून भारतातील आबालवृध्दांच्या गळ्यातील ताईत बनलेले सर्वांचे लाडके अण्णा किसन बाबुराव हजारे उर्फ अण्णा हजारे म्हणून सर्वांना सुपरिचित असणाऱ्या अण्णांचा जन्म १५ जून १९३७ रोजी भारताच्या मुंबई इलाख्यातील भिंगारमधील खोमणे वाडयात झाला. भिंगार म्हणजे महाराष्ट्राच्या अहमदनगर जिल्ह्यातील छोटेसे गाव अण्णांचे वडील आयुर्वेद आश्रम औषध शाळेत मजूर म्हणून काम करत तर त्यांचे आजोबा ब्रिटीश फौजेत सैनिक होते आजोबांच्या मृत्युनंतर अण्णांचे वडील आपल्या कुटुंबासह १९५२ मध्ये राळेगण सिध्दी या आपल्या मूळ गावी वास्तव्यास आले

अण्णांना सहा भावंडे अन् घरची परिस्थिती अत्यंत गरीबी आणि हलाखीची, त्यांमूळे त्यांच्या आत्याने अण्णांचे पालनपोषण करण्याचे ठरविले आणि त्यांच्या शिक्षणासाठी त्यांना मुंबईला नेले. आत्याच्या कुटुंबाची परिस्थिती बेताचीच त्यामूळे त्यांच्या कुटुंबास मदत करण्याच्या उद्देशाने अण्णांनी सातवीनंतर शाळा सोडली व मुंबईमध्येच दादरजवळ फुले विकण्याचा व्यवसाय सुरु केला. परंतू रक्तामध्येच देशप्रेम, वेगळे काहीतरी करण्याची जिद्द असल्याने त्यांचे मन त्या व्यवसायात जास्त दिवस रमले नाही. इ.स. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केलेले असताना मोठ्या प्रमाणात भारतीय सैन्यात भरती सुरु झाली.

किमान शारिरिक पात्रता नसतानाही केवळ प्रचंड इच्छाशक्तीच्या जोरावर अण्णा वयाच्या २५ व्या वर्षी लष्करात भरती झाले. औरंगाबाद येथे प्रशिक्षण घेतल्यानंतर १९६३ मध्ये ते वाहन चालक म्हणून लष्करी सेवेत रुजू झाले. त्यानंतर दोन वर्षातच पाकिस्तानने भारतावर चाल केली. त्यावेळी अण्णांचा मुक्काम पंजाब मधील खेमकरण क्षेत्रात होता. १२ नोव्हेंबर १९६५ रोजी पाकिस्तानी वायुसेनेने भारतीय ठाण्यांवर हल्ले सुरु केले. या हल्ल्यात अण्णांचे इतर सर्व सहकारी शहीद झाले. हे पाहून विषण्ण झालेल्या अण्णांनी जगण्यातील अर्थ शोधण्यास सुरवात केली. आपल्या प्रवासात नवी दिल्ली स्थानकावरील एका दुकानात त्यांच्या हाती स्वामी विवेकानंदाचे ''राष्ट्रनिर्मितीसाठी युवा पिढीला आवाहन'' हे पुस्तक पडले. या पुस्तकांचे वाचन करताना त्यांना समजले की अनेक संतांनी इतरांच्या सुखासाठी, जनतेच्या कल्याणासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग केला. यापासून प्रेरणा घेऊन त्यांनाही जनसेवेची ओढ जाणवू लागली. आपलेही आयुष्य समाजाच्या

सेवेसाठीच आहे याची त्यांना जाणीव झाली. आणि त्यामूळे १९७८ मध्ये लष्कराच्या सेवेचा राजीनामा देऊन ते आपल्या मूळ गावी राळेगण सिध्दीला पोहचले या कालावधीतच त्यांचा भीषण अपघात झाला. मृत्यूशी अगदी जवळून गाठ पडली. या अपघातातून बचावल्यानंतर त्यांना प्रकर्षाने जाणवू लागले की उर्वरीत आयुष्याचा उपयोग समाजसेवेसाठी करावा यासाठीच देव व दैव आपल्याला इशारा देत आहे

अण्णांचे मूळ गाव राळेगण सिध्दी म्हणजे कायमचे दुर्लक्षित आणि दुष्काळी गाव पाण्याचा दुष्काळ आणि गरीबी व निराशेचा सुकाळ असणारे गाव परंतू अण्णांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने अथक परिश्रम व प्रयत्नातून गावाचा कायापालट केला आर्थिक अन् सामाजिक स्तरावर गावातील परिस्थिती सुधारली. तंत्रज्ञान व औद्योगिकीकरण यांचा आधार न घेता केवळ अतोनात कष्ट आणि सहकार यांच्याद्वारेच गावातील गरीबी दूर करण्यात यश मिळवले. सैन्यातील नोकरी सोडल्यानंतर अण्णांनी गावातील युवकांना संघटित केले व तरुण मंडळाची स्थापना केली. यादवबाबा मंदीरात सर्वांनी दारु न पिण्याची शपथ देण्यात आली मद्यपींना मंदीराच्या खांबाला बांधून तरुणांनी चोप दिला

त्याचाच परिणाम म्हणून व्यसनाधीन राळेगण सिध्दी व्यसनमुक्त झाले. गावच्या विकासानंतर अण्णांच्या समाजसेवेच्या कक्षा रुंदावल्या गरीब, वंचित, विधवा यांची परिस्थिती, त्यांची गरीबी यामूळे अण्णांना अतिव दु:ख होई समाजाला लागलेली भ्रष्टाचाराचा निपटारा करण्यासाठी त्यांनी वेळोवेळी आंदोलने केली. वेळप्रसंगी कारावासही भोगला १९८० पासून आतापर्यंत अण्णांनी १६ उपोषणे केली. प्रत्येक वेळी सरकारला




त्यांच्यासमोर नमते घ्यावे लागले. यांच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या यापैकी १३ उपोषणे राज्य सरकारच्या विरोधात करण्यात आली. अण्णांनी आतापर्यंत ११६ दिवसापेक्षा जास्त काळ उपोषण केले. अण्णांच्या या उपोषणामूळे सरकारने ४५० अधिकाऱ्यांवर कारवाई केली तर ६ मंत्र्यांना आपले मंत्रीपद गमवावे लागले.

अण्णांनी पहिले आंदोलन व उपोषण १९७९ मध्ये अहमदनगर जिल्हा परिषदेसमोर केले. शासकीय यंत्रणेकडून हेळसांड होऊन गावाला वेठीस धरणाऱ्या प्रशासनाविरुध्द गावातील शाळेला मान्यता मिळविण्यासाठी हे उपोषण होते. एका दिवसातच अण्णांनी आपल्या उपोषणाने सरकारी यंत्रणेला झुकविले व त्यांची मागणी मान्य झाली त्यांच्या सामाजिक चळवळीतील हे पहिले मोठे यश 'नापासांची शाळा' म्हणून ही शाळा महाराष्ट्राला परिचित आहे यानंतर ग्रामविकास योजना, गावातील पाणी पुरवठा ठिबक सिंचनातील त्रुटी, शेतकऱ्यांना सिंचनासाठी वीज यासारख्या प्रश्नांवर उपोषणे केली आणि प्रत्येक वेळी सरकारला झुकते घ्यावे लागले.

२० नोव्हेंबर १९९६ मध्ये अण्णांनी भाजप शिवसेनेच्या सरकारच्या भ्रष्ट मंत्र्याच्या विरोधात उपोषणाचे शस्त्र उपसले. या १२ दिवसांच्या उपोषणामूळे महादेव शिवणकर व शशिकांत सुतार या मंत्र्यांना राजीनामा दयावे लागले. निरपेक्ष वृत्तीने केलेल्या समाजकार्यामूळे अण्णांना समाजात, महाराष्ट्रात आदराचे स्थान प्राप्त झाले. सन २००३ मध्ये कॉंग्रेस राष्ट्रवादीचे आघाडीचे सरकार असताना अण्णांनी केलेल्या उपोषणामूळे माहितीचा अधिकार मिळाला व त्याबरोबरच

बदल्या आणि दफ्तर दिरंगाईचा कायदा आला. तर २००६ च्या उपोषणामूळे सुरेश जैन पद्मसिंह पाटील, नवाब मलिक यांना आपल्या मंत्रीपदांचे राजीनामे दयावे लागले.

जनलोकपाल कायदयाच्या मंजुरीसाठी केंद्र सरकारच्या विरोधात अण्णांनी ५ ते ९ एप्रिल २०११ रोजी दिल्लीच्या जंतर-मंतर मैदानावर उपोषण केले. हे आंदोलन भ्रष्टाचाराच्या विरोधातले असल्याने साहजिकच भ्रष्टाचाराने पोळलेल्या जनसामान्यांनी अण्णांना उस्फूर्त पाठींबा दिला. अण्णांचे समाजसेवेचे कार्य देशव्यापी बनले. भ्रष्टाचार विरोधी लोकपाल कायदयासाठी संपूर्ण देशात मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली. देशभरात गावोंगावी, शहरात मोर्चे, रॅली, कॅन्डल मार्च काढून लहान मुलापासून ते तरुण महिला, विद्यार्थी, जेष्ठ नागरिक अशा समाजाच्या सर्व थरातील घटकांनी अण्णांच्या आंदोलनाला भरभक्कम पाठींबा व्यक्त केला होता.

आयुष्यभर अविवाहीत राहून समाजाच्या प्रपंचासाठी आपल्या रक्ताचा कण न कण, आयुष्याचा क्षण न क्षण देणारे अण्णा सर्वांनाच आदरणीय आणि वंदनीय आहे कारण मध जमविणारी मधमाशी मधासाठी आसुसते का ? जळणारी दिव्याची वात कधी कुणावर रुसते का ? सुंगध उधळणारे फुल स्वतःसाठी फुलते का ?

तद्वतच अण्णांचे आयुष्य, त्यांचे विचार, त्यांची उपोषणे आंदोलने तुमच्या आमच्यासाठीच आहेत म्हणूनच पद्मभूषण अण्णांच्या, या भारमातेच्या थोर सुपुत्रांच्या प्रत्येक कार्यात आपण सहभागी होऊन या, त्यांना समर्थ साथ देऊ या.

**वंदे मातरम् !!**

**डॉ.दिपक पाटील**





# जागतिक किर्तीचे महान शास्त्रज्ञ डॉ.जयंत नारळीकर

भारत एक राष्ट्र म्हणून उदयास येण्यामागे ज्या काही ठराविक गोष्टी कारणीभूत आहेत त्यातीलच एक म्हणजे आम्ही विज्ञान-तंत्रज्ञानामध्ये घेतलेली गरुडझेप जी आम्हांला २०२० ची महासत्ता बनविण्यासाठी सतत प्रेरणादायी राहील. भारत देशाला गणित तज्ञांची आणि खगोल शास्त्रज्ञांची एक मोठी परंपरा आहे. त्यातही खगोलशास्त्रामध्ये आज जगभरात आपला दबदबा कायम आहे. जगाचे लक्ष वेधून घेणारे उच्च कोटीचे खगोल वैज्ञानिक ही भारताची वेगळी अशी ओळख आहे. याची सुरुवात तर महाभारत व रामायण अशा पुराणकाळापासूनच चालू झालेली, कारण भगवान श्रीकृष्णांनी बसल्या जागेवरुन आपल्या आईला सर्व ब्रम्हांडाचे दर्शन घडविले होते. त्याच श्रीकृष्णांचा वारसा पुढे चालवत अधिक तन्मयतेने जगाच्या नकाशात खगोल शास्त्रातील आम्हीच विजेते आहोत अशी बिरुदावली मिरवणारे व समस्त जगाला खगोल विज्ञानातील नाविन्यपूर्ण कल्पना उलगडून दाखविणारे आजचे आधुनिक श्रीकृष्ण म्हणजे हिरा जसा चमकतो तसे सतत त्याच उमेदीने चमकणारे थोर भारतीय शास्त्रज्ञ म्हणून ज्यांचं वर्णन कितीही केले तरी पुरेसे नसणारे असे भारताचे लाडके खगोल वैज्ञानिक ''डॉ.जयंत नारळीकर'' डॉ.जयंत नारळीकर हे नाव ऐकताच प्रत्येकाच्या मनात काहूर माजते ते म्हणजे 'अवकाश व तारे' यांचा मिलाप. अशा थोर शास्त्रज्ञाचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी महाराष्ट्रातील एक सुगम असा भाग म्हणजे 'कोल्हापूर' येथे झाला. त्यांचे संपूर्ण नाव 'डॉ. जयंत विष्णु नारळीकर'. लहानपणापासूनच त्यांना गणित व खगोलशास्त्र यांचा वारसा लाभलेला कारण त्यांचे वडील विष्णु वासुदेव नारळीकर हे एक प्रसिद्ध गणितीय तज्ञ व तसेच वाराणसी येथील बनारस हिंदू विद्यापीठाच्या गणित विभागाचे ते प्रमुख होते. जसे म्हणतात ना अनुभव हाच अनुभवाच्या कामी येतो. असाच अनुभव डॉ. जयंत नारळीकरांच्या कामी आला. वडीलांकडून मिळालेला तोच गणिताचा व्यासंग पुढे डॉ. नारळीकरांना त्यांच्या अभ्यासकार्य व संशोधनात कामी आला. आपल्या देशात गणित तज्ञांची व खगोल वैज्ञानिकांची मोठी परंपरा आहे. आर्यभट्टापासून चालत आलेली ही परंपरा आजही पुढे चालू ठेवण्याचे महान कार्याचे श्रेय मानले जाते ते अर्थात ''डॉ.जयंत नारळीकरांनाच'' डॉ. जयंत नारळीकरांचे वडील हे एक गणितीय तज्ञ; परंतु त्यांना ओढ होती ती विज्ञानाची मी एक महान असा संशोधक होणार व तुमचे गणितीय ज्ञान मी त्या कामी वापरणार अशीच खूणगाठ मनाशी बांधून त्यांचा लहानपणाचा प्रवास सुरु झाला. डॉ. जयंत नारळीकरांचे शालेय शिक्षण हे वाराणसी येथेच झाले. त्यानंतर विज्ञानाच्या ओढीमुळे त्यांनी "Bachelar of Science" म्हणजे विज्ञान शाखेमध्ये प्रवेश घेतला. त्यात गोडी निर्माण करता-करता ते विज्ञानमय झाले व मनात पक्का निश्चय केला की, आपण याच क्षेत्रात एक उत्तुंग शिखर पार करायचे जे जगाला कोणत्याही टोकावरुन दृश्य असेल. म्हणजे जगाला मी नाही तर एक अवाढव्य असे ते एक योगदान लक्षात राहील. हाच निर्धार मनाशी पक्का करत ते विज्ञान जगले, अनुभवले. त्यातूनच प्रेरणा घेत ते १९५७ मध्ये बनारस हिंदु विद्यापीठाची बी.एस्सी. पदवी ही प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते ब्रिटनमधील नामांकित अशा 'केंब्रीज' विद्यापीठात प्रवेश घेतला. त्याकाळी अशा मोठ्या विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठी प्रवेश परिक्षा असायची व गुणोत्तर अगदी कमी असायचे. परंतु जिद्दीच्या जोरावर व कणखर मानसिकतेच्या बळावर त्यांनी ते आव्हान सहज पेलून आम्ही नव्या जगाची मुहूर्तमेढ आमच्या मातीत रोवू या निर्धाराने त्यांनी उच्च शिक्षणासाठी केंब्रीज विद्यापीठात प्रवेश घेतला. केंब्रीज विद्यापीठातुन त्यांनी बी.ए., एम.ए. आणि पी.एच.डी. या पदव्या

मिळवल्या. त्याच्या जोरावर त्यांना त्या काळी 'रँग्लर' ही पदवी देऊन गौरविण्यात आले. तद्नंतर त्यांना खगोलशास्त्राचे टायसन मेडल व इतर अनेक बक्षिसे मिळाले. त्यांनी 'सर फ्रेड हॉईल' या थोर खगोल शास्त्रज्ञ संशोधक यांच्या मार्गदर्शनाखाली पी.एच.डी. ही पदवी मिळविली होती. स र फ्रे ड हॉईल यांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना त्यांनी चिकाटी, मेहनत व बुद्धीच्या जोरावर आपल्यामध्ये काही तरी वेगळं आहे हे दाखवून दिले. त्याचाच परिणाम की काय चक्क सर फ्रेड हॉईल हे डॉ.जयंत नारळीकरांच्या बुद्धिमत्तेने प्रभावित झाले. गुरुंना शिष्याबद्दल उच्चकोटीचा आदर वाटू लागला म्हणूनच तर १९६६ साली जेव्हा सर फ्रेड हॉईल यांनी 'केंब्रीज' येथे 'इन्स्टिटयूट ऑफ थिओरॉटीकल ऍस्ट्रॉनॉमी' नावाची संस्था सुरु केली, त्यात नारळीकरांनाही सन्मानाचे स्थान देऊन टाकले. आपल्या गुरुंचा विश्वास त्यांनी जिद्दीच्या जोरावर मिळवला हा एक प्रेरणास्त्रोतच होता. १९६६ ते १९७२ पर्यंत त्यांनी त्या संस्थेच्या माध्यमातून खूप काही नाविन्य -पूर्ण अशा कल्पना उदयास आणल्या. खूप साऱ्यामोहिमा फत्ते केल्या व त्या करत असतानाच खूप काही आपल्या ज्ञानाच्या समुद्रात मिळून मिसळून घेतले. सर फ्रेड हॉईल व डॉ.नारळीकरांनी खगोल शास्त्रात एकत्र संशोधन केलं गुरुत्वाकर्षणावर त्या दोघांनी मिळून जो सिद्धांत मांडला, तो ''हॉईल-नारळीकर सिद्धांत' या नावाने खगोलशास्त्रात प्रसिद्ध आहे. अल्बर्ट आईनस्टाईनच्या सापेक्षतेच्या सिद्धांताशी साधर्म्य साधणारा असा हा सिद्धांत आहे. दरम्यान डॉ.नारळीकरांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला सदाशिव राजवाडे यांच्याशी झाला. डॉ. नारळीकर व त्यांचे सहकारी के.एम.व्ही.अप्पाराव यांनी असा सिद्धांत मांडला की विश्वामध्ये कृष्ण विवरांप्रमाणे (Black Holes) श्वेत विवरे अस्तित्वात आहेत आणि प्रत्यक्षात ती विवरे नसून द्रव्य आणि ऊर्जा यांची उगमस्थाने आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर खूप काही मिळविल्यानंतर, नाव कमावल्यानंतर त्यांना आपल्या मातृभूमीची आठवण व्याकूळ करुन गेली व त्यांनी मनाशी पक्क केलं. भारतातील खगोल शास्त्रातील संशोधनाला व लोकप्रियतेला गती देण्यासाठी त्यांनी ब्रिटनला निरोप देऊन १९७२ साली भारतात परतण्याचा एक महत्वाकांक्षी निर्णय घेतला. डॉ. नारळीकर हे एक उत्तम वैज्ञानिक तर आहेतच पण ते एक उत्तम साहित्यिकही आहेत. कारण खगोल शास्त्रात महान संशोधन करण्याबरोबरच त्यांनी मराठी-हिंदी साहित्यांत, विज्ञान साहित्याची मोलाची भर टाकली आहे. डॉ. नारळीकर भारतात परत आल्यानंतर त्यांनी मुंबई येथील टाटा मुलभूत संशोधन संस्थेच्या (टी.आय.एफ.आर.) खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून पद स्वीकारले. कालांतराने विद्येचे माहेरघर म्हणून सर्व जगाला परिचित असणाऱ्या पुणे विद्यापिठाच्या 'आयुका' या जगविख्यात संस्थेचे संचालक म्हणून काम पाहत आहेत व आयुकाच्या संशोधन कार्यात चार दशकांहून अधिक कालावधीपासून त्यांचे अंतरिक्ष विज्ञान क्षेत्रात संशोधन सुरु आहे. डॉ. नारळीकरांनी सामान्य माणसाला खगोलशास्त्र सहजपणे समजावे म्हणून अनेक कथा व लेख लिहिले त्यांच्या 'यक्षाची देणगी' या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला आहे. त्यांच्या महान कार्याची दखल अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांनी घेतली. त्यामुळे त्यांना अनेक मान-सन्मान प्राप्त झाले. १९६५ साली त्यांना पद्मभुषण तर २००४ साली पद्मविभुषणने सन्मानित करण्यात आले शिवाय डॉ. शांती स्वरुप भटनागर स्मृती पारितोषिक, एम.पी. बिरला सन्मान आणि फ्रेंच ऍस्ट्रॉलॉजिकल सोसायटीचा पिक्स ज्यूल्स जेन्सन सारखे सन्मानही त्यांना प्राप्त झाले. वैज्ञानिक विषयांत साहित्यिक लिखाण करुन विज्ञानाचा प्रसार करण्यासाठीही त्यांना १९९६ साली जगविख्यात संस्था युनेस्कोने कलिंग पारितोषिक देऊन सन्मानित केले. त्यांची ग्रंथ संपदा आजही खगोलशास्त्रातील संशोधकाना एक ऊर्जेचं स्थान आहे. त्यांनी लिहिलेल्या 'वामन परत आला', 'अंतराळातील भस्मासूर', 'कृष्णमेघ', 'प्रेषित', 'व्हायरस',' यक्षाची देणगी', 'टाईम मशीनची किमया', याला जीवन ऐसे नाव हे कथासंग्रह आजही विज्ञानाला चिरतरुण ठेवण्यात यशस्वी झालेले आहेत तर 'आकाशाशी जडले नाते', 'विमानाची गरुडझेप', 'गणितातील गमती-जमती', 'विश्वाची

रचना', 'विज्ञानाचे रचयिते', 'नभात हसरे तारे' ही विज्ञानातील माहितीपर पुस्तके म्हणजे मराठीतील जपून ठेवावा आणि अगदी कधीही काढून वाचावा असा अतिशय महत्वाचा दस्तऐवज आहे.

डॉ. जयंत नारळीकरांनी ताऱ्यांचे अजब विज्ञान व पृथ्वीच्या वरती होणाऱ्या अगम्य घडामोडी सर्वांच्या आवाक्यात याव्यात म्हणून त्यांनी प्रसार माध्यमांवर मुलाखती दिल्या व सर्व सामान्यांना अंतराळ हे खूप जवळून समजावे हा उद्देश मनात ठेवून ज्यांना जगाची ओळख खूप दुरुन करुन दिली. त्यांनी जवळून जग व जगातील वैविध्य जवळून पाहण्याची संधीच उपलब्ध करुन दिली. डॉ. जयंत नारळीकरांनी दिलेली एक मुलाखत म्हणजे त्यांचे विज्ञानावर असणारे प्रेम केवढे होते ? व का होते ? हेच सांगण्याचा एक तो प्रयत्न. ज्या काळात भारताला महासंगणक मिळू नये असे प्रयत्न प्रगत राष्ट्रांमध्ये चालू होते. त्या काळी त्यांनी दिलेल्या मुलाखतीमध्ये त्यांना एक प्रश्न विचारला ''आता तुम्ही काय करणार?'' त्यावर त्यांनी जिद्दीने उत्तर दिले, ''मला फक्त एक काळा फळा आणि खडू मिळाला तरी माझा विषय शिकवायला तेवढे पुरेसे आहे''. अशी ही कणखर वृत्ती त्यांच्यात भिनलेली आहे.


अल्पावधीतच आपल्या बुद्धीची व महानतेची चुणूक साता समुद्रापलीकडे नेवून ठेवणारे भारतीय तेजोमंडलाचा कोहिनूर हिरा थोर भारतीय खगोल शास्त्रज्ञ 'डॉ. जयंत नारळीकर' यांचे तेज आज, आता व उदयाही असाच प्रकाश देत नाविन्यपूर्ण कल्पना रहस्य उलगडतच राहील.

**प्रा.संतोष टकले**

# बचत पाण्याची .. गरज काळाची




**शहरात पाण्याची गरज १३५ लिटर प्रति माणशी प्रति दिन या दराने काढली जाते. पण प्रत्यक्षात पाण्याचा वापर बदलत जातो. तक्त्यात दैनंदिन कामासाठी लागणाऱ्या पाण्याची टक्केवारी दिली आहे. संडास साफ करण्याकरिता ४५ % पाण्याचा वापर होतो त्याकरिता पिण्यास योग्य असणारे पाणी वापरले जाते.**



# रघुनाथ माशेलकर

साधारणपणे १९५० ते १९६० या दशकातील घटना ! मुंबईच्या युनियन हायस्कूल या शाळेत घडलेली. शाळा तशी गरीब परिस्थितीतली, पण तिथले शिक्षक मात्र श्रीमंत ! धनाने नव्हे बरं ज्ञानाने. तिथेच भावे सर पदार्थविज्ञान शिकवायचे. प्रयोग करुन, विद्यार्थ्यांना अनुभव देऊन शिकवण्यावर त्यांचा विश्वास होता. साबण कसा करायचा, हे पाठ करुन परीक्षेत लिहिलं तर पूर्ण गुण मिळतात हे माहिती असून त्यांनी मुलांना, शिवडीला हिंदुस्तान लिव्हरचा साबणाचा कारखाना बघायला नेलं होतं. एकदा बहिर्गोल भिंगाविषयी शिकवतांना, त्यांनी सर्व मुलांना शाळेबाहेर उन्हात नेलं. भिंग खालीवर करुन, कागदावर एक प्रखर बिंदू मिळवला. त्यावर सूर्यकिरण एकवटले गेले होते. कागद जळू लागला. त्या क्षणी भावे सरांनी, आपल्या एका बुध्दिमान विद्यार्थ्याला हाक मारली, 'माशेलकर, तूही जर या भिंगाप्रमाणे, तुझ्यातल्या सर्व शक्ती एकवटल्यास तर जगात काहीही मिळवू शकशील'. या घटनेने, जीवनात यशस्वी होण्याची गुरुकिल्ली माशेलकरांच्या ओंजळीत पडली आणि माशेलकरांसारखा एक प्रतिभावंत वैज्ञानिक भारताच्या ओंजळीत ! सूर्यकिरणं समांतर जाऊ दिली तर त्यांच्यात प्रचंड शक्ती असूनही त्याचा वापर होत नाही. ही शक्ती एकवटली तर मात्र किमया घडवू शकते, हे तत्वज्ञान, छोट्या रघुनाथच्या मनात खोलवर रुजलं. पुढे हेच रघुनाथ माशेलकर, सी.एस.आय.आर. चे प्रमुख झाले. प्रमुखपदाची सूत्रं हातात घेतली, तेव्हाही त्यांच्या मनात हीच भिंगाची घटना घुटमळत होती. त्या वेळी सी.एस.आय.आर. मध्ये २८,००० लोक कार्यरत होते. देशभर जागोजागी प्रयोगशाळा वसवल्या होत्या. परंतु त्या अपेक्षितपणे काम करत नव्हत्या. माशेलकरांनी व्हिजन नावाची योजना आखली. चाळीस प्रयोगशाळांचं समांतर चालणं थांबवून, त्यांना एका ध्येयाने आणि काम करण्याच्या एका विशिष्ठ पध्दतीने बांधलं आणि मग त्यातून निर्माण झालं, भारतीय वैज्ञानिक संशोधनाचं एक अचाट पर्व ! एका सृजनशील शिक्षकाने, एका विद्यार्थ्याला दिलेल्या गुरुमंत्राने, भारताच्या प्रगतीच्या इतिहासात मोलाची कामगिरी घडवली.

रघुनाथ माशेलकरांचा जन्म कोकणातल्या माशेल गावाचा. बालपण मुंबईत गेलं. मुंबईतल्या पालिकेच्या शाळेतल्या शिक्षकांनी माशेलकरांचं आयुष्य घडवलं. त्यांच्या आई, हे त्यांचं प्रमुख प्रेरणास्थान ! शिवणकाम किंवा मिळेल ते काम करुन माशेलकरांच्या आई काही कमाई करत असत. एकदा त्या गिरगावातल्या कॉंग्रेस भवनात काम मागण्यासाठी गेल्या. संबंध दिवस तिथे उभं राहूनदेखील त्यांना काम दिलं गेलं नाही. त्या कामासाठी तिसरी उत्तीर्ण असणं आवश्यक होतं आणि माशेलकरांच्या आईचं तेवढं शिक्षण नव्हतं खोटं बोलून त्यांना कदाचित ते काम मिळवता आलं असतंही. पण तसं न करता, त्यांनी स्वतःच्याच मनाशी निर्धार केला – आज माझं शिक्षण नाही म्हणून मला काम मिळालं नाही, पण माझ्या मुलाला मात्र मी जगातलं सर्वोच्च शिक्षण देईन. हा निर्धार पुरा करण्यासाठी त्यांनी प्रचंड कष्ट घेतले. अकरावीच्या परीक्षेत रघुनाथ माशेलकर बोर्डाच्या मेरिटमध्ये आले. पण परिस्थितीमुळे त्यांनी पुढे न शिकण्याचं ठरवलं. इथेही आईच्या आग्रहामुळे त्यांनी बी.केम. ला प्रवेश घेतला आणि १९६९ साली मुंबई विद्यापीठाच्या रसायन अभियांत्रिकी विभागाच्या तत्कालीन संचालक प्रा. एम.एम. शर्मा या अत्यंत सृजनशील संचालकाच्या मार्गदर्शनाखाली, माशेलकरांनी आपली पी.एच.डी. ची

पदवी प्राप्त केली. युरोपमधील सल्फोर्ड विद्यापीठात जाऊन पोस्ट डॉक्टरेट संशोधनही केलं.

**आयुष्यातली कमीतकमी १२ वर्ष तरी अनवाणी पायांनी चालणारा, सार्वजनिक दिव्याखाली अभ्यास करणारा हा माणूस, पुढे इंग्लंडमध्ये, जिथे न्यूटनने सही केली आहे. त्या पुस्तकात स्वाक्षरी करण्याचा सन्मान मिळवणारा पहिला महाराष्ट्रीय ठरला.**
डॉ.माशेलकरांचा उल्लेख आला की त्याबरोबर लगेचंच आठवते ती त्यांनी जिंकलेली आगळीवेगळी हळदीघाटची लढाई ! आपल्या सर्वांनाच हळदीचे औषधी गुणधर्म माहिती आहेत. जखम झाल्यावर त्यावर हळद लावण्याचा रामबाण उपाय, आपल्या देशात पूर्वापार वापरला जातोय. असं असतांना, एक दिवस सकाळी पेपर वाचत असतांना, एका विचित्र बातमीनं डॉक्टरांचं लक्ष वेधलं. अमेरिकेने हळदीच्या औषधी वापरावर आपले हक्क असल्यानं त्या बातमीत म्हटलं होतं. थोडक्यात अमेरिकेने हळदीचं पेटंट घेतलं होतं. बातमी वाचताच माशेलकर बैचेन झाले. आपल्याकडे अनेक पिढ्या चालत आलेलं हे ज्ञान, कोणीतरी स्वत:चं असल्याचा राजरोस दावा करतोय, हे योग्य नव्हे. यावर अमेरिकेशी न्यायालयीन लढाई करुन आपले हक्क आपण राखले पाहिजेत, असा पक्का विचार करुन डॉक्टर कामाला लागले. जोरदार न्यायालयीन लढाई झाली. हळदीचे गुणधर्म सांगणारे अनेक संस्कृत श्लोक, पाली भाषेत हळदीबद्दल लिहिले गेलेले संदर्भ, अनेक कागदपत्रं जमा करुन, त्या सर्वांचा अभ्यास करुन, डॉक्टर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ही अमेरीके विरुध्दची हळदीघाटची लढाई जिंकली. यातून दोन चांगले परिणाम झाले. एक तर आपल्या ज्ञानाचे हक्क आपल्याकडे राहिले आणि दुसरा दूरगामी फायदा झाला. तो असा की आपल्या पारंपरिक ज्ञानाची किंमत आपल्याला आणि साऱ्या जगाला कळली. अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राला भारतीय ज्ञानाचं महत्व कळलं आणि आपण दुसऱ्यांच्या ज्ञानावर आपला हक्क सांगायचा नाही हा धडाही मिळाला. हाच प्रकार बासमती तांदळाच्या बाबतीतही घडला. त्याचेही पेटंट माशेलकरांनी परत मिळवले. सर जगदीशचंद्र बोस यांनी बिनतारी संदेश यंत्रणेचा म्हणजे वायरलेसचा शोध लावला, पण त्या शोधाचं श्रेय मात्र मार्कोनीला मिळालं. कारण बोस यांनी पेटंट घेतलं नाही, ते सर्व करुन मार्कोनीने सर्व अधिकार स्वत:कडे घेतले. १८९८ मध्ये बोस यांनी वायरलेस शोधलं होतं. त्यानंतर १९९८ साली म्हणजे बरोबर १०० वर्षांनी बासमतीची लढाई जिंकून त्याचंही पेटंट डॉ. माशेलकरांनी मिळवले. बोस ते बासमती अशा या ज्ञानाचा हक्क मिळवण्याच्या प्रवासात डॉ. माशेलकरांनी महत्वाची भूमिका बजावली. औषधांपासून ते खतांपर्यंत, जीवनोपयोगी रसायनंपासून ते गृहिणींसाठी छोटे उद्योग वसवून देण्यापर्यंत, अनेक लहान मोठ्या व्यवसायात डॉ. रघुनाथ माशेलकरांनी मार्गदर्शन केलं. व्यवस्थापनापासून ते स्वत: प्रयोगशाळेत संशोधन करण्यापर्यंत जातीने काम केलं आणि आजही ते तितक्याच जोमाने कार्यरत आहेत. सकारात्मक विचारांचा प्रचंड उस्फूर्त असा प्रवाह अनुभवायचा असेल तर डॉ. रघुनाथ माशेलकरांच्या सहवासात आयुष्यातले काही क्षण तरी घालवावेत; ते शक्य नसेल तर त्यांचे भाषण जिथे कुठे असेल तिथे ऐकायला जावं. तेही शक्य नसेल तर त्यांनी लिहिलेले भारताच्या प्रगतीच्या कल्पनांविषयीचे लेख वाचावेत. आणि मग आपल्या लक्षात येईल की, जगद्विख्यात रसायनशास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर हे, जबरदस्त सकारात्मक विचारांच्या मुशीतून घडलेलं, काही एक वेगळंच रसायन आहे. भारताच्या अतिप्रचंड लोकसंख्येबद्दल आपण सर्वच जण चिंता व्यक्त करत असतो. पण त्याहीकडे पाहाण्याचा माशेलकरांचा दृष्टीकोन आपल्याला, त्यांच्या सकारात्मकतेचं दर्शन घडवतो. ते म्हणतात, 'भारताची भव्य लोकसंख्या हाच एक मोठा खजिना आहे. भारतात वैचारिक स्वातंत्र्य असल्यामुळे जेवढी माणसं जास्त, तेवढ्या नवनवीन कल्पना पुढे येण्याला वाव. त्यातच

भारतातील ५५ टक्क्याहून जास्त मंडळी तिशीच्या घरातली आहेत. म्हणजे हा तरुणांचा देश, अनेक नवनवीन धडाडीची कामं करु शकेल. आणि भारतातील सांस्कृतिक विविधता ''यदेशाला अधिक सृजनशील बनवेल. 'मराठीवर मनापासून प्रेम करणारे, मायबोलीतून विचार केल्यामुळे मी यशस्वी झालो' असं सांगणारे डॉ. रघुनाथ अनंत माशेलकर, आपल्या तरुणांसाठी, खास करुन मराठी युवकांसाठी स्फूर्तिस्थान ठरावेत ! पण हा आहे फक्त ट्रेलर, संपूर्ण चित्रपट ज्याला ज्याला शक्य होईल त्याने जरुर पहावा !

भारतीय संशोधक, बौध्दिकसंपदा हक्क व नवनिर्मितीची संस्कृती रुजविण्यासाठी कार्यरत असलेले नेतृत्त्व... भारतातील मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी बौध्दिक क्षमतेच्या आधारे ज्ञानाचे अर्थपूर्ण नियोजन करणारे... विज्ञानाला ग्लॅमर मिळवून देणारे आणि खऱ्या अर्थाने समाजाभिमुख असलेले भारतातील आघाडीचे जगद्विख्यात रसायनशास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर...!!!

केमिकल इंजिनिअरिंगमधील त्यांचे संशोधनकार्य मोठे आहेच, पण त्याहून मोलाचे कार्य म्हणजे त्यांनी भारतातील विज्ञानविश्वाला १९८० च्या दशकापासून दिलेले सक्षम नेतृत्व ! भारतासाठी तो काळ होता संशोधनसुविधांच्या अभावाचा होता. संशोधकसुध्दा भारतापेक्षा परदेशातच काम करण्यासाठी उत्सुक असायचे. अशा वेळी ज्या मोजक्या लोकांनी भारताच्या वैज्ञानिक विकासाची धुरा सांभाळली, त्यात डॉ. माशेलकर यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते.

एवढंच नव्हे तर आपले हे पारंपरिक ज्ञान डिजिटल स्वरुपात आणण्याची कल्पना त्यांनी मांडली आणि आज भारताकडे पारंपरिक ज्ञानाची डिजिटल लायब्ररी तयार झाली. ही ३० लाख पानांची डिजिटल लायब्ररी आज पेटंट देण्याच्या आधी अमेरिका आणि युरोपच्या पेटंट ऑफिसकडून तपासली जाणार आहे. त्यामुळे अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी त्यांची पारंपरिक ज्ञानावर आधारलेली अन्याय्य पेटंट मागे घ्यायला सुरवात केली आहे. आणि पेटंटच्या बाबतीत भारतासारख्या देशांवर होणारा अन्याय दूर होतोय याचं श्रेय डॉ. माशेलकरांच्या त्या वेळच्या द्रष्टेपणाला, धाडसी नेतृत्वाला द्यायला हवं. कारण त्या वेळी भारतासारख्या विकसनशील राष्ट्रानं अमेरिकेला पेटंट संदर्भात आव्हान देणं. ही सोपी गोष्ट नव्हती.

अशा या ज्ञानाच हक्क मिळवण्याच्या प्रवासात डॉ. माशेलकरांनी महत्वाची भूमिका बजावली, 'व्यवसायाभिमुख संशोधन' या तत्वाचा त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. 'ज्ञान ही संपत्ती आहे, तसेच ज्ञानातून संपत्ती निर्माण होते,' म्हणून ते ज्ञान व संशोधन कायदेशीररीत्या सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे ही त्यांची भूमिकाही महत्त्वपूर्ण ठरली आहे. औषधांपासून ते खतांपर्यंत, जीवनोपयोगी रसायनांपासून ते गृहिणींसाठी छोटे उद्योग वसवून देण्यापर्यंत, अनेक लहान मोठ्या व्यवसायात डॉ. रघुनाथ माशेलकरांनी मार्गदर्शन केलं. व्यवस्थापनापासून ते स्वत: प्रयोगशाळेत संशोधन करण्यापर्यंत जातीने काम केलं आणि आजही ते तितक्याच जोमाने कार्यरत आहेत. २००३ मध्ये त्यांनी पुढाकार घेऊन, पारंपरिक वैद्यकशास्त्र, आधुनिक वैद्यकशास्त्र आणि आधुनिक विज्ञान यांचा संगम घडवून आणला. ते ''चित्रकूट डिक्लरेशन'' म्हणून ज्ञानाची डिजिटल लायब्ररी तयार झाली. ही ३० लाख पानांची डिजिटल लायब्ररी आज पेटंट देण्याच्या आधी अमेरिका आणि युरोपच्या पेटंट ऑफिसकडून तपासली जाणार आहे. त्यामुळे अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी त्यांची पारंपरिक ज्ञानावर आधारलेली अन्याय्य पेटंट मागे घ्यायला सुरवात केली आहे. आणि पेटंटच्या बाबतीत भारतासारख्या देशांवर होणारा अन्याय दूर होतोय याचं श्रेय डॉ. माशेलकरांच्या त्या वेळच्या द्रष्टेपणाला, धाडसी नेतृत्वाला द्यायला हवं. कारण त्या वेळी भारतासारख्या विकसनशील राष्ट्रानं अमेरिकेला पेटंट संदर्भात आव्हान देणं. ही सोपी गोष्ट नव्हती.

अशा या ज्ञानाच हक्क मिळवण्याच्या प्रवासात डॉ.

माशेलकरांनी महत्वाची भूमिका बजावली, 'व्यवसायाभिमुख संशोधन' या तत्वाचा त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. 'ज्ञान ही संपत्ती आहे, तसेच ज्ञानातून संपत्ती निर्माण होते,' म्हणून ते ज्ञान व संशोधन कायदेशीररीत्या सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे ही त्यांची भूमिकाही महत्त्वपूर्ण ठरली आहे. औषधांपासून ते खतांपर्यंत, जीवनोपयोगी रसायनांपासून ते गृहिणींसाठी छोटे उद्योग वसवून देण्यापर्यंत, अनेक लहान मोठ्या व्यवसायात डॉ. रघुनाथ माशेलकरांनी मार्गदर्शन केलं. व्यवस्थापनापासून ते स्वत: प्रयोगशाळेत संशोधन करण्यापर्यंत जातीने काम केलं आणि आजही ते तितक्याच जोमाने कार्यरत आहेत २००३ मध्ये त्यांनी पुढाकार घेऊन, पारंपरिक वैद्यकशास्त्र, आधुनिक वैद्यकशास्त्र आणि आधुनिक विज्ञान यांचा संगम घडवून आणला. ते ''चित्रकूट डिक्लेरेशन'' म्हणून प्रसिध्द आहे. आज त्यामुळे भारताच्या औषध उद्योगात मोठं परिवर्तन घडून आलं आहे आणि आज गरिबांना परवडतील अशी स्वस्तात आणि मोठ्या प्रमाणात औषधं आपण उपलब्ध करुन देऊ शकतो.

२००० साली पुण्यात झालेल्या सायन्स काँग्रेसचे ते अध्यक्ष असतांना म्हणाले होते. जर पन्नासच्या दशकात फुटपाथच्या दिव्याखाली अभ्यास करणारा, अनवाणी शाळेत जाणारा आणि ज्याला दोन वेळेला जेवायची भ्रांत आहे असा मुलगा दहावीत बोर्डात येऊनसुध्दा त्याला शिक्षण अर्धवट सोडावं लागेल की काय अशा परिस्थितीत असतो, त्याला त्याच समाजातली काही भली माणसं आणि संस्था मिळाली तर माझ्यासारखा प्रत्येक भारतीय मुलगा आपली चमक दाखवू शकतो. कारण आपल्या देशात बुध्दिमत्ताही आहे आणि बुध्दिमत्तेला संधी देणारे मनाचे श्रीमंत लोकही आहेत. गरज आहे ती फक्त त्या बुध्दिमत्तेला लवकर ओळखण्याची आणि त्या दृष्टीनं फुलवण्याची. म्हणून गरज आहे ती बौध्दिक स्वातंत्र्यावर स्वार होण्याची.

डॉ. माशेलकर यांना पद्मश्री-पद्मभूषण हे नागरी सन्मान, शांतीस्वरुप भटनागर पुरस्कार, मटेरिअल सायंटिस्ट ऑफ दी इयर, पं.जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुरस्कार, भारतीय विज्ञान परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार, प्रियदर्शनी ग्लोबल अॅवॉर्ड असे पन्नासहून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. तसेच लंडन येथील जगद्विख्यात रॉयल सोसायटी लंडनची फेलोशिपही त्यांना १९९८ मध्ये मिळाली. CSIR, NCL अशा महत्त्वपूर्ण संस्थांचे अध्यक्षपद, लंडनच्या 'रॉयल सोसायटीचे' सन्माननीय सदस्य, पंतप्रधानांच्या वैज्ञानिक सल्लागार परिषदेचे सदस्य, नऊ बड्या कंपन्यांच्या संचालक मंडळाचे सदस्यत्व अशा विज्ञान व संशोधन क्षेत्रातील अत्युच्च पदे डॉ. माशेलकरांनी अतिशय कष्टाने, प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत यशस्वीपणे भूषविली आहेत.

आशिया-प्रशांत, युरोप व अमेरिकेतील संशोधन विकास संस्थांनी उभ्या केलेल्या आणि तब्बल ६० हजार वैज्ञानिकांचा समावेश असलेल्या 'ग्लोबल रीसर्च अलायन्स' चे ते अध्यक्ष आहेत. अलीकडेच त्यांची अॅकॅडमी ऑफ सायन्स अॅन्ड एनोव्हेशन रीसर्च या संस्थेचे पहिले अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली. त्याद्वारे त्यांच्या शिरपेचात आणखी एक तुरा खोवला गेला आहे.

आयुष्यातली कमीतकमी १२ वर्ष तरी अनवाणी पायांनी चालणारा, सार्वजनिक दिव्याखाली अभ्यास करणारा हा माणूस ... इंग्लंडमध्ये, जिथे न्यूटनने सही सही केली आहे. त्या पुस्तकात स्वाक्षरी करण्याचा सन्मान मिळवणारा पहिला महाराष्ट्रीय ठरला.

'मराठीवर मनापासून प्रेम करणारे, मायबोलीतून विचार केल्यामुळे मी यशस्वी झालो, असं सांगणारे डॉ. रघुनाथ अनंत माशेलकर, आपल्या देशातील तरुणांसाठी, खास करुन मराठी युवकांसाठी स्फूर्तिस्थान ठरले आहेत ....!!

# श्यामची आई



ज्याप्रमाणे १६ वर्षाचे ज्ञानेश्वर लोकांपुढे ज्ञानेश्वरीचा एकेक अध्याय ठेवीत असत तसाच श्याम रोज आश्रमातील प्रार्थना संपल्यावर आपल्या अनुभवांची एकेक ओवी आपल्या सवंगड्यापुढे ठेवत होता. ऐकणाऱ्यामध्ये लहान भावंडापासुन म्हातारबाबांपर्यंत सर्व होते. आई म्हणोनि कोणी, आईस हाक मारी, ती हाक येई कानी, मन होय शोक भारी–आई..आई.. खरच, 'आई' या दोनच अक्षरांत सारं ब्रम्हांड समावलेल आहे. म्हणुनच ब्रम्हांडाला फेरी मारण्याची पैज लागली तेव्हा श्रीगजाननाने आईभोवती प्रदक्षीणा घालुन पैज जिंकली.

अशाच एका आईची कथा मी वाचली. वाचली म्हणण्यापेक्षा मातृप्रेमाच्या महामंगल स्त्रोताप्रमाणे तिचं पठण केलं. श्याम नावाच्या एका संस्कारक्षम मुलाने आईला वाहिलेली एक श्रध्दांजली.

हा काळ आहे १९३५ चा, स्वातंत्र्यपूर्वीचा. स्थळ आहे कोकणातील एका तालुक्याची जागा, आणि कथेचे जनक आहेत पुजनीय साने गुरुजी.

ज्याप्रमाणे १६ वर्षाचे ज्ञानेश्वर लोकांपुढे ज्ञानेश्वरीचा एकेक अध्याय ठेवीत असत तसाच श्याम रोज आश्रमातील प्रार्थना संपल्यावर आपल्या अनुभवांची एकेक ओवी आपल्या सवंगड्यापुढे ठेवत होता. ऐकणाऱ्यामध्ये लहान भावंडापासुन म्हातारबाबांपर्यंत सर्व होते.

या कथेच नाव आहे श्यामची आई ज्ञानेश्वरीप्रमाणेच श्यामची आई हे एक अमर भुषण आहे. काही लेखक रक्तांची शाई करुन लिहतात!पण साने गुरुजींना श्यामची आई हे पुस्तक स्वतःच्या आसवांनी लिहुन काढंल आहे. म्हणुणच श्यामची आई ही नुसत्या श्यामची न राहता सर्वांची आई झाली आहे.

श्यामच्या आईचं नाव यशोदा. यशोदा कृष्णाला प्रेमाशिवाय आणखी काय देणार? पण ही यशोदा मात्र प्रसंगी कठोर होत होती. असाच एक प्रसंग. श्यामला पाण्याची फार भीती. पोहण शिकायची भीती वाटुन श्याम भाताच्या कणगीआड मांजरासारखा लपुन बसला होता. आईला हे कळल मात्र, तिने त्याला रागानं बाहेर काढलं व शिमटीने मारुन जबरदस्तीने विहरीवर पाठवलं. 'पाण्यात चांगल दोन–चार वेळा बुडवा रे याला! चांगलं नाका तोंडात पाणी जाऊ दे,' असं सांगुन श्यामला पोहण्यासाठी तयार केलं. श्याम आईवर खुप रागवला, पण घरी आला ते पोहण शिकुणच. श्यामच्या आईला असा धीट श्याम हवा होता, भित्रा नव्हे.

आई ही श्यामची गुरु होती. नुसत्या मनुष्यावर नव्हे, तर गाई गुरांवर, फुला पाखरांवर झाडा–पाडांवर प्रेम करावयास तिने शिकवलं. 'श्याम, मुक्या कळ्या नको हो तोडु! फुलायला संधी दे त्यांना. नीट फुलु दे. देवाला एक फुल मिळाल तरी पुरे, परंतु ते नीट फुललेले पाहा,' हे सांगणारी श्यामची आई माझं मन भारावुन टाकते.

'श्याम, पायाला घाण लागु नये म्हणून जपतोस, तसंच मनाला घाण लागु नये म्हणुनही जप हो! देवाला सांग, शुध्द बुध्दी दे म्हणुन.' हे शब्द मी आयुष्यभर विसरणार नाही.


'श्याम, कोणतीही गोष्ट करण्याची लाज बाळगु नये. ज्याला एखादी गोष्ट आपणापेक्षा चांगली करता येत असेल त्याच्याकडे जाऊन शिकलं पाहिजे. त्यात गर्व कशाला? जे जे करीन ते उत्कृष्टच करीन, असे माणसाचे ध्येय असावे,' अशी शिकवण देणारी श्यामची आई ही माझीसुध्दा गुरू झाली आहे.

सुरवातीचे श्रीमंतीचे दिवस पाहिलेल्या श्यामच्या आईने अठरा विश्वे दारिद्र्यातही 'स्वत्व व स्वत्व न गमावता कसं राहिलं पाहिजे हे दाखवुन दिलं आहे.

'मथुरी' सारखी कांडपीण असो वा 'मोरी' नावाची गाय असो, श्यामच्या आईचं त्यांच्यावर जिवापाड प्रेम. 'मथी' नावाची लाडकी मांजर श्यामच्या आईच्या मृत्युनंतर त्याच ठिकाणी प्राण सोडते, हा किती हृदयस्पर्शी प्रसंग!

श्याम शिक्षणासाठी दापोलीला जातो, त्यानंतर औंधला माधुकरी मागुन शिक्षण सुरु ठेवतो, पण त्याचं सारं लक्ष मात्र आपल्या घराकडे, आईकडे असतं. या कथेचा शेवटचा अध्याय वाचताना डोळे पाण्याने भरुन येतात. असं वाटतं, श्यामला त्याची आई देवाघरी जाण्याआधी भेटायला हवी होती.

'श्यामची आई' हे पुस्तक मला एखाद्या दीपस्तंभासारखह वाटतं, म्हणुनच त्याची जागा मी कपाटातुन बदलुन देवघरात केली आहे.



Thinker and tho
and innovator, s
educator and ed
articulator, poli
builder, **Dr. Vija**
internationally a
and IT leaders o

ght leader, researcher
ientist and philosopher,
ucationist, author and
architect and institution
**Bhatkar** is one of the
knowledged scientists
India.



# आधुनिक भारताचे बृहस्पति डॉ.विजय भटकर

**ऐश्वर्यस्य : समग्रस्य धर्मस्य यशस : श्रियः ।**
**ज्ञान – वैराग्ययोश्चैव षण्णाम् भग इतीरणा ।।**

ऋषि पाराशर

भारताची राजधानी दिल्लीतील वातावरण आज वेगळेच भासत होते. भारताचे पंतप्रधान राजीव गांधी अमेरिकेचा दौरा करुन आले होते त्या उमदया, उत्साही पंतप्रधानाच्या मनातली सल त्यांच्या वागण्यात दिसून येत होती परंतु ती समजून घेण्याचे धाडस कोणत्याही नेत्यात, प्रशासकात नव्हते. भारत देश आपल्या प्राणप्रिय पंतप्रधानांच्या अकाली निधनाने हेलावलेला होता. या नवीन नेत्याची सर्वांना काळजी वाटत होती. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या पटावर या तरुण पंतप्रधानाचे नेतृत्व जोखले जात होते. कारण तो जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशाला आधुनिकतेकडे नेण्याचा प्रयत्न करत होता.

तो काळ ९० च्या दशकाचा होता. अमेरिका व रशिया यामध्ये जग विभागलेले होते भारतास समर्थ राष्ट्र बनवायचे असेल तर त्या महासत्तांचे सहकार्य घेणे गरजेचे होते. मात्र आपला आब राखणे हे सुध्दा महत्वाचे होते. राष्ट्रीय पातळीवर, राजीव गांधींनी नवीन राष्ट्रीय शिक्षण नीतीचा पुरस्कार केला. या नीतीने शिक्षणाची गंगा प्रत्येक घरात जाणार होती. यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत महत्वाचा होता. यासाठी त्यांना महत्वाची मदत करत होते सॅम-पित्रोदा त्यांच्या मार्गदर्शनानुसार दूर संचार विभागात क्रांती घडत होती. आधुनिक जगाच्या दळणवळणाने आता वेग घेतला होता.

त्रिवेंद्रम येथील इलेक्ट्रॉनिक्स रिसर्च व डेव्हलपमेंट सेंटरचे संचालक डॉ. विजय भटकर यांचा फोन खणखणला, पलिकडून त्यांचे मार्गदर्शक श्री. के.पी. नंबियार बोलत होते. ''दिल्लीसाठी लगेच निघा'' फोन बंद झाला. डॉक्टर क्षणभरही विचार न करता निघाले.

श्री.के.पी.नंबियार त्यावेळेस भारत सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स खात्याचे सचिव होते. डॉ. भटकरांना १९७२ साली आय.आय.टी. दिल्लीतून डॉक्टरेट झाल्यानंतर इलेक्ट्रॉनिक्स कमिशनमध्ये त्यांनी घेतले होते. त्यांच्या हाताखाली डॉ. भटकरांनी कमिशनमध्ये काम करतांना आपल्या अंगी असलेल्या नेतृत्व गुणांची चुणुक दाखवली होती. डॉ. भटकरांकडे केल्ट्रॉनची जबाबदारी दिली गेली. या केल्ट्रॉनने संपूर्ण देशात इलेक्ट्रॉनिक्स क्रांती घडवून आणली. २१ व्या शतकातील आधुनिक भारताची ती पायाभरणी होती.

१९८२ साली भारतात एशियाड या महोत्सवाचे आयोजन केले होते. तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे स्वप्न होते की माझ्या भारतीय जनतेने हे आयोजन रंगीत दूरचित्रवाणीवर पाहावे. त्यांचे हे स्वप्न प्रत्यक्षात आणले ते डॉ. विजय भटकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी भारत आधुनिक बनत आहे याचे हे 'याचि देहि याचि डोळा' असे प्रात्यक्षिक होते. सर्वसामान्य भारतीय जनता आत्मविश्वासाने भारली गेली. आसेतुहिमाचल प्रत्यक्षात एकसंध झाला. महात्मा गांधीजींचे स्वप्न आधुनिक तंत्रज्ञान वापरुन डॉ. भटकरांनी प्रत्यक्षात आणले.

सर्वसामान्य जनता ही प्रत्येक तंत्रज्ञानाच्या केंद्रस्थानी असली पाहिजे. स्वातंत्र्य पूर्व काळात पिचलेल्या जनतेच्या अनामिक जडत्वाच्या शृंखला तोडण्यासाठी, त्या जनतेस गतीशील करण्यासाठी स्वातंत्र्य मिळाल्यावर गांधीजींनी तरुणांना ''खेड्याकडे चला'' असा संदेश दिला. त्या हाकेस प्रतिसाद म्हणून डॉ. विजय भटकर यांचे वडील, पांडुरंग भटकर यांनी प्राचार्य पदाची तर मातोश्रींनी मुख्याध्यापिकेची नोकरी सोडली. अकोला जिल्ह्यातील मुर्तिजापूर तालुक्यातील मुरांबा या खेड्यात ते स्थायिक झाले. या खेड्याची लोकसंख्या होती केवळ तीनशे या परिस्थितीस न घाबरता त्यांचे जनसेवेचे कार्य चालू होते. अशा या ध्येयवादाने भारलेल्या वातावरणात ११ ऑक्टोबर १९४६ साली विजय भटकर यांचा मुरांबा गावी जन्म झाला. लहानग्या विजयचे शिक्षण गावातल्या राम मंदिरात झाले कारण गावात शाळेसाठी इमारत नव्हती. प्राथमिक शिक्षण राम मंदिरात पूर्ण झाले आणि हनुमंताची आध्यात्मिक एकनिष्ठता मनाशी एकरुप झाली. हायस्कूलचे शिक्षण संत गाडगे महाराज यांनी स्थापन केलेल्या शाळेत झाले. त्या महापुरुषाच्या हिमालयाएवढ्या व्यक्तिमत्वाची सावली पौगंडावस्थेतल्या विजयवर पडली. समाजासाठी समाजाच्या उध्दारासाठी समाजाला बरोबर घेतांना स्वत:चा स्व नष्ट करावा लागतो यामुळे येणारी विनम्रता बरोबरीच्या सहकाऱ्यांना एका मायेच्या बंधनात बांधते. हे प्रेमाचे बंधन पाण्यात बुडणाऱ्या दगडांना तरंगण्याचे सामर्थ्य देते व अशक्य कोटीतील गोष्ट प्रत्यक्षात येते. पुढील इंजिनिअरींगचे शिक्षण वयाच्या १८ व्या वर्षी त्यांनी नागपूरच्या VRCE कॉलेजमधून पूर्ण केले. मनात असंख्य विचारांचा कल्लोळ होता. मनातील उर्जेला योग्य दिशा मिळाली ती सयाजीराव विद्यापीठ, बडोदा येथे.

विदयापीठात पदव्युत्तर शिक्षण घेत असतांना त्यांनी तत्वज्ञान, भाषा, शास्त्र, संगीत इ. विविध शाखांचा अभ्यास केला. विद्यापिठाच्या वातावरणाला अधिष्ठान होते सयाजीराव गायकवाडांच्या तत्वज्ञानाचे तेथील शिक्षण क्षेत्रात उदारता व आधुनिकता यांचा अनोखा संगम होता. यामुळे सृजनशीलता व भविष्याचा वेध घेण्याची ताकद सहजपणे प्राप्त होत होती. याचे प्रत्यंतर डॉक्टरांच्या जीवनात वारंवार दिसून येते. त्यांनी अनेक संस्था उभ्या केल्या व नावारुपाला आणल्या याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे C-DAC होय.

पंतपंधानांच्या दालनातील शांतता आपल अस्तित्व दाखवत होती. दालनात पंतप्रधान राजीव गांधी, श्री. के.पी. नंबीयार, शास्त्र आणि तंत्रज्ञान खात्याचे राज्यमंत्री के.आर. नारायणन व डॉ. विजय भटकर होते. नंबियार यांनी डॉक्टरांना पंतप्रधानांना भेटण्या अगोदर या बैठकीची पार्श्वभूमी संक्षिप्तपणे सांगितली होती. अमेरिकेच्या भेटीत पंतप्रधानांनी अमेरिकेच्या अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांना त्यांच्याकडील महासंगणक विकत

घेण्याची इच्छा व्यक्त केली. रेगन यांनी त्यासमयी अनेक अपमानास्पद अटी घातल्या. भारतासारख्या सार्वभौम देशासाठी निश्चितच त्या अयोग्य होत्या. पंतप्रधानांचा देशास आधुनिक बनवण्याचा निश्चय ठाम होता. अमेरिकेचा महासंगणक क्रे यांनी विकसित केला होता. भारतीय शेतकऱ्यांना हवामानाची योग्य व निश्चित माहिती मिळावी यासाठी महासंगणक विकत घेण्याचा हेतू होता त्या हेतूवरच अमेरिकेने शंका व्यक्त केली होती.

पंतप्रधानांनी शांतपणे प्रश्न विचारला, ''आपल्याला त्याची निर्मिती करणे शक्य आहे ?'' डॉक्टर भटकर यांनी उत्तर दिले की, ''मी महासंगणक अजूनपर्यंत बघितलेला नाही. त्याच्या संदर्भात कोणतीही माहिती उपलब्ध नाही. मी फक्त क्रे यांचे चित्र तेवढे बघितले आहे''. पंतप्रधानांनी विचारले, ''त्यास किती वेळ लागेल?'' डॉक्टरांनी तत्परतेने उत्तर दिले, ''क्रे यांना भारतात आणण्यास जेवढा वेळ लागेल त्यापेक्षा कमी वेळेत त्याची निर्मिती होईल, संपूर्ण तंत्रज्ञान विकसित करण्यास तीन वर्षापेक्षा कमी वेळ लागेल.''

पंतप्रधान म्हणाले, ''किती पैसा लागेल?'' डॉक्टर आत्मविश्वासाने उत्तरले, ''क्रे च्या महासंगणापेक्षा कमी किंमतीत, अंदाजे ३४ कोटी रु. पंतप्रधानांनी मंद स्मित केले. दालनातील तणाव निवळला होता. आता जबाबदारी मोठी होती. डॉक्टरांना क्षणभर देखील उसंत नव्हती. संस्थेसाठी पुण्यातील जागा निश्चित झाली सहकाऱ्यांची निवड होत होती. १९८८ साली पाडव्याच्या दिवशी पुण्यात भारताच्या पहिल्या महासंगणकाची गुढी उभारली जात होती. काम सहजगत्या होणारे नव्हते. प्रशासनातील सुस्तपणा, परमिट राज, सहकाऱ्यांचा राग लोभ, इ. गोष्टींवर मात करत योग्य पध्दतीने सांगड घालत डॉक्टर आणि त्यांचे सहकारी अहोरात्र काम करत होते. महासंगणकाचे विविध भाग उपलब्ध करुन घेताना, त्यांची माहिती विविध मित्रांकडून मिळवली जात होती. कामात गुप्तता राखली जात होती. जगाला या निर्मितीची चाहूल लागलेली नव्हती. दोन वर्षानंतर १९९० साली महासंगणकाचे प्रारुप तयार करण्यात आले. त्याच्या चाचण्या घेण्यात आल्या. सर्व चाचण्यात ते पास झाले व नामकरण करण्यात आले ''परम'' अर्थात ''सर्वोच्च''. त्याच वर्षी झुरिच येथील एका जागतिक प्रदर्शनात डॉक्टर भटकर व त्यांचे सहकाऱ्यांनी परम सादर केला. परम ची कार्यपध्दती व कार्यप्रणाली, वेग बघून अवघ्या जगाने तोंडात बोटे घातली अमेरिकेनंतर फक्त भारताने ती क्षमता प्राप्त केली होती. अमेरिकेच्या प्रमुख वर्तमानपत्रात बातमी झळकली,

**"Denied supercomputer, Angry India does it"**

पंतप्रधान राजीव गांधींनी टाकलेला विश्वास डॉ. भटकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी सार्थ ठरविला. अवघ्या देशाचा ऊर भरुन आला. परम महासंगणक क्रे च्या महासंगणकापेक्षा कितीतरी पटीने स्वस्त होता. रशियासारख्या महासत्तेने त्यांच्या विविध विभागात त्यास स्थान दिले. जागतिक पटलावर भारताचे सामर्थ्य अधोरेखित झाले.

डॉ. विजय भटकर यांना अनेक मानाचे पुरस्कार मिळाले त्यांनी विनम्र भावाने याचे श्रेय आपल्या सहकाऱ्यांना दिले. भारताच्या भावी इंजिनिअर्सना मार्गदर्शन करताना ते सांगतात, आजचा तरुण इंजिनिअरकडे असणारा चांगला गुण म्हणजे त्यांच्याकडे अफाट उर्जा आहे. कोणत्याही आव्हानास सामोरे जाण्याचा प्रचंड आत्मविश्वास आहे. परंतु दुर्गुण म्हणजे लठ्ठ पगाराचे असणारे अतोनात वेड. ज्ञानापेक्षा पैशाला दिलेले अवास्तव महत्व, इंजिनिअरने एका ठराविक चौकटीत राहून समस्यांची उकल केली पाहिजे. आज सर्वसामान्य जनतेचे पाणी प्रदूषण, पिण्याच्या पाण्याची समस्या, उर्जा समस्या, पृथ्वीच्या वातावरणातील बदल इ. प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करायला हवा. हे करत असतांना नीतीमूल्यांशी त्याने प्रतारणा करु नये.

जीवनरुपी कमळाचे बहरणे पूर्णत्वास येते जेव्हा त्याची ऐश्वर्य (Wealth), धर्म (Righteousness), यश (Success),श्री (Beauty), ज्ञान (Knowledge), वैराग्य (Dispassion) ही दलपत्रे पूर्णतः उमलतात तेव्हा. आधुनिक जीवनात तंत्रज्ञानाचा वापर करतांना यांत्रिकतेचा अतिरेक माणूसकी जपून कमी करता येतो. माणूसकी देवत्वाची पहिली पायरी असते. संपूर्ण देवत्व(साधुत्व) ही मानवी जीवनाची फलश्रुती असते. भारतीय तत्वज्ञान व संस्कृतीची ही परम, सर्वोच्च अवस्था महासंगणकासारखी सर्वव्यापक असते.

प्रा.राजेंद्र हिरे





# 'ड्रॅगन' आला टप्प्यात

## अण्वस्त्रधारी 'अग्नी ५' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

जमिनीवरुन मारा करणाऱ्या आणि तब्बल पाच हजार किलोमीटरवरील लक्ष्याचा अचूक वेध घेणाऱ्या 'अग्नी ५' या अण्वस्त्रधारी क्षेपणास्त्राची आज यशस्वी चाचणी घेण्यात आली. त्यामुळे संपूर्ण चीन, युरोप भारताच्या टप्प्यात आला आहे. तसेच, आंतरखंडीय क्षेपणास्त्रे असणाऱ्या देशांच्या पंक्तीत भारताने स्थान मिळविले आहे. ओडीशाच्या किनारपट्टीवरील व्हिलर्स बेटावरील 'इंटीग्रेटेड टेस्ट रेंज'वरुन सकाळी आठ वाजून पन्नास मिनिटांनी क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आल्याची माहिती संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेकडून (डीआरडीओ) देण्यात आली. सध्या अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स आणि चीनकडे आतंरखंडीय क्षेपणास्त्रे आहेत. त्यांच्याबरोबरीने भारत आता उभा राहिला आहे. गेल्या वर्षी १९ एप्रिलला 'अग्नी ५' ची प्राथमिक चाचणी झाली होती. आज अंतिम चाचणी घेत 'डीआरडीओ' ने भारताची अण्वस्त्र क्षमता आणखी मजबूत केली. आता हे क्षेपणास्त्र पुढील वर्षी लष्करामध्ये समाविष्ट करण्यात येण्याची शक्यता आहे. तांत्रिक अडचणींमुळे क्षेपणास्त्राचे प्रक्षेपण काही तास उशिराने करण्यात आले. क्षेपणास्त्राने तब्बल २० मिनिटे आकाशात भ्रमण करुन समुद्रातील लक्ष्याचा अचूक वेध घेतला. त्या वेळी भारतीय शास्त्रज्ञांनी जल्लोष केला. 'डीआरडीओ'च्या सुमारे ५०० हून अधिक शास्त्रज्ञांनी चार वर्षांच्या कठोर मेहनतीनंतर आज ही यशस्वी चाचणी घेतली. 'तुमच्या या कर्तृत्वामुळे देशाची मान उंचावली आहे, अशा शब्दांत संरक्षणमंत्री ए.के.अँटनी यांनी 'डीआरडीओ' शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले.


# India's Agni V missile

The nuclear warhead-enabled Agni V is the fifth in the series of medium and long-range missiles made in India in the past fifteen years




**AGNI V**

- Operational range: **5,000 km**
- Payload: **1,360.78 kg**
- Height: **17 m**
- Future development possible for a submarine-launched variant




**AGNI MISSILE SERIES**

| | Agni I | Agni II | Agni III |
|---|---|---|---|
| **Range (km)** | 700 | 2,500 | 3,000 |
| **Payload (kg)** | 1,000 | 1,000 | 1,500 |
| **Height (m)** | 15 | 20 | 16.3 |



# 'पणत्यांचा अकुंर फुलवा, वंशाचा दिवा लागेल'!

असे म्हणतात की, स्त्री ही जगाचा उध्दार करते, ते खरेच आहे, पणती म्हणजे मुलगी, आणि पणत्या म्हणजे अनेक मुली अथवा स्त्रियां, यांचा खोट्या अंधश्रध्देपायी, सध्या गर्भातच काही वेळा बळी दिला जात आहे, नव्हे जीव घेतला जात आहे, जीवनाची पहाट पाहण्या अगोदरच त्यांच्या वाटेला मृत्युचा काळोख येत आहे का ? आणि कशासाठी ? कुणासाठी ? हे सर्वस्वी चूकीचे आहे, शिवाय महापापही आहे, जर स्त्रियांचा-मुलींच्या रुपाने प्रथम जन्मच झाला नाहीतर वंशाचा दिवा जन्म घेईल काय ? बऱ्याचदा कळी उमलण्या अगोदर खुडली जाते, कारण काय तर वंशाला दिवाच पाहिजे, अशा भ्रामक कल्पनेपायी व गैरसमजुतीने पूर्ण स्त्री जातीवर घोर अन्याय होत आहे. फक्त पुरुषच अन्यायी आहेत असे नाही, त्यास काही अंशी अंधश्रध्दाळू स्त्रियां, अज्ञानी महिलांही जबाबदार आहेत. अज्ञान हे दु:खाचे मूळ कारण आहे.



पुरुषप्रधान संस्कृतीत महिलांना नेहमी दुय्यम स्थान आहे. परंतु स्त्रीयांनी धाडस केल्यास, व आपल्या नैसर्गिक मर्यादेचे पालन केल्यास स्त्रियां जगाचा उध्दार करुन पुरुष वर्गाच्या पुढे गेल्याशिवाय राहणार नाहीत, अशी मला खात्री आहे. विश्वास आहे. स्त्रियांनी आपल्या जातीचे, संस्काराचे, संस्कृतीचे व मर्यादेचे उल्लंघन केले नाही तर, मर्यादित उंबरठा ओलांडला नाही तर, स्त्रियांना सुध्दा सर्व स्तरातून मानाचे स्थान प्राप्त होऊ शकते, अर्थात तशी मानसिकता प्रत्येक स्त्री मध्ये निर्माण होणे आवश्यक आहे.

कुलदिपकसाठी खोटा अंधश्रध्दाळू व अज्ञानी अंधार, याचा फाजील आत्मविश्वास न बाळगता सर्वांनी समंजसपणे, हा मुलगा-मुलगी भेदभावाचा प्रश्न कौटूंबिकरित्या व सामाजिकदृष्ट्या सोडवावा ! ईश्वराने स्त्री-पुरुषांची निर्मिती केली ती निश्चित काहीतरी विचाराअंती केलेली आहे. अशा नैसर्गिक निर्मितीच्या आड कोणीही स्त्री-पुरुषांनी येवू नये, स्त्री - जन्माचे स्वागत करावे, तरच पुढील वंशाचा दिवा वाढेल,

लिंग निदान चाचणी करुन मुलींचा गळा घोटू नये. त्यांना अकाली मृत्युच्या खाईत ढकलू नये.

प्रत्येक पुरुषाला आई पाहिजे, बहिण पाहिजे, मैत्रिण पाहिजे, पत्नी पाहिजे, परंतु त्यासाठी प्रत्येकाने मुलीच्या जन्माचे स्वागत करणे गरजेचे आहे. पणतीला अवेळी विझवू नका, लक्ष्मीच्या रुपाने तुमच्या घरात मुलगी येत असते, हे समजुन घेणे आवश्यक आहे. 'पहिली बेटी, धन की पेटी' असे उगाच कोणीही म्हणत नाही. स्त्रीयांमध्येच खरी धनदौलत दडलेली आहे. हे प्रथम सर्वांनी ओळखावे, स्त्रीयांच्या धीर गंभीर पाठिंब्यांशिवाय पुरुषवर्ग काहीही करु शकत नाहीत. कारण प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या पाठीमागे, आईरुपी, बहिणरुपी, पत्नीरुपी हात असतोच असतो. हे कोणीही विसरु नये.

प्रत्येक स्त्री-पुरुषांनी आपली नकारात्मक मानसिकता बदलावी, स्त्री ही फक्त उपभोग्य वस्तू नाही. तर ती जीवंत हाडामासाची रणरागीणी आहे, तिलाही भावना आहेत. हे सर्वांनी ध्यानात ठेवावे. असे म्हणतात की, स्त्री ही क्षणाची पत्नी तर अनंत काळाची माता आहे. असे का म्हणतात हे समजून घेणे आवश्यक आहे. ईश्वर प्रत्येक ठिकाणी राहू शकत नाही म्हणून आईरुपी दैवत निर्माण केले, तीचा आदर सन्मान झालाच पाहिजे, तीचा मान ठेवला गेलाच पाहिजे.

स्त्री घराचा आत्मा आहे, तर पुरुष मुख्य हेड (डोके) आहे, दोन्हीही गोष्टी तोलामोलाच्या व सारख्याच गरजेच्या व महत्त्वाच्या आहेत. परंतु आत्मा हा शेवटी महान आहे, कारण तो अमर आहे, त्यात ईश्वर आहे, अशा ईश्वर रुपी दैवतांचा, स्त्रीयांचा छळ न करता त्यांची जपणूक करावी, स्त्रीयांच्या जन्माचे स्वागत करावे. आईरुपी दैवत, पणती कोणीही विझवू नये. 'लेक वाचवा, मुलगी वाचवा' या अभियानात सर्वांनी सहभाग घ्यावा या दिवाळी सणात जेव्हा तुम्ही आम्ही आनंदाने पणत्या लावू तेव्हा त्या स्वतःहून विझवू नये. कारण त्यातच उद्याची खरी लक्ष्मी वसलेली आहे. त्यातच खरे दैवत जडलेले आहे. आईरुपी दैवत म्हणजे साक्षात परमेश्वर आहे.

'शनि जाताना सुंदर दिसतो, येताना नाही,! लक्ष्मी येताना सुंदर दिसते, जाताना नाही'!!

हे कधीही कोणीही विसरु नये. ज्या ईश्वराने आईला दैवत नव्हे तर कुलदैवत मानले त्या ईश्वराचा अवतार म्हणजे 'पणती' समजावा. त्याचा असा घोर अपमान करु नका, ते खरोखरच पाप आहे. भविष्यातील कुलदैवतांचा व पर्यायाने कुलदिपकांचा, जन्मा अगोदर जीव घेवू नका ! अन्यथा एक दिवस असा येईल की आई म्हणायला कोणीही नसेल, तर पत्नी फार दूरची गोष्ट आहे.

दैवत जगवा-वंश वाढेल, पणती फुलवा-वंशवेल टिकेल! ज्योती पेटवा-कुलदिपक येतील, मुलगी वाचवा, मुलगा वाचेल, !! शेवटी एवढेच म्हणेल, 'जगा आनंदाने, नांदा सौख्यभरे, पेटवा वाती, मिळेल सुख आणि शांती !!''

**स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी' असे होऊ देऊ नका ! आईरुपी दैवताचे पूजन करा.**

उध्दार होईल ! ईश्वर प्राप्त होईल, बापरुपी मुख्य आधार-दिपस्तंभाचा मान राखा,

आदर करा, जीवन मंगलमय होईल, दोन्ही दैवत एकसमान आहेत, भेदभाव नको,

मुलगा-मुलगी भेद नको, दीपज्योतींचे रक्षण करा, वंशाचे दीपक निर्माण होतील !





# जरासे भान राहू द्या रे ......

मी मुळची साताऱ्यासारख्या ठिकाणी वकील असलेल्या आजोबांच्या घरची मी. वकील असूनसुध्दा घरात कुटुंब नियोजन पोहचलेलं नव्हतं, आमच्या घरात माझे वडील आणि त्यांची अकरा भावंड, एवढं मोठ कुटुंब, तुम्ही सगळे मला हसणार आहात हे मला माहिती आहे. हे सगळ फार पूर्वीचे आहे असे नाही. फक्त अठ्ठावन्न वर्षापूर्वीची ही स्थिती. अठावन्न वर्षातला हा बदल आहे. शासनाने सांगितलं 'हम दो हमारे दो', आम्ही म्हणतो 'हम दो हमारे दो नाही एकच'. आज दहा माणसं आम्ही एका खोलीत रहात होतो. आज दहा खोल्यामध्ये रहायला माणूस नाही. आज कुटुंब व्यवस्थेच विदारक दृश्य मी बघतेय. मला एक आवाज गेली दहा वर्ष कानावर वाजतोय. तो आवाज तुम्हांला कोणाला ऐकू येत नाहीये. म्हणून मला बोलावं लागत, हा जो आवाज आहे तो मला तुमच्यापर्यंत पोहोचवायचाय म्हणुन मी बोलणार आहे.

आणि तो आवाज आहे, भारतीय कुटुंब व्यवस्था, भारतीय संस्कृती, भारतीय संसार या सगळ्याची मृत्यूघंटा बाजायला लागली आहे. शेवटच्या घटका मोजतायेत, पुढच्या १० वर्षात एकही घर अस्तित्वात राहिल असं मला वाटत नाहीये, पूर्वी आम्ही संयुक्त कुटुंबात होतो, नंतर आम्ही एकत्रात आला, नंतर आम्ही विभक्त झालो, नंतर आम्ही विभक्तातून आणखी विभक्त झालो. आता इतके विभक्त झालोत की, 'डबल इनकम नो चाईल्ड' का परिस्थिती आहे ही ? आज मला सांगायला लाज वाटते, आईने टाकून दिलेलं एका दिवसाचं बाळ, सांभाळाव लागत, उच्चविद्याविभूषीत मुलांनी, मुलींनी टाकून दिलेले, म्हातारे, आई आणि वडील देखील सांभाळावे लागतात का ? काय कारण आहेत ? रोज एक आई मरते, रोज एक आई विद्युत दाहिनीत आहे, तिरडी उचलावी लागते. आज रोज एका आईचा, मुलाने टाकलेल्या आईवर अत्यंसंस्कार करायला लागतो आहे.

उच्चविभूषीत असलेला इंजिनिअर मुलगा, आज आईची तिरडी उचलायला येत नाहीये, म्हणुन आज आजच्या तरुण मुलांबरोबर मला संवाद साधायचाय म्हणुन स्पष्ट बोलणार आहे. माझी आई, माझ्या आईला मी अजून कधीही बाहेर जाताना पाहिलं नाही. पन्नास माणस घरात एकूण होती त्या वेळेला, तिला मी आजपर्यंत अंथरुणावर पडेपर्यंत नुसत कामच करताना बघितलय, कधी माझ्या आईला रागवताना पाहिलं नाही, कधी चिडताना देखील पाहिलं नाही, कधी स्वयंपाक घरातील भांड्याचा आवाज आलेला सुध्दा मी ऐकलेला नाही. समईची वात जशी शांतपणे तेवते तशी माझी आई मी शांतपणे तेवताना बघितलय, मी 'तेवते' हा शब्द वापरला जळते नाही, जळणारी वात प्रकाश देत जगत नाही. पण तेवणारी वात मात्र अखंड प्रकाश देवून जगत असते आमची आई अशीच होती.

मला आठवतं मी सहावीत होते एकदा रात्री मला पावणे अकरा वाजता जाग आली. मला तहान लागली होती स्वयंपाक घरात दिवा दिसत होता. मी स्वयंपाक घरात गेले, आई एकटीच जेवत होती. तिला म्हटलं आई ग ! इतक्या उशिरा का गं जेवते ? आई म्हणाली, काय करु उद्या एकादशी आहे, दाणे कुटायचेत मला खूप काम आहे, म्हटलं बघू तुझ्या ताटात काय आहे ? आईनं मला ताट दाखवलं नाही तीन ते लपवलं, मी तिला म्हटलं, आई गं, ताट दाखव. तु काय जेवतीयेस ते मला बघायचयं. आई म्हणाली नाय गं, मी तुला अजिबात ताट दाखवणार नाही, ते ताट मी बळजबरीने ओढून घेतलं, आई चटणी आणि भाकरीशी जेवत होती. तिला म्हटलं तुच केली होतीस ना, मग तुझ्यासाठी वाटीत बाजूला का नाही काढून ठेवलीस? तेव्हा आई म्हणाली, आईला बाजूला स्वत:साठी वेगळं काहीच काढून ठेवता येत नाही. आईला वेगळे कप्पे नसतात. या शब्दांचे अर्थ मला तेव्हा कळले नव्हते, आता कळतात. आता कोणीतरी खायला दिलं की म्हातारी माणसं दिसतात. ज्याला आई बाप नाही त्या पोरांच्या हातात लाडू देताना माझा जीव कासावीस होत आहे.

आज मला आठवतेय आईन सांगितलेलं, आईला स्वत:ला स्वत:साठी बाजूला काही काढून ठेवता येत नाही. आई फार कडक आहे. ती शिकलेली नाही पण सुसंस्कृत आहे हल्ली शिक्षण आणि संस्कार यांचा कोठे संबंध असतो असं आज कुणालाच वाटत नाही. पण माझी आई शिकलेली नसली तरी अतिशय सुसंस्कृत आहे. तिने मला मुलगी म्हणुन जरुर बंधनात वाढवलं तो काळ जूना होता. आता सारखा नव्हता, पण आईने मला बंधनात वाढवलं मुलगी आहेस, मोठ्याने बोलू नकोस, मुलगी आहेस, दारात सारखी डोकावू नकोस, मुलगी आहेस, मोठ्यांदा हसू नकोस, मी मुलगी आहे हे माझ्या आईने मला शंभरवेळा ऐकवलयं दिवसातून आणि मी ऐकलय तिच.

एकदा मी संध्याकाळी ७ वाजता आरशात बघितलं मला तो दिवस आठवतो. आईनं मला इतकं मारलं मी तिला विचारलं का गं? का मारलसं मला ? मी मार खाल्ला पण मी विचारल का मारलं ? ती म्हणाली वाजले किती ? मी म्हणाले सात ती म्हणाली सूर्य मावळला ना, मी म्हणाले, मावळला ! ती म्हणाली मग चांगल्या घरातल्या मुलींनी सुर्य मावळल्यानंतर आरशात बघायचं असतं का ? त्या शब्दांचे अर्थ तेव्हा कळले नाही आता कळतात. आता एखाद्या कार्यक्रमाला जाण्याची संध्याकाळची वेळ झाली तर आरशात बघायची आठवण होत नाही. आईनं मला भान दिल पण शाळेत नाही घातलं, पण वडिलांनी शिक्षण दिलं, वडील फार प्रेमळ होते. घरची गरिबी होती, पण वडिलांना घरात पन्नास माणसं सांभाळताना कधी टेन्शन आलं नाही. टेंन्शन येण्यापूर्वी माझे वडील कायम अटेंन्शन असायचे, आणि गरिबीत समाधान होतं.

मांजरपाठाच्या कापडाचं एक पोलकं मिळायचं बाई ! ते सुध्दा दिवाळीत एकच असायचं, त्याच्यावर आई गुलाबाचं फुल काढायची आणि नटवायची, आम्ही ते परकर पोलकं घालायचो आणि नटायचो. ते चुरगळलेले परकर पोलकं रात्री धुवायचं, वाळत घालायचं, तांब्यात गरम पाणी करुन त्या तांब्याने इस्त्री करायची आणि कपाटात ठेवून द्यायचं, पुन्हा राखी पौर्णिमेला तेच घालायचं, पुन्हा नटायचं ! आता किती कपडे घेतात आईवडिल इतका कपडा आईवडील घेतात पण समाधान मानलं जात नाही. आम्ही समाधानी होतो, इतकं सगळ असूनही गरीबीतही समाधानी होतो. आम्ही पाच भावंड घरात होतो, आई म्हणायची रोज एकानं उपवास करा म्हणजे चार जणांना पोटभर मिळतं ! आम्ही सगळेपण एक एक दिवस उपवास करायचो ! ज्यावेळी धाकट्या भावंडाची उपवास करायची पाळी यायची तेव्हा आम्ही म्हणायचो आई, तो लहान आहे, त्याला नको गं उपवास घडवू ! त्यावेळी आमच्यातली चतकोर भाकरी त्याला देवून, त्याचं पोट भरायचो, या गरीबीतही समाधान होतं. एकमेकांनी वाटून खायचं असतं याची जाणिव होती. शेअरिंग व्हायचं आता, शेअरिंग

नाही, वाटून खाणं नाही, आईचा एक एक दिवस उपवासाचा मी बघितलाय, त्यावेळी तांब्या तांब्या पाणी पिऊन झोपलेली आई बघितली मी. ज्याला आई समजते ना, त्यालाच समाजाचं दुःख समजतं. ज्याला आई समजत नाही त्याला समाजाचं दुःख समजत नाही.




वडिलांनी शाळेत घातलं. सगळं येत मला, माझं अक्षर सुंदर आहे, मला नाटक करता येतं, सावित्रीबाई सुमरानं मला फार सुंदर करता येतं, मला ॲक्टिंग सुध्दा चांगली करता येते, जे सत्य आहे, जे जे शिव आहे, जे जे सुंदर आहे ते ते करायला मला आवडतं, पण स्त्रीच्या मर्यादित राहूनचं ! अक्षरशः मी इतकी हुशार होते, नववीत पास झाले, दहावीत गेले. मला हृदयविकार आहे माझ्या हृदयाला रक्ताचा पुरवठा नीट होत नाही. अजूनही ते दुखणं तसंच बाळगलयं जवळ ! पण आता त्याचा तसा फार त्रास होत नाही. १९६९ साली मी आजारी पडले तर १ डिसेंबर १९७५ ला मी बरी झाली. आणि ती साडेचार पाच वर्ष मी अंथरुणावर पडून होते. बरोबरच्या मैत्रिणी पुढं शिकत गेल्या. भावंड शिकून मोठी झाली. मी होते त्याच वर्गात राहिले रोजचा डॉक्टरचा खर्च परवडत नव्हता; गरीबी फार माझी आई फार रडायची, माझ्या अवस्थेला पाहून माझ्या आईच्या डोळ्यात कायम पाणी असायचं. मी देवाला म्हणायचे, देवा मला इतकं चांगलं वागायला शिकवं की माझ्याकडे आई रडणार नाही

एक वाक्य कायम ध्यानात ठेवा 'माझ्यासाठी कोणाच्या डोळ्यात पाणी आलं नाही तर ते जीवन व्यर्थ असतं, पण माझ्यासाठी कोणाच्या डोळ्यात पाणी आलं. तर ते जीवन कृतार्थ होत' माझ्यासाठी कोणीतरी रडलं पाहिजे . सांगून टाकलं वडिलांना मी लेचपेच जीवन जगणार नाही बाबा ! आजाराच्या काळात फार असह्य वेदना सहन केल्या मी. अंधाऱ्या खोलीत मला जगावसं वाटायचं नाही, असं वाटायचं का जगतेय मी ? आई वडिलांना भार होतेय का मी ! आणि मी आईवडिलांना सांगून टाकलं, मला जगायचं नाही त्यादिवशी माझ्या वडिलांनी एका वाक्यात सांगितलं, 'जी माणसं संकटाला घाबरतात ती भित्री असतात, पण जी माणसं संकट झेलत जगतात ती खंबीर असतात'. पण मला तुझ्यामध्ये इतकी खंबीर स्त्री दिसते की तु पुढे जाऊन इतकं मोठ काम करणार आहे, समाजाचं ! वडिलांनी समोर पुस्तक आणून ठेवलं, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांचं, माझी जन्मठेप या पुस्तकांच्या पहिल्या पानावर एक वाक्य लिहिलेल आहे., आयुष्यात जीवनाच्या वळणावर केव्हाही एकदा तरी माझी जन्मठेप वाचा ! म्हणजे कोणत्याही संकटाने तुम्ही खचून जाणार नाही. तुम्हांला आत्महत्या करण्याचं धाडस होणार नाही. मी वाचायला लागले, पण मला वाचताना सावरकर दिसायचे माई सावरकरांना समजावून घेणारे सावरकर मला दिसायचे. मी अस्वस्थ असायचे त्या काळात वडिलांनी रोज एक पुस्तक वाचून दाखवलंय, रोज नवीन पुस्तक ! विचार करा साडेपाच वर्षातले दिवस किती ? आणि त्या दिवसात एक नवीन पुस्तक, जिजामाता वाचल्या, अहिल्या होळकर वाचल्या, सावित्रीबाई फुले वाचल्या अगणित पुस्तके वडिलांनी मला चिंतनाची सवय लागली, मननाची सवय लागली आणि साडेपाच वर्षानंतर मी थोडीशी बरी झाले, हिंडायला





लागले, फिरायला लागले, पण आईला शिक्षण नाही महत्वाचं वाटलं ती म्हणाली तू आता बरी झाली आहेस तर तुझ लग्न उरकून टाकते. एकोणिसाव वय लागल होतं, तिने माझं लग्न उरकून टाकलं, तिने मला एकत्र कुटुंबात दिलं, आता मी माझ्या कुटुंबात रमले. आता मला रात्री झोपायला बारा वाजायला लागले. आता ताटात काय आहे याकडे माझ लक्ष जाईनास झालं, त्या घराची मी सून होते. नवरा पत्रकार मिळाला प्रचंड बुध्दिमान माणूस घरात पंधरा पेपर यायचे, पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत सर्व पेपर डिटेल वाचणारा नवरा. सतत लिखाण, वाचन, मनन, भाषण एवढा बुध्दिमान नवरा मिळाला पण अत्यंत कडक तक्रार करत नाहीये स्वभाव सांगते. तो काळ असा होता नवऱ्याने मारलं अन् पावसानं झोडलं, सांगायच कुणाला, त्याकाळात महिला दक्षता समितीच्या महिला नव्हत्या. अत्यंत कडक नवरा कपबशी स्वच्छ नसली तरी रागवायचे, चहात साखर जास्त झाली तर रागवायचे, कमी पडली तरी रागवायचे. अजून कळत नाही एकसारखा चहा मला कधीच करता आला नाही, पण सासुबाई फार चांगल्या होत्या. मला माझ्या आईच्या आठवणींन जेव्हा दुःख होत त्यापेक्षा अधिक मला सासूबाईंच्या आठवणीनं होतं. त्या म्हणायच्या घाबरतेस कशाला, आतमध्ये चहा करुन पिऊन बघत जा ! पुरुषांना काही कळतं नसतं आपण आतमध्ये काय करीत असतो ते त्या म्हणायच्या, एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीला समजावून घेतल पाहिजे. एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीच दुःख जाणून घेतले पाहिजे आणि मान दिला पाहिजे.

माझं दुःख माझ्या सासूबाईंनी जाणून घेतलं. मला सन्मान दिला, आजपर्यंत गेल्या ३७ वर्षात मला नवऱ्याने एकदाही विचारलं नाही, कुठं बाहेर फिरायला जायचं आहे का ? तुला नवीन साडी घ्यायची आहे का ? तुला माहेरच्या कार्याला जायचं आहे का ? तुला एखादी वस्तू आवडती का ? तुला ती घ्यायची का ? एकही प्रश्न गेल्या ३७ वर्षात ऐकलेला नाही. पण रोजचे प्रश्न हायलाईट केल्यासारखे असायचे, रोजचे पेपर वाचलेत का ? अग्रलेख समजलेत का ? डोक्यात काही शिरलं का ? अर्थ समजले का ? त्यांना म्हटलं अहो, वाचायला वेळ होत नाही हो ! सकाळपासून मी कामात गुंतलेले असते, इतकी कामे पहाटे चारपासून मी उठलेली असते. रात्री बारा वाजायचे आम्हांला झोपायला ! धुणं, भांडी सगळं इतकी माणसं घरात त्यांना म्हटल मला वेळ होत नाही ते म्हणाले. तू जगात रहाण्याच्याच लायकीची नाहीस, दगड आहेस तू, जो वाचत नाही, जो जगात काय चाललयं ते जाणून घेत नाही, ज्याच्यामध्ये अशी क्षमता नाही तो दगडच ! ते मला म्हणाले मी आजपासून तुझ्याशी बोलणार नाही, ज्या दिवशी तू पेपर वाचशील त्या दिवशी मी तुझ्याशी बोलेन ! त्यांनी बोलणं बंद केल त्या दिवशी सासूबाई मला हळूच विचारतात तो तुझ्याशी बोलत नाही का ? मी म्हटलं नाही. त्या म्हणाल्या का ? मी म्हटलं पेपर वाचायला आवडत नाही पण तुझ्या नवऱ्याला आवडतं ना ! ते तुझ्या चांगल्यासाठी म्हणतात ना ! म्हटलं हो, तेव्हा माझ्या सासूबाई मला म्हणाल्या. दुसऱ्याच्या आनंदासाठी जगता आलं पाहिजे. मला पटलं अन् दुसरा कोण होता, नवरा तर होता. चला नवऱ्याच्या आनंदासाठी पेपर वाचू या ! नवरा म्हणायचा डोळे उघडे ठेवा बातम्या वाचा ! सासूबाई म्हणायच्या पाच मिनिटं शांत रहा ! रोज पेपर वाचायचे, रोज समजावून घ्यायचे संसार माझा छान झाला. पहिली भाकरी केली तिचे चार तुकडे झाले आणि तव्याच्या काठाचा चटका मनगटाला बसला, भाकरी मोडली सगळ्यांना दिसली पण, चटका बसला कोणालाही नाही दिसला. पण त्यादिवशी सासूबाई खूप चिडल्या मला म्हणाल्या गधडे ! कशी मोडलीस भाकरी ? मी म्हटलं पीठ मळायला कुठं तरी कमी पडलयं वाटतं ! यावेळी त्या मला पटकनं म्हणाल्या तुझ्या आईनं तुला काहीही शिकवलेले दिसत नाही, मुलींनो तुम्ही कोठेही जा ! तुमच्या हातून एखादी चूक झाली तर आईलाच नावं ठेवली जातात. वडिलांना नाही, कोणी चुकूनसुध्दा असं म्हणत नाही की, तुझ्या वडिलांनी तुला चांगल शिकवलं नाही. एक वाक्य सारखं ऐकावं लागतं की, तुझ्या आईने तुला नीट शिकवलं नाही, तुझ्या आईनं काही संस्कार केले नाही. त्या दिवशी मी इतकी रडले. मी सासूबाईंना म्हटलं, माझ्या आतमध्ये जे जे काही चांगल आहे, सुंदर आहेते माझ्या आईने दिलेले आहे आणि मी काही चुकलेय ती माझी चूक आहे. मुलींनो आपण आपल्या आयुष्यात कोठेही जावू ज्या घरात आपल पाऊल ठेवू त्या ठिकाणी आपण इतकं चांगल वागू या ! की परतून आपल्या आई-वडिलांना कोणी नावं ठेवणार नाही.

**ॲड. अपर्णाताई रामतिर्थकर**
समाज सेविका





# जागतिकीकरण व शिक्षण

''हे विश्वचि माझे घर, विश्व स्वधर्म सुर्ये पाहो'' असा अखिल मानवतेचा जागतिक महा संदेश संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांनी आठशे वर्षापूर्वी देऊन आपल्या विश्वव्यापी संपन्न विचार परंपरेची जगाला ओळख करुन दिलेली आहे. तसेच

नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते । ज्ञानासारखी पवित्र गोष्ट या जगामध्ये कोणतीहि नाही.असा घोषहि त्यांनी या काळात केलेला आहे. तेव्हा विश्व नागरिकत्वाचा स्विकार आपल्या विचार परंपरेला नविन नाही 'शिक्षण म्हणजे चांगला उदात्त विचाराचा माणुस घडविणे' हा प्लेटोचा विचार प्रत्यक्षात आणणे हाच शिक्षणाचा खरा हेतु आहे शिक्षणाने माणसाचे भविष्य घडविणे हा कर्मवीर डॉ भाऊराव पाटील यांचा व्यवहारी विचार ही अमलात आणणे ही आजच्या आधुनिक काळाची खरी गरज आहे.

शिक्षणाने माणसाला चांगले संस्कारित करणे त्याचबरोबर बदलत्या आधुनिक काळाला समर्थपणे सामोरे जाणेसाठी त्याला सक्षम करणे आजच्या जागतिकीकरणाच्या काळातील शिक्षणा समोरील खरे आव्हान आहे आजच्या शिक्षणाला व शिक्षण व्यवस्थेला जागतिकिरणाच्या रेट्याला सामोरे जावेच लागणार आहे शिक्षण क्षेत्रातील जागतिक जीवघेण्या स्पर्धेला तोंड द्यावेच लागणार आहे. २१ वे शतक हे ज्ञानाचे युग मानले जाते. ज्ञानाच्या या युगात प्रवेश करित असताना आमच्या शैक्षणिक स्थितीची दुरावस्था चिंता करण्यासारखीच आहे भारतीय राज्य घटनेच्या ४५ व्या कलमात सर्व मुलांना त्यांच्या वयाची चौदा वर्ष पुर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा प्रयत्न राज्य करील ''असा आदेश भारतीय घटनेची अंमलबजावणी सुरु झाल्यापासून दहा वर्षाच्या कालावधीसाठी दिलेला आहे त्यानंतर जवळ जवळ ६० वर्षाचा कालावधी लोटला'' सर्वासाठी शिक्षण हा दिल्लीचा जाहिरनामा डिसेंबर १९९३ मध्ये जाहिर करण्यात आला या जाहीरनामाची कोठेहि अंमल बजावणी झालेली नाही व तसा प्रयत्न ना शासनाने केला ना सामाजिक बांधीलकीच्या शिक्षण संस्थांनी सर्वात जास्त संख्येने शाळेबाहेर मुले असणारा आणि सर्वात जास्त निरक्षर प्रौढ असणारा देश भारत अशी आजही आपल्या देशाची प्रतिमा आहे किमान मुलभूत व प्राथमिक शिक्षण नसलेली फार मोठी लोकसंख्या आपल्या देशात आजही ज्ञानाच्या आधुनिक युगात असावी हे या देशाचे व यातील लोकांचे दुर्दैवच म्हणावे लागेल.

ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, संगणक यामध्ये फार मोठ्या वेगाने प्रचंड बदल होवून राहिले आहे संगणकिकरण, इंटरनेट, डॉट कॉम वेबसाईट, ई क्लास हे फक्त परवलीचे शब्द नसुन ती आता प्रत्यक्षातील प्रक्रिया म्हणून वास्तवात आपण पाहत आहोत. संगणक साक्षर व संगणक निरक्षर या दोन वर्गाने आजचे जग विभागले गेले आहेत. महत्वाचा प्रश्न आहे. ज्ञान, तंत्रज्ञान, विज्ञान, संगणक यांच्या आधुनिक जगात निरिक्षर व दुर्बल घटक यांचे स्थान काय ? मुलभूत शिक्षणापासून वंचित असणाऱ्यांना नव्या शिक्षण पध्दतीचा उपयोग काय ? माहिती तंत्रज्ञानाचा यांना काय उपयोग ? इंग्रजी ही विश्वाची ज्ञान भाषा समजली जाते मराठी ही आपली मातृभाषा आहे तिचा आदर तर केलाच पाहिजे परंतु इंग्रजी भाषेचा द्वेषहि आजच्या या युगात करता येणार नाही तिचेबरहि मावशी प्रमाणेच प्रेम करावे लागेल. अक्षर ज्ञानच ज्यांना नाही तर ते इंग्रजी भाषा कशी अवगत करु

शकणार ? उच्च वर्गाला व उच्च वर्गीयांनाच फक्त याचा फायदा मिळणार ? आर्थिकदृष्ट्या उन्नत वर्गच यात मक्तेदारी मिळवणार ? हे सर्व प्रश्न खऱ्या वास्तवाला धरुन आहेत आणि तितकेच ते सामाजिक दृष्ट्या सुचक आहेत. या समस्येतुन मार्ग काढणे हे आजच्या शिक्षण व्यस्थेला गरजेचे आहे नाहीतर मुलभूत शिक्षणापासुनही वंचित, माहिती व तंत्रज्ञान विज्ञान संगणक इंग्रजी या सारख्या आधुनिक ज्ञानापासुनही वंचित अशीच जर निरक्षर आणि कमकुवत वर्गाची स्थिती राहिली तर त्यांची स्थिती म. फुले यांनी नमुद केल्याप्रमाणे होईल. महात्मा फुले म्हणतात.

''विद्येविना मति गेली । मती विना नीती गेली । नीतीविना गति गेली । गतिविना वित्त गेले । वित्ता विनाशुद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले । वंचितांना या अविद्येचे स्थितितून बाहेर न काढल्यास त्यांची दुर्दशा आहे तशीच राहणार हे उघड आहे. आणि मग आपला देश जगातील एक महासत्ता होणार आहे या वास्तवाला काही अर्थच राहणार नाही. आधुनिक ज्ञानाच्या या माध्यमातून आपण परत एकदा समाजा-समाजामध्ये विषमतेची प्रचंड दरी निर्माण करण्यास मात्र कारणीभूत होवू अमेरिकेसारख्या जगातील खऱ्या अर्थी महासत्ता असणाऱ्या देशात कधी काळी अशीच स्थिती निग्रो बांधवात निर्माण झालेली होती. डॉ.कार्व्हर या जग प्रसिध्द निग्रो शास्त्रज्ञाने आपल्या निग्रो बांधवांना प्रेरित करण्यासाठी म्हटले की, अवनत स्थितीतील माझ्या निग्रो बांधवांनो तुम्ही आधुनिक ज्ञानाची विज्ञानाची,, तंत्रज्ञानाची शिक्षणाची कास धरावी जगाला तुमच्या कष्टाने व प्रयत्नाने असे दाखवून द्या की जगात अशी गोष्ट नाही नी जी निग्रो करु शकत नाही'' हाच संदेश आज आपल्या देशातील निरक्षर वंचितापर्यंत पोहचविण्याची व त्यांना प्रेरित करण्याची गरज आहे अर्थात केवळ त्यांना संदेश प्रोहचवून व प्रेरित करुन हे काम होणार नाही. त्यांना आधुनिक शिक्षणाची संधी मिळावी म्हणून योग्य त्या सुविधा ही उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे यासाठी सरकारची प्रखर इच्छा शक्ति व सामाजिक बांधीलकीच्या शिक्षण संस्थांची नितांत गरज आहे आधुनिक ज्ञानाशिवाय बहुजनांना गति नाही आणि त्या शिवाय त्यांची गरीबी हि दुर होणार नाही. महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराज यांची प्रेरणा घेऊन कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना ९२ वर्षापूर्वी केली. आज ही संस्था आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था मानली जाते कर्मवीर हे द्रष्टे समाज-सुधारक व शिक्षण तज्ञ होते. त्यांनी गरीब, दलित आदिवासी व ग्रामीण विद्यार्थ्यांना त्या काळी मुंबई विदयापीठ जिंकण्याची प्रतिज्ञा घेण्यास सांगितले. विद्यार्थ्यांना ते म्हणत, ''तालीम करा, तुम्हाला राजाबाई टॉवर जिंकायचा आहे'' राजाबाई टॉवर जिंकायचा आहे'' राजाबाई टॉवर म्हणजे मुंबई विद्यापिठाच्या मुख्य समारतीचा मनोरा या मनोराच्या रुपाने ते विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्वक शिक्षण घेण्याचा उपदेश करीत. शिक्षणात श्रम संस्कृतिची जोपासना केली. आजहि श्रमाला प्रतिष्ठा, देऊन गोरगरीबांना अशा श्रम संस्कृतीचा अवलंब करुनच शिक्षण घेता येईल अशा शिक्षणाने विद्यार्थ्यांचे मातीशी नाते राहील आणि माय भुमिशी शिक्षणाची जाळ जोडता येईल. त्याच बरोबर सर्व तऱ्हेचा आधुनिक ज्ञानाच्या क्षेत्रात आपल्या दर्जेदार गुणवत्तेने उच्चशिक्षित होऊन तो विश्व नागरीक म्हणून हि वावरु शकेल. दलित, वंचित, सामान्यजन यांचे जवळ श्रम शक्तीची श्रीमंती आहे. ही श्रीमंती खऱ्या अर्थाने आपल्या देशाचे वैभव आहे या संपत्तीच्या जोरावर गरीब माणुसहि आधुनिक शिक्षण घेवू शकेल आणि उच्च विद्या विभुषीत होवून माहिती तंत्रज्ञान विज्ञान संगणक यासह ज्ञानाच्या सर्व क्षेत्रात उंच भराऱ्या मारु शकतो. याचे या देशातील आदर्श उदाहरण आहे रयत शिक्षण संस्थेचे डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केले ती शिक्षण संस्था ही या देशातील सामाजिक व शैक्षणिक परिवर्तनाची प्रयोग शाळा'' बनली पाहिजे अशी अपेक्षा महाराष्ट्राचे भाग्य विधाते स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण यांनी व्यक्त केली होती. 'The purpose of education is right action' या प्लेटोच्या वचनाप्रमाणेच रयत मधील विद्यार्थी आधुनिक ज्ञानात तरबेज होणेसाठी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देशाचे लोकनेते केंद्रिय कृषिमंत्री ना. शरदरावजी पवार 'रयत' मधील सर्व घटकांना बरोबर घेऊन संस्थेचे चेअरमन जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक व श्रेष्ठ विचारवंत ॲड. रावसाहेब शिंदे यांना प्रेरणा देऊन शिक्षणाचे क्षेत्रात या देशात परिवर्तन घडवित आहेत. ९ मे २००८ या कर्मवीराच्या पुण्यतिथिचे दिवशी पवार साहेबांनी सातारा येथील कर्मवीरांच्या समाधीला वंदन करुन रयत मधील सर्व विद्यार्थ्यांना संगणकाचे परिपुर्ण शिक्षण दिले जाईल'' अशी घोषणा केली. रयत शिक्षण संस्थेच्या महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात असणाऱ्या ४३६ माध्यमिक विद्यालयांचे शाखेत शिकणाऱ्या ८ वी ९ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या २ लाख ५० हजार विद्यार्थ्यांना संगणकाचे परिपूर्ण शिक्षण आज मिळत आहे. या देशातील शालेय संगणक शिक्षण क्रांतिचा पाया आदरणीय पवार साहेब चेअरमन ॲड. राव साहेब शिंदे व या क्रांतीस सहकार्य करणारे त्या काळचे उच्च व तंत्रज्ञान शिक्षण मंत्री ना. दिलीपराव वळसे पाटील यांनी घातला. देशातील कोणत्याही शिक्षण संस्थेने,राज्यशासनाने अगर केंद्र शासनाने असा व्यापक

संगणक शिक्षणाचा कार्यक्रम आजपर्यंत कधीहि घेतलेला नाही. आज खेड्यापाडयातील गोरगरीब, शेतमजुर दलित शेतकरी आदीवासी या विद्यार्थ्यांना कदाचित संगणकाचे दर्शन होणे अवघड होते. या वर्गातील मुले-मुली आज संगणकावर मोठ्या आत्मविश्वासाने बोटे चाळवताना दिसतात रयत शिक्षण संस्थेने ही एक प्रकारची 'सायलेंट रिव्होल्युशन' निस्तब्ध क्रांति या देशात घडवून आनली आहे. याचे अनुकरण अन्यत्र होणे ही खरी काळाची आजची गरज आहे. महाराष्ट्राचे भाग्यविधाते व रयतचे मा.अध्यक्ष मा.यशवंतरावजी चव्हाण यांनी राशीया मधील सैबेरियाची सायन्स सीटी पाहून व अभ्यासुन असे म्हटले होते की, या जगातील मानवाची आधुनिक जीवनाची कार्यशील प्रेरणा म्हणजे विज्ञान. विज्ञानावर आधारलेली संस्कृती हा जीवनाचा स्थायी भाव करावयाचा असेल तर त्यासाठी ऐतिहासिक कालानुरुप महत्वाचा निर्णय अवश्य असतो. त्या नंतर त्याचा परिणाम दिसून येतात. ज्ञानाचा प्रसार सर्वत्र दुरवर होऊन मानवी जीवन नवचैतन्याने उजळून निघते. साहेबांच्या या विचाराचे प्रत्यंतर मला अमेरिकेमध्ये आले. या जगातील सर्वश्रेष्ठ महासत्ता म्हणून अमेरिकेचा निर्देष केला जातो या अतिविकसित देशात विज्ञान, तंत्रज्ञान व संगणक प्रणित माहिती तंत्रज्ञान यांचा वापर मानवी प्रगतीच्या प्रत्येक क्षेत्रात जास्तीत जास्त केल्याने हे राष्ट्र महासत्ता बनले आहे. जागतिकीकरणाच्या या तीव्र स्पर्धेत चीन सारखा बलाढ्य लोकसंख्येचा देशही आज अमेरिकेला ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, संगणक यांचे आधारे नवे आव्हान देऊ लागला आहे. मग भारतासारख्या प्रचंड मनुष्यबळ असलेल्या देशाला हे शक्य का नाही असा प्रश्न तुम्हा आम्हा पडतो. या प्रश्नाचे सरळ उत्तर असे आहे की ज्या राष्ट्रांनी समाजांनी अध्यात्मा बरोबर आधुनिक ज्ञानाची, विज्ञानाची, तंत्रज्ञानाची व संगणकाची कास धरली आहे ती राष्ट्रे व त्यातील लोक खऱ्या अर्थाने विकासाच्या अतिउच्च, शिखरावर पोहचले आहे. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशांत, समाजात विज्ञानाची जाणीव करुन देणे गरजेचे आहे व ती जाणीव विद्यार्थ्यास अगदी सुरुवातीच्या काळापासुन करुन देण्याची अत्यंत गरज आहे. विद्यार्थी दशेपासून त्यांना विज्ञानाची गोडी लागावी. त्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन वाढीस लागावा. त्यांचेतील सुप्त संशोधन वृत्ती जागृत व्हावी यासाठी खेड्यापाड्यात विज्ञान-तंत्रज्ञानाचा प्रसार होणे आवश्यक आहे. आजच्या समाज परिवर्तनाची विचारधारा विज्ञानावर आधारित असल्याने या देशातील प्रत्येक शिक्षण संस्थाचालकांनी विद्यापिठांनी शिक्षण व्यवस्थेत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना चला जानुन घेऊ या ज्ञान-विज्ञान रचनावाद हे घोष वाक्य मनाशी बाळगुन काम करण्यास कार्यप्रवृत्त व्हावे लागेल.

येत्या नजिकच्या काळात या देशातील ५०टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या ही ३५ वर्ष वयाच्या आतील राहणार आहे. देशात शिक्षणाचा बऱ्यापैकी प्रसार झाला असला तरी विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण फार मोठे आहे. फार कमी विद्यार्थी म्हणजे शेकडा १३ % विद्यार्थी उच्च शिक्षणा पर्यंत जातात, शहरी भागापेक्षा ग्रामिण भागात सामाजिक व आर्थिकदृष्ट्या उपेक्षित समाजात गळतीचे प्रमाण सर्वाधिक आहे. मुलींचेही गळतीचे प्रमाण लक्षणिय आहे त्यालच सर्वांना रोजगाराची संधी आजच्या शिक्षण पध्दतीमुळे मिळू शकत नाही. भारत खऱ्या अर्थाने जगातील सर्व श्रेष्ठ तरुणाईचा देश'' आहे यात तरुणाईला जर वेळीच त्यांचे हाताला काम मिळाले नाही त्यांना रोजगार उपलब्ध झाला नाही. तर भारत जगातला एक नंबरचा बेकारांची प्रचंड फौज असणारा देश राहील यामुळे या देशात अराजक माजण्याची शक्यता नाकारुन चालणार नाही. या तरुणाईला काम देणे व त्यासाठी देश पातळीवर शिक्षण व्यवस्थेत अमुलाग्र बदल करणे ही देशाची खरी गरज आहे दुर्दैवाने देशाच्या या वास्तववादी समस्येकडे अद्याप पर्यंत कोणाचे हि लक्ष नाही प्राथमिक शिक्षणाची अवस्था एक प्रकारे भिकार अवस्था म्हणावी लागेन अशी करुन ठेवलेली आहे जी काय व्यवस्था आहे, ती अतिशय अपुरी पुरेशा शाळा नाहीत इमारती नाहीत. ध्येयवादी शिक्षक नाहीत परिणामी अर्ध अधिक खेड्यापाड्यातील गरीबांची मुले शाळे बाहेरच राहतात. ज्यांचे काही शिक्षण चालु आहे त्या शिक्षणाला दर्जा नाही, शिक्षकात कर्तव्य दक्षता नाही. खऱ्या अर्थाने आजचा खेड्या-पाड्यातील दऱ्या खोऱ्यातील बहुजन कष्टकरी समाज हा शाळे शिवायच शिक्षणाचा मार्ग अवलंबतोय म्हटल्यास वावगे होणार नाही. आपल्या शिक्षण क्षेत्राची पुर्ण दुर्दशा झालेली आहे. याची प्रचिती अगदी विद्यापीठ शैक्षणिक दर्जावरुन येते ज्ञानाची हजारो वर्षांची परंपरा असणाऱ्या या खंडप्राय देशातील एकहि विद्यापीठ जगातील दर्जेदार २०० विद्यापीठा पैकी नाही. अगदी मुंबई विद्यापीठसुध्दा समाजकारण, राजकारण, धर्मकारण, अर्थकारण यात गुंतलेल्या समाजाला याची काही खंत वाटत नाही. ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या शिक्षक, प्राध्यापक यांच्या संघटना आपल्या कर्तव्याबद्दल 'ब्र' ही काढत नाही. त्यांना विद्यार्थ्यांचे हिताचे काही घेणे देणे नाही शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्ती विद्येचा लिलाव करित आहेत. शासनाला या परिस्थितीचे काही देणे घेणे नाही. देशाचे दुर्दैवाने आजचे शासनकर्तेच विद्येचे लिलाव करणाऱ्या शिक्षण व्यवस्थेचे मालक आहेत शिक्षणात गोर गरिबांचे उत्थापन व्हावे म्हणून या प्रवृत्तींना अंतरीचा कळवळा दिसत नाही अशा या विपरीत परिस्थितीत गरीबांनाच आपला दर्जेदार शिक्षणाचा हक्क

मिळवण्याचा लढा लढावा लागेल. समर्पित भावनेने, सेवाभावी वृत्तीने आणि लाभाविन प्रिती करणाऱ्या रयत सारख्या सेवाभावी संस्था आणि कार्यकर्ते यांना या बाबत सर्वशक्ती पणाला लावून शिक्षणाचे पवित्र कार्य करावे लागेल. परिस्थिती अत्यंत बिकट आहे. तथापि निराश न होता खचून न जाता गती घ्यावी लागणार आहे ध्येयवाद स्विकारुन शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थाना व व्यक्तिंना आता आयुष्याच्या नव्या मशाली पेटवाव्या लागणार आहे

**'शृखंला पायी असु दे, मी गतीच गीत गाई''**

**दु:ख उधळावयास आता-आसवांना वेळ नाही''**

अशी प्रेरणा घेऊनच शिक्षण क्षेत्रात कामाला लागुन वंचितांची शिक्षणाची प्रगति साधावी लागेल. ही प्रेरणा महाराष्ट्राचे सुदैवाने रयत शिक्षण संस्थेने परत एकदा घेतली.


मोठ्या प्रमाणावर या देशात सर्व प्रथम रयत ने नापासांची शाळा काढून माध्यमिक स्तरांवर (८ वी व ९वी) व्यवसाय शिक्षणाची जोड देऊन विद्यार्थ्यांमध्ये व्यवसाय शिक्षणाची जोड देऊन विद्यार्थ्यांमध्ये व्यवसाय शिक्षणाची आवड निर्माण करणे व त्याचे अंगातील प्राथमिक कौशल्य विकसित करण्याच्या दृष्टीने त्याचबरोबर त्याला स्थानिक रोजगार मिळवून त्याचा रोजी रोटीचा प्रश्न सोडविणेसाठी नविन शैक्षणिक धोरणानुसार माध्यमिक स्तरावर व्यवसाय शिक्षण मोठ्या प्रमाणावर देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला व त्यांची अमंलबजावणी हि केलेली आहे या देशात बदलाच्या काळाची व बदलत्या आधुनिक शिक्षणाची पहिली चाहूल 'रयतला' लागते आधुनिक काळाबरोबर जाण्याची व शिक्षणाला त्या दिशेने नेणेची खरी गरज आजचे जागतिकिरणकरणाचे या झंझावातात आहे. जागतिकिरणाचे उद्योग क्षेत्रातील या स्पर्धेत आमचे चाकण' ही उद्योग नगरी आज ड्रेट्राईट ऑफ इंडिया '' बनली आहे. या उद्योग नगरीतील उद्योगाचा पाया मी आमदार असताना घातला व माझ्याच हयातीत या उद्योग नगरीने उद्योग क्षेत्राच्या जागतिक नकाशात गरुड झेप घेतली याचे फार मोठे समाधान आज मला वाटत आहे. हिंदुस्थानातील वाहन उद्योगाचे ' प्रमुख केंद्र चाकण झालेले आहे वाहन उद्योगाला'' लागणारे स्थानिक मनुष्यबळ निर्माण करणे व त्यासाठी आवश्यक त्या तंत्र शिक्षणाची सोय करणे ही खरी गरज आहे. ही गरज ओळखून चाकण गावचे एक भुमिपूत्र तरुण उद्योजक श्री प्रतापराव खांडेभराड यांनी मोठ्या दुरदृष्टीने पी.के. फौंडेशन'' या नावाचा शैक्षणिक संस्था स्थापन केली या संस्थेने वाहन उद्योगाला लागणारे तंत्र कुशल मनुष्य बळ निर्माण करणेसाठी चाकण परिसरात आद्यायावत असे इंजिनिअरिंग कॉलेज व्यवस्थापन महाविद्यालय व पॉली टेक्नीक सुरु केलेले आहे या शिक्षण संस्थेत गोर गरीबांच्या मुलांना सहज प्रवेश मिळतो अत्यंत गरीबीतून पुढे आलेले प्रतापराव नेहमीच गरीबीची जाण ठेवतात व गरीब माणसाविषयी त्यांचे मनात कळवळ निर्माण होत असल्याने केवळ निरपेक्ष बुध्दीने ही शिक्षण संस्था चालवित आहे या शिक्षण संस्थेने करि लाभाविना प्रीती'' या माणुसकीने व सेवा भावी वृत्तीने मुकबधीरांसाठी एक शाळा काढली आहे. मुक बधिरांना आपल्या जीवनात ज्ञानदानाद्वारे उभे करण्याचे पवित्र कार्य ते खऱ्या अर्थाने हरिचेचे' काम ते करित आहे सत्ता व संपत्ती याला नेहमीच नम्रतेची झालर असावी लागते. वारकरी सांप्रदयाची परंपरा असलेल्या घराण्यात त्यांचा जन्म झाल्याने त्यांचे जवळ संपत्ती आहे परंतु त्यांचे स्वभावाला नम्रतेची झालर आहे जागतिकिरणाच्या या स्पर्धेत शिक्षण क्षेत्राला प्रतापरावासारख्या शिक्षण संस्था चालकांची व शिक्षण प्रेमी कार्यकर्त्यांची गरज आहे शिक्षण क्षेत्रात काम करताना त्यांची भुमिका नेहमीच गुरुदेव रविंद्रनाथांच्या अवतरणाप्रमाणे राहीलेली आहे.

'सुर्याने प्रश्न केला मी आता अस्ताला जाईल सगळीकडे अंधार होईल. प्राणिमात्र कासाविस होतील. मग प्रकाश कोण देईल'' सर्वत्र स्तब्धता पसरली तेवढ्यात एक पणती पुढे आली आणि धिटाईने म्हणाली, मी सुर्या इतका प्रकाश देण्याचा दावा करु इच्छीत नाही पण मी तेवत राहीन. आणि प्रकाश अंधाराला छेदु शकतो हा प्राणिमात्रा मधला विश्वास मी जागता ठेवीन''.

प्रताप रावांनी हाती घेतलेले शिक्षणाचे पवित्र कार्य जागतिकिरणाच्या जीव घेण्या स्पर्धेत तेवत राहील आणि ज्ञान प्रकाशाने अवती भोवतीचे विश्व उजळून काढण्याचा त्यांचा प्रामाणिकपणाचा प्रयत्न असाच चालु राहिल असा विश्वास व्यक्त करुन त्यांना व त्यांचे पवित्र शिक्षण कार्यास मी मनापासुन शुभेच्छा देऊन जागतिकीकरण व शिक्षण'' या विषयाला येथेच मी पुर्णविराम देतो.

ॲड.राम कांडगे (माजी आमदार)
चेअरमन,
पश्चिम विभागीय सल्लागार समिती पुणे

भेटले जर मदतीचे हात तर जोमाने लढेल मी
सोडली जर सगळ्यांनी साथ तर एकटाच चालेल मी !



# यशाची १० तत्वे

- **जर तुम्हाला जग बदलावे असे वाटत असेल तर त्या अगोदर तुमचं मन बदला.**

  यश तुमच्या कृतीमधून मिळते. ज्यापध्दतीने तुम्ही कृती करता त्याचा विचार करा व ती समजून घ्या. तरीसुध्दा, जर तुम्हाला यशस्वी व्हायचं असेल तर पहिल्यांदा स्वत:ला बदला.

- **यश ही सवय आहे.**

  श्रेष्ठता ही काय वेगळी कृती नाही, ती एक सवय आहे. जे काय तुम्ही पुन:पुन्हा करता ते अशी छोटी गोष्ट की, जी तुम्ही दररोज एकमेकांवर बांधता. तुमचं ध्येय गाठण्यासाठी दररोज प्रगती त्यादृष्टीने करा.

- **यश हे आत्ताच मिळविण्यासाठी असते**

  'वर्तमान' हाच एक क्षण आपल्या हातात असतो आणि तोच 'क्षण' इतर क्षणांसाठी दरवाजा असतो.

  आपण भूत किंवा भविष्य अनुभवू शकत नाही. त्यामुळे खरंतर आपल्या यशाला दाद मिळण्यासाठी आपल्या हातात फक्त वर्तमान असतो. वेळ घ्या व यशाचा आनंद घ्या त्याशिवाय तुम्हाला शब्दाचा अर्थ सुध्दा कळणार नाही.

- **यश हे गतीमध्ये असते –**

  ज्यावेळी तुम्ही एखादी गोष्ट करता आणि ती चांगली होते तेव्हा तुम्ही त्यावरच समाधानी न राहता तीच गोष्ट अजून चांगली करण्याचा प्रयत्न करता. 'या नंतर काय' फक्त याचाच आकडा लक्षात ठेवा. तुम्ही यशाची चव चाखली आहे का, त्यापासून उन्मत्त होणं सुध्दा सोपं आहे. जेव्हा यशामुळे तुम्ही खुप आनंदी होता. तेव्हा ते प्रेमपुर्वक दिसत असतं. तुम्ही खात्रीशीर बनता त्याच्या (यश) थोड्या काळाबद्दल.

  जर ते तुमच्याजवळ कायमस्वरुपी राहावे असे वाटत असेल तर ते पुढे हलवत राहणे. एक यशस्वी व्यक्ती त्याला काम मिळाल्यानंतर सुध्दा नियमित काम करत असते.

- **यशासाठी विश्वास लागतो.**

  झेप घेतली तर जाळे दिसेल. यशाचा पाठलाग करणे हे आव्हानात्मक व धोकादायक आहे. पण मी यशस्वी होईल यावर जेव्हा विश्वास ठेवता तेव्हा त्यामध्ये तुमच्या संधीमध्ये वाढ होते.

## यश म्हणजे इतरांना मदत

यशस्वी लोक हे देणारे (दाता) नसतात. पण देणारे लोक हे यशस्वी असतात.

तुम्हाला स्वत:ला मदत करणं हे आनंददायक असते पण दुसऱ्याला मदत केल्यामुळे मिळणाऱ्या समाधानापेक्षा नाही. यशाची खरी व्याख्या हि तुम्हाला आत्तापर्यंत काय मिळाले व त्यामधील तुम्ही काय मागे दिले, यामध्ये आहे.

## यश ही एक निवड असते.

तुम्ही जेव्हा आजुबाजुच्या परिस्थितीत स्वत:ला पहिल्यांदा शोधता (ओळखता) तेव्हा ते यशाच्या दिशेने उचललेले पहिले पाऊल असते. तुमचं जीवन तुमच्या हातात आहे. जर तुम्हाला तुमची परिस्थिती आवडत नसेल तर ती बदला.

चांगल जीवन निर्माण करण्यासाठी प्रत्येकाकडे साधन व संधी आहे. पण तसं करण्यासाठी प्रत्येकान निर्णय घेतला पाहिजे. एका स्विडीश म्हणीनुसार – देवाने प्रत्येक पक्ष्याला खाण्यासाठी जंत (किटक) निर्माण केले, पण ते त्याने त्यांच्या घरट्यात दिले नाही.

## टिकवून ठेवणे महत्त्वाचे


जीवनातलं सर्वात मोठ/खरं अपयश – जेव्हा तुम्हाला कळत नाही, की तुम्ही यशाच्या किती जवळ आहात आणि तुम्ही मधूनच माघार घेता.

कॉलोनेल हारलन सॅन्डरस यांनी आपल्या तळलेल्या चिकन या पदार्थाची पद्धत विकत घेण्यासाठी १००८ कॉल उपहार गृहात केले. जर त्यांनी १००० नकारानंतर कॉल करणे कायम केले नसते तर KFC (असं उपहारगृह की ज्याला अर्धा बिलियन डॉलर प्रत्येक वर्षाला कर मिळतो.) ते अस्तित्वात नसतं.

## कल्पना ही चावी आहे.

जर तुम्ही काय करत आहात हे माहीत नसेल तर तुम्ही नक्कीच जगातील चांगली ठिकाण (गोष्टी) चुकवताय.





# यशाच्या १० व्याख्या

### अनिता रॉडिक

मी यशाचा नव्याने अर्थ स्पष्ट करू इच्छिते मोहिनी, भुरळ, पैशांची शक्ती व काळजीचे विशेषाधिकार हे सर्व यशाच्या खोट्या व्याख्या आहेत. यशाची व्याख्या ही प्रत्येकासाठी वेगळी असते. पण यशाने मात्र माझ्या नशिबाला एक वेगळा आकार मिळाला.

### दिपक चोप्रा

आपला आनंद व असे ध्येय कि ज्यामुळे आपली प्रगती होवू शकेल. यांच्या मर्यादा वाढवणे अशी यशाची व्याख्या होवू शकते.

### रिचर्ड ब्रानसन

जे काम तुम्ही समाधानाने करता, त्यापासून प्रेरणा घेवून इतर लोक तुमच्या सोबत येतात. नवनिर्मिती, कल्पना यांना जेव्हा बक्षिस (फळ) भेटते ते उत्पन्नापेक्षा मोठं असतं.

### विन्स्टन चर्चिल

यश हे अपयशाकडून अपयशाकडे उत्साह न गमवता जाते.

### जीम रॉहन

यश हे सामान्याला, असामान्य बनवते.

## ओरिसन स्वेट्ट मॅरडन

एखाद्या व्यक्तीची शक्ती, त्याने आतापर्यंत मिळवलेले तसेच मिळवू शकतो अशा गोष्टी याविषयी त्याच्या मनात धडधड निर्माण होते, तोच खरा आनंद, यश

## झिग झिग्लर

यश म्हणजे, आत्ता आपण जे आहोत त्याहून चांगले करणे. यश हे प्रयत्न करण्यात असते त्यावर विजयी होने नाही. यशामुळे आपण साधारण पातळीवरुन उंची गाठता येते तसेच, इतरांना सुध्दा आपल्यासोबत घेणे जेथे आपण आहोत

## जॉर्ज शिहन


यश म्हणजे निश्चयाचे बळ. आणि असा व्यक्ती बनणे कि, तुमचा सुध्दा विश्वास बसला पाहिजे की, यामध्ये सुध्दा काहीतरी अर्थ आहे.

## राल्फ वालडो एमरसन

यश म्हणजे हसणे, हुशार व्यक्तींचा आदर कमावणे, लहानांचे आकर्षण, प्रामाणिक टिकाकारांची योग्यता मिळवणे, खोट्या व विश्वासघातकी मित्रांमध्ये स्वतःला टिकवणे, सौंदर्याचे मोल जाणणे, इतरांमध्ये सर्वोत्तम शोधणे, जरास जगाला वेगळ सोडणे, निरोगी बाळ, कृत्रिम सामाजिक स्थिती, यावरून समजले जगात एक जीव सुलभरित्या श्वासोच्छवास करु शकते कारण तुम्ही जीवंत आहात हेच ते यशस्वी होणं.

## विल्फरड पीटरसन

यश म्हणजे तुमच्या नष्ट होत जाणाऱ्या इच्छेला मिळवण्यासाठी पूर्ण ताकदीने एकाग्र होणे.





# कर्मवीर भाऊराव पाटील यांचे जन्मगांव कुंभोज येथील शिक्षक व कर्मचारी यांच्या उद्बोधन शिबीरात केलेले भाषण (११ ऑक्टोबर. २०१३)

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कुंभोज या गावी २२ सप्टेंबर, १८८७ रोजी झाला. महाराष्ट्रातील शैक्षणिक उपक्रमाचा उगम करणारे कर्मवीर भाऊराव पाटील या गावचे म्हणून या भूमिचे महत्व आहे. कुंभोजचे राज्यातच नव्हेतर देशभर महत्व वाढलेले आहे. अण्णा निवर्तल्यानंतर ५४ वर्षांनी कर्मवीर भाऊराव पाटील अध्यासन या उपक्रमाची सुरुवात आज रयत शिक्षण संस्थेचे आधारास्तंभ मॅनेजींग कौन्सील सदस्य ना. पतंगराव कदम यांच्या हस्ते व सध्याचे व्हाईस चेअरमन कर्मवीर अण्णांचे नातु डॉ. अनिल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. अण्णांच्या जीवनावर अभ्यास करुन त्यांच्या विविध पैलुंवर पी.एच.डी. करणारे विद्यार्थी निर्माण होतील व त्यांच्या संशोधन कार्याला पाठबळ देण्याचे काम या अध्यासनामार्फत सुरु राहील ही अपेक्षा.

या निमित्ताने रयत शिक्षण संस्थेचा दक्षिण विभाग (सांगली व कोल्हापूर जिल्हा) शिक्षकांचे उद्बोधन वर्ग घेण्याची संधी मला मिळाली. सुमारे अडीच ते तीन हजार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते. अण्णांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करुन शिक्षकांच्या समोर बोलण्याची संधी मिळाली, हे माझे भाग्य समजतो. शिक्षकांशी बोलतांना मी नेहमी सांगतो की, आपण फक्त परीक्षेपुरता अभ्यास शिकविण्याचा विचार करीत आहोत. आता अभ्यासक्रमाशिवाय बाह्य ज्ञान देणारे व्यक्तीमत्व शिक्षण देण्याची गरज आहे. केवळ अभ्यासक्रमामध्ये नाही, परीक्षेला नाही म्हणून शिवाजी महाराज, विवेकानंद, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम हे संत अथवा महात्मा ज्योतीराव फुले किंवा कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबद्दल माहिती विद्यार्थ्यांना शिकवायची नाही का ? असा प्रश्न मी शिक्षकांना विचारला. मग तुम्ही याप्रमाणे प्रयत्न करता का ? असे असेल कर हात वर करा, बोट वर करा. मला फारसा प्रतिसाद जाणवला नाही. विद्यार्थ्यांना आता नापास करता येत नाही. मला नापास करा असा अर्ज केला तरी सदरचा अर्ज नाकारण्यापलिकडे मुख्याध्यापक काहीही करु शकत नाहीत.

मी गेल्या महिन्यात (ऑगस्ट-२०१३) नेपाळला गेलेला होतो. परत येतांना गौतम बुध्दांचे जन्मस्थळ लुंबिनी या गावी भेट देण्याची संधी मिळाली. गाडीमध्ये माझ्या समवेत काही शिक्षक होते. मी त्यांना विचारले की, मला गौतम बुध्दांबद्दल माहिती द्या. गाडीतील इतर प्रवाशांना विचारले, कोणीतरी शिक्षक माहिती देऊ शकतील असा माझा आत्मविश्वास होता. मी देखील एका शिक्षकांना प्रश्न विचारला की, गौतम बुध्दांबद्दल माहिती द्याल का ? त्यांनी मला सांगितले की, मी, मराठीचा शिक्षक आहे, योगायोगाने इतिहास शिकविणाऱ्या शिक्षकांना विचारले असता त्यांनी उत्तर दिले की, या वर्षी मला गौतम बुध्द यांचा विषय शिकवायला नसल्याने मला माहिती नाही. केवळ शिकवायला नाही म्हणून थोरा-मोठ्यांचे चरीत्र शिकवायचे नाही, ही सध्याच्या शिक्षण पध्दतीतील शोकांतिका आहे. सहाव्या वेतन आयोगामध्ये प्रचंड पगाराची वाढ झालेली आहे. त्याबद्दल आम्हाला चूक वाटत नाही. पण ही पगारवाढ शिक्षकांना स्वतःचे ज्ञान वाढवून विद्यार्थ्यांना शिकवावे यासाठी केलेली आहे. दुर्दैवाने याचे भान राहिलेले नाही.

मुख्याध्यापक हा शाळेचा कणा आहे. पण केवळ जेष्ठतेमुळे मुख्याध्यापक झालो, थोडे दिवसांसाठी मी आहे, ही

भावना मनात ठेवून पेशा स्विकारणारे अनेकजण मी पाहतो. एका शाळेत मी मुख्याध्यापकांना प्रश्न विचारला, आपल्या शाखेच्या अडचणी काय आहेत. त्यांनी मला सांगितले की, मी नव्याने आलो असल्याने मला कल्पना नाही. मी म्हणालो आपण किती दिवसांपासून येथे आहात ? त्यांनी उत्तर दिले, मला फक्त दिड वर्ष झालेली आहेत. कपाळावर हाणुन घेणे या पलिकडे मी काहीही करु शकलो नाही. मुख्याध्यापक राजपत्रित वर्ग-२ दर्जाचे अधिकारी आहेत. आम्हाला आमचा दर्जा समजला पाहिजे व त्या दर्जानुसार काम करायला पाहिजेहे समजून काम करण्याची आमची ज़बाबदारी आहे.

बदली करणे म्हणजे शिक्षा देणे ही गोष्ट मला मान्य नाही. बदलीच्या कालावधीमध्ये रयत शिक्षण संस्थेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अर्ज करतात, त्यामध्ये मी आजारी असल्याने मला बदली द्यावी असे कळवितात. आई-वडीलांची सेवा करावयाची आहे असे लिहितात. मी संस्थेच्या मॅनेजींग कौन्सीलच्या सभेमध्ये गमतीने म्हणालो की, रयत शिक्षण संस्थेने मोठमोठी हॉस्पिटल्स निर्माण करावीत, याचे कारण आपले बदली मागणारे बहुतांश शिक्षक आजारी असतात, ते मुलांना काय शिकविणार ?

विद्यालयातील मुख्याध्यापक व शिक्षक यांनी सामुहिकपणे काम करावे, गरजा लक्षात घ्याव्यात, निधी निर्माण करावा, गावातील प्रमुख कार्येकर्त्यांच्या समवेत उत्तम संवाद साधावा अशी मी अपेक्षा व्यक्त केली. काही शाळा अशा आहेत की, ४० वर्षात स्नेह संमेलन नाही, सहली काढलेल्या नाहीत, माजी विद्यार्थ्यांचा मेळावा नाही अशा शिक्षणाने मुलांच्या अंगभूत कौशल्यामध्ये सुधारणा होणार नाही. कर्मवीर अण्णांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांना पाहिलेले काही शिक्षक योगायोगाने हयात आहेत, त्यांचे भाग्य किती मोठे ? पण सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत काम करायचे ही मनोवृत्ती शिक्षक पेशाला कमीपणा आणणारी आहे. विद्यार्थ्यांचा खूप वेळ क्रिडांगणावर जावा. बुध्दीबळ, कॅरम, टेबल टेनिस, रींग टेनीस, हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो, कुस्ती यासारख्या अनेक खेळांमध्ये त्यांचा सहभाग असावा अशी माझी अपेक्षा आहे. अनेक शाळांच्या मधून बुध्दीबळा सारखा छोटा संच सुध्दा दिसत नाही. ही दुर्देवी बाब आहे. केवळ या पध्दतीचे शिक्षण देण्याने आपण नव्या पिढीची वाट लावीत आहोत. असे माझे स्पष्ट मत आहे. योगायोगाने या वरील बाबी गांभियनि लक्षात घेऊन कर्मवीर प्रबोधिनीच्या मुख्याध्यापक व शिक्षकांचे प्रशिक्षण व्हावे म्हणून कुंभोजला प्रशिक्षण संस्था स्थापन केलेली आहे, ही अत्यंत समाधानाची बाब आहे. या कामी अण्णांचे नातु व रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन डॉ. अनिल पाटील पुढाकार घेत आहेत ही अत्यंत स्पृहनिय बाब आहे. संस्थेचे अध्यक्ष कृषीमंत्री ना. शरदचंद्रजी पवार साहेब, चेअरमन थोर स्वातंत्र्यसेनानी ॲड. रावसाहेब शिंदे, प्रा.एन.डी. पाटील यांच्यासारखे समाजधुरीन संस्थेची धुरा सांभाळत आहेत ही अत्यंत गौरवास्पद बाब आहे. संस्थेचे सचिव डॉ. अरविंद बुरुंगले व सहसचिव डॉ. नानासाहेब गायकवाड यांची धडपड सातारा ते मंत्रालया पर्यंतची पळापळ, संस्थेच्या कामाला बळ देणारी आहेत. या सर्व गोष्टींचे भान ठेवून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी नव्या संकल्पनांचा स्विकार करावा व २१ व्या शतकातील पिढी घडविण्यासाठी कटिबध्द व्हावे ही अपेक्षा.

योगायोगाने कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या वाटेने जाणारे श्री.प्रतापराव खांडेभराड यांच्यासारखा कार्यकर्ता सुध्दा शिक्षण क्षेत्रामध्ये कार्यरत आहे. पी.के. फाऊंडेशन या नावाने ते मतीमंद मुलांची शाळा चालवतात, असे सेवाभावी काम करणारे कार्यकर्ते समाजामध्ये कार्यरत आहेत. म्हणूनच मतीमंद, अपंग, विधवा, परितक्त्या गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण मिळू शकते.

भारताचे कृषीमंत्री ना. शरदचंद्रजी पवार साहेब नेहमी सांगतात की, ज्या समाजातील भगिनी शिकली, तो समाज पुढे गेला, देश पुढे गेला. तालुक्याच्या ठिकाणी खेडेगावात शिक्षणाची व्यवस्था केल्याने गोरगरीब मुले-मुली शिकू शकतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे चाकण येथील पी.के. फाऊंडेशन संस्था दरवर्षी मुलांना प्रेरणा देणारे, आत्मविश्वास वाढविणारे विविध उपक्रम राबवित असते. त्याबद्दल द्यावे तेवढे धन्यवाद कमी आहेत.

पी के दिपोत्सव २०१३ च्या निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या पुस्तकात माझा लेख घेऊन त्यांनी एकप्रकारे माझा बहुमान केलेला आहे. पी.के. फाऊंडेशन ही संस्था भविष्यामध्ये असे शैक्षणिक संकूल व्हावे यासाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा !

मा.विजय कोलते

**होईन पुर्तता स्वप्नांची, मनी एकच आस आहे,**
**त्यासाठी जवळी माझ्या, जबरदस्त विश्वास आहे.**



# शब्दावाचून कळावे सारे शब्दांच्या पलिकडले

भारतीय लोकशाहीत देशाचा कारभार करायला आता तरुणांनी सक्रिय राजकारणात सहभागी व्हायला हवं असा काहीसा सूर आता राजकारणाशी नेते काढू लागले आहेत, तरुणांच्या क्रयशक्तिचा उपयोग आणि उपभोग घेण्याचा हेतू ठेवून आज राजकारणात तरुणांना ओढण्याचा प्रयत्न होऊ पहात आहे. वयोपरत्वे तरुणांमधील स्वभाव गुण–अवगुणांचा हेतूता उपभोग आजपर्यंत नेहमीच घेतला जात आलेला आहे. तसा तो यापुढील काळात देखील करुन घेतला जाईल पण तरुणांनी मात्र आपली अद्याप स्वतःची अशी खास ओळख निर्माण करण्यात पाहिजे तेवढे यश मिळविले नाही.

आजचा तरुण उमदं मन असलेला, प्रसन्न चेहऱ्याचा व आकर्षक व्यक्तिमत्व लाभलेला आणि शैक्षणिक गुणवत्तेत 'सु'शिक्षित म्हणुन आपण पहातो आहे. तरीदेखील या तरुणांबद्दल फारसं काही चांगल बोललं जातं असही नाही, किंवा काही यांच्याबद्दल चांगल बोललं तर ते तसचं कायम चांगलच बोलता येईल अशी ही परिस्थिती आज नाही काळानुरुप आलेले बदल व बदलापुरुप आलेली जीवनशैली व या जीवनशैलीने विविध पैलू आज या तरुणांना थोडं बॅड इम्प्रेशनमध्ये देखील पाहणे भाग पाडत आहे. हा बॅड इन्प्रेशन देणारा पॅच जर तरुणांनी स्वतःच काढला तर उद्याची पिढी जाज्वल्य विचारधारा असलेली व सामाजिक भान, संस्कृती जपणारी अशी पहायला मिळेल.

स्वतःची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न हर एक जन आपल्या आयुष्यात नेहमीच करत असतो. मग त्यासाठी काही ध्येय्य, उद्दिष्ठ व त्यांच्या पूर्ततेसाठीची साधना करत अंतिम ध्येय्यापर्यंत पोहचत अनेकांनी आपली स्वतःची ओळख निर्माण केली आहे. मग वेगवेगळ्या क्षेत्रात आपला स्वतःचा ठसा देखील उमटवला आहे. तरी देखील हा तरुण आजही स्वतः अपूर्ण आहे. तसे सर्वच जन अपूर्ण आहेत, पण तरुणांमध्ये पुर्णार्थाने यशस्वीतता अनुभवायला येण्याची अपेक्षा अशा कारणाने आहे की, तरुणांकडून आज समाजाला दिशा देणारा एक मार्गदर्शक म्हणुन सगण्यांच्याच नजरा आहेत, मग नजरेत भरणाऱ्या तरुणांनी स्वतःची ओळख एक स्वतःला ओळखणारा, स्वतःचे विचार असलेला अशी करुन देणे अपेक्षित आहे.

आज अनेक तरुण उच्चशिक्षित असूनही उसन्या विचारांनी आपला प्रभाव दाखवित आहे. अनेकजण स्वतःकडे क्षमता असून देखील मुकेपणाने 'साजरे' दिसत आहेत. स्वतःची वैयक्तिक विचारांची मांडणी, घडणी करण्यात कोणी फारसे कृतीशिलता दाखवत नाही, बोलताना, विचार कथन करताना किंवा वक्तृत्व स्पर्धेत देखील भाग घेणारा आजचा तरुण उसन्या

विचारांची शब्दफेक करताना आपल्या स्वतःच्या विचारांबाबतचे मत मात्र झाकून ठेवत आला आहे. संत ज्ञानेश्वरांनी, संत तुकारामांनी, साने गुरुजी, अब्राहम लिंकन, मदर तेरेसा, नेहरु, गांधी, सावरकर, आंबेडकर, कवी मनांचे कुसुमाग्रज, पाडगांवकर आदींची विचारधारा व त्यातील काही निवडक विचारांची फेक करत आपली 'इमेज' दाखविण्यात अनेकजण आपआपले त्या विचारांचे केवळ 'शब्दभंडार' सांभाळून आहेत. या जुन्या, नव्या विचारांच्या-विचारवंतांचे विचार टाकावू आहेत किंवा ते वापरात, आचरणात आणू नयेत असे नाही. पण या विचारांशी प्रभावित रहाताना आपले स्वत्व, स्व विचारधारा आपण कधी अंमलाखाली आणणार आहोत हा खरा प्रश्न आहे. प्रत्येकाकडे स्वतःची जशी वैचारिक शक्ति आहे तशीच ती या थोर विचारवंताकडे देखील होती. ते काही मोजकेच विचारवंत म्हणुन जन्माला आलेले नाहीत तसे आपण ही नाही. मग आपल्या स्वतःचे मत, स्वतःचे विचार कृतीतून समाजप्रबोधनासाठी, समाज घडविण्यासाठी कुटुंब व्यवस्था सांभाळण्यासाठी कधी वापरणार आहोत ? खरं तरं प्रत्येकाला आपल्या मनाप्रमाणे सगळं घडावं असं वाटत असताना मनाला कोंडून उसन्या अवसानावर आलेले मोठेपण खरचं 'साजरे' आहे का? हे देखील आपल्या मनाला काही प्रश्न विचारुन तपासले पाहिजे. स्वतःच्या मनात आलेल्या भावना या स्वतःला संवेदना निर्माण करीत असताना त्याला आकार येणे देखील अपेक्षित आहे. एखादं काव्यमनं असलेला तरुण व्याकरणाच्या रितीनुसार शब्दफुलांची जुळवाजुळव करुन शब्दवेल तयार करतो. पण या शब्दवेलीतील फुलांमध्ये आपल्या स्वतःला पहातो का ? आपल्याच मनाने दिलेल्या शब्दांची ही वेळ त्यात आपण नसेल तर ती जशी अबोल वाटते तसेच आजचे तरुण भव्यदृष्टी, क्रयशक्ती भरपूर असुनही उसन्या अवसानावर फक्त 'तरुन' आहेत.

तरुणांनी जर स्वतःचे विचार व्यक्तकरीत स्वतःच अस्तित्व निर्माण केले तर खऱ्या अर्थाने तरुण 'सु'शिक्षित, 'सु' विचारांचा व या देशाचे नेतृत्व करण्यास संपन्न व्यक्तिमत्व असलेला घडेल. आपलं स्वतःच प्रतिबिंब आपण आरशात पाहून निटनेटके करण्याचा प्रयत्न करीत असतो, चेहऱ्यावरील डाग, केशरचना, नाकाची ठेवण, नजरेचे देखलेपण या आरशात पाहून आपले बाह्यांगाने अपेक्षित असलेले व्यक्तिमत्व घडवत असतो. पण अर्तअंगाने व्यक्तिमत्व घडविणारा आरसा देखिल निर्मात्याने आपल्याला दिलेला आहे. त्या आरशात आपल्या स्वतःच व्यक्तिमत्व कसे आहे, ते कसे आवश्यक आहे याची अनुभूती आपल्याला देईल व त्या आधारे आपण आपल्या स्वतःच्या विचारांनी स्वत्व व स्व व्यक्तिमत्व घडवू शकतो व अशा तरुण व्यक्तिमत्वाची आज कुटुंबाला, समाजाला व पर्यायाने देशाला देखील गरज आहे तो चेहरा आज घडविण्यासाठी मनाच्या घरात सातत्याने डोकावण्याची गरज आहे. अन् म्हणुनच व स्व विचार असलेला एक उमदा तरुण या भारतभूमीला लाभावा, जो स्वतः एक नेता, अभिनेता म्हणुन स्व कर्तृत्वावर, स्व विचारांवर या देशाची लोकशाही चिरकाल अबाधित ठेवण्यास कारणीभूत ठरेल.

मा.नंदकुमार मांदळे
संपादक: सा.जनहिंदोळा वृत्तपत्र



## चांगले विचार

* अपयश मार्गात आल तर असं समजू नका की, तोच मार्गाचा शेवट आहे.
* माणूस आत्मविश्वासाने जग जिंकतो पण अतिआत्मविश्वासाने सर्व काही हारतो.
* आयुष्यात दुःखाचा अनुभव घेणे गरजेचे असते त्यामुळे सुखाचा उपभोग कसा घ्यायचा ते समजते.
* भुतकाळ हा कधीही वाईट किंवा चांगला नसतो; आपण जसा घडवतो तसा तो घडतो.



# यशाची १० सुत्रे

**अल्बर्ट आईन्स्टाइन**

जर A = यश तर A = X + Y आणि Z कामासाठी, Y खेळासाठी तर Z तुमचे तोंड बंद ठेवण्यासाठी (तुमचे काम व खेळ तोंड बंद ठेवून केल्यास यश मिळेल)

**स्वामी विवेकानंद**

एक कल्पना घ्या. तिला तुमच्या जिवनाचा भाग बनवा. त्याबद्दल विचार करा, स्वप्न पहा. तिच्याच विश्वात रमून जा. तुमच्या मेंदू, स्नायू, शरिराचा भाग यांना त्या कल्पनेचा भाग बनवा. इतर विचारांना दूर करा. यश मिळवण्याचा हाच मार्ग आहे.

**थॉमस जे वॉटसन**

मला तुम्हाला यशाचं सूत्र द्यायला आवडेल का? ते खूप सोपं आहे. खरंच तुमच्या अपयशाचा भाव दुप्पट करा. जर तुम्ही तुमच्या अपयशाचा विचार करत असाल कर ते तुमच्या शत्रूच यश असेल. पण तसं काही नसतं. तुमच्या अपयशाने तुमचं धैर्य खचतं की तुम्ही त्यापासून शिकता. मग चुका करा जे इतर करतात ते तुम्हीपण करु शकता. कारण लक्षात ठेवा, तेथेच तुम्हाला यश मिळेल.

**स्टॅन्ली टॅग**

तुमचं काम तुम्ही प्रेमाने जास्तवेळ कष्टाने केल्यास तुम्हाला यश मिळेल.

**मार्क ट्विन**

जर जिवनात तुम्हाला यश मिळवायचे असेल, तर अज्ञान व आत्मविश्वास ह्या दोन गोष्टींची गरज आहे.

**नेपोलिअन हिल**

सहनशक्ती, चिकाटी व कष्ट यापासून कधीही न हरणार यशाच एकिकरण बनते

**जेम्स ॲलन**

खरं यशासाठी स्वतःला प्रश्न विचारा का ? का नाही ? मी का नाही ? आता का नाही ?

**ॲनॉनिमस – निनावी**

अपयशी न होणारा यशाचा आराखडा प्रत्येक दिवशी सर्वात महत्त्वाच्या सहा गोष्टी लिहून ठेवा ज्या तुम्हाला उदया करायच्या आहेत. त्यांना त्यांच्या महत्वानुसार क्रम दया आणि त्या पद्धतीने करा.

**अरनॉल्ड एच. ग्लॅसगो –**

यश हे साधं आहे. योग्य काम, योग्य वेळेत, योग्य मार्गाने करा.

### शेक्सपिअर

इतरांच्या भावनांसोबत खेळू नका, कारण त्याने तुम्ही फक्त खेळ जिंकू शकता. पण तुम्ही त्या व्यक्तीला कायमच गमावू शकता.

### नेपोलिअन

हे जग वेगवेगळ्या कारणांनी ग्रासले गेले आहे. वाईट लोकांनी केलेल्या हिंसेमुळे नाही तर, चांगल्या लोकांच्या गप्प बसण्यामुळे.

### आईनस्टाईन

जे लोक मला 'नाही' म्हणाले त्यासाठी मी आभारी आहे. कारण त्यांच्या मुळे मी स्वत: काही करु शकलो.

### अब्राहम लिंकन

जर मैत्री हा तुमचा दोष असेल तर तुम्ही जगातील सर्वात शक्तीशाली व्यक्ती आहात.



### शेक्सपिअर

हसणारे चेहरे पाहून कळत नाही की येथे दु:ख नाही पण त्यांच्याकडे त्याच्यासोबत (दु:ख) तडजोड करण्याची क्षमता आहे.

### विल्यम आर्थर

संधी या उगवत्या सूर्याप्रमाणे असतात. जास्त वेळ वाट पाहत राहील्यास त्यांना तुम्ही गमवता.

### हिटलर

जेव्हा तुम्ही प्रकाशझोतात असतात तेव्हासर्व तुमच्या सोबत असतात. पण जेव्हा तो झोत नाहीसा होतो तेव्हा तुमची सावली सुध्दा तुमच्या सोबत नसते.

### शेक्सपिअर

नाणे नेहमी आवाज करते व नोट नेहमी शांत असते. जेव्हा तुमची किंमत वाढते तेव्हा नेहमी शांत रहा.

### डॉ. अब्दूल कलाम

एखाद्याला हरवणे सोप्पे असते. परंतू एखादयाला जिंकणे खूप अवघड असते.



# समतेचा झेंडा उंच धरा रे ... !

समता !! भारतीय जीवनप्रणालीचा प्रमाणभूत ग्रंथ म्हणून विश्वमान्य असलेल्या गीतेमध्ये युगंधर भगवान श्रीकृष्ण समतेविषयी म्हणतात –

'अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्र करुण एवचं ।
निर्मत्रो निरहंकार : समदु:ख सुख: क्षमी ।।'

तर आखील विश्वाच्या कल्याणासाठी पसायदान मागणारे कैवल्यसम्राट चक्रवर्ती, ज्ञानियांचा राजा, योगियांची माऊली संतशिरोमणी ज्ञानेश्वर माऊली ज्ञानेश्वरीत म्हणता –

'गाईची तृष्णा हरु । का व्याघ्रा विष होऊनि मारु ।
ऐसे नेणेची का करु । तोय जैसे ।।
जो खांडावया घाव घाली । का लावणी जयाने केली ।
दोघा एकचि साऊली । वृक्षु दे जैसा ।।'

'सर्वस्पर्शी आणि सर्वांगीण अशी समाजसुखकारक अवस्था म्हणजे समता होय.'

'Laking of special rights and giving necessary opportunities means equality'.

'व्यक्ती – व्यक्तीच्या उन्नयनासाठी आवर्जून स्विकारलेल्या नितीतत्वांची निदर्शक संज्ञा म्हणजे समता होय.

'जीवनाच्या सर्वच क्षेत्रात सारखेपणा, बरोबरी, नि:पक्षपातीपणा म्हणजेच समता होय.'

दैदिप्यमान इतिहास व उज्वल भविष्य असणाऱ्या या देशात धार्मिक व जातीय विषमतेची विषवल्ली स्वार्थाचं लोकांनी काळजीपूर्वक जोपासली आहे. धर्म आणि जात हे भारतीय माणसाचे आवडीचे शब्द. अन्न, वस्त्र, निवारा, ज्ञान आणि विज्ञान या अर्थाने धर्म खरचं का माणसाला आवश्यक आहे ? राष्ट्राला घटना जेवढी आवश्यक असते तेवढाच माणसाला धर्म आवश्यक आहे. धर्म हे जीवनाचे नियामक तत्व आहे. धर्म !! ''धृ – धारयति इति धर्म''

'जीवाच्या निकोप वाढीसाठी जी संस्कार प्रणाली वापरली जाते ती म्हणे धर्म'

महर्षी व्यास म्हणतात ...

'यतो नि:श्रेयस अभ्युदय सिध्दी: स: धर्म: ।।' ऐहिक जीवनाची सफलता व मानसिक जीवनाची संपन्नता हेच खऱ्या धर्माचे प्रयोजन आहे. प्रत्येक धर्म ग्रंथात एकता अन् समतेतून 'मानवी जीवाचा विकास' हेच तत्व सांगितले आहे. स्वधर्माची शेखी मिरविण्यासाठी परधर्माची निंदा करणाऱ्या लोकांना समर्थ म्हणतात...

'वृथाच ताठा मनात मोठा । धर्म जात अन् श्रेष्ठत्वाचा ।
मान मानवा धर्म युगाचा । समानतेच्या कर्तुत्वाचा ।।'

संतानी, समाजसुधारकांनी उपदेशलेली समता दैनंदिन जीवनात उतरली नाही. कारण धर्माची रखवालदारी अल्पमती महंत अन् कर्मठ लोकांकडे होती. त्यामूळे शुष्क कर्मकांड व निरर्थक बडबड यांना महत्व प्राप्त झाले. इब्राहीमखान, दौलतखान यासारखे मुस्लिम अधिकारी आरमारात पदरी बाळगणाऱ्या, ७०० पठाणी सैनिकांवर अतुट प्रेम करणाऱ्या कुतुबशाहीशी मित्रत्वाचे संबंध आबाधित ठेवणाऱ्या राजे शिव छत्रपतींनाही लोकांनी धार्मिक चौकटीत बंदिस्त केले. धार्मिक भावना भडकावून तापलेल्या तव्यावर स्वत:ची पोळी भाजण्यासाठी मुंबई,गुजरात शहरे पेटविली जातात. फादरची अमानुष हत्या केली जाते. सर्वसामान्यांच्या प्रपंचाची होळी करुन स्वत:ची पोळी भाजली जाते. या लोकांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालण्यासाठी ज्योतिबा फुले म्हणतात –

'मानवाचे साठी बहु धर्म कसे ।
झाला का हो पिसे ।। ज्योती म्हणे ।

मानवाचा धर्म, सत्य सर्व निती ।
बाकी कुरापती ।। ज्योती म्हणे ।।' म्हणूनच

धार्मिक क्षेत्रात समानता, समता, साधण्यासाठी 'हे विश्वचि माझे घर' अशी वैश्विक कुटुंबाची संकल्पना मांडणारे माऊली म्हणतात 'खळांची व्यकटी सांडो' खलाचे खलत्व जावो, खलच नामशेष होवो अशी त्यांची वांछा नाही. तद्वतच परधर्म, परजातीची निंदा करणाऱ्या दुष्ट माणसातील दुष्टत्व काढून घेतले म्हणजे उरतो तो निखळ माणूस, भावमधानं शिगोशीग भरलेला रसवंत कंदच. त्याच्यातील खलत्व नष्ट झाले तर समतेचा झेंडा तिन्ही लोकात घेऊन जाणाऱ्यांत तो अग्रणी असेल.

शिकागोच्या व्यासपीठावरुन स्वामी विवेकानंदानी विश्वधर्माचा संदेश जगाला दिला. यामध्ये जग अन् धर्म यांची युती असेल, माणसाच्या प्रगल्भ मानसिकतेचे आदर्शरुप 'मोक्ष म्हणजे श्रेयस व नित्यजीवनातील सुखसाधना म्हणजे प्रेयस. प्रेयसाला श्रेयसाचा स्पर्श घडविणे आणि श्रेयसाला प्रेयसाचे अढळ स्थान, अधिष्ठान मिळवून देणे अशा संयुक्त साधनेचे नाव म्हणजे समताधिष्ठित विश्वधर्म होय. अशा विश्वधर्माचा पाईक असणाऱ्या प्रत्येक तत्वचिंतकाच्या कंठातून गीत आकारास येईल ...

'न हिंदू वा मी बौध्द, जैन धर्म पंथाचा ।
शैव वैष्णव वारकरी महानुभावांचा ।।
मज नितांत आदर मनात या सर्वांचा ।
मी भारती, प्रिय भारती संस्कृतीचा ।।'

सर्वधर्म सहिष्णूतेचा अंगिकार करणाऱ्या जगाने विश्वधर्म, विश्वसंस्कृतीचे स्तवन करावे तेच खरे समतेचे ईशस्तवन ठरेल त्याने जगी जगदीश अवतरेल अन् भेदांच्या भिती पाडण्यासाठी संतांनी सांगितलेल्या ...

'विष्णूमय जग । वैष्णवांचा धर्म ।।
भेदाभेद भ्रम । अमंगळ ।।'

या वचनांची सार्थकता पटेल. संतानी देवाच्या दारापर्यंत समता आणली परंतू तिला गाभाऱ्यात प्रवेश मिळाला नाही. दगडांच्या देवाला काय आवडते ? हे सुध्दा माणसाने ठरवून टाकले आहे. गणपतीला मोदक, विठोबाला लोणी, खंडोबाला खोबरे परंतू मानवाला काय हवे याची विवंचना आपण कधी करतो का ? आपल्या सभोवताली दोन हातापायांचा देव उभा आहे. त्याच्या पोटात अन्न नाही, त्याच्या अंगावर वस्त्र नाही, त्याच्या पूजेला धावून जाणे आपल्याला जमेल का ?

'दोन फुलांची कथा, अशी ही दोन फुलांची कथा ।
एक शिवाच्या पदी शोभते, एक शवाच्या माथा ।।'

यातील दुसऱ्या फुलाच्या उन्नतीसाठी शाहू-फुले-आंबेडकर हे समतादूत धावून आले. फुल्यांच्या काळात इंग्रज आले होते, स्वातंत्र्य गेले होते. पराक्रमाची परंपरा खंडीत झाली होती. सळसळत्या रक्ताची दौड थांबली होती. विकलांग हिंदू समाज तेजोहिन झाला होता. मोडकळीस आलेल्या वर्ण व्यवस्थेच्या वाड्यात जातीयतेची चूल मांडून न पावणाऱ्या देवासाठी नैवद्य करण्यात माणूस गढून गेला होता. श्रीमंतांनी आपले सुख व गरीबांनी दु:ख जपून ठेवायचे, स्त्रियांनी पायाची दासी म्हणून जगायचे, दलितांनी जनावरांचे जीवन कंठावयाचे, शेतकऱ्यांनी पोराबाळाचे हाल पहावयाचे अशी तत्कालीन समाजाची अवस्था होती. फुले-शाहू-आंबेडकर या युगपुरुषांनी कालचक्राला कलाटणी देण्याचा निर्धार केला. कालचक्र असेच फिरत राहीले तर रंजल्या - गांजल्या जीवांचा अंत घडेल, दलितांच्या गळ्यातील मडकी, कमरेच्या डहाळ्या, गावकुसाबाहेरचे जिणे तसेच राहील., वैधव्याच्या नरकात पडलेल्यांचे केशवपान घडतच राहील., आत्महत्येच्या रवाईत त्यांना 'जोहार' करावा लागेल म्हणून १ जाने १८४८ साली भिडे वाड्यात मुलींसाठी तर १८५१ साली अस्पृशांसाठी पहिली शाळा सुरु केली. स्वत:ची विहीर पाणी भरण्यासाठी सर्वांना खुली केली. काशीबाई नातू या ब्राम्हण विधवेचा विवाहबाह्य संबधातून जन्मलेला मुलगा दत्तक घेतला आणि ...

'जैसे बोलणे बोलावे, तैसे चालणे चालावे ।
मग महंतलीला स्वभावे, अंगी बाणे ।।'

या समर्थवचनांची सार्थकता सिध्द केली.

आपल्या राज्यात राजर्षी शाहूंनी समतेसाठी १८९६ साली सर्व जाती-जमातीसाठी संयुक्त वसतीगृहाचा प्रयोग केला. ८/१०/१९१९ मुलांना शाळेत प्रवेश दिला. प्रशासनात बहुजनांची भरती, जातवार राखीव मतदार संघ, अस्पृशात आत्मभान जागृतीचे प्रयत्न, अस्पृश्यता कायद्याने गुन्हा असे क्रांतीकारी निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी केली. डॉ.आंबेडकरांनी 'जाती संस्थेचे उच्चाटन' या ग्रंथात जाती जातीसस्थेच्या अंताची भूमिका मांडली. जातीसंस्थेच्या अंतासाठी आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन दिले. कारण त्यांच्या मते ... 'समता, बंधुभाव निर्माण करण्यास रक्तमिश्रण हेच एकमेव औषध आहे.'

म.फुले-शाहू-आंबेडकरांचा जातीअंताचा संघर्ष हा केवळ विशिष्ट जाती विरुध्द जसा नव्हता तसाच केवळ एकाच जातीच्या अन् उच्च जातीत जन्मलेल्या परंतू गरीबीत जगणाऱ्यांच्या जातीव्यवस्था व भांडवलशाही पासून मुक्ती करण्यासाठीचा होता.

'कार्यचि ऐसे शाहू अन् बाबांचे । नाही दूजा ते जमायचे ।
नाव तेयाचे घेता । मस्तक अमुचे नमायचे ।।'

या समतादूतांपुढे नतमस्तक होण्यासाठी जागोजागी त्यांचे पुतळे उभे केले आहेत परंतू पुतळ्यांच्या या देशात पुतळ्यांकडे पाहून विवेक जागा होण्याऐवजी अभिनिवेशाचा भडका उडतो पुतळ्याची विटंबना या सबबीवरुन दंगली घडतात. त्यांना वाचा फुटली तर कुसुमाग्रजांच्या स्वातंत्र्य देवतेप्रमाणे म्हणतील ...

'नाव आमचे घेऊन तुम्ही, पोट आपले भरु नका,
पातक करुनी तोंड लपविण्या, आश्रय आमुचा घेऊ नका'

पुतळा ही कार्यकत्याची हौस नसावी चौकातील आरास नसावी, धटिंगणाची मिरास नसावी, तो इतिहासाचा श्वास असावा, तत्वाचा ध्यास असावा समतेच्या विचारांचे असे पुतळे उभे राहीले तर ती समाजजागृतीची केंद्रे ठरतील अन् स्त्री-पुरुष समानतेचा संदेश देतील.

'कुपुत्रो जायेत क्वचिद् अपि कुमाता न भवति ।।'

'वाईट, दुष्ट हे शब्द जिच्या शब्दकोशात नाही अशा स्त्रीच्या समर्थ खांद्यावर कुटुंबसंख्या उभी आहे. परंतु दर्दैवाने आजही मुली हा दुःखाचा विषय व स्त्रीकडे भोगदासी म्हणून पाहिले जाते. कारण चातुर्व्यवस्थेने, मनुस्मृतीने स्त्रीला शूद्र ठरविले. आजही आपल्या देशात आंतर जातीय विवाह केल्यामुळे उत्तरप्रदेशात मुलींची दगडाने ठेचून हत्या केली जाते. 'रुपकुंवर' सती म्हणून जाळताना रजपूत तरुण बघ्याची भूमीका घेतात. तरीही संयमाची गंगोत्री असणारी भारतीय स्त्री हे सहन करते कारण ...

'मी स्त्री आद्ययुगाची, प्रेरकशक्ती, विश्वाची अधिकारी ।
मम हृदयी भरल्या, वात्सल्याप्रिती, ममतेच्या घागरी ।।'

पुरुष-स्त्रीच्या समतेसाठी आवश्यकता आहे कणखर द्रोपदीची ... 'मला पणाला लावण्याचा अधिकार धर्माला नाही' हे भ्रीष्म अन् द्रोणाचार्यांना तळमळीने सांगणारी, 'आजची सून उद्याची सासू' म्हणून स्त्रीनेच स्त्रीला सन्मान देण्याची, आंतरजातीय विवाहाची, पुरुषांच्या त्यागाची अन् अर्धनग्न स्त्रियांची पोस्टर्स असलेल्या जाहीरातीवरील बंदीची अन् समाजातील आर्थिक समतेची.

'गरीब आणि श्रीमंत यातील ही तफावत ।
युगायुगाची अभेदय भिंत, कोणीतरी फोडली पाहिजे ।
झोपडीत वाढणाऱ्या अश्वत्थाम्याला,
दुधाचा त्याला मिळालाच पाहिजे,
खरचं काहीतरी व्हायला पाहिजे,
आर्थिक विषमतेचे युग संपायलाच पाहिजे ।।'

परहितासाठी अष्टौप्रहर राबणारा झिजणारा शेतकरी, कामकरी, श्रमजीवी दारिद्रयाची वसने घालून सुंदर स्वप्ने कशी पाहणार ? आज भारतातील ३२ कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगण्याची केविलवाणी धडपड करत आहे. कोट्यावधी रुपयांचा घोटाळा करणारा हर्षद मेहता किंवा मुद्रांक घोटाळ्यातील आरोपींना सरकार दरबारी सन्मानाची वागणूक मिळते परंतु दुष्काळामुळे बँकेचा एखादा हप्ता थकला तर गरीब शेतकऱ्यांचे प्रपंच रस्त्यांवर आणुन त्यांच्या अब्रुचे धिंडवडे काढले जातात. कारण ऐहिकाचे, धनाचे, अर्थाचे महिमान सांगताना माऊली म्हणतात ...

'जयाचे ऐहिक धड नाही । तयाचे परम पुसशी काही ।।'

ऐहिक धड होण्यासाठी, सांपत्तिक स्थिती सुधारण्यासाठी, शेती विकासाला अग्रक्रम मिळाला पाहिजे. श्रमाला महत्व प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. जपानप्रमाणे कायदे करुन विषमतेची दरी कमी केली पाहिजे. युरोपियन शेतकऱ्याप्रमाणे येथील श्रमजीवी, शेतकरी यांना विद्यादान द्यावे. त्यांच्या मुलांना त्या त्या क्षेत्रात आधुनिक शिक्षण व अद्ययावत ज्ञान मिळावे. श्रमजीवी व बुध्दीजीवी हे मानसिक विभाजन समतेला विघातक आहे. समृध्दीदर्शक असणारा सहकार हा लोकजीवनाचे अंग व्हावे. समाजातील दुर्बल घटकांना स्वावलंबी व समर्थ करणे त्यासाठी त्यांना संघटीत, शिस्तबध्द जीवनाची दीक्षा देणे हे सहकाराचे धोरण असावे. कारण सहकार हा लोकशाहीचा प्रसाद आहे. 'विना सहकार नही उध्दार' हे जेवढे खरे तेवढेच हे देखील खरे की स्वराज्याशिवाय सुराज्य नाही, स्वराज्याकडून सुराज्याकडे, आर्थिक समतेकडे जाण्यासाठी सहकाराची वाट उपयोगी पडावी. शेती, कारखाने, लघुउद्योग यामध्ये सहकार तत्वाचा अवलंब करावा. जागतिकीकरणाच्या प्रवाहात टिकायचे असेल तर यांसारख्या उपायांचे चिंतन करावे. तरच समता आणि सहकार यांची युती व्यक्तिगत उननतीचा मार्ग होईल.

'Equality is golden path of progress for everyday'

सत्ता आणि ऐश्वर्य या दोहोंचा संयुक्त स्पर्श झाल्यामुळे

ज्यांच्या जीवनाचा कायापालट झाला आहे. देवघरापुरता निर्मळपणा आणि व्यवहारात गढूळपणा अशी जीवनशैली असणारे, ऐहिक उत्कर्षाचे साधन म्हणून राजकारण करणारे धार्मिक, सामाजिक, आर्थिक समतेस पाठबळ देतील का ? त्यासाठी आवश्यकता आहे राजकीय समतेची.

'Equality is a foundation stone of a temple of democracy'

लोकशाहीमध्ये राजकीय ध्येय म्हणून समतेचा पुरस्कार केला गेला. सर्व प्रौढांना मताधिकार, राजकीय सत्ता संपादन करण्याचा अधिकार देण्यात आला. समान संधीचे तत्व लागू करण्यात आले. त्यामूळे सत्तेचे विकेंद्रीकरण झाले व त्यामुळे सत्ता मिळालेले लोक शेकडो वर्षापासून दारिद्र्यात आयुष्य कंठणाऱ्या आपल्या बांधवांच्या उन्नतीच्या योजना राबवू लागले. म्हणतात ना ...

'जाळाशिवाय कढ नाही, अन् मायेशिवाय रड नाही' ते का उगाचच. सत्तेच्या राजकारणापेक्षा राजकीय प्रबोधनाला महत्व देणारी विचारी माणसे पुढे आली पाहिजे आपल्या मतांचे प्रांजळपणे प्रतिपादन केले पाहिजे. त्यांनी रामशास्त्री झाले पाहिजे राजसत्ता ही लोकसत्ता असावी, लोकसत्ता ही लोकशाहीच्या चलनवलनासाठी आवश्यक असणारी शक्ती असावी.

राजकीय समता आल्यास राजकारण हे लोकशाहीच्या विकासासाठी घडेल. लोकशाही ही लोकहितवर्धिनी होईल, आत्मविकास प्रत्येकाचा जन्मसिध्द हक्क आहे. आपल्या व इतरांच्या व्यक्तिमत्वांचा सन्मान आणि ज्ञान विज्ञानाच्या प्रकाशात घडणारा विकास हाच पुरुषार्थ असेल अन् समतेचे राजकारण हे या पुरुषार्थाच्या सिध्दतेसाठी केले जाईल कारण -

'Equality is breathe of democracy'

'कृती संस्कृतीत मजला, प्रकाश धवल समतेचा । ती ध्वजा धवल किर्तीची, ज्ञानमयी ऋषीची ।

मज बदल हवा तो अत्याधुनिक दृष्टीचा । मी भारती, सर्वांग भारती, अंतीही भारताचा ।'

व्यक्तिगत साधना व व्यक्तिगत क्षमता यातुन सिध्द होणारे वेगळेपण हे समतेच्या चौकटीत न बसविता प्रत्येकाला आपल्या परीने फुलण्याचा अधिकार असावा. त्याच्याकडून इतरांचा अधिक्षेप न घडावा. इतरांनी त्याच्या जगण्यात व्यत्यय न आणावा ही अपेक्षा हा समतातत्वाचा एक अविष्कार आहे. पूर्वी आपल्या समाजव्यवस्थेत अनेकांचे मुलभूत हक्क डावलेले गेले, अनेकांना शिक्षणाची, व्यवसायाची दारे बंद राहीली. अन्न, पाण्यासाठी गुलामगिरी पत्करुन तिष्ठत राहावे लागले. स्वार्थी लोकांनी निर्माण केलेल्या भेदाच्या भितीवर माणुसकीचे आढे कधीच स्थिरावले नाही या अन्यायकारक व्यवस्थेविरुध्द समतेचे लढे दिले गेले अन् यापुढेही दिले जातील म्हणूनच आपण देखील म्हणू या ... 'समतेचा ध्वज उंच धरा रे ।

ना.सुर्यकांत मुंगसे (सर)





# सकारात्मक दृष्टिकोन : यशस्वी जीवनाचा मूलमंत्र

भारताचे पूर्व राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी समस्त भारतवासियांना एक स्वप्न दाखविले आहे. सन २०२० पर्यन्त भारत हा जागतिक महासत्ता बनेल. डॉ. कलामांनी हे स्वप्न पाहिलं ते तरूणांच्या कार्यक्षमतेवर ! आज आपल्या देशातील ६९ % लोकसंख्या ही १८ ते ३५ या वयोगटातील आहे. अमेरिका, रशिया, इंग्लंड रशिया हे देश सरासरी म्हाताऱ्या लोकांचे देश म्हणून ओळखले जात असताना सर्वात जास्त तरुण रक्ताचा देश म्हणून भारताची ओळख निश्चितपणे डॉ. कलामांच्या स्वप्नांची पूर्तता करील असे चित्र आहे. परंतु हे तेव्हा शक्य होईल, जेंव्हा तरुणांची ताकद Quantity मध्ये परावर्तित होईल.

दुर्दैवाने भारतातील १५० वर्षांपासून तरुणांना गुलाम बनवणाऱ्या भ्रष्ट मेकॅले शिक्षण पध्दतीमुळे बहुसंख्य तरुणांसमोर कुठलेही ध्येय नाही. आजचा तरुण हा उदास वाटतो आहे. त्याच्याकडे प्रचंड बुध्दीमत्ता आहे, परीस्थितीशी झुंजण्याचे सामर्थ्य आहे. पण भ्रष्ट सरकारी यंत्रणा, लालफितीतला कारभार, मतांसाठी घटनेची चौकट मोडून मोजक्या लोकांचे लांगुलचालन करणारे व तरीही स्वत:ला ''धर्मनिरपेक्ष'' म्हणवून घेणारे राज्यकर्ते यांचेशी तोंड देताना त्याची दमछाक होत आहे आणि मग त्याला वाटू लागतं, ज्या क्रांतीकारकांनी आणि देशभक्तांनी आपल्या सर्वस्वाचा होम करुन या देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलं, त्याच भारत देशात मी आहे का? सुदैवाने सन २०१३ हे वर्ष स्वामी विवेकानंदांचे १५० वे जयंतीवर्ष संपूर्ण भारतभर उत्साहात साजरे होत आहे. विवेकानंदांनी राष्ट्र निर्मितीसाठी नेहमीच युवकांना आवाहन केले त्या आवाहनातून पेटलेले स्फुल्लिंग अद्याप विझले नाही. स्वामी विवेकानंदांप्रमाणे प्रत्येक क्षेत्रात दीपस्तंभाप्रमाणे कामगिरी केलेल्या अनेक महान विभूती तरूणांसाठी रोल मॉडेल आहेत.

ज्या देशात हजारो वर्षांपासून कुष्ठरोग्यांना बहिष्कृत केलंल त्या कुष्ठरोग्यांची आयुष्यभर सेवा करुन त्यांच्या जीवनात प्रकाश आणण्याची किमया बाबा आमटे यांनी केली. हे महान कार्य एका पिढीपुरतेच थांबले नाही तर तिसऱ्या पिढीपर्यन्त. गेली ६५ वर्षे अविरत सुरु आहे. सेवा साधना या भारतीय संस्कृतीचे संवर्धन करण्याचे महान कार्य आमटे परिवाराकडून जोपासले जात आहे. बाबा आमटे यांनी समस्त मानवजातीला फार मोठी शिकवण दिली ''पराभवाच्या धक्क्यानं खचून न

जाता पुन्हा ताठ मानेनं उभं राहणं हाच खरा धर्म आहे'' बाबांचे कार्य प्रांत, धर्म, देश यांच्या सीमा ओलांडून जगातील तरुणांसाठी आदर्शवत ठरले आहे.

कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना केवळ शुध्द चारित्र्य व उच्चतम देशभक्ती या गुणांच्या आधारे लालबहादुर शास्त्री हे या देशाचे पंतप्रधान झाले. पाकिस्तानचे पंतप्रधान अयूब खान हे १९६५ च्या युध्दात उपहासाने शास्त्रींना म्हटले होते. ये धोतीवाला हमसे क्या लडेगा ? त्यावर लालबहादूर शास्त्रींनी लाहोरपर्यन्त सैन्य नेऊन पाकिस्तानला व पर्यायाने अयूब खानला मूँहतोड जवाब दिला होता. ही देशभक्ती आजच्या तरुणाला प्रेरणादायी आहे.

लहानपणी रेल्वे प्लॅटफॉर्मवर वडिलांना चहाच्या विक्रीसाठी मदत करणारे नरेन्द्र मोदी देशभक्ति व आपल्या सद्‌गुणांचे आधारावर गुजरात राज्याचे चार वेळा मुख्यमंत्री झाले. प्रत्येक क्षेत्रातील विकासाच्या बाबतीत नरेन्द्र मोदी हे देशातील तरुणांच्या गळ्यातील ताईत बनले आहेत.

इंग्रजांच्या राज्या खउड परीक्षा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेले चिंतामणराव देशमुख प्रखर बुध्दीमान व स्वाभिमानी होते. पंतप्रधानांचे मनात महाराष्ट्राबद्दल आकस आहे असे सांगत चिंतामणराव देशमुखांनी नेहरुंच्या तोंडावर केंद्रीय अर्थमंत्री पदाचा राजीनामा फेकला होता. हा मराठी बाणा महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतीय तरुणांना प्रेरणादायी आहे.

निराशेच्या गर्तेत सापडलेल्या तरुणांनी हिमालयाच्या उंचीच्या या भारतीय आदर्शांना डोळ्यासमोर ठेवून सकारात्मक विचारांनी वाटचाल करायला हवी. प्रत्येक तरुणाने आत्मविश्वास, चिकाटी या गुणांबरोबरच तीन D म्हणजेच Dedication (समर्पण) Devotion (त्याग) व Descipline (शिस्त) या गुणांचा आपल्या व्यक्तिमत्वामध्ये अंतर्भाव करावा.

प्रत्येक मनुष्य त्याच्या मेंदूच्या क्षमतेच्या जास्तीत जास्त १०% वापर करतो. ही क्षमता प्रत्येकाने जाणीवपूर्वक वाढवली पाहिजे. आपली क्रयशक्ती वाढवली पाहिजे बंद पडलेले घड्याळ देखील दिवसातून दोन वेळा अचूक वेळ दर्शविते. आपण तर चैतन्यरुप आहोत याचे सर्वांनी भान ठेवले पाहिजे. प्रत्येकामध्ये काही ना काही विशेष गुण असतो. तो आपण स्वत: ओळखायला शिकलं पाहिजे. या विशेष गुणाला उच्चतम पातळीवर नेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. प्रत्येक तरुणाने डोळ्यासमोर काहीतरी ध्येय ठेवून वाटचाल करायला हवी. आपल्या मनातील स्वप्नांना खडतर परीश्रमांची जोड दिल्यास जगात अशक्य अशी कुठलीही गोष्ट नाही.

कुठलेही प्रयत्न अर्ध्यावर सोडू नयेत. या संदर्भात इंग्रजीत एक म्हण आहे.

Winner never Quit
Quittters never win

विद्यार्थ्यांनी आपले करिअर निवडताना नेहमी आपल्या आवडीच्या क्षेत्रात शिक्षण घेऊन त्यामध्ये मास्टर होण्याचा प्रयत्न करावा. त्यामध्ये कदाचित दोन पैसे कमी मिळतील. परंतु त्यातून मिळणारा आनंद हा ब्रम्हानंद असतो. भारतीय संस्कृतीत सुख व श्रीमंतीची व्याख्या अशी आहे की जो माणूस जास्त आनंदी तोच खरा सुखी आणि श्रीमंत. म्हणून आपण सर्वांनी आनंदी होण्याची संकल्प करु यात.

प्रयत्नांमध्ये सातत्य असावे. यश आणि अपयश यामध्ये सूक्ष्म फरक जर कुठला असेल तर तो म्हणजे सातत्य हा होय. आपण जर एखादी गोष्ट दररोज रासत्याने केली तर निश्चितपणे ध्येयप्राप्ती होते. याबद्दल दैनंदिन व्यवहारातील उदाहरण देता येईल. विहीरीवरील आडातून पाणी काढताना आपण सूताच्या दोरीला एखादे भांडे जोडून ते विहीरीत सोडतो पाणी काढताना प्रत्येक वेळेस सूताची दोरी विहीरीतील काळ्या पाषाणाला घासून जाते. उन, वारा, पाऊस यांची पर्वा न करणाऱ्या पाषाणावर मात्र सूताच्या होणाऱ्या सातत्यपूर्ण घर्षणाने व्रण पडतात. सातत्याने केलेल्या प्रयत्नांचा तो परिणाम असतो.




डॉ. ए.पी.जे. कलाम साहेबांची पुढील कविता प्रत्येक तरुणाने आत्मसात केल्यास भारत हा जागतिक महासत्ता बनण्यास वेळ लागणार नाही

मी भारताचा तरुण नागरीक आहे.
माझ्याजवळ देशप्रेम आहे
ज्ञान आहे, तंत्रज्ञान आहे

लहान ध्येय उराशी बाळगणे
हा गुन्हा आहे, याची मला जाण आहे

मी कष्ट करीन, घाम गाळीन
भव्य दिव्य स्वप्न साकारण्यासाठी

माझ्या भारताचे रुपांतर मी
विकसित राष्ट्र म्हणून करीन

त्यामध्ये नांदेल आर्थिक समृध्दी
आणि भारतीय संस्कृतीची जीवनमूल्य पध्दती

मी शंभर कोटी नागरीकांपैकी
एक नागरीक आहे

दूरदृष्टीच या कोटी-कोटी
माणसांची मने प्रज्वलित करील
या दूरदृष्टीने माझ्यात प्रवेश केला आहे

अशी दूरदृष्टीची माणसेच
पृथ्वीवरील, आकाशातील आणि समुद्रातील .....
जगातील सर्वात मोठी शक्ती आहे.

श्री.रोहिदास महादेव गडदे
शिवे

## कै.रामचंद्र महादेव गडदे स्मृती वाचनालयास महाराष्ट्र शासनाचा 'उत्कृष्ठ ग्रंथालय' पुरस्कार प्राप्त




**महाराष्ट्र शासनाचा सन २०१२-१३ या वर्षासाठीचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार खेड तालुक्याच्या दुर्गम व डोंगरी भागात वसलेल्या मौजे शिवे गावातील कै.रामचंद्र महादेव गडदे स्मृती वाचनालयास प्राप्त झाला असुन या पुरस्काराचे वितरण महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री ना.श्री.राजेश टोपे व उपमंत्री ना.श्री.डी.पी.सावंत यांचे शुभहस्ते करण्यात आले.**

# थोरांचे विचार

दैनंदिन व्यवहारामध्ये आपण नैतिकतेने, निर्मळपणे एखाद्या धर्माप्रमाणे कसे जगावे आणि वागावे, याची जाणीव सामान्य व्यक्तीला नसते. अशावेळी पुस्तकामध्ये त्याच्या प्रश्नांची उत्तरे सापडतात. वाचनामुळे चुका टाळून स्वत:ला सुधारण्याचे तसेच सुसंस्कृत करण्याचे ज्ञान मिळते, म्हणून पुस्तक हा मन निर्मळ करणारा साबण आहे, जो मनाची मलिनता धुवून काढतो.

**– महात्मा गांधी**



चांगल्या पुस्तकामुळे अनेक व्यक्तींचे आयुष्य तर घडलेच आहे, पण अनेकांच्या मनात जगण्याची आशासुध्दा निर्माण केली आहे. जगात पुस्तक ही अशी एकच गोष्ट आहे की, जी एखाद्या गरीबाला श्रीमंतीकडे नेते, दु:खी व्यक्तीला सुखाकडे नेते, आजारी व्यक्तीला दु:ख विसरायला लावते, ओझे वाहणाऱ्याला ओझ्याचे वजन कमी भासवते.

**– ओरिसन स्वेट मार्डेन**



उत्तम साहित्य वाचल्यावर विचारांच्या मर्यादा लांबपर्यंत पोहोचतात. पुस्तक म्हणजे स्पर्धात्मक युगात आकस्मित येणाऱ्या संकटांपासून संरक्षण करण्याचे शस्त्र आहे. सतत वाचन केल्यावर पुस्तक यशाचे मार्गदर्शक ठरतात, म्हणून वाचन कायम ठेवा.

**– फ्रान्सिस बेकन**




मी सुख, समाधान आणि शांती मिळविण्यासाठी खूप हिंडलो, खूप प्रयत्न केले, पण मला ते शोधूनही सापडले नाही. शेवटी थकून विश्रांतीसाठी एका विशाल वृक्षाच्या छायेत एक लहान पुस्तक वाचू लागलो आणि तेव्हा मला सुख, शांती आणि समाधान अचानक लाभले.

**– थॉमस केम्पिस**



जीवनात उपयुक्त ठरणारे वाचन करा, जे वाचल्यानंतर मनुष्यप्राण्याला ज्ञान प्राप्त होते आणि ज्याचा वापर तो उत्तमरित्या स्वत:साठी आणि योग्यरित्या परोपकारासाठी जीवन जगण्यासाठी करु शकतो.

**– हेन्री फोर्ड**





# शिक्षणाचे सिंहावलोकन ... दोन शब्द

प्रिय विद्यार्थी जगतांस सोबतचा लेख समर्पित करताना अत्यांतिक आनंद होत आहे. आखील मानवजातीचे जीवन नवरात्रमय करणारा एखादा 'नवरात्रौत्सव' असावा आणि समस्त शिक्षण प्रेमींना 'तिमिरातूनी तेजाकडे' वाटचालीस प्रेरणा देणारा चैतन्यमयी 'दिपोत्सव' तद्वत विचारांचे सामर्थ्य लक्ष-लक्ष दिपांनी उजळून लावणारा दिपावली अंक आपल्या नजरेस येत आहे.

इतिहासांच्या पानांत शतकानुशतके झळकणारी 'शिक्षण परंपरा' सर्वांना प्रेरणा देणारी आहे. 'विचारातून विकासाकडे झेपावणाऱ्या' या ज्ञानगंगेतील सर्व शिक्षणप्रेमींना शिक्षणाचे सामर्थ्य आकलन व्हावे यासाठी हा लेखप्रपंच आहे.

वास्तविक शिक्षणपध्दतीचे सामर्थ्य, गतिमानता, कल्पकता ही शिक्षकांच्या दर्जावर निश्चित होत असते. शिक्षकाला शिक्षण व्यवस्थेचे ज्ञान, आधुनिक व्यवस्थेचे भान असल्यास विद्यार्थी जगतात अष्टपैलू विकासाची जाण आल्याशिवाय राहणार नाही. शिक्षणाची फलनिष्पत्ती शिक्षकाच्या अष्टावधानी कर्तृत्वानुसारच होत असते. समाजपरिवर्तनाच्या कार्यात शिक्षकांचे योगदान लाख मोलाचे आहे. शिक्षक-शिक्षण हे समीकरण समाज आणि राष्ट्र यांच्या बदलांशी, प्रगतीशी आणि उन्नतीशी संबधित असणारे आहे. या दृष्टीने आजच्या काळात विषयाचे प्रावीण्य, विद्वत्ता, ज्ञान-प्रदान करण्याची कौशल्य, नवे आशय व तंत्रज्ञानाची ओळख, संवादी शिक्षणाची आस, ज्ञानपरायण वृत्ती ही शिक्षकाची ठळक गुणवैशिष्टये या क्षेत्रातील गुरुंची असावीत. दुर्दैवाने पाश्चिमात्य देशात ज्ञानाची जी प्रगती झाली. कांती झाली ती प्रगती पूर्वेकडे झाली नाही. जागतीक अहवालानुसार जगभरातील अग्रगण्य २०० विद्यापीठात एकही भारतीय 'विद्यापीठाचा' समावेश नाही ही शोकांतिका आहे.

शिक्षणाचे महत्व :

येत्या दशकात हिंदुस्थान जगाचे नेतृत्व करील इतकी शक्ती या देशामध्ये आहे. खाजगीकरण (Privatization) उदारीकरण (Libralization), जागतीकीरण (Globalization) या LPG फॉर्म्युल्यानुसार विकासाची वाटचाल सुरु आहे. आजची पीढी अत्यंत हुशार आहे. त्यांच्यातील विवेक जागृत करणे हे आजच्या शिक्षण व्यवस्थेचे प्रमुख कार्य आहे. नवीन पीढीची बरोबरी आपण करु शकत नाही. ती अनुभवावर उभी राहीली आहे. त्यांना फक्त त्यांच्या 'डेव्हलपमेंटच इन्फ्रास्ट्रक्चर' तयार करुन देणं, 'पायाभूत विकास सुविधा' निर्माण करुन देणे आणि गरजेनुसार मार्गदर्शन करणं हे आपलं काम आहे.

बाबा आमटेंनी तरुणांच वर्णन केल आहे की, ''घन अंधःकारात काळ्या ढगावर स्वार होऊन, हातात वीजेचा चाबूक घेवून, जो सारथ्य करतो तो तरुण ...'' आपल्याला त्यांचीच गरज आहे. लंडन ऑलंपिकमध्ये पंचतारांकीत यशाची उत्तुंग कामगीरी करणारे 'गगन नारंग, साईना नेहवाल, विजयकुमार, मेरी कोम, योगेश्वर दत्त' हे तरुणाईचे आदर्श असायला हवेत.

मुळात 'शिक्षण' ही संकल्पना गुणवत्तेशी संबधित



असणारी स्पर्धा असा विषय नेहमीच चर्चेला येतो. शिक्षणाचा अर्थ खरे पाहता अमर्याद आहे. शिक्षण केवळ 'साक्षरते पुरते किंवा डॉक्टरेट' मिळवून पांडित्यापुरते मर्यादित नाही. जीवनविषयक मूल्यांकडे पाठ फिरवून प्राप्त केलेली विद्वत्ता किंवा कौशल्य म्हणजे परिपूर्ण शिक्षण नव्हे. शिक्षणातून उदरनिर्वाहाची सोय प्राप्त होणं ही वेगळी बाब आहे. खरे शिक्षण समाज व देशाच्या विकासासाठी हातभार लावणाऱ्या उद्योग, व्यापार, माहिती-तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स, मिडीया इ. क्षेत्रांतील बदलांचा मागोवा घेवून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेशी मेळ घालणारे आहे. केवळ 'सर्विस ओरिएंटेड' एज्युकेशन न राहता ते बिझनेस ओरिएंटेड (व्यवसायाभिमुख) दिशेने वाटचाल करणारे असावे. शिक्षणपध्दतीचे खरे यश पागंतराला महत्व देणाऱ्या शिक्षण व्यवस्थेकडून संवाद निर्माण करणाऱ्या सहभागी शिक्षण व्यवस्थेत सामावलेले आहे Give with faith, do not give without faith, give compensation, give with large heart".... देणाऱ्याने देत राहावे, घेणाऱ्याने घेत राहावे, घेणाऱ्याने घेता-घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे हा शिक्षण व्यवस्थेचा संस्कार आहे "The altimate aim of education, to read the heart of the student". शेवटी विद्यार्थी-माणूस वाचन हेच तर शिक्षणाचे अंतिम ध्येय आहे.

आजची शिक्षणपध्दती-भावी पीढीच्या इच्छा आकांक्षाची निर्माती ... आजच्या जगात 'ई' या शब्दाला फार महत्व आलय... 'ई' म्हणजे इंटरनेट, ई-मेल, ई-इकॉनॉमिक्स, ई-मंत्रालय, ई-विधानसभा, ई-एज्युकेशन त्याच्यासोबत 'व्ही' या शब्दाला महत्व आहे. 'ए' For Education & V Values. आपले चारित्र्य संपन्न करण्यासाठी माणुसकी आरि जीवनमूल्यांचा अंगिकार विद्यार्थी दशेतच करायला हवा. आता ''एटीएम'' चा वापर वाढला आहे, ''ऑल टाईम मनी'', मी सांगेन ''एटीबी'' ऑल टाईम बुक्स ... इकडे बटन दाबलं की तिकडे पुस्तक निघेल अशी जबाबदारी समाजाने व सरकारने स्वीकारली पाहिजे. महाविद्यालये, शाळा यातून नव्या पीढीच्या आशा-आंक्षांचा विचार होताना दिसला पाहिजे.

या पीढीच्या जडणघडणीत काया-वाचेच्या पलीकडे डिजीटल स्त्रोत उपलब्ध आहेत. आजच्या डिजीटल पीढीचे एक स्वतंत्र जग आहे. इंटरनेटच्या माध्यमातून ग्रंथालय तुमच्या हाताशी आहे. डिजीटल पीढीतून व्हीडिओ जगताचे रहिवाशी नवीन पीढीत दाखल झाले आहेत. डिजीटल पीढीतून यू-ट्यूबच्या जगतात नवीन क्रांती होताना दिसत आहे. के.बी.ओ., बी.पी.ओ., आय.टी. पार्क, बायोटेक्नॉलॉजी, एस ई झेड, या क्षेत्रात सर्वव्यापी साधनांनी शिक्षणासमोर महत्वाचे प्रश्न निर्माण केले आहेत. समजा परिक्षा घ्यायची म्हटली तर कसली परिक्षा ? व्यक्तिची कि तिच्या डिजीटल साधने वापरण्याच्या क्षमतेची ? डिजीटल साधने न वापरता येणारी व्यक्ति या शिक्षण-व्यवस्थेत, २१ व्या शतकाच्या परिभाषेत सुशिक्षित म्हणायची का ?

**२१ व्या शतकातील शैक्षणिक आव्हाने...**

महाराष्ट्र राज्याची आजची लोकसंख्या बारा






कोटीच्या आसपास तर देशाची १२२ कोटीपर्यंत पोहचली आहे. एकूण ९४,२७४ प्राथमिक व माध्यमिक शाळा तर ७ हजाराच्या आसपास महाविद्यालये आहेत चांगल्या व दर्जेदार शिक्षणासाठी व्यवस्थापन चांगल्या प्रतिचे आवश्यक आहे. सांप्रतांच्या सुविधांमुळे शहरी भागांस विद्यार्थी शिक्षणक्रमांस प्राधान्य देतात पर्यायाने ग्रामीण भागांत शाळा प्रवेश घेणारांची संख्या कमी आहे.

शिक्षणप्रक्रियेत सहभाग व निष्ठा या प्रणालीस अत्यंतिक महत्व आहे. तथापी 'ग्रामसभा' सारखी 'पालकसभांची' परिस्थिती आहे.

पालकांची शिक्षणाविषयीची अनास्था, उच्च शिक्षणांत शिक्षित मनुष्यबळाची कमतरता, आज ही मुलींच्या शिक्षणाविषयी नसलेली तळमळ.. कमी वयातच अन् अर्धवट शिक्षणाच्या वाटेवर लगीनघाई .. एकूणच सामाजीक चित्र वैफल्यग्रस्त आहे. इच्छा-आकांक्षा असूनही शिक्षण अर्ध्यावरच सोडावे लागणे ही समस्या विचित्र आहे.

दर्जेदार शिक्षणासाठी अपुऱ्या भौतिक सुविधा.. इमारत, क्रीडांगण, प्रयोगशाळा, संगणक, स्वच्छतागृह, बैठक व्यवस्था इ. भौतिक सुविधांची वाणवा, पालकांच्या वाढत्या अपेक्षा, आर्थिक अडचणी या शैक्षणिक आव्हानांच्या अडसर आहेत.

प्राचार्य शिक्षक यांच्या क्षमतावृध्दीसाठी प्रशिक्षणाशिवाय पर्याय नाही. प्रशिक्षणांतून मिळालेल्या ज्ञानाचा वापर शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता वाढविणेस वापरणे-क्रमप्राप्त आहे. अन्यथा भविष्यकालीन पीढीचे भवितव्य अंधारातच राहील.

## कशी हवी शिक्षणव्यवस्था ....

बॉब जोहान्सन या तत्ववेत्त्याने शिक्षणाबाबत 'द लिडर मेक्स द फ्यूचर' या ग्रंथात दोन पिढ्यातील जनरेशन गॅपची संकल्पना सांगीतली आहे. जोहान्सन यांच्या मते वीस ते पंचवीस वर्षांनी पीढी बदलते असे आपण मानतो. पण जगातील दोन पीढ्यांची अंतराची कल्पना आता ६ वर्षावर आली आहे. म्हणजेच आज ९ वर्ष वय असणाऱ्या मुलाचे व्यक्तिमत्व १५ व्या वर्षीच बदललेले असेल. भविष्यातशिक्षणाचा वेध घेताना हे आक्रसणारे अंतर भरुन काढावे लागणार आहे.

जेब्रॉनच्या मते, "आपल्या मुलाला आपले बुरसटलेले विचार देऊ नका. त्याला स्वातंत्र्य द्या त्याला तुम्ही पंख द्या, त्याचे पंख तुम्ही कापू नका."

प्रत्येक विद्यार्थ्यात चांगले गुण असतात, त्या गुणांची, त्या मुलाची उजवी बाजू बघितलीच पाहिजे. मुलांचा अपमान, उपमर्द करु नका.. एखादा मुलगा ऐकत नसेल तर त्याचा अर्थ असा नाही की तो फार बिघडला.

शिक्षणाचे पारंपारिक स्वरुप बदलून पाटी-पेन्सिल ऐवजी डिजीटल पाटी (टॅबलेट) त्याच्या हाती आला आहे. पुस्तकी पाठांतराला महत्व देणारी शिक्षणव्यवस्था आता कालगत झाली आहे. आजची शिक्षणपध्दती समाजाच्या इच्छा, आकांक्षा आणि सामाजिक प्रश्नांशी जोडलेली असणे आवश्यक आहे.




'तहानल्याने तहानची प्यावी, भूकेल्या भूकचि खावी अहोरात्र व्हावी मवा वा वारा... आपण अंग, आपण अलंकार, आपण जीव आपण शरीर आपण हात, आपण हथियार चराचर''

प्रत्येक विद्यार्थी मनाचं एक स्वगत आंदोलन असतं. मोठेपणी कोण व्हायच ? हे बीज मनाच्या पाटीवर कोरलेलं असतं छोटी-मोठी स्वप्न उराशी बाळगून कुटुंबाच्या छोट्याशा गवाक्षातून समाजाच्या विशाल प्रांगणात पाय ठेवता.. मग ही स्वप्न अपडेट करण्यासाठी प्रचंड मेहनत करणं अत्यावश्यक आहे. सामान्य कुटुंबात जन्म घेवून आंतरराष्ट्रीय पातळीवर झळकण्याची तुमची मनोकामना पूर्ण हाणार आहे या तिळमात्र संदेह नाही. सामान्य विद्यार्थ्यांत असामान्य गुण आणि कर्तृत्व दडलेलं असतं याचा विसर शिक्षक-जगांना पडता कामा नये ?

ज्ञानेश्वरांनी आपल्याला ज्ञान दिलं. नामदेवांनी भक्ती दिली. तुकोबाने वैराग्य दिलं, संत रामदासांनी सामर्थ्य दिलं. अलीकडच्या काळात संत गाडगेबाबांनी स्वच्छता दिली, तुकडोजी महाराजांनी राष्ट्रभक्ती दिली. हे सर्व आपण वाचून आचरणांच आणणार की नाही ?

**शुभसंदेश ...**

पी.के. इन्स्टिटयूट हे शिक्षण व्यवस्थेची गीता सांगणारे प्रष्ठिान आहे, त्याचे श्रीकृष्ण तुम्ही प्रिय विद्यार्थी आहात. ऐकणारे श्रोते आम्ही सामान्यजण आहोत. देवाच्या पूजेइतकेच पवित्र कार्य शिक्षण संस्थेच्या माध्यमातून साकारते आहे.

आदरनिय 'प्रताप खांडेभराड' यांचे कार्य तुमच्या पंखांना बळ देणारे आहे. या महान व्यक्तिजनांच्या मार्गदर्शनाचा नितांत आदर करत' सामाजिक बांधीलकीचे ' पाईक व्हा. तुमच्यात क्षमता आहे, आळस करु नका... इमारती खोल्या, वर्ग यांत शिक्षणाचा कोंडमारा होतो, नव्या डिजीटल माध्यमांचा वापर करत अडथळे दूर करुया अखेर भविष्याचा खात्रीलायक मार्ग म्हणजे आपले भविष्य आपणच लिहणे.

**श्री. रामदास थिटे**
प्राचार्य संभाजीराजे महाविद्यालय
जातेगांव बु ।। ता. शिरूर



॥ श्री समर्थ सद्गुरु ॥

# ॥ आदर्श भागवत धर्माचा ...

# ह.भ.प. शांतीब्रम्ह, गुरुवर्य, मारोतीबाबा कुऱ्हेकर ॥

''ज्ञानेदेवे रचिला पाया, उभारिले देवालया ! तुका झालासे कळस, भजन करा सावकाश !!''

१३ व्या शतकापासुन किंबहुना त्यापुर्वी सुरु झालेली वारकरी संप्रदाय परंपरा आजतागायत महाराष्ट्रातील थोर संतानी आपल्या कार्याने विस्तारत ठेवली आहे. वारकरी संप्रदाय म्हणजे महाराष्ट्रियांचा भागवत धर्म ! ''विष्णुमय जग, वैष्णवांचा धर्म''आणि ''जे जे भेटे भूत, ते ते माणिजे भगवंत ! तो भक्ती योग निश्चित! जाण माझा !'' या विचाराने या संप्रदायाचे कार्य अखंड मानव जातीच्या कल्याणासाठी संतानी आपल्या आचरणातून समाजापुढे मांडले. ''जततपयज्ञ लाजविली दाने ! हरिनामसंकीर्तने करुनिया !!'' अशा नामसंकिर्तनाचा महिमा जगद्गुरु तुकाराम महाराजांनी या संप्रदायाला दिला आहे. आणि या भागवत मंदिरावर कळस चढविला. ही नाम संकिर्तनाची परंपरा अखंडपणे पुढे चालविण्याचे कार्य अनेक विभूती आणि संतमहात्मे महाराष्ट्रात आज करीत आहेत. प्रसिध्द जोग महाराज म्हणजेच विष्णु नरहरी जोग यांनी स्थापन केलेली आळंदीतील ''वारकरी शिक्षण संस्था'' ही या महान परंपरेतील एक महत्वाची 'कडी'आहे. नामदेवादी संतांनी भागवत धर्माच्या प्रचारासाठी ज्या हरिकथेचा अवलंब केला ते साधन जोग महारा जांनीही वापरले. जोग महाराज हे ''नैष्ठिक ब्रम्हचारी' होते.



आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत सर्वस्वाने त्यांनी या संस्थेचा 'भार' वाहीला. त्यांच्या नंतर प्राचार्य सोनोपंत दांडेकर यांनी हे कार्य पुढे चालविले. आणि आज या संस्थेची ही महान परंपरा पुढे चालवित आहेत. ''ह.भ.प. शांतीब्रम्ह गुरुवर्य मारोतीबाबा कुऱ्हेकर''.

''माझ्या वडिलांची मिरासी गा देवा !
तुझी चरणसेवा पांडुरंगा !''

तुकाराम महाराजांच्या या वचनाप्रमाणे बुवांना आपले वडील वै. लहानुजीबाबा व मातोश्री जिजाई यांच्याकडून उत्तम अध्यात्मिक वारसा घरातच मिळाला. विदर्भातील नरखेडे जिल्हा नागपुर येथे १ जुलै १९३२ रोजी त्यांचा जन्म झाला. त्याच ठिकाणी मॅट्रीकपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले. ''देव बसे ज्याचे चित्ती! त्याची घडावी संगती !'' अशा स्वाभाविक इच्छेने बुवांनी ऐन तारुण्यात आळंदीचा रस्ता धरला आणि ते ज्ञानेश्वर माऊलींच्या सानिध्यात आले. ज्याच्या पदरी 'पुण्य संपत्ती' विपुल आहे. त्याला 'सत्संग' घडतो. 'सत्संग दुर्लभ' आहे. 'अगम्य' आहे. पण 'अमोघही' आहे.

वै. मामासाहेब दांडेकर यांच्या सानिध्यात वारकरी शिक्षण संस्थेत मारोतीबाबा दाखल झाले. त्यांचे भाग्य थोर या ठिकाणी वै. शांताराम गुरुजी, भाऊसाहेब वरोलीकर, गुरुवर्य विठ्ठलबाबा उर्फ मोठेबाबा चौधरी यांच्या कृपाशीर्वादाखाली ज्ञानेश्वरी, पंचदशी, गीता, विचारसागर आदि ग्रंथाचे सखोल अध्ययन त्यांना करता आले. मुळची ज्ञानलालसेची वृत्ती, चिकाटी, मातापित्यांचे पुर्वसंस्कार यामुळे बुवांच्या अध्यात्मिक प्रगतीचा आलेख सतत उंचावत राहीला आहे. त्यांचे पुण्य एवढे थोर की, जोग महाराज, गुरुवर्य दांडेकर यांच्या महान कार्याची परंपरा पुढे चालविण्याची जबाबदारी त्यांना घ्यावी लागली. आजही अत्यंत निष्ठेने बुवा आपले हे व्रत पुढे चालवित आहेत. अखंड ब्रम्हचर्याचे पालन करुन बुवांनी आपली 'गुरुपरंपरा' पुढे चालविली आहे. वारकरी संप्रदायात एक अत्यंत दुर्मिळ अशी ही परंपरा पुढे अशीच चालु रहावी अशी प्रार्थना माऊलींच्या चरणी करावीसी वाटते. पाच दशकाहून अधिक काळ किर्तन-प्रवचने यांच्या माध्यमातून बुवांनी आपले वारकरी संप्रदायाच्या प्रचार प्रसाराचे कार्य वारकरी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सुरु ठेवले आहे. ज्ञानदानाच्या या कार्यातून असंख्य शिष्यगण या संस्थेती बाहेर पडले आणि आपापल्या परीने भागवत धर्म प्रसाराचे कार्य करीत आहे. ''मार्गाधारे वर्तावे, शिश्व हे मोहरे लावावे ! अलौकीका नोहावे लोकांप्रति !'' हा माऊलींचा संदेश व जीवनसूत्र बाळगुण बूवांनी आपली पारमार्थिक वाटचाल चालविली आहे. 'किंबहुना तुमचे केले धर्म किर्तन, हे सिध्दी गेले माझे येथली उतले पाईकपण !'' अशी विनम्र वृत्ती बाळगुण पंढरीनाथाच्या कृपेने आपल्या हातुन साप्रंदायाची आणि गुरुपरंपरेची सेवा घडावी या भावनेने त्यांचे 'भगवत कार्य' चालु आहे. अत्यंत निरपेक्ष वृत्तीने आणि निस्पृह भावनेने चालविलेले हे कार्य संत परंपरेचा उज्वल वारसा सांगणारे आहे यात मुळीच शंका नाही. लोकभावनेतुन मारोतीबाबांना दिली गेलेली ''शांतीब्रम्ह'' ही उपाधी त्यामुळेच साई वाटते. महाराष्ट्र वारकरी महामंडळाने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री बा.ना. श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेब यांच्या हस्ते पुरस्कार देवुन त्यांचा गौरव केला. ही संपुर्ण महाराष्ट्राने त्यांच्या ठायी दिलेली 'मानवंदना' ठरली आहे.

असे म्हणतात 'संत होवून संताना जाणावे. आपण अंगे संत झाल्याशिवाय संत चरित्राचे वर्म ठावे होत नाही.'' या न्यायाने प्रत्यक्ष माऊलींनी ज्यांना दर्शन दिले त्या मारोतीबाबांसारख्या संव्दिभुतीचा सहवास मिळाला ही आमची 'पूर्वपुण्याई' आहे. शतकोत्तर उत्तम आयुर्मान बाबांना मिळावे आणि हे 'भगवत कार्य' व्हावे अशी माऊलींच्या चरणी श्रध्दापूर्वक प्रार्थना .... !!!



मा. विनोद सहदेव महाळुंगकर (पाटील)
संपर्कप्रमुख, पुणे जिल्हा आखिल भारतीय वारकरी मंडळ



# माझिया जातीचे मज भेटो कोणी ... !

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणजे निर्भिड पत्रकार होय. समाजाला जागृत करणं ही आमची जबाबदारीच आहे. सत्याला हार तर असत्याला प्रहार ह्या दोन आयुधांचा जो रामशास्त्री बाण्यानुसार वापर करील तोच खरा जिवंत पत्रकार पत्रकारांनी प्रबोधन केल्यानंतर सुधारणं म्हणजे, भारतीयत्व जागृत केल्यासारखंच आहे. परंतू काही वेळेला....' अरे ! तुम्ही आमचं ऐकू नकाच परंतू स्वत:चा विवेक तर जागेवर ठेवणार ना ? आमच्या विचारांचं तात्पुरतं स्वागत करुन, हसुन रडून टाळ्या वाजवून थोड्याच वेळात लोक पुन्हा चर्चा करतात असे लिहिणारे सांगणारे फार येऊन गेले हो ! आपण एव्हढं मनावर घेऊन कसं चालेलं ? हा त्यांचा धंदा आहे. बोंबलण्याचा – खरडण्याच आपलं काम काय नुसतं ऐकायचं वेळ जात नाही म्हणून वाचायचं ! ऐकावे जनाचे आणि करावे मनाचे ! चला आपल्या लागा उद्योगाला यांच्या नादी लागून भागणार आहे का ? आणि तुम्ही तुमचे उद्योग सुरुच ठेवणार. डूकरानं कधी घाण खायची शप्पथ घ्यायची का ? तो त्याला आपली शान समजणारचं !

सज्जनहो ! मरे पर्यंत फिट रहायचे असेल तर नीट रहायला शिका. वयाच्या तीस पस्तीसलाच जर मानगुटावर डॉक्टरने पट्टा लावायला दिला असेल तर आता तरी विनाकारण भुंकणं बंद करावं. नाही तर काही दिवसांनी स्वत:ची दिवटी मुलं साखळीसुध्दा बांधतील वयाच्या बावीसाव्या वर्षी 'डायबेटीस' व्हावा आणि सत्तावीसमध्ये हार्ट अॅटॅक यावा. युवकांबद्दलची ही फार मोठी शोकांतिका आहे. वीस वर्षांची स्वत:ची मुलगी विधवा झालेल्या बापाला त्यांचं दु:ख काय आहे ते जरा विचारा ... बेधुंद तरुणाईचे हायवेवरील ड्रिंक अॅण्ड ड्राईव्ह चे बळी जाताना त्या आई वडीलांना काय वाटत असेल ? अरे ... तुम्ही जाता एका वाटेने, पण बाकीच्यांना वाटच् शिल्लक ठेवीत नाहीत. तुमच्या आत्राबपणामुळे तुम्ही तर मरणारच् परंतू तुमच्या परिवाराला मुलाबाळांना रोजच् मराव लागणार. आपण जिवंत आहोत, हेच जीवनातलं फार मोठं सत्य आहे. शेवटी मृत्यू तर आपल्या हातात नाहीच् मोठमोठे योगी सुध्दा शेवटी रोगी होऊन अंथरूणावर हाल अपेष्टा सहन करीत गेले आहेत. प्रत्येकाला कर्माचे भोग भोगायचे आहेतच. परंतू आपला मृत्यू सुकर असावा, नैसर्गिक मृत्यू येण आणि हातानं रोग वाढवून मृत्यूला आमंत्रण देणे, या दोहोमध्ये फार फरक आहे. व्यसन आणि तलफी आपणाला संपवण्याची जबाबदारी पुर्णत: सांभाळत असतात. परंतु आज व्यसनांवर ताबा राहूच शकत नाही. व्यसनं कां करु नयेत ? रोज पाच–दहा हजार रुपये, जर हरामाचे घरात येत असतील तर, त्यांच्या लाडक्यांनी धूम स्टाईलने गाड्या उडवल्याच पाहिजेत. ते गाडीखाली घुसलेच पाहिजेत त्यांचे हातपाय वाकडे होऊन त्यांचे सर्व कार्यक्रम जागेवरच सुरु झाले पाहिजेत. तो संपण्याचा मार्ग ठरलेला आहे. त्यांना तुम्ही आम्ही अडविण्याचा प्रयत्नही करु नये. आपल्या चांगल्या वाईट कर्मांची फळं आम्हाला याची डोळा, याची देही फेडावयाचे असतात.

आज माणसं किती भांबावलेली असावीत ? कसं वागावं–कसं जगावं ? हेच काही लोकांना तिरडीवर जाईपर्यंत कळतंच नाही. बापाचं धोतर, जर चारठिकाणी फाटलं असेल

तर पोरांने बारा खिशांची जिन्स वापरायची गरज आहे का? आणि सर्व बारा खिश्यांमध्ये भांडवल तरी काय आहे ? दोनचार गुटख्यांच्या पुड्या अेक कंगवा आणि बहिणीच्या पर्स मधून चोरलेले पन्नास रुपये ! दुसऱ्यांच्या वरातीत बेचाळीस किलोची सडलेली बॉडी वाकडी तिकडी करुन नाचलास म्हणजे तू हिरो झालास का ? .... अरे, तुझी बहिण तोंडाला स्कार्फ बांधून बसस्टॉपवरुन दुसऱ्यांच्या बाईकवर बसून जाते तेव्हा मात्र तू मुद्दाम पाहून न पाहिल्यासारखं करतोस... कारण तुझ्यात कष्ठ करण्याची हिम्मत नाही. म्हणून निर्लज्जासारखं बहिणीकडून पैसे मागतोस ना ? तिला बोलायला तुला नाकच् नाही आणि ह्या आपल्या हिंदूस्थानात अशा नामर्द नमुन्यांचीच दिवसेन दिवस भर पडत आहे. काय म्हणावं ह्या तरुणाईला ? त्यांच्या वीस कलमी कार्यक्रमानं समाजही लज्जीत होत आहे.

मित्रहो – आयुष्यात आनंद मिळवायचा असेल तर सर्वांवर सकस माया करा. हे मी कां सांगतो ? हे मी अनुभवलंय म्हणूनच सांगतो. आपल्याला जे काही कर्म करायचं आहे, ते आपण प्रामाणिकपणे करणं हीच तपश्चर्या आहे. हीच नितांत भक्ती आहे. असे मी मानतो. माणसं कधी कधी म्हणतात गेल्या दिड महिन्यापासून त्याची तब्बेत फारच खराब झाली हो ! स्मृतीसुध्दा जागेवर नाही, महिन्याभरापासून तो माणसंसुध्दा ओळखत नाही. अरे, असं होणारच होत, तो महिन्याभरापासून माणसं ओळखत नाही. असं नाहीच जन्मभर त्याने कधीच माणसं ओळखली नव्हती. मग शेवटी अशी हलाखीची परिस्थिती होणारचं ! त्यात नवल ते काय ? शेवटच्या आयुष्यांत कोण कुठून जागेवर घाण करणारा. आयुष्यभर बेईमानीची घाण करतच आलेला असतो., आयुष्यभर घरात हरामाची घाण आणलेली असते. त्यानं आणलेल्या घाणीवर, सर्वच कुटूंबियानी यथेच्छ हात मारलेला असतो. म्हणूनच त्याच्या परिवाराला आज त्याचीच घाण काढावी लागते.

पैशाचा–संपत्तीचा मोह करु नका. अहंकार करु नका. हे सांगायला फारच सोय आहे. परंतु आमच्यातले हे अनुभव आम्ही सोडायलाच तयार नाही. तुम्ही धार्मिक नसलात तरी चालेल. परंतु तुम्ही नैतिक असणं गरजेचं आहे. कारण धार्मिकतेच्या मुळ पायात नैतिकता आहे तुम्ही नैतिक नसाल तर तुमच्या धार्मिकतेला शेंगदाण्याच्या टरफला इतकी देखिल किंमत ती काय ? येथे सर्वांनी सरळ सरळ एकच गोष्ट लक्षात ठेवणे हिताची आहे. आपण जसं पत्र पाठवाल, तसं त्याचं प्रत्युत्तर मिळतं जैसे ज्याचे कर्म, तैसे फळ देतो रे ईश्वर, हे काय खोट आहे? आपण आपल्या बापान, घाम गाळून कमावलेल्या संपत्तीची, बार आणि मुजऱ्यांत उधळणं केली तर ती आपल्याला लवून मुजरा करणार तर नाहीच, परंतु ती तर आपल्याला पोत्यात घालून हाणतील अशी आजची वास्तुस्थिती आहे. नियतीचा नियम असा आहे की, आपल्याला प्रत्येक कामाचा मोबदला आणि बदला घेतल्याशिवाय आपल्याला वर जागाचं नाही.

सज्जन... मित्रहो ! संसारप्रपंच ही न संपणारी व्यवस्था आहे. या व्यवस्थेला माणसाचे दहा जन्मसुध्दा पुरणार नाहीत. आपल्या ह्रदयावर ताण पडणार नाही, असा नेटका प्रपंच असावा जीवनात शक्यतो लबाडी–धोकेबाजी नकोच वास्तविक पहाता आमच्यासारखे सत्याचा मार्ग दाखविणार समुपदेशक मार्गदर्शक आज बावचळलेले नव्हे तर चळलेले ही जेव्हा आढळतात, त्यावेळी दुर्दैवाने अंगार भडकतो. पत्रकारितेच्या माध्यमातून, राष्ट्रपतीच्या सन्मानाचं सर्वोच्च शिखर गाठले. आतापर्यंतच्या चढउतारात, लहान लहान माणसंसुध्दा, किती मोठी असतात तर मोठमोठी माणसं किती लहान असतात. याचा जवळून प्रत्यय आला.

माणसं येतात आणि जातात ! परंतु काही माणसं गेल्यानंतर काळीज कापून जातात. आमचे तीर्थरुप 'कै. ज.मा. आवटे गुरुजी तथा काका' हे आज ह्या जगात नसले तरी, ती दत्तस्वरुप मुर्ती, लोचना समोरुन , कधीच जात नाही. पिंपरी पेंढार, वडगांव आनंद, आळे राजुरी ह्या गावात त्यांच्या शिक्षणप्रणालीचा सुवास अजूनही धमधमत आहे, परदेशास्थित, भारतीय उच्च ... अनेक छात्र– शिष्यगण त्यांच्या प्राजक्ताचा सुगंधच आहेत. अत्यंत हलाखीच्या रोपट्याचा महावृक्ष केलात त्याची कणभर छाया आम्ही समाजात देतोय. कुटूंबीय, मित्रपरिवार, नातेवाईक ज्ञात–अज्ञात हितचिंतकांच्या पाठबळावरच मी लौकीकास पात्र ठरत आहे. मी आज सर्व बाजूंनी कृतार्थ झालो आहे. अपेक्षा आहे ती हसतमुख मृत्यूची ! मरावं असं की मनाला त्याची जाणीव सुध्दा होऊ नये. 'सामान सौ सालका भरोसा नही पलका'' म्हणून आजही मी मरण्यापूर्वी जगायचं शिकत आहे. प्रतिक्षेत आहे. ''माझिया जातीचे मज भेटो कोणी ....!!''

**श्री.रामचंद्र ज. आवटे**
राष्ट्रपती सन्मानीत पत्रकार



# विद्यार्थ्यांची मानसिकता ओळखण्याची गरज
# पालकांची हवी सजगता

चाकण भागात विद्यार्थी दशेतील मुलांची बदलती मानसिकता, वैफल्यग्रस्त होऊन घडणाऱ्या घटनांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात दिसून येत असून ही भविष्यातील धोक्याची घंटा आताच ओळखली गेली पाहिजे. चाकण मधील विद्यार्थ्यांच्या गटा-गटाच्या भांडणाचे प्रकार अनेकदा समोर आले आहेत. नुकताच एका मोठया प्रशालेत समोर आला होता. शाळा कॉलेज मधील विद्यार्थ्यांचे क्रूर व्यवहार सातत्याने कानांवर आदळत असताना घराघरांमधल्या पालकांना चिंतेने भंडावून सोडले आहे.

शाळा, कॉलेज आणि क्लासच्या अभ्यासाचा बोजा, पालकांच्या न पेलवणाऱ्या अपेक्षांचे ओझे, स्पर्धात्मक परीक्षा त्यासाठी करावी लागणारी सततची धावपळ, वाढते ताणतणाव, त्यातून येणारे वैफल्य, आजार, कौटुंबिक तंटेबखेडे आणि अशा अनेक समस्यांमुळे १४ ते १९ या वयोगटातील तरुण तरुणींचे अभ्यासातील लक्ष कमी होणे, बेछुट वागणे, मित्र-मैत्रिणींच्या आग्रहाला बळी पडणे आणि आत्मविश्वास ढासळणे, भांडण तंट्यामध्ये रस घेणे असे काहीसे चित्र सध्या बघण्यास मिळत आहे.

शिक्षणाचे माहेरघर मानल्या जाणाऱ्या पुण्यामधील दहावी-अकरावीतील शेकडो मुला-मुलींनी दारु पिऊन धिंगाणा घातल्याचा प्रकार काही दिवसांपूर्वी समोर आला होता. ही सर्व पालक आणि पाल्यांना काळीमा फासणारी घटना घडण्यामागे काही अंशी वरील कारणे असू शकतील पण भविष्यात अशा घटना घडूच नयेत म्हणून आता काय खबरदारी घेणे आवश्यक आहे ? त्यासाठी काय करायला पाहिजे ? ह्या गोष्टींकडे सर्व पालक आणि पाल्यांनी अंतर्मुख होऊन निर्णय घेणे गरजेचे आहे. कारण पुण्यातील हे लोन जिल्ह्याच्या ग्रामीण भागात आपली पाळेमुळे रोवू लागले आहे. औद्योगिक विकासासह जमिनीच्या व्यवहारातून आणि कारखान्यांतील ठेकेदारीच्या माध्यमातून या भागातील अर्थकारण बदलले आहे. या भागातील जमीन व्यवहार किंवा वडिलोपार्जित जमीन विकून अमाप पैसा मिळविणारे अनेक पालकच जर आनंद साजरा करण्यासाठी दारुच्या पाट्र्या झोडत असतील तर ते पाल्यांना एक प्रकारचे चुकीचे प्रोत्साहन दिल्यासारखेच आहे. मग महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनीची पावले वाकडी पडली तर त्याचा दोष कोणाला द्यायचा, हा प्रश्नच अनेक उत्तरांचा धनी आहे.

टीव्ही पहा पण...

वाहिन्यांवरुन प्रसारित होणाऱ्या आणि पुन:पुन्हा दाखविल्या जाणाऱ्या बातम्या सर्व वयोगटातील नागरिक बघत असतात याचे भान निर्मात्यांना नसते. शिवाय याच प्रसारमाध्यमांद्वारे दाखविण्यात येणाऱ्या मालिका आणि त्यातील बीभत्सपणा अशा 'स्वरुपांचे' मार्गदर्शन करणारी प्रशिक्षण केंद्रेच बनली आहेत. जाणकारांच्या मते मानवी मनाचे शास्त्र असे सांगते की, मानवी मन कोणाच्या उत्कर्षापेक्षा त्याच्या अधोगतीकडेच अधिक आकर्षित होते. अर्थात या मालिकांमधून दाखवल्या जाणाऱ्या विधायक गोष्टींचे अनुकरण करण्याऐवजी ही माणसे (?) त्यातील विघातक गोष्टीच आपल्या कृतीत आणतात आणि नेमकी हीच गोष्ट समाजाला तारक ठरण्याऐवजी मारक ठरते. वाहिन्यांवरील काही कार्यक्रमांचे अत्यंत हिडीस दर्शन बंद करण्यासाठी आता शासनानेच पुढाकार घेण्याची गरज आहे. मोबाईलचा वापर सर्रास :

शाळा–महाविद्यालयात मोबाईलच्या वापराने विद्यार्थ्यांचे नुकसान होते. त्यासाठी शासनाने शैक्षणिक संस्थामध्ये त्याच्या आवारात मोबाईल वापरावर बंदी घातली खरी, पण त्याची अंमलबजावणी मात्र होत नाही. अश्लील एसएमएस आणि थ्रीजी मोबाईलच्या सुविधेने आता अश्लील चित्रीफितीही मोबाईलमध्ये आढळत आहेत. मग लेक्चर्स 'बंग' करुन त्या कॅन्टीनमध्ये या फिल्मस् पाहण्याचे प्रमाण वाढले आहे, तर मुलींना एसएमएस करुन त्रास देण्याचे प्रकारही वाढत आहे. महाविद्यालयात मोबाईल वापरण्यास बंदी बाबत शासनाने परिपत्रकही काढले होते, तरीही त्याचा विद्यालय आणि आवारात सर्रास वापर केला जात आहे. मोबाईलने संपूर्ण वर्गच विचलित होतो. यामुळे अनेकदा विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये वादही होतात. परिणामी संपूर्ण तासिकाच भंग होतात. तरुण–तरुणींसह सर्वांसाठी मोबाईल एक व्यसन झालंय आणि त्याचे मानसिक परिणाम अधिक होत असल्याचे सिध्द झालेले आहे. या प्रकारांसाठी विद्यार्थी–विद्यार्थिनी इतकेच पालकही जबाबदार असल्याचे सर्वच कॉलेजचे प्राचार्य आणि शिक्षक सांगतात.

या प्रकारांना बहुतांशी पाल्यांशी असलेल्या संवादाचा अभाव, पालकांचे पाल्यांवर बारकाईने लक्ष नसणे, पालकांना मुलांकडे लक्ष द्यायला वेळच नसणे, तसेच घरात काय करतात? मित्र कोण ? या बाबतचा निष्काळजीपणा कारणीभूत असल्याचे पहावयास मिळते. या भागातील शाळा कॉलेज मध्ये विद्यार्थ्यांच्या दुर्व्यवहाराचे प्रकार समोर येत आहेत. प्रशालांमध्ये केलेले छेडछाडीचे कोणतेही कृत्य हे रॅगिंगच ठरते. यात मानसिक अथवा शारीरिक छळ, लैंगिक दुर्व्यवहार, शिवीगाळ, असभ्य वर्तणूक तसेच गुन्हेगारी पध्दतीने भयभीत करणे, अथवा अनैतिक निर्बंध लादणे, त्याचप्रमाणे मानवी अस्मितेला आघात पोहोचवणे, आर्थिक शोषण, बळजबरी किंवा बळाचा वापर करणे, अशा प्रकारांचा समावेश आहे. केवळ अशाच प्रकाराचे रॅगिंग किंवा यासह केलेले अन्य गैरव्यवहार देखील रॅगिंगचाच एक भाग आहे. या बाबत पालकांनीच पुढाकार घेवून पाल्यांना समजावणे व त्यांच्याकडे बारीक लक्ष ठेवणे अत्यावश्यक आहे

**अविनाश ल. दुधवडे**
पत्रकार





# औद्योगिकीकरण आणि आर्थिक सुबत्ता

'औदयोगिकरण' हा भारतासारख्या देशामधील ग्रामीण भागातील लोकांना थोडा जड वाटणारा शब्द आहे. 'जड' या अर्थाने की, भारतासारख्या झपाट्याने प्रगती करणाऱ्या देशामध्ये ठराविक राज्ये, शहरे सोडली तर इतर भागामध्ये औद्योगिकीकरणाचा खूप मोठा अभाव दिसून येतो. देशातील कानाकोपऱ्यामधून लाखो लोक आपली उपजिविका भागविण्यासाठी देशातील महत्वाच्या औद्योगिक शहरांमध्ये स्थलांतरीत झालेले आहेत. परिणामी, देशाला भेडसावत असलेल्या प्रमुख समस्या जसे बेरोजगारी, गुन्हेगारी, अन्न समस्या इ. समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावू लागल्या आहेत. देशातील राजकीय नेत्यांनी मात्र या समस्यांचा समाजापुढे तमाशा मांडून आपल्या भाकरी भाजून घेतल्या.

कारखाना पद्धतीच्या मोठ्या व भांडवलप्रधान उदयोगांचा विकास, अशी औद्योगिकीकरणाची स्थुलमानाने व्याख्या करता येईल. इंग्लडमध्ये अठराव्या शतकाच्या मध्यास औद्योगिकीकरणास सुरुवात झाली. तसेच एकोणिसाव्या शतकाच्या सुमारास युरोप व अमेरिका खंडातील बहुतांशी देशांनी औद्योगिकीकरणामध्ये क्रांतिकारक बदल घडवून झपाट्याने प्रगती केली. इंग्लडसारख्या छोट्या राष्ट्राने उदयोग, व्यापार यांच्याद्वारे जगभर राज्य केले. सन १९९१, सालापासून भारताने 'उदारीकरणाचे' धोरण स्वीकारुन खऱ्या अर्थाने औद्योगिक विकासाकडे वाटचाल सुरु केली. मे १९९१ च्या राजीव गांधीच्या हत्येनंतर, जून १९९१ च्या सुमारास पी.व्ही. नरसिंहराव यांच्या सरकारने, त्यावेळेस वर्ल्ड बँक व 'एशियन डेव्हलपमेंट बँक' च्या संचालकपदी असलेले थोर अर्थशास्त्र तज्ञ यांची देशाचे अर्थमंत्री म्हणून घोषित केले. १९९१ च्या नंतर भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये परकीय चलनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. त्यामुळे परकीय कंपन्या भारतामध्ये येऊ घातल्या. मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ व सरकारी धोरणे यांमुळे परकीय कंपन्या मोठ्या प्रमाणात भारतात येऊन, बेरोजगारीचा प्रश्न काही प्रमाणात कमी झाला.

सन २००४ ते २००८ या वर्षांमध्ये भारतासारख्या देशात, संपूर्ण जगात नामंकित असलेल्या, विविध क्षेत्रामधील, बहुराष्ट्रीय कंपन्या भारतामध्ये वसाहत करुन आशिया खंडातील तसेच इतर देशांमधील बाजारपेठांमध्ये कब्जा करु लागल्या. त्यामध्ये सरकारची ठोस पावले, त्यांचा विदेशी आस्थापनांना असलेला पाठिंबा यामुळे भारतासारख्या देशामध्ये सुद्धा लहान–मोठे उदयोजक तयार झाले.

सध्याची जागतिक बाजारात रुपयाची होत असलेली हेळसांड, रिझर्व्ह बँकेचे निगरगट्ट धोरण, परकीय गुंतवणूकीची मंदावलेली गाडी, राजकीय लोकांचा आडमूठेपणा, देशाबाहेर जात असलेला काळा पैसा, निद्रावस्थेत असलेले सध्याचे सरकार, बड्या कंपन्यांकडून कामगार लोकांची होत असलेली पिळवणूक यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले आहे. भीती आहे, ती पून्हा अर्थव्यवस्था भक्कमपणे उभी राहिल का ? सदय परिस्थितीमधून बाहेर पडेल का ? आणि जर ती अस्ताच्या दिशेने अजून काही काळ चालली तर होणारा दुष्परिणाम ? या सर्व प्रश्नांची उत्तरे सध्यातरी अन्नुत्तरीत आहेत.

धनसंपत्तीसाठी आपापसातील तंटे, वाद–विवाद, कंत्राटे घेण्यासाठी असलेली रस्सीखेच आणि त्यातूनच निर्माण

होत असलेली गुंडगिरी, भ्रष्ट्राचार, अत्याचार, नातेसंबंधातील तूट यांसारखे राक्षसी प्रवृत्ती आ–वासून बसल्या आहेत. मनुष्यबळ पुरवठा, माथाडी, ट्रान्सपोर्ट यांसारख्या अल्पसा उदयोग मिळविण्यासाठी नाते संबंधांचे देखील भान उरले नाही. त्यातूनच कंत्राटे देण्यासाठी आस्थापनांतील व्यवस्थापकांना होणारा त्रास यांची सीमा ओलांडली आहे. बहुतांशी परकीय गुंतवणुकदार आपली गुंतवणूक या भागातून कमी करण्याची प्रयत्न करत आहेत. हे चित्र अक्षरश: झोप उडविण्यासारखे आहेत. परंतू प्रशासनाला, राज्यकर्त्यांना, तरुणांना मात्र याचा कितपत गंध आहे हे माहित नाही. सरकारने या बडया कंपन्याच्या प्रगतीसाठी, त्यांच्या व्यवसाय सुकर बनविण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ, विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) यांसारखे नवनवीन उपक्रम हाती घेतले. परंतू स्थानिक भागातील राजकर्त्यांनी आपली पोळी भाजण्याकरिता स्थानिकांना पेटवून देऊन सरकारला हतबल केले. एक चांगल्या प्रकारे स्थानिकांची पाठराखण करुन, त्यांच्या भविष्याचा विचार करुन मध्यस्थी करण्याची गरज वाटते.

औद्योगिकीकरणासाठी व उत्तम उदयोजक घडण्यासाठी चांगल्या शिक्षण व्यवस्थेची गरज आहेत. सध्या शिक्षणाबाबत तरुणांचे विचार भरकटलेले दिसतात. आपल्या माता–पित्यांच्या स्वप्नांची तो पायमल्ली करत आहेत. हजारो विदयार्थी पुणे, मुंबई सारख्या शहरांमध्ये शिक्षण घेण्यासाठी येतात. स्वत:ची ध्येये तर सोडाच पण छोटेसे स्वप्न असलेल्या आई–वडिलांची सुदधा तो पर्वा करत नाही. गर्दीच्या महापूरामध्ये तो वाहून जात आहेत. वाईट विचार आणि आचार यांनी त्याचे मन ग्रासलेले आहे. परिणामी, भारतासारख्या देशात बेरोजगारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढु लागले आहे. याला वेळेतच खिळ बसवली नाही, तर खुप मोठा उद्रेक होण्याचा धोका भारतासमोर आहे.

सध्याची भारताची अर्थव्यवस्थेची असलेली स्थिती व राष्ट्रहितासाठी लागणारी पुंजी म्हणजेच देशातील तरुण, या तरुणांचा राष्ट्रहितासाठी असलेला सहभाग, त्यांचे दायित्व याचा त्यांना विसर पडलेला दिसतो. प्रत्येक राष्ट्राच्या उन्नतीसाठी तरुणांचा असलेला सहभाग, त्यांचे योगदान हेच महत्वाचे असते. देशातील गरिबी, बेकारी, माजलेला, भ्रष्टाचार, राजकीय सत्ता, सरकारचे धोरण या गोष्टींवर बोट ठेवण्यापेक्षा देशातील तरुणांनी पेटून उठून नव्या औदयोगिक क्रांतीची मशाल चेतवून आगेकूच केली पाहिजे. जगात महासत्ता असलेल्या अमेरिका, युरोप खंडातील राष्ट्रांना भारत, चीन यांसारख्या प्रचंड मनुष्यबळ असलेल्या देशांपासून धोका आहे, हे ते सर्वश्रुत आहे. सध्या चीनची होणारी प्रचंड प्रगती हे एक ज्वलंत उदाहरण आहे. नक्कीच, तरुण रक्तांची आणि कुशाग्र बुदि्धमत्ता असलेल्या या भारत भूमीतील, रणसंग्रामांची असणारी अवस्था पाहून मन हळहळ करु लागते.

खेड परिसरातल्या चाकण रांजणगाव सारख्या छोट्याशा गावामध्ये आशियातील सर्वात मोठा असलेला वाहन उदयोग मोठ्या प्रमाणात प्रस्थापित झाला आहे. जनरल मोटर्स, मर्सिडिझ बेन्झ, फोक्सवॅगन, फियाट यासारख्या जगातील नामांकित कंपन्या या लहान लहान गावांमध्ये येऊ घातल्या. या बड्या कंपन्याबरोबर छोट्या–मोठ्या परकीय कंपन्याही या भागामध्ये विस्तारीत झाल्या. स्वप्नातही कोणी या शहराची अशा प्रकारे ओळख होईल असे वाटले नव्हते. अमाप पैसा आणि त्यांची देवाणघेवाण या प्रदेशामधून होत आहे. या प्रदेशातील भूमीपुत्र आर्थिकदृष्ट्या खूप सधन झाले आहेत. परंतू म्हणतात ना, पैसा कमविण्यापेक्षा पैसा टिकविणे खूप कठिण असते, त्यांची वृदि्ध करणे अवघड असते आणि परिणामी धनसंपत्तीमुळे आलेला अंहकार निश्चितच पाताळात नेल्याशिवाय राहत नाही. काही तशीच परिस्थिती या भागामध्ये सध्या दिसून येत आहे.

युवकांनी एकत्रित येऊन देशाची अर्थव्यवस्थेचा कणा असलेली शेतीकडे व्यापारीदृष्टया पाहून, नवीन यंत्रसामुग्री, उदयोगधंदे उभारुन शेतीमध्ये बदल केला पाहिजे. 'कृषिविषयक औद्योगिकीकरणाची' सध्या देशाला खुप मोठी गरज आहे. स्वत:च्या मस्तीसाठी नव्हे तर राष्ट्रहितासाठी उदयोगधंदे उभारले पाहिजे. परकीय गुंतवणुकीसाठी देशामध्ये चालना दिली पाहिजे. सहकारी तत्वावर कृषीविषयक उदयोगधंदे उभारुन मोठ्या प्रमाणात निर्यात केली पाहिजे. स्वत:ची मानसिकता बदलून विदेशी ज्ञान–विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे स्वागत करुन आपली आणि देशाची भाकरी भाजून घेतली पाहिजे. खऱ्या अर्थाने तरुणांचा सहभाग आणि त्यांचे राष्ट्रप्रेम हेच आपली अर्थव्यवस्था मजबूत करु शकते. आपल्या देशाला थोर हौतात्म्यांचा इतिहास आहे. शिवाजी महाराज यासारख्या योदध्याचा इतिहास आपल्याला सर्वश्रुत आहेच. काळाची गरज आहे की छत्रपतींसारखे स्वराज्य तयार करण्याची म्हणजेच औदयोगिकिकरणाची संकल्पना विस्तृत करुन, नविन पिढी उदयोगधंदयामध्ये सहभागी होवून, स्वत:चे उदयोगधंदे उभारुन, रोजगार निर्मिती करण्याची आणि शेवटी राष्ट्रहित जपण्याची !

**प्रा.अविनाश अरगडे**

# ध्येयाच ध्यास व्यक्तिमत्वाचा विकास



१६ते२० वयोगटातील कालखंड म्हणजे जीवनातील वसंत ऋतु. युवकांनी फुलावे, बहरावे, मोहरावे असा हा काळ. जे घडावं असं वाटतं ते घडवून आणण्याचं सामर्थ्य या कालखंडात असतं. परंतु–

जवानी मस्तानी होती है! ये बडी खतरनाक चीज होती है! अकल होती है, होश भी होता है! लेकिन जोश उससे भी जादा! इतना जादा कि वो अकल को मार देता है!

त्याला वळण लावण्याचं काम हे स्वत: युवकांचं व त्याचबरोबर शिक्षकांचं, पालकांचं नि समाजाच आहे.

ध्येयाला उच्चतेचा व उदात्ततेचा नेहमी सुगंध हवा. जो चांगल्या वृक्षाचा आश्रय घेतो त्याला नेहमी चांगली छाया लाभते. लष्करात निवड झालेला माझा एक विद्यार्थी खेड्यातील होता. त्याला राष्ट्रीय सरंक्षण प्रबोधिनीत दीक्षांत समारंभात पाच मिनीटे इंग्रजीत भाषण करावयाचे होते तर त्याची तयारी तो महिनाभर करत होता. यशस्वी व अयशस्वी व्यक्तित फरक पडतो तो नेमका येथेच. व्यक्तिमत्व संपन्न व सफल करण्यासाठी गरज असते ती जिद्दीची, आंतरिक प्रेरणेची व अथक प्रयत्नांची.

सॉक्रेटिसला एका तरुणाने प्रश्न केला,''ज्ञानार्जनाचे रहस्य कशात आहे?'' सॉक्रेटीस म्हणाला, ''चल माझ्याबरोबर.'' सॉक्रेटिसने त्याला एका तलावापाशी नेऊन त्याचे डोके, तो खाली वाकला असता पाण्यात बुडविले सॉक्रेटिसच्या हाताला रेटा देऊन त्याने डोके वर काढले. ''पाण्यात असताना तुला काय वाटले?''सॉक्रेटिसने प्रश्न केला. ''कधी एकदा पाण्याबाहेर डोके वर काढतो म्हणुन जीव व्याकुळ झाला होता.''''ज्ञानासाठी जीव असाच व्याकुळ झाला पाहिजे.''

ऑक्टोबर १९८२ मध्ये न्युयॉर्कच्या मॅरेथॉन शर्यतीत एका पंचवीस वर्षाच्या तरुणीने भाग घेतला होता. कोणी म्हणेल,''त्यात काय विशेष?'' विशेष म्हणजे ती युवती अपंग होती. तरीही तिने कुबड्याचा आधार न घेता नियोजीत ४२ किलोमीटर अंतर पूर्ण केले.पळता पळता ती अनेक वेळा पडली. अपंगत्वामुळे तिचा वेग कमी होता. पण कोणत्याही अडथळ्याची पर्वा न करता ११ तास पळुन तिने आपला संकल्प पूर्ण केला. कार्य सुरु करणे केव्हाही उत्तम पण ते पुर्ण करणे सर्वोत्तम. त्यासाठी अंतरी एक जिद्द व चिकाटी लागते. अलबामा विद्यापीठाचा फुटबॉल खेळाडु चार्ले बोसवेल यांची दुसऱ्या महायुध्दात दृष्टी गेली. परंतु तो हिंमत नाही हरला. राष्ट्रीय गोल्फ स्पर्धेचा तो १७ वेळा चॅम्पियन बनला. त्याचे म्हणणे असावयाचे, ''मी काय गमावले याचा विचार न करता जे मजजवळ आहे त्याचा सतत विचार व विकास करतो.''

पोलिश पियोनोवादक पादरबेस्की याचे संगीत ऐकुन एक रसिक श्रोता उद्गारला, अशा संगीतासाठी मी माझे सारे जीवन समर्पित करीन, विश्वविख्यात पियोनोवादक म्हणाला,''मी नेमके तेच केले आहे.''

ध्येय गाठण्यासाठी एखादा जादुचा दिवा किंवा मंत्र नसतो. त्यासाठी गरज असते खालील साध्या साध्या गोष्टींची. साध्या गोष्टींतूनच पूर्णत्व साधता येते जे कधीच साधे नसते.

**इच्छाशक्ती :–** इच्छाशक्ती एक तरफच आहे. एकदा का ती आपल्या हातात आली की आपल्याला काहीच अशक्य

नसते. इच्छाशक्ती विकास करण्याचा एक मार्ग म्हणजे थोडासा नकार देण्यास शिकणे. प्राचीन चिनी तत्वज्ञ मेन्शियस म्हणतो,''आपणाला काय करायचे नाही ते माणसाने प्रथम निश्चित केले पाहिजे. तरच जे काही करावयाचे आहे त्यावर तो आपली शक्ती केंद्रित करु शकेल.''एक ध्येय निवडले म्हणजे इतर अनेक गोष्टींना नकार द्यावा लागतो.'हो'ला 'नाही' ची किंमत मोजावी लागते. प्रख्यात अमेरिकन गायक गोरिन यांना संगीत शिकत असता सुरवातीला चिरुट ओढण्याची सवय होती. त्यांना त्यांचे गुरू म्हणाले.''तुला महान संगीततज्ञ व्हायचं आहे का प्रसिध्द चिरुटबहाद्दर व्हायचं आहे हे प्रथम ठरवावं लागेल. दोन्ही एकाच वेळेस नाही होता येणार!'' गोरिनने चिरुट ओढणे सोडुन दिले. एका दारुड्याला एक मानसशास्त्रज्ञ म्हणाला,''बाटली पाहीली की हाताची मुठ बंद कर.' त्याने प्रश्न केला का'? मानसशास्त्रज्ञाने प्रतिप्रश्न केला,''जोपर्यंत मूठ बंद असेल तोपर्यंत तू बाटली कशी उचलु शकशील?''ऐकायला उपाय सोपा वाटतो. आचारणातही आणता येईल. पण केव्हा? इच्छाशक्ती दृढ असेल तर.**उत्साह :–** स्टॅन्डर्ड मोटार कंपनीचे व्यवस्थापक श्री.डिक यांनी एकदा आपल्या कंपनीतील तरुण कामगाराला विचारले,''तुझ्या कामात तु नेहमी उत्साही असतो. कारण मला सांगु शकशील?''''साहेब बोलण्याची माफी असावी. एक दिवस तुमच्या या खुर्चीवर बसण्याची महत्वकांक्षा मी बाळगुन आहे.''हा तरुण भविष्यकाळात खराखरच कंपनीचा संचालक बनला.

मदर तैरेसा यांना मोठा अनाथश्रम बांधायचा होता. त्यांच्याजवळ भांडवल होते फक्त तीन शिलिंग. अनेकांनी त्यांना त्यांचा विचार सोडुन देण्याचा सल्ला दिला. त्यावर त्यांनी उत्तर दिले,''तीन शिलगिमध्ये मदर तेरेसा काहीच करु शकत नाही. पण उत्साह, इच्छाशक्ती, आत्मविश्वास व सकारात्मक वृत्ती यांच्या सामर्थावर असे काहीही नाही की, जे मदर तेरेसा करू शकणार नाही.''

इलिनॉयस शहरात एक उत्साही तरुण निवडणुकीसाठी उभा राहिला. त्यात त्याचा दारुण पराभव झाला. नंतर तो उद्योगधंद्यात शिरला. तेथे त्याला अवाढव्य कर्ज झाले. ते फेडण्यासाठी त्याची १७ वर्षे गेली. निवडणूकीसाठी तो परत उभा राहिला. त्याने आपटी खाल्ली. रेव्हेन्यू खात्यात नोकरीसाठी प्रयत्न केला. ती मिळाली नाही. उत्साहाने परत अमेरिकेच्या उपाध्यक्षपदासाठी उभा राहिला. पुन्हा एकदा अपयश आले. पण त्याचा उत्साह अखंड होता. राष्ट्राध्यक्षाच्या पदासाठी त्याने नंतर निवडणूक लढवली. अखेर त्याची जिद्द फळाला आली. तो राष्ट्राध्यक्ष झाला. हा तरुण म्हणजे ख्यातकीर्त अमेरिकन राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन.

**आत्मविश्वास :–** आत्मविश्वास नसेल तर इच्छाशक्ती व उत्साह हे दोन गुण आंधळे ठरतील. तर इच्छाशक्ती व उत्साहावाचून आत्मविश्वास पांगळा ठरेल. ज्याचा आत्मविश्वास संपला त्याचे सारे काही संपले. आत्मविश्वास हा ध्येयनिष्ठेचा हुंकार असतो. यशाचा तो ओंकार असतो. आत्मविश्वास म्हणजे आपला कार्यावरचा विश्वास.

यादवी युध्दात एका वृध्द स्त्रीने अब्राहम लिंकनला विचारले,''बाबा रे! तू एवढा त्या गुलांमांसाठी झटत आहेस पण तुला असे वाटते का ईश्वर तुझ्या बाजुने आहे?'' लिंकनने दिलेले उत्तर प्रत्येकाने आपल्या हृदयावर कोरुन ठेवले आहे. तो म्हणाला

जे कार्य आपण करतो ते आवडीने व श्रध्देने केले पाहिजे.

तीन पाथरवट दगड फोडत होते. तिघांना ''तुम्ही काय करता?''असा प्रश्न स्वतंत्रपणे विचारला असता एकाने दगड फोडतो, दुसऱ्याने पोटापाण्याचा उद्योग करतो तर तिसऱ्याने मंदिरातील मुर्तीघडवितो असे उत्तर दिले. तिसऱ्या माणसाप्रमाणे कामात नेहमी आनंद वाटला पाहिजे.





# शिक्षणपध्दती - कालची आणि आजची

शिक्षणाचा सर्वसामान्य अर्थ म्हणजे शाळेत जाणे ! 'आमचा मुलगा शिकतो आहे' किंवा 'मुलाचे शिक्षण संपले आता त्याला नोकरीला लावून द्यायला हवे' अशा प्रकारची वाक्ये जेव्हा आपण व्यवहारात नेहमी बोलत असतो तेव्हा शिक्षण म्हणजे शाळा - कॉलेजात जाणे हाच अर्थ गृहीत धरलेला असतो. जणू मुलगा शाळेत जाऊ लागण्यापूर्वी काहीही शिकला नव्हता किंवा शाळा-कॉलेजांतून बाहेर पडल्यावर त्याची शिक्षणप्रकिया खंडित होणार आहे असेही नाही. परंतु ज्याप्रमाणे शाळापूर्व जीवनातही भाषा, दैनंदिन व्यवहाराला उपयुक्त अशी कौशल्ये व ज्ञान प्रत्येक मूल आत्मसात करीतच असते त्याप्रमाणे शाळा सोडल्यानंतरही त्याचा शैक्षणिक विकास होतच असतो. ज्या व्यक्तीने शाळेची पायरी कधीच ओलांडली नाही अशा व्यक्तीला फार तर आपण निरक्षर म्हणू शकू, परंतु अशिक्षित, व्यवहारशून्य किंवा मूर्ख म्हणणे योग्य ठरेल काय ? उलट अक्षरशून्य अशा अनेक व्यक्ती शिकलेल्या व्यक्तीपेक्षा पुष्कळदा अधिक व्यवहारी, चतुर व जीवनात अधिक यशस्वी झालेल्या आढळून येतात, हे ही आपण पाहतो. एकूणच शाळा-कॉलेजात जाणे म्हणजेच शिकणे ही शिक्षणासंबंधीची कल्पना किती खोटी व चुकीची कल्पना आहे हे आपणांस सांगावयास नको. शिक्षणाचा अर्थ केवळ साक्षरता असा नाही. स्वत:कडे एकही पदवी नसलेल्या विद्वान व कर्तबगार माणसांची उदाहरणे समाजात काही थोडी नाहीत. रविंद्रनाथ टागोर हे शालेय शिक्षणात पूर्णपणे अपयशी ठरले तरी देखील एक प्रतिभावंत कवी व कलावंत तसेच एक शिक्षणशास्त्रज्ञ म्हणून त्यांच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास आपणांस करावाच लागतो. याप्रमाणेच किर्लोस्कर, अंबानी यासारख्या उद्योगपतींची देखील उदाहरणे आपणांस देता येतील. एकूणच मनुष्य घडणीत बहुमोल वाटा असलेल्या शिक्षणात अथवा त्याच्या पध्दतीबाबत ज्ञानाचा उपहास करण्याचा अथवा ज्ञानी व विद्वान लोकांचा अपमान करण्याचा मुळीच उद्देश नाही. परंतु शिक्षण म्हणजे साक्षरतेबरोबरच उत्पादनक्षमता, नागरिकत्वाची जाणीव, चांगल्या सवयी, सामाजिकता, सुसंस्कार इत्यादी घटकांची व्यक्तीमध्ये झालेली स्थापना होय असे म्हणता येईल. आजच्या शिक्षणपद्धती आणि शिक्षणाचा विचार करता खरंच यावर विचार करण्याची वेळ आली असे म्हणता येईल.

भारतीय संस्कृतीत प्राचीन काळापासून शिक्षणाची परंपरा असलेली दिसून येते. प्राचीन वैदिक कालखंडात शिक्षणाची ध्येये ही आत्मसाक्षात्कार, अध्यात्मिक व धार्मिक प्रवृत्तींचा विकास, ज्ञानार्जन व ज्ञानाचे संक्रमण चारित्र्य संवर्धन, इंद्रिय निग्रह, शरीरसंवर्धन अशी होती. या काळात गुरुकुल पद्धती अस्तित्वात होती. गुरुबरोबर शिष्यालाही आश्रमात रहावे लागायचे. अभ्यासाबरोबरच खाणे-पिणे, वागणूक, शरीरप्रकृती, वेशभूषा, सवयी इत्यादी बाबतीत गुरुंचे मार्गदर्शन मिळायचे व नियंत्रणही असायचे. असे शिक्षण देणारे आश्रम गावांपासून दूर अरण्यांमध्ये निसर्गरम्य अशा ठिकाणी असायचे पाच सहा तास अभ्यास असायचा त्यामुळे गुरुला विद्यार्थ्यांच्या व्यक्तीत्वाच्या इतर अंगांकडे लक्ष देता येत असे त्यामुळे विद्यार्थ्यांचे चारित्र्यसंवर्धन होत असायचे. या काळातील

अभ्यासक्रमात चौदा विद्या व चौसष्ट कला तसेच धर्मशास्त्र, साहित्य, व्याकरण, संगीत, नृत्य, शिल्प, वाद्य इत्यादी आधुनिक काळाला अपरिचित असलेल्या अनेक विद्यांचा समावेश होता. त्याचप्रमाणे भौतिक जीवनाशी संबंधित अशा अर्थशास्त्र, वैद्यकशल्यकर्म, स्थापत्य, दण्डनीती, राजनीती, व्यापारशास्त्र, शस्त्रविद्या, युध्दविद्या, कृषिविज्ञान अशा अनेक अभ्यासक्रमांच्या अध्यापनाची सोय होती. अध्ययन-अध्यापनात लेखनकलेचा शोध नसल्याने पाठांतरावर प्रात्यक्षिकांवर भर होता. निरनिराळ्या सूत्रांचे अर्थ सांगण्यासाठी स्पष्टीकरण तसेच प्रश्नोत्तर व संवादाचाही उपयोग केला जाई. तसेच वादविवाद देखील अनेक विषयांवर होत असत. गुरु-शिष्य संबंधांना अत्यंत महत्त्वाचे स्थान असायचे. ज्ञान व चारित्र्य याबाबतीत गुरु आदर्श व्यक्ती असायची त्यामुळे ज्ञानप्राप्तीच्या क्षेत्रात 'गुरुवाक्यं प्रमाण' मानूनच अभ्यासाला प्रारंभ करावा लागे. विद्यार्थ्यांनी आपले मन, इंद्रिय व बुध्दी यांवर ताबा मिळवून स्थितप्रज्ञ बनण्याचा प्रयत्न करावा असे वैदिक शिक्षणातून सांगण्यात आले. या कालखंडातच पुढे नालंदा, तक्षशीला, वल्लभी यासारखी जागतीक किर्तीची

विद्यापीठे उदयास आली व जगभरातले विद्यार्थी या ठिकाणी विविध विषयांवर अभ्यास करू लागले. जागतिक दर्जाची सर्वज्ञान संपन्न विद्यापीठे प्रथम भारतीय उदयास आली हे याठिकाणी आवर्जून सांगावेसे वाटते. याच शिक्षणपध्दतीचा स्वीकार पुढे रविंद्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे यांनी केला

एकूणच कालच्या शिक्षणपध्दतीचा विचार करता विविध विषयांच्या अभ्यासाबरोबर चारित्र्यसंपन्न असा माणूस घडविणे हा महत्वाचा घटक दिसून येतो व याच शिक्षणातून आरुणी, उपमन्यू व एकलव्यासारखे शिष्य अर्थात विद्यार्थी घडल्याचे दिसून येते. वैदिक व बौध्द कालखंडानंतर जैन शिक्षणपध्दती त्यानंतर धर्मप्रसारासाठी मुस्लिमानी राबविलेली इस्लाम शिक्षणपध्दती या पद्धती फार काळ टिकाव धरू शकल्या नाहीत. यौवनांच्या आक्रमणानंतर धर्मनिष्ठित शिक्षणाला प्रारंभ झाला व त्यातून समाज हवालदिल झाला. याकाळातच संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, समर्थ रामदास यांसारख्या संतांनी सामाजिक ज्ञानासाठी महत्वाची भूमिका बजावली. बराच काळ भारतीय समाज शिक्षणापासून वंचित राहिला. पुढील कालखंडांत इंग्रजांनी भारतीय भूप्रदेश शोधून काढला आणि आपल्या कामासाठी आवश्यक असणारे कारकुनी शिक्षण द्यायला सुरुवाती झाली. आतापर्यंत निसर्गाच्या कुशीत असलेल्या शाळा चार भिंतीत आल्या, विद्यार्थ्याला प्रत्यक्ष ज्ञानाऐवजी कागदी घोड्यांवर विश्वास ठेवायला लावणारे शिक्षण द्यायला सुरुवात झाली आणि त्याचबरोबर आमची सर्वगुणसंपन्न अशी प्राचीन शिक्षणपद्धती संपुष्टात आली. आज शिक्षण पद्धतीत अमूलाग्र बदल झालेला दिसतो. जागतिकीकरणाच्या काळात पूर्वीचे जीवनदायी असणारे शिक्षण केव्हा जेवणदायी झाले हे आपल्याला कळले देखील नाही. औद्योगीकरण, समाजातील बदललेल्या परंपरा याला अनुसरुन विद्यार्थी घडू लागले. ज्ञान-विज्ञानाला मोठ्या प्रमाणात चालना मिळू लागली. सृष्टीच्या निर्मितीचे कोडे उलगडण्याच्या काळात आई आणि मुलातील नाते फक्त जन्मापुरतेच मर्यादित झाले. प्रगतीच्या नावाखाली अनेक कामाचे तास आणि त्याचे शरीरावर होणारे दुष्परिणाम जाणवू लागले. गुरु-शिष्य नात्याचा विसर पडू लागला. कोणे एकेकाळी समाजाच्या मदतीवर चालणाऱ्या शिक्षणसंस्था बंद झाल्या आणि उद्योगांसारख्या शिक्षणाच्या देखील आस्थापना निर्माण होवू लागल्या. गुरुजी हा शब्द लोप पावून त्यातून 'टिचर' हा शब्द कधी विद्यार्थ्यांच्या जीभेवर घोळू लागला हे कळले देखील नाही. करिअरच्या नावाखाली विद्यार्थ्यांची पदव्यांसाठी आणि रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात ससेहोलपट होऊ लागली आणि त्यातूनच चारित्र्यसंवर्धन, ज्ञानसंपन्नता, सुसंस्कार हे गुण कमी झाले असे असले तरी ज्ञान विज्ञानाच्या काळात देखील मानवाने साधलेलेली अमोघ प्रगती ही याच शिक्षणातून निर्माण झाली हे नाकारता येणार नाही.

आमची प्राचीन शिक्षणपद्धती त्याकाळात योग्य आणि श्रेष्ठ असली तरी आधुनिक काळात ती उपयोगी पडू शकेल असे वाटत नाही याचे महत्वाचे कारण म्हणजे आधुनिक विज्ञानाचा त्यात असलेला अभाव, आजची बदललेली जीवनपध्दती व औद्योगीक समाजरचना. प्राचीन अध्ययन-अध्यापन पध्दतीचा जशाच्या तसाच अवलंब करावा असे कोणीही सुज्ञ माणूस म्हणणार नाही, परंतु त्यातील मानसशास्त्रीय व शैक्षणिक सिध्दांतांचा आजही अवलंब करणे आवश्यकच नव्हे तर अपरिहार्य ठरणार आहे.

**प्रा.भोर आर.एम.**



# शुन्यातुन विश्व ... उद्योगाचे

समाज केंद्रस्थानी ठेवून आपण एखादा उद्योग अथवा व्यवसाय सुरु करतो. हे करताना समाजघटकांचा विचार करुन व्यवसाय निवडला व तो प्रामाणिकपणे केला, तर त्यात हमखास यश मिळते. हीच बाब यशोशिखरावर नेते. उद्योगातून समाजाचं भलं होतं, तेव्हा समाज पाठीशी उभा राहतो. उद्योगपती व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब भोसले (कोतवाल) यांचा जीवनप्रवास असाच आहे. त्यांनी वरील गोष्टींचा अवलंब करीत शून्यातून विश्व निर्माण केले आहे.

धडपडीतून अनेक चांगल्या गोष्टी साध्य होतात, याची जाणीव त्यांना लहानपणीच झाली होती. वयाच्या चौथ्या वर्षी वडिलांचे अपघाती निधन झाले. त्यामुळे सर्व कुटुंबाची जबाबदारी आईच्या खांद्यावर येउन पडली. याची जाणीव सर्व भावंडांना झाल्याने बाळासाहेबांची धडपड सुरु झाली. त्यांचे सातवीपर्यंतचे शिक्षण लोणी काळभोर येथे मामांकडे झाले. त्यानंतरच्या शिक्षणासाठी त्यांनी उरुळी कांचन गाठले. वाचनाच्या आवडीतून त्यांनी कथालेखनही केले.

या आवडीतूनच त्यांना ग्रंथालय सुरु करण्याची प्रेरणा मिळाली. अकरावीत असताना त्यांनी ते सुरु केले. सोबत अर्थार्जन व्हावे म्हणून भाड्याने प्रोजेक्टर आणून १०-२० पैसे घेऊन चित्रपट दाखविण्याचा व्यवसायही केला. बारावी होईपर्यंत ही धडपड सुरु होती. अशा स्थितीतही त्यांनी बारावीमध्ये केंद्रात प्रथम क्रमांक मिळविला. अभ्यासात प्रगती होत होती, परंतु परिस्थितीमुळे शिक्षण थांबवून त्यांना आईच्या मदतीसाठी पैसे कमावण्यासाठी धडपड करावी लागली.



सुरुवातीला त्यांनी स्टेशनरीचा व्यवसाय सुरु केला. मुंबईला जाऊन पेन, बॉलपेन, रिफिल्स व इतर शालोपयोगी साहित्य ठोक भावात आणायचे व लोणी काळभोर परिसरातील दुकानदारांना ते किरकोळ भावात विकायचे. यात बऱ्यापैकी पैसे मिळू लागल्यानंतर त्यांनी स्वत:चेच दुकान थाटले. प्रामाणिकपणा व लोकसंग्रहाच्या आवडीमुळे बऱ्यापैकी अर्थार्जन झाले; परंतु त्यात मन न रमल्याने दुकान मामांच्या हवाली करुन पेंटिंगचा व्यवसाय सुरु केला. मैलाचे दगड, रस्त्यावरचे बोर्ड रंगविणे, कार पेंटिंग करणे आदी कामे त्यांनी सुरु केली. याच्या जोडीला फोटो फ्रेमचा व्यवसाय सुरु केला. त्यातूनही पैसे मिळू लागले. त्यांना या कामांचा अनुभव नव्हता; परंतु काही तरी नवीन करण्याच्या प्रेरणेमुळे त्यांच्यापुढे पर्याय येत गेले. त्यांनी कारागिरांचे तंत्र आत्मसात करुन सर्व कामे शिकून घेतली.

प्रत्येकाच्या आयुष्यात टर्निंग पॉईंट येत असतो. नवे काही तरी करण्याची धडपड सुरु होती. यातूनच त्यांना शेती-अवजारांचे विकसित होणारे क्षेत्र गवसले. हाच त्यांचा आयुष्यातील टर्निंग पॉईंट ठरला. शेती करणे सोपे जावे, आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करुन शेतकऱ्यांना जादा नफा कमावता यावा व त्या माध्यमातून शेती समृध्द व्हावी, हा दृष्टिकोन समोर ठेवून बाळासाहेबांनी १९८२ पासून शेती-अवजारे क्षेत्रात प्रवेश केला.

कोल्हापूरला 'पॉप्युलर' नावाची कंपनी नांगराची निर्मिती करीत असे. तेथून अनेक शेतकरी नांगर आणत, परंतु मागणी तसा पुरवठा होत नसल्याने बाळासाहेबांनी पुणे जिल्ह्यासाठी 'पॉप्युलर'ची डीलरशिप मिळविली. त्यात चांगला जम बसल्याने काम पाहून कंपनीने भागीदारीची ऑफर दिली. मार्च १९८५ पासून त्यांनी भागीदारीत व्यवसाय सुरु केला. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही. शेती-अवजारांच्या विक्रीसमवेत त्यांनी अवजारांच्या देखभाल-दुरुस्तीचेही काम चालू केले. त्यामुळे शेतकऱ्यांना विक्रीपश्चात विनाविलंब सेवा मिळू लागली. यामुळे अनेक शेतकरी बाळासाहेबांच्या व्यवसायाशी जोडले गेले. त्यातूनच त्यांना शेतकऱ्यांच्या अडचणींची जाणीव झाली. त्या सोडविण्याच्या प्रयत्नांतून त्यांनी एक-एक करीत अनेक अवजारे उपलब्ध करुन दिली.

'या अवजारांची निर्मिती आपणच का करु नये?' असा विचार पुढे त्यांच्या मनात आला. त्यावर त्यांनी त्वरित अंमलबजावणी करुन 'सूर्या' हे 'ब्रॅंडनेम' घेऊन अवजारांची निर्मिती सुरु केली. १९९२ मध्ये सुरु केलेला हा व्यवसाय आज कोट्यावधी रुपयांच्या घरात पोहोचला आहे. उत्तम गुणवत्तेमुळे शेतकऱ्यांचा अभूतपूर्व प्रतिसाद

# अन् समाजकारणाचेही बाळासाहेब भोसले

उपाध्यक्ष, जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस

त्यांना मिळाला. आज 'सूर्या'ची ट्रेलरपासून पेरणी यंत्रापर्यंत अनेक प्रकारची अवजारे बाजारात दिसतात. त्यांची उपयुक्तता व दर्जा चांगला राखल्याने मागणी वाढत आहे. एवढेच नव्हे तर 'सूर्या ट्रेलरने परदेशी बाजारपेठही काबीज केली आहे. केनिया, श्रीलंका, घाना, झिम्बाब्वेसारख्या देशांत 'सूर्या ट्रेलर' ची निर्यात होत आहे.

बाळासाहेब आयात-निर्यातीच्या क्षेत्रातही कार्यरत आहेत. १९९०-९१ मध्ये त्यांनी याची सुरुवात केली. शेती-अवजारांच्या निर्मिती क्षेत्रात उतरण्यापूर्वी काही इलेक्ट्रॉनिक मशिन्सची आयात करुन ती देशात विकण्याचा व्यवसाय त्यांनी केला. असे असले, तरी शेती हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय आहे. अवजारांच्या निर्मितीसमवेत त्यांनी काही आधुनिक अवजारांची आयातही केली १९९६ मध्ये त्यांनी काही परदेशी ट्रॅक्टर भारतीय बाजारात आणले. ट्रॅक्टरसारखे आधुनिक अवजार हाती लागल्याने शेतीतून जास्तीत जास्त नफा मिळविणे शेतकऱ्यांना सहज शक्य झाले. या व्यवसायाच्या माध्यमातून त्यांनी हजारो शेतकऱ्यांना ट्रॅक्टर उपलब्ध करुन दिले. आता साखर कारखानदारीपुढे ऊसतोडणी कामगारांचा प्रश्न आहे. आपला ऊस वेळेत कारखान्यात जावा, यासाठी कामगारांना जादा रोजगार देऊन तोडणी करावी लागते. शेतकऱ्यांची ही अडचण लक्षात घेऊन त्यांनी 'शुगरकेन हार्वेस्टर' ची आयात केली. हे 'हार्वेस्टर' एका दिवसात पाच एकर उसाची तोडणी करीत असल्याने मोठी सोय झाली आहे. या सर्व कार्याची दखल घेऊन शासनाने त्यांची केंद्रीय खते व रसायन मंत्रालयाच्या 'ॲडव्हायझरी फोरम' च्या सदस्यपदी निवड केली आहे.




शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करता यावा, यासाठी ते स्वखर्चाने काही शेतकऱ्यांचे अभ्यास दौरे आयोजित करतात. त्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना मिळतो. आधुनिक शेतीतंत्राबद्दलची ताजी माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी व्यासपीठ असावे म्हणून त्यांनी एक मासिक सुरु केले असून, अशा अनेक उपक्रमांतून शेतकऱ्यांना समृध्द करण्याचा त्यांचा अविरत प्रयत्न सुरु आहे.

हे सर्व करीत असताना सध्याचे केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांचे शेतकऱ्यांबद्दलचे कार्य व कळवळा पाहून ते प्रभावित झाले. १९९१ मध्ये लक्ष्मी कॉलनी (१५ नंबर) येथे 'सूर्या ॲग्रो' च्या कार्यालयाचे उद्घाटन अजित पवार यांच्या हस्ते झाले. तेव्हापासून त्यांची राजकारणातील वाटचाल चालू झाली. बाळासाहेबांचे काम पाहून त्यांना २००५ मध्ये राष्ट्रवादी औद्योगिक विभागाचे प्रदेश उपाध्यक्षपद देण्यात आले. या माध्यमातून त्यांनी उद्योजकांसमवेत बरोजगार तरुणांचे रोजगाराचे प्रश्न सोडविले. तसेच, शासनाशी निगडित असलेल्या लेबर व इंडस्ट्रीयल अडचणी सोडविल्या.

**समाजघटकांचा विचार करून व्यवसाय निवडला तर तो प्रामाणिकपणे केला.**
**तर त्यात हमखास यश मिळते, हीच बाब यशोशिखरावर नेते.**

२००९ मध्ये त्यांना राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष केले. या वेळी त्यांनी जिल्हाध्यक्ष सुरेश घुले यांच्यासमवेत पुणे जिल्ह्यात पक्षबांधणीसाठी मोलाचे कार्य केले. त्याची दखल घेऊन २०१२ मध्ये त्यांची उपाध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली.

मध्यंतरीच्या काळात आर.टी.ओ. च्या नियमानुसार 'हायड्रोलिक ब्रेक' शिवाय ट्रेरचे 'पासिंग' होत नव्हते. बाळासाहेब स्वत:ट्रेलरची निर्मिती करीत असल्याने या व्यवसायातील अडचणी त्यांना माहिती होत्या त्यांनी सर्व ट्रेलर व्यावसायिकांने संघटन केले व शरद पवार यांच्याशी संपर्क साधून या बाबीचा दिल्लीपर्यंत पाठपुरावा केला. त्यामुळे हा नियम अडीच वर्षापर्यंत शिथिल करण्यात त्यांनी यश मिळविले.

शेतकऱ्यांचे जीवन समृध्द करण्याबरोबरच अनाथांना मदतीचा हात देण्याची गरज ओळखून भविष्यात काही वेगळे करण्याची बाळासाहेबांची मनीषा आहे. त्या दृष्टीने त्यांची तयारी सुरु आहे. समाज केंद्रस्थानी ठेवून जेव्हा आपण एखादा उद्योग अथवा व्यवसाय सुरु करतो, त्यातूनच अशी मोठी कामे होतात. बाळासाहेब भोसलेंच्या जीवनप्रवासातून ठळकपणे अधोरेखित होणारा हा मुद्दा बरेच काही शिकवून जाणारा आहे.

# सेल्फ मेडचा 'प्रताप'
# प्रतापराव खांडेभराड

ध्येय असेल तर मार्ग दिसतो अन् अतिउत्तम करण्याचा ध्यास असेल तर... ? तर मग प्रतापराव खांडेभराड या सेल्फ मेड व्यक्तिमत्वाच्या हातून सामाजिक प्रतिकृती साकारते... भविष्याचा वेध घेत पुढील पीढी घडविण्यासाठी ... आता शैक्षणिक क्षेत्रात आपल्या दूरदृष्टीचा प्रभाव प्रभाविपणे साकारणारे प्रतापराव खांडेभराड यांच्याविषयी थोडसं.,

प्रतापराव खांडेभराडांची मुलाखत घेण्यासाठी आम्ही गेलो खरे; परंतु मुलाखतीचे प्रश्न बाजूला पडले अन् मुक्त संवाद घडून आला. या संवादातून साधेपणा अन् निगर्विष्ठपणा भावला अन् गप्पांचा फड रंगत गेला. 'मी केले' या शब्दाचा उल्लेख एकदाही न येणे म्हणजेच मातीत रुतून ठेवलेले पाय आणि प्रतापरावांचे गळून पडलेले 'मी' पण अधोरेखित झाले. हा साधा माणूस सांगतो, फारशी गरिबी आमच्या कुटुंबाची नव्हती. कुटुंब विभक्त झाल्याने जबाबदारी पडली. शिक्षण मध्येच सोडण्यास ही जबाबदारी कारणीभूत ठरली. एकलकोंडा आणि हट्टी स्वभावाबद्दल सांगताना आईने केलेल्या शिक्षा कशा होत्या हे सांगितले खोटं वागू नये म्हणुन जन्माची अद्दल घडविताना कोलदांडा घालून केलेली शिक्षा अजूनही प्रतापरावांना आठवतेय. अभ्यासात हुशार असलेल्या प्रतापरावांचे शिक्षण मात्र ब्रेक के बाद, ब्रेक के बाद असे झाले तेही अर्धवटच पुस्तकीज्ञानापेक्षा व्यावहारीक व समयसूचकतेचे ज्ञान महत्वपूर्ण ठरते. प्रतापरावांच्या कार्यावरून तसेच म्हणावे लागेल. सकृतदर्शनी आकडू वाटणारे हे व्यक्तिमत्व खरे तर दिलखुलास.... तो शैक्षणिक काळ सांगताना त्यावेळेच्या साध्या पण गंमतीदार किस्स्यांमध्ये ते रमून गेले. कॉलेज वयात प्रा. पांडुरंग होले यांनी कारण नसताना केलेली शिक्षा, नंतर सरांच्याच चेहऱ्यावर दिसलेला अनामिक प्रेमभाव आजही प्रतापरावांना आठवतो.

शाळा-कॉलेजांमधील दिवसात अभ्यासक्रमाच्या पुस्तकांपेक्षा जास्त स्वामी विवेकानंद, जे आर डी टाटा यांच्या संदर्भातील पुस्तके वाचनात आली हा प्रभाव प्रतापरावांवर आजही आहे टेम्पोचालक नंतर चालक ते ख्यातनाम कॉन्ट्रॅक्टर हा प्रवासही खास रंजक होता. जायचं होतं मिलीटरीत पण झालो टेम्पोचालक असे मिश्किलपणे सांगताना ते म्हणतात, आमच्या बरगड्याही मोजता येतील असं आमचं शरीर, मापात आडवाही बसेना आणि उभाही बसेना अशी अवस्था. मग कोण घेणार सैन्यात ? प्रसंगी आईचे व नात्यातील बहिणीचे दागिने विकून टेम्पो घेतला. पण नंतर कॉन्ट्रॅक्टर झालो. कॉन्ट्रॅक्टर हाण्यामागे कोणाचाही आदर्श आपल्यासमोर नसल्याचे प्रतापरावांनी नमूद केले. कष्टाचा संस्कार त्यांच्यावर भागुबाई व वामनराव या त्यांच्या आई-वडिलांनी केला. सरळ विचारांना कष्टाची जोड मिळाली आणि यश त्यांच्यामागे धावू लागले. ट्रक्स, जेसीबी, पोकलँड, रोलर्स एकापाठोपाठ येऊ लागले.

अर्थमुव्हींग कंपनीची स्थापना झाली. पुढे **पी के इन्फ्राप्रोजेक्ट् अँड रिॲलिटी इंडिया प्रा.लि.** ही नवीन कंपनी स्थापन केली. संधीची वाट पाहण्यापेक्षा संधी निर्माण करायची हा प्रतापरावांचा विचार अधिक भावण्यासारखा होता. गुणवत्ता, वेळ प्रामाणिकपणा या त्रिसूत्रीवर आपण काम करीत राहिलो आणि यश मिळत गेल्याचे प्रतापराव सांगतात. पी. के. या टोपणनावाने परिचित असणारे प्रतापरावांचे काम म्हणजे आयएसआय मार्क असणारे काम अशीच खात्री रस्तेबांधणी,

**खेड तालुक्याच्या वैभवात आचाराने, विचाराने संस्कृतीचा वारसा जोपासत, कष्टमय जीवनातून 'साध्या' कडे प्रवास करताना विविध स्तरावरील उज्वल यशस्वितेने व्यावसायातून ही सामाजिक भान जपणार, एक नाव, चाकण कडाचीवाडी येथील उद्योजक प्रतापराव खांडेभराड यांनी केलेल्या कार्याचा ओघवता आलेख मांडण्याचा हा छोटासा प्रयत्न, मातीशी इमान राखून मातीला ही सोन्याचा गंध देण्यासाठी मतीमंद मुलांची शाळा, उच्च शिक्षणाच्या सुविधा देण्यासाठी त्यांनी केलेला प्रयत्न निच्छितच प्रेरणादायी ठरणार आहे.**

बांधकाम आणि अर्थमुव्हींग या क्षेत्रात आहे. यशाच्या शिखरावर असाणारा, या व्यक्तिमत्वातला साधा माणूस प्रचंड हळवा आणि विचारी आहे. त्यामुळेच मतीमंद मुलांची निवासी शाळा त्यांनी सुरु केलीय. एक दुखरी जखम मनाच्या कोपऱ्यात हळूवार भावनेने जपत प्रतापरावांनी ही शाळा सुरु करण्यामागील गुपित उलगडले. हे सांगताना त्या दाटून आलेल्या भावना शब्दबध्द करणे अवघड वाटून गेले. ग्रामीण भागातील मुलांमध्ये सर्व प्रकारच्या योग्यता, पात्रता आणि क्षमता आहेत. पण ती केवळ इंग्रजी भाषेच्या अभावामुळे मागे पडतात. म्हणुन त्यांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या उद्देशाने **पी के इंटरनॅशनल स्कुल** ही इंग्रजी माध्यमाची शाळा देखील सुरु केली.

अभियांत्रिकी, मॅनेजमेंट आणि आर्किटेक्चर अभ्यासक्रम सुरु करुन त्यांनी स्वखर्चाने उभारलेले पी के टेक्निकल कॅपस हे शैक्षणिक संकुल' निश्चित डोळी दिपविणारे आहे. कोणी एकाने म्हटलेय की, कबुतरालादेखील गरुडाचे पंख लावता येतील कदाचित; पण गगनभरारीचे वेड रक्तातच असावे लागते. ही उक्ती प्रतापराव खांडेभराडांना लागू पडते. कोणतीही पार्श्वभूमी नसताना 'सेल्फ मेड' म्हणजेच स्वत: घडलेल्या प्रतापराव खांडेभराड यांचे कार्य अन् विचार जसे कौतुकास्पद आहेत तसेच ते अनुकरणीय आहेत. शैक्षणिक संकुलातून निर्माण होणारा पैसा हा शैक्षणिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी तसेच मुलांना शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबर, नैतिकतेचे अधिष्ठान असणारा, प्रामाणिक माणून बनविण्यासाठीच वापरायचा, पण स्वत:साठी हा पैसा वापरायचा नाही हा त्यांचा कटाक्ष शिक्षण सम्राटांच्या भावगर्दीत आदर्शवत म्हणावा लागेल. साधी राहणी उच्च विचार बोलण्यास सोपे पण आचरणास अवघड ! पण प्रतापराव खांडेभराडांनी स्वत:च्या कृतीतून हे दाखवून दिलेय.

कर्तबगारीचे दुसरे नाव प्रतापराव.... ते पैशाची श्रीमंती मानत नाहीत. आपल्या मुलांचे, नव्या दमाच्या पिढीवरचे संस्कार हेच खरे 'ॲसेट'असल्याचे मानतात. मनमोकळ्या गप्पा राजकारणाकडे वळल्या अन् केंद्रीय कृषीमंत्री शरदराव पवार, अजितदादा पवार यांच्याप्रती असणारी भक्ती बोलण्यातून डोकावली. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पद त्यांच्याकडे असले तरी निवडणुका लढवाव्या, नेता म्हणुन मिरवावं हे त्यांच्या स्व:भावात नाही ! असा माणूस साधा, सरळ नि:गर्वी अन् कर्तबगार नव्हे काय ! त्यांच्या कर्तृत्वाचा प्रताप आज जिल्ह्यात दिसतोय... **होय, सेल्फ मेडचा प्रताप ! प्रतापराव खांडेभराड ...**

प्रतापराव खांडेभराड यांनी शैक्षणीक गुणवत्ताधारक गुवा पिढी निर्माण करण्यासाठी **पी के फाऊंडेशन**च्या माध्यमातून उभे केलेले हे वैभव आज दैदिप्यमान स्वरुपात पहायला मिळत आहे. जेथे जावून पाहिल पी, आपल्या तालुक्यात मोठी माणसं कसं मोठं काम उभं करुन ठेवतात ते अनुभवायला मिळेल.



मा.शिवाजी आतकरी
पत्रकार ........................

# वाचा आणि पेटून उठा

अमिताभ बच्चन

कोलकत्तामधील एका कंपनीत नोकरीला होता आणि आज तो हिंदी चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार आहे.

---

लोकमान्य टिळक

जेव्हा लोकमान्य टिळकांना मंडाले येथील तुरुगांत बंदिवासी केले होते, तेव्हा त्या प्रदीर्घ एकांतवासात त्यांना सोबत दिली ती फक्त पुस्तकांनीच. ह्या व्यक्तीने एक-एक पैसा जमा करुन पुण्यातील तळेगांव येथे ब्रिटीश राज्य असताना पैसा फंड काच कारखान्याची स्थापना केली

---

रजनीकांत

एक बस कंडक्टर होता आणि आज हेच व्यक्तीमत्व दक्षिणेतील चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार म्हणून प्रसिध्द आहे.

---

विव्हीयन रिचर्डस्

हा एक साधा मोटार मॅकेनिक होता. पुढे तो वेस्ट इंडिजचा एका दर्जेदार क्रिकेटपटू म्हणून नावारुपाला आला.

---

अब्राहम लिंकन

हा एक पोस्टमॅन होता. अनेक वर्षाच्या अपयशी प्रयत्नानंतर ते अमेरिकेचे सोळावे राष्ट्राध्यक्ष झाले.

---

नील आर्मस्ट्रॉंग

एका औषधाच्या दुकानात नोकरीला असलेल्या ह्या व्यक्तीने चंद्रावर पहिले पाऊल ठेवले.

---

धीरुभाई अंबानी

ह्यांनी तीनशे रुपये पगारावर पेट्रोलपंपावर नोकरी केली आणि पुढे त्यांनी स्वतःची पेट्रोलियमची खाण खणून आज अब्जाधीश झाले.

---

डॉ.अब्दुल कलाम

नावाड्याच्या घरात जन्मलेल्या ह्या व्यक्तीने पहिला पगार अडीचशे रुपये कमवला आणि एक शास्त्रज्ञ म्हणून नावारुपाला येऊन भारताचे राष्ट्रपतीपद भुषवले.

---

स्मिता पाटील

ही टीव्हीवर वृत्तनिवेदिका होती. पुढे ती प्रसिध्द अभिनेत्री होऊन तिने अनेक दर्जेदार पुरस्कार मिळावले.

# वाचा आणि पेटून उठा

### दिलीपकुमार

हा एक रस्त्यावरील फळ विक्रेता होता, ज्यांनी अभिनयाच्या जोरावर लोकांची मने जिंकुन सुप्रसिध्द अभिनेता म्हणून नाव कमवले.

---

### यशवंतराव चव्हाण

साताऱ्यातील कराड ह्या खेडेगावाचे एका सुसज्ज शहरात रुपांतर करण्यात यशवंतरावांचा सिंहाचा वाटा आहे. आपल्या राजकीय जीवनामध्ये एक उत्तम वक्ता आणि विचारवंत म्हणून त्यांनी नावलौकीक मिळवला. आजही त्यांनी गोळा केलेली सात हजाराहून जास्त पुस्तके वेणूताई चव्हाण ग्रंथालयात वाचकांसाठी उपलब्ध आहेत.

---

### राईट बंधु

हे दोन भाऊ सायकलच्या दुरुस्तीचे दुकान चालवत होते, ज्यांनी पुढे विमानाचा शोध लावला.

---

### शेक्सपिअर

ही व्यक्ती कसाईखान्यात कामाला होती. नाट्यगृहाच्या आवारात रात्रीच्या वेळी घोडीगाडी सांभाळत असतानाच त्यांच्यातील नाटककार उदयाला आला.

---

### सुशिलकुमार शिंदे

हे दहावीच्या परीक्षेत तीनदा नापास झाले. सोलापूरच्या कोर्टात पट्टेवाला म्हणून त्यांनी काम केले. पुढे ते महाराष्ट्राचे अर्थमंत्री, मुख्यमंत्री झाले आणि आता ते भारताचे ऊर्जामंत्री म्हणून कारभार सांभाळत आहेत.

---

### करसनभाई पटेल

हा एक शेतकऱ्याचा मुलगा. वयाच्या पंचविसाव्या वर्षी ते गुजराथ सरकारची नोकरी करत होते. धुलाईच्या साबणाच्या लघुउद्योगाने सुरुवात करुन आज ते भारतातील एक यशस्वी उद्योजक म्हणून ओळखले जातात.

---

### पं.जवाहरलाल नेहरु

यांना वाचनाची आणि लेखनाची खूप आवड होती, वाचनाच्या जोरावर स्वातंत्र्यपूर्व काळात तुरुंगात असताना त्यांनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' ह्या पुस्तकाचे लेखन केले आणि स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान झाले.

---

### नरेश गोयल

वाणिज्य शाखेची पदवी मिळवून ह्यांनी ट्रॅव्हल एजंटची नोकरी स्विकारली. आज ते जेट एअरवेज ह्या राष्ट्रीय विमानसेवेचे मालक आहेत.



# कुलगुरुंचे गुरु
# कर्मवीर भाऊराव पाटील

आपल्या पंखाखाली रानपाखरांना घेऊन, त्यांच्यात आकाशाचे भव्यत्व आणि सूर्याचे तेजस्व पेरणारे व्यक्तीमत्व म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील. महापुरुषांची चरित्रमालिका म्हणजे इतिहास असतो. अशा इतिहासाचे स्मरण हे चैतन्याचे स्फुरण असते. उजाड माळरानाची रुपांतरे संपन्न ज्ञानमंदिरात करणारे कर्मवीर अण्णा हे एक ध्यासपर्व आहे. इतिहासाला लाभलेले ते स्फूर्तिस्थान आहे

कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज हे कर्मवीरांचे प्रेरणास्थान होते. अज्ञानाच्या गर्तेत पिचत पडलेल्या समाजात अण्णा जन्माला आले. शेवटच्या श्वासापर्यंत अज्ञानाच्या अंधाराशी निर्धाराने लढत राहीले. आपल्या अलौकीक कर्तृत्वातून त्यांनी महाराष्ट्राच्या मातीवर रयत शिक्षण संस्थेच्या रुपाने ज्ञानाचे नवे तीर्थ निर्माण केले. संस्थेसाठी वटवृक्ष हे बोधचिन्ह घेऊन समाजाला सावली दिली. तरुणाईला स्वावलंबी शिक्षणाचा मंत्र दिला.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म २२ सप्टेंबर १८८७ या दिवशी वारणेच्या परिसरातील कुंभोजे या गावी झाला.भाऊरावांचे वडील पायगोंडा त्यांचे वडील देवगोंडा. अत्यंत तत्व निष्ठ, ध्येयनिष्ठ असे हे जैन कुटुंब, परंतु निरक्षरतेच्या शापामूळे मागे पडले कर्मवीर अण्णांचे वडील पायगोंडा पाटील चतुर्थ जैन समाजातील सातवीची परीक्षा उत्तीर्ण होणार पहिला विद्यार्थी म्हणून त्यांचे कौतुक झाले आपल्या कुटुंबावरील निरक्षरतेचा डाग त्यांना पुसून टाकला. महसूल खात्यात रोड कारकून म्हणून त्यांनी आपल्या नोकरीचा श्री गणेशा केला. पायाला चाक आणि पाठीवर बिऱ्हाड असे त्यांच्या प्रपंचाचे स्वरुप होते. कर्मवीरांचे वडील हे अतिशय करारी होते त्यामूळे मामलेदारांनी केलेला अपमान सहन न झाल्यामूळे नोकरीचा राजीनामा दिला. हाच करारीपणा कर्मवीरांच्यामध्ये ही उतरला

भाऊराव पाटील यांचे प्राथमिक शिक्षण वडील विटयाला असताना झाले. मराठी चौथी आणि इंग्रजी पहिली या दोन इयत्ता ते विट्याच्या शाळेतून उत्तीर्ण झाले पुढील शिक्षणासाठी ते कोल्हापूरच्या जैन वसतीगृहात दाखल झाले. अंगात सुती गुंड्यांची जाडीभरडी बंडी, डोक्याला कानटोपी आणि कमरेला लंगोटी असे हे ध्यान पाहून 'प्रायव्हेट हायस्कूल मधली मुले खळखळून हसली सुरवातीला प्रायव्हेट हायस्कूल, मग राजाराम हायस्कूल असे शालांतर करीत ते सहावीपर्यंत सायासाने पोहचले. काही मुले अशी असतात की त्यांचे लक्ष जीवनावर असते पण पुस्तकावर नसते कर्मवीर त्या वयात तसेच होते. कर्मवीरांचे ग्रामीण भाबडेपण लोप पावले आणि वारणेकाठचे रांगडेपणा त्यांच्या अंगी प्रकट झाले. ते कुस्ती, मल्लखांब आणि पोहणे या जीवकलेच्या उपासनेत दंग झाले कोल्हापूरच्या मुलखातील मर्दांचे दैवत आणि नामर्दांचा कर्दनकाळ अशी ख्याती असणारे छत्रपती शाहू महाराज हे त्यांचे हिरो झाले. जैन वसतीगृहातील सोवळे कर्मवीरांना मानविले नाही. त्यामूळे लवकरच वसतीगृह सोडावे लागले व ते छत्रपतींच्या आश्रयाने वाड्यावर राहू लागले.

इतिहासाला वेडीवाकडी वळणे आवडतात. पुढे शिक्षण महर्षी म्हणून मान्यता पावलेले कर्मवीर इंग्लिश सहावी परिक्षा नापास होऊन पास होण्याच्या सर्व संभाव्यता संपल्यामूळे कोल्हापूर शहराचा आणि छत्रपतींचा निरोप घेऊन चालते झाले. मुंबईचे रत्नपारखी शेठ माणिकचंद पानाचंद यांनी कर्मवीरांना व्यावसायिक दीक्षा देण्यासाठी मुंबईला नेले. रत्नांचे प्रकार, आकार, लावण्य, कांती यांचे ज्ञान भाऊरावांना देण्यास शेठजींनी प्रारंभ केला. परंतु भाऊरावांना पेटीतील रत्नांचे आकर्षण नव्हते. त्यांना हवी होती नररत्ने, समाजभर विखुरलेली हरिजन वस्तीत हरवलेली शेतमळ्यात विस्कटलेली, दूरवर पसरलेली नररत्ने भाऊरावांच्या

नजरेसमोर तरळत राहीली आणि हा रत्नपारखी मुंबईतून बाहेर पडला तो या नररत्नांच्या शोधार्थ

१९१२ मध्ये ते विवाहबद्ध झाले मागे संसार लागला. एकाच वेळी स्वत:चा आणि समाजाचा संसार सुकरतेने करता येत नाही. एका अपरिचित युवतीचे सामर्थ्यवान सहचारिणीत रुपांतर होण्यास वेळ लागला. भाऊराव पायगोंडा पाटील यांचे कर्मवीर अण्णा यांच्यात रुपांतर होण्यास एक छोटासा प्रसंग कारणीभूत ठरला. भाऊरावांचे वडील कोरेगाव येथे राहत होते. एकदा पाहुणे आले. पाहुण्यांच्या समवेत भाऊराव व त्यांचे वडील जेवण करत होते. संध्याकाळची वेळ होती लक्ष्मीबाई जेवण वाढत होत्या. पाहुण्यांनी सहज प्रश्न केला आपले भाऊराव काय करतात ? वडील रागानेच म्हणाले, 'काय करतो' ? लडदू दोन वेळा खातो आणि भटकतो' या खवचट उपरोधीक बोलण्याने लक्ष्मीबाईंचे मन पूर्णत: हेलावून गेले. त्यांच्या डोळ्यात अश्रू उभे राहीले ते अश्रू भाऊरावांच्या ताटात पडले. भाऊरावांनाही वडीलांचे शब्द चांगले झोंबले.

पत्नीचे अश्रु पाहून त्यांना अतीव दु:ख झाले त्याचक्षणी त्यांनी हातातील घास ताटात ठेवला हात धुतला आणि सरळ साताराचा रस्ता धरला. रात्री बारा वाजता ते सातारला पोहोचले सातारच्या जुना मोटार स्टॅंडवर संपूर्ण रात्र थंडीने कुडकुडत काढली दुसऱ्या दिवशी शिकवणीला सुरुवात केली.



अल्पवधीतच ते पाटील मास्तर' या नावाने प्रसिध्द झाले अधिकाऱ्यांना अधिकार वाणीने शिकविणारे एक अधिकारी अध्यापक असा त्यांचा नाव लौकीक झाला. चार पैसे मिळू लागले पत्नीला घरकुल मिळाले. आता मानवकुलाचा विचार करायला कर्मवीर मोकळे झाले. पण कधी कधी दुर्दैव या नावाची गोष्ट माणसाच्या वाट्याला येते. कोल्हापूरात डांबर प्रकरण या नावाने गाजलेले एक गंडातर कर्मवीरांवर गुदरले.

त्यांना अटक झाली. डांबर प्रकरणाने काळवंडलेले जीवन त्यांना असहय झाले छत्रपती शाहू महाराजांच्या कृपेमूळे लवकरच कर्मवीर या वेदनांच्या खाईतून बाहेर पडले अन पुन्हा उद्योगाला लागले त्यांनी ओगले यांच्या काच कारखान्यात काही काळ काम केले त्यानंतर किर्लोस्करांच्या कंपनीत ते रुजू झाले. परंतू त्यांच्या मूळ उद्देशापासून ते दूर जाऊ इच्छित नव्हते त्यामूळे भरपूर द्रव्यलाभ घडविणारी ही नोकरी त्यांनी सोडली आणि विजयादशमीच्या मुहुर्तावर दि. ४ ऑक्टोबर १९१९ या दिवशी काले येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली नंतर १९२४ मध्ये ही संस्था सातारा येथे स्थलांतरीत करण्यात आली. जागेच्या अडचणीस्तव साताऱ्यातील सोमवार पेठेतील आपल्या घरातच संस्थेचे कार्यालय केले.

वसतीगृहाची स्थापना हेच सुरवातीचे उद्दिष्ट होते. वसतीगृहाचे नामकरण १९२७ मध्ये महात्मा गांधी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या वसतीगृहात सर्व जातीधर्माचे विद्यार्थी एकत्र राहत होते, एका चुलीवर

स्वयंपाक, एका पंगतीला भोजन एका आढ्याखाली विश्रांती असे या वसती गृहाचे स्वरुप होते. स्वावलंबी शिक्षण हे सर्वांचे समान ब्रीद होते. या वसतीगृहात महात्मा गांधी आले तेव्हा त्यांनी विचारणा केली'' हे छत्रपती शाहू बोर्डिंग याला आपण ज्याचे नाव दिले त्या राजपुरुषाने आपणास किती देणगी दिली ?'' यावर कर्मवीर उत्तरले ''महाराजांनी मला फक्त अंतकरण दिले. आभाळाऐवढे महाराजांचे मन हीच आमच्या वाट्याला आलेली देणगी.

साताऱ्याच्या राजघराण्याची एक बाग होती. तिला 'धनिणीची बाग' म्हणत. राजकुटुंबातील स्त्रियांना मोकळेपणाने फिरता यावे यासाठी राखून ठेवलेली ती जागा होती कर्मवीरांनी संस्थेसाठी भाड्याने ती मागितली. राजपरिवाराने आनंदाने ती दिली दहा एकर जमीन, दोन विहीरी एक नारळीबाग अनेक आम्रवृक्ष एक मोठी इमारत आणि एक डेरेदार वटवृक्ष अशी ही दौलत तीस फुट घेर असणारा तीनशे वर्षांचा हा वडीलधारा वृक्ष कर्मवीरांच्या रयत शिक्षण संस्थेचे 'बोधचिन्ह' म्हणून मान्यता पावला. वसतीगृहात येणारी मुले कर्मवीर स्वतः शोधून आणीत. महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठांचे कुलगुरु कर्मवीरांच्या वसतीगृहाचे विद्यार्थी होते. बॅ. पी. जी. पाटील, शंकरराव खरात फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. शिवाजीराव भोसले हे सर्व कर्मवीरांच्या झोपडीत राहणारे तेव्हाचे छात्र होते. कर्मवीर हे कुलगुरुंचे गुरु होते.

लहानलहान वसतिगृहांच्या रुपात प्रकट झालेली ही कर्मवीरधारा कालांतराने शतमुखाने वाहु लागली खेड्यापाड्यांना साक्षरता प्रसारासाठी प्राथमिक शाळा काढल्या. शाळेसाठी प्रशिक्षित अध्यापक भेटावेत म्हणून ट्रेनिंग कॉलेजेस काढली. उच्च शिक्षणाचा प्रवाह मुंबई-पुणे सांगली कोल्हापूर या नगरांजवळ अडला होता त्याची वाट मोकळी करुन सातारा कऱ्हाड पंढरपूर अशा मोठ्या गावात महाविद्यालये काढली साताऱ्याचा अजिंक्यतारा हा एक इतिहास प्रसिध्द किल्ला आहे. स्वातंत्र्याचे निशाण आपल्या अंगावर डौलाने मिरविणारा हा किल्ला शहराची शान आहे परंतु कर्मवीर नावाच्या सेनापतीने अज्ञान अविद्या जातीयता याविरुध्द पुकारलेले युध्द दिलेला लढा ज्यामुळे यशस्वी झाला असे अनेक नरदुर्ग कर्मवीरांनी महाराष्ट्रात उभे केले आहेत. माणसे घडली तर इतिहास घडतो. माणसे अडली तर इतिहास अडतो कर्मवीर हे कर्तेपणाच्या वाटेने जाणारे स्वाभिमानाची व स्वावलंबनाची एक नविन लिपी तयार करणारे युगपुरुष झाले. रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार असे अनेक आजार अंगावर वागविणारा आणि समाजाच्या आरोग्याची अहोरात्र विवंचना करणारा हा महापुरुष दि ९ मे १९५९ या दिवशी सर्वत्र शिवजयंतीचे वातावरण असताना शिवछत्रपतींना संस्थेचा अहवाल देण्यासाठी निघून गेला कर्मवीर गेले ? त्यांनी महाराष्ट्राला काय दिले ? ती रयत शिक्षण संस्था ! तिची अनेक विद्यालये महाविद्यालये, वसतीगृह त्यांनी दलितांना अस्मिता दिली. गरीबांना ब्रीद दिले महाराष्ट्राला स्वप्न दिले. !!





# आनंदवनातील आनंदयात्री
# बाबा आमटे

पिढी घडविण्याचे सामर्थ्य दोन महत्वाच्या गोष्टींवर अवलंबून आहेत. एक म्हणजे त्यांच्यावर केलेले संस्कार आणि दुसरे त्याच्यासमोर असणारे आदर्श.

संस्कार करण्याची जबाबदारी मुख्यत: पालक आणि शिक्षक यांच्यावरच आहे. तसेच आपल्यासमोर आदर्श असायला हवेत ते साने गुरुजी, विनोबा भावे, बाबा आमटे, जे. कृष्णमूर्ती, मदर तेरेसा यांसारखे ज्यांनी सर्वसामान्य जनतेत जाऊन काम केले, तेच मोठे झाले. आनंदवनाची सुरुवात करताना विनोबा भावे बाबांना म्हणाले, ''समाजाच्या कामासाठी तू जगाकडे पाठ फिरविलीस, एक दिवस यासाठीच सगळे जग तुझ्या पाठीशी उभे राहिल.'' आणि आज या वाक्याची प्रचिती आपल्याला येत आहे.

एकदा एका सत्कार समारंभाच्यावेळी बाबा आमटे यांचा आदर्श समाजसेवक आणि धीरुभाई अंबानी यांचा प्रसिध्द उदयोगपती म्हणून सत्कार होणार होता. त्यावेळी ही दोन्ही दिग्गज व्यक्तिमत्व एकमेकांशी हितगुज करत होती. गप्पा मारताना धिरुभाई बाबांना म्हणाले, ''तुम्ही सामाजिक कार्यात स्वत:ला वाहून घेतले, प्रचंड कष्ट घेतले आणि आज तुम्ही एक यशस्वी, आदर्श समाजसेवक आहात. तसेच मी ही उदयोग क्षेत्रात प्रचंड कष्ट करुन यश मिळवले आहे आणि मी ही यशस्वी उदयोगपती आहे. आपल्या दोघांचा एकाच व्यासपीठावर सत्कार होतो की किती मोठी गोष्ट आहे, '' बाबा म्हणाले, ''आपले यश हे पुढच्या पिढीच्या हातात. आहे. मी यशस्वी केव्हा होईन? की जेव्हा माझी पुढली पिढी मी करत असलेले कार्य पुढे चालू ठेवील. व ते वाढवेल. परंतु आपल्या दोघांच्या नंतर (मृत्यूनंतर) एक गोष्ट होईल आणि ती म्हणजे मी गेल्यानंतर माझ्या मुलांमध्ये सेवेवरुन कामाचे विभाजन होईल तर तुम्ही गेल्यानंतर तुमच्या मुलांमध्ये संपत्तीवरुन भांडणे होतील''. आज त्या दोघांच्या पश्चात त्या दोघांमधील संवाद आणि त्यातील बाबाचे विचार फार मोठा अर्थ सांगून जातात. ज्यांनी आपल्या आचार, विचारातून समाजासमोर आदर्श निर्माण केले त्यांचा विसर पडणे हेच सामाजिक, वैचारिक, नैतिक अधोगतीचे लक्षण आहे.

बाबा आमटे ही एक विभूती होती. उपेक्षीत अशा कुष्टपिडीतांच्या जीवनात जगण्याची नवी प्रेरणा निर्माण करुन एक वेगळा आदर्श त्यांनी तरुणांपुढे आणि समाजापुढे ठेवला. उज्वल भारताच्या नवनिर्मितीसाठी आवाहन करणारे बाबांचे जीवन कार्य भारतीय तरुणांना दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरणारे आहे.

एका श्रीमंत जमीनदार घराण्यात २६ डिसेंबर १९१४ रोजी मुरलीधर देवीदास आमटे उर्फ बाबांचा जन्म झाला. ऐश्वर्यात जन्मलेल्या बाबांचे बालपण अतिशय लाडात गेले. जन्मत:च कुशाग्र व चिकित्सक बुध्दी लाभलेल्या बाबांच्या आयुष्यात रविंद्रनाथ टागोरांच्या 'गितांजली' या पुस्तकाने अमुलाग्र बदल घडविला. त्यामुळे त्यांच्या ह्रदयात दीनदुबळ्या मानवाबद्दल अपार करुणा व प्रेम निर्माण झाले. बाबांनी शालेय शिक्षण वरोडा येथे तर महाविद्यालयीन शिक्षण नागपूर येथे घेतले. शाळा कॉलेजातील अभ्यास ते नियमितपणे करीत असत. अभ्यासाबरोबरच चौफेर अवांतर वाचन व त्याचे मनन सतत चालू असे. नियमित व्यायाम करुन बाबांनी आपले शरीर पिळदार बनविले. कॉलेजच्या काळात त्यांनी कुस्त्यांचे फडही गाजविले ते M.A. LLB होते. शिक्षण पूर्ण करताना त्यांच्यावर प्रभाव पडला तो महात्मा गांधी व विनोबा भावे यांच्या विचारांचा वकीलीसाठी वरोड्यात आलेला, समाज कार्याचे वेड लागलेला हा तरुण भंगीकाम, सूतकताई, सार्वजनिक रस्ते झाडणे अशी कामे

करु लागला. हे पाहून गावातील मुले त्यांना वेडा वकील म्हणून चिडवू लागली. पुढे त्यांच्या कार्याची आवड व जाणीव लक्षात घेऊन तीच मुले त्यांच्या कार्यात सहभागी होऊ लागली. त्यांच्या सहकार्याच्या गुणामुळे ते लोकप्रिय झाले व नगरपरिषदेवर निवडून आले, व उपाध्यक्ष झाले. पण त्यांची कार्य करण्याची पध्दत निराळी होती. ते कर्मचाऱ्यांमध्ये मिसळून काम करीत. त्यांच्या समस्या जाणून घेत, त्यांच्या दु:खात सहभागी होत. सामाजिक कार्यात पावित्र्य व मांगल्य पाहणारा हा वकील सर्वांना अवलिया वाटला. त्यांचे बोलणे साधे पण अर्थपूर्ण असे. त्यांच्या प्रत्येक वाक्याला आचरणाचा भक्कम आधार असल्याने त्यांचा प्रत्येक शब्द ऐकणाऱ्याच्या आत्म्याला जाऊन भिडे.

सामाजिक कार्यासाठी अस्वस्थ असणे हा त्यांचा स्वभावधर्म होता. काम करताना शिखर गाठायचे हा त्यांचा हव्यास असे. शिखर गाठल्यानंतर तेथे थांबायचे नाही आणि नवी शिखरे धुंडाळायची, हे त्यांचे ब्रीद होते. कारण शिखरावर थांबणे म्हणजे पतनास प्रारंभ असे ते म्हणत. गांधी–विनोबा यांच्या विचारांच्या प्रभावातून त्यांनी 'श्रमाश्रमाचा' एक अभिनव पण लोकविलक्षण प्रयोग केला. या आश्रमात सामाजिक आणि धार्मिक विषमता नष्ट करण्यासाठी भंग्यापासून वकिलापर्यंत सर्वांचा समावेश होता, सर्वांनी परिश्रम करावे, श्रमाने शुध्दी व श्रमातून निर्मिती ही जीवनदृष्टी बाबांनी या प्रयोगातून दिली. परिश्रमाच्या परीसाने मातीचे सोने करण्याची किमया बाबांनी शिकविली. श्रमाधारित सामूहिक जीवनाचा प्रयोग चालू असतानाच बाबांच्या जीवनात एक क्रांतीकारी क्षण आला, आणि बाबांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. बाबा उपनगराध्यक्ष असताना वरोड्यातील भंग्यांनी संप पुकारला संप मिटविण्यासाठी बाबांनी स्वत: प्रयत्न केले. परंतु त्यांच्या अवास्तव मागण्यांमुळे तो संप सुरुच राहिला. तेव्हा बाबांनी स्वत: मैल्याची पाटी वाहून न्यायला सुरुवात केली. ऐके दिवशी पाटी नेत असताना पावसात रस्त्याच्या कडेला एक तुळशीराम नावाचा महारोगी बाबांच्या नजरेस पडला. त्याच्या डोक्यात अळ्या पडल्या होत्या. त्याला पाहताच बाबा दचकले, पण लगेच सावरलेही या प्रसंगाला उद्देशून बाबा म्हणतात, ''गुंडांचे वार झेलताना आणि झेपावणाऱ्या वाघावर गोळी घालताना न आलेल्या माणसातल्या भितीचा काटेरी अनुभव मी त्या क्षणी घेतला. माझ्यातील घृणेने मी स्वत:वरच चिडलो आणि त्या भितीनेच मी अवाक झालो. त्या कुष्ठपिडीताच्या वाहत्या शरीरावर कोसळणाऱ्या पावसापासून संरक्षण देण्यासाठी ज्या क्षणी एक तरट मी झाकले त्या क्षणापासून माझी खरी 'अभयसाधना' सुरु झाली.

सर्वसामान्य माणसाचे मन अशा प्रसंगाने हेलावते व तो चार हात लांब होत पैसे टाकून आपले कर्तव्य संपले असे मानून पुढे सटकतो. बाबा मात्र त्या महारोग्याला रस्त्यावर सोडून पुढे गेले नाहीत. त्यांच्यासमोर एकदम विचार आला, ''याच्या जागी माझी प्रिय पत्नी अथवा मुलगा असता तर मी असाच त्यांना टाकून निघून गेलो असतो का ? देवाची कृपादृष्टी माझ्यावर नसती तर कदाचित त्याच्या जागी मी ही दिसलो असतो.'' सर्वभूती आत्माराम पहाणाऱ्या बाबांनी जॉन बन्यानचे उद्‌गार जणू आत्मसात केले – But for the sake of god there go.

बाबांच्या जीवनातला हा क्षण क्रांतीकारी ठरला. त्यानंतर बाबांनी आपले तत्कालीन सर्व सामाजिक कार्य सोडून सारे जीवन महारोग्यांच्या सेवेला वाहून घेण्याचे ठरविले. त्याबद्दल करुणा बाळगून व दु:खाने केवळ निश्वास सोडून त्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. तर त्यांचे शरीर महारोगातून मुक्त करुन त्यांना स्वाभिमानाने व पुरुषार्थाने जीवन कसे जगता येईल ? हा विचार बाबांनी केला व त्या दृष्टीने महारोगाचा शास्त्रशुध्द अभ्यास केला व या कार्याला त्यांनी वाहून घेतले.

बाबांनी या कार्यासाठी जी चळवळ उभी केली, त्यात त्यांच्या आत्मविश्वासाचे व कर्तृत्वाचे प्रचंड अधिष्ठान होते. त्यांनी निर्माण केलेल्या चळवळीतून आनंदवन निर्माण झाले. अनेक चांगल्या कल्पना आजही तेथे साकारत आहेत.

समर्थांनी म्हटलेच आहे –

**सामर्थ्य आहे चळवळीचे ।**
**जो जे करील तयाचे ।**
**परंतु तेथे भगवंताचे ।**
**अधिष्ठान पाहिजे ।।**

बाबांच्या समर्थ व व्यापक दृष्टीमुळे आनंदवनातील कार्य झपाट्याने वाढत गेले. त्यातून अनेक सेवाभावी संस्था व कार्यकर्ते निर्माण

झाले. आनंदवनाचे नंदनवनात रुपांतर झाले. या वटवृक्षाकडे पाहिले की वाटते

**इवलेसे रोप लावियेले द्वारी ।**
**त्याचा वेलू गेला गगनावरी ।**

बाबांचा सेवेचा संस्कार समाजात रुजवायचा असेल तर मुलांवर तशा प्रकारचे संस्कार करायला हवेत. म्हणून बाबांचा मोठा मुलगा विकास व पत्नी भारती यांनी आनंदवनात सेवा करायला सुरुवात केली. तर डॉ. प्रकाश व मंदाताई यांनी चंद्रपूर येथे शाळा व दवाखाना या क्षेत्रात सेवा सुरु केली.

बाबांनी कुष्ठ पिडीतांना स्वाभिमानाने जगायला शिकविले. कोणतेही दान त्यांनी घेतले नाही. ते म्हणत 'दान नादान करते' ही बाबांची जीवनदृष्टी होती. Food for Peace या आस्ट्रेलियन संस्थेने १२०० पोती गहू देण्याचा मनोदय बाबांना कळविला. बाबांनी उत्तर दिले – "Decline with Thanks, because peace will last as long as wheat is there, give us a technique by which we produce bumper crop of wheat & Rise".

सामाजिक बांधिलकी बरोबर बाबांनी पर्यावरणाचाही गांभिर्याने विचार केला. त्यांनी आनंदवनात प्रगत तंत्रज्ञान वापरुन शेती केली. चंद्रपूर जिल्ह्याला पुरेल एवढा गहू व तांदूळ बाबांनी आनंदवनात निर्माण केला. बाबांचा हा विक्रम पाहून पंजाबराव कृषी विद्यापीठाने त्यांना 'कृषिरत्न' पुरस्कार दिला.. कृषीउत्पन्नाबरोबरच त्यांनी फळभाज्या, फुलझाडे यांचीही लागवड केली. आनंदवनाचा सारा परीसर अन्नधान्य व फुलाफळांनी बहरुन आला. त्याचबरोबर डेअरी व कुक्कुटपालनही त्यांनी सुरु केले. अन्न शिजविण्यासाठी गोबर गॅस, पाणी गरम करण्यासाठी, विजेसाठी सौर उर्जा व शेतीसाठी कंपोस्ट खत अशा प्रकारे नैसर्गिक उर्जेचा वापर त्यांनी सुरु केला. बाबांच्या वैज्ञानिक दृष्टीची झेप किती पराकोटीची होती याची साक्ष त्यांच्या कार्यातून स्पष्टपणे दिसते आहे.

बाबांना देव कुष्ठरोग्यात दिसला आणि त्यांनी त्यांच्या सेवसाठी स्वतःला वाहून घेतले. त्याचप्रमाणे डॉ. अभय व राणी बंग यांना कुपोषणाने मरणाऱ्या बालकांत देव दिसला व त्यांनी ते कार्य सुरु केले पुढे अने क हात त्यांच्या मदतीला आले. डॉ. अनिल अवचटांना व्यसनी लोकांमध्ये देव दिसला व त्यांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणण्याच्या कार्यात ते रममान झाले. सिंधूताई सपकाळ यांना अनाथ, निराधार मुलांमध्ये देव दिसला व त्या अनाथांच्या माता झाल्या.

आपण म्हणतो सध्याच्या तरुण पिढीत काही राम नाही पण तो राम (देव) त्यांनी कशात पहावा हे आपण त्यांना शिकविले का ? हे पहाणे जास्त योग्य ठरेल. आपण म्हणतो. आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. या युगात ऐश्वर्य, पैसा, संपत्ती याला जास्त महत्व आहे. परंतु या युगातही आदर्श आहेतच जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती बील गेटस् असताना त्यांच्या खालोखाल नंबर होता वॉरन बफेचा. बील गेटस् यांनी आपल्या संपत्तीतील ५०% पेक्षा जास्त रक्कम सामाजिक कार्याला दिल्याने त्यांचा पहिला नंबर गेला व ती जागा मिळाली वॉरन बफेंना पण उंची वाढली बील गेटस् यांची त्यांची दातृत्व वृत्ती बफेंना भावली नंतर त्यांनी २० अब्ज डॉलर सामाजिक कार्यासाठी दिले पण ते देताना ते पैसे त्यांनी बील गेटस् फाऊंडेशनला दिले ते म्हणाले समाजाची गरज काय आहे ? ते गेटस् यांना चांगले माहित आहे त्यामुळे या पैशाचा विनियोग ते चांगल्या तऱ्हेने करु शकतील.

मोठ्यांची ही सगळी उदाहरणे लक्षात घेऊन आयुष्याच्या उंबरठ्यावर उभे असलेल्यांनी अधिक ज्ञानासाठी धडपड करावी व्यक्ती, समाज, राष्ट्र आणि मानवता यांच्या कल्याणाचा विचार सर्वपर्यंत न्यावा. थोडेतरी योजनाबध्द असे परोपकार कृत्य, समाजभिमुख वृत्तीने केले तर बाहेरची प्रतिष्ठा वाढतेच पण व्यक्तीमत्वाची प्रतही सुधारते. अंतर्गत शरीराच्या मर्यादेवरही चांगुलपणाचे काही शुभ आणि अनुकुल बदल घडतात. या दीपस्तंभाप्रमाणे कर्मवीराच्या जीवन प्रकाशात सामाजिक जाणीवेचा एक प्रसन्न अनुभव असतो घेऊन पाहू या या देशाचे भाग्य उजळून निघेल

**उठा ! सगळे एकत्र येऊ या'**





# स्त्री शिक्षणातील प्रकाशतारा
# सावित्रीबाई फुले



शिरवळचा आठवड्याचा बाजार होता. आज बाजारात दुकानांची रेलचेल अन् माणसांची लगबग. धान्यांची, भाज्यांची खेळण्यांची खाऊची, कपड्याची दुकाने सजली होती. दिवस वर येत होता तशी गर्दीही वाढत होती. आणि या गर्दीत ही चिमुरडी कोण चाललीय ? कोणाचा हात धरुन फिरतेय ही ? ही छोटी विस्फारलेल्या नजरेनं बाजार न्याहाळीत होती. तिच्या डोळ्यात उत्सुकता, आनंद दिसत होता. मुलीचे, बाईचे फिरणे-बोलणे चालूच होते. बराच वेळ झाल्यावर त्या दोघी शेवगाठीच्या दुकानाशी आल्या. बाईने मुलीला ओंजळभर शेवगाठी दिल्या म्हणाली, 'हा खाऊ खा हितं बसून, इकडे तिकडे भटकू नगंस, मी आता येतेच बघ. दम खा वाइच. दमलीस व्हय ना! मुलीने मानेने संमती दिली व इकडे तिकडे बघत खाऊ खाण्यात दंग झाली. थोड्याच वेळात तिच्यासमोर गोरा साहेब घोड्यावरून उतरुन उभा रहिला. हातातले पुस्तक पुढे करुन तिला म्हणाला, 'खाऊ खातेस, हा संपेल खाऊ. पण हा माझ्याजवळचा खाऊ बघ, हा कधीच संपणार नाही.' न संपणारा खाऊ !

त्या चिमुरडीने एकदा साहेबाकडे व लगेच पुस्तकाकडे पाहिले. पुस्तकाचे ते रंगीत मुखपृष्ठ पाहून तिला खूप आनंद झाला साहेबांनी दिलेले पुस्तक मुलीने हातात धरले. त्याचा कोरेपणाचा वास, एका उंचीत काढलेली अक्षरं मुलगी हरखून गेली, पुस्तक उघडले पण... मला कुठं वाचता येतंय ! वाचता आलं असतं तर... चिमुरडीचे डोळे पाण्याने भरले. लगेच तिने मुठीने डोळे पुसले. कसला तरी मनाशी निश्चय केला, परत पुस्तकाचा वास घेतला आणि काखेमध्ये पुस्तक घट्ट धरले. तोपर्यंत त्या बाई आल्या. परतीचा रस्ता सुरु झाला. घरी जाताच चिमुरडी पटकन माडीवर गेली. एका लोखंडी ट्रंकेच्या तळाशी पुस्तक ठेवून ती खाली आली.

ही चिमुरडी म्हणजे नायगावच्या खंडोजी नेवसे पाटलांची मुलगी. हिच्या आईचे नाव लक्ष्मीबाई ! या नेवश्याच्या पाटलांना शिवशाहीपासून पेशवाईपर्यंत पाटीलकीचा मान होता बरं का ! ३ जानेवारी १८३१ पाटलांना कन्या झाली. घरात आनंदी आनंद झाला बाराव्या दिवशी बारसं झालं. नाव ठेवलं, 'सावित्री'

सावित्री लहानपणापासूनच खेळकर, खोडकर अन् धीट. सारी कामे चटचट अन् स्वच्छ करायची पोहणे, गोफण मारणे, एका दगडात चिंचा, कैऱ्या पाडणे यातही ती पारंगत होती. मोटेच्या चाकावरून ती विहिरीत उडी घेई. झुंजणाऱ्या बैलाची शिंगे देखील तिने धरुन ठेवली होती. एकदा तर झाडावरचा नाग पाहून मुले पळाली पण या मुलीने टोकेरी दगड घेऊन नागालाच जखमी केले. वाऱ्या-वादळातून, पावसातूनसुध्दा ती मावशीकडे ये-जा करायची. अशी गुणी पोर दिसामासाने वाढत होती. आता सावित्री सात वर्षांची झाली. मुलगी लग्नाला आली. वरसंशोधन सुरु झाले. पण मनासारखा वर मिळेना. आता सावित्रीला नववे वर्ष लागले. 'घोडनवरी झाली घोडनवरी झाली' आजूबाजूचे लोक नातेवाईक कुजबुजू लागले. खंडोजी पाटील चिंतेत पडले आणि त्याचवेळी गोविंदरावांची मावसबहीण सगुणाबाई हिने खंडोजी पाटलांच्या सावित्रीचं नाव सुचवलं. नायगावला निरोप गेला, पाहुणे पाहायला आले. मुलगी पसंत पडली. पाटलांना जावई पसंत पडला आणि फाल्गुन वद्य पंचमी सन १८४० चा मुहूर्त ठरला. रंगपंचमीच्या मुहूर्तावर

ज्योतिबा - सावित्रीच्या जीवनात सगळे रंग खुलून आले.

घरांत लक्ष्मी आली. सगुणाबाईंना आभाळ ठेंगणं झालं. अवघी नऊ वर्षांची पोर. पण पहाटे उठून सडा रांगोळी करून मळ्यातील फुले वेचून देवाचे तबक छान सजवून स्वयंपाकालाही मदत करायची. फुल्यांची मोठी फुलशेती होती. ज्योतिबा, सगुणाबाई सकाळी उठून मळ्यात जायचे आणि सावित्री त्यांना जेवण घेऊन जायची. रोजचा क्रम ठरलेला. सावित्रीची वेळही ठरलेली. पण आज किती उशीर ? सावित्री का आली नाही? बरं नसेल, घरी काय घडलं असेल, असा विचार करीत ज्योतिबा भाकरी घेऊन येणाऱ्या सावित्रीची वाट पहात होते आणि दुरुन सावित्री येतांना दिसताच त्यांचा जीव भांड्यात पडला. सावित्रीने पटकन आंब्याच्या सावलीत टोपली ठेवली व ज्योतिबांना 'जेवायला या' असे सांगितले. ज्योतिबा पानाकडे पाहू लागले, 'अगं आज काय पुरणपोळी ? हां ! आज पुरणपोळीचं काय कारण ? 'ओळखा पाहू ? ' 'नाही बा?' 'आज हनुमानजयंती', चैत्री पौर्णिमा. आज वाढदिवस न्हवं का?' आपल्या वाढदिवसाची आठवण ठेवून कौतुकाने पुरणपोळी केलेली पाहून ज्योतिबांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. आईची आठवण दाटून आली. झाले. आंब्याच्या सावलीत मस्त जेवण झाले. गप्पा रंगात आल्या आणि सावित्री एकदम गप्प झाली. 'काय गं झालं? माहेरची आठवण आली ! कोणाची आईची, बाबांची का सिदूजीची न्हाय ! मग सखारामाची, श्रीपतीची न्हाय हो 'अग मग काय झालं! सांगते पण हसनार नाय ना मला नाही? सांग बरं सारं पटकन ज्योतिबांचे हे शब्द ऐकतांच सावित्रीने पाटी (टोपली) खाली ठेवलेलं पुस्तक काढलं आणि म्हणाली, हे बघा पुस्तक. मला न्हाई वाचता येत. तुम्ही वाचून दावाल मला? तुला आवडतं पुस्तक ? अग हे तर येशू ख्रिस्ताच्या जीवनावरचे पुस्तक, शांततेचा समतेचा संदेश देणारा येशू. ते न्हाई मला कळत पर दावा की वाचून, कराल ना येवढं ? अगं पण, हे पुस्तक तुझ्याकडे कसं ! सांगत्ये ना ! असं म्हणून तिने सर्व हकिगत सांगितली ! खरंच शिकवाल मला ! कधीपासून ? कुठल्या शाळेत ? अगं हो ! हो ! आतापासून आणि इथेच शिकविणार तुला. सावित्रीच्या चेहेऱ्यावर हसू फुटले. ज्योतिबाने झटकन बारीकशी आंब्याची काडी घेतली. शेतातली मऊ माती पसरली आणि त्यावर लिहिले 'श्री'. सावित्रीने पाहून गिरवून 'श्री' काढला, आणि तिचा आनंद गगनात मावेनासा झाला. मला लिहायला जमेल असा विश्वास वाटला. ज्योतिबांनी सावित्रीबरोबर सगुणाबाईंनाही या धूळपाटीवर अक्षरे लिहून दिली. दोघी शिकू लागल्या. पण हे कोणाला कळू नये याची मात्र त्या काळजी घेत. दोन विद्यार्थिनी आणि एक शिक्षक. शाळा सुरू झाली होती. सावित्रीचे लहान वय व शिकण्याची आवड त्यामुळे सावित्रीला अक्षरे, बाराखड्या पटापट जमू लागले. आता ती लिहू वाचू लागली. आता मला पुस्तक वाचता येईल असा विश्वास तिला वाटू लागला. सगुणाबाईंची प्रगती होत होती. काही दिवसातच नॉर्मल स्कूलच्या मिचेलबाईंनी परीक्षा घेतली. दोघी पास झाल्या आणि नॉर्मल स्कूलमध्ये शिकू



लागल्या. तेथे तिसऱ्या व चौथ्या वर्षाची परीक्षा दोघी पास झाल्या. येशू ख्रिस्ताचे पुस्तक सावित्रीने वाचून काढले. येशूचा मानवता धर्म तिला भावला. दयाबुध्दी, गरीबांबद्दल कळवळा, सर्वांठायी समभाव, माणुसकीचा गहिवर त्यांच्या वागण्यातून दिसू लागला. एकदा काय झाले ! सावित्री मळ्याकडे भाकरी घेऊन जात होती. भर दुपारची वेळ, सावित्री झपझप चालली होती आणि तेवढ्यात तिच्या कानावर आवाज आला, 'मुली फार भूक लागलीय नं! भाकरी देते... 'तिचे वाक्य पुरे व्हायच्या आतच सावित्रीने टोपलीतील भाजी भाकरी काढून तिला दिली. सावित्री मळ्यावर गेली. ज्योतिबांना भाकरी वाढली आणि स्वत: बसून राहिली. अगं, सावित्री तुला घे की भाकरी ! नको मला जेवायला. माझं पोट भरलंय. अगं, खरं सांग काय झालंय ते मग सावित्रीने सारे सांगितले, ज्योतिबांनी तिचे कौतुक केले. आपल्यातली अर्धी भाकरी सावित्रीला दिली. अर्ध्या भाकरीने दोघांची पोटे मात्र पूर्ण भरली.

सुधारणेचा मूळ पाया शिक्षण आहे असे ज्योतिबांचे ठाम मत होते. त्यातही स्त्री शिक्षण व शूद्रांना शिक्षण देणे जास्त गरजेचे आहे असे त्यांना वाटत होते. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी! ती जगाला उध्दारी'. पण पाळण्याची दोरी! ती जगाला उध्दारी'. पण पाळण्याची दोरी हातात असलेली स्त्री अशिक्षित, पराधीन असेल तर तिने कसा जगाचा उध्दार करणार ? करायला हवा आणि तो शिक्षणानेच होईल. पण स्त्रिया, शूद्रांना शिक्षण दिले तर देव कोपतो, दुष्काळ पडतो आणि मग असे रुढीबाह्य काम करणाऱ्यांना शिक्षा मिळे, वाळीत टाकण्याची बहिष्काराची. ज्योतिबांनी स्त्री शिक्षणाची सुरुवात स्वत:च्या घरापासून केली होती. ज्योतिबांच्या स्त्री शिक्षणास सावित्री व सगुणाबाई दोघींचाही पाठिंबा, अगदी सक्रिय पाठिंबा होता. सगुणाबाई मिशनऱ्यांच्या घरी काम करीत होत्या. त्यांना इंग्रजी कळत होते. शिक्षणाचे महत्व पटले होते. घरच्यांच्या पाठिंब्याने ज्योतिबांनी शिक्षणाचे क्रांतिकार्य हाती घेतले. आणखी त्यांना सक्रिय पाठिंबा दिला तो बुधवार पेठेतील ज्योतिबांचे मित्र तात्याराव भिडे यांनी. त्यांनी तर उदार मनाने आपला वाडा दरमहा पाच रुपये भाड्याने शाळेसाठी दिला व प्राथमिक खर्चाकरिता १०१ रु. दिले

१ जानेवारी १८४८ ला भिडेवाड्यात मुलींची शाळा सुरु झाली. देशाला स्वातंत्र्य मिळण्याआधी शंभर वर्षे ही शाळा सुरु झाली. पहिल्या दिवशी सहा विद्यार्थिनी, मुख्याध्यापिका शिक्षिका सावित्रीबाई. शाळा काढली पण... पालक मुली पाठवायला तयार होईनात. त्यांना ते धर्माविरुध्द वाटे व त्यामुळे पालकांची समजूत घालून मुलींना शाळेत आणावे लागे. सावित्रीबाईंनी तेही काम केले. लहान मुलांना मायेची गरज असते हे जाणून त्या मुलींवर प्रेमाचा वर्षाव करीत, त्यांना खाऊ देत. कोणी आजारी पडली तर घरी जाऊन तिची चौकशी करीत. यामुळे मुलींना शाळेची गोडी लागली. वर्षअखेर २५ मुली तर १८५० साली ७० मुली शाळेत दाखल झाल्या. सावित्रीबाई तन मन वेचून शिकवीत होत्या. आता विद्यार्थिनी वाढत होत्या, दुसरी शाळा काढणे भाग होते. पण शिक्षक – शिक्षिका कोठून मिळणार ? तेही फुकट आणि तळमळीने शिकवणारे ! शिक्षक तयार करण्यासाठी त्यांनी नॉर्मल ट्रेनिंग स्कूल



काढले. त्यातील पहिली विद्यार्थिनी फातिमा शेख, हीच पुढे सावित्रीबाईंच्या शाळेत शिक्षिका म्हणून काम करु लागली. आता दोघींचे उत्तम काम पाहून पालक सावित्रीबाईंच्या शाळेत मुली दाखल करु लागले. बघता बघता पाच वर्षांत त्यांनी पुणे व परिसरात अठरा शाळा काढल्या. या कार्याचे त्या वेळच्या इंग्रज सरकारलाही कौतुक वाटले. १६ नोव्हेंबर १८५३ या दिवशी मेजर कँडी यांच्या हस्ते फुले दांपत्याचा सत्कार करण्यात आला. सगुणाबाई – गोविंदराव भारावून गेले.

सावित्रीबाईंनी फक्त शिक्षण क्षेत्रात काम केले असे नाही. विधवा स्त्रिया व अनाथ मुले यांच्यासाठीही त्यांनी खूप काम केले. त्यातील काशीबाई या विधवेच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले. त्याचे नाव यशवंत ठेवले. त्याला डॉक्टर केले.

महाराष्ट्रात १८७६ व १८९६ मध्ये भयंकर दुष्काळ पडला यावेळी सावित्रीबाईंनी मोलाची कामगिरी केली. दानशूरांच्या मदतीने दोन हजार लोकांच्या जेवणाची सोय केली. १८५१ मध्ये अस्पृश्यांसाठी आपल्या घरचा पाण्याचा हौद खुला केला.

२७ नोव्हेंबर १८९० साली ज्योतिबांचे निधन झाले. आपलेही जीवन संपवावे असे सावित्रीबाईंना वाटले. पण लगेचच तो विचार त्यांनी झटकून टाकला. त्यांना ज्योतिबांचे शब्द आठवले,

'मी गेलो तरी कष्टी होऊ नकोस, माझे कार्य तू करायचे आहेस.' त्या पुन्हा कामाला लागल्या. सत्य-शोधक समाजाचे काम पाहू लागल्या. सर्व संस्थांचे काम चालले होते.

अशातच १८९७ साल उजाडलं. पुण्यात व परिसरात प्लेगने धुमाकुळ घातला. ६५ वर्षांच्या सावित्रीबाई दलितांच्या, अपंगाच्या झोपड्यात गेल्या. त्यांना औषधोपचार करीत होत्या. यशवंताच्या दवाखान्यात प्लेग झालेल्यांची सेवा करता करता त्यांनाच प्लेग झाला. यशवंताने खूप उपचार केले. पण व्यर्थ ! १० मार्च १८९७ सावित्रीबाईंना मृत्यू समोर दिसू लागला. त्या यशवंताला म्हणाल्या, 'मी आता जाते, माझे जीवनव्रत मी तुझ्याकडे सोपवते. लक्षात ठेव 'मानवता हाच धर्म' आणि क्षणातच ज्योत विझली. ज्योतिबांच्या तेजात सावित्रीचं तेज विलीन झालं. सावित्रीबाई गेल्या पण त्यांनी आचरलेला मानवता धर्म, गरीब, अशिक्षित, दलित, अपंग यांच्यासाठी काम करणे या गोष्टी आपणही करुया. सावित्रीबाई गेल्या परंतु कार्यरुपाने त्या अमर झाल्या. त्यांचा वारसा आपण पुढे चालवू या.

## यशोगाथा



**उठ माणसा पुरे झाली झोप रणी लढण्यांची आता तुझी खेप**
**प्रयत्नांच्या पंखांना बळ दे तूच उंच उडण्यासाठी मोठी घे झेप ।।**

**आता तरी टाक पाऊल जोमाने थांबू नकोस तू उद्याच्या भितीने**
**धर तू नेम अर्जुनाच्या नजरेने ध्येय तू गाठ तुझ्या हिमतीने ।।**

**झटकून टाक मरगळ मनाची ही लढाई आहे तुझ्या अस्तित्वाची**
**चिकाटीचे बळ दाखव जगाला पाहू हे त्यांना प्रेरणा अंतरिची ।।**

**यशाची चव चाखुन बघ एकदा डौलाने मिरव विजयी पताका**
**अन् मग सांग तू अभिमानाने तुझ्या जिद्दीची तू यशोगाथा ।।**

# हॅप्पी मदर्स डे

आई या दोन अक्षरांमध्ये अक्षरश: सगळे विश्व सामावले आहे. पाळण्यातल्या तान्ह्या बाळापासून ते वयोवृध्द व्यक्तींपर्यंत सगळ्यांना एकत्र गुंफणारा धागा म्हणजे आई ! आई हा प्रत्येकाच्या भावविश्वाचा रेशमी कप्पा असतो. आईबरोबरच्या नात्याचा कॅलिडोस्कोप मात्र आपल्या वयानुसार वेगवेगळे आकार धारण करत असतो. 'माझी आईच माझी बेस्ट फ्रेंड आहे' इथपासून ते 'आई तू ना अजून जुन्या जमान्यातच आहेस. तुला काही कळत नाही' इथपर्यंत अनेक आकार त्यात उमटून जातात.

काळ पुढे जातो आणि एक दिवस आपणही आई होतो. या नवीन भुमिकेत शिरल्यावर जाणवतं, आईपणाचा परीघ केवळ स्वत:च्या मुलाबाळांपुरताच मर्यादित नाही. 'देव सगळीकडे नाही, म्हणून त्याने निर्माण केली आई' हे वचन शब्दश: खरं आहे. आपणही त्याचा पदोपदी अनुभव घेतलाच होता. फक्त त्याची जाणीव स्वत: आई झाल्यावर झाली. आईपणाचं हे मर्म कळल्यावर जीवनाच्या प्रत्येक वळणावर वेगवेगळ्या रुपात भेटलेल्या आईविषयी मनात कृतज्ञता दाटून येते. या उपकारांची अंशत: फेड फक्त एकाच गोष्टीनं शक्य असते, आईपणाचा वसा पुढे चालवून. मग स्वत:च्या मुलांची आई असतानाच, कधी जिवलग मैत्रिणीची, कधी नवऱ्याची, कधी ऑफिसमधल्या सहकाऱ्याची तर कधी चक्क सासूचीही आई होण्याचा प्रयत्न आपण करु लागतो.

या प्रवासात लक्षात येतं की आई ही एक वृत्ती आहे, ते एक तत्त्व आहे, तो एक ध्यास आहे. या वृत्तीचा वारसा देणाऱ्या आपल्या आईबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस, आईपणाचे तत्त्व शिकवणाऱ्या प्रत्येकाविषयीचा आदर व्यक्त करण्याचा हा दिवस. आईपणाचा ध्यास घेतलेल्या प्रत्येकीला शुभेच्छा देण्याचा हा दिवस – मदर्स डे ! हा दिवस तुम्हाला आणि तुमच्या आईला आनंदाचा, समाधानाचा, कृतार्थतेचा जावो !!



# वाचा आणि पेटून उठा

**टिपू सुलतान**

हा एक लढवय्या होता, पण त्याने आपल्या राजवाड्यात स्वतःचे ग्रंथालय उभे केले. त्या ग्रंथालयात दूर गावातून मिळवलेल्या दुर्मिळ ग्रंथाचा उत्तम संग्रह होता. हाच पुढे म्हैसूरचा वाघ म्हणून प्रसिध्द झाला.

---

**एन.आर.नारायण मूर्ती**

आपल्या बायकोकडून दहा हजार रुपये कर्जाऊ घेतले आणि इन्फोसिस कंपनीची स्थापना केली. आज ह्या कंपनीची वार्षिक उलाढाल अब्ज रुपयांची आहे.

---

**कर्मवीर भाऊराव पाटील**

हे खेड्यात राहून कंदिल आणि नांगर विकायचे, पण त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली, जी आजवर अनेकांना सुशिक्षित करत आहे.

---

**जॉनी लिव्हर**

आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी धारावी येथे राहणारा ज्याने कलाकौशल्य विकसित केले आणि आज तो विनोदी अभिनेता म्हणून प्रसिध्द झाला.

---

**नेपोलियन बोनापार्ट**

हा आपल्या शरीरयष्टीसाठी भरपूर व्यायाम करायचा, पण मानसिक विकास करण्यासाठी त्याने भरपूर पुस्तके वाचली. तो पुस्तकांवर अतोनात प्रेम करायचा. जेव्हा तो लढाईसाठी स्वाऱ्या करायचा, तेव्हा तो लढाई तर जिंकायचा, पण तेथील दुर्मिळ पुस्तकेही आपल्याबरोबर जमा करुन घेऊन यायचा. पुढे हीच व्यक्ती जगज्जेता झाली.

---

**लक्ष्मणराव किर्लोस्कर**

आयुष्यातील दहा वर्षे चित्रकलेतील शिक्षक म्हणून काम केल्यानंतर नांगराचा कारखाना उभा केला. आज किर्लोस्कर हे नाव आंतरराष्ट्रीय ख्यातीचे झाले आहे.

---

**फिल नाईट**

ह्यांनी जपानमधुन स्पोर्टस शूज आयात करुन अमेरिकेत गाडीच्या डिकीचे रुपांतर दुकानात करुन मोठ्या प्रमाणात विक्री केली आणि आज जगभर लाखो खेळाडू त्यांनी निर्माण केलेले नाइकीचे स्पोर्टस् शूज तसेच खेळांसाठी लागणाऱ्या वस्तू वापरतात.

---

**लता मंगेशकर**

वडिलांच्या मृत्युनंतर वयाच्या बाराव्या वर्षी कोल्हापुरात स्टुडिओमध्ये नोकरी केली. आपल्या लहान भावंडांचा सांभाळ करत पन्नास हजाराहून अधिक गाणी गाऊन 'भारतरत्न' हा सर्वोच्च किताब मिळवला.

---

आमच्या घरी धन, शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे, यत्ने करु ।
शब्दचि अमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोका ।

– संत तुकाराम महाराज

# वाचा आणि पेटून उठा

### स्टीव्ह जॉब्ज

शीतपेयांच्या रिकाम्या बाटल्या विकून त्यातून जेवणाचे पैसे उभे करायचा. इतक्या गरीब परिस्थितीवर मात करुन वयाच्या विसाव्या वर्षी जगातील मोठ्या कॉम्प्युटर कंपन्यांपैकी एक ॲपल कॉम्प्युटरची स्थापना केली.

---

### गुलजार

भारत-पाक फाळणीनंतर भारतात येऊन मुंबईला एका मोटर गॅरेजमध्ये कामाला सुरुवात केली आणि आज चित्रपटसृष्टीत गीतकार आणि चित्रपट निर्माता म्हणून मोठे नाव कमावले.

---

### चार्ली चॅप्लिन

ही व्यक्ती एवढी गरीब होती की, त्याला शालेय जीवनात उदरनिर्वाहासाठी फुले विकावी लागली. पण आपल्या गरीबीवर मात करुन, आपले अश्रू पुसुन त्यांनी जगाला हसवले.

---

### एम.एफ.हूसेन

मुंबईच्या फुटपथावर सिनेमाचे मोठमोठे फलक रंगवणाऱ्या ह्या चित्रकाराने आपली शंभर चित्रे शंभर कोटींना विकून चित्रकलेमध्ये एक इतिहास रचला.

---

### जसवंतीबेन पोपट

८० रुपयांचे कर्ज आणि सात स्त्रियांच्या आधारे सुरु केलेला पापडाचा उद्योग आज लिज्जत पापड ह्या नावाने प्रसिध्द आहे. हा उद्योग चाळीस हजारांपेक्षा जास्त स्त्रियांना रोजगार देऊन २००० करोड रुपयांची उलाढाल करत आहे.

---

### डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन्

यांना वाचनाचा दांडगा व्यासंग होता. ग्रंथ हेच त्यांचे मित्र आणि गुरु होते. पुस्तकांचे वाचन, मनन आणि चिंतन यासाठी त्यांनी आपल्या आयुष्यातील भरपूर वेळ दिला आणि त्यामूळेच त्यांनी शिक्षणतज्ञ, राष्ट्रपती आणि राजदूत अशी अष्टपैलू कामगिरी बजावली. आजही त्यांचा ५ सप्टेंबर हा जन्मदिवस शिक्षकदिन म्हणून देशभर साजरा केला जातो.

---

### थॉमस् एडिसन

ही व्यक्ती बहिरी होती. पण त्यांनी ही उणीव वाचनाने भरुन काढली. थॉमस रात्री दोन वाजेपर्यंत वाचन करायचे आणि फक्त पाच तास झोपायचे. हीच व्यक्ती पुढे जगप्रसिध्द शास्त्रज्ञ झाली.

---

### ग्रंथ ही ह्या जगातील शाश्वत गोष्ट आहे.

थोरामोठ्यांचे सान्निध्य लाभणे जरी कठीण असले तरी पुस्तक रुपातून थोरांची संगत आपल्याला निश्चितच लाभू शकते. आपल्यालाही जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर, वाचनसंस्कृती विकसित करा.

# वेळेची शिकवण



वेळेविषयी इंग्रजीमध्ये एक सुंदर वाक्य आहे. जे आपण नेहमी वापरत असतो. ऐकमेकांना बोलून दाखवतो. " Time is Money" वेळ हेच धन आहे. पण काय ? वेळेला धनाएवढेच महत्व आहे ? नाही. हातून गेलेले धन पुन्हा कधीही हाती येऊ शकत पण हातातून एकदा गेलेली वेळ पुन्हा कधीच हाती येऊ शकत नाही. कधीही नाही आणि कदापिही नाही. जगामध्ये सर्वात महत्वाची आणि महागडी वस्तू कोणती असेल तर ती वेळ आहे. वेळेला खरेदी करता येत नाही आणि विकताही येत नाही. जगात पैशाने सर्व वस्तू आपण मिळवू शकतो. घर गाडी, धनदौलत, चैनीच्या सर्व वस्तू आपण मिळवू शकतो. पण वेळ ... वेळ कोणालाही खरेदी करता येत नाही.

वेळेचे अचूक ज्ञान होण्यासाठी माणसाने घड्याळ नावाची वस्तू बनवली. घड्याळ पाहिले की, आपल्याला कळते की, आता किती वाजले आहेत. घड्याळाचे काटे नेहमी फिरत असतात उजवीकडून डावीकडे हे काटे नेहमी फिरत असतात. ते कधी उलटे फिरत नाहीत. अगदी असेच काळाचे आहे. काळ हा एक प्रवाही आहे. तो सतत अखंडपणे चालू असतो. तो पुन्हा माघारी फिरत नाही. अशा ह्या घड्याळाला कोणी थांबवू शकत नाही. कितीही मोठी व्यक्ती असू द्या, कितीही श्रीमंत, कितीही धनवान असू द्या, पण ती व्यक्ती आपल्या ताकतीच्या जोरावर आपल्या वैभवाच्या जोरावर घड्याळाला थांबवू शकत नाही. वेळेला आपल्या मुठीत करु शकत नाही. अशी ही वेळ कुणासाठीही थांबत नाही. अखंड चालत राहते. अहोरात्र चालत राहते.

आपण बऱ्याचदा म्हणतो माझा खराब टाईम चालला आहे. माझा टाईम चांगला आहे. आपण जर आपली सर्व कामे वेळेवर व नियोजन बध्द केली तर आपला टाईम कधीच खराब येणार नाही. उदा. सकाळी लवकर उठणे, व्यायाम करणे, आंघोळ करुन देवाला व आई-वडिलांना नमस्कार करुन शाळेत अथवा कामाला जाणे. संपूर्ण दिवसाची अगोदर आखणी करुन ठेवा. ज्या कामासाठी तुम्ही जेवढा वेळ दिला असेल तेवढ्या वेळातच ते काम झाल पाहिजे. वेळ फुकट वाया घालवू नये. कारण गेलेली वेळ पुन्हा येत नसते. एकाच कामासाठी दिवसातला जास्तीत जास्त वेळ घालवू नये. त्यामुळे त्याचा दुष्परिणाम दुसऱ्या कामावर होतो. 'वक्तशीरपणा' हे मुल्य ज्याने आत्मसात केले आहे आणि प्रत्यक्षात आणले आहे. त्याचा टाईम कधीच खराब येत नसतो. वक्तशीरपणा म्हणजे प्रत्येक काम वेळेवर करणे. आपल्या दैनंदिन कामामुळे आपल्याला अनेक भेटीगाठी घ्याव्या लागतात. पण बऱ्याच लोकांना उशिरा येण्याची सवय असते. ती व्यक्ती आपली अर्धा-

एकतास तिथे वाट पाहते आणि आपण जाऊन Sorry बोलतो. बस झाले. Sorry बोलल्याने ती वेळ पुन्हा येणार आहे का ? दिलेल्या वेळेवर हजर राहणे आपले कर्तव्य आहे. समजा ११ वाजून १० मिनीटांची ट्रेन आहे. आणि तुम्ही जर १ मिनीट उशिरा गेलात तर ती ट्रेन तुमच्यासाठी थांबणार आहे का ? आपल्या ह्या उशिरा जाण्याच्या गुणधर्मामुळे ती ट्रेन आपल्या हातून सुटणार आहे. आपल्यात जर वक्तशिरपणा असेल तर अशा प्रकारच्या घटना आपल्या जीवनात घडणार नाहीत. वेळेला महत्व द्या वेळ ही अनमोल आहे.

बऱ्याचदा आपण बघतो की, आपण कुणाला विचारल की काय रे काय करतोय ? तर ती समोरची व्यक्ती उत्तर देदे, काही नाही टाईम पास करतोय. टाईमपास ! अहो यांना एवढा टाईम मिळतो तरी कुठून की हे लोक टाईमपास करतात. तुम्ही जर असाच टाईमपास केला तर, एक दिवस टाईमसुध्दा तुम्हाला असचं पास करेल. म्हणे टाईमपास.... टाईमपास म्हणजे काय ? हां जर खूप थकवा आला असेल किंवा काही कारणास्तव थोडासा आराम केला तर ठीक आहे. तुमच्या जवळ जर एवढा टाईम असेल तर त्याचा सदुपयोग करा. आपल्या अंगातील कलागुणांना वाव द्या. सतत विचार करा, चिंतन करा, वाचन करा, अभ्यास करा. त्याच्याने तुमचा तो टाईमपास ही होईल. तुमच काम ही होईल आणि ज्ञानही वाढेल 'टाईमपास' करु नका.

वेळ चांगली असो अथवा वाईट परिस्थितीला समजून चांगले वागण्याचा प्रयत्न करा. वेळ ही अनमोल आहे. गेलेली वेळ पुन्हा येत नसते. म्हणून वेळेचा सन्मान करा, आदर करा, वेळेनुसार वागाल तर वेळ तुमच्या मुठ्ठीत राहील. नाहीतर, हीच वेळ तुमचा काळ होऊ शकते.

आपण महापुरुषांची चरित्रे वाचताना आपल्याला कळते की त्यांनी त्यांच्या उमेदीच्या काळात फार संघर्ष केला. अथक परिश्रम घेतले. अहोरात्र मेहनत केली. म्हणून ते महान झाले. यावरुन असे कळते की, विद्यार्थीदशा आणि त्यानंतरचा काही काळ हा उमेदीचा काळ असतो. त्यातच आपण खूप परिश्रम घ्यायचे असतात. अभ्यास करायचा असतो. सतत चालायचे असते, उमेदीच्या काळात माणूस अधिक कष्ट करु शकतो आणि ते केलेच पाहिजे. तरच पुढचे भविष्य उज्ज्वल होऊ शकते. काळ हा एकमार्गी असतो. गेलेली वेळ पुन्हा येत नसते. म्हणून प्रत्येक क्षणाला भरभरुन जगले पाहिजे. माणूस आयुष्याच्या शेवटी मागे वळून पाहतो तेव्हा त्याला कळते की, मी खूप काही करु शकलो असतो पण काहीच करता आले नाही. आयुष्याच्या उत्तरार्धात पश्चाताप होण्यापेक्षा आत्ताच जागे व्हा.

**क्षणाला जाणून घ्या सदैव तो तुमचाच असेल फळ नको, फळाची अपेक्षा नको यश हे तुमचेच असेल**

सृष्टीकडून मानवाला अनेक गोष्टी अगदी सहज मिळतात परंतू मानवाला त्यांचा योग्य उपयोग करुन घेता येत नाही. उदा. सूर्यप्रकाश

सूर्य रोज उगवतो परंतू आजच्या धावपळीच्या जीवनात कित्येकांना उगवत्या सुर्याचे दर्शन घेता येत नाही. एक तर ते झोपेत असतात किंवा अगदी भल्यापहाटे ते कामानिमित्त अथवा शाळेनिमित्त घराबाहेर पडतात. त्यामुळे सकाळची सुर्यकिरणे अंगावर पडत नाहीत. रोज सकाळी सुर्यदेवाचे दर्शन घेतले पाहिजे. कोवळ्या उन्हात बसले पाहिजे. शरीरासाठी खूप चांगले असते.

दुसरे उदाहरण म्हणजे हवा. सृष्टीमध्ये प्रचंड प्रमाणात हवा आहे आपल्याला त्यातून प्राणवायु मिळत असतो. कोणत्याही प्रकारचे मूल्य न देता आपल्याला हा प्राणवायू मिळत असतो पण आपण तो ही नीट घेऊ शक त नाही. बरेच लोक अर्धवट श्वास घेतात. खरे तर श्वास घेताना पोट अधिकाधिक फुगले पाहिजे. श्वास संपुर्णतः घेतला पाहिजे आणि श्वास सोडल्यावर पोट खाली झाले पाहिजे पण .... पण हा विनामूल्य श्वास आम्हाला नीट घेता येत नाही.



अगदी असेच वेळेचेही आहे. दररोज आपल्याला दिवसाला २४ तास मिळतात. एक दिवस संपला की पुन्हा दुसऱ्या दिवशी आपल्याला २४ तास मिळतात. पण आपण त्यातील किती वेळेचा सदुपयोग करतो ? आणि किती वेळ वाया घालवतो ? याचा नीट विचार करायला हवा वेळेचे नियोजन व्यवस्थित केले तर वेळ वाया जाणार नाही. झोपण्याची, जेवण्याची आणि कामाची वेळ निश्चित करा. दिवसातील काही वेळ स्वतःसाठी राखून ठेवा, स्वतःसाठी वेळ द्या. व्यायाम करा, अभ्यास करा, थोडा वेळ विरंगुळ्यासाठी राखून ठेवा. वेळेला आताच समजून घ्या. कोणतेही कार्य करण्यासाठी वेळ कधीच होऊन गेलेली नसते. फक्त आपण विचारपूर्वक सुरुवात करायला हवी. ते म्हणतात ना Well begumn is half done.

यशाचे गमक : वेळेचे नियोजन, आत्मविश्वास आणि प्रयत्न यातून यशाचा मार्ग मिळत असतो. म्हणून वेळेचे महत्व जाणून घेतले पाहिजे. आता गेलेल्या वेळेवर हळहळ करण्यापेक्षा येणाऱ्या वेळेची आखणी करुन आयुष्याचे गणित सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.



# आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार
# यशवंतराव चव्हाण

**।। निरांजनाच्या दीपकळीची, जिद्द जयांची होती, गुणसुमनांनी त्यांच्या झाली, गंधीत येथील माती ।।**

जीवन पराकोटीचे समर्पित असेल तर ते कधीच जीर्ण होत नाही, चंद्र कधी जुना होत नाही, सूर्याला म्हातारपण येत नाही, दर्या कधी संकोचत नाही. यातील प्रत्येकाचे जीवन पराकोटीचे समर्पित आहे. पण अनंत युगे लोटली तरी विनाश त्यांच्याजवळ पोहचलेला नाही, काळाने त्यांना घेरलेलं नाही, त्यांचा कधी कायापालट नाही, स्थित्यंतर नाही ते नि:श्वसन अखंड आहे. असंच एक समर्पित व्यक्तिमत्व म्हणजे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण.

महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्याही राजकारणात आपले वेगळेपण सांभाळून अनेक महत्वपूर्ण भूमिका पार पाडलेल्या असामान्य लोकनेते यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी जुन्या सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्र या गावी झाला.

बालपणीच वडिलांचे छत्र हरपल्याने त्यांनी दारिद्र्याचे चटके सहन करत स्वत:ला सावरलं आत्मविश्वासाच्या बळावर जीवनाची वाटचाल सुरु केली.

शालेय शिक्षण घेत असतानाच राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या विचाराने प्रभावित होऊन १९३० च्या असहकार आंदोलनात भाग घेवून शाळेच्या आवारातील झाडावर तिरंगा फडकविला. त्यात त्यांना कारावास झाला. त्यावेळी त्यांना कारागृहात अनेक देशभक्तांचा सहवास लाभला. त्यामुळे त्यांचा स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग वाढतच गेला.

मातोश्रींच्या खंबीर पाठिंब्यामुळे बी.ए.,एल.एल.बी. पर्यंत शिक्षण घेतलं. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत चव्हाण साहेबांनी १९४० मध्ये सक्रिय राजकारणात स्वत:ला झोकुन दिलं. १९४२ मध्ये वेणूताईशी त्यांचा विवाह झाला. त्याचवर्षी सातारा जिल्ह्यातील चळवळीत प्रवेश करत ते काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष झाले. वैचारीक ज्ञानाची शिदोरी बरोबर घेऊन यशवंतराव १९४६ मध्ये मुंबई विधानसभेवर निवडून आले. आणि पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले. १९४२ ते १९५५ या काळात मंत्री म्हणून, विविध खात्यांची धुरा सांभाळली तर १ नोव्हेंबर १९५६ साली द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले.

१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्मितीचा मंगल कलश आणून यशवंतरावांनी महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.

१९५६ ते १९६२ या सहा वर्षांच्या कालखंडात महाराष्ट्राचा विकास हाच यशवंतरावांच्या मनीचा एकमेव ध्यास होता. या काळात त्यांनी समाजहिताचे अनेक कायदे केले. कृषी, औद्योगिक सहकार आणि सिंचन या विभागांच्या कामावर भर दिला.

महाराष्ट्र राज्याला नवीन दिशा दिली ग्रामीण विकास असो की शिक्षणाचा विस्तृत पाया. साहेब कुठे कमी पडलेच नाहीत. त्यांनी मांडलेला प्रत्येक विचार त्यांनी टाकलेलं प्रत्येक

पाऊल हा एक सर्वांगीण विकासाचा आलेख ठरला. त्यांच्या नेतृत्वानं आणि प्रेरणेनं अनेक सहकारी संस्था या उभ्या राहिल्या.

१ मे १९६२ रोजी जिल्हा परिषद आणि पंचायत समितींची निर्मिती करुन राज्यविकेंद्रीकरणाचे एक ऐतिहासिक पाऊल त्यांनी टाकलं आणि तेच धोरण देशानंही स्वीकारले.

१९६२ मध्ये हिमालयाच्या रक्षणासाठी पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु यांची हाक आल्यावर देशाचे संरक्षण मंत्री म्हणून ते दिल्लीला गेले. देशाचे संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्र खात्याचे मंत्री आणि उपपंतप्रधान अशा सर्वोच्च स्थानावर काम केलेले यशवंतराव चव्हाण साहेब महाराष्ट्राचे सुपुत्र होते. याचं विस्मरण आपल्याला केव्हाही होण शक्य नाही.

प्रतिकूल परिस्थितीशी यशस्वी झुंज देत नेतृत्वाची पायरीपायरीने वाटचाल करीत मोठ्या होणाऱ्या नेतृत्वाने आपल्यामागे महाराष्ट्राच्या विकासाचा आलेख उभा केला. यशवंतराव चव्हाण हे अभ्यासू, विचारवंत, लोकशाहीवादी, मानवतावादी, व्यापक दृष्टीकोनाचे मुत्सद्दी राष्ट्रीय, आणि जागतिक राजकारणाचा उत्तम अभ्यास केलेले जनमानसातील कर्तृत्ववान नेते होते. सर्व गुणांची आणि कलेची जाण असणारे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. त्यांनी आयुष्यभर बेरजेचं उत्तम राजकारण केलं.

यशवंतराव हा महाराष्ट्राच्या राजकारणाचा जवळ-जवळ चार तपं परवलीचा शब्द झाला होता. यशवंतरावांना उपजतच उत्तमोत्तम साहित्य वाचनाची आवड असल्याने साहित्यिकांच्या सहवासात खुप रमायचे. साहित्यिकांबरोबरच राजकारणी, विद्वान, पत्रकार इतकेच नव्हे तर सामान्यातील सामान्य कार्यकर्त्यांबरोबर यशवंतरावांनी आयुष्यभर जिव्हाळ्याचे संबंध ठेवले. त्यात कधीही कटूता येऊन दिली नाही. ते आपल्या आयुष्यात राजकारणात, समाजकारणात सर्वत्र आनंदयात्री म्हणूनच जगले.

आजचा महाराष्ट्र चव्हाण साहेबांच्या विचारांवर उभा राहिलेला



आहे, प्रगती करतो आहे. त्यांच्या पुरोगामी निर्णयामुळं लोकशाहीच्या संवर्धनाचं काम घडतं आहे. तरुण नेत्यांची आजची फळी त्याच्यांच विचारानं महाराष्ट्राला पुढे नेत आहे. महाराष्ट्राला एक पुरोगामी राज्य म्हणून नावारुपाला आणणाऱ्या चव्हाण साहेबांनी देशाच्या सेवेत महाराष्ट्र कुठेही कमी पडू दिला नाही.

राष्ट्रसेवेत मराठी माणसाचा वाटा हा सिंहाचा वाटा असेल हे आपल्या कृतीतुन दाखवून दिलेलं आहे. महाराष्ट्राला यशवंत आणि देशाला किर्तीवंत केलं आहे. म्हणूनच महाराष्ट्रातला किंबहूना देशातला प्रत्येक नागरिक या महान नेत्याचं ऋण कधीही विसरत नाही, त्यांच्या स्मृतीत प्रत्येकजण अतिशय कृतज्ञतेनं विनम्र होत असतो.

''राज्ये जी चालतात ती राज्ये चालविणाऱ्या माणसापेक्षा, राज्य शक्तीच्या बाहेर जी माणसे असतात. त्यांच्या पुण्याईने चालतात. ती माणसे ज्या परंपरा आणि ज्या शक्ती निर्माण करतात त्यांच्या साहयाने ती चालतात''. या विचार तत्वावर यशवंतरावांची श्रध्दा होती. यामुळेच जनतेजवळ वत्सल मातेचे व पित्याचे ह्रदय असते. याची त्यांना प्रचिती आली.

आजही समाजात राज्यकर्त्यांना पैसे देणारे पुष्कळ हात आहेत पण ते हात निरपेक्ष नाहीत. आणि पैसे निरपेक्षपणाने देणारे हातही पुष्कळ आहेत पण ते घेणाऱ्यांचे हात मात्र साहेबांसारखे पवित्र दिसत नाहीत. हीच खरी खंत आहे.

यशवंतरावांनी महाराष्ट्राला जे दिलं, आजही सह्याद्री त्याची साक्ष देते. असा हा महानकर्मयोगी २५ नोव्हेंबर १९८४ रोजी अनंतात विलीन झाला.

कल्पवृक्ष जनतेसाठी लावूनीया तुम्ही गेला।

वैभवाने बहरुन आला।

याल काहो बघायला।

तुम्ही गेला आणिक तुमचे देवपण नावा आले। कृष्णकाठी घर तुमचे काशी झाले। महाराष्ट्राच्या या महान सुपुत्राला शतकोटी कोटी-कोटी प्रणाम !





# भारतरत्न
# डॉ.बाबासाहेब आंबेडकर

कोणाचा जन्म कोठे व्हावा हे कोणाच्याच हाती नसते. आपल्या जीवनाचा जन्मपूर्व संदर्भ नियती ठरवीत असते. जन्माबरोबरच येणाऱ्या उपाधी स्वीकारुन जीवनयात्रेला प्रारंभ करावा लागतो. काही व्यक्ती जीवनाच्या वाटेवरुन निमूटपणे चालत राहतात. काही व्यक्ती चालता चालता थांबतात. विचार करतात. मागेपुढे पाहतात. ही वाट आली कोठून ? आणि जाणार कुठे ? या जगात ही एकच एक वाट आहे का ? ती अटळ आहे का ? असा विचार करणाऱ्या भेदक बुध्दीच्या माणसापैकी डॉ. आंबेडकर हे एक होते.

डॉ. आंबेडकर यांचे आखील जीवन ही एक शोधयात्रा होती. त्यांचा जन्म दि. १४ एप्रिल १८९१ मध्ये झाले. रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगडजवळचे आंबवडे हे त्यांचे मूळ गाव त्यांचे वडील रामजी सकपाळ सुभेदार मेजर या पदापर्यंत पोहचलेले एक शुर गृहस्थ होते. त्यांच्या मातृ घराण्यालासुध्दा अशीच शौर्याची परंपरा होती. आंबेडकरांचा जन्म झाला तेव्हा रामजीबाबा हे मध्य प्रदेशातील महु येथील छावणीत काम करीत होते. सैनिकांचे प्रबोधन करणाऱ्या लष्करी शाळेचे ते मुख्याध्यापक होते. रामजीबाबा हे कबीरपंथी होते. मद्य आणि मांस यांपासून ते आजन्म दूर राहीले. विशेष म्हणजे डॉ. आंबेडकरांनी तर सुपारीचेसुध्दा व्यसन नव्हते. सायंकाळच्यावेळी आपल्या मुलांना जवळ घेऊन नित्य उपासना करणारे आणि कबीराचे दोहे ऐकवणारे आंबेडकरांचे वडील हे लष्करी बाण्याचे साधुपुरुष होते.

डॉ. बाबासाहेबांचे विद्यार्जन हा एक प्रदिर्घ प्रवास आहे बाबासाहेबांचा जन्म महू या गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण दापोली आणि सातारा येथील शाळांत झाले. त्यांचे माध्यमिक शिक्षण सातारा व मुंबई या नगरांत झाले. सेवानिवृत्त झाल्यावर वडीलांना निर्वाहाचे नवे मार्ग शोधावे लागत होते त्यापायी स्थलांतर होत होते. बाबासाहेबांच्या वाट्याला देशाटन येत होते. १९०८ मध्ये मुंबईच्या एल्फिस्टन हायस्कूलमधून ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांच्या या यशाचे कौतुक करण्याच्या निमित्ताने भरलेल्या सभेत कृष्णाजी केळुस्कर यांनी स्वतः लिहीलेले बुध्द चरित्र आंबेडकरांना भेट म्हणून दिले तेव्हापासून बाबांना भगवान बुध्दांचा भावनिक आणि वैचारिक सहवास लाभला. शालांत परीक्षेनंतर त्यांनी एल्फिस्टन कॉलेजला प्रवेश घेतला. याच दरम्यान त्यांचा रमाबाईंशी विवाह झाला. अंगावरच्या अक्षता ओघळण्यापूर्वीच त्यांनी पुढच्या अभ्यासास आरंभ केला. १९१२ साली ते बी.ए. झाले त्यांच्या प्रतिकुल जीवन पत्रिकेत शिक्षण योग हाच राजयोग होता. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात राहून अर्थशास्त्र या विषयाच्या एम.ए. आणि पी.एच.डी. या पदव्या त्यांनी संपादन केल्या. आज बाबासाहेब असते तर त्यांच्या निवास स्थानाच्या प्रवेशद्वारावर लावलेल्या नाम फलकावर कोणकोणत्या पदव्या आढळल्या असत्या. एम.ए. (कोलंबिया) पी.एच.डी. (कोलंबिया) डी.एस.सी. (लंडन) एलएलडी (कोलंबिया) डी.लिट (उस्मानिया) बार-ॲट-लॉ (लंडन) बाबासाहेब लंडनला असताना दुपारचे जेवण टाळीत. रात्रभर वाचन करीत ग्रंथालयात जाऊन टिपणे काढीत. दिवसाकाठी सुमारे अठरा तास त्यांचा अखंड अभ्यास चालत असे. बाबासाहेब प्रचंड ग्रंथवेडे होते. हे वेड हा वडिलोपार्जित वसा वारसा होता. आपल्या मुलाच्या व्यासंगात खंड पडू नये यासाठी त्याच्या आवडीचे ग्रंथ खरेदी करणारे रामजी बाबा कधी कधी कर्ज बाजारी होत. पण पुत्राच्या पुढ्यात ग्रंथ आणून ठेवत.

ग्रंथ हेच बाबांचे अन्न होते, पक्वान्न होते. ग्रंथाविषयी आपली भावना व्यक्त करताना बाबासाहेब म्हणतात, ''

सगळ्या जगाने मला दूर लोटले तेव्हा माझ्या ग्रथांनी मला धीर दिला प्रकाश दिला दिशा दिली. माझे डोळे अधू झाल्यामूळे माझ्या वाचनात खंड पडला तर माझ्या जीवनातील स्वारस्यता संपेल माझ्या दुर्दैवाने कधी घरावर जप्ती आली, दागदागिने आणि मौल्यवान वस्तू लिलावात निघाल्या तरी मी ते सहन करीन पण ... पण माझ्या ग्रंथांना कोणी हात लावला, तर जीवाच्या कराराने मी तो कलम करीन''.

डॉ. आंबेडकर हे कलात्मक जीवन जगणारे रसिक होते; तसेच भावसंपन्न जीवन जगणारे एक प्रापंचिक पण होते. दिल्लीतील आपल्या निवास स्थानाला एका अंगाला राजप्रासादाचे आणि दुसऱ्या अंगाने मठीचे रुप त्यांनी दिले होते. बाबांची अभ्यासिका स्वयंपाकघर आणि विश्रांतीची खोली अतिशय साधी होत; पण त्यांचा दिवाणखाना आणि उरलेले घर सदैव सजवलेले असे रंगीबेरंगी फुले, अधून मधून अत्तरांचे फवारे प्रांगणात उचंबळणारे कारंजे असा डामडौल दिसे. कोणीतरी कुतुहलाने विचारले ''बाबा एकाचवेळी ही साधी आणि उच्च अशी दुहेरी राहणी कशासाठी ? डॉक्टर म्हणाले.

साधेपण माझ्यासाठी ! दिमाख तो माझ्या दलित बांधवांना आत्मप्रत्ययाची स्फूर्ती देण्यासाठी आपल्यापैकी एकजण विद्येच्या बळावर असा ऐश्वर्याचा धनी होतो हे दलितांच्या ध्यानी यावे यासाठी ! ''कन्फ्युशियस'' या तत्वज्ञाचे एक वचन आंबेडकर आपल्या अनुयायांना वारंवार ऐकवित. तो म्हणत असे ''तुमच्याजवळ दोन आणे असतील, तर एका आण्याचे अन्न खरेदी करा. दुसऱ्या आण्याचे एक फूल घ्या. अन्न तुम्हाला जगवील. फुल तुम्हाला जगावयास शिकवील.

स्व:कर्तृत्वाच्या जोरावर डॉ. आंबेडकर १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री झाले. १९४८ मध्ये त्यांना घटनेचा मसुदा लोकसभे पुढे सादर केला. मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटनेच्या संपूर्ण चर्चेनंतर घटनेचे गणराज्य सुरु होताना त्यांनी उत्तरादाखल पुढील भाषण केले त्याचा हा गोषवारा

''घटना – परिषदेच्या कामाचे जर आपण सिंहावलोकन केले तर आपणास असे दिसून येईल की ९ डिसेंबर १९४६ रोजी घटना परिषद सुरु झाल्यापासून २ वर्षे १२ महिने व १७ दिवस लोटले आहेत. या अवधीत घटना परिषदेच्या ११ बैठकी झाल्या.

घटना तयार करण्यासाठी घटना परिषदेने २९ ऑगस्ट १९४७ रोजी मसुदा समिती नेमली. तिची पहिली सभा ३० ऑगस्ट रोजी झाली. या मसुदा समितीने प्रथम घटनेचा जो मसुदा घटना समितीत सादर केला त्यात ३१५ कलमे व ८ परिशिष्टे होती बऱ्याच विचार चर्चेनंतर मसुदयातील कलमांची संख्या ३८६ पर्यंत वाढली आणि घटनेच्या शेवटच्या मसुदयात ३९५ कलमे व ८ परिशिष्टे दाखल झाली. मसुदा समितीने केलेल्या कामाची, फक्त एक अपवाद वगळून घटना परिषदेच्या सर्व सभासदांनी एक मुखाने प्रशंसा केली. हे पाहून मला अत्यंत आनंद वाटतो. मसुदा समितीने घेतलेल्या परिश्रमाचे इतक्या औदार्याने व मन:पूर्वक गुणग्रहन होत आहे घटना परिषदेच्या सभासदांनी व मसुदा समितीतील माझ्या सहकाऱ्यांनी माझ्यावर जो स्तुतीचा वर्षाव केला आहे त्यामूळे मी इतका दडपून गेलो आहे की त्याच्यासंबंधी योग्य शब्दात व पूर्णपणे कृतज्ञता व्यक्त करता येणे मला अशक्य वाटते.

फक्त अनुसूचित जातीच्या हितसंबंधाचे रक्षणकरण्याची आकांक्षा धरुन मी घटना परिषदेत आलो. त्यावेळी जास्त जबाबदारीची कार्ये माझ्यावर सोपविली जातील अशी मला यत्किंचितही कल्पना नव्हती. म्हणून घटना परिषदेने मसुदा समितीच्या सभासदांनी समितीचा अध्यक्ष म्हणून माझी जेव्हा योजना केली तेव्हा माझ्या आश्चर्यास पारावार राहीला नाही.

मी या ठिकाणी घटनेच्या गुणवर्णनात शिरत नाही. घटना कितीही चांगली व निर्दोष असली तरी जर अमंलात आणणारे नालायक व निरुपयोगी असले तर ती घटना वाईट ठरेल त्याचप्रमाणे घटना कितीही वाईट असली तरी ती राबविणारे चांगले असतील तर ती चांगली ठरेल राज्यघटनेच्या स्वरुपावर तिची अंमलबजावणी अवलंबून नसते कायदेमंडळ, मंत्रिमंडळ व न्यायधीश अशा सारखी राज्याची प्रमुख अंगे पुरविण्याचे काम राज्यघटना करीत असते. या राज्यघटनेची अंमलबजावणी ज्या घटकांवर अवलंबून असते ते घटक म्हणजे जनता व देशातील पक्षोपपक्ष हे होत.

घटनेच्या दुरुस्तीबाबत काय तजवीज आहे ती लक्षपूर्वक पाहिली असता असे दिसून येईल की घटना परिषदेने या घटनेवर परिपूर्णत्वाचा अमोघपणाचा किंवा बिनचूकपणाचा शिक्का मारण्याचा मुळीच विचार केला नाही कारण तसे केले असते. तर कॅनडाप्रमाणे घटना दुरुस्त करण्याचा

जनतेचा हक्क हिरावून घेतला गेला असता. अथवा घटना दुरुस्तीच्या बाबतीत अमेरिका किंवा ऑस्ट्रेलिया यांनी अशा लोकविलक्षण अटी घातल्या आहेत तशा घातल्या असत्या तर ते ही अयोग्य झाले असते पण तसे न करता घटनेत दुरुस्त्या करणे शक्य व्हावे अशा तऱ्हेच्या सोप्या कामकाज पध्दतीचा अवलंब करण्यात आला. या घटनेच्या टीकाकारांना मी असे जाहीर आव्हान देतो की या देशाप्रमाणे परिस्थिती असलेल्या जगातल्या कोणत्याही देशाच्या घटना परिषदेने आमच्या घटनेप्रमाणे घटना दुरुस्तीची सोय करुन ठेवली आहे हे त्यांनी सिध्द करुन द्यावे ही घटना ज्यांना अमान्य आहे त्यांना जर प्रौढ मतदान पध्दतीने निवडलेल्या सभागृहात दोन तृतीयांश बहुमत मिळविता आले नाही तर घटनेसंबंधीचा त्यांचा असंतोष सर्वसामान्य जनतेचा आहे असे म्हणता येणार नाही.

माझे भाषण मला येथेच संपविता आले असते परंतू आपल्या देशाच्या भवितव्याविषयी माझे मन इतके व्याकुळ झाले आहे की, आपले विचार व्यक्त करण्याची ही संधी साधलीच पाहीजे. असे मला वाटते. २६ जानेवारी रोजी भारत हा एक स्वतंत्र देश होईल. त्याच्या स्वातंत्र्याचे पुढे काय होईल ते तसेच अबाधित राहील की पुन्हा ते त्याच्या हातून नष्ट होईल ? माझ्या मनात पहिल्या प्रथम हा विचार येत असतो की हिंदुस्थान हा कधीकाळी स्वतंत्र देश नव्हता असे नव्हे पण मुख्य मुद्दा असा की जो देश एके काळी स्वतंत्र होता तो आपले स्वातंत्र्य गमावून बसला. पुन्हा दुसऱ्यांदा तो आपले स्वातंत्र्य नष्ट होऊ देईल का ? याच विचाराने हिंदी राष्ट्राच्या भवितव्याविषयी मला चिंता वाटते.

हिंदी राष्ट्राचे स्वातंत्र्य गेले याबद्दल मला दुःख वाटतेय पण त्याहीपेक्षा आपल्याच लोकांच्या विश्वासघातामूळे आपण स्वातंत्र्याला मुकलो याचे मला अत्यंत दुःख वाटते. महमंद बिन कासीमने जेव्हा सिंध प्रांतावर स्वारी केली तेव्हा दाहीर राजाच्या सेनापतीने मंहमद बिन कासीमकडून लाच घेतली व दाहीर राज्याच्या बाजूने लढण्याचे नाकारले. महमंद घोरीला हिंदूस्थानवर स्वारी करण्यास व पृथ्वीराजाविरुध्द लढण्यास जमचंदाने खास आमंत्रण देऊन बोलावले व त्यासाठी त्याचे आपले स्वतःचे व सोळंकी राजाचे साहाय्य देऊ केले. हिंदूच्या स्वातंत्र्यासाठी जेव्हा शिवाजी महाराज लढाया करत होते तेव्हा इतर मराठे सरदार व राजपूत राजे मोगल सम्राटांच्या वतीने लढत होते. जेव्हा ब्रिटीश लोक शीख राजे नष्ट करण्याचा प्रयत्न करत होते तेव्हा त्यांचा प्रमुख सेनापती गुलाबचंद स्वस्थ बसून राहीले.

इतिहासाची पुनरावृत्ती होईल काय? याच विचाराने माझे मन चिंताग्रस्त झाले आहे. या चिंतेत आणखी एका चिंतेने भर पडली आहे आपल्या भोवती जाती आणि पंथ या रुपाने जे आपले जुने शत्रू वावरत होते त्यात आता परस्परविरोधी विसंवादी राजकीय ध्येये असलेल्या अनेक राजकीय पक्षांची भर पडणार आहे. हिंदी जनता आपल्या पंथापेक्षा देशाला अधिक महत्व देईल काय ? की देशापेक्षा आपला पंथच श्रेष्ठ समजतील ? मला काही सांगता येणार नाही पण ही गोष्ट मात्र निश्चित आहे की देशातल्या पक्षापक्षांनी देशहितापेक्षा आपल्या पंथाला प्राधान्य दिले तर देश पुन्हा एकदा संकटात सापडल्यावाचून राहणार नाही आणि मग आपले सर्वस्व कायमचेच नष्ट होईल. या आपत्तीपासून आपण दृढ निश्चयपूर्वक आपल्या देशाचे रक्षण केले पाहिजे. रक्ताच्या शेवटच्या बिंदू पर्यंत आपण आपल्या स्वातंत्र्याचे प्राणपणाने संरक्षण केले पाहीजे.

स्वातंत्र्य, लोकशाहीचे रक्षण करु इच्छिणाऱ्यांनी कोणत्याही मोठ्या माणसाच्या चरणी आपले स्वातंत्र्य अर्पण न करणे व आपली संघटना उलथून टाकता येईल अशा प्रकारची सत्ता त्यांच्या हाती न सोपविणे. ज्या थोर पुरुषांनी देशाची आमरण सेवा केली त्या थोर पुरुषांबद्दल कृतज्ञ असणे मुळीच चुकीचे नाही पण कृतज्ञतेलाही मर्यादा आहेत. आपल्या देशाच्या राजकारणात भक्ती किंवा विभूतीपूजा जितकी आढळते तितकी जगातल्या कुठल्याही देशाच्या राजकारणात आढळणार नाही. धर्मातील भक्तीमार्ग हा आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असेल पण राजकारणातील भक्ती किंवा विभूती पूजा हा अधोगतीचा व अंती हुकुमशाहीचा निश्चित मार्ग आहे यात संशय नाही.

हिंदी समाजात दोन गोष्टींचा पूर्ण अभाव आहे हे आपण प्रारंभीच कबुल केले पाहीजे यापैकी समता ही एक आहे सामाजिकदृष्ट्या आपला समाज क्रमशील विषमतेच्या तत्वावर उभारलेला आहे म्हणजे काहीना उच्च स्थान मिळाले आहे व इतरांना हीन अवस्था प्राप्त झाली आहे आर्थिक क्षेत्रातही अशीच विषमता आहे ज्यांच्या जवळ शिगोशिग संपत्ती आहे असे काही लोक आहेत तर हजारो लोक भयंकर दारिद्र्यात खितपत पडले आहेत.

२६ जानेवारी रोजी आपण ज्या जीवनाला प्रारंभ करणार आहो ते विरोधाने भरलेले आहे. राजकारणात आपल्याला समता मिळाली आहे पण सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमताच दिसेल. राजकारणात दरडोई एक मत आणि एका मताचे एक मूल्य हे तत्व आपण मान्य करीत आहोत पण सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपल्या विशिष्ट सामाजिक आणि आर्थिक समाजरचनेमूळे व्यक्तीमूल्याचे हे तत्व पूर्वीप्रमाणेच नाकारले जाणार आहे.

हे विरोधात्मक जीवन आपण आणखी किती दिवस असेच घालविणार आहोत? आर्थिक व सामाजिक जीवनात आपण आणखी किती काळ समतेला थोपवून धरणार आहोत ? आपण जर अधिक काळपर्यंत या समतेला विरोध करीत राहीलो तर त्यायोगे आपली राजकीय लोकशाही संकटात आल्यावाचून राहणार नाही. आपण ही विषमता शक्य तितक्या लवकर नाहीशी केली पाहीजे नाहीतर विषमतेने गांजलेले लोक या घटना परिषदेने मोठ्या परिश्रमाने उभे केलेले हे राजकीय लोकशाहीचे मंदीर उध्वस्त केल्यावाचून राहणार नाही.

सभागृहाचा आता जास्त वेळ मी घेऊ इच्छित नाही. स्वातंत्र्य हे आनंदाची गोष्ट आहे यात मुळीच संशय नाही पण आपण हे विसरता कामा नये की या स्वातंत्र्याने आपणांवर अनेक मोठ्या जबाबदाऱ्या टाकल्या आहेत. आता यापुढे काही चुका झाल्या तर त्याचे धनी आपणच आहोत व त्याचा दोष आपणच घेतला पाहीजे.

ज्या घटनेत आपण जनतेसाठी जनतेचे व जनतेने चालविलेल्या ''राज्याचे तत्व अंतर्भूत केले आहे ती घटना जर दीर्घकाळपर्यंत टिकावी अशी आपणास इच्छा असेल तर आपणापुढे जी संकटे वाढून ठेवलेली आहेत ती समजून घेण्यास आपण विलंब लावता कामा नये. तसेच त्याचे निराकरण करण्यास असमर्थ राहता कामा नये देशाची सेवा करण्याचा हाच मार्ग आहे''



## नवी पहाट

घटिका असेल जरी कष्टी तू खचू नको मनाने
रात्र असेल जरी वैऱ्याची तू पळू नको भयाने ।।

झाडांना या फुटेल पालवी टवटवीत होतील फुले
आशेच्या नव किरणांसंगे पक्षी गातील गाणे ।।

हार आली जी पदरी तुझ्या तिलाच बनव प्रेरणा तुझी
उठून लढ तू मर्दा आता हीच कसोटीची वेळ तुझी ।।

सोडू नकोस रणांगण तू पराभवाच्या भितीने...
ढळू देऊ नकोस विश्वास तू धीर आपला सोडू नको ।।

तमा नसावी वादळाची घेतला वसा टाकू नको
होईल सोन्याहुनी पिवळे श्रावण भासेल बारा महिने ।।

लढत रहा तू लढत रहा जगायचे तर शूराचे जिणे
उद्या होईल नवी पवी पहाट तुझ्या यशाच्या साक्षीने ।।

## कार्यसिध्दी

आडवे येतील कितीही, खेचतील पाय कितीही
चालायचे थांबणार नाही, मी खचलो जरी कितीही ।।


मुद्दाम चटके ते देतील, वाटेवर काटे टाकतील
माझे एकाग्र चित्त पाहून, ते चकित होऊन बघतील ।।

छळ करतील दुष्ट जन, लुबाडतील माझे धन
पण कसे पळविणार ते, माझे स्वप्न, चिकाटी मन ।।

ते करतील नाना वल्गना, दुखवतील माझ्या भावना
पण माझा विश्वास तोडून, कशी चिरडणार माझी प्रेरणा ।।

माझ्या भोवतीच्या गोष्टींचा, ते करतील नायनाट
पण ते कशी अडविणार, माझ्या अंतरीची लाट ।।

माझी जिद्द माझा ध्यास, माझी शक्ती माझा विश्वास
एवढेच पुरेसे आहे, कार्य सिध्दिस नेण्यास ।।




# अणुयुगातील शांतीदूत डॉ.होमी भाभा


गगन हेच ज्याचे सदन मानले जाते. त्या परम चैतन्याचे नेमके निवासस्थान तरी कोणते ? ते जळी स्थळी, काष्ठी पाषाणी असते असे म्हणतात खरे पण तरीही त्याला अधिक निकटचे स्थान कोणते ? विश्वरुपात नटलेले हे तत्व अणूच्या गर्भात दडी देऊन बसते आणि एक प्रकारचा लपंडाव खेळते त्याच्या अणुस्वरूपाचे आकलन घडल्याशिवाय त्याचे विश्वरुपदर्शन अशक्य आहे असा निर्वाळा एका विज्ञानवेत्याने दिला. पुढे त्याने असेही सांगितले, की अणूच्या गर्भात दडलेली चेतना प्रसन्न झाली तर पंचमहाभूतांवर प्रभुत्व संपादन करता येईल आणि या भूमंडळाच्या ठायी स्वर्ग संपन्न असे नवे नंदनवन निर्माण होईल. येथून पुढे जगभर वीज आणि इंधन यांचा तुटवडा पडेल. या संकटाचे निवारण व्हावे यासाठी अणुउर्जेची दारे ठोठावणे हाच एक मार्ग आहे. नियंत्रित अणु विच्छेदन आणि अणु उर्जेचा विवेकी वापर हा जगाच्या भाग्योदयाचा राजमार्ग ठरेल कालपटावरून झेपावत जाणाऱ्या आपल्या प्रतिभेने ज्याने हे जग पाहिले, जाणले व सूचित केले तो क्रांतीदर्शी विचारवंत म्हणजे डॉ होमी भाभा.





डॉ. भाभा यांचा जन्म ३० ऑक्टोबर १९०९ या दिवशी मुंबईत झाला. त्यांचे आजोबा हे म्हैसूर संस्थानचे दिवाण होते. वडील हे टाटांच्या उद्योग परिवारात एक अधिकारी म्हणून काम करीत. ज्ञान विज्ञानाची ओढ त्या घरकुलात घर करुन राहीली होती. मुलांनी शिकावे आणि आचार विचार संपन्न व्हावे हा आई वडीलांचा आग्रह होता. बालपणी डॉ भाभांना निद्रानाश हा विकार जडला त्यांची वैद्यकिय तपासणी करण्यात आली. एका युरोपियन डॉक्टराने निदान केले की बाळ महाबुध्दीमान आहे त्याची विचारचक्रे अहोरात्र फिरत राहतात. त्याच्या चित्ताला असणाऱ्या चिंतनशिलतेच्या तारा क्षणाक्षणाला थरथरतात आणि त्यामूळे त्याला अस्वस्थता प्राप्त होते. वाढत्या वयाबरोबर मज्जासंस्था बलवान होईल आणि विचारांचे ओझे तिला सहज पेलेल. होमी भाभांना संगीताची उपजतच जाण होती पाळण्यात असताना ते रडू लागले म्हणजे















त्यांची आई अभिजात संगीताची ध्वनीमुद्रिका लावत असे गाणे सुरु झाले की रडणे थांबत असे. भाभांना लहानपणी ठोकळे जोडणे आणि जुळवणे हा खेळ फार आवडत असे. त्यांच्या कल्पकतेला हा खेळ मानवत असे. त्यांच्या मनातले आकृतीबंध साकार करण्याची संधी या खेळामूळे त्यांना मिळत असे.

डॉ. भाभांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कॅथाडील व जॉन कॉनन या विद्यालयात झाले पंधराव्या वर्षी सिनियर केंब्रिज ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी दोन वर्षे एलफिस्टन कॉलेज व रॉयल इन्स्टिटयूट ऑफ सायन्स या संस्थात काढलेल्या वयात त्यांनी आईन स्टाईनचा सापेक्षतावार अभ्यास प्राध्यापकांना जे अगम्य वाटे त्याची रम्यता हा विद्यार्थी अनुभवत असे आपल्या या मुलखावेगळ्या मुलाला वेगळ्या मुलखात वाढविले पाहिजे असे वडिलांना वाटे त्यांनी त्यांचे नाव केंब्रिज विद्यापिठात दाखल केले. मुलाने कोणत्या विषयाचा अभ्यास करावा. याविषयी घरभर चर्चा झाली. मुलाला गणितात गोडी होती, त्यात त्याची गती होती. पण वडिलांना मात्र वाटे की, मुलाने टाटांच्या परिवारात राहता यावे यासाठी तरी अभियात्रिकीचे अध्ययन करावे. होमी भाभांनी ते मानले कारण त्यांनी केंब्रिज विद्यापीठाचा इंजिनिअरिंगची निवड केली तरी त्यांच्या आवडीचा विषय होता. विज्ञान संशोधन व सिध्दांत पध्दती १९३० च्या पदवी परीक्षेत त्यांना मिळालेले



यश जगाच्या नजरेत भरले विविध शाखातील त्यांच्या प्राविण्याबद्दल ॲडम्स व हापकिन्स पारितोषिक त्यांना देण्यात आले. न्यूटन स्कॉलरशीपचे ते मानकरी ठरले एवढी पारितोषिके व शिष्यवृत्ती मिळविणारे 'एकमेव भारतीय' म्हणून लोक त्यांना ओळखित. बी.ए.च्या पदवीनंतर ४ वर्षांनी त्यांनी पी.एच.डी. ही पदवी संपादन केली त्यावेळी त्यांचे वय अवघे पंचवीस वर्षे होते.

डॉ भाभांनी विज्ञान विचारांची गंगा भारतात आणली. भारत हा विज्ञान क्षेत्रात अग्रभागी राहावा असे त्यांना वाटत होतेच जवाहरलाल नेहरूंच्या आशिर्वादाने आणि टाटा ट्रस्टच्या सहकार्याने मुंबई येथे एक संशोधनसंस्था उभी केली. टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्च ही संस्था अस्तित्वात आली. त्यापूर्वी डॉ भाभांनी बंगळुर येथे इंडियन इन्स्टिटयुट ऑफ सायन्स या संस्थेत प्रपाठक आणि प्राध्यापक म्हणून काम केले होते. पण ते काम दुय्यम स्वरुपाचे होते त्याला स्वयंभूपणा नव्हता. परंतू हे सर्व क्षणात घडले नाही. भाभांनी सुरवातीला आपल्या आत्याच्या घरी आपला शास्त्रसंसार थाटला ज्या खोलीत जन्म झाला. त्या खोलीत त्यांनी कार्यालय उघडले. नोकरांच्या खोल्यात संशोधक प्राध्यापक राहू लागले.

नृत्यदालनात ग्रंथालय सजले संस्थेची पावले प्रथम हळूहळू मग वेगाने पडली आज ती प्रसन्न परिसर, विस्तीर्ण वास्तू आणि संशोधन मग्न अभ्यासक या वैभवानिशी उभी आहे १९४५ साली स्थापन झालेल्या या संस्थेचे पहिले डायरेक्टर भाभा हेच होते. या संस्थेच्या उभारणीनंतर डॉ भाभांच्या कर्तृत्वाचे वारे दशदिशांना वाहू लागले या वाऱ्यांना झंझावाताचे बळ प्राप्त झाले. १९४८ मध्ये भारत सरकारच्या अणुउर्जा आयोगाचे पहिले अध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती झाली त्यानंतर १९४५ मध्ये स्वतंत्र खाते होऊन ते सचिव झाले. त्यानंतर शास्त्र सल्लागार म्हणून कार्यरत राहीले पदामागून पदे वाटेत येत राहीली. भारत आणि परराष्ट्रातील अनेक विद्यापिठांनी त्यांना डॉक्टरेट देऊन गौरविले.

त्यांचे जीवन मानसन्मानाची वाहती गंगा झाली. भारत सरकारने पद्मभूषण देऊन १९४५ मध्ये गौरविले. डॉ भाभांनी जपानमधील अणुबॉम्ब स्फोटापूर्वी या दुर्घटनेपूर्वी कितीतरी अगोदर सावधानतेची सूचना दिली होती. एखादे वरदान शापासमान ठरते ते त्यांच्या गैरवापरामूळे शास्त्रज्ञांनाही विवेकाची बांधिलकी नाकारता येत नाही हे सत्य निर्धाराने सांगणारे शास्त्रज्ञ म्हणजे डॉ होमी भाभा. डॉ होमी भाभा म्हणजे अव्यभिचारी विज्ञाननिष्ठेचे व संशोधनशीलतेचे प्रतिकच होय. स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणत 'विज्ञान हा आमचा पंचवेद झाला पाहिजे' डॉ भाभा हे या पंचमवेदाचे आचार्य होते.

२२ जानेवारी १९६६ रोजी डॉ भाभांनी दिवंगत पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांना श्रध्दांजली वाहिली आणि २४ जानेवारी या दिवशी त्यांना श्रध्दांजली वाहण्याची वेळ आली. एका शास्त्रीय परिषदेला जिनिव्हाला निघालेले कांचनगंगा हे एअर इंडियाचे बोईंग विमान डॉ भाभांना प्रिय असणाऱ्या नितांत सुंदर आल्प्स पर्वताच्या माऊंट ब्लॉक या सर्वोच्च शिखराजवळ क्षणभर रेंगाळले आणि एकदम कोसळले त्या शिखरावर कळस चढविण्याचे काम नियतीने आपल्या पध्दतीने केले एका शांतीदूताने शांतपणे जगाचा निरोप घेतला.





डॉ.होमी भाभा इन्स्टियुट



# कहाणी एका जिद्दीची
# जे आर डी टाटा

उद्योग म्हणजे साहस, मोठा उद्योग म्हणजे मोठे साहस, मनातील जिद्द, अमर्याद कष्ट करण्याची कुवत, धोका व जिम्मेदारी पत्करण्याची तयारी आणि चतुर चाणाक्षपणा असल्याखेरीज ही साहसे यशस्वी होत नाहीत. जिद्द आणि जिज्ञासा जीवंत असेल तर माणसाला स्वत:चे विश्व निर्माण करता येते, यशस्वी होता येते. प्रयत्नाच्या प्रत्येक पावलाचे यशात रुपांतर करण्याची जिद्द आणि जिज्ञासा बाळगणारे व्यक्तीमत्व म्हणजेच जे आर डी टाटा

जे आर.डी. चा जन्म पॅरीस येथे १९०४ साली झाला. जमशेटजी टाटा यांचे चुलत बंधू दादाभाई हे त्यांचे वडील हिरे, माणके व इतर जवाहीर यांचा व्यापार करण्यासाठी दादाभाई फ्रान्समध्ये स्थायिक झाले. तेथेच दादाभाईनी सुझान ब्रेअरी या फ्रेंच महिलेशी लग्न केले. धर्मांतरानंतर सुझान ब्रेअरी यांचे नाव सुनु झाले. हीच जे आर डी ची आई जे आर डी ची मातृभाषा फ्रेंच असल्यामूळे ते फ्रेंच अस्ख्यलित बोलू शकत असत. लहानपणी फ्रेंचशिवाय त्यांना कोणतीही भाषा येत नसे. वडीलांबरोबर फ्रान्स इंग्लंड जपान येथे सारखी भ्रमंती करावी लागल्यामूळे त्यांच्या शालेय शिक्षणाची आबाळच झाली. काही दिवस पॅरीसमधील जॉन्सन बसेली या शाळेत एक वर्ष तर मुंबईच्या कॅथेड्राल हायस्कूलमध्ये एक वर्ष असे त्यांचे शिक्षण चालू होते.

जे आर डी च्या १५ व्या वर्षी त्यांचे वडील भारतात परत आले व त्यांनी आपली पेढी येथे उघडली त्यावेळी जे आर डी ना फक्त फ्रेंच नीट बोलता येत होते इंग्रजी मोडकेतोडके नि गुजराती भाषा तर अजिबात येत नव्हती. त्यांच्या वडीलांची पेढी पारसी बझार गेटमध्ये होती. जे आर डी ना त्यांनी लगेच पेढीवर कामाला लावले. मुलाला त्यांनी ताकीद दिली 'पेढीवर तु माझा मुलगा नाहीस, पेढीचा नोकर, असिस्टंट ! वाटेल ते काम तुला करावे लागेल. पोस्टात जा, तार कर, पत्र लिही, वसुलीला जा, जे सांगेल ते इतर नोकरांप्रमाणे करावे लागेल वडीलांच्या आज्ञेनुसार त्यांनी ही सर्व कामे आनंदाने केली १९२२ साली वयाच्या १८ व्या वर्षी ते टाटा कंपनीत प्रविष्ट झाले. इंग्रजी शिकण्यासाठी त्यांनी स्वतंत्र शिकवणी लावली ते त्यामध्ये पारंगतही झाले मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इंजिनिअरींगच्या शिक्षणाला ते मुकले होते परंतू यंत्रे हाताळुन, चालवून, दुरुस्त करुन त्यांची जुळवणी करुन जे आर डी कार्य






कुशल इंजिनिअर झाले तो त्यांचा आवडता विषय होता. घरी एका खोलीतच त्यांनी प्रयोगासाठी वर्कशॉप रचले होते. त्यांना तांत्रिक कामाचा विलक्षण छंद होता. कोणतेही यंत्र बिघडले तर स्वत: दुरुस्त करीत. १९२५ साली वडीलांच्या मृत्यूनंतर जे आर डी डिरेक्टर झाले. १९२९ साली जगभर मंदीची लाट असताना जे आरडीनी अतिशय प्रतिकुल परिस्थितीत आपल्या कर्तृत्वाने कंपनीचा डोलारा सांभाळला. प्रतिकुल परिस्थितीवर जिद्दीने प्रहार करत या उद्योग व्यवसायात चैतन्याचे चांदणे फुलविणरे जे.आर.डी. वयाच्या ३४ व्या वर्षी १९३८ साली. टाटा उद्योग समूहाचे अध्यक्ष झाले व ५३ वर्षांच्या त्यांच्या कुशल नेतृत्वामूळे टाटा उद्योग समूहाने विविध उद्योग व्यवसायात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला.

जमशेटजी टाटा यांनी भारतात औद्योगिक क्रांती घडवून आणुन देशात पोलाद उद्याग सुरु केला. जल विद्युत शक्तीची निर्मिती केली आणि उच्च पातळीवरचे तंत्रशिक्षण दिले जेव्हा १९३८ साली जे आर डी नी टाटा उद्योग समूहाची सूत्रे हाती घेतली तेव्हा टाटांच्या उद्योग समूहात पोलाद कंपनी, काही कापड गिरण्या ताज हॉटेल आणि काही विश्वस्त संस्था होत्या. ५३ वर्षांच्या यशस्वी कार्यकालानंतर जेव्हा जे आर डी १९९१ साली चेअरमन पदावरुन निवृत्त झाले तेव्हा टाटा उद्योग समूहास ७५ मोठ्या कंपन्या होत्या आणि त्यांची वार्षिक उलाढाल होती १५००० कोटी रुपयांपेक्षा जास्त टाटा उद्योग समूहाचे विशेष म्हणजे त्यांनी औद्योगिक संपत्ती निर्माण करताना ती राष्ट्रासाठी व राष्ट्र संपन्न करण्यासाठी करीत आहेत याचे सदैव भान ठेवले

टाटा उद्योगसमूहातील एवढ्या मोठ्या संख्येने असणाऱ्या अवाढव्य कंपन्या चालवायच्या म्हणजे कर्तबगार व गुणी माणसांचा शोध सतत घ्यावा लागत असे. अशा माणसांची गरज लागल्यावर त्याच्या शोधात न लागता विविध क्षेत्रातल्या प्रतिभावंत व कर्तबगार माणसांच्या सतत शोधात राहायला हवे असे जे आर डी चे मत होते. एखादी गुणी व्यक्ती टाटा उद्योग समूहात असेल. तिच्या क्षमतेचा पूर्ण उपयोग करुन घेतला जात नसेल तर त्यासाठी चांगली संधी व योग्य जबाबदारी देणे आपले काम आहे असे त्यांना वाटत असे. चांगली व्यक्ती टाटा उद्योगसमूहा बाहेर असेल तर त्याला टाटामध्ये रुजू होण्यासाठी उद्युक्त करणे हे आपले काम आहे असे ते समजत. याबाबतीत

# JRD:

# LEGEND LIVES ON

दरबारी सेठ यांचे उदाहरण पुरेसे बोलके आहे टाटा केमिकल्समधील एक तरुण अभियंते सोडा अॅश बनविण्याची प्रक्रिया गुप्त ठेवली होती मी ही अशक्य वाटणारी गोष्ट शक्य करुन दाखवतो. असे दरबारी सेठ यांनी संगितल्यावर जे.आर.डीनी त्यांच्यावर जबाबदारी टाकली. या कामात ते यशस्वी झालेच १९७० पर्यंत कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक पदापर्यंत त्यांना बढती मिळाली. १९८२ मध्ये ते टाटा केमिकल्सचे अध्यक्षही झाले. जे आर.डींचे ते जवळचे व विश्वासू सहकारी होते. या पध्दतीने एकापेक्षा एक उत्तुंग व्यक्तिमत्वाची विलक्षण कर्तबगारीची माणसे त्यांनी टाटा उद्योग समूहात जोडली. नानी पालखीवाला मिजू मोनी, फेडी मेहता मिनू मसानी, एच. एन. सेठ ना रोजा, रामण्णा, सुमंत मुळगांवकर अशी एक ना एक दिग्गज माणसे जे आर डी टाटा उद्योग समूहाशी जोडली होती. इन्फोसिसच्या सौ सुधा मूर्ती या टेल्कोमध्ये इंजिनिअर म्हणून नोकरीला होत्या टेल्को कंपनी सोडताना त्यांनी जे आर डींची शेवटची भेट घेतली त्या म्हणाल्या ''माझा नवरा नवा स्वतंत्र उदयोग सुरु करतो आहे. मी नोकरी सोडून पुण्याला जात आहे यशस्वी होऊ की नाही सांगता येत नाही'' यावर जे आर डी उत्तरले ''अशा नकारात्मक भावनांनी नव्या उद्योगाची सुरुवात करु नका. यश मिळेलच असा विश्वास वाटायला हवा आणि जेव्हा यश मिळेल तेव्हा समाजाने तुम्हाला अनेक हस्ते दिलेले देणे परत समाजाला दयायला विसरु नका. माझ्या शुभेच्छा तुमच्या पाठीशी आहेत'' जे आर डींच्या तोंडून जणू नियतीच बोलत होती. जे आर डींच्या या चार वाक्यांनी माझे सारे आयुष्यच बदलून गेले असे सौ सुधा मूर्ती सांगतात.

टाटा उद्योग व्यवसायाचा विकास करत असताना त्यांनी सामाजिक भानही जपले. देशात विज्ञान संशोधन व्हावे उच्च प्रतिचे शास्त्रीय व तांत्रिक शिक्षण मिळावे उर्जा क्षेत्रात संशोधन व्हावे. नाट्य, नृत्य संगीत या क्षेत्राला उत्तेजन मिळावे म्हणून व संस्थांची निर्मिती केली या संस्थाच्या माध्यमातून देशाला शास्त्रज्ञ, संशोधक कलाकार, समाजसेवक नेते निर्माण करण्यासाठी टाटा उद्योगसमूहाने जे कार्य केले ते एकमेव द्वितीय असे आहे त्यापाठीमागे प्रेरणा होती जे आर डी टाटांची ! उद्यागेपती हे मिळविलेल्या धनाचे फक्त विश्वस्त आहे हा महात्मा गांधीचा विचार त्यानी कृतीत आणला. वीज, पोलाद विज्ञान या क्षेत्रात टाटांनी काम करावे ही जमशेटजी' टाटांची इच्छा या मिवेदेचा टोलेजंग विकास तर जे आर डी नी घडवून आणलाच पण त्याच्या बाहेर जाऊन उद्योगधंदयाची

अनेक क्षेत्रे त्यांनी धुंडाळली त्यात नुसता प्रवेश मिळविला असे नव्हे तर त्यांत उच्च स्थान मिळविले. एवढ्यानेच त्यांचे समाधान झाले नाही. त्यांच्या कर्तृत्वाला पंख फुटले आणि अक्षरश: त्यांनी आसमान गाठले. भारतात विमान विद्या प्रथम त्यांनी आणली खाजगी क्षेत्रात विमान वाहतूक प्रथम त्यांनी सुरु केली. पुढे सरकारने त्याचे राष्ट्रीयीकरण करताच एअर इंडियाची धुरा वाहून त्यांच्या विलक्षण साहसप्रियतेने ती त्यांनी सफल करुन दाखविली १९५३ साली एअर इंडियाच्या स्थापनेपासून १९७८ पर्यंत २५ वर्षे ते एअर इंडियाचे अध्यक्ष होते. एअर इंडियाच्या संवर्धनात आणि भारताला हवाई वाहतूकीत जगात मानाचे स्थान मिळवून देण्यात जे आर डींचा सिंहाचा वाटा आहे जे आर डी हे पहिले भारतीय पायलट होते १० फेब्रुवारी १९२९ रोजी त्यांना हे प्रमाणपत्र मिळाले त्यावरचा क्रमांक होता एक खासगी लायसेन्स मिळविणारे ते पहिले ग्रहस्थ जे आर डी हे असंख्य तरुण वैमानिकांचे आदर्श होते. आपल्या भारतीय वायुदलाचे ते सन्माननिय एअर व्हाइस मार्शल होते.

विविध क्षेत्रात उत्तुंग यश संपादन केलेल्या टाटांचा परीचय सर्व जगाला व्हावा या उद्देशाने The World's Hundred Most Important Persons" या पुस्तकासाठी अमेरिकन प्रकाशनासाठी जे आर डींची संपूर्ण माहिती मागितली होती. तसा लेख तयार करुन त्यांचे खाजगी सचिव श्री भाभा यांनी त्यांच्याकडे मान्यतेसाठी पाठविला त्यावर जे आर डींचे उत्तर आहे ''माझ्या मृत्यूलेखासारखा वाटणारा लेख मला मिळाला. चांगला वाटला. योग्य वेळ येईपर्यंत तो ठेवून दयावा. जगातील १०० महत्वाच्या व्यक्तीमध्ये माझा समावेश करायला हरकत आहे असे त्यांना कळवा पण हा आकडा १० असेल तर माझी हरकत नाही'' असे हे उत्तुंग व्यक्तीमत्व !

टाटांच्या दुरदृष्टीमूळे सध्या सहा खंडातील ५४ देशात टाटा उद्योग



समूहाच्या कंपन्या कार्यरत आहेत. टाटा उद्योगसमूहाची ही गरुडभरारी व देशाच्या प्रगतीमधील त्यांच योगदान यांचा उचित सन्मान करण्याच्या उद्देशाने १९९२ साली भारत सरकारने 'भारतरत्न' या सर्वोच्च पुरस्काराने त्यांना सन्मानित केले.

अनेकविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या या कर्तबगार व देशभक्त उद्योगपतीचे १९९३ साली निधन झाले. एका सभ्य सुसंस्कृत नि संपन्न व्यक्तिमत्वाला, त्यांच्या अजोड कर्तृत्वाला मानाचा सलाम !







# जिव्हाजड ... झाला महान वक्ता !
# डेमॉस्थेनिस

सभा संमेलने ही संस्कृतीची भूषणे होत. धर्म, साहित्य, तत्वज्ञान व राजकारण या सर्वच क्षेत्रांत अधिवेशने आणि परिषदा यांना अधूनमधून मोहोर येतो. ही आजकालची गोष्ट आहे. एक काळ असा होता, की बोलणे. हे दुर्मिळ होते. लोकमत प्रदर्शनाचे व परिवर्तनाचे ते एकमेव साधन होते ...

ग्रीस देशात लहानसहान नगरराज्ये होती. त्यांचे भवितव्य प्रभावी वक्तृत्वाने आकाराला येत असे. माणसांची संपर्कक्षमता मर्यादित होती. अनेकांनी एका वेळी ऐकें ठिकाणी येणे, सरळ सरळ आणि उघड मुक्त विवेचन करणे, हा एकच लोकप्रिय व लोकमान्य मार्ग होता. तेव्हा प्रभावी वक्तृत्व हा सर्वज्ञतेचा अविष्कार मानला जात असे.

अशा काळात वक्ता होण्याचे स्वप्न एक युवक पाहत होता. त्याच्या वाट्याला आलेले व्यक्तिमत्वाचे द्रव्य अनेक अंगांनी अपुरे होते. तेवढ्याने वक्ता होणे शक्य नव्हते. अंगात बळ नव्हते. पण मनाची धाव मोठी होती. धावत्या मनामागे दुबळे शरीर ओढले जात होते. शरीर व मन यात संवाद प्रस्थापित करु पाहणारी प्रबळ इच्छाशक्ती त्या कुडीत वास करीत होती. तो बालपणी तसा मुखदुर्बल होता. त्याची प्रकृती बेताचीच होती. जीभ जड होती. उच्चारात स्पष्टता नव्हती. आवाज कोता आणि कमकुवत होता. बोलण्यात झेप नव्हती. त्याने बोलावे आणि इतरांनी ऐकावे असे काहीच नव्हते तरीही त्याला वक्ता होण्याचे स्वप्न पडत होते तो त्याचा ध्यास होता त्याचे नाव डेमॉस्थेनिस

वक्ता होण्यासाठी काय लागते, याचे त्याने गणित मांडले. आपले व्यक्तिमत्व प्रसन्न असले पाहिजे. आपले हावभाव आणि अविर्भाव आकर्षक आणि लक्षवेधी असले पाहिजेत; पण हे मार्दव, हे आर्जव आणि हा प्रभाव आणायचा कुठून ? तो संपादन करायचा कसा ? अनुकरण करायचे कोणाचे ? मार्गदर्शन तरी घ्यायचे कोणाचे ? त्याच्या मनात प्रकाश पडला. एका नाटक कंपनीच्या परिवारात त्याने प्रवेश मिळविला पडेल ते काम पत्करले मंचावरुन घडणारा अनेक भूमिकांचा वावर पाहिला. नटांचा अभिनय, वाणीचा विलास आणि प्रेक्षकांची दाद यातील सूत्र अभ्यासले त्याच्या उपजत बुध्दीला जाग आली, जाण आली.

बोलणे हे काम तसे हिमतीचे होते तेव्हा समोर ध्वनिवर्धक नव्हता, श्रोताही संस्कारित नव्हता. काही अवखळ आणि ओढाळ मंडळीही पुढे असत. या सर्वांना सावरुन सभा बांधावी लागत असे. मग तिच्यात जीव ओतता येत असे. कोता, कमकुवत आणि कापरा आवाज हा चमत्कार कसा घडवू शकणार होता ? निसर्गाने हात राखून दिलेले देणे, त्याचे लेणे करावयाचे कसे ? इच्छा उत्कट होती. मार्ग सापडला. डेमॉस्थेनिस रोज धावण्याचा सराव करु लागला. टेकड्यांवरून चढउतार करु लागला. त्याची श्वसनशक्ति मजलेदार झाली. पल्लेदार वाक्य धाप न लागता त्याला पेलता येऊ लागले, तरी एक अडचण जाणवली. आवाज पल्लेदार झाला, पण दमदार झाला नाही. त्याला वजन, विस्तार आणि व्याप्ती नव्हती तो घुमत नव्हता. डेमॉस्थेनिस सागर तीरावर जाऊन, मोठ्याने बोलू लागला. लाटानां साक्ष ठेवून. त्यांनाच श्रोते मानून त्यांचा सळसळ व खळखळ मागे लोटून आवेगाने बोलत राहिला. त्याची वाणी खणखणीत झाली. गालावरचे मुद्रेवरचे आणि जिभेचे स्नायु बळकट व्हावेत म्हणून काही काळ लोकभ्रमाच्या आहारी जाऊन तो तोंडात गारगोट्या धरुन बोलण्याचा प्रयत्न करीत असे यात थोडी गंमत आणि वेडेपणा होता.

एवढी पूर्वतयारी झाली खरी; पण तेवढ्याने डेमॉस्थेनिसचे समाधान नव्हते. बोलण्यासाठी शब्दांचे लावण्य हवे, भाषेचे सौष्ठव हवे. ते कोठून आणायचे ? डेमॉस्थेनिस ग्रंथ – शरण झाला. त्याने थुसिडिडिज या लेखकाचा इतिहासग्रंथ अनेकदा वाचला. काही काळ तो अक्षरश आणि विरामश उतरवून काढला. त्याच्या ओठात आणि बोटात भाषा भिनली. 'दिवसा माजी काही तरी ते लिहावे । प्रसंगी अखंडीत वाचीत जावे ।' हे समर्थ वर्तनसूत्र तो आजन्म आचरत राहिला . त्याने डोळे उघडे ठेवले. कानामनाने जीवन टिपले. मग तो मनोभावे बोलतच राहिला. तो त्याच्या काळातील वक्तृत्वाचा महामेरु ठरला.

# जागर : स्त्री शक्तीचा

भारतीय संस्कृती ही पूजनाची प्रतीक आहे. मग जे पूजन नागाचे असो वा बैलाचे. भावांचे असो वा पतीचे. ईश्वराचे असो वा अन्य कुणाचे. एवढेच काय 'ईडा-पीडा जावो, बळीचे राज्य येवो' असे म्हटले जाते. यालाही हिंदू संस्कृतीत महत्व आहे. अशा संस्कृतीत स्त्रीपूजन म्हणजेच आई जगदंबेचे पूजन हे सर्वांत मोठे व नऊ दिवस, नऊ रात्र चालते. हे शक्ती उपासनेचे दिवस असतात. त्यालाच आपण नवरात्र असे म्हणतो.

नवरात्र आणि आई जगदंबेबाबत अनेक आख्यायिका सांगितल्या जातात. त्यांपैकीच एक आख्यायिका म्हणजे महिषासुराचा वध. त्यातील आशय पुढीलप्रमाणे आहे. पृथ्वीतलावर सर्व सज्जनांना त्रास देणारा महिषासुर नावाचा राक्षस होता. स्वत:च्या राक्षसी महत्वाकांक्षेमुळे त्याने सर्वत्र प्रचंड विध्वंस सुरु केला होता. देवी-देवतांनाही सळो की पळो करुन सोडले होते, तेथे सामान्यांचे काय ? त्याच्या या कुटिल कृत्याला कंटाळून शेवटचा उपाय म्हणून साधूंनी ब्रम्हा-विष्णू-महेश यांची आराधना केली. त्रिमूर्ती प्रसन्न झाली. भक्तांसाठी धावून आले. त्यांच्या पुण्यप्रकोपातून दैवी शक्तीचा उदय झाला. या दैवी शक्तीने नऊ दिवस अविरत युध्द करुन महिषासुराचा वध केला. सगळ्यांना त्रासातून मुक्त केले. ही दैवी शक्ती म्हणजेच अंबा अर्थातच जगदंबा.



आतही अनेक महिषासुर

महिषासुराच्या वधानंतर जगदंबेची अख्यायिका संपते का ? तर नाही.

कारण त्यानंतर हजारो वर्षाचा काळ लोटला. त्या कालावधीत अनेक आसुरी शक्तींनी आसुरी प्रभाव दाखविला. ती शक्ती काळाच्या ओघात नष्टही झाली. त्यांची आसुरी वृत्ती आजही जिवंत आहे. त्याचप्रमाणे दैवी वृत्तीही आज अस्तित्वात आहे. ही आसुरी वृत्ती म्हणजे नेमके काय ? तर,

'असुषु रमन्ते इति असुर:।' ही वृत्ती इतरत्र कुठे नसून माणसाच्या अंत:करणात आहे. तसेच प्राणात व जिवातच रमेलेली आहे. आज एकविसाव्या शतकात या आसुरी वृत्तींमुळे झालेले विध्वंस दैनंदिन वर्तमानपत्रात रोज वाचत असतो. कुणी तरी उठतो, विनयभंग करतो. कुणी बलात्कार करतो. कुणी लुटमार करतो. लाचखोरांपासून देशद्रोह्यांपर्यंत ही आसुरी वृत्ती फोफावत चालली आहे. याला कोण आवर घालणार ? कोण पुन्हा त्रिमूर्तीला प्रसन्न करण्यासाठी तपश्चर्या करणार ? मग कुठली जगदंबा धावून येईल ? आज असे काही घडणार नाही ! आपल्यातील दैव शक्तीच जागृत करावी लागणार आहे आणि असे घडूही शकते.

आचार्य मंत्राचा 'सार'

**'अहं राष्ट्रीय संगमनी वसूनां**
**चिकितुषी प्रथमा यज्ञियानाम्'** ... असे ऋग्वेदात सांगितले आहे. आचार्य विनोबा भावे यांनी या प्रकारचे उदात्त ज्ञानाचे वेदामृत निवडले. 'ऋग्वेदसार' नावाचा ग्रंथ

लिहिला. त्या ग्रंथालाच आचार्य मंत्र म्हणतात. या मंत्राचे 'सार' असे आहे – एके काळी स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य होते. जसे पुरुष ब्रम्हवादी होऊन गेले, तसेच स्त्रियाही ब्रह्मवादिनी होऊन गेल्या. म्हणूनच स्त्रियांची सूक्तेही वेदांमध्ये येतात. अंभृणी नावाच्या एका ऋषिकन्येचे हे सूक्त आहे. ती ईश्वराचा गौरव करताना म्हणते, 'परमात्म्याची कृती माझीच कृती आहे. अशा आध्यात्मवादाच्या पवित्र हिंदुस्थानात आपण वावरत असताना चिमूटभर महिषासुरांची भीती का बाळगावी ? आज आपल्याला आपली आदिशक्ती जागृत करुन मस्तवाल रेडयांना चिरडायची वेळ आली आहे. या विचारसरणीचा स्वामी विवेकानदांनीसुध्दा पुरस्कार केला आहे.'

उठा, जागे व्हा !

**'उत्तिष्ठित जाग्रत प्राप्य वरान्निबोधत'**

ऊठा जागे व्हा ! व ध्येय प्राप्त केल्याविना थांबू नका ! जगाला कित्येक शतके देता येईल. इतका आध्यात्मिक साठा आपल्याजवळ आहे. मात्र, आपण कल्पनाप्रिय व भावनाप्रधान असल्यामुळे आपली हेटाळणी होत आहे.

आज स्त्रीजातीवरील होणारा अन्याय बघितला, की क्षणभर रक्त सळसळते. दुसऱ्याच क्षणाला आपण थंडगार पडतो. इथे होणारा अन्याय हा एका स्त्रीचा नाही, तर संपूर्ण समाजाची झालेली विटंबना आहे, हे जोवर आपल्या मनात ठरत नाही, तोवर स्त्री मुक्त होऊच शकत नाही.

तुकडोजी महाराजांचा उपदेश


संस्कृती म्हणजे फक्त बाह्य ऐषआराम नव्हे, तर माणसाला नवी दृष्टी व उच्च जीवनाची गोडी लावून त्याच्यातल्या पाशवी प्रवृत्ती नष्ट करणे होय. पावित्र्य हा देशाचा प्राण असतो. अपवित्रता ही देश रसातळाला जाण्याची पहिली खूण आहे. या विचाराला अनुसरुन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात,

**'परि हे एकांगीपणे नोळखती । स्त्रियांची अनास्था करिती ।**

येथे स्त्रियांच्या वेदना पुरुषांनी समजून घ्याव्यात व वडीलकीचा आधार द्यावा. देशातील राक्षसी प्रवृत्ती प्रबळ झाली, तर आज सामान्यांच्या स्त्रियांचा ती घास घेईल. उद्या भ्रष्टाचाराच्या संपत्तीवर पोसलेल्या सुदृढ पिंडाचे लचके हे महिषासुर उघडपणे तोडल्याशिवाय राहणार नाहीत. तेव्हा हतबल झालेल्या प्रत्येक पालकाला काळ प्रश्न विचारेल, की कालपर्यंत सामान्यांच्या स्त्रियांचे धिंडवडे निघत होते; तेव्हा तुम्ही नकळत त्या राक्षसांना मदत केली होती. मग आता का रडता ? किंवा महाराजांनी म्हटल्याप्रमाणे असेही घडू शकते.

**'तेथे कासयासि पडदा । परावलंबनाची आपदा ।**
**आत्मसामर्थ्यानेच सदा । स्त्रिया मर्दिती असुरांना ।।**

हा दुसरा भाग ज्यांच्याकडून आधाराची अपेक्षा आहे, त्यांच्या पुरुषार्थात साठलेला षंढपणा असह्य होईल. जगदंबा रणचंडिकेचे रुप धारण करील. तेव्हा तिच्या एका हातात दुष्ट कृत्य करणाऱ्यांच्या रक्ताने भरलेला कटोरा असेल, अन् दुसऱ्या हातात दुष्ट कृत्य बघत हसणाऱ्यांचे मुंडके असेल. गळ्यात दुष्ट कृत्य होताना हतबल झालेल्या षंढांच्या मुंडक्यांची माळ असेल. त्या वेळेपासून पुरुषातला पुरुषार्थ संपेल. असे होऊ नये म्हणून समाजरक्षकांनी असा विचार करावा, की 'माझ्या जमाजातील सर्व आयाबहिणी या माझ्याच कुटुंबातल्या आहेत. मी त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी घेईन,' अशी जगदंबेजवळ शपथ घ्यावी. मग खऱ्या अर्थाने 'नवरात्र' साजरे होऊन विजयादशमीच्या विजयाचा आनंद साऱ्यांना उपभोगता येईल.


GOD
has not called
me to be
SUCCESSFUL.
He called
me to be
FAITHFUL.

# दीनदुबळ्यांची सावली
# मदर तेरेसा



युगोस्लोविया देशातील स्कोपे शहरात आग्नेस नावाच्या मुलीचा जन्म झाला. वयाच्या चौथ्या वर्षी तिच्या वडिलांचे निधन झाले. आईने तिचे पालनपोषण केले. वयाच्या १२ व्या वर्षीच तिने मनाशी निश्चय केला जोगीण (नन) होण्याचा. ही आग्नेस गोन्शा बोजाहिव म्हणजेच सर्व जगातील गोरगरिबांची आई मदर तेरेसा.

ज्या वयात मुलांचे भावविश्व शाळा, खेळणे असे असते, त्याच वयात या मुलीने आपल्या जीवनाचा मार्ग निश्चित केला अठराव्या वर्षी युगोस्लावियामध्ये शिक्षण पूर्ण झाल्यावर लगेचच सर्व सुखाचा त्याग करुन जोगिणीचे व्रत तिने घेतले.

भारतातील बंगालमध्ये कार्य करणाऱ्या लॉरिटो संघात तिने प्रवेश घेतला. भारतातील विशेषत: बंगालमधील लोकजीवनाची माहिती या संघात दाखल झाल्यावर त्यांनी अभ्यासली व भारतात येण्याचे निश्चित केले.

१९२८ मध्ये आपले कुटुंब, देश, सर्वस्वाचा त्याग करुन कोलकत्याजवळ एन्टलीच्या सेंट मेरी स्कूलमध्ये शिक्षिका म्हणून त्यांनी आपल्या कार्याला सुरुवात केली. शाळेचा परिसर शांत आणि सुंदर होता. मध्यमवर्गीय सर्व धर्माच्या मुली शाळेत शिकत होत्या. शाळेत भूगोल हा विषय तन्मयतेने त्या शिकवीत होत्या. त्यांच्या प्रेमळ स्वभावाने त्यांनी सर्व मुलींची मने जिंकली.

शाळेतील अध्यापनाच्या कालावधी नंतर मदर तेरेसा आपल्या खोलीच्या खिडकीतून आजूबाजूच्या परिसराचे निरीक्षण करीत असत. त्यांच्या राहण्याच्या समोरच्या बाजूस 'मोत्याचे सरोवर' नावाची वस्ती होती. नांव मोत्याचे सरोवर पण ती एक गलिच्छ अशी झोपडपट्टी होती. झोपडपट्टीच्या परिसरात उघडी गटारे, त्यांचे वाहणारे पाणी, त्याच ठिकाणी अर्धनग्न अवस्थेत खेळणारी लहान मुले, त्यापैकी बरीच मुले कुपोषित अशी होती. त्यांच्या पालकांची स्थिती यापेक्षा वेगळी नव्हती. हे सर्व दृश्य पाहिल्यावर मदरचे मन शाळेत रमेना. या मुलांच्यासाठी, माणसांसाठी काही केले पाहिजे.

त्यांचे मन शाळेत रमेना. त्यांचे मन अस्वस्थ झाले. एक दिवस प्रार्थनेसाठी त्या जात असताना त्यांना भगवान येशूचा साक्षात्कार झाला. 'आपला जन्म या दीनदलितांच्या सेवेसाठी आहे' हे त्यांना उमगले. गौतमबुध्दांना बोधीवृक्षाखाली ज्ञान प्राप्त झाले, आणि बौध्द धर्माची स्थापना झाली. मदरने कोणताही धर्म स्थापन केला नाही. पण गोरगरिबांसाठी सर्वस्व अर्पण करावयाचे ठरविले. ज्यांची सेवा करायची त्यांचा मनापासून स्वीकार केला पाहिजे म्हणून मदरने त्यांच्यासारखे राहणे पसंत केले. त्यांची बंगाली भाषा त्यांनी अवगत केली आणि एक दिवस त्यांनी सेंट मेरी स्कूलचा निरोप घेतला.

२१ डिसेंबर १९४८, त्यांनी आपल्या कार्याला मोती सरोवर भागात सुरुवात केली. प्रथमत: त्यांनी वस्तीत शाळा उघडली तशी शाळा उघडीच होती. शाळेला दारेच नव्हती. परंतु खऱ्या अर्थाने मुलांच्यासाठी शाळा सुरु झाली. मदरने दीन-दुबळ्यांसाठी शाळा सुरु केली ही बातमी शहरभर पसरली. शाळेसाठी मदतीचे अनेक हात पुढे झाले. कोणी बाके दिली तर कोणी टेबल. शाळेला भरघोस आर्थिक मदत करणारे देणगीदारही आले. एक शाळा स्थापन करुन मदरच्या कार्याला सुरुवात झाली व पुढे १०० पेक्षा जास्त शाळा त्यांनी सुरु केल्या व शिक्षणाचे कार्य अविरतपणे सुरु झाले.




१९५० साली मिशनरीज ऑफ चॅरिटी संघाची स्थापना केली. मदरला मदत करणारे सर्व धर्माचे लोक होते. मुसलमान गृहस्थ पाकिस्तानात स्थायिक होण्यासाठी निघाला होता. त्याने आपले घर मदर तेरेसांना अल्प किमतीत देऊ केले पण ते घेण्यासदेखील त्यांच्याकडे पैसे नव्हते. परंतु मदरचे कोणतेच काम पैशासाठी अडत नसे. प्रत्येक अडचणीच्यावेळी एखादा धनिक मदतीसाठी येत असे. याही वेळी एका दाम्पत्याने मदत केली व मदरने ते घर विकत घेतले. त्यांच्या या कार्याला सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या अनेक सिस्टर्स मिळाल्या. मदर तेरेसांनी सुरु केलेले व्रत त्या मनापासून करत होत्या. एक दिवस त्या रस्त्याने जात असताना त्यांना एक स्त्री रस्त्याच्या कडेला अखेरचा श्वास मोजत असताना दिसली. बेवारस म्हणून पोलिस तिची विल्हेवाट लावतील याची कल्पना मदर तेरेसांना होती.

त्यांनी त्या स्त्रीला उचलून जवळच्या अंगणात नेले. तिची सेवा शुश्रूषा त्यांनी केली. मदरच्या कुशीत तिने आपली प्राणज्योत मालवली. मरताना आपणास कोणी तरी आधार दिला याचा आनंद तिच्या चेहऱ्यावर क्षणभर मदरला दिसला. अशा बेवारस लोकांसाठी त्यांचा शेवट गोड व्हावा, इहलोकीची यात्रा संपविताना एखाद्या जनावराप्रमाणे त्यांना रस्त्याच्या कडेला खितपत पडावे लागू नये, यासाठी 'निर्मळ हृदय' या संस्थेची स्थापना केली. ज्यांना आधार नाही अशांचा शेवट निर्मळ हृदयमध्ये होऊ लागला, आयुष्याच्या अखेरीस त्यांना उपचारांच्या सोयी उपलब्ध होऊ लागल्या. मदर तेरेसा कोणाचे मरण वाचवू शकत नव्हत्या. पण वेदनारहित जीवन शेवटी असावे यासाठी त्या प्रयत्न करत होत्या. अनेक अनाथांना निर्मळ हृदयाचा आसरा मिळाला.

निर्मल हृदयाच्या धर्तीवर निर्मल शिशु भवनाची स्थापना त्यांनी केली.

खोडकर, उपद्‌व्यापी किंवा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या मुलांना शिशुभवनात प्रवेश दिला जात असे. त्यांच्यावर योग्य संस्कार केले जात. त्यामधून अनेक मुलांमध्ये सुधारणा झाल्याचे दिसून आले. मायेपासून, प्रेमापासून उपेक्षित असलेली मुले त्यांना मदरच्या रुपाने देव भेटला आणि त्यांच्या जीवनाला नवीन दिशा मिळू लागली. कार्य वाढले, संस्था वाढल्या तशा गरजाही वाढत होत्या. नवीन संस्थेसाठी नवीन इमारतीची आवश्यकता भासत असे. आग्राला बालभवनाचे काम सुरु झाले होते. काम अर्ध्यावर आल्यावर बंद पडले. पैशाविना हे काम थांबणार असे मदरला वाटले पण त्यांच्या प्रत्येक संकटसमयी प्रभू त्यांच्या मदतीला धावून येतो याची मदरला कल्पना होती. पैशाच्या विवंचनेत असताना त्यांना फोन करुन आनंदाची बातमी मिळाली. मॅगसेसे पुरस्कारासाठी त्यांची निवड झाली होती. ५०,००० रु. पारितोषिकाच्या रुपाने मिळाले आणि आग्राचे बालभवन पूर्ण झाले.

मदर तेरेसा यांनी कुष्ठरोग्यांसाठी केलेले कार्यही तेवढेच महत्वाचे आहे. कुष्ठरोग्यांना आश्रय देऊन त्यांची सेवाशुश्रूषा करण्याचे काम मदर तेरेसा व त्यांच्या सिस्टर्स मनोभावे करीत असत. एखाद्यावेळी काही कुष्ठरोग्यांची बोटे अगदी सडून गेलेली असत. ती कापून टाकणे आवश्यक ठरत असे. काही वेळेस तर स्वत: मदर तेरेसा ही कामे करीत असत. कुष्ठरोग्यांसाठी त्यांनी कलकत्त्यात 'प्रेमनिवास' उभारले. प्रेमनिवास मध्ये स्वयंरोजगार उपलब्ध करुन दिला जात असे, अशाप्रकारची ११९ कुष्ठधाम केंद्रे चालविली जातात.

मदर तेरेसा यांचे कार्य भारतात सुरु झाले. त्या कार्याचा विस्तार संपूर्ण विश्वात झाला. त्यांच्या या कार्यामुळे त्यांना अनेक पारितोषिके मिळाले. रेमन मॅगसेसे, जवाहरलाल नेहरु पुरस्कार, नोबेल पारितोषिक, युनेस्को शांतता पुरस्कार, भारत शिरोमणी याच बरोबर भारतरत्न पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले.

त्यांना मिळालेले पुरस्कार हे त्यांच्या कार्याचा गौरवच आहे. त्यांनी केलेले हे कार्य त्या पारितोषिकाच्यापेक्षा कितीतरी पटींनी मोठे आहे. युगोस्लावियातून बाहेर पडताना जवळ पाच रुपये इतकीच रक्कम असणाऱ्या या जोगिणीला पैशाची कमतरता कधीच भासली नाही. प्रेम, उत्कट इच्छा, परिश्रम, प्रभूवर नितांत श्रध्दा यामुळे त्यांच्या कार्याचा वटवृक्ष संपूर्ण जगभर फोफावला.

आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांचे सेवाकार्य चालू होते. त्यांच्या या कामात कधी वयाचा किंवा प्रकृतीचा अडथळा आला नाही. अशी ही भारतरत्न दीनदुबळ्यांची माता, ५ सप्टेंबर १९९७ ला प्रभुचरणी विलीन झाली.








CHICAGO
CHICAGO



# संगीत क्षेत्रातील अढळ तारका
# लता मंगेशकर

सांगलीतील दीनानाथ मंगेशकरांचे घर. सकाळची प्रसन्न वेळ होती. आपल्या बैठकीच्या खोलीत दीनानाथ बसलेले होते. हातात तानपुरा घेऊन ते गाण्याचा रियाज करीत होते. गात असतानाच त्यांच्या लक्षात आलं की आपल्या आवाजात कुणाचा तरी आवाज मिसळतो आहे. आपल्यासारखं कोण बरं गातय? त्यांनी आजूबाजूला पाहिलं अन् त्यांना नवलच वाटलं. अरेच्चा ! माझी छोटी लता गाते आहे ! त्यांनी माईंना हाक मारली, 'अगं माई बघ बघ ! माझी लताबाबा गाते आहे.' कौतुकानं त्यांनी छोट्या लताला उचललं. कुरवाळलं अन् लताला ते म्हणाले, 'लताबाबा, तू गाणं शिकणार? रोज माझ्याबरोबर रियाज करणार?' तात्काळ लतानं मान डोलवली. या छोट्या ३/४ वर्षाच्या लतानं गाणं शिकायला सुरुवात केली या लताचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी झाला. दीनानाथ तिला आवडीनं 'लताबाबा' असं म्हणत.

दीनानाथांकडे अनेक शिष्य गाणं शिकण्यासाठी येत होते. एकदा दीनानाथांनी एका शिष्याला चीज शिकवली व रियाज करायला सांगितला. ते बाहेर निघाले. जाताना त्यांनी लताला सांगितलं, 'लताबाबा या शिष्याच्या तानेकडे लक्ष दे.' दीनानाथ बाहेर गेले. लताचं खेळता खेळता शिष्याच्या तानेकडे लक्ष गेलं आणि ती चटकन् त्याला म्हणाली, 'अहो, थांबा ही तान चुकली. मी घेऊन दाखवते तान तुम्हाला!' तिनं शिष्याला तान शिकवली. हा शिष्य होता चाळीस वर्षांचा. आणि त्यावेळी लताचं वय होत अवघ सहा वर्षाचं !

लता शाळेत शिकू लागली. तिच्या शाळेत गाण्याच्या स्पर्धा जाहीर झाल्या. 'खजांची' चित्रपटातील गाणी म्हणायची अट होती. लताला पर्वणीच वाटली. तिनं दीनानाथांना सांगितलं, 'बघा बाबा मी गाण्याची अशी तयारी करते की पहिला नंबर माझाचं! मीच घेणार हे बक्षीस!' स्पर्धेच्या दिवशी लतानं गीत सादर केलं. अन् अपेक्षित असलेला पहिला नंबर पटकावला. तिला गाण्यातलं पहिल्या नंबरचं बक्षीस म्हणून एक 'दिलरुबा' नामक छोटं वाद्य मिळालं. म्हणून तिला खूप आनंद झाला. ती घरी आल्याबरोबर ती बाबांच्या गळ्यात पडली. बक्षीस दाखवत म्हणाली, छोटासा फकल्पनाने वडीलांचा विरोध पत्करत 'पाहिलत बाबा माझं बक्षीस! मिळवलाच ना पहिला नंबर !' दीनानाथांना लताचं खूप कौतुक वाटलं. त्यांनी आनंदाने दिलरुबा हाती घेतला व हळुवारपणे त्याच्या तारा ते छेडू लागले. तशी लता म्हणाली, 'बाबा हळू हं ! मोडेल तो. केवढ्या कष्टानं मिळवलाय तो मी.' दीनानाथांना लताच्या शब्दात गर्व दिसला. त्यांना हे सहन झालं नाही. त्यांनी दिलरुबा फेकून दिला. ते भिंतीवर आदळून त्याचे दोन तुकडे झाले. लताला रडू कोसळलं. बाबांनी तिला जवळ घेत समजावलं, 'लता तुला खूप मोठं व्हायचं आहे. तेव्हा असा गर्व कधी करु नकोस.' दीनानाथांनी जणू लताचा दिलरुबा नव्हे तर तिचा गर्वच मोडला.



आयुष्यात निगर्वीपणे राहण्याचा हा धडाच तिला बाबांनी दिला. दीनानाथ मोठे गायक होते तसे ते मोठे कलाकारही होते. नाटकातून भूमिका ते करीत असत. एकदा 'संगीत सौभद्र' या नाटकाचा प्रयोग ठरला पण ज्या दिवशी प्रयोग होता त्याच दिवशी सकाळी नारदाची भूमिका करणारा नट आजारी पडला. नाटकातील गाणीही नटांनाच गावी लागत होती. नाटकाचा प्रयोग रद्द करण्याशिवाय पर्याय नव्हता . पण शेजारी उभी असणारी लता बाबांना म्हणाली, 'बाबा, नाटक कशाला रद्द करता ! मी आहे ना ! मी करीन नारदाची भूमिका. 'अगं लताबाबा, नारदाचे संवाद, गाणी तुला कशी येतील?'बाबांच्या प्रश्नाला उत्तर देत लता म्हणाली, 'बाबा, अहो नारदाचेच काय, मला तर सर्व पात्रांचे संवाद आणि गाणी पाठ आहेत. मी रोज तुमचा सराव पाहत होते ना ! दीनानाथांना आश्चर्य वाटलं. त्या दिवशी नाटक उत्तम झालं. अर्जुनाच्या भूमिकेत दीनानाथ होते. नारदाची भूमिका करणाऱ्या लतानं 'लग्नाला जातो मी द्वारकापुरा' या गाण्यासाठी वन्समोअर मिळवला. यावेळी लताचं वय होतं अवघं दहा वर्षाचं! दीनानाथ गावोगाव गाण्याच्या मैफिली करीत. त्यांच्याबरोबर लताही जात असे.

सोलापूरच्या मैफिलीत लतानं गाणी सादर केली. आणि नंतर ती स्टेजच्या मागे जाऊन झोपली. अवघ्या ११ वर्षाची लता सारी रात्र थोडीच जागी राहणार होती? नाटकाचे, गाण्याचे दौरे झाले की दीनानाथ रुपयांची थैली घरी घेऊन येत. ती थैली ते लताकडं देत. लता पैसे काढून मोजत असे पुन्हा थैलीत भरत असे नंतर स्वतःच्या डोक्यावर थैली उलटी करुन पैशांचा पाऊस अंगावर पाडून घेई. असे हे दृश्य पाहून कौतुकानं दीनानाथ म्हणत, 'लताबाबा तुझ्या आयुष्यात असाच पैशांचा पाऊस पडेल.'जणू काही ते भाकीत बोलत होते. दीनानाथांना वाटे जर आपल्याला असे पैसे मिळाले तर आपण मंगेशीचा डोंगर घेऊ. पोर्तुगीजांच्या तावडीतून गोवा मुक्त करू. त्याकाळच्या व्हॉईसरॉयने दीनानाथांना एका कार्यक्रमात बोलावलं. व्हाईसरॉय संगीताचे चाहते होते. त्यांनी दीनानाथांना गाणं म्हणण्याचा आग्रह केला. व्हाईसरॉय म्हणजे इंग्रजांचा प्रतिनिधी. दीनानाथांनी संधी साधली आणि रणदुदुंभी नाटकातील गीत सादर केलं. 'असून थोर मालक घरचा, म्हणती चोर त्याला । परवशता पाश दैवे ज्याच्या गळा लागला।' या गीतातून भारताच्या पारतंत्र्याची जाणीवच त्यांनी करून दिली. व्हाईसरॉयने दीनानाथांच्या गाण्यावर खुश होऊन त्यांना सुवर्णकमळ दिले.

दीनानाथांच्या नाटक कंपनीत अनेक जण दारू घेत. त्यांच्या संगतीने दीनानाथही व्यसनाधीन झाले. तशातच त्यांनी 'कृष्णार्जुन युध्द'नावाचा चित्रपट काढला. चित्रपटासाठी त्यांनी सावकारी व्याजाने, मित्रांकडून पैसे घेतले. दुर्दैव असं की चित्रपट पडला आणि दीनानाथांच्या अंगावर कर्जाचा डोंगर उभा राहिला. सावकारांनी पैशाचा तगादा लावला. जवळच्या मित्रांनी तोंड फिरवलं. म्हणतात ना 'बुडत्याचा पाय खोलात.' तसंच झालं. त्यामुळे चिंता वाढली. आजार बळावला आणि दीनानाथांना ब्लडकॅन्सर (रक्तक्षय) झाला. फक्त आनंदाची गोष्ट एकच लताला रेडिओवर गायला बोलावलं. लताचं गाणं ऐकून ते म्हणाले, 'बघितलंस माई, मला वाटतं माझाच आवाज मी ऐकतो आहे.'एक संगीतसूर्य अस्ताला जात होता तर संगीतातील बालकवी उदयाला येत होता. दीनानाथांचे शेवटचे काही क्षण.

त्यांनी माईला बँकबुक मागितले. त्यात फक्त ४३ रुपये शिल्लक. ते म्हणाले, 'लताबाबा मी व्यवहारशून्य होतो. माझ्या आयुष्याचाही जमाखर्च आता संपत आला. लताबाबा तूच मोठी. या







कुटुंबाला आता तुझाच आधार. लताबाबा मी तुम्हाला काही देऊ शकलो नाही. पण या दोन गोष्टी मी देतो. एक तानपुरा अन् दुसरी चिजांची वही. आता 'आम्ही जातो आमच्या गावा, आमचा राम राम घ्यावा' असं म्हणून त्यांनी डोळे मिटले. यावेळी लता अवघी तेरा वर्षांची होती. पण सर्व कुटुंबाचा ती आधार झाली.

दीनानाथांच्या मृत्यूनंतर देणेकरी येऊ लागले. लताला हे सहन होईना. तिने माईला दागिन्यांचा डबा मागितला जड अंत:करणानं माईने तो दिला. दागिने मोडून कर्ज फेडले. हे कुटुंब पुण्यात शुक्रवार पेठेत राहू लागले. समोर गावड्यांचे वाण्याचे दुकान. त्याने उधार सामान दिले. लताने मैफिलीतून गायला सुरुवात केली अन् कुटुंबाचा उदरनिर्वाह करु लागली. पैसे साठवून प्रथम तिने माईला दागिने केले. योगायोगाने त्यांची गाठ मास्तर विनायकांशी पडली. आणि लताबाईंना प्रफुल्ल चित्रपट कंपनीत काम मिळालं. सारे कुटुंब कोल्हापूरला आले. लता चित्रपटात भूमिका व गाणी गाणे अशी कामे करू लागली. गजाभाऊ चित्रपटात काम करताना खोटं खोटं रडायला तिला जमेना. तेव्हा तिच्या आईची भूमिका करणाऱ्या स्त्रीनं त्यांना जोरात मारलं. हे तिला सहन करावं लागलं. एकदा परीची भूमिका करताना तिला अंगात ताप असूनही २/३ तास छताला लटकावे लागले. 'माझा मुलगा' चित्रपटात तिने भावंडासह चित्रीकरणात भाग घेतला. भिकारी अनाथ मुलं रस्त्यानं चाललीत असं दृश्य होतं. तेव्हा कुणीतरी म्हटलं, 'खरंच हो दीनानाथांच्या मृत्यूनंतर ही मुलं पोरकी झालीत.' हे शब्द लतादीदींला झोंबले. ती म्हणाली, 'नाही नाही. माझी भावंडं पोरकी नाहीत ! मी त्यांची पालक आहे!'

खरंच लतादीदी बाबांच्या भूमिकेत जगत होत्या. दर रविवारी त्या भावंडाशी खेळत, त्यांचा अभ्यास घेत. लतादीदींना हिंदी चित्रपटातून गाण्याची



संधी मिळाली आणि त्यांना चांगले दिवस आले. घरी पैसा येऊ लागला. लतादीदींनी घरातून गेलेला रेडिओ पुन्हा नव्याने आणला. रेडिओ लावला अन् रेडिओवर बातमी आली ती प्रसिद्ध गायक सैगलचा मृत्यू.' या बातमीने लतादीदी दु:खी झाल्या अन् त्यांनी रेडिओ दूर फेकला. कारण सैगल हा त्यांचा अत्यंत आवडता गायक होता. १९६१ साली पंडित नेहरूंनी प्रजासत्ताकदिनी लतादीदींना दिल्लीला बोलावले. त्या प्रसंगी लतादीदींनी कवी प्रदीप यांचं गीत आर्ततेने गायलं. ते 'ए मेरे वतनके लोगों...' हे गीत ऐकून पं.नेहरु गहिवरले व म्हणाले, 'लता बेटी आज तूने मुझे रुलाया!' लतादीदींची प्रसिद्धी सर्व जगात झाली. अनेक मानसन्मान, बक्षिसं त्यांनी मिळवली. सर्व भाषेत त्यांनी गीते गायली. 'भारतरत्न' हा किताब त्यांना मिळाला. पण त्यांचा साधेपणा कुठही हरवला नाही. अनेकांना त्यांनी मदत केली. एकदा गो.नी. दांडेकरांनी मुंबईला शिवसृष्टी प्रदर्शन भरवले. पण ते प्रदर्शन चालले नाही. अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही. त्यावेळी कलाकार उपाशी राहू नये म्हणून लतादीदींनी त्यांना मदत दिली.

मोठेपणाची त्यांना कधीच हाव नव्हती. भालचंद्र पेंढारकरांनी त्यांना 'छत्रपती शिवाजी' या चित्रपटात जिजाईचं काम करण्यासाठी विचारलं तेव्हा त्या म्हणाल्या, 'मी चित्रपटात काम करीन ते शिवाजीला ओवाळणाऱ्या सामान्य स्त्रीचं!' शिवाजी, स्वामी विवेकानंद व सावरकर ही त्यांची दैवतं आहेत. पुण्यामध्ये त्यांनी 'दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल' काढून वडिलांची स्मृती जपली. एकदा पी. सावळाराम रेल्वेने प्रवास करीत होते. त्यांच्या डब्यात एका लग्नाचे वऱ्हाडी बसले होते. त्यात हिरवा चुडा ल्यालेली, शालू नेसलेली, हाताला मेंदी लावलेली नवी नवरी त्यांनी पाहिली आणि त्यांना गीत स्फुरलं. त्यांनी नव्या नवरीवर गीत लिहिलं. आयुष्यात लग्न न करणाऱ्या लतादीदींनी मात्र सगळ्या नववधूंसाठी हे गीत गाऊन अमर केलं–

**कडकडूनी तू मिठी मारता बाळे**
**बालपण आले आले घुमवित घुंगुरवाळे**
**आठवले सारे सारे, गहिवरले डोळे**
**कढ मायेचे तुला सांगती जा ऽ**
**जा मुली जा,**
**दिल्या घरी तू सुखी रहा ।'**



# पोलिसदलातील प्रखर तारा
# किरण बेदी

१९८२ साल. दिल्लीला आशियाई क्रीडा स्पर्धा होणार होत्या. आशिया खंडातले अनेक खेळाडू, प्रेक्षक या निमित्ताने भारताच्या राजधानीत यायचे होते. भारताची शान यांच्या माध्यमातून आशिया खंडभर पोचणार होती. त्यासाठी पंतप्रधानांपासून सारेच तयारीला लागले होते. एक मोठी समस्या होती ती दिल्लीतील वाहतुकीच्या गलथानपणाची. प्रचंड लोकसंख्या, विविध प्रकारची असंख्य वाहने, लोकांचा बेशिस्तपणा, पोलिसांची काही अंशी बेपर्वाई आणि काही अंशी अगतिकता, सारीच या समस्येला जबाबदार होती. पण या वाहतुकीला सुरळीत करण्यासाठी एक डी.सी.पी. अधिकारी मात्र झटत होती. स्वत: गाडीतून हिंडून ध्वनिक्षेपकावरुन लोकांना सूचना देणे, शिस्त लावणे, वाहने नीट उभी करण्याबाबत सूचना देणे हया साऱ्या बरोबरच सिग्नलची नोंद, त्यांची ताबडतोब दुरुस्ती ही कामेही ती तत्परतेने करत होती नियमांचा भंग करणाऱ्यांवर लगेच कारवाई करणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांच्या पाठीशी ती उभी राहायची. त्याबाबत कोणालाही दयामाया नाही. अगदी पंतप्रधानांच्या सचिवांची चुकीच्या जागी लावलेली गाडीही तिचे सहकारी निर्मलसिंग यांनी क्रेनने उचलून नेण्याचं धाडस केलं ते तिच्या पाठिंब्यामुळेच. तिच्या या अथक प्रयत्नांना बऱ्याच अंशी यश आलं. दिल्लीची वाहतूक सुरळीत झाली. सामान्य जनता तर तिला किरण बेदी म्हणून संबोधे !

कोण ही क्रेन बेदी ! ही किरण बेदी. भारतातली पहिली स्त्री पोलिस अधिकारी.

किरण अमृतसरची ९ जून १९४९ हा तिचा जन्मदिवस. तिच्या वडिलांचे नाव परकाशलाल आणि आईचे नाव प्रेमलता. परकाशलाल अत्यंत संयमी, सहृदय होते. त्यांच्या या स्वभावामुळेच त्यांना परंपरेने घरी चालत आलेला कापडाचा व्यवसाय फारसा सांभाळता आला नाही. अर्थात त्यांची आर्थिक परिस्थिती बेताचीच होती.



प्रेमलताबाई शिकलेल्या होत्या. बेताच्या परिस्थितीतही व्यवस्थित संसार करुन त्यांनी मुलींचे शिक्षण, संगोपन केले. त्यांच्या खेळाडूवृत्तीला उत्तम खतपाणी घालून टेनिसपटू बनण्यासही प्रोत्साहन दिले. किरणने आपल्या बहिणी शशी, अनु, रिटा यांच्याबरोबर टेनिसची अनेक बक्षिसे मिळवली. टेनिसमधूनच तिला चिकाटी, कष्ट यांचे धडे मिळाले तसेच व्यूहरचना, डावपेच, आयुष्याकडे बघण्याची दृष्टी यांचाही विकास झाला.

१९७२ मध्ये तिची आय.पी.एस. मध्ये निवड झाली. जरी ती परीक्षेत पास झाली असली तरी पोलिसखाते हे पुरुषांचे क्षेत्र आहे. त्याचे प्रशिक्षण खडतर व कठीण आहे, तेव्हा तीने ते क्षेत्र निवडू नये. यासाठी मुलाखतीमध्ये तिला वारंवार सांगण्यात आले. पण किरण निश्चयापासून दूर झाली नाही. ती माऊंट अबू इथल्या नॅशनल पोलिस अकादमीमध्ये प्रशिक्षणासाठी गेली, आणि तिने उत्तम यशही मिळवले. १९७५ पासून उपविभागीय पोलिस अधिकारी म्हणून तिची कारकीर्द सुरु झाली. किरणला नोकरीमुळे घरापासून दूर तर नेहमीच राहावे लागले.

तिच्या कारकिर्दीत अनेक समरप्रसंगांनाही तिला तोंड द्यावे लागले. अर्थात प्रत्येक प्रसंगांतून आपली चिकाटी, जिद्द प्रसंगातून मार्ग काढण्याची हातोटी यामुळे ती बाहेर पडली आणि तिच्या यशाची पावतीही तिला मिळाली. गोव्याला वाहतूक पोलिस अधिकारी म्हणून तिची बदली झाली. तिने पोलिसांची मिटिंग बोलावली. पोट सुटलेले, पट्टे घसरलेले, घाणेरडे बूट, अस्वच्छ, गणवेश अशा अवतारातले ते पोलिस तिने पाहिले. पोलिसांच्या व्यवस्थित राहण्याचा जनतेवर कसा परिणाम होतो ते तिने त्यांना समजावून दिले. पोलिस व्यवस्थित राहतील यासाठी व्यवस्था केलीच पण त्याचबरोबर गोव्यातील गचाळ वाहतूकही तिने शिस्त लावून सुरळीत केली. झुआरी नदीवरील पूल तयार झाला होता, उद्‌घाटन करायला राजकीय मंडळींना वेळ मिळत नव्हता किरणने कामावर असणाऱ्या एका सामान्य कामगाराकडून पुलाचे उद्‌घाटन करुन घेतले व तो वाहतुकीसाठी खुला केला. वाहतुकीची कोंडी फुटली.

गोव्यात चोगम परिषद भरणार होती. त्यासाठी पंतप्रधान इंदिरा गांधी आणि अनेक परदेशी मान्यवर मंडळी गोव्यात येणार होती. वाहतूक व्यवस्था किरण बेदीकडे होती. विमानतळापासून त्यांच्या राहण्याच्या ठिकाणापर्यंतचे अंतर होते ४० कि. मी. किरणकडे पोलिस संख्या कमी होती. तिने शाळा कॉलेजातील विद्यार्थ्यांची मदत घेतली. १२०० विद्यार्थी वाहतूक नियमनाच्या कामाला लागले. त्यांना प्रशिक्षण दिले. एन.सी.सी. चे हे विद्यार्थी – विद्यार्थिनी निळा पांढरा गणवेश, पांढरे बूट मोजे, डोक्यावर गोल्फकॅप्स आणि गळ्यात शिट्टीची लाल दोरी अशा थाटात मुख्य रस्त्याला मिळणाऱ्या गल्ली बोळांवर व्यवस्थित लक्ष ठेवत होते. मुख्य रस्त्यावर विशिष्ट अंतरावर रांगेत उभे होते. इंदिरा गांधींबरोबर राणी एलिझाबेथ, मागरिट थॅचर, कॅनडाचे अध्यक्ष त्रुदेऊ इ. मान्यवर मंडळींची वाहने मुख्य रस्त्यावरुन जात असताना हात हलवून त्यांनी त्यांचे स्वागत केले. इंदिराजींनी वाहने थांबवून विद्यार्थ्यांना ''शेकहॅन्ड'' केले. हा त्या विद्यार्थ्यांना आयुष्यभरातील अविस्मरणीय आनंद मिळाला. गोव्याच्या राज्यपालांनी खास पत्र पाठवून किरण बेदींचे, पोलीस दलाचे, विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

फक्त दहशतीने सुधारणा होत नाहीत तर त्यासाठी वेगवेगळ्या सोयी कराव्या लागतात. वेगळे मार्ग काढावे लागतात. वेगळे प्रयोग करुन पाहावे लागतात ही किरण बेदींची धारणा. त्यांनी आपल्या कारकिर्दीत याचा यशस्वीपणे उपयोग करुन दाखवला आहे.



किरण दिल्लीत असतानाची गोष्ट. पोलिस आणि सामान्य जनता यांच्यात सहकार्याची देवाणघेवाण व्हावी म्हणून दिल्लीच्या पश्चिम जिल्ह्यात किरणने नवी योजना आखली. प्रत्येक हवालदाराला लहान लहान भागाचा ताबा दिला, आणि त्या भागात एक छोटेसे लाकडी घर उभारुन दिले. या घराला नाव दिले ''बीट बॉक्स'' हे त्याचं ऑफीस. त्या भागातल्या नागरिकांची जबाबदारी त्या हवालदारावर. त्यांच्या तक्रारी तिथे सोडविल्या जायच्या त्यामुळे पोलिस स्टेशनचा कामाचा ताण, जनतेचा त्रास, वेळ, पैसा सारेच वाचलं. आपल्या घराजवळ पोलिस आहे या गोष्टीचा नागरिकांना दिलासा मिळू लागला. गुंडगिरी कमी झाली. छोट्या मारामाऱ्या, भांडणं तिथंच मिटवली जायची. पोलिसांना आत्मविश्वास, सन्मान मिळाला. पोलिस खूष, जनता खूष, परंतु वकील लोक संतापले. त्यांना केसेस मिळेनाशा झाल्या.

स्मॅक म्हणजे (हेरॉईन) यांची विक्री होत असे. अंमली पदार्थ आणि गुन्हे यांचे नाते असते हे किरणच्या लक्षात आले. दिल्ली पोलिसांना मिळणाऱ्या सुधार कार्यक्रम हाती घेण्याचे अधिकार या कायद्याचा वापर करण्याचे तिने ठरविले. गुन्हेगार व्यक्तीला ती हद्दपारीची दहशत दाखवत असे त्यामुळे अंमली पदार्थ सेवन करणारे आणि विकणारे घाबरले आणि आपल्या कामापासून परावृत्त होऊ लागले. रोज दोन ते पाच या वेळात आपल्या कार्यालयात ती 'कोर्ट सेशन'

भरवत असे. 'सामाजिक न्याय पध्दती' चा तिने अवलंब केला. त्यामुळे कमीत कमी लोकांना अटक होऊ लागली. अंमली पदार्थांपासून सुटका व्हावी म्हणून व्यसनी लोकांसाठी 'व्यसनमुक्ती, सुधार आणि पुनर्वसन संस्था' सुरु झाली. किरण ही या संस्थेची संस्थापक, सरचिटणीस झाली. आजही ती त्या पदावर आहे. 'नवज्योती पाठशाळेत' झोपडपट्टीतील मुलांसाठी प्राथमिक शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रांत स्त्रियांसाठी साक्षरता व व्यावसायिक शिक्षण दिले जाते. अशा सामाजिक सुधारणांच्या कामामुळेच तिच्या नावाची 'रॅमन मॅगसेसे' पुरस्कारासाठी चर्चा होऊ लागली.

नवी दिल्लीच्या तिहार तुरुंगात महानिरीक्षक म्हणून नेमणूक झाल्यावर तर तिची योग्यता योग्य प्रकारे सिध्दच झाली. पोलिस सेवेत तिहार कारागृहातील नियुक्ती ही कमी प्रतीची मानली जायची. तिथल्या कामकाजाबद्दल गुप्तता पाळली जायची. कर्मचारी उध्दट, उर्मट, शिवीगाळ करणारे, हुकूमशाही वृत्तीचे होते. कैद्यांना कायम बंदिस्त ठेवत, कर्मचारी आणि कैदी या दोन परस्परविरोधी शक्ती होत्या. त्यांच्यात एकमेकांबद्दल अविश्वासाची भावना होती.

किरणने सर्वप्रथम कैद्यांना होणारी मारझोड बंद केली. त्यांच्या तक्रारींना दाद दिली. कर्मचारी वर्गाला 'आपण कैद्यांचे केवळ शरीररक्षक आणि ताबेदार आहोत, त्यांच्या सुरक्षेची आणि कल्याणाची काळजी



घेणे हेच आपलं काम आहे.' याची जाणीव करुन दिली. दुपारचे जेवण उप-महानिरीक्षक आणि इतर चार अधीक्षक यांच्याबरोबर घेण्यास तिने सुरुवात केली. जेवता जेवता चर्चा करुन महत्त्वाच्या प्रश्नांवर उपाय शोधले. तिहार तुरुंगाला सुधारसंस्था करण्याचे प्रयत्न तिने सुरु केले.

तिहार तुरुंग १८० एकर जागेत पसरलेला, चार स्वतंत्र तुरुंग असलेला, उंच भिंतींनी बंदिस्त असलेला सर्वाधिक सुरक्षित तुरुंग आहे. जवळ जवळ ९००० कैदी यात असतात. सशस्त्र पोलिसांची गस्त, उंचावर लाकडी खोल्यातून स्वयंचलित शस्त्रधारी, भयावह दिसणारे पहारेकरी, मजबूत लोखंडी गज, मोठ्या आकाराची जाड, चपडी कुलपे, भक्कम पोलादी दरवाजे धडकी भरावी असंच रुप. पण किरणने तुरुंगाची भयानकता पार बदलून टाकली.

पृथ्वीवर नरक निर्माण करण्यासाठी जे लागतं ते सगळं या तुरुंगात होतं. कैद्यांना, विडी, सिगारेट, दारु अंमली पदार्थ सारं काही मिळायचं. नुसतं कोंडलेलं अशांत मन, रिकामे हात आणि भडकलेलं डोकं त्यामुळे मारामाऱ्या, उद्दामपणा त्यासाठी शिक्षा हे सत्र चालूच राहायचं.

किरण तिहारच्या चारही तुरुंगातून दिवसा, रात्री वरचेवर फेऱ्या मारु लागली. तिने अमली पदार्थांच्या समस्येला प्राधान्य दिले. त्यासाठी लागणारी औषधे मागवली. एका वॉर्डाचे रुपांतर व्यसनमुक्ती केंद्रात केले. अमली पदार्थ तुरुंगात येणाऱ्या चोरवाटा बंद केल्या. कैद्यांना विडी, सिगारेट देणं बंद केलं. कारागृहात धूम्रपानावर बंदी आणली. कैद्यांची मनं वळविण्यासाठी त्यांच्यापुढे भाषणे करुन त्यांना आपला हेतू समजावून दिला. साक्षरता मोहिमेसाठी सुशिक्षित कैद्यांना शिक्षक केले. कैद्यांना अभ्यासवर्गाची सवय लावली. आता कैदी अभ्यास, योगासने विणकाम, शिवणकाम, टी.व्ही. दुरुस्ती अशा कामात मग्न होऊ लागले. बराकींमधून वेगवेगळ्या धर्मांच्या प्रार्थना, गीते यांचे आवाज येऊ लागले. 'विपश्यना साधना संस्थान' ने किरणशी संपर्क साधला आणि कैद्यांना आत्मशोध, चित्तशुध्दी, शुध्द, शांत, सुखी होण्याचा मार्ग गवसला. 'विपश्यनामुळे कैद्यांची आणि तुरुंगातील कर्मचाऱ्यांचीही विचारशक्ती आणि वागणूक चांगली झाली.



काही काळ डाकू फुलनदेवी या तुरुंगात होती. तिला लिहा वाचायला याच तुरुंगाने शिकवले. ती हलकी फुलकी पुस्तके वाचू लागली.

१९९३ मध्ये मुलांसाठी दोन विभाग (मुंडाखाना) सुरु करण्यात आले. 'कांबळी वॉर्ड' अशी क्रिकेटपटूंची नावे त्यांना दिली. या किशोरवयीन गुन्हेगारांना चांगल्या वाईटाची जाण देऊन त्यांची शक्ती विधायक कार्याकडे वळवली. सुरक्षा आणि देखरेखीच्या कामावर तिहारमध्ये दीडहजार अधिकारी आणि जवान आहेत. त्यांचे कल्याण हाही तुरुंग प्रशासनाचाच एक अविभाज्य भाग आहे

हे लक्षात घेऊन किरणने सेवकवर्गासाठीही अनेक उपक्रम राबवले. कर्मचाऱ्यांच्या स्त्रियांना कौशल्याची कामे शिकवून त्यांच्या कुटुंबाची मिळकत वाढविणे, कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळा बदलत्या ठेवून कुटुंबाबरोबर त्यांना अधिक वेळ घालविता यावा अशी योजना करणे अशा गोष्टींकडेही तिने लक्ष पुरवले. हे सारे करत असतानाच 'अंमली पदार्थांचे सेवन आणि घरगुती हिंसाचार' या विषयात संशोधन करुन तिने डॉक्टरेट मिळविली. तिच्या कार्याला मानसन्मानही मिळाले. राष्ट्रपतींकडून 'पोलिस शौर्यपदक', नॉर्वेच्या 'इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ गुड टेमप्लार्स' या संघटनेतर्फे अंमली पदार्थ प्रतिबंध क्षेत्रात मोलाचे कार्य केल्याबद्दल 'एशिया रीजन ॲवॉर्ड', फिलिपिन्सच्या रॅमन मॅगसेसे फौंडेशनचे 'रॅमन मॅगसेसे ॲवॉर्ड फॉर गव्हर्न्मेंन्ट सर्व्हिस' हे पारितोषिकही मिळाले.

या सर्वांहूनही महत्त्वाचे म्हणजे तिचा आदर्श समोर ठेवून चित्रपट तयार झाले. 'कर्तव्यम्' हा तेलगू चित्रपट, तोच तामिळ भाषेत डब झाला. त्याचं नाव 'विजयाशांती आय.पी.एस.' या चित्रपटातील किरणची व्यक्तिरेखा करणाऱ्या विजयाशांती या अभिनेत्रीला राष्ट्रीय पारितोषिक मिळाले. किरणच्या आयुष्यावर आधारित 'स्त्री' आणि 'इन्सपेक्टर किरण' या सारख्या टी.व्ही. मालिका सादर झाल्या. स्वत:च्या हयातीत स्वत:च्या जीवनाला असं मोठ्या आणि लहान पडद्यावर प्रसारित झालेलं पाहण्याचं भाग्य लाभलेली ही पहिलीच पोलिस अधिकारी होय !





*Women Who Changed the World*



**थॉमस एडिसन**

यश हे १ % प्रेरणा असते व ९९ % कष्ट असते.

**डॉरशिया ब्रॅन्डे**

यश म्हणजे अशी कृती की ज्यामध्ये नापास होणं अशक्य आहे.

**वुडी ॲलन**

जीवनातील ७७ % यश हे दिखाऊ असते.

**मार्क विक्टर हॅन्सन**

शेवटी सगळं बरोबर व्हायची वाट पाहू नका. ते कधीच परिपूर्ण नसेल तिथे अनेक आव्हानं, अडथळे व खूप कमी परिपूर्ण स्थिती असेल. मग काय ? सुरुवात करा. प्रत्येक टप्प्यानंतर तुम्ही अधिक शक्तीशाली, अधिक कौशल्यपूर्ण अधिक आत्मविश्वासू व अधिक यशस्वी बनाल.

**योडा**

एखादे काम करु की नको यामध्ये कोणतेच प्रयत्न नसतात.

**तर्याण रोझ -**

भीती ही अपयशापेक्षा खुप वाईट असते.

**एडवर्ड सिमॉन्स**

यश आणि अपयश यामधील फरक म्हणजे एखादी गोष्ट बरोबर करणे व एखादी गोष्ट अचूक बरोबर करणे होय.

**जॉर्ज बर्नाड शॉ**

कारणे देणारा व्यक्ती हा जगाने आपल्याला स्विकारावे याची वाट पाहतो. तर कारणे न देणारा व्यक्ती जगाला आपण स्विकार[illegible] या प्रयत्नात असतो तरीसुध्दा प्रगती कारणे न देणाऱ्या व्यक्तीवर अवलंबून असते[illegible]

# छत्रपती शिवाजी महाराज



शिवरायांच्या वयाची पहिली सहा वर्षे फार धावपळीत गेली.
पण या धावपळीतही जिजाबाईंनी शिवरायांना उत्तम शिक्षण दिले.
सायंकाळी त्या सांजवात लावत. शिवबाला जवळ घेत,
मायेने त्याला कुरवाळत, त्याला रामाच्या आणि कृष्णाच्या,
भीमाच्या आणि अभिमन्यूच्या गोष्टी सांगत तसेच कधी ज्ञानेश्वरांचे,
कधी नामदेवांचे तर कधी एकनाथांचे अभंग म्हणून दाखवत.
शिवरायांना शूर पुरुषांच्या गोष्टी आवडत. साधुसंतांची
चरित्रेही त्यांना आवडत.



# डॉ.बाबासाहेब आंबेडकर

डॉ.बाबासाहेब आंबेडरांची गरीब परिस्थिती. वडील सरकारी नोकरीतून निवृत्त झालेले. आपल्या मुलाने खूप शिकून ज्ञानी व्हावे असे त्यांच्या वडिलांना वाटायचे. बायकोचे आणि लग्न झालेल्या मुलीचे दागिने वेळोवेळी गहाण ठेवून त्यातील पैशातून मुलाला पुस्तके घ्यायचे. स्वत:ची भूक मारायचे पण मुलाची पुस्तकाची भूक भागवण्याचा सदैव प्रयत्न करायचे. भीमरावांनीही पुस्तकांचा पुरेपूर वापर करुन वाचनकला विकसित केली. ज्या अभ्यासासाठी इंग्लंडमध्ये ८ वर्षे लागतात, तो अभ्यास त्यांनी सव्वा दोन वर्षात पूर्ण केला. यासाठी २४ तासांपैकी २१ तास ते वाचन करत. वयाच्या चाळीशीनंतरही ते १८ ते २० तास काम करत होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना 'भारतरत्न' हा किताब मिळवून त्यांचे प्रयत्न सार्थकी लावले.

# ए.पी.जे.अब्दुल कलाम




१९९० च्या प्रजासत्ताक दिनी मला 'पद्मविभूषण' या
सन्मानाने गौरवण्यात आले.
दहा वर्षांपूर्वी 'पद्मभूषण' सन्मान मिळाला होता,
त्या वेळच्या आठवणींना मला घेरून टाकले.
मी त्यावेळी होतो, तोच होतो तसाच राहत होतो.
दहा बाय बाराच्या खोलीत, पुस्तकांनी भरलेल्या
कपाटांच्या संगतीने, त्या खोलीत कागद आणि
अत्यावश्यक जुजबी भाड्याचे फर्निचर माझ्याबरोबत तिथे होते.

# श्री.शरद पवार



श्री.पवार यांचे वाचन विपुल आणि विविधांगी आहे. ज्यावेळी त्यांच्याकडे वेळ नसेल तेव्हा वाचन करण्याची जबाबदारी ते एखाद्या योग्य व्यक्तीवर सोपवतात आणि त्याच्याकडून तो विषय समजावून घेतात. श्री.पवार हे आधुनिक व्यक्तिमत्व आहे. 'टेबलावर आलेल्या सर्व फाइल्स वाचणारे मुख्यमंत्री' असा श्री.पवार यांचा लौकिक होता.



# शाहरुख खान

शाहरुख खानला वाचनाची खूप आवड आहे. फिक्शन, नॉन-फिक्शन कोणत्याही प्रकारची पुस्तकं त्याला वाचायला आवडतात. काही आत्मचरित्रंही त्याने वाचलेली आहेत. 'मी एका वेळी एकच पुस्तक वाचत नाही, तर ३-४ पुस्तकं वाचतो. एक बेडरुममध्ये, एक बाथरुममध्ये, एक गाडीत, एक विमानातून प्रवास करतानाही असतं. ही पुस्तकं एका जागेवरुन दुसऱ्या जागेवर हलत नाहीत. समजा, प्रवासात मी एखादं पुस्तक वाचत असेन, वीस पानं वाचून झाली असतील, तर ते पुस्तक मी तिथेच सोडून देतो. बेडवरचं बेडवरचं राहतं आणि बाथरुममधलं बाथरुममध्ये... माझं असचं आहे !' किंग खानचं वाचनवेडही त्याच्यासारखं किंग साईज दिसतंय.

# बिल गेटस्



बिल गेटस्ला पुस्तक वाचनाने वेड आहे. त्यासाठी तो वेळात वेळ काढून पुस्तकांचे वाचन करतो. प्रवासातही बिल अनेक पुस्तके घेऊन जातो. वर्तमानापेक्षा भविष्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या आणि स्वप्नांना ध्येयात बदलून अहोरात्र कार्य करणाऱ्या बिल गेटस्ची 'बिझनेस ॲट द स्पीड ऑफ थॉट' आणि 'द रोड अहेड' ही दोन पुस्तके जगभर प्रसिध्द आहेत. त्याच्या घरातील त्याचे आवडते दालन म्हणजे त्याचे ग्रंथालय आहे, जिथे सुमारे १५,००० पेक्षा जास्त पुस्तके संग्रही आहेत.



# महात्मा गांधी

महात्मा गांधी ह्यांना पुस्तक वाचण्याचे वेड होते. त्या संदर्भात ते म्हणतात, 'साऊथ आफ्रिकेत असताना मी रस्किन ह्या लेखकाचे 'अनटू द लास्ट' हे पुस्तक वाचले आणि माझ्या जीवनावर इतका प्रभाव पडला की, भारताच्या स्वातंत्र्यासाठ मी स्वयंप्रेरीत झालो. एकदा गांधीजींना इंग्लंडमध्ये एका इंग्रजी महिलेने भगवद्गी संबंधी एक प्रश्न विचारला.तेव्हा आपल्याला भारतातील भगवद्गीता ह्या महान ग्रंथाचे अजिबात ज्ञान नाही, याची गांधीजींना लाज वाटली आणि त्यांनी अहोरात्र अध्ययनकरून सहा महिन्यांमध्ये भगवद्गीता वाचून काढली. महात्मा गांधी म्हणतात, 'भगवद्गीतेमुळे आपल्या आयुष्याला एक वेगळे वळण दिले. पुस्तके जवळ असल्यावर आपले जिवलग मित्र आपल्याजवळ नसले तरी चालतात, इतकी प्रचंड शक्ती पुस्तकांमध्ये असते. मी माझ्या जीवनात पुस्तकांचे जसजसे वाचन करुन लागलो, तसतसे पुस्तकांचे महत्व मला पटू लागले.

# जेआरडी टाटा



जेआरडी टाटांचे शिक्षण अर्धवट राहिले तरी त्यांनी आपल्या उद्योगात एक वेगळा ठसा उमटवला आणि याचे एकमेव कारण म्हणजे काम संपल्यावर ते आपल्या कार्यालयात तासन्‌तास वाचन करत. त्यांना व्यवस्थापनाची पुस्तके वाचणे खूप आवडायचे. एकदा जेआरडींना हिवतापाने ग्रासले होते. ते बिछान्यावर पडून दिवसभर पुस्तके वाचत. त्यावेळी त्यांच्या बहिणीने पुस्तक बाजूला ठेवून आराम करण्यास सांगितले. तेव्हा जेआरडींनी तिला सांगितले की, मला टाटा समूहामध्ये माझे नाव उज्ज्वल करायचे आहे. आयुष्यभर जेआरडी ह्यांनी शिकत राहण्यास ध्यास घेतला.



# अझीम प्रेमजी

अझीमजी आपल्या सवयींबाबतीत उल्लेख करताना म्हणतात, 'मला पायी फिरायला खूप आवडते. मी नेहमी वर्षभरात १२ ते १५ वेळा शहराबाहेर फिरायला जातो, त्यामुळे आत्मचिंतन करायला बराच वेळ मिळतो. मला व्यवस्थापनाची आणि नेतृत्वगुणाची पुस्तके वाचायला खूप आवडतात. वर्षातून किमान १० ते १२ पुस्तके तरी मी विकत घेऊन वाचतो. अझीमजी गांधीवादी विचारांचे आहेत. महात्मा गांधी जॅक वेल्च, मायकेल डेल हे त्यांचे आदर्श आहेत.

## किरण मुजुमदार शॉ

बायोकॉन इंडिया कंपनीच्या संचालिका किरण मुजुमदार शॉ ह्यांना 'भारतीय बायोटेक्नोलॉजीची सम्राज्ञी' म्हणून ओळखले जाते तसेच भारतातील सर्वात श्रीमंत स्त्री म्हणून त्यांची गणना होते.
भारत सरकारने त्यांना 'पद्श्री' देऊन सन्मानित केले. आपल्या यशामध्ये व्यवस्थापनाच्या पुस्तकांच्या तसेच आत्मचरित्रपर पुस्तकांच्या वाचनाचा सहभाग आहे, असे किरणजी म्हणतात.






## अब्राहम लिंकन

अमेरिकेचा १६ वा राष्ट्राध्यक्ष असणाऱ्या अब्राहम लिंकन यांचे शालेय शिक्षण केवळ १८ महिने तेही विविध शाळांमध्ये, फिरत्या शिक्षकांकडुन झाले, परंतू हातात पडेल ते पुस्तक वाचण्यांच्या सवयीमुळे त्यांचे स्वत:चे स्वत: बरेच शिक्षण झाले.
बायबल, शेक्सपिअरचे लेखन, इंग्लिश आणि अमेरिकन इतिहासाचा त्याने खोलवर अभ्यास केला. याच वाचनाच्या जोरावर त्यांनी अतिशय साधी अशी वक्तृत्वशैली कमावली.

## जपान

जपानी माणूस लहान वयातच आपल्या भावी पिढीला वाचनाचे धडे द्यायला सुरुवात करतो. वर्षभरात ५२ आठवडे असतात. हे ध्यानात ठेवून जपानी माणूस आठवड्याला एक पुस्तक वाचतो, त्यामुळे प्रत्येक वर्षी ५२ पुस्तके आणि १० वर्षामध्ये ५२० पुस्तके तर २० वर्षामध्ये १००० हून जास्त पुस्तके जपानी माणूस वाचत असतो आणि त्यामुळेच तो स्वत: निवडलेल्या क्षेत्रात तज्ज्ञ होऊन प्राविण्य मिळवतो.
वाचन संस्कृतीमुळे जपान राज्य आज सर्वोत्तम देशांच्या यादीमध्ये अग्रेसर आहे.






# विश्वकवी रविंद्रनाथ टागोर

शिक्षणासाठी शाळेत जावे लागते हा जगाचा न्याय आहे. शाळा सोडल्याशिवाय शिक्षणाला आरंभच होत नाही हा टागोरांनी लावलेला शोध आहे. अनेकांना आजवर घडलेला बोध आणि टागोरांनी लावलेला शोध यात जमीन अस्मानाचे अंतर आहे टागोर कोणत्याही शाळेत रमले नाहीत. कोणत्याही वर्गात थांबले नाहीत. गुरुजनांच्या वाऱ्याला आणि थाऱ्यालासुध्दा थांबले नाहीत. तरी टागोर सुविद्य झाले. घराघरात पोहचलेल्या एका गीताचे रचनाकार झाले. एक हजार कविता, दोन हजार गीते, कांदबऱ्या, नाट्य, निबंध, प्रबंध समिक्षा पत्रे प्रवासवर्णने अशा नाना परींनी प्रकट झालेली त्यांची साहित्यसंपदा हे भारताचे ऐश्वर्य ठरले. त्यांची योग्यता ओळखून जीवनाच्या उत्तरार्धात नियतीने त्यांच्यावर मानसन्मांनाचा वर्षाव केला. त्यांच्या 'गीतांजली' नावाच्या गीतसंग्रहास १९१३ मध्ये नोबेल पारितोषिक मिळाले. कलकत्ता, बनारस, ढाका, उस्मानिया विद्यापीठांबरोबरच ऑक्सफर्ड विद्यापीठाने त्यांना सन्माननीय डॉक्टरेट पदवी प्रदान केली.

रविंद्रनाथांचा जन्म १८६१ मध्ये झाला. वयाच्या अकराव्या वर्षी त्यांची पहिली कविता प्रसिध्द झाली त्यांची अखेरची कविता लिहीली गेली तेव्हा ते ८० वर्षांचे होते. जवळजवळ ७० वर्षे ही साहित्यसरिता वाहत राहिली. टागोर देशभक्त होते, तत्वज्ञ होते, समाजसुधारक होते शांतीनिकेतन, श्री निकेतन विश्वभारती या संस्थाचे शिल्पकार होते. टागोरांनी शाळा नाकारली परंतू शिक्षण नाकारले नाही. त्यांचे जीवन ही एक अविरत



संस्कार साधना होती सगे सोयरे, नोकर चाकर यांनी गजबजून गेलेला जोडो साँको या नावाचा टागोरांचा वाडा हे एक विद्यापीठ होते रात्रंदिवस नानाविध उपक्रमांनी निनादत असणारे मुलुखावेगळे घरकुल ही टागोरांची संपत्ती होती या वाड्यात रामायणाचे, महाभारताचे, गीतेचे उपनिषदाचे वाचन होत असे. संगीताच्या मैफली होत. बंगाली नाटके होत इंग्लिश भाषणे होत. चित्रप्रदर्शने भरत. विचारांची वादळे विश्रांतीसाठी या वाड्यात येत. टागोरांचे आजोबा द्वारकानाथ टागोर हे एक जहाज वाहतूक कंपनी चालवित. त्यांनी भारताबाहेरचे जग पाहिले होते. त्यांचे वडील देवेंद्रनाथ हे राजा राममोहन रॉय, यांच्या वाटेने जाणारे, ब्रम्हचिंतनात रमणारे उपनिषदांचे अखंड वाचन करणारे एक तत्वचिंतक होते. तीन प्रांतात पसरलेली शेतीवाडी असणारे ते एक सधन जमीनदार होते अधूनमधून ते हिमालयात जाऊन राहत उपासना करीत ध्यानधारणा करीत वयाने सर्वात लहान असणारे आणि क्रमाने चौदावे असणारे आपले चिमुकले चिरंजीव रविंद्रनाथ यांना मायेने कौतुकाने आणि संस्कारित करण्याच्या हेतूने वडील




बरोबर घेऊन जात या भ्रमंतीचे रविंद्रनाथांना वेड लागले त्यांनी जीवनात बारा वेळा जग प्रवास केला. जग ज्यांचे झाले ते जगाचे झाले या जगात भारत त्यांचे तीर्थ होते.

रविंद्रनाथ हे तत्वज्ञ आणि कवी होते त्यांच्या कवितेत त्यांचे तत्वज्ञान प्रतिबिंबीत झाले होते. त्यांच्या जीवनात त्यांचे तत्वज्ञान घर करुन राहीले होते. पण हे तत्वज्ञान आले कोठून ? बंगालमध्ये भ्रमंतील रमणारा आणि गात गात पुढे जात राहणारा बाऊल या नावाचा लोक कवींचा वर्ग होता. मनुष्य गौरवात धर्माचे सार शोधणारा हा 'बंगाली' 'वासुदेव' अंगणाप्रांगणात नाचत नाचत मागे गीतांचा सुगंध ठेवून निघून जात होता. टागोरांनी बालपणी ही लोक गीते पाठ केली. वारंवार म्हटली वेळी अवेळी आठवली, आळवली. या निरक्षर कवींचे अक्षर वांङ्मय हे रविंद्रांच्या प्रतिभेचे अन्न झाले. लोकगीतांनी जागृत केलेली, उपनिषदांनी संस्कारित केलेली, धम्मपदांचा स्पर्श लाभलेली, कबिरांमुळे भाव निर्भर झालेली, कालिदासांचे लेखन लावण्य लाभलेली रविंद्रांची प्रतिमा भारतीय भक्तीभावनेची रुद्रवीणा घेऊन आपले जीवनसंगीत आळवू लागली.

रविंद्रनाथांच्या मते ईश्वर हा सर्व चराचरात व्यापलेला आहे. एका कवितेत टागोर म्हणतात, देवा घरटेही तूच, पक्षी पण तूच आणि आकाश पण तूच..'' गुरुदेव म्हणतात हे मंदिरात बसणे, डोळे मिटून घेणे, जपमाळ ओढत राहणे सोडून दे रे देव खडी फोडणाऱ्यांच्या घामात आहे. श्रमिकांच्या कामात आहे, शेतकऱ्यांच्या सावलीत आहे. त्यांच्या अंगावरचे वस्त्र धुळीने माखले आहे घामान चिंब भिजले आहे''. हे जग सुंदर करण्याचा प्रत्येक प्रयत्न ही प्रार्थना आहे प्रसन्नतेशिवाय प्रसाद नाही. आर्तते वाचून आरती नाही. पूज्यते वाचून पूजा नाही '' प्रथम लीन व्हा, मग विलीन व्हा, मग एकरुप व्हा''.

बोलापूरच्या सीमेवर असणारी विस्तीर्ण माळरानावर जमीन देवेंद्रनाथांनी एकदा पाहिली. त्या भूमीत असणारे सप्तपर्णा वृक्ष पाहून देवेंद्रांना एक प्रकारचे समाधान वाटले. वातावरणातील नीरवता पाहून तेथेच एक लहानशी वास्तू बांधण्यात आली. ते शांतीधाम पुढे शांती निकेतन झाले शहरी जीवनाला विटलेल्या टागोरांना हे शांतीवन फार आवडले वयाच्या चाळीशीनंतर आपल्या जीवनाची शैक्षणिक प्रयोगशाळा म्हणून या भूप्रदेशाकडे टागोर पाहू लागले. त्यांनी तेथे एक आश्रम काढून, हाताशी चार-सहा विद्यार्थी घेऊन एका शैक्षणिक चळवळीचा पाया घातला.

टागोरांच्या प्रयत्नामागे एक उद्वेगजनक कहानी होती. एक खंत होती. बालपणी ते कोणत्याही शाळेत रमले नाहीत. अत्यंत निर्जिव आणि साचेबंद अशा शालेय वातावरणाला ते विटले होते. निसर्ग आणि समाज यापासून मुलांची फारकत केली जाते.

शिक्षण हे पुस्तकाकडून पुस्तकाकडे वाहत जाते. जगणे बाजूला राहते. शिकणे चाकोरीतून चालत राहते मुले जागेवर जखडून टाकली जातात. त्यांची पुरती यंत्रे केली जातात. वेतनार्थी शिक्षक आणि आनंदाला वंचित झालेले परीक्षार्थी विद्यार्थी यांचे भावशून्य मीलन म्हणजे शिक्षण अशी परिस्थिती आढळते हे सर्व चित्र टागोरांना बदलायचे होते. जुने चित्र पुसायचे होते.


शांतीनिकेतनमधल्या शाळेत टागोरांनी हे प्रत्यक्षात प्रयत्नपूर्वक आचरले या आश्रमात सर्वत्र शांतता आणि रम्यता यांचे अधिराज्य होते आम्रवृक्षाच्या छायेत विद्यार्थी बसत कुठे संगिताचा वर्ग चाले. कुठे हास्य कल्लोळात भूमितीतील प्रमेयांचा उलगडा केला जात असे. या सर्वात शासनापेक्षा अनुशासनाला महत्व असे. मुलांना मातृभाषेतून शिकवावे हा टागोरांचा आग्रह होता. शाळा समाजाची प्रतिकृती असावी शिक्षण ही जीवनाची आवृत्ती असावी. शिक्षण सर्वार्थाने सर्वांगीण असावे. प्रत्येक ज्ञानेंद्रिय, कर्मेंद्रिय आणि मन:शक्ती यांची त्यात गुंतवणूक असावी. शरीराचे मनाशी बोलणे व्हावे. मनाचे शरीराबरोबर चालणे व्हावे त्यात हसणे खेळणे असावे. मुलांनी खुलावे, फुलावे बहरावे, मोहरावे उमलावे, नाचावे, बागडावे, जीवन प्रवाहात डुंबत राहावे असा हा एकूण विचार होता. शांती निकेतन चालू झाल्यावर ते चालू ठेवण्यासाठी टागोरांनी चालत्या संसाराला खीळ घालावी लागली. पुरीच्या किनाऱ्यावर ब्रम्हचिंतन आणि लेखन निर्वेधपणे घडावे यासाठी बांधलेले एक सुंदर घरकुल राहावयास जाण्यापूर्वीच विकावे लागले पत्नीच्या अंगावरचे अलंकार संस्थेच्या सौभाग्य रक्षणासाठी खर्ची पडले. पण हे सगळे कशासाठी केले गेले ? विद्येचे निशाण फडकत रहावे म्हणून भारतातील आणि भारताबाहेरील उगवती पिढी नव्या जगाच्या निर्मितीसाठी नव्या जगाच्या स्वागतासाठी कटिबध्द व्हावी यासाठी. गुरुदेव टागोरांचे असे एक जीवन विषयक तत्वज्ञान होते ते असे मानत की, अनंत वस्तूंनी गजबजलेल्या या विश्वात मानवापेक्षा श्रेष्ठ असे काही नाही. मानव्य हा निर्मितीचा कळस आहे "Man is the crown of all creation" या सूत्रावर त्यांचा विश्वास होता.

टागोरांचे व्यक्तिगत जीवन उदात्तरम्य होते मानवकुलाच्या ऐक्यावर आघात करणाऱ्या टोकाच्या राष्ट्रवादावर त्यांनी टीका केली. आपल्या विदेश दौऱ्यात सभा मागून सभा घेऊन त्यांनी मानवी संस्कृतीवरच्या या संकटाकडे लोकांचे लक्ष वेधले. लोकमान्य टिळकांसारख्या लोक नेत्यावर अकारण खटला भरणाऱ्या सरकारच्या विरोधात ते उभे राहीले. जालियनवाला हत्याकांडाचा विरोध म्हणून सरकारने दिलेला 'सर' हा किताब त्यांनी परत केला. पाँडेचेरीच्या गुंफेत योगसाधना करणाऱ्या श्री अरविंदांना प्रणिपातपूर्वक आवाहन करण्यासाठी हा महापुरुष दक्षिणेकडे केला. जातवार मतदार संघाची राष्ट्रघातक कार्यवाही थांबविण्यासाठी जीवाचे निर्वाण मांडणाऱ्या गांधी नावाच्या महात्म्याचे प्राण वाचविणाऱ्यासाठी सर्वस्वाचा जोहार करण्याची तयारी या पुरुषोत्तमाने दाखविली.

आळंदीच्या ज्ञानदेवाप्रमाणे या विश्वकवीने विश्वात्मक देवाजवळ एक प्रार्थना केली या माझ्या देशाला उदात्त आणि उन्नत अशा स्वर्गभूमीत नेऊन ठेव. टागोरांची ही प्रार्थना अवघ्या मानव कुलासाठी होती.

जेथे मन निर्भर असेल आणि मस्तक उन्नत असेल जेथे ज्ञान विमुक्त असेल, जेथे क्षुद्रतेच्या आणि स्वार्थाच्या भिंतीनी जग भेगाळले नसेल जेथे शब्द सत्याच्या गर्भातून प्रकट होतील, जेथे अदम्य प्रयत्न पूर्णत्वाच्या आलिंगनासाठी आसुसलेला जेथे विशुध्द विचारांचा विमल प्रवाह रुढीच्या वैराण वाळवंटात विराम पावला नसेल, जेथे मन तुझ्या मागोमाग सदैव विकसनशील विचार आणि कृती यांच्या राज्यात चालत राहील अशा दिव्य लोका, माझ्या देवा, माझ्या देशाला घेऊन जा,''

टागोरांना असणारे हे उदयाचे जग अजून तरी क्षितीजावर दिसत नाही. या उदयाचा जगाची चाहूल घेणारा हा विश्वकवी त्याच्या शोधार्थ या मर्त्य लोकातून चालता झाला तो दिवस होता ७ ऑगस्ट १९४१.







# निरभ्रतेचा दुत जे. कृष्णमूर्ती

काळाच्या ओघात विस्मृतीच्या कुंचल्यांनी जी पुसली गेली नाहीत अशा अनेक ललामभूत व्यक्तिमत्वांपैकी एक व्यक्तीमत्त्व म्हणजे जे. कृष्णमूर्ती. जे कृष्णमूर्ती हे एक कौतुक आहे. कुतुहल आहे, कोडे आहे कोणी म्हणतात की कृष्णजी हे अगम्य आहेत गुढरम्य आहेत तर कोणी अशी ग्वाही देतात की इतके सरळ आणि सुगम विवेचन करणारे तत्त्वज्ञ फक्त कृष्णजीच आहेत. हे कृष्णमूर्ती आहेत तरी कोण ?

जे कृष्णमूर्ती या नावाने जगभर ते ओळखले जातात. जिद्द या ग्राम नामास संक्षेप देऊन त्याच्या आद्याक्षरापासून एक आडनाव तयार झाले. कृष्णमूर्तींचा जन्म रात्रीच्या काळोखात, म्हणजे मध्यरात्रीच्या प्रहरी झाला. त्यामूळे त्यांना कृष्णमूर्ती नाव प्राप्त झाले. ग्राम आणि समय यांची गुंफण घातली आणि जे कृष्णमूर्ती ही नाममुद्रा अस्तित्वात आली. जिद्य हे कृष्णजींच्या वडीलांचे गाव. आंध्र प्रदेशातील सागरी किनारपट्टीवर आहे. जे कृष्णमूर्ती यांचा जन्म आंध्रमध्ये असणाऱ्या चित्तूर जिल्ह्यातील मदनपल्ली या गावी १२ मे १८९५ या दिवशी झाला.

कृष्णमूर्तींचे वडील थिऑसॉफिस्ट होते. थिऑसॉफी हा मानवकुलाच्या एकतेचा आणि बंधुत्वाचा एक विचार होता. या बंधुत्वाचे संस्करण करणाऱ्या आणि जगाचा उत्कर्ष घडविणाऱ्या काही सूक्ष्मशक्ती अधिभौतिक स्तरावर वावरतात अशी थिऑसॉफीची धारणा होती. मानवाच्या ठायी असणाऱ्या आंतरिक शक्ती जागृत झाल्या तर जगातील सिध्द पुरुषांशी संपर्क साधणे शक्य आहे असा एक विश्वास होता. त्यांच्या वडीलांची या विचारांवर नितांत श्रध्दा असल्याने सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्यावर अंडयार येथील थिऑसॉफिकल सोसायटीच्या कार्यालयात सवेतन सेवा करु लागले कृष्णमूर्ती आणि धाकटे बंधु नित्यानंद हे दोघे अंडयारच्या विराट वटवृक्षाच्या छायेत राहु लागले. मैलापूरच्या शाळेत शिकू लागले. ही दोन्ही भावंडे समुद्रावर पोहण्यासाठी जात. त्यांचे पोहणे आणि डुंबणे चालू असताना थिऑसॉफीचे एक प्रवर्तक आणि ॲनी बेझंट बाईंचे योगमार्गातील सांगाती श्री लेडबीटर यांच्या नजरेस ही दोन मुले पडली. ती त्यांच्या नजरेत भरली त्यांची दिव्यदृष्टी या मुलांवर खिळून राहीली. या मुलांभोवती एक तेजोवलय दिसत होते. ॲनी बेझंट यांना हा नियतीचा नजराणा दाखविला. बाईंना हरपले श्रेय गवसले. या दोन मुलांचे पालकत्तव ॲनी बेझंटबाई यांनी त्यांच्या पित्याच्या अनुमतीने आपल्याकडे घेतले त्यांना थिऑसॉफीची दिक्षा दिली. त्यांना अधिकारी व्यक्तिंच्या वर्तुळात ठेवले १९११ ते १९२० या काळात कृष्णमूर्ती लंडन येथे राहीले पण त्यांची शिक्षणात विशेष प्रगती झाली नाही लंडन विद्यापीठाची मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होऊ शकले नाहीत. त्यामूळे ऑक्सफर्ड केंब्रिज विद्यापीठात प्रवेश घेण्याचा मनोदय सोडून दयावा लागला. या दोन्ही विद्यापीठांचे दरवाजे उदयाच्या जगद्गुरुसाठी बंद झाले.

१९२१ साली कृष्णजी भारतात परत आले. वडील व आप्तस्वकियांना भेटून कॅलिफोनिर्यात

गेल्यानंतर ओव्हाल येथील आर्य विहारात राहू लागले आणि याच कालावधीत यातनापर्व सुरु झाले. वैद्यकशास्त्राच्या आवाक्यात न येणाऱ्या अनामिक व्याधींनी त्यांचे शरीर ग्रासले. कृष्णमूर्ती यांचा कायापालट होत होता. त्यांच्या जाणीवेचे जागरण उन्नयन होत होते दिव्यत्वाचे नवीन परमाणू तिच्यात प्रवेश करीत होते. हा परतत्वस्पर्शाचा प्रभाव आणि भगवत शक्तीचा अविर्भाव होता. त्यामूळे कृष्णजींच्या अध्यात्म कार्यासाठी ॲनी बेझंट यांनी एक स्वतंत्र संस्था स्थापन केली. तिचे नामकरण केले ते 'पूर्वतारक संघ' असे 'ऑर्डर ऑफ द ईस्ट' ही संस्था विश्व विख्यात झाली. या संघाचे एक लाख सभासद होते. कृष्णजी या संघाचे अध्यक्ष होते. हॉलंडमध्ये एक किल्ला व दोन हजार एकर जमीन या संघाला मिळाली. संघाचे वार्षिक मेळावे होत. त्यामध्ये कृष्णजींची प्रवचने होत. कृष्णमूर्तींची देववाणी श्रवणी पडावी म्हणून दूरदूरचे साधक येत. भूलौकीच्या या बैकुंठात चारी मुक्तींचा वास घडत होता. कृष्णमूर्ती हे जगाला नवीन विचार देणारे आचार्य ठरले एक विश्वसंघ विभूती म्हणून जग त्यांच्याकडे पाहू लागले.

१९२५ मध्ये थिऑसॉफिकल सोसायटीचा सुवर्णमहोत्सव भारतात साजरा झाला. आपला आजारी भाऊ नित्यानंद प्रवास करु शकणार नाही म्हणून त्याला कॅलिफोर्नियात ठेवून कृष्णमूर्ती भारतात यावयास निघाले. परंतू प्रवासात असतानाच नित्यानंदाच्या निधनाची वार्ता समजली. त्यामूळे ते सुन्न झाले. त्यांचे चित्त द्रवले. थिऑसॉफीची पायाखालची भूमी डळमळली या देवदूताच्या भाव विश्वात धरणीकंप झाला. या आघातामूळेच ३ ऑगस्ट १९२९ या दिवशी कृष्णमूर्ती या नावाचा तारा थिऑसॉफीच्या अस्मानातून निखळून पडला. ही संघटना बरखास्त करताना त्यांनी सांगितले मानवाच्या मुक्तीसाठी धर्म संप्रदाय, संघटना, गुरु आवश्यक नाहीत इतकेच नव्हे तर ते शुध्द अडथळे आहेत. साधना नामस्मरण, ग्रंथपारायण या सर्व गोष्टी व्यर्थ आहेत. त्यांची गरज पूर्वी नव्हती आणि पुढेही नाही या पडलेल्या पायवाटा पुसल्याशिवाय जगाची प्रगती होणार नाही. कृष्णमूर्ती एखाद्या विमल जलप्रवाहाप्रमाणे परीमल युक्त वायुलहरीप्रमाणे मुक्तपणे जगभर विहार करीत राहीले. जे कृष्णमूर्ती या नंतर ५० वर्षापेक्षा अधिक काळ अखेरपर्यंत जगभर बोलत फिरत राहीले. त्यांचे बोलणे प्रचारकाचे नव्हते, प्रतिपादकाचे नव्हते, श्रोत्यांना विमुक्त आत्मदर्शन घडविणाऱ्या सहचिंतनशील साधकाचे होते. सुंगधाला जात नसते. संगीताला पक्ष नसतो सूर्याला धर्म नसतो जे आहे ते आहे त्यालाच सत्य म्हणायचे उभे जीवन सद्यक्षणात सामावलेले असते. भूतकाळ निघून गेलेला असतो जीवन वर्तमानात असते. त्याला आपण शिळ्या विचारांचा नैवद्य दाखवितो. माणसे मागचे आठवत बसतात. पुढचे आखत बसतात आणि साक्षात जे समोर आहे त्याकडे पाहतही नाही. स्वतःच्या मनोवृत्तीचे साक्षित्वाने निरीक्षण करीत नाहीत. जीवन वाट्याला येते परंतू जगणे राहून जाते. वर्तमान क्षण आपण हरवून बसतो जीवन ओंजळीतून गळत सांडत जाते. आयुष्य रिते होते. हे रितेपण भरुन काढण्यासाठी आपण कशाच्याही मागे धावतो, घोषणा जयजयकार – व्रतांचे पालन ग्रंथांचे पारायण – पूजाअर्चा असे काही करीत राहतो. आपणाला सुरक्षितता हवी असते. आधार हवा असतो. परंतू स्वयंभू जीवनाला आधार लागतोच कशाला ? हा सवयीचा भाग आहे. जीवन हाच जीवनाचा आधार आहे. अन्य गोष्टींची आवश्यकता ही लावून आणि लादून घेतलेली सवय आहे. ज्यांना पूर्वपक्ष उत्तरपक्ष हवा. खंडन-मंडन हवे त्यांच्या वाटयाला निराशा येते. ज्यांना उपदेश हवा दीक्षा हवी माळ हवी त्यांना दारुण दुःख होते. दोन व्यक्ती सारख्या नाहीत. एका व्यक्तीच्या जीवनातील दोन क्षण सारखे नाहीत. वाहून गेलेले पाणी परत फिरत नाहीत. येऊन गेलेला दिवस पुन्हा येत नाही. जीवन हे असेच आहे. नुसते वाद आणि प्रणाली यांचे जंजाळ म्हणजे जीवन नव्हे. मग माणसांनी करावे तरी काय? निसर्ग जाणावा देहधर्म ओळखावा.

फक्त जगत असताना निराग्रही राहावे पक्षाचा कैवार घेऊ नये. कोणाची अवहेलना करु नये. कोणाचा जयजयकार करु नये. निरपेक्ष वृत्तीने प्रसन्न चित्ताने जगावे. जेव्हा मनावरचा भार कमी होतो, मनावर असणारी पूर्व संस्काराची, अभिनिवेशाची पुटे गळून पडतात. गतस्मृतीचे ओझे फेकून दिले जाते. भविष्याची हुरहुर सोडून दिली जाते. मन निश्चल होते तेव्हा सत्य प्रकट होते सृजनशीलता उमलून येते. बहरुन येते. मनात येईल ते येऊ द्यायचे फक्त आपण भानावर राहायचे. आपल्या मनाच्या सर्व व्यापारांकडे अगदी स्तब्धतेने पाहा. कसलीही अभिलाषा न बाळगता अवधानपूर्वक पाहा. या स्तब्धतेने, अवधानयुक्त जाणिवेने सत्य आणि मिथ्या यातील फरक कळेल. प्रमादांचे परिमार्जन घडेल. तुम्ही विमुक्त व्हाल''

कृष्णमूर्तींनी स्वत: ग्रंथलेखन केले नाही त्यांचे प्रकट चिंतन त्यांच्याच शब्दात सभास्थानी टिपले गेले. इंग्लिश भाषेची सारी शब्दकळा पारदर्शक अशा प्रासादिकतेची वसने परिधान करुन सत्याचे पूजन करीत असल्याचा अनुभव येतो तो कृष्णजींच्या साहित्य स्पर्शाने कृष्णमूर्तींच्या जीवनसरणीचे अनुसरण करण्याच्या प्रयत्नातून कृष्णमूर्ती प्रतिष्ठानने काही विद्यालये चालविली आहेत. ऋषी व्हॅली, वाराणसी अशा ठिकाणी असणाऱ्या विद्यालयातून मुलांना सुरवातीलाच सांगितले जाते ''तुम्हीच जग आहात, तुमच्यात प्रथम परिवर्तन करा. मग जग बदलेल''. पूर्वग्रह आणि पूर्वसंस्कार यापासून मुक्त व्हा, तुमच्या जीवनात स्फूर्तीचे झरे प्रकट होतील.

कृष्णमूर्तींनी गीता, उपनिषदे, वेदांत सूत्रे वाचली नव्हती. त्यांना तशी गरज वाटली नाही आपल्या ५० वर्षाच्या प्रतिपादनात धर्म ग्रंथातील एकही अवतरण त्यांनी दिले नाही. श्रोत्यांच्या रंजनासाठी इतिहास–पुराणे–लोककथा यातील दाखले दिले नाहीत. कारण त्यांच्या मते त्या महापुरुषाने अन्य कोणाचा हवाला दिला नाही त्यांचा अनुभव त्यांनी घेतला. तुमचा अनुभव तुम्ही घ्या. कारण तुम्ही आणि तुमचा अनुभव यात द्वैत नाही.

प्रवचन, विवेचनात निरभ्रता असणाऱ्या, आणि आपल्या आचरणातून जगाला विचारांचा अमृतकुंभ देणारे कृष्णमूर्ती १७ फेब्रुवारी १९८६ रोजी अनंताच्या प्रवासाला निघून गेले.



# उद्योजकतेचा तेजस्वी तारा हेन्री फोर्ड

'जगात असे किती अब्जाधीश किंवा कोट्याधीश आहेत की जे आपल्या धंद्याचा अखंड विचार न करता, त्या विचारापासून अलिप्त राहून काही तरी नाविन्य कल्पनाशक्तीला सहज आपल्या मुठीत घेतात. उद्योजकतेच्या अवकाशात झळकणारा एक तेजस्वी तारा, जो सदैव तेवत राहील व सर्वांना सतत प्रकाशाकडे जाण्यासाठी प्रवृत्त करेल असाच काहीसा हरहुन्नरी उद्योजक, ज्याचं नाव आपण अगदी सन्मानाने आज व उदयाही स्मरणात ठेवू. ते म्हणजे ''अमेरिकन उद्योगपती व फोर्ड मोटर कंपनीचे संस्थापक ''हेन्री फोर्ड''


हेन्री फोर्ड नाव ऐकताच आठवतो तो त्यांचा जगात सर्वोच्च स्थानावर असणारा उदयोजकतेचा आरसा, त्या आरशाचा वापर करुन अनेकांनी त्यांच्यासारखे बनण्याचा प्रयत्न केला. परंतु हेन्री फोर्ड व त्यांचे विचार यांना पार करुन जाणे अशक्यच...

हेन्री फोर्ड यांचा जन्म ३० जुलै १८६३ साली अमेरिकेतल्या वायने कौंटी, मिचीगन येथे अत्यंत गरीब शेतकरी कुटुंबात झाला. हेन्री फोर्ड यांचे सुरुवातीचे जीवन अगदी हलाखीचे व वेदनात्मक स्वरुपाचे होते. लहानपणापासूनच उदयोजकतेशी आस पाठी बाळगणाऱ्या त्या इवल्याशा 'हेन्री' ला सुरुवातीसच शेती व पूरक व्यवसायात रस नव्हता. हेन्री फोर्ड व त्यांची सर्व भावंडे शेतीत राबत असे तरीही त्यांचा संसाराचा गाडा पुढे सरकतच नसायचा. त्यांची आई मोलमजुरी करुन कुटुंबाला आधार देत असायची. तरीही एखाद्या भिकाऱ्याप्रमाणे त्यांची व कुटुंबियांची अवस्था असायची. इतक्या हलाखीच्या क्षणांमध्ये वेळ घालवणारा तो इवलासा देह मनाशी एकदम मोठसं पण काहीसं अवघडसं स्वप्न उराशी बाळगून असायचा. एक क्षण का होईना पण मी 'राजासारखे जीवन जगेल'' याची प्रचिती त्यांच्या लहानपणीच्या एका गोष्टीवरुन आपणाला समजून येईल.

'हेन्री फोर्ड हे लहान असताना एकदा त्यांच्या शाळेमध्ये चित्रकला या विषयाची शेरा पद्धतीची एक सोपी पण बुद्धीला तेज आणणारी अशी ही ती 'इंटरमिजीएट' परीक्षा... सोपी पण जीव लावून त्या चित्राचे रेखाटन करण्याची ती एक पद्धत ... कारण त्या परीक्षेचा विषय हा काहीसा वेगळा... ''तुमचं ध्येय तुम्ही तुमच्या चित्रांमधून रेखाटा'' सर्वांनी आपआपल्या परीने, जमेल तसे आपण 'भविष्याचे काय शिल्प आहोत, ते रेखाटले कुणी 'बँकिंग ऑफिसर' तर कुणी 'पोलिस दल' ... तर कुणीतरी 'अभिनेता' होण्याचं ध्येय त्या चित्रादवारे भावना रुपात सर्वांसमोर आणलं, परंतु हेन्री फोर्ड यांच्या मनातील ध्येयाचं वादळ खूप दूरवर पोहोचलेलं होतं आणि ते शमनारं नव्हतं. कारण त्यांचा ध्येयाचा विषय व त्यांच्या ध्येयशक्तीचा तुरा हा पर्वताच्या उत्तुंग अशा शिखरावर झळाळला होता. दुसऱ्या दिवशी त्या सर्व शाळेतील सहभागी विद्यार्थ्यांचा निकालाचा दिवस होता. सर्वजण आपले ध्येय आपल्याला शेवटच्या टोकावर घेऊन जाईल का ? हाच प्रश्न सर्वांना मनातून खुणावत होता. निकाल जाहीर झाला.

सर्वजण खुश, आनंदी अशा वातावरणात आपल्या ध्येयाची ध्येयपूर्ती झाल्याचा आनंद साजरा करत होते. पण एक मुलगा आपल्या ध्येयाच्या गाडीमध्ये बसून काहीतरी वेगळ्याच ठिकाणी भटकत होता. तो चक्क त्या ध्येयरुपी गाडीमध्ये स्वत:ला हजर नाही असाच काहीतरी वेगळा विचारांचा घोळका मनामध्ये साठवून ठेवत होता. कारण तो मुलगा चक्क एकटाच त्या परीक्षेमध्ये 'नापास' झाला होता. चित्रकला विषयाचे गुरु व त्यांचे प्रेरणास्थान यांनी चक्क त्याला ""F" हा "Fail" चा शेरा देऊन त्याच्या स्वप्नांचा चकनाचुर केला. तो दुसरा तिसरा कुणी नसून 'हेन्री फोर्ड' होता. खूप दु:ख झाले. सागराएवढे अश्रु ढाळले पण गुरुंनी त्यांचे ध्येय समजून घेतले नाही. काही कालावधीनंतर ओळखीचे वाटायला लागले. त्याच गाड्या, त्याच कारंज्या सर्व अगदी तंतोतंत असे कसे ? गुरुंना मनाला प्रश्न केला. ''हा राजवाडा कुणाचा आहे ?'' त्या व्यक्तीने एका व्यक्तीला बोलावले. जी व्यक्ती तेथे आली. त्या व्यक्तीला गुरुंनी तोच प्रश्न विचारला.'

त्या व्यक्तीने नम्रपणे उत्तर दिले ''सर तुम्ही हा राजवाडा ओळखलात. भोवताली असणाऱ्या सर्व गोष्टी ओळखल्यात''. पण हा राजवाडा का निर्माण झाला ? कुणामुळे निर्माण झाला ? सर मीच तो ज्याला तुम्ही "F" हा शेरा दिला होता व हेच ते ध्येयपूर्ती चित्र आज प्रत्यक्षात तुमच्यासमोर उभे आहे''. सर मी हेन्री फोर्ड'' जो "F" तुम्ही मला चित्रासाठी दिला होता




त्या "F' वरच मी हा राजवाडा बांधला आहे. मी आज 'फोर्ड मोटर कंपनीचा संस्थापक आहे'' व माझ्या कंपनीचा लोगो तुम्ही दिलेला "F' तोच "Fail' आहे. सर स्वप्न उराशी बाळगताना फक्त ते पूर्णत्वाला नेण्यासाठी प्रयत्न करावा. यश कधीच दुर राहत नाही यावरुन हेन्री फोर्ड यांची ध्येयपूर्तीची धडपड दिसून येते.

लहानपणी शेतीत मन रमत नाही म्हणून वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी घरातून पळ काढला व तात्पुरत्या तत्वावर यंत्र कामगार म्हणून एका कारखान्यात नोकरी सुरु केली . ती चालू असताना ते बऱ्याच गोष्टी शिकत गेले जसे की वाफेचे इंजिन व त्याबद्दलच्या सर्व गोष्टी त्यांनी आत्मसात केल्या हेन्री फोर्ड हे एक उत्तम स्व-कुशल कामगार होते. सर्व गोष्टी ते स्वत: शिकत व समजून घेत. १८८८ साली हेन्री फोर्ड यांचा विवाह 'क्लारा अला ब्रायंट' यांच्याशी झाला व ते परत एकदा शेतीत रममाण झाले. पण त्यांची ध्येय त्यांना स्वस्थ बसून देत नव्हती. तीन वर्षानंतर शेती सोडून परत इंजिनिअर म्हणून 'एडिसन इल्युमेटिंग' या कंपनीमध्ये नोकरी सुरु केली. १८९३ मध्ये त्यांची बुद्धि व ज्ञान यांच्या जोरावर 'मुख्य अभियंता' म्हणून पदोन्नती मिळाली. वर्ष १८९६ साली हेन्री फोर्ड यांनी एक कार डिझाईन तयार केले तेच त्यांचे पहिले 'फोर्ड क्वाडरी सायकल' कार डिझाईन होते. हेन्री फोर्ड यांनी भरपूर डिझाईन बनविल्यानंतर मनाशी निर्धार पक्का केला आपण स्वत:च उदयोजक व्हायचे. त्या प्रयत्नातून त्यांनी स्वत:ची 'फोर्ड कंपनी' १९०३ साली सुरु केली. परंतु भांडवलाचा तुटवडा असल्याकारणाने कंपनीमधून पहिले कार मॉडेल १९०८ साली 'मॉडेल ढ' या नावाने जगासमोर सादर झाले. ज्या मॉडेलमध्ये हेन्री फोर्ड यांची जबरदस्त इच्छाशक्ती व ध्येयपूर्ती यांचे एकत्रिकरण झालेले असेल ते जगामध्ये काहीतरी नाविन्य करण्यावाचून राहणार नाही असे कदापि होणे नाही. त्यानंतर त्यांनी लावलेल्या त्या छोट्याशा रोपटयाचा इतका मोठा वटवृक्ष झाल आहे कि आसपास असणारी सर्व रोपटी आज जमीनदोस्त झाली आहेत. हेन्री फोर्ड नेहमी सांगायचे, ''एखादे काम करायला तुम्ही सक्षम आहात किंवा एखाद्या कामासाठी अगदी नालायक आहात, या पैकी तुम्हाला काहीही वाटले तरी तुम्ही अगदी बरोबर आहात कारण ''तुम्ही स्वत:ला अगदी बरोबर ओळखले आहेत''

अशा या देदीप्यमान कारकिर्द जगणाऱ्या एका आगळ्या वेगळ्या उद्योजकाचा अखेरचा श्वास एके दिवशी संपला आणि तो दिवस होता १७ एप्रिल १९४७ वयाच्या ८३ व्या वर्षी डियरबर्न, मिचीगन येथे त्यांनी ध्येयशक्तीच्या त्या शिखरांवर आपले नयन अखेरचे बंद करुन घेतले.

हेन्री फोर्ड यांनी परिस्थितीशी सामना कसा करावा, हा संदेश लोकांपर्यंत पोहचवून आपणच ''उद्योग जगताच्या अवकाशातील झळकणारा उत्तुंग तारा आहोत'' हे दाखवून दिलेले आहे.

# प्रेरणेचे दुसरे नाव - स्टीव्ह जॉब्स


**स्टीव्ह जॉब्सने स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीच्या पदवीदान समारंभात केलेले भाषण प्रचंड गाजले. हे भाषण म्हणजे त्यांच्या प्रेरणादायी आयुष्याचा गोषवारा आहे... आमचा मित्र अमोल कडू याने त्याचा केलेला मराठी अनुवाद...**

जगातल्या सर्वोत्तम गणल्या जाणाऱ्या महाविद्यालयांपैकी एक अशा महाविद्यालयाच्या पदवीदान समारंभात तुमच्यासोबत बोलायची संधी मला मिळते आहे, हा मी माझा बहुमान समजतो. मी महाविद्यालयीन शिक्षण कधीच पूर्ण करु शकलो नाही. आता सत्य सांगायला हरकत नाही, पण महाविद्यालयीन दीक्षांत समारंभ इतक्या जवळून मी पहिल्यांदा पाहतो आहे.

आज मी तुम्हाला माझ्या आयुष्यातील तीन गोष्टी सांगणार आहे. बस्स... काही प्रचंड कहाणी नाही. फक्त तीन छोट्या गोष्टी...

पहिली गोष्ट आहे ठिपके जुळवण्याच्या संदर्भातली... मी रीड कॉलेजमधून सहा महिन्यांतच बाहेर पडलो होतो, पण त्या आधी मी जवळपास १८ महिने कॉलेज मध्येच ड्रॉप इन म्हणून घुटमळत होतो. मग मी बाहेर पडलो तरी का ? याची सुरुवात खरं तर माझ्या जन्माच्या आधीपासूनची आहे. माझी आई ही एक तरुण, अविवाहित महाविद्यालयीन विद्यार्थिनी होती, आणि तिने मला दत्तक द्यायचे ठरवले. तिची फार इच्छा की मी पदवीधर पालकांकडे दत्तक म्हणून जावे, त्यामुळे अखेर एका वकील दाम्पत्याची त्याकरिता निवड झाली. सारे कसे

Quality is more important than Quantity
One home run is much better than two doubles



सुरळीत चालू होते आणि अचानक माझ्या जन्माच्या वेळी त्या दोघांनी ठरवले की त्यांना मुलगी हवी आहे. त्यामुळे वेटिंग लिस्टवर असलेल्या माझ्या आई–बाबांना रात्री अचानक फोन गेला की, ''मुलगा झालाय ... तुमची अजूनही त्याला स्वीकारण्याची तयारी आहे का ?'' ते म्हणाले, ''अर्थातच..'' अर्थात, नंतर माझ्या आईला कळले की माझ्या दत्तक आईने पदवी पूर्ण केली नव्हती आणि वडिलांनी तर शाळेच्या पुढेही मजल मारली नव्हती. तिने मग दत्तक कागदपत्रे साईन करायला नकार दिला. मग मला 'महाविद्यालयीन शिक्षणापासून दूर ठेवले जाणार नाही' या आश्वासनावरच तिने कागदांवर सह्या केल्या.

१७ वर्षांनंतर मी खरंच कॉलेजला गेलो. मूर्खासारखे मी स्टॅन्फोर्डसारखे महागडे कॉलेज निवडले आणि माझ्या दत्तक पालकांची मध्यमवर्गीय कमाई माझ्या शिक्षणावरच खर्च होऊ लागली. सहा महिन्यांतच त्याची किंमत मला ऊमगेनाशी झाली. मला माझ्या आयुष्यात काय करायचे आहे. याची सुतराम कल्पना नव्हती आणि कॉलेजचे शिक्षण मला याचे उत्तर शोधण्यात मदत करत नव्हते आणि मी इथे आईबाबांची आयुष्यभराची कमाई उडवण्यात गुंतलो होतो. म्हणून मी कॉलेजमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आणि सुस्कारा सोडला... अर्थात, त्या वेळी हा छातीत धडकी भरवणारा निर्णय होता.... पण आता वाटते की कदाचित हा माझ्या आयुष्यातील सर्वात चांगला निर्णय असेल... हा निर्णय पक्का झाल्याक्षणीच मी ज्या वर्गाबाबतीत उत्साही नव्हतो तिथे जाणे बंद करुन टाकले आणि ज्या वर्गामध्ये मला जाण्यात रस होता त्या वर्गांना नियमितपणे जाऊ लागलो.

हे सगळेच काही स्वप्नवत नव्हते ... डोर्म मिळायची नाही, म्हणून मित्रांच्या रुम्सवर जमिनीवर झोपावे लागे... कोकच्या रिकाम्या बाटल्या देऊन मी ५ सेंट्स जमा करत असे... आणि त्यातून जेवणाची तजवीज करत असे... दर रविवारी ७ मैल चालत जात असे. 'हरे राम हरे कृष्ण' चे व्यवस्थित जेवण खायला मिळावे म्हणून.. पण मला ते आवडत होते... माझी अंत:प्रेरणा आणि माझे कुतूहल यांनी मला जे काही सापडले, ते पुढे आयुष्यात अनमोल ठरले. आता हेच पाहा ना... रीड कॉलेजमध्ये त्यावेळेला बहुधा सर्वोत्तम असे कॅलिग्राफीचे (सुलेखन) वर्ग चालत. संपूर्ण परिसरात प्रत्येक भित्तीपत्रकावर, इतकेच काय अगदी खणांवरदेखील सुंदर कॅलिग्राफी केलेली आढळे. मी तसाही ड्रॉप करणे जरुरीचे राहिले नव्हते. कॅलिग्राफीच्या वर्गात मी सेरिफ आणि सान्स सेरिफ फॉण्ट्सविषयी मी शिकलो. त्याच्याच बरोबर दोन अक्षरांमध्ये किती जागा असावी, अक्षरे सुशोभित कशी करावी याचेही ज्ञान मिळत होते. ते सारेच फार सुंदर, ऐतिहासिक आणि कलात्मकरीत्या हळुवार होते... कदाचित शास्त्राच्या चिमटीत पकडण्यापलीकडले ... मी त्याने भारावून गेलो...

या सगळ्याचा माझ्या आयुष्यात दुरान्वयानेही मला काही प्रत्यक्ष लाभ होईल अनं मला स्वप्नातही वाटलं नसतं. पण दहा वर्षांनंतर जेव्हा आम्ही पहिला मॅकिन्टोश कम्प्युटर बनवत होतो, हा सगळा काळ माझ्या मदतीला आला. आम्ही त्या सगळ्याचा वापर मॅकिन्टोशमध्ये केला. सुंदर टायपोग्राफी असलेला तो पहिला कम्प्युटर होता. जर मी महाविद्यालयातून त्या विषयांच्या जंजाळातून बाहेर पडलो नसतो, तर मॅकिन्टोशमध्ये जसाच्या तसा कॉपी केला नसता, तर आज जगातल्या कुठल्याच पीसीवर ते दिसले नसते. मी महाविद्यालयातून बाहेर पडलो नसतो तर या कॅलीग्राफीच्या वर्गात कसा पोहोचलो असतो ; आणि अर्थात, आज पीसीवर जे सुंदर टाइप फॉण्टस् दिसतात ते कसे दिसले असते.. अर्थात हे ठिपके जोडणे.. आज १० वर्षांनंतर मागे वळून बघताना सोप्पे जाते. तेव्हा हे कळत नव्हते ..

पुन्हा.. हे ठिपके तुम्ही भविष्यात बघून नाही जोडू शकत.. ते फक्त मागे वळून बघताना जोडलेले दिसतात. म्हणूनच ते पुढे जाऊन जोडले जातील, यावर विश्वास ठेवावा लागतो. तुम्हाला कशावर तरी विश्वास ठेवावाच लागतो.. तुमचे मन, आतला आवाज, भाग्य, नशीब, कर्म .. काहीतरी.. या विचार पध्दतीने मला कधीच दगा दिलेला नाही आणि त्यामुळेच माझ्या आयुष्यात बराच बदल घडलेला आहे.

**माझी दुसरी गोष्ट आहे प्रेम आणि तोट्याविषयी ..**

मी फार नशीबवान आहे.

मला काय करायला आवडते हे मला फार आधीच उमगले होते. मी २० वर्षांचा असतानाच मी आणि वोझने मिळून घरच्या गॅरेजमध्ये ॲपल कम्प्युटर्सची सुरुवात केली आम्ही खूप मेहनत केली. दहा वर्षात गॅरेजमधल्या आम्हा दोघांपासून सुरु झालेली ॲपल २ बिलियन डॉलर्स आणि ४००० कामगारांची कंपनी झाली होती. आम्ही वर्षभरापूर्वीच आमचे सर्वोत्तम काम बाजारात आणले होते.. मॅकिन्टोश कम्प्युटर ! मी तेव्हा फक्त ३० वर्षांचा होतो. आणि अचानक मी माझ्या कंपनीतून हाकलला गेलो. तुम्ही स्वत: स्थापन केलेल्या कंपनीतून तुम्ही स्वत: हाकलले कसे जाऊ शकता ? खरं सांगायचं झालं तर जसं ॲपल वाढत होतं, त्याच्याबरोबर मला गुणी वाटणाऱ्या काही मंडळींना मी नोकरीवर ठेवले. काही वर्षे ठीक गेली, पण नंतर आमच्या दृष्टिकोनात फरक पडू लागले. अखेर भांडणे झालीच. बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनी पण त्यांचीच पाठराखण केली. साहजिकच वयाच्या तिसाव्या वर्षी मी अक्षरश: हाकलला गेलो... आणि तेही अतिशय सार्वजनिक पध्दतीने... माझ्या आयुष्याचा जो केंद्रबिंदू होता, तोच गायब झाला. मी उदध्वस्त झालो.. काही महिने.. नक्की काय करावे हेच सुचेना.. मला जणू माझ्या आधीच्या कार्यकुशल उद्योजकांचा विश्वासघात केल्यासारखे वाटत राही .. जणू आधी धावणाऱ्याने माझ्या हातात दिलेले निशाण मी पाडून बसलो होतो. मी डेव्हिड पेकार्ड, बोब नोईस यांना भेटलो... आणि अशा पध्दतीने घोळ घातल्याबद्दल त्यांची माफी मागितली. मी एक मोठे सार्वजनिक अपयश बनलो होतो आणि सिलिकॉन व्हॅलीतून पळून जाण्याचे विचार मनात घोळू लागले होते. पण हळूहळू एक गोष्ट जाणवायला लागली... माझे अजूनही माझ्या कामावर प्रेम होते.... पण माझे प्रेम संपले नव्हते... म्हणूनच मी पुन्हा सुरुवात करण्याचा निश्चय केला.

तेव्हा तसे वाटले नसेल कदाचित, पण ॲपलमधून हाकलले जाणे ही माझ्या आयुष्यातली सर्वाधिक चांगली घटना ठरली. यशस्वी असण्याचे सगळे दडपण गळून पडले. त्याची जागा एखाद्या नवोदिताच्या खांद्यावर असलेल्या हलकेपणाने घेतली. कशाचीही खात्री नव्हती ... याच स्थितीमुळे मी माझ्या आयुष्यातल्या सर्वाधिक सृजनात्मक कालखंडात प्रवेश केला...

त्यानंतरच्या ५ वर्षात मी 'नेक्स्ट' नावाची कंपनी स्थापन केली, 'पिक्सार' नावाची दुसरी कंपनीही उभारली आणि एका अशा भन्नाट स्त्रीच्या मी प्रेमात पडलो जिच्याशी मी लग्न केले. 'पिक्सार' ने जगातली पहिली ॲनिमेटेड फिल्म 'टॉय स्टोरी' बनवली आणि आज ती जगातली पहिल्या क्रमांकाची ॲनिमेशन कंपनी आहे.. गंमत म्हणजे, पुढे 'नेक्स्ट'पण ॲपल ने विकत घेतली.. आणि आम्ही 'नेक्स्ट' मध्ये बनवलेले तंत्रज्ञान आज 'ॲपल'च्या कामाला येते आहे.. आणि ॲपलच्या यशाला ते कारणीभूत ठरते आहे.

मला खात्री आहे की मी जर ॲपलमधून हाकलला गेलो नसतो तर हे कधीच घडले नसते. औषधाची चव घेणे कठीण असते, पण रुग्णाला त्याचीच गरज असते. कधी आयुष्याने डोक्यात दगड घातलाच, तर निराश होऊ नका. मला खात्री आहे की जर माझे माझ्या कामावर प्रेम नसते तर मी अशा पध्दतीने काम करत राहू शकलो नसतो. आपले प्रेम कशावर आहे याचा शोध घेत राहा. हे केवळ तुमच्या व्यक्तिगत आयुष्यात जितके महत्वाचे आहे तितकेच ते तुमच्या कार्यक्षेत्रातही. तुमच्या आयुष्यातला एक मोठा भाग तुम्ही काम करण्यात व्यतीत करणार आहात, आणि उत्तम काम करण्याकरिता तुम्ही जे करताय त्यावर तुमचे प्रेम असणे आवश्यक आहे. जर ते तुम्हाला अजून सापडले नसेल तर मग शोधात राहा.. स्वत:ची समजूत घालून नका घेऊ. हृदयाच्या इतर गोष्टीप्रमाणेच जेव्हा तुम्हाला ते सापडेल, तेव्हा ते तुम्हाला आपोआप जाणवेल आणि एखाद्या सुंदर नात्याप्रमाणेच वर्षे जशी सरकत जातील, तसतसा तुमचा त्यातला रस वाढतच राहील. म्हणून म्हणतो... शोधत राहा.. स्वत:ची समजूत घालून नका घेऊ.

माझी तिसरी गोष्ट मृत्यूविषयी आहे.

मी १७ वर्षांचा होतो तेव्हा एक वाक्य वाचले होते.. 'जर तुम्ही रोज आपले आयुष्य आजचा दिवस शेवटचा असं समजून घालवलात तर कमीत कमी एक दिवस तुमची समजूत खरी ठरेल.' या वाक्याने माझ्यावर खूप परिणाम केला होता. तेव्हापासून जवळपास ३३ वर्षे मी रोज सकाळी उठतो आणि आरशात पाहून स्वत:ला विचारतो - ''जर आज मला मरणयायचे असेल, तर आज जे मी करतो आहे तेच मला करायला आवडेल का ?' जर माझे उत्तर बरेच दिवस 'नाही' असेल, तर मला कळते की काहीतरी बदल करायची गरज आहे.

मला लवकरात लवकर कधीही मृत्यू येऊ शकतो ही कल्पना मला माझ्या आयुष्यातले महत्वाचे निर्णय

घेताना खूप कामाला येतं. कारण आपल्या बाह्य अपेक्षा, सारा अहंकार, लाज किंवा अपयशाची भीती हे सारं सारं मरणाच्या भीतीमध्ये नष्ट होतं... आणि जे महत्वाचं आहे, तेवढंच उरतं. तुम्ही मरणार आहात हे लक्षात ठेवणे म्हणजे तुम्ही काहीतरी गमावू शकता या भीतीपासून मुक्ती असं मी समजतो. तुम्ही आधीच इतके नागवे झालेले असता की हृदयाचं सोडून दुसऱ्या कुणाचं ऐकण्याचं तुम्हाला कारणच रहात नाही.

साधारण वर्षापूर्वी मला कॅन्सर असल्याचे निदान झाले. सकाळी ७.३० वाजता माझा स्कॅन झाला आणि स्वादुपिंडापाशी मला भला मोठा ट्युमर असल्याचे स्पष्ट झाले. स्वादुपिंड शरीरात कुठे असते हेही ठाऊक नव्हते. डॉक्टर म्हणाले हा जवळपास असाध्य अशा स्वरुपाचा कॅन्सर आहे आणि मी काही सहा महिन्यांपेक्षा जास्त जगणार नाही. डॉक्टरने मला घरी जाऊन साऱ्या गोष्टींची आवराआवर करायला सांगितले, म्हणजे दुसऱ्या शब्दात तो मला मृत्यूसाठी तयार राहायला फर्मावत हाता. याचाच दुसरा अर्थ म्हणजे पुढच्या दहा वर्षात तुम्ही आपल्या मुलांना ज्या चार युक्तीच्या गोष्टी सांगणार होता, त्या सांगायला आता तुमच्याकडे फक्त सहा महिने आहेत. याचाच दुसरा अर्थ म्हणजे सगळी बटणं लावून तयार राहा.. निरोप घ्यायची वेळ आलेली आहे.

त्या निदानासोबत मी एक दिवस घालवला. त्या दिवशी संध्याकाळी माझी बायोप्सी झाली. त्यांनी माझ्या घशावाटे आणि पोटातून आतड्यात एन्डोस्कोप घुसवला, माझ्या स्वादुपिंडात सुई खुपसून त्यांनी तिथल्या पेशी काढल्या. मला अर्थात भूल दिली होती, पण माझी पत्नी म्हणाली की, जेव्हा डॉक्टर्सनी त्या पेशी सूक्ष्मदर्शकाखाली पाहिल्या, तेव्हा ते आनंदाने रडू लागले माझा कॅन्सर अतिशय दुर्मिळ असला तरी शस्त्रक्रियेने तो बरा करता येण्यासारखा होता.. माझ्यावर शस्त्रक्रिया झाली आणि मी आता ठणठणीत बरा आहे.

ही माझी मृत्यूशी झालेली सर्वात जवळची आणि बहुधा अजून दोन दशक तरी टिकेल अशी ओळख. आत्ता मी याविषयी एवढ्या अधिकारवाणीने बोलतो आहे, त्याचं कारण या एका उपयुक्त कल्पनेचं या अशा ओळखीत झालेलं रुपांतर.

मरण कुणालाच नको असतं. अगदी ज्यांना स्वर्ग हवा असतो त्यांचीही त्याकरिता मरण्याची तयारी नसते. तरीही मरण हे आपल्या सगळ्यांना एकत्र करणारच आहे. कोणालाही ते चुकलेले नाही आणि हे खरंच अगदी बरोबर आहे, कारण मरण हा जीवनाचा सर्वात छान शोध आहे. तो जीवनातल्या बदलाचा शिल्पकार आहे. तोच जुन्याला दूर करुन नव्याची वाट मोकळी करतो. आज, कदाचित तुम्ही चर्चेत आहात, पण उद्या तुम्ही हळूहळू म्हातारे व्हाल आणि दूर सारले जाल. जास्त नाट्यमय वाटले, तरी हेच सत्य आहे...

तुमच्याकडे अगदी मर्यादित वेळ आहे, म्हणूनच दुसऱ्या कोणाचं आयुष्य जगत तो फुकट घालवू नका. दुसऱ्यांच्या विचारावर आधारलेल्या निष्कर्षाचं जोखड आपल्या आयुष्यावर मिरवू नका. दुसऱ्यांच्या मतांच्या गलबल्यात आपला आतला आवाज दबून जाऊ नये याची काळजी घ्या. आणि सर्वात महत्तवाचे, आपले हृदय आणि अंतःप्रेरणा यांचं ऐकायचं धाडस सदैव दाखवा. त्यांना जवळपास नेहमीच तुम्हाला काय बनायचे आहे, याची कल्पना असते. बाकी सगळे दुय्यम आहे.

जेव्हा मी तरुण होतो त्या वेळी होल अर्थ कॅटलॉग नावाचे मासिक प्रसिध्द होत असे–जणू आमच्या पिढीचे बायबलच.. इथून जवळच मेन्लो पार्क इथे राहणारा स्टेवर्ट ब्रांड नावाचा इसम ते काढत असे आणि त्याने आपल्या कवीप्रवृत्तीने ते मासिक सजवले होते. ही गोष्ट पूर्णपणे टाईपरायटर, कात्री आणि पॉलोराईड कॅमेऱ्याने बनवले जाई.. जणू पेपरबॅक फॉर्ममधले गुगल.. आणि तेही गुगल येण्याच्या ३५ वर्षे आधी. खूप आदर्शवादी, नेटके आणि नव्या कल्पनांनी भारलेले.

स्टेवर्ट आणि त्याचे सहकारी भरपूर वर्षे त्या मासिकाचे अंक काढत राहिले., आणि जेव्हा त्याचा प्रवास संपला तेव्हा त्यांनी त्याचा शेवटचा अंक काढला. सत्तरीची मध्यान्ह चालू होती आणि मी तुमच्याच वयाचा होतो... त्या शेवटच्या अंकात शेवटच्या पृष्ठावर एक गर्द रानातल्या रस्त्याचे चित्र होते. त्याच्याखाली लिहिले होते. 'भुकेलेले राहा .. वेडे राहा...'

हा त्यांचा शेवटचा संदेश होता. भुकेलेले राहा.. वेडे राहा... मी सतत स्वतःसाठी तेच मागतो आणि आत्ता जेव्हा तुम्ही पदवीधर होऊन बाहेर पडताय.... तेव्हा तुमच्यासाठी पण हीच इच्छा करतो आहे. भुकेलेले राहा... वेडे राहा !!!



# महर्षी अभियंता
# भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या

**''नाभिषेको न संस्कार सिंहस्य त्रियते क्रियते मृगे:**
**विक्रमार्जित सत्वस्य स्वयमेव मृगेंद्रता''**

**वनराज, केसरीची उभे राहण्याची ऐट, त्याची गर्जना, त्याची झेप- आदि गुणांमुळे तो स्वयमेव मृगेंद्र असतो.**

विज्ञानयुगातील चमत्कार म्हणून ओळखले जाणारे डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांचे नाव स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रात कोणाला माहित नाही ?

डॉ.मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांचा जन्म दिनांक १५ सप्टें. १८६१ रोजी त्यावेळच्या म्हैसूर प्रांतातील मुद्देनहळ्ळी (तहसिल चिक्क बल्लापूर, जि. कोलार) या लहानशा खेड्यात सुशील व धार्मिक ब्राम्हण कुटुंबात झाला. त्यांच्या आईचे नाव व्यंकटलक्ष्मण अम्मा होते. परंतु तिला प्रेमाने व्यंकटम्मा म्हणत असे. त्यांच्या वडिलांचे नाव श्रीनिवास शास्त्री होते. ते आपल्या माता-पित्यांचे द्वितीय चिरंजीव होत.

विश्वेश्वरैय्यांचे वडील श्रीनिवास शास्त्री संस्कृतचे गाढे अभ्यासक होते. त्यांचे माते-पिता अतिशय धार्मिक, धर्म परायण वृत्तीचे होते त्यांच्याकडून अगदी लहान वयातच भारतीय संस्कृती आणि परंपरा यांचा मान सन्मान व योग्य आदर करण्याची शिकवण त्यांना मिळाली होती. त्यांचे वडील अतिशय प्रामाणिक होते. त्यांच्या घरची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची होती.

विश्वेश्वरैय्या यांनी आपले मूर्ख प्राथमिक व पूर्व माध्य. शिक्षण आपल्या जन्मगावी पूर्ण केले. त्यांना बालवयातच वाचनाचा छंद जडला. वयाच्या १५ व्या वर्षी त्यांचे पितृछत्र हरपले. कुटुंबाच्या उदरभरणाची जबाबदारी त्यांच्या आई वर येऊन पडली. आर्थिक परिस्थिती जास्तच खालावली. आपल्या मुलाच्या शिक्षणाचे नुकसान होऊ नये असे तिला मनापासून वाटत होते परंतु मार्ग सुचत नव्हता.

''आई तू काळजी करु नकोस, मी मामाला मुळीच त्रास देणार नाही. माझ्या शिक्षणासाठी आवश्यक असलेले अर्थार्जन मी सन्मानाने कसेही करुन मिळवीन''. या शब्दात त्यांनी आईची मनधरणी केली व आईचा होकार मिळवला. विश्वेश्वरैय्यांचे मामा रामय्या हे बंगलोर येथे चामरापेठ मध्ये राहात होते. १८७६ मध्ये विश्वेश्वरैय्यांनी बंगलोर येथील वेस्लीन मिशन हायस्कूलमध्ये माध्य शिक्षणासाठी प्रवेश घेतला.

सन १८७८ मध्ये त्यांनी मॅट्रिकची परिक्षा गणित व विज्ञान विषय घेऊन प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली. त्यावर्षी म्हैसुर राज्यात ते सर्वप्रथम आले.

विश्वेश्वरैय्यांना उच्च शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा होती परंतु हा खर्च मामाला झेपणारा नव्हता त्याच्या राहण्याची व भोजनाची व्यवस्था मामाने आपल्या घरी केली. पण शिक्षण शुल्क व पुस्तक यावर होणारा खर्च त्याला स्वत: भागविण्यास सांगितले विश्वेश्वरैय्यांनी मुदैय्या यांच्या मुलांची शिकवणी घेण्यास सुरुवात केली. मुदैय्या हे सधन, प्रतिष्ठित गृहस्थ होते. ते बंगलोरच्या फोर्ट भागात राहत होते. विश्वेश्वरैय्या दररोज महाविद्यालयात व मुदैय्या यांच्या घरी पायीच जायचे. शिकवणीचे घर, महाविद्यालय व मामाचे घर असे सुमारे वीस कि.मी. चे अंतर त्यांना दररोज पायी चालावे लागत होते. एवढे मोठे अंतर एका विशिष्ट वेळेत पायी चालण्यामुळे त्यांना खूप कष्ट पडत होते. त्यामुळे त्यांना अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नसे. म्हणून ते मामाचे घरी संध्याकाळचे जेवण आटोपून मुदैय्या यांच्या घरी रात्री पायी जायचे. आपला अभ्यास करायचे आणि तेथेच रात्री मुक्काम करायचे सकाळी लवकर उठून आपली रोजची कामे उरकायचे. मुलांना सकाळी शिकवायचे आणि मामाच्या घरी पायी चालत जायचे आपला अभ्यास व जेवण आटोपून ते सुमारे साडे चार कि.मी. अंतर पायी चालून महाविद्यालयात जायचे आणि संध्याकाळी मामाचे घरी पायी चालत यायचे. परंतु उच्च शिक्षणाचे ध्येय गाठण्यासाठी त्यांनी कधीच हार मानली नाही.



वयाच्या १९ व्या वर्षी सन १८८७ मध्ये गणित हा विषय घेऊन बी.ए.ची पदवी परीक्षा त्यांनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली. अभियांत्रिकी शिक्षणासाठी त्यांनी म्हैसूर संस्थानाकडे शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला. ती मंजूर झाल्यावर १८८१ मध्ये पुणे येथील सायन्स कॉलेजमध्ये स्थापत्य अभियांत्रिकी शाखेत प्रवेश घेतला. ही संस्था सध्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय म्हणून प्रसिध्द आहे. हा अभ्यासक्रम तीन वर्षाचा असतांना त्यांनी तो अडीच वर्षातच वर्षातच पूर्ण केला. सन १८८३ मध्ये ते एल.सी.ई. व एफ. सी.ई. (बी.ई. पदवी समकक्ष) परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.

ते अनुशासनप्रिय होते. ते इतरांना शिस्तीने वागण्यास सांगत. ते नियमित अभ्यास करीत असत. प्रत्येक दिवशी निश्चय करुन ठरविलेली कामे नियोजनबध्द पूर्ण करीत असत. तेजस्विता ही वृत्ती असते. ती आंतरिक असावी लागते. दिखाऊपणा त्यात नसतो. ती विशिष्ट व्यवसायापुरती नसून ती संपूर्णत: वृत्तीत भिनलेली असते. याची प्रचिती मो. विश्वेश्वरैय्या यांच्या चरित्रात क्षणोक्षणी जाणवते. विश्वेश्वरैयांनी अभियंता म्हणून नोकरी करण्याचा निर्णय घेतला आपल्या आईला सुखात ठेवण्याचे त्याचे स्वप्न होते. ते स्वप्न प्रत्यक्षात आणण्याचा त्यांचा निश्चय होता. १८८४ साली वयाच्या २३ व्या वर्षी नाशिक येथे सहाय्यक अभियंता म्हणून शासकीय

सेवेत ते रुजू झाले. सार्व. बांधकाम खात्याच्या स्पर्धा परिक्षा त्यांनी दिली त्यात उत्तीर्ण होऊन त्यांची उप अभियंता पदावर बढती झाली. हे फक्त सहाय्यक अभियंता म्हणून नियुक्त झाल्यानंतर वीस महिन्याच्या कालावधीत केले.

नाशिक जिल्ह्यातील दातारी गावाजवळील मोठ्या नाल्यावरील जलवाहिनी पांझरा नदीला पावसाळ्यात येणाऱ्या पुरामुळे वाहून जाण्याची समस्या निर्माण झाली होती. रात्रंदिवस मेहनत घेऊन पावसाळ्यातील प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी जलवाहिनी दुरुस्त करुन वरिष्ठांची शाबासकी मिळवली.

विश्वेश्वरैय्या यांची त्यानंतर पुणे येथे उपअभियंता या पदावर बदली करण्यात आली. त्यांनी खडकवासलाच्या धरणाच्या पाण्याचा उपयोग करुन पुणे शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावला त्यांनी पुणे शहरातील प्रमुख रस्त्यांचे आणि प्रसिध्द इमारतींचे संकल्पना व आराखडे तयार केले. त्यांनी कर्नाटक राज्यातील विजापूर, धारवाड या शहरांच्या पाणी पुरवठ्यांची योजना तयार केली.

ब्रिटीशांच्या शासनकाळात मुंबई प्रांताचा विस्तार खूप मोठा होता, सिंध भाग हा त्यावेळेस मुंबई प्रांतात येत होता. हे सिंध भागातील प्रमुख शहर ज्याची अशुध्द पाणी पुरवठ्याची भुयारी चरावाटे शुध्द पाणी विहिरीत समस्या अतिशय ज्वलंत होती. या प्रश्नाची उकल करण्याची जबाबदारी प्रांत सरकारने १८९३ साली विश्वेश्वरैय्यांवर सोपविली. त्यांनी सिंधू नदीचे अशुध्द पाणी वाहून नेण्यासाठी नदीत भुयारी चर खणला अशुध्द पाणी वाळूतून नैसर्गिकरित्या गाळले जाऊन गोळा करण्यात आले. हे शुध्द पाणी संयंत्र वापरुन एडिंगबर्ग टेकडीवरच्या टाकीत साठवले गेले. गुरुत्व बलाच्या नियमाचा वापर करुन ते शुध्द पाणी सक्कर शहराला जलवाहिनीच्या मदतीने पुरविण्यात आले. या कमी किमतीच्या उपाययोजनेने त्यांनी सर्वांची वाहवा मिळविली. सक्कर नगर परिषदेने एका ठरावाने त्यांचे अभिनंदन केले.

शेतकऱ्यांसाठी पाणी हे फारच मौल्यवान असते. त्याचा योग्य वापर केल्यास भरघोस उत्पन्नाची हमी असते. १८९९ साली कमी पावसामुळे मुंबई प्रांतात दुष्काळ पडला होता. यावर मात करण्यासाठी ब्रिटीश सरकारने एक समिती नेमली होती. त्या वेळेस विश्वेश्वरैय्या पाटबंधारे विभागात पुणे येथे कार्यरत होते.

विश्वेश्वरैय्यांनी अवर्षण काळात पाटबंधाऱ्याचे पाणी मुळीच वाया जाऊ न देता काटकसरीने वापरता येणारी नाविन्यपूर्ण योजना मांडली लागवडीच्या जमिनीपैकी एक तृतीयांश भागात ऊसासारखी रब्बी पिके व भाजीपाल्याची लागवड बागायतदारांनी करावी असे त्यांनी सुचविले. या योजनेनुसार जमिनीचे विभाग पाडून त्यात ऊसासारखी वार्षिक पिके, रब्बी पिके व खरीप पिके अशी वर्गवारी करुन त्याच्या आवश्यकतेनुसार पाटबंधाऱ्याचे पाणी पुरविण्याचे त्यांनी सुचविले त्यामुळे पाण्याच्या वापरावर योग्य नियंत्रण तर येईलच, पण योग्य वेळी भरपूर पाणी मिळाल्याने दरवर्षी उगवणारी पिके हमखास येईलच आणि अवर्षणामुळे होणारी वाताहतही निश्चितच थांबेल ही खात्री त्यांनी बागायतदारांना दिली. जलसिंचनाच्या पध्दतीत पाण्याचा योग्य वापर करण्याच्या दृष्टीने विश्वेश्वरैय्यांनी अविरत प्रयत्नांनी एक नवीन पध्दत शोधुन काढली या पध्दतीस त्यांनी 'ब्लॉक इरिगेशन सिस्टिम' असे नाव दिले. नदी व धरणात पुरेसे पाणी नसतानाही त्यातील पाणी वैशिष्ट्यपुर्ण दरवाजाद्वारे वाहून नेण्याची ही संपल्पना आहे या




संकल्पनेनुसार धरणात पुरेसे पाणी

साठवण्याची आवश्यकता नाही आणि पावसाळ्यात पुराचे पाणी धरणात वाढल्यामुळे पाण्याची उंची वाढते. कित्येकदा पुराचे पाणी धरणाचे बरेच नुकसान करुन निघून जाते. हा पुराच्या पाण्याचा अपव्यय होता. ऐनवेळी आपल्याला धरणाची उंचीही वाढविता येत नाही. धरणातील पाण्याचा अपव्यय होऊ नये किंवा पावसाळ्यात धरणातील पाणी वाहून जाऊ नये म्हणून विश्वेश्वरैय्यांनी पाण्याच्या नैसर्गिक दाबावर आधारित स्टेनलेस स्टीलचे न गंजणारे दरवाजे ही ब्लॉक सिस्टिमसाठी संकल्पना मांडली या दरवाज्याचे संपूर्ण आराखडा व प्रारुप त्यांनी स्वत: तयार केला. धरणातील पाण्याची पातळी ठरावीक उंची खाली असल्यास हे दरवाजे आपोआप बंद होतात. पावसामुळे पाण्याची पातळी ठरावीक उंची ओलांडताच हे दरवाजे आपोआप उघडतात.

अशा प्रकारे धरणाची उंची न वाढविताच धरणात साठवलेले पाणी दरवाजाच्या मदतीने आपोआप नियंत्रणात आणता येते.

हे स्वयंचलित दरवाजे'' विश्वेश्वरैय्या गेटस'' या नावाने ओळखले जातात. विश्वेश्वरैय्यांनी या पध्दतीची उपयुक्तता समितीस पटवून सांगितली. त्याची अंमलबजावणी ब्रिटीश सरकारने अमलात आणण्याची आज्ञा केली. या पध्दतीचा वापर खडकवासला (जि. पुणे) येथील मूठा नदीच्या धरणावर केला. त्यानंतर तिगटा धरण, ग्वाल्हेरचे टिका धरण, कृष्णार्जुनसागर इ. धरणांवर या दरवाजांचा वापर करुन धरणाच्या परिसरातील सिंचन क्षमता वाढविली आणि पूर नियंत्रणही केले.

विश्वेश्वरैय्यांनी खडकी, नाशिक, धुळे, कोल्हापूर, सांगली, अक्कलकोट, पंढरपूर, नागपूर, विजापूर, धारवाड, ग्वाल्हेर इ. शहरांच्या सांडपाणी व मल निस्सारण योजना त्यांनी आखल्या त्यांचे मॉडेलही तयार केले यातील बऱ्याचशा योजना त्यांनी शासकीय सेवेत असतांना पूर्ण करुन कार्यान्वित केल्या. काही योजना शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यावर पूर्ण केल्या.

पात्रता, योग्यता सिध्द झाल्यावर देखील ब्रिटीशांनी त्यांना मुख्य अभियंताच्या पदोन्नतीच्या समयी भारतीय असल्यामुळे डावलले. त्यांचा देशाभिमान दुखावला गेला. अंगी पात्रता नसलेल्या ब्रिटीश मुख्य अभियंत्याच्या हाताखाली काम न करण्याचा त्यांनी निश्चय केला. १९०८ साली त्यांनी आपल्या शासकीय सेवेचा राजीनामा दिला. त्यासमयी त्यांचे वय ४७ वर्षे होते. ब्रिटीश सरकारने त्यांना परत विचार करण्याची विनंती केली ती विनंती त्यांनी धुडकावून लावली.

(विशेष – पुण्याच्या डेक्कन क्लबची स्थापना केली. या क्लबचे त्यावेळचे सहयोगी सदस्य होते. न्या. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, लो. टिळक यांसारखे देशभक्त नेते.)

प्रसंगी कोण येतो मदतीला लढावे लागते एकट्यालाच ।
सांगणारे तर भेटतात पण चालावे लागते एकट्यालाच ।।

ठाऊक आहे मजला इतका सोपा नाही रस्ता ।
म्हणूनच चालतो आहे वाटेल तेवढ्या खाईन खस्ता ।।

कधीच नव्हती मला हारण्याची भिती ।
म्हणून झाली नाही कमी माझ्या धावण्याची गती ।।




# स्वप्ने पहा व साकार करा

### ⁂ भिकाऱ्याचे राजा होण्याचे स्वप्न

या जगात प्रत्येकजणच स्वप्ने पाहातो, आपल्या स्वप्नांची पूर्तता केव्हातरी होईल या आशेवरच माणूस जगत राहतो. लहान थोर, गरीब–श्रीमंत सर्वजण स्वप्ने पाहातात. रस्त्याच्या कडेला उभा असलेला भिकारीसुध्दा राजा होण्याची स्वप्ने पाहात असतो. राजा झाल्यावर आपण राजवाड्यात राहू आणि सुखच सुख मिळवू अशा कल्पनाविश्वात मग्न होऊन तो उभा असतो. त्या भिकाऱ्याला वाटते की जगातली सर्व सुखाची साधने फक्त राजालाच मिळतात. मी राजा झालो की, रोजच सोन्याच्या ताटात जेवीन व सोन्याच्या वाटीने खीर प्राशन करीन, असे त्याचे स्वप्न असते आजुबाजुला सर्वत्र नोकर–चाकर असतील, नाटकात दाखवतात त्याप्रमाणे 'कोण आहे रे तिकडे ?' असे म्हटल्याबरोबर चार नोकर सेवेसाठी धावत येतील, अशी कल्पना तो भिकारी करत असतो.

### ⁂ स्वस्तात विकत मिळणारी स्वप्ने

त्या भिकाऱ्याप्रमाणे आपणही सर्वजण भरभराटीची स्वप्ने पाहात असतो. अशी स्वप्ने विकतही मिळतात. त्यांची किंमत १ रुपया किंवा ५ रुपये इतकीच असते. लॉटरीचे तिकीट १ ते १० रुपयात मिळते. लॉटरीचे तिकीट म्हणजे अल्प किंमतीत स्वप्ने विकण्याचे दुकानच असते. १ कोटी रुपये मिळण्याच्या आशेने लाखो लोक तिकीटे विकत घेतात. त्यांच्या पदरात स्वप्नाशिवाय काहीच पडत नाही, एक गोष्ट मात्र खरी. आपल्या उत्कर्षाची स्वप्ने पाहाताना जीवन फारच सुखासमाधानाचे व भरभराटीचे असते. त्याच्या स्वप्नात उत्कर्षाची गाडी जोराने धावत असते. या जगात लाखो लोक स्वप्ने पाहातच जगत असतात.

### ⁂ स्वप्नांची रेलचेल

विरक्त साधू सोडल्यास या जगात भरभराट व समृध्दी प्रत्येकाला हवी असते. कोणाला पुढारी व्हायचे असते. कुणाला रुपेरी पडद्यावर सुपरस्टार बनायचे असते. कोणाला आईन्स्टाईनसारखा शास्त्रज्ञ व्हायचे असते. माणसांच्या अशा स्वप्नांना काही मर्यादाच नाही. समजा एखाद्या माणसाचे छोटेसे स्वप्न साकार झाले तर तो लागलीच आपल्या मनात दुसरे स्वप्न तयार करतो. अशा प्रकारे प्रत्येक माणसाच्या जीवनात स्वप्नांची रेलचेल असते.

### ⁂ नश्वर स्वप्ने पाहण्याची प्रचंड लालसा

या जगात माणूस जन्म घेतो तेव्हा त्याच्या जवळ काहीही नसते. अगदी कपडेही नसतात. तो या जगातून जातो तेव्हाही तो आपल्या हातात काहीच घेऊन जात नाही. सर्व काही येथेच सोडून जातो. ही वस्तुस्थिती त्याच्या मनात नसतेच. तो फक्त मोठी मोठी स्वप्ने पाहात राहातो, कारण स्वप्ने पाहाणे ही माणसाची जन्मजात प्रवृत्ती आहे. स्वप्ने पाहाताना माणूस विसरतो की या जगात सर्व गोष्टी नाशवंत आहेत. तुम्ही पक्के घर बांधले तरीही शंभर दोनशे वर्षात ते पडणारच असते. माणूस जी स्वप्ने पाहातो तीही अशीच नश्वर असतात. तरीही तो स्वप्ने पाहाणे सोडून देत नाही.

माणसाच्या मनातील लोभ व लालसा ही कधी नष्ट होत नाही एखाद्या माणसाने मोटार बाळगण्याची इच्छा मनात धरली व तेच त्याचे स्वप्न पूर्ण झाले की त्याला वाटते की आपल्याजवळ स्वत: चे खाजगी विमान असले पाहिजे. किर्लोस्कर समूहाचे प्रमुख कसे स्वत:च्या विमानातून हिंडतात! माझ्याकडेही तसे विमान हवे. मग तो आपले नवे स्वप्न पूर्ण करायला धडपड करीत राहातो. अशा तऱ्हेने त्याची हाव वाढतच जाते.

### ⁂ भाग्य – कल्पना माणसाला आळशी बनवते

पण या माणसाचे निदान मोटार बाळगण्याचे स्वप्न पूर्ण झालेले असते. या लॉटरीचे तिकीट काढणाऱ्या लाखो लोकांचे स्वप्न कधीच पूर्ण होत नाही. मग तो भाग्य, नशीब विधिलिखित यावर विश्वास ठेऊन आळशीपणा करीत बसून राहतो. खरोखर भाग्य व नशीब या शब्दांनी संपूर्ण मानवजातीलाच आजवर खूप फसवले आहे. भाग्य कल्पनेचे व नशीब कल्पनेचे हे जाळे फार लांबवर पसरले आहे. एखाद्याला तुम्ही विचारा की, तुझी अशी स्थिती का ? तो ताबडतोब सांगेल, 'सटवीनं सहाव्याच दिवशी माझ्या कपाळावर जो ललाटलेख लिहून ठेवला आहे ! त्याप्रमाणेच सर्व काही होणार ! तो मला बदलता थोडाच येणार आहे ! सर्व काही नशिबावर अवलंबून असते रे बाबा ! आपल्या हातात काय आहे ? कपाळावर लिहिले असेल तसेच घडणार ना ! अरे बाबा, या जगात सुख, संपत्ती, मान–मरातब, हे सर्व भाग्यानेच मिळत असते. या जगात ज्या सर्वांना हे मिळते त्यांच्या कपाळावरच हे सर्व लिहिलेले होते, असे म्हणून सर्वसामान्य मनुष्य आपण पाहिलेली सर्व स्वप्ने भाग्यकल्पनेच्या स्वाधीन करुन कसलाच प्रयत्न न करता स्वस्थ बसून राहातो.

## ✲ नशीब - कल्पना संपूर्ण खोटी आहे

खरोखरच या जगात सर्व गोष्टी भाग्याने किंवा नशिबाने घडतात काय ? जरा तपास करुन बघू, या जगात यशस्वी झालेले शेकडो लोक आहेत. त्यांच्या हातावर धनरेषा नव्हती किंवा त्यांच्या पत्रिकेत गुरु अकरावा नव्हता. तरीही त्यांनी वैभव मिळवले व सुखही मिळवले. या जगात दीर्घायुषीच काय शंभरी गाठणारेही खूप लोक आहेत. त्यांच्या हातावर आयुष्यरेषा खोल खोदलेली नव्हती, तरीही ते दीर्घायुषी झाले. कारण त्यांनी मिताहार ठेवला, कुठलीही व्यसने केली नाहीत व त्यांचे आयुष्य नियमित होत म्हणूनच त्यांना दीर्घायुष्य मिळाले.

तेव्हा हातावरील रेषा, पत्रिकेतील ग्रहयोग किंवा ललाटलेख या सर्व गोष्टी खोट्या आहेत. तुमचे उज्ज्वल भविष्य सांगणारे ज्योतिषी रस्त्याच्या कडेला पोपटाचा पिंजरा घेऊन बसलेले दिसतील. जर या लोकांना भविष्य समजत असेल तर त्यांना स्वत:चे उज्वल भविष्य का नाही समजले ? त्यांना भविष्य सांगत रस्त्याच्या कडेला का बसावे लागले ? कारण उज्ज्वल भविष्यकाळ फक्त कठोर परिश्रमात असतो, ही साधी गोष्ट त्या ज्योतिषांना माहीत नव्हती.

## ✲ स्वप्ने कष्टाने साकार होतात

तुम्ही तुमच्या उज्वल भविष्याची स्वप्ने पाहाता ना ? हरकत नाही, जरुर पहा. तुमची स्वप्ने साकार नक्की होतील. त्यासाठी तुम्हाला स्वत:ला कष्ट व मेहनत करावी लागेल. आपले नशीब केव्हा तरी फळफळेल म्हणून तुम्ही हात जोडून बसून राहणार असाल तर दु:ख आणि दुर्दशा यापेक्षा तुमच्या हाताला काहीही लागणार नाही.

खरे म्हणजे माणूस आपल्या अशक्य वाटणाऱ्या इच्छा किंवा स्वप्ने नक्कीच साकार करू शकतो. माणसाने पक्षी आकाशात उडताना लाखो वर्षे पाहिला होता, माणसाला नेहमी वाटत असे की आपण पक्षाप्रमाणे आकाशात उडावे. आकाशात उडण्याचे माणसाचे स्वप्न अमेरिकेतील राईट बंधूंनी साकार करुन दाखवले. त्याला आता शंभर वर्षे होतील. राईट बंधूच्या पूर्वी आकाशात उडण्याचे माणसाचे स्वप्न खुळचटपणाचे वाटत असे. ते स्वप्न बाळगणाऱ्याला वेडाच समजत असत, पण हेही माणसाचे स्वप्न साकार झालेच .

## ✲ सामान्य माणूससुध्दा प्रचंड पराक्रम करु शकतो

अर्थात सर्वच स्वप्ने साकार होत नाहीत. कारण त्या स्वप्नामागे मेहनत नसते. प्रत्येक माणसाला आपली स्वप्ने साकार होण्याची आशा असतेच. मला प्रगती व वैभव नको आहे; असे म्हणणारा माणूस क्वचितच सापडेल. एखादा म्हणेल की 'माझ्याकडे कसलेच गुण नाहीत. माझ्या हातून काय होणार आणि स्वप्ने कसली साकार होणार ? परंतु पहिल्या व दुसऱ्या महायुध्दात अतिशय सामान्य बुध्दीच्या व ताकदीच्या सैनिकांनी प्रचंड पराक्रम गाजवला आहे व प्रसंगावधान दाखवले आहे. शाळेत भित्रा असलेला एखादा तरुणच प्राणाची बाजी लावून आपल्या मित्राचे प्राणही वाचवतो.

हॉवर्ड विद्यापीठातील एका प्राध्यापकाने एक आठवण सांगितली आहे. त्यांच्या वर्गातील एक मुलगा फारच साधारण होता. कॉलेजमधील परीक्षांत त्याला फारसे गुण पडत नसत. पण वार्षिक परीक्षेत तो पहिला आला. विद्यापीठातील काही लोक म्हणाले की याने कॉपी केली असेल. म्हणून समिती नेमून त्याची तोंडी परीक्षा घेण्यात आली. पण त्यातही त्याने आपले कौशल्य व अभ्यास दाखवून दिला. ज्याला हे यश मिळाले कसे हे अनेकांना समजले नाही. पण त्याने सांगितले की मी परीक्षेत सर्वोच्च यश मिळवण्याचे स्वप्न पाहिले होते आणि वर्षभर अभ्यास करुन ते मी साकार केले.

## ✲ आत्मविश्वासाचे सामर्थ्य

एका तरुणाला त्याची वहिनी त्याच्या बेकारीबद्दल बोलत असे. त्याला 'खायला काळ व भुईला भार' असे म्हणत असे. या बोलण्यामुळेच की काय त्याचा स्वाभिमान जागृत झाला आणि रात्रंदिवस तो मेहनत करु लागला व लवकरच त्याने आपली योग्यता सिध्द केली.

म्हणजे जो तरुण स्वप्ने पाहातो आणि आपल्या स्वप्नपूर्तीसाठी सतत परिश्रम व मेहनत करतो, त्याच्यासाठी यशाचे द्वार आपोआप उघडते. यश मिळवायला तुमचा आत्मविश्वास फार उपयोगी पडतो. आत्मविश्वास ही फार मोठी शक्ती आहे. ही शक्ती ईश्वरी नाही किंवा भाग्यानेही मिळत नाही. ही शक्ती माणसाच्या अंतरंगातच असते. ती बाहेर येणे आवश्यक असते. माणसाच्या मनात जे संकुचित विचार असतात त्यामुळे त्याचा आत्मविश्वास नष्ट होतो, भीती, निराशा या भावनांचा शाप देवाने दिलेला नाही, परमेश्वराने दिली असेल तर ताकदच दिली आहे. माणसामध्ये कोठे तरी दुबळेपणा असतोच, पण त्या दुबळेपणाच्या कित्येक पटीत जास्त असे उत्तम गुणही दिलेले असतात. पण या उत्तम गुणाकडे माणूस लक्ष देत नाही, व त्याचे परिणाम भोगत राहातो.

### ※ खंबीर मन लढते, शस्त्र नव्हे

जो माणूस स्वत:ला दुर्बळ समजतो, बहुधा त्याच्या अंगात खूप आळस असतो. त्याच्या या आळसाच्या दुर्गुणामुळेच त्याने पाहिलेली स्वप्ने साकार होत नाहीत. आपले सामर्थ्य ओळखण्याचे साधन सतत कार्यरत राहाणे हेच आहे. माणसाच्या अंतरंगातील ईश्वरी शक्ती त्याला ताकद देते आणि तो अशक्य वाटणारी गोष्ट शक्य करुन दाखवतो

एक सेनापती म्हणतो की, 'युध्दात हत्यार लढत नसते, युध्दात ते शस्त्र हातात धरणाऱ्याचे मन लढत असते. म्हणून युध्दात काय किंवा व्यवहारात काय ज्याचे मन खंबीर आहे त्यालाच अंतिम यश मिळते. अशा खंबीर मनाच्या माणसांच्या सततच्या परिश्रमामुळेच जगाची प्रगती होत आहे.

जबरदस्त आत्मविश्वासाचा परिणाम कसा होतो हे पाहाण्यासाठी एक उदाहरण घेऊ. एक खलपुरुष वाईट कृत्य करुन घरी आला. आपली बंदूक उचलून सर्वांना धमकावू लागला. इतक्यात तेथे परिपूर्ण आत्मविश्वास असलेला एक तरुण आला, त्याने गंभीर आवाजात इशारा दिला आणि बंदुकीचा धाक दाखवणाऱ्या इसमास खंबीर आवाजात बंदूक फेकून देण्याविषयी फर्मावले. त्याने घाबरुन ताबडतोब बंदूक फेकली. वास्तविक तो दार लावून आत बसला होता. पण त्याचे हेतू वाईट होते त्यामुळे त्याच्याकडे आत्मविश्वास व हिम्मत नव्हती. त्यामुळे त्याला बंदूक फेकावी लागली. म्हणून साधनापेक्षा साधनामागे काम करणारे खंबीर मन जास्त महत्वाचे असते.

### ※ धोका पत्कारण्याची तयारी म्हणजे धाडस

आत्मविश्वासाबरोबर माणसाकडे धाडसही हवे. धाडस म्हणजे धोका पत्करायची तयारी असते. ही धाडसीवृत्ती माणसाला अंगभूत नसते ती विचारातून कमवावी लागते. परिश्रमाला जर धाडसाची जोड मिळाली तर माणूस जगात चमत्कार करु शकतो.

अनेक माणसांकडे हुशारी असते, ताकद असते परंतु त्यांचा स्वत:वरच विश्वास नसतो. 'हे कार्य माझ्या हातून पूर्ण होईलच' असे तो कधी म्हणत नाही. जमलं तर बघूया, जमेल की नाही, सांगता येत नाही, असे तो म्हणत राहतो, मग ते कार्य त्याच्या हातून होतच नाही. इतिहासात नेपोलियनसारखे जे लोक अत्यंत यशस्वी झाले, त्यांचेकडे जबरदस्त आत्मविश्वास असल्याचे आढळते.

### ※ बळकट मन आजार बरा करते

माझ्या ओळखीच्या एका मुलीची कथा येथे सांगितली पाहिजे. ती एकदा खूप आजारी पडली, त्या आजारपणामुळे तिला कॉलेज सोडावे लागले. व्याधींमुळे ती दुर्बळ होऊन गेली. पण तिच्याकडे जबरदस्त आत्मविश्वास होता. या आजारातून मी बरी होणारच, असे ती सतत म्हणत असे. डॉक्टरांनी तिची आशा सोडली होती तरी ती बरी झाली व जगली. या जीवघेण्या आजारातून ती बाहेर पडली याचे कारण तिचे मन बळकट होते व तिच्या अंगी अपूर्व धाडस होते. काही वेळा माणसाच्या मनातील आत्मविश्वास जागा करायला दुसऱ्या व्यक्तीची जरुरी लागते. किंवा एखाद्या साधुपुरुषाचा आशीर्वादही पुरेसा होतो.





# अंधारातील तारा हेलन केलर



अमेरिकेतील टस्कांबियामधील अलाबामा या शहरात कॅप्टन आर्थर एच्. केलर राहत होते. त्याचबरोबर केटी ॲडम्ज ही त्यांची दुसरी पत्नी राहत होती. पहिल्या पत्नीपासून झालेले दोन्हीही मुलगेच होते. कॅप्टन आर्थर व केटी ॲडम्ज यांना २७ जून १८८० रोजी एक मुलगी झाली. तिचे नाव हेलन असे ठेवण्यात आले. लहानपणी हेलन दिसायला अतिशय गोड होती. वडिलांचे हेलनवर फारच प्रेम होते. ते तिची फारच काळजी घेत असत. कुटुंबात सर्वांना हवीहवीशी वाटणारी हेलन बोबडे बोल बोलू लागली. आई-वडील कौतुकाने तिला उचलून घेत व तिचे बोबडे बोल बोलू ऐकत. हेलन नेहमी आनंदी असे. तिच्या त्या बाललीला ऐकण्यात व पाहण्यात केलर कुटुंब रमून जात असे. त्यांच्या या आनंदी घराला एके दिवशी अचानक भीतीची चाहूल लागली. हेलन एकोणीस महिन्यांची असताना अचानक एके दिवशी हेलनला खूप ताप भरला. हेलनला दवाखान्यात नेण्यात आले. डॉक्टरांनी तपासण्या केल्या तेव्हा एका दुर्धर रोगाने हेलनला ग्रासल्याचे निदान झाले. हेलन या आजारातून बरी होईल की नाही असा डॉक्टरांना प्रश्न पडला. हा आजार अतिशय गंभीर, असाध्य असाच मानला जातो. डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांनी हेलन वाचली पण या आजाराने तिचे जीवनच पूर्ण अंधारमय बनले. ती डोळ्यांनी अंध झाली होती व कानाने पूर्ण बहिरी झाली होती. त्यामुळे आजूबाजूचा आवाज ती ऐकू शकत नव्हती. भोवतालचे सुंदर जग डोळ्यांनी पाहू शकत नव्हती. एका आनंदी गोंडस मुलीचे आता त्रस्त, एकाकी जीवन झाले. त्यामुळे हेलन घरातील लोकांना फार त्रास द्यायची. हेलनच्या वर्तनातून ती अतिशय कुशाग्र बुध्दिमत्ता असलेली मुलगी घरच्यांना जाणवायची. परंतु काळ्या अंधारात खितपत पडल्याच्या भयाने ती इतरांना लाथा मारणे, चावणे, कपबश्या फोडणे, चिमटे काढणे, इतरांच्या ताटातले अन्न ओरबाडणे असे विचित्र प्रकार करून घरच्यांना भंडावून सोडत असे. जन्मदात्या माता-पित्यापुढे हेलनला कसे समजावावे? कोणाची मदत घ्यावी अशी समस्या उभी राहिली. तिला शिक्षण कसे द्यावे ? याचा विचार आई-वडिलांनी केला. सर्वसामान्य मुलांप्रमाणे ती शाळेत जाऊ शकणार नव्हती त्यामुळे घरीच शिकवण्यासाठी त्यांना स्वतंत्र शिक्षिकेची आवश्यकता होती. त्याकरिता आंतरराष्ट्रीय कीर्ती असलेले प्रसिध्द शास्त्रज्ञ अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल यांच्याशी संपर्क साधला. त्यांच्या मदतीने हेलनला शिकविण्यासाठी ॲना मॅन्सफील्ड सॅलिव्हन या विद्यार्थिनीची निवड करण्यात आली. त्यावेळी हेलन सात वर्षांची होती.

टीचर ॲनाने केलर कुटुंबात आल्यानंतर हेलनचे वर्तन पाहिले व शिस्त लावण्याचा पहिलाच पाठ त्यांनी तिला शिकविला. जेवणाच्या टेबलावर सर्वजण बरोबरच जेवायला बसले की, हेलन स्वतःला हवे ते ओरबाडून, ओढून घेत असे न मिळाल्यास त्रागा,



आदळआपट करीत असे. ॲनाने हे सर्व पाहिले. एके दिवशी ॲनाने घरातील सर्वांना बाहेर जाण्यास सांगितले. दरवाजा बंद करून घेतला व निरीक्षण करु लागली. कुणाचीही हेलनला चाहूल लागेना. शेवटी ती टेबलाजवळ जाऊन ताटातले अन्न खाऊ लागली. ॲनाने तिच्या हातात चमचा दिला पण तो हेलनने भिरकावून दिला. ॲनाने तिला तो चमचा शोधण्यास भाग पाडले. तेव्हाच तिला जेवायला दिले. अशाप्रकारे ॲनाने दिलेला स्वावलंबनाचा व शिस्तीचा पाठ ! हेलनला शिकवायचे असेल तर इतरांचा हस्तक्षेप नको असे ॲनाने स्पष्ट तिच्या आई-वडिलांना सांगितले. हेलनच्या आई-वडिलांनी दोघींची फार्म हाऊसवर राहण्याची सोय केली. खरे शिक्षण तिथेच सुरु झाले. ॲनाने हेलनला पाणवठ्याजवळ नेले व तिच्या हातात मग दिला. तो मग पाण्याच्या धारेखाली धरायला लावला.

ॲनाने हेलनच्या हातावर वॉटर हा शब्द लिहिला. थंडगार पाण्याच्या स्पर्शाबरोबर हातावर उमटणाऱ्या अक्षरखुणांनी तिच्या डोक्यात एकदम प्रकाश पडला. तिने मग हातातून सोडून दिला आणि ती एका जागेवर खिळल्यासारखी उभी राहिली. तिचा चेहरा उजळला. थोड्या वेळाने तिने ॲनाला नाव विचारले. ॲनाने हेलनच्या हातावर पुन्हा 'टीचर' हे अक्षरखुणांनी सांगितले. त्या दिवसांपासून ॲनाला हेलन 'टीचर' संबोधू लागली. त्यादिवशी हेलन आजूबाजूच्या वस्तूंना हात लावून प्रत्येकाची खुणांनी माहिती करून घेत होती. व पुन्हा पुन्हा ती अक्षरे हातांनी गिरवत होती. तिच्या दृष्टीने ॲना टीचरने आनंदाचा, सुखाचा, मुक्तीचा मार्ग आज खुला केला होता. एका आठवड्यातच ती ३०० शब्द शिकली. रोज अभ्यासात गुंतून राहिल्याने ती आनंदी दिसू लागली. कारण ॲनाने तिचे एकटेपणाचे जग विसरुन पक्ष्यांप्रमाणे तिला बागडायला शिकविले होते. भाषेची खिडकी उघडून ज्ञानाचे मोकळे आकाश दाखविले होते. ॲना सलिव्हन ही तिच्या विद्यार्थिनीच्या प्रगतीवर खूष होती.

हेलन कादंबऱ्या, पुस्तके वाचू लागली. स्वत:कथा लिहू लागली.

१८८८ मध्ये हेलनले न्यूयॉर्कमध्ये पुढील शिक्षणासाठी राईट ह्यूम या शाळेत घालण्यात आले. हेलन काही शब्द अडखळत बोलण्याचा प्रयत्न करीत असे. पुढे काही शब्द ती बोलू लागली. ती १६ वर्षांची झाल्यावर १८९६ साली केंब्रिज स्कूल फॉर यंग लेडीजमध्ये प्रवेश घेतला. तेथील प्राध्यापक 'ॲना हेलनकडे वाजवीपेक्षा जास्त लक्ष देऊन शिकविते.' असा आरोप करीत होते. ॲनाला तर लवकरात-लवकर तिला शिकवायचे होते. म्हणून तिने केंब्रिज सोडून एका खेड्यात राहून हेलनची पूर्व-परिक्षेची तयारी करुन घेतली. प्रवेश परीक्षा पास झाल्यावर हेलनने अविश्रांत परिश्रम करुन १९०४ मध्ये पदवी परीक्षेतही यश मिळवले. इंग्रजी साहित्याच्या अभ्यासास तिला उत्कृष्ट शेरा मिळाला. एक अंध, बहिरी विद्यार्थिनी इच्छाशक्तीच्या जोरावर पास झाली. हेलनने 'माझी जीवन कथा' नावाचे पुस्तक लिहिले. त्या पुस्तकामुळे ॲनाला बऱ्यापैकी पैसे मिळाले. पण आपल्या या शिष्येला जगापुढे सादर करण्याची तिची इच्छा होती. म्हणून तिने १९२० साली न्यूयॉर्कमध्ये एका नाट्यगृहात हेलनचा कार्यक्रम ठेवला. पहिलाच कार्यक्रम हाऊसफुल झाला. हेलनची माहिती जाणून घेण्याकरिता नाट्यगृहाबाहेर लोकांनी रांगा लावल्या

होत्या . प्रथमच जगापुढे हेलन येणार होती. आकर्षक कपडे परिधान केलेली हसतमुख प्रसन्न चेहऱ्याची हेलन रंगमंचावर आली. ॲनाने आपल्या या शिष्येची अविस्मरणीय कथा लोकांना सांगितली होती. सर्व लोक हेलनकडे कुतूहलाने पाहत होते. हेलनने अडखळत पण सावकाश बोलायला सुरुवात केली. 'माझ्या शिक्षिकेने तिच्या स्पर्शातून मला शिकविले. माझ्या मनातल्या अज्ञानाचा अंधकार मावळून ज्ञानाची प्रकाशाची पहाट माझ्या जीवनात माझ्या या शिक्षिकेमुळे आली. तिच्यामुळेच माझी स्वत:शी व परमात्म्याशी ओळख झाली.' छोटेसे भाषण पण सर्वांच्या हृदयाला भिडून गेले लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. संपूर्ण अमेरिकेत हेलनची ही जीवन कहाणी पोहचली. हेलनचे अनेक कार्यक्रम अमेरिकेत झाले. या कार्यक्रमांतून मिळणाऱ्या पैशांचा



उपयोग माझ्यासारख्याच अंध-अपंगासाठी करण्याचा मनोदय हेलनने व्यक्त केला आणि हेलन व ॲना दोघींनी या कार्यात स्वत:स झोकून दिले. अनेक समाजसेवी संघटनांसाठी कार्यक्रम करुन त्यांनी पैसे जमविले. संपूर्ण जगात गुरुशिष्याची ही आगळीवेगळी जोडी काम करीत होती. हेलनची अंध-अपंगांच्या कार्याबद्दल ओढ वाढत चालली होती. ॲनाने हेलनच्या




जीवनावर एक चित्रपट काढला. त्यामधून बऱ्यापैकी त्यांना पैसे मिळत होते. हेलनचे लेख वर्तमानपत्रात येत होते. त्यातूनही काही पैसे मिळत होते. हे सर्व पैसे ॲना व हेलन अंधांच्या मदतीसाठी त्याचा विनियोग करत होत्या. हे त्यांचे महान कार्य अनेक संस्था व गरजूंच्या जीवनात प्रकाश देणारे होते. हेलनबरोबरच्या धावपळीत ॲनाची तब्येत खालावली. ती आजारी पडून २० ऑक्टोबर १९३६ रोजी देवाघरी गेली. आपल्या शिक्षिकेशिवाय हेलनने आपले कार्य चालू ठेवले. जगातील इतर अनेक देशांना तिने भेटी दिल्या. अंधांच्या कार्याबद्दलची माहिती घेतली. १९३९ मध्ये दुसऱ्या महायुध्दाचा फटका अनेक माणसांना बसला. त्यात अनेकजण अंध-अपंग झाले. त्या सर्वांना दवाखान्यात जाऊन भेटायचे, त्यांना मानसिक आधार द्यावयाचा अशी अनेक कामे हेलनने केली. १९६१ मध्ये तिला हृदयविकाराचा लहानसा झटका आला. नंतर ती ॲना भेटण्यापूर्वी जशी हेलन होती, तशाच प्रकारचे आयुष्य तिच्या वाट्याला आले. १९६८ मध्ये वयाच्या ८८ व्या वर्षी हेलन केलरने जगाचा निरोप घेतला. जिला दिसत नव्हते. अशा एका मुलीने आपल्या अपंगत्वावर मात करुन इच्छाशक्तीच्या जोरावर मनुष्य काय करू शकतो हे सर्व जगाला दाखवून दिले.


If I have a thousand ideas
and only turns out to
be good, I am satisfied.

# नोबेल पुरस्काराचे प्रणेते आल्फ्रेड नोबेल

एखादी विद्वान व्यक्ती धनवान असेल तर तिचे कौतुक वाटते, तिच्या सधनतेला दातृत्वाच्या फांदया फुटल्या तर तिचा जीवनवृक्ष सहज डोळ्यात भरतो. या वृक्षाच्या सावलीत सुखाने विसावणा यांची वाढती संख्या पाहून नेत्रांचे पारणे फिटते. दर वर्षी स्टॉकहोम येथे १० डिसेंबर या दिवशी साजरा होणारा नोबेल पुरस्कार वितरणाचा सोहळा पाहून अनेकांच्या मनात असेच धन्यतेचे भाव उचंबळून येतात. जात वंश राष्ट्र पक्ष पंथ व सांप्रदाय याहून श्रेष्ठ असणाऱ्या ज्ञान-विज्ञान साहित्य, तत्वज्ञान या जीवन प्रणालीचे नेत्रदिपक दर्शन या सोहळ्यात घडते. ज्यांच्या तपातून व ध्यासातून ही संस्कारगंगा प्रकटली ते आल्फ्रेड



नोबेल म्हणजे प्रयोगशील रसायनशास्त्रज्ञ इम्यानुअल नोबेल यांचे तृतीय पुत्ररत्न २१ ऑक्टोबर १८३३ या दिवशी आल्फ्रेड नोबेल यांचा जन्म झाला.

आल्फ्रेडच्या वडिलांचे स्टॉकहोममधील विफल जीवन क्लेषकारक झाल्यामुळे ते मुलाबाळांसह रशियातील पाटसबर्ग येथे गेले. तेथे गेल्यावर आल्फ्रेडने पाच भाषा स्वप्रयत्नाने आत्मसात केल्या स्विडीश ही त्यांची मातृभाषा होती. रशियन भाषा वातावरणात होती. इंग्रजीचाही वावर व वापर होता. जर्मनी व फ्रान्स जवळच होते त्यामुळे जर्मनी व फ्रेंच भाषा श्रवणी पडत होत्या. या सर्व भाषा स्वातीच्या शिंपल्याप्रमाणे मनात साठवून वारंवार आठवून त्यांनी आपल्याशा केल्या. परंतू त्यांना नित्य असे औपचारिक शालेय जीवन जगता आले नाही. वडिलांच्या कारखाना, कार्यालय, उपकरणे हीच त्यांची शैक्षणिक साधने झाली. मुलांनी काम करावे, जग पहावे व जाणावे आणि आपला उत्कर्ष आपल्या प्रयत्नांनी साधावा असा वडिलांचा विचार होता.

आल्फ्रेड १७ वर्षाचा झाला आणि वडिलांनी त्याला थोडा प्रवास करुन चार देश पाहून यायला सांगितले. प्रवास या कल्पनेने ते हुरळुन व हरखून गेले. त्यांच्याजवळ भाषेचे पंख होते. त्यांचे डोळे उघडे व हातपाय धड होते, डोके ठिकाणावर होते. नाती गोती, सगेसोयरे, चिठ्ठयाचपाट्या, वशिला या भानगडीत न पडता वाट फुटेल तसे ते चालत राहीले. त्यांना बंद दार ठोठावता येत होते उघड्या दारातून आत जाता येत होते. पॅरीस येथील प्रो. टी. जी. पिलाझी या ख्यातकीर्त रसायनशास्त्रज्ञाच्या प्रयोगशाळेत त्यांना उमेदवारी स्विकारली येथेच नायट्रोग्लिसरीन या स्फोटकाचा ओझरता परिचय एका अभ्यासकामूळे झाला हाच परिचय त्यांनी आपला मानला अन् दत्तक घेतला हे संशोधनसूत्र हाती घेऊन ते कालांतराने डायना माईट व ब्लास्टिंग जिलेटीन या स्फोटकापर्यंत पोहचले दोन वर्षाच्या विदेश भ्रमतीनंतर पीटसबर्ग येथे वडिलांच्या कारखान्यात रुजू झाले युध्दकाळ असल्यामुळे स्फोटक द्रव्यांची मागणी वाढू लागली व परिणाम नोबेल कंपनी भरात आली. परंतू युध्द थांबल्यावर सरकारची लहर फिरली. खाजगी कंपन्यांविषयी सरकारची धोरणे

बदलल्यामुळे नोबेल कंपनीला उतरती कळा लागली. आल्फ्रेडच्या वडीलांनी रशियातील व्यवसाय बंद करुन स्वीडन गाठले.

आल्फ्रेडला रसायनशास्त्रात गोडी होती, गती होती त्यामूळे त्यांनी अहोरात्र कष्ट उपसून नवनवीन स्फोटकांचा अभ्यास केला. अनेक वेळा त्यांच्या कंपनीत व कंपनीने घेतलेल्या जहाजावर स्फोट झाले. एका स्फोटात आल्फ्रेड यांचा धाकटा भाऊ एमिल मरण पावला. परंतू त्यामुळे संशोधनलालसा कमी झाली नाही किंवा शोधयात्राही संपली नाही ग्लिसरीनमध्ये सल्फ्युरिक ॲसीड व नायट्रीक ॲसीड मिसळून तयार झाले परंतू ते द्रवरूप असल्यामूळे ते सांडत व स्फोट होत असे त्याला घनता येण्यासाठी आल्फ्रेडने किझेलगूर ही मृत्तिका वापरली या प्रयोगाने संशोधनाला दिशा मिळाली. डायनामाईट, ब्लास्टिंग जिलेटीन अशी प्रभावी स्फोटके निष्पन्न झाली. शेतमळ्यापासून रणांगणापर्यंत त्यांचे उपयोजन क्षेत्र विस्तारले. नोबेल कंपनीने पुन्हा मूळ धरले. व उत्कर्षाचे गगन गाठले दारी संपत्तीचे पीक डोलावू लाचले.

उत्कर्षाच्या या सर्वोच्च शिखरावर असताना वयाच्या ४० व्या वर्षी वडील गेले होते. आई उरली नव्हती पैशात आई–वडिलांच्या पश्चात पोहणारा हा जीव भाव विश्वात कोरडा राहीला होता.






अगदी खिन्न आणि सुन्न झालेल्या आल्फ्रेडची भूक मंदावली, झोप उडाली जीवनातील स्वारस्य ओसरले. याच कालावधीत ३३ वर्षाची सुस्वरूप प्रसन्न व्यक्तिमत्वाची, अनेक विषय बोलू शकणारी, अनेक विषयांची समज असणारी, लोभस स्त्रित्व लाभलेली काउंटेस बार्था त्यांच्या सहवासात आली बार्थाला स्फोटके ही कल्पना धृणास्पद वाटे. संहारक द्रव्याचे साठे निर्माण करुन का जगाचे पर्यावरण सुधारणार आहे ? नोबेल स्फोटकांच्या उपयुक्ततते विषयी बोलत परंतू कधी तरी या जगाला शस्त्रास्त्रांचा वीट येईल व माणसे शांतीचा शोध घेतील असा त्यांचा तर्क होता. परंतू बार्थाचे सहवास सौख्य आल्फ्रेड यांना फार काळ लाभले नाही. शस्त्रसंन्यास हाच शांतीचा मार्ग ही भूमिका मांडणारी बार्था १९०५च्या शांतता पुरस्काराची मानकरी ठरली.

दोघांचे एकत्र येणे. प्रेमाच्या सरहद्दीपर्यंत त्यांचा सहप्रवास घडणे तेथूनच त्यांना परतावे लागणे आणि व्यक्तीगत दु:ख मनावेगळे करुन मोठ्या मनाने जगाच्या कल्याणाचे स्वप्न दोघांनीही पाहणे, हा प्रेममोक्ष होता. १० डिसेंबर १८९६ या दिवशी आल्फ्रेड नोबेल यांची जीवनयात्रा संपली तो दिवस मुहुर्त समान मानून नोबेल पुरस्काराचे वितरण या दिवशी स्टॉकहोम येथे स्वीडनच्या राजाच्या हस्ते केले जाते. रसायन विज्ञान, वैद्यक व शरीर विज्ञान पदार्थ विज्ञान, साहित्य व आंतरराष्ट्रीय शांतता, अर्थशास्त्र क्षेत्र या पैकी कोणतेही असो त्यात काम करणाऱ्या ज्या व्यक्तींचे प्रयत्न मानवी जीवन संपन्न व कृतार्थ करण्यासाठी साह्यभूत ठरतील त्यांचा जाहीर व जागतिक पातळीवरून सन्मान घडावा हे नोबेल स्वप्न सत्यसृष्टीत उतरले.






# * आरोग्य विषयक सल्ले *

### * आरोग्यविषयक सल्ला :

* रोज एक सफरचंद आपल्याला डॉक्टरांपासून दुर ठेऊ शकते
* रोज एक तुळसीचे पान आपले कर्करोगापासुन संरक्षण करते
* रोज एक लिंबु सेवन केल्यास अंगावरील चरबी कमी होते.
* रोज एक कपभर दुध पिल्यास हाडांच्या तक्रारी कमी होतात.
* रोज १ लिटर पाणी आपल्याला आजारापासून दुर ठेवते.

### * झोपताना घेतलेली काळजी आपल्या हृदयावरील ताण कमी करु शकते :

जर आपण पोटावर पालथे किंवा डाव्या कुशीवर झोपत असाल तर आपल्या शरीरावरील पुर्ण वजन हृदयावर पडते व त्यावर ताण पडतो. विचार करा आपल्या आयुष्यातील एक तृतीयांश वेळा आपण झोपण्यात घालवतो व इतका वेळ विनाकारण आपण हृदयावरील ताण वाढवतो. हे कमी करण्यासाठी आपण उजव्या कुशीवर किंवा पाठीवर झोपल्यास आपण आपल्या आयुष्यातील काही दिवस वाढवु शकतो.

### * डोळ्यांखालचे काळे वलय घालवण्याचा सोपा उपाय :

* पुदिन्याची पाने बारीक कापुन वाटुन घ्या
* हा तयार झालेला चोथा डोळ्याच्या खालच्या भुवईखाली लावा. २० मिनिटांनंतर स्वच्छ पाण्याने धुवा. असे आठवड्यातून दोन वेळा करा व फरक पहा.

### * केळयाच्या सालीच्या मदतीने आपले दात पांढरे शुभ्र ठेवा :

केळ्याच्या सालीचा आतल्या भागाचा एक तुकडा घ्या आपल्या दातांवर दोन मिनिटे चोळा. केळीच्या सालीतले पोटॅशिअम मॅग्नेशिअम, मॅंगेनिझ दातात शोषुन घेतले जातात व दातास पांढरे शुभ्र बनवतात.

### * इतर सल्ले :

* नेहमी फोनवर उत्तर देताना फोन डाव्या कानावर लावा.
* औषधे थंड पाण्याबरोबर घेऊ नये
* संध्याकाळी ५ नंतर जड पदार्थ खाऊ नयेत
* सकाळी जास्त पाणी प्या व रात्री कमी प्या
* झोपण्याची उत्तम वेळ रात्री १० ते सकाळी ४
* औषधे घेतल्यानंतर लगेच झोपु नये
* फोनची बॅटरी शेवटची लाईन दाखवत असेल तर फोनचा वापर करु नये कारण त्याच्या लहरी हजारपटीने जास्त असतात.

# * आरोग्य विषयक सल्ले *

### * लाल रंगांच्या फळांमुळे होणारे फायदे :

* लाल फळांमुळे हृदयविकारापासुन आपले संरक्षण होते तसेच त्यामुळे रक्ताभिसरणास मदत होऊन रक्तातील गुठळी होऊन होणाऱ्या आजारास प्रतिबंध होण्यास मदत होते.
* लाल फळांमध्ये ॲन्टिऑक्सिडंटचे प्रमाण जास्त असल्यामुळे कर्करोगासारख्या आजारापासुन संरक्षण मिळते.
* लाल रंगाच्या फळांमधील लायकोपीन नावाच्या घटकामुळे त्यास लाल रंग येतो. हे एक उत्तम ॲन्टिऑक्सिडंट म्हणून काम करते.



### * केळांपासून होणारे १० फायदे :

* धुम्रपानाची सवय घालवण्यास मदत करते.
* बुध्दिच्या वाढीस मदत करते.
* मासीक पाळीतील होणाऱ्या पोटदुखीच्या तक्रारी कमी करते
* डास चावल्यामुळे येणारी खाज कमी करते.
* रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढवण्यास मदत करते.
* हाडांच्या मजबुतीसाठी मदत करते.
* तणावग्रस्त जीवनात येणारे नैराश्य कमी करण्यास मदत करते.
* हृदयविकार व रक्तदान सारखे आजार नियंत्रण करण्यास मदत करते
* पोट साफ राहण्यास मदत करते.
* पित्तामुळे होणारे पोटाचे विकार कमी करते.

### * आनंदी राहण्याचे १० मार्ग :

* जर एखादी गोष्ट तुम्ही बदलु शकत नसाल तर ती आहे तशी स्विकारा व जर तुम्ही ती बदलु शकत असाल तरी ती बदलण्याचा पुर्ण प्रयत्न करा.
* जे लोक तुमच्या प्रगतीमध्ये अडथळा बनत असतील त्यांना सोडून द्या आणि हे लोक कोण आहेत ते तुम्हाला माहीत असते.
* तुमचे आवडते गाणे मोठ्या आवाजात लावा आणि त्याच्याबरोबर मोठ्यानी गा जमलंच तर नाचलं तरी चालेल
* रोज पळायला जा जोपर्यंत तुम्हाला आतुन छान नाही वाटत तोपर्यंत पळा जेव्हा तुम्ही पूर्ण दमाल तेव्हा तुमचे वाईट विचार तुमच्यापासून लांब पळलेले असतील
* तुमच्या आवडत्या व्यक्तीला फोन करा तुमचा दिवस चांगला जाईल.
* अनोळखी माणूस जरी असला तरी हसून प्रतिसाद द्या दोघांनाही छान वाटेल.
* एखादी गोष्ट आवडल्यास त्या व्यक्तीची मनापासून प्रशंसा करा.
* एका कागदावर स्वतःच्या न आवडणाऱ्या गोष्टी लिहा आणि तो कागद जाळून टाका.
* तुमचा आवडता चित्रपट पहा.
* स्वतःवर विश्वास ठेवा.

### * सौंदर्यप्रसाधनातील रसायने नर्मटमध्ये ?

* सोडियम स्टीरॉयल लॅक्टीलेट
– हे रसायन शाम्पु आणि साबणामध्ये सापडते. हे ब्रेडचे पीठ फुगवण्यासाठी वापरले जाते.
* कॅल्शियम डायसोडियम (ई.डी.टी.ए.)
– हे रसायन त्वचेच्या आणि केसांच्या प्रसाधनांमध्ये वापरले जाते. हे ब्रेडमध्ये का वापरले जाते तर त्याचा स्वाद टिकवण्यासाठी
* अमोनियम ग्लासीरीझीन
– चेहऱ्याच्या लेपमध्ये वापरले जाते
* डायसोडियम फॉस्फेट
हे रसायन डोळ्यांच्या मेकअपमध्ये आणि तोंड धुण्यासाठीच्या लिक्वीड मध्ये वापरले ताजे. ब्रेड टिकवण्यासाठी हे वापरले जाते.

### * मानवी नेत्रासंबंधातील काही सत्य :


* दर मिनिटाला अंदाजे १२ वेळा आपण पापण्यांची उघडझाप करतो.
* डोळा दोन लाखांपेक्षा जास्त पेशींनी बनलेला आहे.
* मानवी नेत्र हा ५७६ मेगापिक्सल कॅमेराइतका सक्षम आहे.
* नेत्रातील कॉरनीचा हा एकमेव भाग आहे. त्यात रक्तप्रवाह नसतो. एका तासाला
* एका तासाला नेत्र ३६,००० प्रकारची माहिती गोळा करु शकतो.
* मानवी नेत्राचे वजन अंदाजे २८ ग्रॅम असते.
* डोळे उघडे ठेऊन शिंकणे केवळ अशक्य आहे.
* नेत्र दिवसातून १०,००० वेळा उघडझाप करतात.

### * केळे :

* रातआंधळेपणापासुन संरक्षण करते
* रक्ताभिसरण संस्था – उच्चरक्तदाब कमी करण्यास मदत करते.
* आम्लपित्तासारखे आजार कमी करण्यास मदत करते.
* हाडे ठिसुळ होण्यापासून वाचवते.
* जुलाबामुळे होणारी शरीरातील पोटॅशियमची मात्रा भरुन काढते
* शौचास साफ होण्यास मदत करते
* कर्करोगापासून बचाव करते.



पुर्ण पिकलेल्या केळ्याभोवती गडद काळे डाग तयार होतात. त्यामध्ये ट्युमर नेक्रोसीस फॅक्टर (TNF) नावाचा घटक तयार होतो. हा घटक शरीरातील खराब झालेल्या पेशींविरुध्द लढण्याचे काम करतो. जेवढे जास्त गडद डाग असतात तेवढ्या जास्त प्रमाणात हा घटक तयार होतो म्हणुन पिकलेले केळे हे कर्करोगापासुन संरक्षण देणारे उत्तम फळ आहे.


If you can't expl
don't understand

ain it **simply**, you
it well enough.


# विज्ञान महर्षी
# आल्बर्ट आईनस्टाईन

राजाला केवळ देशात मान मिळतो पण विद्वानांचा जगभर बहुमान होतो. अशा आशयाचे एक सुभाषित अनेक भाषेत आढळते. पण विद्वानांना देशातून हद्दपार केले जाते. त्यांची मालमत्ता जप्त केली जाते. त्यांचे पद काढून घेतले जाते. जगाने त्यांना नोबेल पुरस्काराने सन्मानित केले तरी स्वतःला उंची नसणारे त्यांचे सजातीय बांधव त्यांना पाण्यात पाहतात असेही या जगात घडू शकते. आल्बर्ट आईन स्टाईन या शास्त्रज्ञाच्या वाट्याला हे दुर्भाग्य येऊन गेले.

आल्बर्ट आईनस्टाईन यांचा जन्म १४ मार्च १८७९ या दिवशी दक्षिण अमेरिकेतील अल्म या गावी झाला.


आल्बर्ट स्वभावाने बुजरा व हळवा होता. बोलण्यास त्रास होत असल्याने तो न बोलणेच पसंत करीत असे. लहानपणी जेव्हा तो शाळेत जायचा तेव्हा त्याला शाळेतील घोकंपट्टी, शिकविण्याची पध्दती, आणि कडक शिस्त अजिबात आवडत नसे प्रश्न विचारण्याकडे आणि कोणतीही गोष्ट मुळापासून समजून घेण्याकडे कल असल्यामूळे गणित विषय त्याचा अत्यंत आवडीचा होता. तो बालपणीच एक गणिती झाला. त्याची आई व्हायोलिनवादक होती. सहा वर्षाच्या आईन स्टाईनला आईने व्हायोलिन शिकविले. तो नवनवीन गीते व चाली यांचा रचनाकार झाला. त्याच्या पाचव्या वाढदिवसाला मॅग्नेटिक कंपास या नावाचे होकायंत्रसदृश्य उपकरण वडिलांनी त्याला दिले ते पाहून त्याला नवल वाटले. सदा उत्तराभिमुख राहणारी ही सुई त्याला जादूची कांडी वाटली. तो बारा वर्षाचा असताना त्याला युक्लिडचे भूमितीवरचे पुस्तक भेट म्हणून मिळाले. या पुस्तकाशी त्याने मैत्री केली. नेमकी आणि नेटकी भाषा पायरीपायरीने होणारी प्रमेयाची सिध्दता ही प्रक्रिया त्याला संगीता समान वाटली त्याच्या लेखी भूमिती हा विचारांचा ताजमहाल झाला.

आईन स्टाईनने बालपणीचे औपचारिक शिक्षण म्युनिच येथील



मिशनऱ्यांनी चालविलेल्या शाळेत झाले. तो जन्माने ज्यू होता या एकाच कारणाने त्याची शाळेत अवहेलना होत असे. वयाच्या दहाव्या वर्षानंतर 'जिन्मॅशियम' या नावाने प्रसिध्दीस आलेल्या माध्यमिक दाखल परंतू वडीलांच्या व्यावसायिक अपयशामूळे संपूर्ण कुटुंब इटलीतील मिलन या गावी परतले. इटलीतील निसर्ग सुंदर परिसर, विस्तीर्ण उदयाने भव्य कलादालने, वस्तुसंग्रहालये या गोष्टींनी त्याला वेड लावले. आल्बर्ट इटलीतील वास्तव्यात सुखावला. त्याला लहानपणापासून गोंगाट गलका, आरडा-ओरड, दंगामस्ती यांची नावड होती., तो आपल्या विचारसृष्टीत व स्वप्नरंजनात रमत असे.

सोळाव्या वर्षी अल्बर्ट स्वित्झर्लंडला गेला विंटेकर नावाच्या एका कुटुंबात राहून एका तांत्रिक शाळेत शिकू लागला. ज्या शाळेत तो शिकत होता ती शाळा त्याला फार आवडली. वातावरणातील प्रसन्नता विद्यार्थ्यांना मिळणारे प्रयोग स्वातंत्र्य व व्यासंगी अध्यापकांचे मार्गदर्शन यामूळे त्याची बुध्दी उजळून निघाली. झुरिच या गावी असणाऱ्या स्विस फेडरल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेत राहून त्याने पदवी मिळविली. परंतू योग्यता असतानाही शिक्षक म्हणून नोकरी न मिळाल्यामूळे शेवटी २३ व्या वर्षी बर्न येथील एका पेटंट तपासणी कार्यालयात त्याने दुय्यम नोकरी धरली. या कार्यालयात त्याला रोजचे काम उरकून बरीच उसंत मिळू लागली. सुमारे पाच वर्षाच्या काळात त्याने काही शोधनिबंध केले. पदार्थ विज्ञानात क्रांती घडविणारे तीन संशोधन प्रबंध आल्बर्टने वयाच्या २६ व्या वर्षी लिहीले. झुरिच विद्यापीठाची पी.एच.डी. संपादन करण्यासाठी त्याने एक स्वतंत्र प्रबंध प्रसिध्द केला या प्रबंधामूळे त्याला




पी.एच.डी. ही उपाधी व प्राध्यापक म्हणून नोकरीही मिळाली.

येथून पुढे अनेक उपक्रमांनी संपन्न असा विचारसमृध्दीचा काळ आईनस्टाईने अनुभवला. प्रयोग केले निष्कर्ष काढले उपपत्तीचे आकृतीबंध उभे केल ग्रंथ लिहीले मते मांडली, खंडन मंडनही केले. १९०५ मध्ये त्यांचा सापेक्ष वादावरचा ग्रंथ प्रसिध्द झाला. १९०५ ते १९०९ या काळात त्याची 'क्वांटम थिअरी' प्रकाशात आली. १९०९ मध्ये झुरिच विद्यापीठात तो दाखल झाला. बर्लिन येथे असलेल्या कैसर विलहेम इन्स्टिटयूटचा तो १९१३ मध्ये संचालक झाला. १९२२ मध्ये पदार्थ विज्ञान शाखेसाठी असणाऱ्या नोबेल पारितोषिकचा मानकरी ठरला. त्यांचा सापेक्षतावाद जग प्रसिध्द झाला तो सरळ साधा, पण महत्वाचा विचार असा, 'प्रत्येक व्यक्ती जगाकडे आपल्या जागेवरुन पाहते. प्रत्येकाने रेखाटलेले जगाचे चित्र हे व्यक्ती सापेक्ष व भिन्न असते. जगातील सर्व व्यक्तींच्या संभाव्य आणि सापेक्ष अशा अनुभवांची बेरीज म्हणजे अंतीम सत्य ! सत्येंद्रनाथ बोस, रविंद्रनाथ टागोर, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा आईन्सस्टाईन्सच्या जीवनावर फार मोठा प्रभाव होता. विचारांची सधनता लाभलेल्या आईन्सटाईनला संपत्तीचे आकर्षण नव्हते. तो कमालीचा साधा होता. एकदा बेल्जियमच्या राणीने त्याला भेटीसाठी बोलावले स्थानकावर त्याच्या स्वागतासाठी वाहने आणि अधिकारी सज्ज होते. पण आईन्स्टाईन एका हातात सुटकेस आणि दुसऱ्या हातात व्हायोलीन घेऊन

राजवाड्यापर्यंत चालत गेला त्याला कोणी ओळखले नाही. या निगर्वी बुध्दीमंताला लोक डामडौल का करतात ते कधीच कळले नाही. आपण जगतो ते केवळ आपल्यासाठी नाही तर आपला आनंद ज्या अनेकांच्या सुखावर अवलंबून आहे त्या सर्वांसाठी असे तो म्हणत असे. आईन्स्टाईन मनाने निराग्रही होते पण तत्वाच्या बाबतीत सत्याग्रही होते. शास्त्रज्ञांची संवेदना आणि संतांची वेदना यांनी घडलेले व्यक्तिमत्वशिल्प म्हणजे आईन्स्टाईन.

जर्मनी ही आईनस्टाईनची जन्मभूमी तो कैसर विलहेम्स फिनिक्स इन्स्टिट्यूटचा वीस वर्षे संचालक होता 'प्रशियन ॲकडमी ऑफ सायन्स' या संस्थेचा तो मार्गदर्शक होता. पण नाझी राजवटीचा उद्दामपणा त्याला रुचला नाही. तो विमनस्क दशेत एका व्याख्यान दौऱ्यावर गेला अमेरिकेतील न्यू जर्सी परगण्यातील प्रिन्स्टन येथील इन्स्टिट्यूट फॉर ॲडव्हान्स स्टडी या संस्थेने त्याला आजीव सभासदत्व देऊन सन्मानपूर्वक अमेरिकेत ठेवून घेतले. १९४० मध्ये त्याला अमेरिकन नागरिकत्व देण्यात आले. जर्मन सरकारने त्याला कैद करुन शिरच्छेद करावा असे पत्रक प्रसिध्द केले परंतू त्यापूर्वीच अमेरिकन राजवटीने आपली सुरक्षा व्यवस्था या विद्यावंताच्या दारी उभी केली.

आईनस्टाईनला लहान मुलांचा फार लळा होता.


तो लहानांना फार मानत असे बालगोपाळांच्या एका सभेत तो म्हणाला, 'तुम्ही शाळेत जे शिकता ते अनेक पिढ्यांचे विचारधन आहे तुम्हाला मिळालेला हा वारसा तुम्ही जतन करा. शक्य तो त्यात भर टाका.

आयुष्याच्या उत्तरार्धात आईनस्टाईन प्रसिध्दीच्या झोतात राहीला. तो रस्त्याने चालला म्हणजे पत्रकार फोटोग्राफर यांची धांदल उडे. त्याला भेटण्यासाठी आतुर असणाऱ्या अनेक महिला त्याच्या दूरदर्शनाने समाधान पावत. निरभ्र आकाशातील पौर्णिमेच्या चंद्राची शीतलता ज्याच्या ठायी होती तो सम्यक ज्ञानी चांदणे शिंपीत पुढे जात असे.

वयाच्या शहात्तराव्या वर्षी १८ एप्रिल १९५५ या दिवशी प्रिन्स्टन येथील एका हॉस्पीटलमध्ये झोपेतच त्यांचे देहावसान घडले.

उज्वला गायकवाड


# Applying Einstein's Theories of Relativity



*Albert Einstein's theories of relativity play an essential role in many Livermore research projects.*

# चार्ली चाप्लीन

''माझ्या वेदना कुणाच्या तरी
हसण्याचं कारण असु शकतात
पण माझ हसणं कुणाच्याही
दु:खाच कारण बनता कामा नये''



हास्य एक रस म्हणुन पाहिलं तर आजच्या ओढा-ताणाच्या जगण्यामधली एक दैवी देणगीच पण या देणगीचा देव कोण असा प्रश्न पडला की त्याचा चेहरा आठवल्याशिवाय राहत नाही. कधीतरी त्याचा सिनेमा लागतो. त्याच मनाला भावणारं दर्शन आणि त्याच्या गमती हसवितात, हे हसणं इतक दिलखुलास असत की हृदयाची कवाडं आपोआप कधी खुली होतात हे कळत देखील नाही. तेव्हा कुठं आम्हाला कळत या माणसाचं महत्व आणि मग आपणही मनातल्या मनात सलाम करतो त्याला त्या विनोदाच्या बादशहाला ज्याच नाव आहे ''चार्ली चाप्लीन''

१६ एप्रिल १९८९ साली हनाह चाप्लीन आणि चार्लस चाप्लीन (ज्येष्ठ) या कलाकार दांम्पत्याच्या घरी जन्माला आलेल्या चार्लीने पुढे जावून अशी काही धमाल केली की, आज त्याच्या अनुपस्थितीतही त्याचे सिनेमे जगभरातील लोकांच्या जीवनात आनंदाचे क्षण देत आहेत. दक्षिण लंडनच्या एका लहानश्या घरात जन्माला आलेल्या चार्लीची आई एका चांभांराची मुलगी पण कलाकार/गायक म्हणून समाजामध्ये तिची स्वःताची अशी एक ओळख होती लिली हार्ले या नावाने चार्लीला त्याच्या आईपासून असलेला एक सावत्रभाऊ होता त्याच नाव सिडने जॉन पुढे याच सिडनेने चार्लीला त्याच्या कलेच्या प्रवासात साथ दिली.

चार्लीच सुरुवातीच जीवन हे दारिद्र्य आणि कष्टानं पुरेपुर भरलेल होत. आई हनाहचे अधेमधे होणारे कार्यक्रम व सुरांच्या माध्यमातुन ती घरचा खर्च चालवत असे. वडीलांनी मात्र या परिस्थितीतही त्यांना कोणताच आधार पुरविला नाही. हळूहळु परिस्थिती आणखी बिकट बनत गेली आणि अशातच आईच्या आजारपणामुळे चार्लीला त्याच्या सातव्या वर्षी गरजु मुलांच्या शाळेत दाखल करण्यात आलं, ज्याच वर्णन पुढे चार्ली आयुष्यभर ''एक दुखःद अस्तित्व'' असच करत आला. पुढे काही दिवसात त्याच्या आईला झालेल्या मानसिक रोगामुळे मनोरुग्णालयात

दाखल करण्यात आले. इकडे मात्र चार्ली आई, वडील व भाऊ हयात असुनही अनाथाचं जिणं जगत होता. एकीकडे आजारी असणारी आई दुसरीकडे दारुच्या आहारी गेलेले व कसलाही संबंध न ठेवणारे वडील भाऊ दुर नौदलामध्ये कामासाठी गेलेला अशा तिहेरी चक्रव्युहात अडकलेल्या चार्लीने या काळातही जगण्याच आणि लढण्याच सामर्थ्य सोडल नाही. चौदा वर्षाचा चार्ली या काळात एकट जगला, खाण्यासाठी अन्न नाही की राहण्यासाठी घरचा पत्ता, सगळ काही असुनही चार्लीसाठी मात्र त्याचं असं या काळात काहीच आणि कुणीच नव्हतं. १४ वर्षाच्या या पोराने धैर्याचं एक अप्रतिम जग या काळात अनुभवलं पुढे त्याचा भाऊ नौदलातून घरी परतला. पण काही दिवसांनी सगळं काही सुरळीत होत असतानाच त्याची आई पुन्हा मानसिक रुग्ण झाली आणि आता तर डॉक्टर आणि रुग्णालयही तिला स्वीकारत नव्हते. या परिस्थितीबद्दल चार्लीने नंतर लिहून ठेवलय की ''माझ्या आईच्या दुर्दैवापुढे आम्हीही हतबलपणे काहीच करु शकत नव्हतो.'' एवढं होवूनही चार्लीने आपल्या आईची तब्बल २३ वर्षे उत्तम सुश्रुषा केली.

कलाकार म्हणून चार्लीने वयाच्या नवव्या वर्षापासून स्वःताच्या करिअरची सुरुवात केली ती एका डान्स ग्रुपचा सदस्य म्हणुन पुढील दोन वर्ष त्यांच्या ग्रुपने तत्कालीन इंग्लंड मधील जवळपास सर्व नाट्यगृहांमध्ये स्वता:ची कला सादर केली वयाच्या १३ व्या वर्षी त्याने त्याचं शिक्षण पुर्णपणे थांबविलं आणि आता त्याची एक वेगळीच धडपड चालु झाली ती म्हणजे जगण्याची, दरम्यानच्या काळात त्याने अनेक नोकऱ्या बदलल्या मात्र जगण्याच्या या मारामारीत त्याने एक निखारा त्याच्या आतमध्ये सदैव जिवंत ठेवला तो म्हणजे ''एक यशस्वी कलाकार होण्यासाठीचा'' लवकरच त्याने लंडनमधल्या एका थिएटर एजन्सीमध्ये (वेस्ट एंड) काम करायला सुरुवात केली थिएटरच्या मॅनेजरने त्याच्यातला तो निखारा ओळखला व त्यावर फुंकर घातली इथेच चार्लीला त्याच्या आयुष्यातला पहिला रोल मिळाला, ''रोमान्स ऑफ कोकायेन'' या नाटकात तो होता वर्तमान पत्र वितरकाचा. पण दोन आठवड्यातच नाटकाचे शो बंद पडले. पण तरीही चार्लीचा विनोदी नट मात्र भाव खाऊन गेला ह्याच अनुभवाच्या बळावर त्याने तत्कालीन सर्वात लोकप्रिय नाटकात म्हणजे ''शेरलॉक होम्स'' मध्येही स्वतःची वठविली व दोनच वर्षांत याच नाटकात प्रमुख नटाबरोबर काम करायची संधीही त्याला लाभली. या संधीचा उल्लेख चार्लीने ''स्वर्गातून मारलेली उडी'' असा केला. इथून पुढे मात्र त्याने कलेच्या क्षेत्रात मागे वळुन पहिलंच नाही सहाय्यक ते प्रमुख नट, दिग्दर्शक ते निर्माता आणि पडद्यामागची छोटी मोठी कामे करणारा पोरगा ते विनोदाचा अनभिषिक्त सम्राट त्याने अनेक भुमिका गाजविल्या मात्र डोक्यावर हॅट परिधान केलेला, थोटक्या मिश्या, अपुरी पण ढगळ अशी पॅन्ट, विशिष्ट पद्धतीने चढविलेला सुट, हातातली काठी आणि पायातले मळलेले, शुज घालुन एक भटका म्हणुन त्याने ''द ट्रॅम्प'' मध्ये केलेली त्याची भुमिका इतिहासाच्या पानांना इतकी भावली की आजही त्याचा खरा फोटो आम्हांला हा चार्ली नाहीच असं ठणकावून सांगतो. त्याच्या पुढील जवळपास चार्लीच्या सर्वच चित्रपटांमध्ये त्याचा हा वेश कायम राहिला. ''द कीड'' मधील त्याचा अभिनय जगभर वाखाणला गेला. विनोदी ढंगाने समाज व माणसांमधील विद्रूप सत्य प्रेक्षकांसमोर ठेवताना डोळ्यांच्या कडा ओलावणाऱ्या त्याच्या चित्रपटांप्रमाणेच आयुष्याचा चित्रपटही डोळे पाणावून सोडतो.

बालपणापासुनच नियतीने केलेला प्रत्येक वार या पठ्ठयाने अलगद झेलला. आई-बाप असुनही अनाथाचं आयुष्य जगताना होणाऱ्या वेदना असह्य असतानाच पण त्याचा साधा अस्फुट हुंकारही त्याने कधी जाणवू दिला नाही की परिस्थितीची कारणं पुढे करुन त्याने स्व:ताचं जगणं थांबवलं नाही वडील असुनही बापपण न लाभलेला वेड्या आईची तितकीच प्रामाणिकपणे सुश्रुषा केलेला चार्ली आणि कलाकार म्हणुन जिद्द व चिकाटीने संघर्षाचं मुर्त लेणं लेवून, कलाकार म्हणुन स्व:ताला सिद्ध केलेला चार्ली, यामध्ये कुठेच साध्या सुईच्या अग्राचाही फरक जाणवत नाही.

चार्ली खऱ्या अर्थाने कला जगला होता. यशस्वीतेच्या शिखरावर असताना देखील त्याने त्याचा भूतकाळ लपविला नाही त्याच ''द कीड'' या चित्रपटातल एका छोट्या मुलाबरोबर असणारं एक साधंस छायाचित्र आम्हांला आजही नुकत्याच जन्मलेल्या व खुदकन हसणाऱ्या बाळा इतकच निरागस का वाटावं ? असा प्रश्न त्याचा हा भुतकाळ वाचल्यावर नक्कीच आठवत राहतो.

जीवनात चार्ली हा हाल अपेक्षा सहन करतच जगला त्याने स्वता:ची दु:ख मेकअपने झाकली आणि दुसऱ्यांची दु:ख कमी व्हावीत म्हणुन जगाला आनंदी बनविण्याचा जणु वसाच घेतला होता दु:ख काय असतं? त्याचे परिणाम काय होतात आणि हसण्याचं आयुष्यात काय महत्व आहे हे त्याला खुप छान समजलं होत. ज्या दिवशी तुम्ही हसले नाही तो दिवस तुम्ही वाया घालविला. या म्हणण्याचा तो खंदा समर्थक होता.

तो नेहमी म्हणायचा ''मला पाऊस खूप आवडतो कारण पावसाचे थेंब जेव्हा माझ्या चेहऱ्यावरुन ओघळतात त्यावेळेस माझं रडणही त्यात मिसळुन जातं''.

८८ वर्षाचे भरपुर आयुष्य लाभलेल्या या विनोदाच्या असामान्य बादशहाचे वैयक्तिक आयुष्य व त्याची दु:ख मात्र सामान्य आणि कारुण्याने भरलेलं होत पण हो त्यावर मात करुन हसत आणि हसवत जगला.

**प्रा.अविनाश हांडे**



# एक तेजस्वी चांदणी
# कल्पना चावला

**दिल है छोटासा, छोटीसी आशा ... चांद तारोंको छुने की आशा ...**
**आसमानोमें उडने की आशा ...**

जाने गगनाला गवसणी घालण्याचा, चांदण्यांना कवटाळण्याचा ध्यास घेतला. जिद्दीने स्वप्न पुर्ण केले, पण चांदण्यातच विरुन गेली. साऱ्या भारतीयांच्या मनाला चटका लावून जाताना बालपणापासून कल्पनेच्या साम्राज्यात वावरणारी कल्पना, कल्पना चावला.

कल्पना चावलाचा जन्म कर्नाल गावचा वडील बनारसीदास आणि आई संयोगिता मूळचे मुलतानचे बनारसीदास अगदी कफल्लक स्थितीत भारतात आले आणि कर्नालला येऊन स्थायिक झाले. दोघांनी अमाप कष्ट केले प्रसंगी रस्त्यावर गाडीवरून गोळ्या, बिस्किटे, शेंगा किरकोळ वस्तू विकुन संसार चालविला. बनारसीदासांनी टायर रिमोल्डिंग व्यवसाय सुरु केला. ते अतिशय हुशार होते. काही दिवसातच स्वत:च्या बुध्दीने टायर्स बनविण्याचा व्यवसाय सुरू केला नवीन व्यवसायात खूप भरभराट झाली. १७ मार्च १९६२ रोजी घरात एका धष्टपुष्ट गोंडस बाळाने मुलीने प्रवेश केला. घर आनंदाने भरुन गेले. घरात ८ वर्षानंतर बालिका आली. मोठी बहीण सुनिता तिला घेऊन घरभर फिरु लागली. सगळेजण प्रेमाने मॉंटी, मॉंटी म्हणून हाका मारु लागले. मॉंटी मोठी होत होती शाळेत जाण्याच्या वयात आली तेव्हा लक्षात आले की तिचे बारसे करायचे राहून गेले. बाईंनी विचारले नाव काय लिहायचे मोठी सुनिता म्हणाली आम्ही तिची तीन नावे ठरवलीत. ज्योत्स्ना, सुनयना आणि कल्पना. बाई म्हणाले मॉंटी तुला कोणते नाव आवडले तेच नाव शाळेत लावून टाकू. मॉंटी म्हणाली 'कल्पना'.

रात्रीच्या वेळी कल्पना गच्चीवर जाई गाद्यावर आरामात पडून चांदण्या बघत बसणे तिला खूप आवडे. ती आईला म्हणायची मी एक दिवस चांदण्याकडे जाणारच कल्पना अतिशय



हुशार आणि तल्लख बुध्दीची होती तशीच खेळात नेहमी पुढे असे. डोंगरात जंगलात भटकणे आवडे. कर्नालला छोटासा फ्लाईंग क्लब होता. हट्ट करुन वयाच्या ११ व्या वर्षी छोट्या विमानातून हिंडून आली आणि तिथे ठरवून टाकले पायलट व्हायचे. मुलांसारखा ड्रेस घालून बॉबकट करुन ती सायकलवरुन शाळेत जाई.

डोंगरावर हिंडून दगड गोटे गोळा करायला तिला आवडे म्हणायची एक ना एक दिवस मंगळावर जाऊन तिथले दगड घेऊन येईन

घरी तिच्या खोलीत सगळीकडे चांदण्या लावलेल्या, विमानाची रॉकेटची चित्रे असायची युरी गागारीन – अंतराळात जाणारा पहिला अंतराळवीर – याचेही मोठे चित्र लावलेले असायचे १६ वर्षे पूर्ण व्हायच्या आतच ती मॅट्रिक झाली. कॉलेजात कमी वयामूळे प्रवेश मिळेना. शेवटी नवीन जन्मतारीख १ जुलै १९६१ घेऊन कल्पनाने कॉलेजात प्रवेश केला.

त्या काळात कर्नालसारख्या गावात मुलींनी शिकावे असे वातावरण नव्हते मुलगी १६-१७ वर्षाची झाली की घरची मंडळी शिक्षण बंद करुन मुलीच्या लग्नाच्या मागे असत. कल्पनाने वडीलांचा विरोध पत्करत



चंदीगढच्या पंजाब इंजिनिअरिंग कॉलेजात प्रवेश घेतला येवढेच नव्हे तर विमान विद्या (एअरोनॉटिकल इंजिनिअरिंग) हा विषय घेतला. संपूर्ण कॉलेजात ७ मुली आणि विमान विद्या शिकणारी कल्पना एकटीच मुख्याध्यापकांनीसुध्दा हा विषय घेऊ नको नोकरी मिळणार नाही म्हणून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण कल्पना निर्णयावर ठाम होती कॉलेजात कल्पना अतिशय चमकली. कितीही चांगले मार्क मिळाले तरी अजून जास्त का नाहीत म्हणून ती बैचेन व्हायची कॉलेजमध्ये विमानासंबंधीची अनेक पुस्तके वाचून काढली अभ्यासाव्यतिरिक्त तिने अग्निबाण, अंतराळ विषयक अनेक ग्रंथ धुंडाळले



व ज्ञान अद्ययावत ठेवले कॉलेजमध्ये एका मैत्रिणीची फी ती कोणताही गाजावाजा न करता भरत असे . शेवटच्या वर्षात असतानाच उचशिक्षणासाठी अमेरिकेत जाण्याचे तिने ठरविले तिच्या धडपडीला यश आले. तिला १९८२ मध्ये टेक्सासमधील आर्लिंग्टन विद्यापीठात शिष्यवृत्तीसह प्रवेश मिळाला. पंजाब विद्यापीठात ती तिसरी आली विमान विद्येत पदवी मिळविणारी पहिली पंजाबमधली मुलगी ठरली

वडील व्यवसायात ओढतील या भीतीने ती सुट्टीमध्ये कर्नालला परतलीच नाही. मोठया पगाराच्या नोकऱ्या झिडकारुन स्वत:च्या कॉलेजात प्राध्यापक झाली. अमेरिकेत पोहोचायला अवकाश होता तो पर्यंत या विषयाचा खूप अभ्यास करता यावा हा हेतू होता.

अखेर सप्टेंबर १९८२ मध्ये घरच्यांचा थोडा विरोध पत्करुन कल्पना आर्लिंग्टनला पोहोचली वसतीगृहात जॉन पिअरे हॅरीसन नावाच्या तरुणाची पहिल्याच दिवशी ओळख झाली. हा हवाई उड्डाणाचा मार्गदर्शक होता. अधिकाधिक विमानोड्डाण करायचे, हवाई कसरती करायच्या यासाठी तर कल्पना संधीची वाट पहात होती. दुसऱ्याच दिवशी दोन्ही अर्थाने कल्पना हवेत तरंगु लागली. जीन विमानोड्डाणाचा मार्गदर्शन होता होता तिच्या जीवनाचा मार्गदर्शक झाला. डिसेंबर १९८३ मध्ये दोघांनी विवाहाचा निर्णय घेतला.

कल्पना अतिशय हुशार होती. १९८४ साली तिने विमान विद्येतील एम.एस. ही उच्च पदवी संपादन केली. अजूनपुढे ही तिची लहानपणापासून वृत्ती होती. १९८८ साली ती या विषयातील डॉक्टरेट झाली. एअरोनॉटिक्स मुळातच अवघड विषय हा अभ्यास करणाऱ्या मुली अमेरिकेतसुध्दा हाताच्या बोटावर मोजता येणाऱ्या, त्यामूळे तिच्या पी.एच.डी. चे अमेरिकेत खूप कौतुक झाले. मोठमोठ्या कंपन्यांनी तिला लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या देऊ केल्या पण तिचे ध्येय होते अंतराळ. १९९३ मध्ये नासासाठी काम करणाऱ्या एका मोठ्या कंपनीने तिची संशोधक व उपाध्यक्ष म्हणून निवड केली. नासा ही अमेरिकेची अंतराळ संशोधन करणारी सर्वात मोठी संस्था १९९४ मध्ये अनेक स्पर्धकातून कल्पनाची नासाने निवड

केली. १९७५ पासून रीतसर अंतराळवीर प्रशिक्षणासाठी तिला बोलावण्यात आले जगातल्या अत्यंत कठीण परीक्षेतील ती परीक्षा पण कल्पनाने सहजपणे सर्व टप्पे पार केले मनाचा व शरीराचा खंबीरपणा एकांतात काम करण्याची सवय कोणत्याही कठीण परिस्थितीला संकटाला न डगमगता चटकन् निर्णय घेण्याची क्षमता या सर्व गोष्टी कल्पनाने सिध्द केल्या. २-२ दिवस पाण्याखाली प्रशिक्षण चाले. कधी विमानातून उंचावरुन पॅराशूटने खाली यावे लागे. कधी एकांतात राहून प्रचंड आवाज, प्रखर रंगीबेरंगी प्रकाश सहन करावालागे. कधी गोल गोल पाळण्यातून उभे आडवे तिरके कसेही फिरवले जाई. अशावेळी हृदय मेंदू पूर्ण क्षमतेने काम करतात का नाही तपासले जाई. दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर कल्पना या सर्व दिव्यातून पार पडली आणि तो भाग्याचा दिवस उजाडला.

१९ नोव्हेंबर १९९७ रोजी होणाऱ्या अंतराळ मोहीमेसाठी तिची कोलंबिया यानाची 'मिशन स्पेशालिस्ट' म्हणून निवड करण्यात आली तिचा आनंद गगनात मावेना. ३५ वर्षे उरात साठविलेले स्वप्न साकार झाले होते.

सुमारे ७० मीटर उंचीच्या व शेकडो टन वजन असलेल्या कोलंबिया यानाने १९ नोव्हें. १९९७ रोजी अंतराळात यशस्वी झेप घेतली. कल्पनासह ७ अंतराळवीर यानात होते. ८ कि.मी. म्हणजे ताशी जवळजवळ २८,००० कि.मी. झाला. ९-१० मिनिटातच यान ६०० कि. मी. अंतरावरून पृथ्वी प्रदक्षिणा करु लागले. योग्य वेळ येताच कोलंबियाने अंतराळात पूर्वीपासून असलेल्या स्पेस स्टेशनकडे अंतराळ स्थानाकडे झेप घेतली पुढे १६ दिवस कल्पना व तिच्या सहकाऱ्यांनी अनेक महत्वाचे प्रयोग केले अंतराळात बाहेर येऊन कल्पनाने एक उपग्रह सोडला अंतराळात थोडा मोकळा वेळ मिळाला की ती पृथ्वीकडे नजर टाके. आपला भारत देश हिमालय पर्वत छोटेसे गाव शोधू लागे पंतप्रधान तिच्याशी बोलले. तिच्या कॉलेजातल्या मित्र मैत्रिणी गुरुजन, यांच्याशीही बातचीत झाली. साऱ्या भारतात कल्पनाचे नाव घुमू लागले कर्नाल गावाने ५ डिसेंबरला तिच्या पृथ्वीवर परतण्याच्या दिवशी तर दिवाळी साजरी केली. कल्पनाचे भारतभूमीवर अतिशय प्रेम होते. अमेरिकन माणसाबरोबर लग्न केले तरी आपले कल्पना चावला नाव कायम ठेवले. K.C. नावानेच ती ओळखली जायची आईने लहानपणी केलेले संस्कार तिने आयुष्यभर जपले. गीतेमधील एक तरी श्लोक वाचल्याशिवाय ती झोपत नसे.



अंतराळातदेखील गीता घेऊन गेली होती. घरातल्या मंडळीप्रमाणेच ती पूर्ण शाकाहारी होती नवऱ्याला शाकाहारी बिर्याणी करायला तिने शिकविले होते. अत्यंत साधी रहाणी,सर्वा मध्ये सहजतेने मिसळणारी, रस्त्यावर अगदी सहजपणे खरेदी करत हिंडणारे ! कल्पना कोणाला सांगून देखील खर वाटणार नाही की ही भारतातील पहिली अंतराळ बाला कुठेही गर्व नाही ताठपणा नाही. लहान मुलांच्यात रमेल. मित्रमंडळीत रमेल. पण नासात आल्यावर तितक्याच कठोरपणे प्रशिक्षणाला सामोरी जाई. या साऱ्या गुणांमुळेच कल्पनाची कोलंबियाच्या दुसऱ्या उड्डाणासाठी पुन्हा निवड झाली. फार थोडे वीर अशा धोकादायक कामासाठी पुन्हा जायला तयार होतात. पण कल्पनाने लगेच होकार दिला १६ जानेवारी २००३ या दिवशी पुन्हा एकदा सहा साथीदारांसह अंतराळात झेपावली या वेळेस अनेक कठीण पण मानवजातीला भविष्यात उपकारक ठरतील असे प्रयोग होते. बहुतेक सर्व प्रयोगांची निरीक्षणे निष्कर्ष

कल्पनाने नासाकडे पाठविले नासातले अधिकारी तिच्यावर अत्यंत खूष होते.

१ फेब्रुवारी २००३ सर्व अंतराळवीर आणि कल्पना सर्व मोहिम ठरल्याप्रमाणे पार पडल्यामूळे आनंदात होते पृथ्वीकडे परतीची वेळ झाली अमेरिकन वेळेप्रमाणे सकाळी ९ वाजून १६ मिनिटांनी यान उतरणार होते. यानाने पृथ्वीपासून ६० कि.मी. उंचीवर वातावरणात प्रवेश केला. १६ मिनिटे बाकी होती. सारे शास्त्रज्ञ श्वास रोखून यानाचा वेध घेत होते. भारतात रात्रीचे ८ वाजले होते. सारेजण कल्पनाच्या सुखरुप आगमनासाठी प्रार्थना करत होते. अन अचानक आकाशात आगीचा प्रचंड लोळ दिसू लागला. काही कळायच्या आतच यानाचे तुकडे तुकडे झाले. कल्पनासह सातही अंतराळवीरांची शरीरे काळी टिक्कर कोळसा होऊन खाली कोसळली २-४ मिनिटातच टेक्सासच्या वाळवंटात यानाचे हजारों तुकडे विखरले गेले यानाचे उष्णतेपासून संरक्षण करणाऱ्या विटातील एक वीट केव्हातरी कोसळली होती. हवेच्या घर्षणामूळे यानाचे तापमान १२०० से. पर्यंत वाढले अन् नियतीने डाव साधला. चांदण्यांकडे झेपावणारी चांदणी-कल्पना आपल्या सगळ्यांच्या कल्पना शक्तीच्या पलीकडे दूर दूर निघून गेली.

भारत सरकारने तिच्या स्मरणार्थ एका उपग्रहाला कल्पना ! उपग्रह नाव दिले आहे.

कल्पना जळून गेली असेल शरीराने पण कोटी कोटी भारत वासीयांच्या हृदयात तिची तेजस्वी ज्योत कायमची तेवत राहील.





# शुरवीर सैनिक भारताचा



सैनिक राजा तूज जायचे पुढे
तुझ्याच शौर्याने देशाचे भविष्य घडे

सीमेवरती झोंबतो तूज गार गार वारा
हिमाचाही येतो तिथे खाली खाली पारा
पावसाचाही होतो तुजवरी हा मारा
परी तुझे पाऊल ना अडे...

सीमेवरी करिसी तू जागता पहारा
शत्रूला ना देशी जरा सुद्धा तू थारा
शत्रूमध्ये आहे तुझाच रे दरारा
शेजारी असे रे शत्रू राष्ट्र हे खडे

महान कार्य तुझे सीमा रक्षणाचे
दुजे कार्य तुझे जन रक्षणाचे
सुपुत्र तुम्ही या भारतमातेचे
छालीवरी तुझ्या शौर्यपदक हे जडे ...

तव बलिदानाचे गिरवू आम्ही धडे
निर्मितील त्यातूनी लष्करी अधिकारी बडे
सांडतील शत्रू रक्ताचे ते सडे
भारत एकता शौर्य दर्शन जगासी घडे.....

**कवी : दत्ता गांधी** खेतवाडी, मुंबई

जीवनामध्ये प्रत्येकाला यशस्वी व्हावंस वाटत आणि यशस्वी होण्यासाठी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे आत्मविश्वास होय. यश हे एका रात्रीत कधीच प्राप्त होत नाही त्यासाठी वर्षानुवर्षे जिद्दीने व चिकाटीने अविश्रांत धडपड करावी लागते. त्याचबरोबर मनी जबरदस्त आत्मविश्वास बाळगावा लागतो. आत्मविश्वास ही अशी गोष्ट आहे जी येणाऱ्या प्रत्येक संकटावर मात करण्याचे सामर्थ्य देते.

सर्वप्रथम आपण आपल्या जीवनातील ध्येय नक्की केलं पाहिजे. ध्येय हे योग्य असावं आणि मग ध्येयाकडे जाणाऱ्या पायऱ्या ठरवाव्यात. ध्येयाकडे जाणाऱ्या पायऱ्यांना उद्दिष्टे असे म्हणतात. ह्या पायऱ्या आत्मविश्वासाने चढण्याचा प्रयत्न केला की हळूहळू आपण आपल्या ध्येयाकडे वाटचाल करु लागतो. हा प्रवास करत असतांना अनेक वादळे येतील. संकट येतील. त्या वादळांना थोपविण्याचं त्या संकटांना दोन हात करण्याच सामर्थ्य अंगी बाळगलं पाहिजे. आणि हे सामर्थ्य आत्मविश्वास आणि प्रयत्नांतून येत असते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे बाबा आमट



बाबांचे मूळ नाव मुरलीधर देविदास आमटे. त्यांचा जन्म २६ डिसेंबर १९१४ रोजी वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे झाला. बाबांचे कुटुंब त्या भागातील जमीनदार कुटुंब होते. श्रीमंती परंपरागत आलेली होती. साहजिकच बाबांचे लहानपण अतिशय ऐश्वर्यात गेले. कॉलेजच्या दिवसांत बाबांनी अख्ख्या भारताची परिक्रमा केली. रवींद्रनाथांच्या संगीत आणि कवितांनी प्रभावित झालेल्या बाबांनी त्यांच्या शांतीनिकेतनलाही भेट दिली. टागोरांचा बाबांवर प्रभाव होता तितकाच प्रभाव महात्मा गांधी आणि साने गुरुजींचाही बाबांवर पडला होता.

अशा वातावरणातूनच मोठे झालेल्या बाबांनी वरोरा येथे वकिली सुरु केली. ती दणकून चालायलाही लागली.आठवड्या अखेरीस ते आपली साडे चारशे एकर शेती बघायचे. दरम्यान बाबांनी वरोराचे उपनगराध्यक्ष पद भुषविले. प्रचंड पैसा मिळत होता. पण एवढे श्रीमंत असूनही बाबा आतमधून तितके सुखी नव्हते कारण आयुष्याला काहीतरी हेतू असावा तो त्यांना मिळाला नव्हता.

एकदा एका लग्नाला नागपूरला गेले असतांना त्यांनी इंदूला (साधनाताई) पाहिले आणि त्यांचे मनोमन प्रेम बसले. साधनाताईंनाही बाबा आवडले त्यांच्या घरच्यांच्या (साधनाताईंच्या) विरोधात जाऊन लग्न केले. लग्नानंतरही बाबांना आयुष्याचे ध्येय सापडत नव्हते एके दिवशी त्यांनी एक कुष्ठरोगी पाहिला. हातपाय झडलेले, भर पावसात भिजत असलेला तो माणूस पाहिला आणि ते भयंकर घाबरले आणि हाच त्यांच्या आयुष्यातील महत्वाचा क्षण ठरला. ह्याच क्षणापासून त्यांच्या आयुष्याने वेगळे वळण घेतले. पुन्हा परतून त्यांनी त्या माणसाची सेवा केली. पण तो जगला नाही. पुढचे सहा महिने ह्याच उलघालीत गेलेल्या बाबांनी अखेर कुष्ठरोग्यांसाठी काम करण्याचे ठरविले आणि पत्नी साधनानेही त्यांना या निर्णयात साथ दिली. त्यानंतर त्यांनी आनंदवन उभारले.

बाबांच्या आयुष्यातील त्या महत्वाच्या वळणापासून बाबांना ध्येय मिळाले. ध्येय अवघड आहे याची त्यांना जाण होती. तरीही त्यांनी कशाचीही पर्वा न करता कुष्ठरोग्यांची सेवा करत राहिले.

बाबा आमटे यांच्यासारखी अनेक उदाहरणे आहेत ज्यांनी शुन्यातून विश्व निर्माण केलं. रतन टाटा, धीरुभाई अंबानी, सिंधुताई सपकाळ इ. नी आपली ध्येय गाठली. मनामध्ये आत्मविश्वास असल्यास यशाच्या शिखरावर पोहचण्यास जास्त काळ लागत नाही. हा प्रवास करत असतांना जरी अपयश पदरी आल तरी अपयशाने खचून न जाता, निराश न होता आत्मविश्वासाने जिद्दीने व चिकाटीने प्रयत्न करत रहायचा. आत्मविश्वासाने व प्रयत्नाने आपण यश संपादन करु शकतो. कारण आत्मविश्वास हा अडीअडचणींतून मार्ग काढायला शिकवितो.

जीवनातील ध्येय, उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जी साधने लागतात ती प्राप्त करण्याचे सामर्थ्य फक्त आत्मविश्वासामध्ये आहे. आत्मविश्वासाचा परिस लाभल्यावर असाध्य असं काहीच राहत नाही. आत्मविश्वास हा सर्व वयोगटातील मुला–मुलींमध्ये, स्त्री–पुरुषांमध्ये असतो आणि तो असलाच पाहिजे . खास करुन विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्या भविष्यासाठी आत्मविश्वास गरजेचा आहे. अभ्यास, क्रीडास्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम अथवा इतर कोणत्याही कार्याची पुर्तता करण्यासाठी अंगी जबरदस्त आत्मविश्वास असावा लागतो विद्यार्थीदशा ही अशी अवस्था आहे ज्यावर भविष्य

अवलंबून असते. म्हणून विद्यार्थ्यांमध्ये दृढ आत्मविश्वास असला पाहिजे. सर्वगुणसंपन्न असून देखील जर आत्मविश्वास नसेल तर व्यक्ती बावचळल्यागत करते. काय करावे व काय करु नये हेच कळत नाही. गोंधळ निर्माण होतो. समजा एखादा वक्ता भाषण करण्यासाठी उभा आहे. सर्व काही तयारी झालेली आहे. कोणत्या विषयावर बोलायचे आहे ? काय-काय बोलायचे आहे ? कोणकोणते मुद्दे मांडायचे आहे ? सर्व काही ज्ञात आहे पण .... पण जर त्या व्यक्तीमध्ये आत्मविश्वास नसेल तर ती व्यक्ती भाषण करु शकेल ? आणि जरी भाषण केलं तरी त्यामध्ये ते पुर्णत्व, ते सुख, ते समाधान, तो आनंद असूच शकत नाही.




सर्वप्रथम आपण स्वत:वर विश्वास ठेवला पाहिजे. आपल्या विश्वासावर विश्वास ठेवला पाहिजे. आपल्याला आपल्या ध्येयाची प्रतिमा दिसू लागेल. आपण अधिक चिकाटीने प्रयत्न करु. स्वप्नांचा, इच्छांचा आणि कल्पना शक्तीचा विस्तार होईल अंगी एक नवशक्ती नवचैतन्य निर्माण होईल जी येणाऱ्या प्रत्येक संकटांना सामोरे जाण्याची शक्ती देते. कार्य करण्यासाठी हुरुप येतो.


कोणतेही कार्य सहज पूर्ण होत नाही. आत्मविश्वास असेल तर महान कार्याची पुर्तता होते. कर्तव्य कोणतेही असो त्याची उपेक्षा करु नये. कोणत्याही कामाला हलके समजून त्याकडे दुर्लक्ष करु नये. कोणी हलक्या स्वरुपाच काम करत असेल तर त्याकडे पाहून हसू नये. याउलट ती व्यक्ती ते काम कोणत्या कौशल्याने करत आहे याच निरीक्षण करावे. त्याचा प्रयत्न त्याचा विश्वास पहावा तेच काम जर आपण केलं तर ते कोणत्या प्रकारे आणि कोणत्या कौशल्याने करु याचा विचार करावा. समोर असलेलं काम आपण पुर्ण करु की नाही या भितीने झुरण्यापेक्षा विश्वासाने त्या कार्यास सुरुवात करावी आपला स्वत:वरील विश्वास म्हणजेच सृष्टीतील शक्तींवरचा विश्वास होय आपला विश्वास प्रयत्न, कौशल्य, जिद्द व परिश्रम या सर्वांमिळून ते कार्य सिद्धीस जाते.

महापुरुषांची चरित्रे वाचतांना आपणास कळते की, त्यांनी त्यांच्या उमेदीच्या काळात फार संघर्ष केला अथक परिश्रम घेतले. अहोरात्र मेहनत घेतली. म्हणून ते महान झाले. यावरुनच असे कळते की विद्यार्थीदशा आणि त्यानंतरचा काही काळ हा उमेदिचा काळ असतो. त्यातच आपण खुप परिश्रम घ्यायचे असतत. अभ्यास करायचा असतो. सतत चालायचे असते. उमेदीच्या काळात माणूस अधिक कष्ट करु शकतो आणि त्याने ते केलेच पाहिजे तरच पुढे भविष्य उज्वल होऊ शकते. गेलेली वेळ पुन्हा येत नसते. वेळेचे नियोजन करावे. मनी न्यूनगंड बाळगून माघार घेण्यापेक्षा रणांगणात एकदा उतरुन पहावे. लढून पहावे. हार होईल. अपयश येईल पण त्यातून खुप काही शिकता येते आणि पुन्हा नव्याने सुरुवात करता येते.

आजच्या पिढीजवळ सर्व सुखसोई उपलब्ध आहे. दळणवळणाची साधने मुबलक आहे. तरीही व्यक्ती आपल्या आयुष्यात काही विशेष अस करु शकत नाही. त्याच कारण आत्मविश्वासाचा अभाव आहे. आत्मशक्ती म्हणजेच जगण्याची शक्ती आहे. आत्मविश्वासाने आणि प्रयत्नाने मिळवलेल्या यशाचा सुगंध हा वेगळाच असतो. म्हणून प्रत्येकाने आपल्यातील आत्मविश्वास जागा केला पाहिजे. आत्मविश्वासाने प्रयत्न करत राहिले पाहिजे. आत्मविश्वास ही यशाची गुरुकिल्ली आहे.

**लेखक : शंकर गोपाळे** (राजगुरुनगर)

घ्या एक ठाम निर्णय जो बदलेल तुमचे जीवन माझा जन्मच विजयासाठी झाला आहे मी एक योध्दा आहे.
संकटाची भीती नाही मला एव्हरेस्ट गाठायचे आहे. जन्माबरोबर सुरु झालेली स्पर्धा अखेरच्या क्षणापर्यंत चालणारच
व्यक्ती म्हणून सर्वच जगतात. स्वत:साठी सर्वच जगतात. मी माझ्या आणि इतरांच्या स्वप्नासाठी जगेन
मी जिंकायचे म्हणून जगणार ।।
मी माझ्या जीवनाचे सार्थक करणार. मी यशाचे शिखर गाठणारच . मी माझे स्वप्न साकार करणारच


ask chanakya

# चाणक्याचे १५ महान विचार

- इतरांच्या चुकां पासून शिका व त्यांना आत्मसात करा. तरच तुम्ही सुंदर आयुष्य जगू शकाल.
- व्यक्तीने कधीही जास्त प्रामाणिक नसावे. कारण ताठ उभी झाडे पहिल्यांदा कापली जातात, तसेच प्रामाणिक व्यक्ती पहिल्यांदा पेचात सापडली जाते
- साप विषारी नसला तरी चालेल, पण त्याने विषारी असल्याचे ढोंग तरी करायला हवे.
- प्रत्येक मैत्रीमध्ये स्वतःचा स्वार्थ पाहिला जातो. कोणाचीही मैत्री ही स्वार्थाशिवाय नसते. हे एक कटू सत्य आहे.
- कोणलेही काम सुरु करण्याच्या अगोदर स्वतःला तीन प्रश्न विचारा. हे मी का करतोय ? त्याचा निकाल (परिणाम) काय असेल ? यामध्ये मला यश मिळेल का ? जर तुम्ही खोलवर विचार करुन तुम्हाला त्याची समाधानकारक उत्तरे मिळाली तर ते काम करा.
- जर तुमची भीती तुमच्या मनामध्ये प्रवेश करत असेल. तर त्यावर हल्ला करुन त्याचा विनाश करा.
- जगातील सर्वात मोठ्या शक्ती युवक व स्त्रीचे सौंदर्य.
- ज्यावेळी तुम्ही एखादे काम सुरु करता तेव्हा त्याच्या अपयशाचा विचार करुन ते मधून सोडून देवू नका. जे लोक प्रामाणिकपणे काम करतात, ते लोक आनंदी असतात.
- फुलांचा सुगंध हा वारा ज्या दिशेला वाहतो, त्याच दिशेला पसरतो. परंतू एखाद्या व्यक्तीची किर्ती ही चोहोबाजूंना पसरते
- देव हा मूर्तीमध्ये नसतो. तुमच्या भावना हाच देव आहे व तुमचा आत्मा हे त्याचे मंदिर आहे.
- माणूस हा त्याच्या कर्तृत्वाने मोठा होतो, त्याच्या जन्माने नाही.
- तुमच्या सामाजिक दर्जाच्या खाली किंवा वर असलेले लोक मित्र बनवू नका अशाप्रकारचे लोक तुम्हाला कोणत्याही प्रकारचा आनंद देवू शकत नाही.
- तुमच्या लहान मुलाला पहिल्या पाच वर्षात प्रेमाने वागवा, नंतरच्या पाच वर्षात त्याच्याशी खडसावून बोला. जेव्हा तो वर्षाचा होईल, तेव्हा त्याच्यासोबत मित्राप्रमाणे वागा. वाढणारे तुमचे मुल हे तुमचे सर्वात चांगला मित्र असेल.
- पुस्तके मुर्ख लोकांना अशाप्रकारे उपयोगी वाटतात जसे, आंधळ्या व्यक्तीला आरसा.
- शिक्षण हे सर्वात चांगला मित्र आहे. सुशिक्षित व्यक्तीला सगळीकडे आदर दिला जातो. शिक्षण हे सौंदर्य व तारुण्याचा पराभव करते.

# * चाकण पोलीस स्टेशन वाहतुक सुरक्षा अभियान *



चाकण पोलीस स्टेशनच्या वतीने महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत श्री शिवाजी विद्यामंदिर चाकण येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

# * वाहतूक सिग्नलमधील दिवे *



**समयसूचक दिवा**

सिग्नल किती वेळेचा आहे हे दर्शविण्यासाठी जेणेकरून वाहन चालकांना इंधन बचत व प्रदूषण कमी करता येईल.

**लाल दिवा**

थांबा

**पिवळा दिवा**

थांबा किंवा थांबारेषा ओलांडली असल्यास पुढे जा.

**हिरवा दिवा**

पहा व सुरक्षितपणे पुढे जा.

**लाल दिवा**

पादचाऱ्यांना थांबण्याचा इशारा

**हिरवा दिवा**

पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्याचा इशारा

**Flashing Red Light**

**सतत लुकलुकणारा लाल दिवा**

अशा ठिकाणी वाहन प्रथम थांबवावे. वाहतूकीमधील वाहने आणि पादचारी यांना जाण्यास प्राधान्य द्यावे त्यानंतरच पुढे जावे.

**Flashing Amber Yellow Light**

**सतत लुकलुकणारा पिवळा (अंबर) दिवा**

अशा ठिकाणी वेग कमी करुन काळजीपूर्वक पुढे जावे.

# ※ वाहतूक पोलीसांचे हातांचे इशारे (सिग्नल) ※

वाहतूक नियंत्रण करणे कामी पोलीस कर्मचाऱ्याने हाताने करावयाच्या इशाऱ्याचे (ट्रॅफिक सिग्नलचे) एकूण नऊ प्रकार आहेत. त्यामध्ये १ ते ६ हे वाहतूक थांबविण्यासाठी व ७ ते ९ हे वाहतूक बोलविण्यासाठी आहेत.

## अ) थांबविण्याचे इशारे (स्टॉप सिग्नल)




### ※ इशारा क्र. १

आपल्या पाठीमागून येणारी वाहतूक थांबविण्यासाठी इशारा क्र. १ चा उपयोग केला जातो.

**कृती :**

इशारा करणाऱ्याने मागून येणारी वाहतूक थांबविण्यासाठी आपला डावा हात खांद्यापासून आडवा, जमिनीला समांतर असा लांब करावा. हाताचा तळवा पुढील बाजूस असावा.




### ※ इशारा क्र. २

आपल्या समोरुन येणारी वाहतूक थांबविण्यासाठी इशारा क्र. २ चा उपयोग केला जातो.

**कृती :**

इशारा करणाऱ्याने समोरुन येणारी वाहतूक थांबविण्यासाठी उजवा हात डोक्याच्या वर, थोडासा पुढच्या दिशेने उंचवावा; बोटे चिकटलेली आणि तळवा समोरुन येणाऱ्या रहदारीकडे असावा. येईल जेव्हा शाळा । अतिवेग टाळा ।। जाऊ द्या बाळा । असू द्या कळवळा ।। आमचे जीवन सेवेसाठी




### ※ इशारा क्र. ३

आपल्या पाठीमागून येणारी व समोरुन येणारी वाहतूक एकाच वेळी थांबवण्यासाठी इशारा क्र. ३ चा उपयोग केला जातो.

**कृती :**

इशारा करणाऱ्याने इशारा क्र. १ व इशारा क्र. २ ची कृती क्रमवार करुन मागून व समोरुन येणारी वाहने थांबविण्यासाठी हाताचे इशारे करावेत.



### ※ इशारा क्र. ४ (अ)

आपल्या डावीकडून येणारी वाहतूक जर त्याच्या उजव्या बाजूस वळू इच्छित असेल तर त्यांना हळूवार इशारे (स्लो डाऊन) करुन थांबविण्यासाठी इशारा क्र. ४ अ चा उपयोग केला जातो.

**कृती :**

इशारा करणाऱ्याने डावीकडून येणारी व उजवीकडे वळणारी रहदारी थांबविण्यासाठी आपला डावा हात खांद्यापासून आडवा, जमिनीला समांतर असा लांब करावा व उजव्या हाताने येणाऱ्या वाहतुकीस हळुवारपणे थांबण्याचा इशारा करावा.




### ※ इशारा क्र. ४ (ब)

आपल्या उजवीकडून येणारी वाहतूक थांबविण्यासाठी व त्याचवेळी इशारा क्र. ४ अ ने थांबविलेली वाहतूक त्यांच्या उजव्या बाजूस जाण्यास मोकळीक देण्यासाठी इशारा क्र. ४ (ब) चा उपयोग केला जातो.

**कृती :**

इशारा करणाऱ्याने डावीकडून येणाऱ्या रहदारीला उजवीकडे वळता यावे यासाठी उजवीकडून येणारी रहदारी थांबविण्यासाठी इशारा क्र. ३ करुन उजवा हात समोरुन घड्याळाच्या विरुध्द दिशेने फिरवून उजव्या बाजूने येणाऱ्या रहदारीस थांबण्याचा इशारा करावा.



**❊ इशारा क्र. ५**

आपल्या डावीकडून येणारी वाहतूक थांबविण्यासाठी व त्याचवेळी उजव्या बाजूने येणाऱ्या वाहतूकीस त्यांच्या उजव्या बाजूस जाण्यास मोकळीक देण्यासाठी इशारा क्र. ५ चा उपयोग केला जातो.

**कृती :**

इशारा करणाऱ्याने उजवीकडून येऊन उजवीकडे वळणाऱ्या रहदारीला जाऊ देण्यासाठी डावी कडील रहदारी थांबविण्यासाठी इशारा क्र. ३ करुन डावा हात डाव्या दिशेला उंच करुन डावीकडून येणारी रहदारी थांबविण्याचा इशारा करावा.




**❊ इशारा क्र. ६**

आपल्या चौकात सर्व बाजूने (डावीकडून, उजवीकडून, समोरुन, पाठीमागून) येणारी वाहतुक थांबविण्यासाठी व त्याचवेळी अत्यावश्यक सेवा असणाऱ्या वाहनांस (प्रमुख व्यक्तिंचा वाहन ताफा, रुग्णवाहिका, अग्निशमन दल, प्रेतयात्रा वगैरे.) मोकळीक देण्यासाठी इशारा क्र. ६ चा उपयोग केला जातो.

**कृती :**

इशारा करणाऱ्याने सर्व बाजूनी येणारी रहदारी बंद करण्यासाठी दोन्हीहात उंचावून हाताचे दोन्ही तळवे बाहेरील बाजूस करुन चारही दिशेस इशारे करावेत.

## ब) मोकळीक करण्याचे इशारे (ओपन सिग्नल)



**❊ इशारा क्र. ७**

आपल्या डावीकडून येणारी वाहतूक बोलविण्यासाठी इशारा क्र. ७ चा उपयोग केला जातो. (इशारा क्र. ५ ने थांबविलेल्या वाहतूकीस मोकळीक करण्यासाठी)

**कृती :**

इशारा करणाऱ्याने डावीकडून येणाऱ्या रहदारीस पुढे बोलविण्यासाठी इशारा क्र. ३ करुन डाव्या हाताने डावीकडून येणारी रहदारी बोलविण्यासाठी डावा हात कोपरातून वाकवून छातीसमोर आणून परत त्याचठिकाणी ने-आण करण्याची कृती करावी.




**❊ इशारा क्र. ८**

आपल्या उजवीकडून येणारी वाहतूक आपल्या समोरुन बोलविण्यासाठी इशारा क्र. ८ (अ) चा उपयोग केला जातो. (इशारा क्र. ४ (ब) ने थांबविलेल्या वाहतूकीस मोकळीक करण्यासाठी)

**कृती :**

इशारा करणाऱ्याने उजवीकडून येणाऱ्या रहदारीस आपल्या समोरुन बोलविण्यासती इशारा क्र.३ करुन उजवा हात घड्याळाच्या विरुद्ध दिशेने फिरवून कोपरात वाकवून छातीसमोर आणावा.




**❊ इशारा क्र. ८ (ब)**

आपल्या उजवीकडून येणारी वाहतूक आपल्या पाठीमागून बोलविण्यासाती इशारा क्र. ८ (ब) चा उपयोग केला जातो. (इशारा क्र. ४ (ब) ने थांबविलेल्या वाहतूकीस मोकळीक करण्यासाठी)

**कृती :**

इशारा करणाऱ्याने उजवीकडून येणाऱ्या रहदारीस आपल्या पाठीमागून बोलविण्यासाठी इशारा क्र. ३ करुन उजवा हात घड्याळाच्या विरुध्द दिशेने फिरवून कोपरात वाकवून मानेच्या मागील बाजूस आणावा.



**❊ इशारा क्र. ९**

आपल्या समोरुन येणारी वाहतूक बोलविण्यासाठी इशारा क्र. ९ चा उपयोग केला जातो. (इशारा क्र. २ ने थांबविलेल्या वाहतूकीस मोकळीक करण्यासाठी.)

**कृती :**

इशारा करणाऱ्याने समोरुन येणाऱ्या रहदारीस बोलविण्यासाठी उजवा हात व उजवा पाय पुढे करुन उजवा हात कोपरात वाकवून आपल्याकडे बोलविण्याचे इशारे करावेत.

# * सर्वसाधारण सूचना *



* स्वत:च्या सुरक्षिततेसाठी फूटपाथवरुन चाला.
* रमत गमत, गप्पा मारीत, विचारांचे तंद्रीत अगर जाहिराती पाहात रस्ता ओलांडू नका.
* वाहनांचे मधून तिरकस नागमोडी वळण घेत रस्ता ओलांडू नका.
* पादचारी मार्ग दाखविले असतील तेथे रस्ता ओलांडा.
* फुटपाथवरुन रस्त्याच्या मध्ये अगर चौकाचे कॉर्नरवर गप्पा मारत थांबू नका.
* लहान मुले, वृध्द, अपंग, अंध यांना रस्ता ओलांडण्यासाठी मदत करा.
* कोणत्याही वाहनाच्या डाव्या बाजूच्या दरवाज्यानेच उतरा.



* रिक्षा टॅक्सीसारख्या वाहनास चौकात अगर रस्त्याच्या मध्यभागी उभे राहून इशारे करु नका,
* अपघाताचे ठिकाणी घोळका करुन थांबू नका. त्यावेळी वैद्यकीय मदत लवकर मिळेल याची तजवीज करा.
* तुमचे डोळे झाकले जातील अगर पुढील लांब पर्यंतचे दिसणार नाही अशी छत्री अगर बोजा घेऊन चालू नका.
* रस्त्यात केळीची साले टाकू नका. कोणी टाकली असतील तर ती उचलून कचरा पेटीत टाका व संभाव्य अपघात टाळा.
* रस्ता आपल्या एकट्यासाठीच आहे अशा अविर्भावात चालू नका.

# * पादचाऱ्यांना आवाहन *




* थांबा, पहा आणि मगच रस्ता ओलांडा या ३ मंत्राचे कृपया पालन करा.
* कृपया फूटपाथचा वापर करा.
* फूटपाथ नसल्यास रस्त्याच्या उजव्या बाजूने चाला.
* अर्धे-मधे रस्ता ओलांडू नका. झेब्रा क्रॉसिंगवरुनच रस्ता ओलांडा.
* रस्ता ओलांडताना प्रथम उजवीकडे, नंतर डावीकडे पाहून वाहन येत नाही याची खात्री करुन मगच रस्ता ओलांडा.
* रस्ता ओलांडताना अचानक वाहन आल्यास गडबडून न जाता जागेवरच थांबा.
* रस्ता ओलांडताना दोन्ही बाजूंच्या वाहनांच्या नजरेत स्पष्ट याल अशा ठिकाणीच रस्ता ओलांडा.
* फूटपाथ व रस्त्याच्यामध्ये लावलेल्या रेलींग्जवर कधीही उड्या मारुन ओलांडण्याचा प्रयत्न करु नये. तसेच रस्त्यावर रेलींग्जच्या कडेला लागून चालू नये. समोरुन येणाऱ्या आगगाडीस पाहून रेल्वेलाईन ओलांडण्याइतके ते धोकादायक आहे.
* थांबलेल्या वाहनाच्या मागून किंवा पुढून रस्ता ओलांडू नका.
* लहान मुले, स्त्रिया, वृध्द, अपंग, अंध यांना रस्ता ओलांडण्यास मदत करा.
* दुर्दैवाने अपघात झाल्यास, अपघातग्रस्तांना त्वरीत मदत करा.



# * सायकलस्वरांना आवाहन *

* वाहतुकीचे नियम सायकलस्वारांना देखील लागू आहेत. कृपया त्याचे पालन करावे.
* आपल्या सायकलचे मागील मडगार्ड अर्धे पांढरे व अर्धे लाल रंगाने रंगवावे, तसेच मागील बाजूस तांबडा परावर्तक (रिफ्लेक्टर) बसवावा.
* सायकलचे दोन्ही ब्रेक सुस्थितीत व कार्यक्षम आहेत, याची खात्री करावी.
* आपल्या उंचीला योग्य अशीच सायकल वापरावी.
* सायकल सरळ रेषेत चालवावी. सायकल डाव्या कडेने चालवावी.
* वळण्यापूर्वी योग्य इशारा करावा.
* दोन किंवा अधिक सायकली समांतर चालवू नये.
* मोठ्या वाहनांच्या साखळीला धरुन सायकल चालवू नये.
* रात्री सायकलचा दिवा लावावा.
* सायकल थांबविताना दोन्ही ब्रेकचा वापर करावा.



**मनाचा ब्रेक .... उत्तम ब्रेक**

# चाकण पोलीस स्टेशन अंकीत

# महिला दक्षता कमिटी चाकण






महिला दक्षता कमिटीच्या विविध सामाजिक उपक्रमांतील संस्मरणीय क्षण ...



सुर्याच्या तिरप्या किरणात आपल्या
अलौकिक सौंदर्याने तळपणारा ताजमहाल
राजे मंत्रमुग्ध होऊन पाहत होते.
'आबासाहेब, आपण ही अशी इमारत बांधुया ना !'
राजांच्या शेजारी उभे असलेले संभाजीराजे म्हणाले.
बाळराजांच्या पाठीवर हात ठेवीत राजे म्हणाले,
'बाळराजे, अजुन तुम्ही लहान आहात.
लक्षात ठेवता आलं, तर ठेवा.
गादीवर येणारा प्रत्येक सम्राट आपलं
भव्य थडगं उभारण्यात आपली निम्मी
हयात खर्ची घालत असतो. आपल्या मागे
आपलं नांव रहावं, हीच त्यामागे उत्कट
इच्छा असते. बाळराजे, माणसानं जगात
येऊन असं कार्य करावं, की त्याला आपलं
नांव राखण्यासाठी थडगं बांधण्याची वेळ
येऊ नये. जीवन असं जगावं, की उज्वल
किर्तीचा दरवळ सदैव मागे रहावा.'



# बहुरंगी व्यक्तीमत्व...

# शरद पवार

# शरद पवार : संक्षिप्त जीवनपट

| | |
|---|---|
| १२ डिसेंबर १९४० | जन्म (काटेवाडी, ता.बारामती, जि.पुणे) |
| १९५४-५५ | शालेय शिक्षण - राजर्षी शाहू विद्यालय, बारामती |
| १९६२ | बी.कॉम. - बृहन्महाराष्ट्र कॉलेज, पुणे |
| १९६२ | युवक काँग्रेसमध्ये प्रवेश |
| १९६३ | पश्चिम महाराष्ट्र युवक काँग्रेसचे चिटणीस, चिनी आक्रमणाच्या वेळी नागरी समितीची धुरा सांभाळली. युनेस्कोचे आमंत्रण, आंतरराष्ट्रीय युवक परिषदेत सहभाग, जपान, अमेरिका, कॅनडा, इंग्लंड व जर्मनी या देशांतील युवक चळवळीचा अभ्यास केला. |
| १९६४ | महाराष्ट्र युवक काँग्रेसचे चिटणीस |
| १९६७ | बारामती मतदार संघातुन विधानसभेवर प्रथम निवड |
| १९७०-७२ | काँग्रेस फॉर सोशॅलिस्ट ॲक्शन या संघटनेच्या महाराष्ट्र शाखेचे अध्यक्ष |
| १९७२ | राज्यमंत्री - गृह, क्रीडा, राजशिष्टाचार, प्रसिध्दी, अन्न व नागरी पुरवठा |
| १९७४-७८ | मंत्री - शिक्षण व युवक कल्याण, कृषी, पाणलोट क्षेत्र, विकास व खार जमिनी, गृह व युवक सेवा, निवडणूकीनंतर उद्योग व कामगार मंत्री |
| जुलै ७८ ते फेब्रु. ८० | महाराष्ट्राचे पहिल्यांदा मुख्यमंत्री |
| १९८१ ते ८४ | महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते |
| १९८२ ते ८६ | अध्यक्ष- अखिल भारतीय काँग्रेस कमिटी (समाजवादी) |
| १९८४ | बारामती लोकसभा मतदार संघातुन खासदारपदी निवड |
| १९८५ | विधानसभा विरोधी पक्षनेते |
| २५ जून ८८ ते ४ मार्च १९९० | महाराष्ट्राचे दुसऱ्यांदा मुख्यमंत्री |
| मार्च १९९० ते जून १९९१ | महाराष्ट्राचे तिसऱ्यांदा मुख्यमंत्री |
| नोव्हेंबर १९९१ | मुख्यमंत्री पदाचा राजीनामा व बारामती लोकसभा मतदार संघातून खासदार |
| जून १९९१ ते मार्च ९३ | भारताचे संरक्षणमंत्री |
| ४ मार्च ९३ ते मार्च ९५ | महाराष्ट्राचे चौथ्यांदा मुख्यमंत्री |
| मार्च ९५ ते मे ९५ | महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते |
| मे १९९६ | पुन्हा खासदारपदी निवड |






# शरद पवार : संक्षिप्त जीवनपट

| | |
|---|---|
| १९ मार्च ९८ ते मे ९९ | लोकसभा विरोधी पक्षनेते |
| १० जून १९९९ | राष्ट्रवादी काँग्रेसपक्षाची स्थापना व राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड |
| मार्च २००१ | केंद्रीय आपत्कालीन व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष |
| नोव्हेंबर २००१ | मराठवाडा कृषी विद्यापीठाचा 'कृषीरत्न' किताब प्रदान |
| २००४ | केंद्रीय कृषीमंत्री |
| २००५ | भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे अध्यक्ष |
| २००७ | उत्कृष्ट संसदपटु म्हणून गौरव |
| २००९ | माढा लोकसभा मतदारसंघातुन लोकसभेवर निवड व केंद्रीय कृषिमंत्रीपदी दुसऱ्यांदा निवड. |
| अध्यक्ष | रयत शिक्षण संस्था, सातारा<br>नेहरु सेंटर, मुंबई<br>यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण, मुंबई<br>महाराष्ट्र कुस्तीगीर परिषद<br>मुंबई क्रिकेट असोसिएशन<br>विद्या प्रतिष्ठान, बारामती<br>कृषी विकास ट्रस्ट, बारामती<br>वसंतदादा पाटील शुगर इन्स्टिट्युट<br>भारतीय क्रिकेट नियामक मंडळ |
| संपुर्ण पत्ता | **पुणे** – २७०/सी, बारामती गेस्ट हाऊस,<br>गोखलेनगर, पुणे ४११०१६<br>फोन : ०२०- २५६५९१९१ / ९७९७<br>फॅक्स : ०२० – २५६७७७७<br><br>**नवी दिल्ली** – १२२, कृषी भवन, नवी दिल्ली ११०००१<br>फोन : ०११- २३३८३३७० / ८१६५<br>फॅक्स : ०११ – २३३८४१२९ |






आयुष्य एक समुद्र आहे
त्यात हे 'मी' नावाचं इवलसं 'तारु' !
तुम्ही माझ्या सारख्या अनंत तारुंना
योग्य दिशा दाखवलीत
म्हणूनच ...
तुम्ही आमचे मार्गदर्शक आहात,
दिपस्तंभ आहात !









जाणत्या राजाला जाणता राजाचं अभिवादन...



दररोज दिवसातील १८ तास कार्यमग्न ...



गुरु यशवंतराव चव्हाणांबरोबर हितगुज करताना ....



पत्नी प्रतिभाताईसमवेत एका कार्यक्रमातील सुखद क्षण



उपमुख्यमंत्री पुतणे अजितदादा पवार यांच्यासमवेत चर्चा करताना



बारामतीच्या खासदार सुकन्या सौ.सुप्रिया सुळे यांचे समवेत



शास्त्रज्ञ व मा.राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दूल कलाम साहेबांबरोबर चर्चा करताना



गाणसाम्राज्ञी लता मंगेशकर यांच्याबरोबर दिलखुलास गप्पा



मास्टर ब्लास्टर सचीन तेंडूलकर यांच्या बरोबर आनंदी क्षण



समाजसेविका मदर तेरेसा यांच्याबरोबर चर्चा करताना



संत गाडगेबाबा यांना अभिवादन करताना





संत साहित्यीक शिवशंकर महाराज यांच्याशी हितगुज करताना



अमेरीकेचे राष्ट्रपती बिल क्लिंटन यांच्या भारत भेटीतील एक क्षण



उद्योगपती रतन टाटा यांच्याबरोबर एक औद्योगिक भेट



जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती बील गेटस् यांच्या भारत भेटीचा एक क्षण




महानायक अमिताभ बच्चन यांच्या समवेत दिलखुलास गप्पा



ज्येष्ठ साहित्यीक व हास्यसम्राट पु.ल.देशपांडे यांच्या सोबत एक क्षण



संगीतकार पंडीत रवीशंकर यांचा गौरव करताना एक क्षण



थेट कार्यकर्त्यांशी संपर्क



संरक्षणमंत्री असताना सैन्यदलाचे मनोधैर्य वाढविण्यासाठी थेट सीमेवर...



गर्दी आणि शरद पवार हे जणू एक सुत्रच आहे ...

# परिपक्वतेचा परिस म्हणजे साहेब ... !



पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यात उदय पावलेले, मनाने फार मोठे असलेले व्यक्तीमत्व. पुण्यातील बी.एम.सी.सी. कॉलेजमधील निवडणुकीत पहिल्यांदा आपले राजकीय यशस्वी पदार्पण करणारे, महाराष्ट्र नावाचं राजकीय तारांगण पुर्ण प्रकाशमान करुन दिल्लीकडे झेपावलेला महाराष्ट्राचा विकाससुर्य ! असे सर्वार्थाने महाराष्ट्राचा स्वाभिमान व भुषण असणाऱ्या केंद्रिय कृषीमंत्री मा.ना. शरदचंद्रजी पवारसाहेब यांचा आज ७० वा जन्मदिवस, म्हणजेच एका अत्यंत खंबीर, धैर्यशाली, परिपक्व अशा जाणत्या राजाचा वाढदिवस !

राजा शिवछत्रपतीनंतर 'जाणता राजा' ही उपाधी जर जनतेने कोणाला बहाल केली असेल,तर ती फक्त आदरणीय लोकनेते शरदचंद्रजी पवारसाहेबांना ! राजेशाही संपली, पण राजे मात्र संपले नाहीत.त्यात काही फक्त नावाने राजा आहेत.तर काही स्वयंघोषीत राजे आहेत, तर काही राजेशाही थाटात वावरणारे आहेत, तर काही राजासारखी उधळपट्टी करून स्वत:च्याच मस्तीत मश्गुल राहणारे आहेत. राजे असंख्य आहेत; पण जाणता राजा आहे फक्त एक आणि एकच आणि ते म्हणजे केंद्रिय कृषिमंत्री शरदचंद्रजी पवार! तसे राज्यात घराघरात एक दादा आहे. पण दादा म्हणताच नजरेसमोर येतात ते फक्त अजितदादा. अगदी तसेच; पण घराघरांत अन राज्यातच काय तर संपुर्ण देशात राजा आणि राजे असंख्य असताना जाणता राजा शब्द उच्चारताच नजरेसमोर येतात ते फक्त केवळ एकमेव शरदचंद्रजी पवारसाहेब.

राजासारखे मन असणाऱ्या या मनासारख्या राजाने महाराष्ट्रात अनेक अनमोल रत्ने घडविली; तसेच त्यांच्या अचुक मार्गदर्शनाने असंख्य कार्यकर्तेही घडलेत. त्यांतील अत्यंत उठावदार व प्रभावी असणारी काही रत्ने आहेत. त्यातील एक राज्यात प्रति शास्त्रीजी म्हणुन मान्यता पावलेले राज्याचे गृहमंत्री व माजी उपमुख्यमंत्री आर.आर.पाटील (आबा) व दुसरे महाराष्ट्राचा उज्वल भविष्यकाळ असणारे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री, स्पष्टवक्ते, आदरणीय अजितदादा पवार; तसेच उपेक्षीत, दुर्लक्षीत घटकांसाठी विशेष कार्य करणाऱ्या व बचत गटांच्या माध्यमांतुन स्त्रियांचा सर्वांगीण विकास साधणाऱ्या कार्यक्षम नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे व विलक्षण बुध्दिमान असणारे विधानसभेचे सभापती दिलीपरावजी वळसे पाटील. एवढेच नाही, तर असे अनेक नेते जे सर्व समाजाला विकासाची, समृध्दीची दिशा देऊन यशस्वीतेसाठी घेऊन जाणारे आहेत. अशा असंख्य राष्ट्रवादी कॉंग्रेस कार्यकर्त्यांची

**राजा शिवछत्रपतीनंतर 'जाणता राजा' ही उपाधी जर जनतेने कोणाला बहाल केली असेल, तर ती फक्त आदरणीय लोकनेते शरदचंद्रजी पवारसाहेबांना !**
**राजेशाही संपली, पण राजे मात्र संपले नाहीत.**
**त्यात काही फक्त नावाने राजा आहेत.**
**तर काही स्वयंघोषीत राजे आहेत,**
**तर काही राजेशाही थाटात वावरणारे आहेत,**
**तर काही राजासारखी उधळपट्टी करून स्वत:च्याच मस्तीत मश्गुल राहणारे आहेत.**
**राजे असंख्य आहेत: पण जाणता राजा आहे फक्त एक आणि एकच आणि ते म्हणजे केंद्रिय कृषिमंत्री शरदचंद्रजी पवार !**

फळीच पवार साहेबांच्या प्रयत्नांतुन निर्माण झाली आहे.

शेतकरी कुटूंबात जन्मलेल्या साहेबांची त्यांच्या राजकीय पर्वाच्या सुरवातीतच शेतकरी बांधवांशी नाळ जोडली गेली. शेतकरी बांधवांच्या सुखदुःखात समरस झालेल्या साहेबांनी त्यांच्या सुधारणेसाठी व त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी नेहमीच सुधारीत शेतीसाठी आग्रही भूमिका घेतली. त्यासाठी सहकाराच्या माध्यमातुन भांडवल निर्मीती करीत वेगवेगळ्या प्रकारची कृषीप्रदर्शने, सवलती, अनुदाने देण्याचे काम केले. शेतकरी बांधवांनी केवळ शेतीवर अवलंबुन न राहता उद्योगधंदे करावेत व त्यासाठीही वेगवेगळ्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याचा वेळोवेळी प्रयत्न साहेबांनी केला. अनेक व्यावसायीक प्रशिक्षण संस्था उभारणीस प्रोत्साहन देऊन नवनवीन व्यावसायिक संधी निर्माण केल्या. बेभरवश्याचे पर्जन्यमान व तोट्यातील पारंपारिक शेतीच्या चक्रव्युहात अडकलेल्या अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यामुळे व्यथीत झालेल्या साहेबांनी हजारो कोटींची कर्जमाफी देऊन शेतकऱ्यांना दिलासा दिला व अनेक उपाययोजना आखल्या; तसेच शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी अनेक साखर कारखान्यांना विविध प्रकारची पॅकेज देऊन नवसंजीवनी देण्याचे महत्वपुर्ण काम केले.

स्त्री-पुरुष समानतेला महत्व देणाऱ्या साहेबांनी स्त्रियांच्या सहभागामुळे समाजाचा विकास साधणे सोप होईल तसेच स्त्रियांना या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये समानतेची व सन्मानाची वागणुक मिळण्यास मदत होईल.या उदात्त हेतुने स्त्रियांसाठी विशेष प्रयत्न केले. महिला बचत गट हा त्यातील एक भाग. या बचतगटाच्या माध्यमातुन विशेषतः ग्रामीण भागातील महिला वर्गाला स्वतःच्या प्रगतीचा मार्ग दाखविला. आज त्यांच्याच मार्गदर्शनानुसार अजितदादा पवार व सुप्रीयाताई यांच्या प्रयत्नांतुन राज्यभर बचत गटांना अल्पदरात कर्जे उपलब्ध करुन दिली आहेत. साहेबांची ही संकल्पना खऱ्या अर्थाने महिला वर्गाला आर्थिक सुबत्ता देऊन सक्षम बनविणार आहे. ३३% महिला आरक्षणात त्यांनी पुढाकार घेतल्याने आज अनेक शासकीय, निमशासकीय संस्थामध्ये सरपंच, सभापती, अध्यक्ष, आमदार, खासदार अशा विविध महत्वाच्या पदांवर



अनेक स्त्रिया सन्मानाने व स्वाभीमानाने कार्यरत आहेत. धर्मनिरपेक्षतेची विचारसरणी असणाऱ्या साहेबांनी महाराष्ट्रामध्ये अनेक लोकहितवादी निर्णय घेतले. मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या मुद्यावर सत्ता गेली तरी चालेल. पण मी माझ्या दलित बांधवांच्या आत्मसन्मानासाठी मराठवाडा विद्यापीठाचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ' असे नामांतर करणारच, अशी भूमिका घेऊन विद्यापीठाचे नामांतर केले; तसेच राज्यात मंडल आयोगाच्या शिफारशींची प्रथम अमंलबजावणी करुन इतर मागासवर्गीय बांधवांना दिलासा दिला.

साहेबांनी राज्यांत शांतता, कायदा सुव्यवस्था चोख राखण्यासाठी देशाच्या एकात्मतेसाठी नेहमीच प्रयत्न केले.१९९२ च्या मुंबई बॉम्ब स्फोटाच्या वेळी काही तासांतच मुंबईचे जनजीवन पुर्वपदावर आणले; तसेच २६ नोव्हेंबरच्या अतिरेक्यांच्या हल्लयाच्या वेळी राज्य सरकारला वडीलकीचा सल्ला देत आपल्या वैचारीक प्रगल्भतेचे व धीरोदात्तपणाचे दर्शन अखंड देशाला घडविले. भारताला जागतिक महासत्ता बनविण्याचा प्रयत्न करणाऱ्या साहेबांनी देशाच्या दरडोई उत्पन्नवाढीवर भर दिलेला आहे. राज्यातील विजेचा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी एन्रॉन प्रकल्प राज्यात आणला; परंतु विरोधकांनी त्याला विरोध केला. त्यामुळे विजेचा प्रश्न राज्यात गंभीर झाला. विजेचा प्रश्न सोडविण्याची दुरदृष्टी साहेबांकडे आहे. संगणकीय शिक्षण, सुधारीत शेती, औद्योगीकीकरण, शेतकऱ्यांच्या जोडधंद्याला चालना, छोट्या उद्योगांना चालना देण्याचे काम साहेबांनी केले आहे. मोठ्या कंपन्यांच्या संप काळात उद्योगपतींना दिलासा देत कामगारांचे हित जोपासण्याचे कामही साहेबांनी केले आहे. अमेरिका या जागतिक महासत्ता असलेल्या देशाचे तत्कालीन अध्यक्ष बिल क्लिंटन भारतभेटीवर आल्यानंतर ते साहेबांच्या भेटीची इच्छा व्यक्त करतात, यावरुन साहेबांच्या कार्यकौशल्याची जाणीव सर्वांना झाली आहे याची प्रचिती येते. साहेबांवर प्रेम करणारी असंख्य माणसे आहेत की, ज्यांना कोणत्याही लाभाची आशा नाही. असे कित्येकजण साहेबांचा उगवणारा प्रत्येक दिवस नवीन यश घेऊन येवो आणि पडणारे प्रत्येक पाऊल यशस्वी ठरो एवढीच माफक अपेक्षा ठेवुन एका अनामिक आनंदात साहेबांसाठी शुभचिंतन करीत मार्गक्रमण करीत आहेत. संपुर्ण महाराष्ट्राला यशस्वी जीवनाचा मुलमंत्र देणाऱ्या या कल्पतरुला उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लोभो हि सदिच्छा व्यक्त करतो.

शब्दांकन : प्रताप खांडेभराड



# हार्दीक शुभेच्छा



मा.शरदचंद्रजी पवार
केंद्रीय कृषिमंत्री





मा.दिलीप मोहिते
आमदार, खेड



मा.प्रताप खांडेभराड
उद्योजक

मराठी अस्मिता, मराठी बाणा इतकेच काय उभा महाराष्ट्र ज्यांनी आपल्या
मनमंदिरात केवळ आपला म्हणून जपला त्या केंद्रीय कृषिमंत्री

## मा.ना.शरदचंद्रजी पवार साहेब अर्थात आपल्या साहेबांस त्यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त आमुच्या अती अती अती हार्दिक शुभेच्छा !

* कार्य नि कर्तृत्व त्यांचे सागराएवढे विशाल, जाणता राजा अशीच घे तू उंच भरारी खुशाल.
* मुसंडी असता विजयाची नाही भावना अहंकाराची, राजकीय प्रेम, भीती आहे सर्वांना या साक्षात शंकराची.
* त्यांच्या ठायी संघटक, दूरदृष्टी, राष्ट्रवाद यांचा त्रिवेणी संगम झाला, म्हणून इवलासा कवडसा प्रचंड प्रकाशमान झाला.
* राजकीय तारांगणातील हा एक अत्यंत तेजस्वी तारा, त्याने हिमालय ठेंगणा केला आपल्या कार्य कर्तृत्वाद्वारा.
* विजयश्रीची साथ संगत असताही सदैव विवेक जागृत राहिला, म्हणून तमाम जनतेने दुसरा जाणता राजा पाहिला.
* मौन, मुत्सद्देगिरी, संयम यांचा चमत्कार अखंड देशाने पाहिला, धैर्यशिल विचारवंत आपल्या विचारांवर ठाम राहिला.
* अती शाहण्यांना अस्तित्वहीन करी ही वक्रदृष्टी त्यांची, समर्थनीय प्रकाशमान होई ही कृपादृष्टी त्यांची.
* शेतकरी, कामगार याचंचं दु:ख त्यांच्या मनामध्ये दाटलं, म्हणून जाणीवपुर्वक त्यांनी कृषि मंत्रालय घेतलं.
* सर्व स्वप्न त्यांची मनासारखी होऊ दे शेतकरी वर्ग सदैव त्यांच्या स्मरणात राहू दे.
* संस्कारक्षम शिक्षणाचा होत चाललाय ऱ्हास, घेऊन ध्यास, थांबवुन ऱ्हास, घडवा नवा इतिहास.
* साहेब एक व्यक्ती नसून अत्यंत दूर्मिळ संधी आहे, साहेबांविना महाराष्ट्राला सवोच्चस्थानी बंदी आहे.
* त्यांचा स्पर्श होताच मातीला, सोनं तिचं होवो, शिखरावर विराजमान साहेब आमुचे होवो.
* अजरामर स्थान मिळविलं तुम्ही मनात आमुच्या, ते दुभंगविण्याचं सामर्थ्य नाही नरवीरांत कोणत्या.
* नतमस्तक होऊनी विनवितो मी ब्रम्ह्मांड नायकाला, उदंड आयुरारोग्य लाभ दे, आमच्या या राजकीय दैवताला.

(शव्दांकन : प्रताप खांडेभराड)

**शुभेच्छुक :**



## मे.प्रताप खांडेभराड अर्थ मुव्हर्स, चाकण.

जिव्हाळा बिल्डींग, छत्रपती शिवाजी चौक, चाकण
ता.खेड, जि.पुणे. मो.९८२२०९१५३९
फोन नं. (०२१३५) २५२७४८, फॅक्स : २५२७४९
ईमेल : pkem2006@yahoo.co.in





# साहेब ... !

**आज १२-१२-२०१२ म्हणजे, आजचा दिवस एक अविस्मरणीय, अद्‌भुत, अभूतपूर्व तब्बल १००० वर्षांनी येणारा प्रत्येकाच्या आयुष्यातील दुर्मिळ योगायोग. या शुभदिनी शुभयोग आहे, केंद्रीय कृषिमंत्री मा.ना. शरदचंद्रजी पवारसो तथा आपल्या आदरणीय साहेबांचा जन्मदिवस.**

सह्याद्रीच्या कुशीत जन्मलेल्या आणि याच मातीत वाढलेल्या, अखंडितपणे तब्बल ४५ वर्षे महाराष्ट्राची धुरा आपल्या अंगाखांद्यावर घेऊन, विकासाची अनेक शिखरे पादाक्रांत करीत यशस्वीपणे दिल्लीकडे झेपावलेला महाराष्ट्राचा विकाससूर्य. शाहू, फुले, आंबेडकर, यशवंतराव यांच्यानंतरचा पहिलाच क्रांतिसूर्य. तसेच रयतेचा कल्याणकारी आदर्श राजा शिवछत्रपतींनंतरचा जनमानसावर निर्विवादपणे अधिराज्य गाजविणारा, पहिलाच 'जाणता राजा' देशातील असंख्य रथींच्या गर्दीत सर्वात उठून दिसणारा एकमेव महारथी, उंची गगनाला भिडली तरी पाय जमिनीवरच असणारा अत्यंत शक्तिशाली माणूस असणाऱ्या आदरणीय साहेबांचा आज १२-१२-२०१२ म्हणजेच ७२ वा वाढदिवस.

साहेबांबद्दल सर्वांच्याच मनात नितांत आदर व प्रेमाची भावना आहे. तिला श्रध्देचं आणि निष्ठेचं स्वरुप प्राप्त होऊन साहेब तळागाळातील जनमानसाची शक्ती बनून गेलेत. त्याही पलीपडे कित्येकांच्या मनात त्यांच्याबद्दल अनामिक अशी भक्तीदेखील आहे. ती केवळ त्यांच्या मनातील महाराष्ट्र व देश विकासाची व्यापक अशी दूरदृष्टी तसेच त्यांनी स्वीकारलेली, कसल्याही भेदभावाला थारा न देणारी, जात-पात, पंथ-प्रदेश यांचे बंधन नसलेली धर्मनिरपेक्ष विचारसरणी यामुळेच. आज साहेब सर्वांचे स्फूर्तिस्थान बनून सर्वार्थाने आशास्थान बनलेत. महाराष्ट्रातून दिल्लीत गेल्यानंतर, महाराष्ट्रातील जबाबदारी महाराष्ट्राचा उज्ज्वल भविष्यकाळ असणारे, असंख्य कार्यकर्त्यांचे बलस्थान ठरलेले राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार व इतर काही नेत्यांकडे आली.

आदरणीय दादांच्या कार्यपध्दतीवर बोलताना आणि लिहिताना शब्दसामग्री कमी पडावी इतकी त्यांची कार्यशैली उच्च प्रतीची आहे. स्पष्टवक्ते असणाऱ्या दादांचे वेळेचे नियोजन तर इतक्या उच्च प्रतीचे आहे की, वेळेच्या वक्तशीरपणामुळे त्यांना लोक आता 'राइट वॉच दादा' म्हणून संबोधू लागलेत. शासनाची उत्तम जान व प्रशासनावर वचक असणारे दादा चुकीचे काम करणाऱ्यांना तोंडावर तंबी देतात. तसेच कोणाला ताटकळत ठेवणे त्यांच्या स्वभावात नाही. म्हणून राज्यमंत्रिमंडळात आजी-माजी अनेक मंत्री असतानाही जबरदस्त निर्णयक्षमता असणाऱ्या अभ्यासूवृत्तीचे दादा आज महाराष्ट्रामध्ये सर्वात वलयांकित व्यक्तिमत्व ठरले आहेत.

तसेच 'लेक वाचवा' अभियान व बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे जीवनमान उंचावणे या उपक्रमांच्या माध्यमातून अत्यंत कार्यक्षम ठरलेल्या खासदार सौ. सुप्रियाताई सुळे, प्रति शास्त्रीजी म्हणून ओळखले जाणारे राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व गृहमंत्री आर. आर. पाटील, विलक्षण बुध्दिमान असणारे राज्याचे कार्यक्षम विधानसभा सभापती दिलीप वळसे पाटील, तसेच इतर काही महाराष्ट्राची धुरा समर्थपणे पेलणारी नेतृत्वदेखील साहेबांनी निर्माण केलीत.

विजयश्रींची प्रचंड साथसंगत असतानाही सदैव विवेक जागृत असणाऱ्या साहेबांच्या विचारांचा कधी उद्रेक नाही की भावनेचा कधी अतिरेक झाल्याचे अजिबात दिसत नाही. अशा परिस्थितीमध्ये 'हाथी चले अपनी चाल' या उक्तीप्रमाणे काम करत साहेबांनी राज्य व देशाच्या हिताचे अनेक निर्णय घेतले.त्यात मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करण्याकरिता धरणांची निर्मिती, विद्युत समस्येची सोडवणूक करण्याकरिता मौलिक मार्गदर्शक, कामगार व उद्योगपतींशी सलोख्याचे संबंध, औद्योगिकीकरणाला चालना तसेच सेझच्या मुद्यावर शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करुन सेझला सहकार्य अशा रीतीने राज्याच्या विकासात साहेबांचे प्रमुख योगदान असल्याचे दिसून येते.

आपल्या कार्यकर्तृत्वाच्या माध्यमातून जनतेच्या मनात अढळ स्थान मिळविणाऱ्या साहेबांनी रचनात्मक असणारा व दीर्घकालीन ठरणारा सर्वसमावेशक विकास साधताना महिला-भगिनींचा सत्तेत सहभाग असायला हवा म्हणून महिला आरक्षण, ओ.बी.सी. बांधवांसाठी मंडल आयोग शिफारस, दलित बांधवांसाठी विद्यापीठ नामांतर, तेव्हा तर सत्ता गेली तरी चालेल पण मी माझ्या दलित बांधवांच्या आत्मसन्मानासाठी मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ असे नामांतर करणारच हा अत्यंत धाडसी निर्णय घेतला. तसेच अल्पसंख्याक समाजासाठीदेखील अनेक महत्त्वाचे निर्णय घेऊन त्यांनाही न्याय देण्याचे काम केले. अशा निर्णयांवरुन साहेबांच्या कल्पनेतील विकास हा सर्वसमावेशक असल्याचे व सर्वांना बरोबर घेऊन जाणारा असल्याचे दिसून येते.



त्यामुळे गेल्या **४५ वर्षांचा काळदेखील शरद पवार या ६ अक्षरांचा प्रभाव कमी करु शकला नाही. नुसता प्रभावच नाही तर त्यांच्याबद्दल असणारा आदर, प्रेम आणि आदरयुक्त धाकसुध्दा कायम राहिलाय.**

कारण राजकीय परिपक्वतेचा परीस असणाऱ्या साहेबांनी आयुष्यात आलेल्या राजकीय चढ-उतारांमध्ये, कधीही, कसल्याही पध्दतीची आगपाखड केलेली दिसुन नाही. तर वेळोवेळी आलेल्या विशेष प्रसंगांमध्ये आपल्या स्वभावविशेषानुसार अत्यंत शांततेने आणि संयमाने प्राप्त परिस्थितीशी सामना केलाय. कधी मौन तर कधी संयमित बोलणे आणि त्यातून मुत्सद्देगिरी असा वैचारिक प्रवास करणाऱ्या साहेबांकडून कधीही कोणावर नाहक चिखलफेक किंवा टोकाची टिका-टिप्पणी झाल्याचे दिसत नाही. त्यामुळेच कुठलाही गाजावाजा अथवा कुरकुर किंवा कुरघोडी न करता हळुवारपणे एखादा पडदा बाजूला सारावा अशा शिताफीने आलेले अनेक प्रश्न व प्रसंग साहेबांनी लिलया बाजूला केलेत. त्यातून त्यांच्या सुसंस्कृतपणाचे आपल्याला दर्शन घडून येते. म्हणूनच साहेबांचा राजकीय प्रवास काटेवाडी ते दिल्लीपर्यंत जाऊन पोहोचला.

साहेबांच्या जनहितार्थ कार्यकर्तृत्वाकडे मान वर करुन बघताना डोक्यावरील टोपीदेखील पडावी, एवढे प्रचंड यश साहेबांनी अनंत कष्ट आणि अखंड कार्यरत राहून मिळविले. यानंतरच्या काळात ते कोणाला सहजशक्य होईल असे अजिबात वाटत नाही. म्हणून त्यांच्या वैचारिक पदपथावरुन चालणाऱ्या प्रत्येकाला वाटते, साहेबांच्या रुपाने आपल्याला देशाचे सर्वोच्च पद मिळावे म्हणून महाराष्ट्रातील अनंत नजरा आशेने आदरणीय साहेबांकडे पाहात आहेत.

या अनंत नजरांच्या भाऊगर्दीत कित्येकांना कशाचेही घेणं नाही, देणं नाही. अगदी राजकारणाचेसुध्दा घेणं-देणं नाही. तरीदेखील कित्येक माणसं सदर इच्छा ठेवून 'साहेब' नावाच्या भक्तिमार्गावरुन मार्गक्रमण करीत आहेत. त्यातलाच मी एक वाटसरु, भक्तिमार्गाच्या ऐलतीरावरून पैलतीरावरील यशोशिखराकडे आशेने बघतोय, 'साहेब' नावाचं राजकीय दैवत शिखरावर विराजमान झाल्याचे बघण्यासाठी.

'साहेब'प्रबळ इच्छाशक्ती, दुर्दम्य आत्मविश्वास, अथक परिश्रम, अखंड कार्यरतता यांचा 'न भुतो न भविष्यती' असा भारताला महासत्ता बनविणारा अनाकलनीय पण शाश्वत असा महान चमत्कार आहेत. आदरणीय साहेबांच्याच माध्यमातून महाराष्ट्राचं स्वप्न सिध्दीस जाण्याकरिता त्यांना उत्तम आरोग्य व उदंड आयुष्य लाभो, ही संतश्रेष्ठ संत ज्ञानेश्वर महाराज, जगद्गुरु तुकोबाराय व स्वामीश्रेष्ठ स्वामी विवेकानंदांच्या चरणी विनम्र प्रार्थना !

शब्दांकन : प्रताप खांडेभराड



# मा.ना.केंद्रीय कृषिमंत्री
# शरदचंद्रजी पवार
## वाढदिवस अभिष्टचिंतन !

कार्य नि कर्तृत्वाचे समायण घडविण्याचे प्रचंड सामर्थ्य असणारा महासामर्थ्यवान नेता, राजकिय उंची गगनाला भिडली तरी पाय सदैव जमीनीवरच ठेवणारे, कला-कौशल्याच्या जोरावर अमर्याद कार्य-कुशलतेचे दर्शन अखंड देशाला घडविणारे **राजकिय मर्यादा पुरुषोत्तम** म्हणजेच केंद्रिय कृषीमंत्री **मा.ना.श्री.शरदचंद्रजी पवार साहेब** अर्थात साहेबांस ...



बेन्यू पक्षाप्रमाणे आपली नजर सदैव विकास सुर्याकडेच ठेवणारा अत्यंत ध्येयवादी पण खंबीर राष्ट्रवादी नेता

सागराच्या पैलतीरावरुन पैलतीराचा वेध घेण्याची दुरदृष्टी असणारा महान दूरद्रष्टा नेता

अखंड जनसागराला आपल्या दूरदृष्टीच्या कवेत घेवून विकास छाया देणारा जाणता राजा.

मराठी अस्मिता तसेच धर्मनिरपेक्षतेसह संपूर्ण महाराष्ट्र आपल्या मनमंदिरात सदैव आपला म्हणून जपणारा विशाल हृदयी नेता.

करोडो सामान्य, लाखो असमान्य, हजारो लोकमान्य, शेकडो रथीमधील ... एकमेव महारथी नेता

अशा अष्टपैलू, चिरंतन, शाश्वत, अजरामर ठरणाऱ्या दंतकथेला, सर्वांच्या बलस्थानाला विकसीत भारताच्या आशास्थानाला त्यांच्या

**६७ व्या वाढदिवसानिमित्त उत्तम आरोग्य व दिर्घ आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा !**

शब्दांकन : श्री.प्रताप खांडेभराड



उद्योजक मा.प्रताप खांडेभराड
उपाध्यक्ष, पुणे अर्थमुव्हर्स असो.पुणे

**शुभेच्छुक :**



## मे.प्रताप खांडेभराड
## अर्थ मुव्हर्स, चाकण.

जिव्हाळा बिल्डींग, छत्रपती शिवाजी चौक, चाकण
ता.खेड, जि.पुणे. मो.९८२२०९१५३९
फोन नं. (०२१३५) २५२७४८, फॅक्स : २५२७४९
ईमेल : pkem2006@yahoo.co.in

# अनाकलनीय पण शाश्वत सत्य म्हणजेच साहेब ...!



साधारणत: साठच्या दशकात महाराष्ट्राच्या राजकीय तारांगणात उदय पावलेला एक अत्यंत तेजस्वी तारा. अत्यंत अल्पावधीत महाराष्ट्र नावाचं संबंध तारांगण प्रकाशमान करुन गर्व, अहंकार बाजूला सारत आपल्या संघटनकौशल्य, मौन, मुत्सेद्देगिरी, विवेकाच्या जोरावर राजकीय माऊंट एव्हरेस्ट असणाऱ्या दिल्लीकडे झेपावून प्रकाशमान झालेला महाराष्ट्राचा जाणता राजा केंद्रीय कृषीमंत्री मा.ना.शरदचंद्रजी पवार साहेबांचा आज ६७ वा वाढदिवस.


गेल्या चार-पाच दशकांत उगवणारा प्रत्येक दिवस, पडणारं प्रत्येक पाऊल यशस्वितेचं असणारे साहेब सर्वच क्षेत्रांतील आदर्शाचा स्वत:च एक अतिउच्च मापदंड बनून गेलेत. त्यांच्या नावापुढे असतील तेवढी सर्व बिरुद जरी लावली तरी त्यांना पुरुन उरणारे साहेब एक चिरंतन, शाश्वत, नैसर्गिक सत्य होवून गेलेत.

निसर्गचक्राप्रमाणे अगणित माणसं जन्माला येतात नि कालप्रवाहाबरोबर वाहत जातात. पण काही माणसं, नव्हे असामान्य व्यक्ती कालप्रवाहाबरोबर वाहून न जाता आपल्या कार्यकर्तृत्वाने अजरामर होतात. इतरांचं बलस्थान होतात. आशास्थान बनतात. स्वत:च एक दंतकथा बनून जातात. इतरांच्या मन-मंदिरात घर करुन बसतात. अगदी कायमचं ! या चमत्काराला जाणणारा व मानणारा प्रत्येक महाराष्ट्रीयन माणूस पवार साहेब भारताच्या राजकीय शिखरावर विराजमान होवोत. असं भव्यदिव्य स्वप्न उराशी बाळगून आपलं स्वप्न सिध्दीस जाण्याची प्रचंड उत्सुकतेने वाट पाहत आहे.

महाराष्ट्रातील कला, क्रीडा, साहित्य, उद्योग व राजकीय क्षेत्रातील सामान्य-असामान्यांसह, ग्रामीण व अगदी अतिग्रामीण भागातील शेतकरी - कष्टकरी तसेच आधुनिक जगाशी ज्यांचा फारसा संबंधही आलेला नाही. साहेबांना ज्यांनी प्रत्यक्ष पाहिलेलेही नाही. ज्यांची समाजाला फारशी ओळखही नाही. अशाही परिस्थितीत आपल्याच उद्योगविश्वात रममाण असणाऱ्या, आहे त्यात समाधान मानणाऱ्या, तळागाळातील अंतिम घटकांच्याही श्रध्दा व निष्ठा साहेबांच्या पाठीशी आहेत. गरज आहे ती फक्त अत्यंत आत्मविश्वासाने, जिद्दीने, सर्वांनी सर्वार्थाने, सर्वांच्या हितासाठी साहेबांच्या स्वप्नातील विकसित भारत घडविण्याचा संकल्प करण्याची व तो सिध्दीस नेण्याची !

**- प्रताप खांडेभराड**

**आपले श्रद्धास्थान असणारे अष्टपैलू, लोकनेते, जाणता राजा, केंद्रीय कृषि, अन्न व नागरी पुरवठा मंत्री मा.ना.शरदचंद्रजी पवार साहेब म्हणजे प्रबळ इच्छाशक्ती, दुर्दम्य आत्मविश्वास, अथक परिश्रम, अखंड कार्यरतता यांचा 'न भूतो न भविष्यती' असा भारताला महासत्तेकडे नेणारा अनाकलनीय पण शाश्वत असा महान चमत्कार आहेत.**



अजितदादा पवार नावाचा अत्यंत तेजस्वी तारा साधारणत: २२ वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या राजकीय क्षितीजावर उदय पावला. आदरणीय लोकनेते, जाणता राजा केंद्रीय कृषीमंत्री मा.ना. शरदचंद्रजी पवार साहेबांच्या छाया-छत्राखाली महाराष्ट्र नावाचं राजकीय तारांगण प्रकाशमान होऊ लागलं. दादांच्या रुपाने पक्षामध्ये आलेली एक नवचैतन्याची लकेर बघता बघता पक्ष चैतन्यमय करीत संपूर्ण महाराष्ट्रभर पसरली. साहजिकच अल्पावधीत प्रचंड आत्मविश्वास, जिद्द, अविरत कार्यरतता, स्पष्टवक्तेपणा, या आपल्या अंगभूत कलागुणाच्या जोरावर दादांची आपली स्वत:ची एक खास ओळख निर्माण झाली. दादांच्या रुपाने पक्षात जबरदस्त कर्तृत्व तसेच उत्तम, स्पष्ट व निर्भिड वक्तृत्व असलेले खंबीर नेतृत्व निर्माण झाले. मजल-दरमजल करीत नव्हे तर अगदी कमी कालावधीत दादा तरुणांचे व पक्ष कार्यकर्त्यांचे स्फूर्तिस्थान बनून सर्वांचे सर्वार्थाने प्रेरणास्थान बनले. अशा स्फूर्तिदायी प्रेरणास्थानाचा ज्यांच्या नावातच जीत आहे, हार नाही अशा अजित दादांचा आज २२ जुलै २००८ म्हणजे ४९ वा वाढदिवस !

कर्तृत्व आणि नेतृत्व यांचा सुरेल संगम असणाऱ्या दादांचा आपोआपच जनसामान्यांमध्ये असामान्य नेतृत्व निर्माण झाले. नेतृत्वांना बऱ्याच कसोटयामधून जावं लागतं. पण साहेबांचं मार्गदर्शन व आपले कलाकौशल्य व शिस्तप्रियतेच्या जोरावर दादांचा राजकीय प्रवास 'मंत्रिमंडळातील अत्यंत प्रभावी व वलयांकित मंत्री' होण्यापर्यंत पोहोचला. त्यामुळे आज ते महाराष्ट्र शासन मुकुटाच्या शिरेपेचातील मानाचा तुरा ठरले आहेत.

आज राज्य मंत्रिमंडळात विविध खात्यांचे विविध मंत्री आहेत, पण दादांची कार्यपध्दती सर्वांपेक्षा वेगळी असल्याचे दिसून येते. विशेषत: दादांचे 'वेळे' ला असणारे महत्त्व व वेळेचे केलेले नियोजन ही तर सर्वांसाठी अत्यंत अनुकरणीय बाब ठरते. दादा वगळता बहुसंख्य राजकारणी मंडळी लग्नसमारंभ असोत उद्‌घाटन समारंभ असोत किंवा इतर काही कार्यक्रम असोत, नियोजित वेळेची नको तेवढी वाट लावून आपल्या संवेदनशून्यतेचे दर्शन घडविणाऱ्या व असंख्य लोकांना तिष्ठत ठेवून वेळेचा अपव्यय करणाऱ्यांची संख्या काही कमी नाही. नियोजित वेळ न पाळणे ही जणू काही त्यांची परंपराच झाली आहे. पण विकास कामांची उर्मी अंगी बाळगून जनहिताची स्वप्नं पाहणाऱ्या, तसेच एक एक मिनिटाला महत्त्व देणाऱ्या दादांनी ही परंपरा मोडीत काढून आपल्या कर्तव्यदक्षतेचा एक नवीन आदर्श लोकांसमोर निर्माण केलाय. त्यामुळे दादांना 'राईट वॉच दादा' म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

संस्कारित शिक्षण, नैतिक मूल्य, विकास, औद्योगिकता, ग्रामस्वच्छता व आरोग्य या सर्वांसाठी मनस्वी आग्रही भूमिका घेणाऱ्या दादांचा संपूर्ण भरवसा हा

# डायनॉमिक दादा

**नावात काय आहे, असे म्हणतात. खरं तर नावात प्रेम व धाकासह सर्व काही आहे. कारण सध्या राज्यात घराघरात एक दादा आहे तरी अखंड महाराष्ट्रात दादा म्हणताच नजरेसमोर येतात ते फक्त केवळ अजितदादाच.**

समाजातील युवाशक्तीवरच असल्याचे दिसून येते. ठिकठिकाणी शैक्षणिक संस्था, व्यायाम शाळा, वाचनालये निर्माण करुन युवकांच्या माध्यमातून समाजाची नावीण्यपूर्ण जडणघडण करताना दिसतात. भविष्याचा वेध घेणारी दादांची दूरदर्शी विचारसरणी पुढची पिढी व्यर्थ जाणार नाही याचीही दक्षता घेताना दिसते. त्यामुळेच अचूक निर्णयक्षमता व स्पष्टवक्तेपणाबद्दल प्रसिध्द असणाऱ्या दादांनी औद्योगिकीकरणाला चालना देऊन ठिकठिकाणी स्पेशल इकॉनॉमिक झोनसाठी सहकार्याची भूमिका घेतली. 'सेझ' साठी होणारी आंदोलने व होणारा विरोध आपल्या कलाकौशल्याने थांबविला ज्यामुळे राज्यात रोजगार निर्मिती होऊन बेरोजगारी कमी होईल, त्याही पुढे जाऊन दादा अत्यंत आग्रहाने व कळकळीने सांगतात. तरुणांनी नोकरी करण्याच्या भानगडीत न पडता स्वत: उद्योगधंदा सुरु करुन स्वत:चे उद्योगविश्व उभारावे. त्यासाठी लागणाऱ्या आवश्यक त्या मदतीची तयारी दर्शवितात.

सर्वांचे आशास्थान व कार्यकर्त्यांचे बलस्थान असणाऱ्या दादांनी उत्तम आरोग्यासाठी स्वच्छतेचे भान ठेवून संपूर्ण राज्यभर 'संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान' राबविले. त्यासाठी ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषदांमार्फत आवश्यक ती मदत, सबसिडी, अनुदान देऊन प्रत्येक घरात शौचालय असलेच पाहिजे ही आग्रही भूमिका घेतली. प्रत्येक गावामध्ये स्वच्छता अभियान राबविण्यासाठी 'निर्मलग्राम पुरस्कार' ठेवून निर्मलग्राम गावांना प्रोत्साहित केले.

संस्कार व संस्कारित शिक्षणाचा पुरस्कार करणाऱ्या दादांनी संस्कृतीवर होणाऱ्या आक्रमणाला विरोध करीत आधुनिकतेला प्राधान्य दिले. त्यासाठी संगणक प्रशिक्षण, इंजिनिअरिंग कॉलेजांसाठी प्रयत्नशील राहिले आहेत. एड्ससारख्या महाभयंकर रोगापासून समाजाचे रक्षण करण्यासाठी व अनैतिकतेने बिघडलेल्या व भरकटलेल्यांसाठी अखंड महाराष्ट्रमध्ये एड्सविरोधी अभियान राबविले. त्यावरून त्यांची सामाजिक बांधिलकी, दूरदृष्टी, वैचारिक प्रगल्भता दिसून येते. विकास कामांना खतपाणी घालणारे दादा दहशतवादाला कडाडून विरोध करतात. दादागिरी, गुंडगिरी तसेच खंडणीखोर या सामाजिक स्वास्थ्य बिघडविणाऱ्यांना वठणीवर आणण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना विनाअट विनाविलंब कडक कारवाई करण्यासाठी सूचना देतात.

मेळावे, सभा-समारंभामध्ये कार्यकर्त्यांना मार्गदर्शन आधुनिकतेला प्राधान्य दिले. त्यासाठी संगणक प्रशिक्षण, इंजिनिअरिंग कॉलेजांसाठी प्रयत्नशील राहिले आहेत. एड्ससारख्या महाभयंकर रोगापासून समाजाचे रक्षण करण्यासाठी व अनैतिकतेने बिघडलेल्या व भरकटलेल्यां साठी अखंड महाराष्ट्रमध्ये एड्सविरोधी अभियान राबविले. त्यावरून त्यांची सामाजिक बांधिलकी, दूरदृष्टी, वैचारिक प्रगल्भता दिसून येते. विकास कामांना खतपाणी घालणारे दादा दहशतवादाला कडाडून विरोध करतात. दादागिरी, गुंडगिरी तसेच खंडणीखोर या सामाजिक स्वास्थ्य बिघडविणाऱ्यांना वठणीवर आणण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना विनाअट विनाविलंब कडक कारवाई करण्यासाठी सूचना देतात.

मेळावे, सभा-समारंभामध्ये कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सहजतेने जनसामान्यामध्ये मिसळणारे दादा

'वात्सल्यमूर्ती' वाटतात. तर विविध प्रश्नांवरील शासकीय निर्णय घेताना अधिकारी पदाधिकारी यांना सूचना देताना त्यांच्यामधील 'कर्तव्य कठोरता' दिसून येते. कधी वात्सल्यमूर्ती तर कधी कर्तव्यकठोर असणारे धर्मनिरपेक्ष दादा जात-पात, उच्च-नीच, गरीब-श्रीमंत अशा कुठल्याही प्रकारच्या भेदभावाला अजिबात थारा न देता सर्वांचे, अगदी विरोधी पक्षातील लोकांचे प्रश्नसुध्दा आपल्या नि:स्वार्थी, कर्तव्यदक्षतेने सोडवतात. त्यातच त्यांचे वीस टक्के राजकारण व ऐंशी टक्के समाजकारण दिसून येते. त्यामुळेच त्यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आदरयुक्त भीती, प्रेम व दरारा कायम राहिला आहे. तो त्यांच्या कामातून निर्णय झालाय. ऐनवेळी उपस्थित होणाऱ्या प्रश्नांवर ताबडतोब संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देणारे दादा वरिष्ठांच्या व इतरांच्या अधिकारात नाहक हस्तक्षेप करीत नाहीत. त्यांच्या व वैशिष्ट्यपूर्ण कार्य पध्दतीमुळे त्यांच्याबद्दल असणारे प्रेम व धाक या दोन विरुध्द बाबी समांतरतेने त्यांच्यासोबत राहणार आहेत यात शंका नाही.

नावात काय आहे, असे म्हणतात. खरं तर नावात प्रेम व धाकासह सर्व काही आहे. कारण सध्या राज्यात घराघरात एक दादा आहे. तरी अखंड महाराष्ट्रात दादा म्हणताच नजरेसमोर येतात ते फक्त केवळ अजितदादाच !

'निदोष प्रपंच म्हणजेच खरा परमार्थ' या संत वचनाप्रमाणे त्यांनी आपला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नावाचा प्रपंच महाराष्ट्रात अगदी निर्दोष आणि नि:स्वार्थीपणे चालवून एक प्रकारचा परमार्थ साधून खऱ्या अर्थाने ते समाजसवेवेचे काम करीत आहेत हे दिसून येते. या व अशा कार्यात ईश्वरीय वरदहस्त असतो असे म्हणतात. म्हणूनच त्यांच्यामध्ये कधी अशांतता, ताण-तणाव, नकारात्मकता दिसून येत नाही व म्हणूनच त्यांच्याकडून व त्यांच्या कार्याच्या माध्यमातून साकारणार आहे एक भरभक्कम पक्ष, आदर्श समाज आणि स्थिर शासन व त्यांच्या स्वप्नातील समृध्द महाराष्ट्र ! तसेच घडणार आहे, ज्याच्या नावापुढे अस्तित्वात असणारी सर्व बिरुदं जरी लावली तरी कमी पडतील असे आपले सर्व काही असणाऱ्या, साहेबांच्या स्वप्नातील समृध्द भारत !

**- प्रतापराव खांडेभराड**



जाणता राजा



मा.ना.शरदचंद्रजी पवार
(केंद्रीय कृषीमंत्री)

## जिवेत् शरद: शतम्



**मा.अजितदादा पवार**
जलसंपदामंत्री, महाराष्ट्र राज्य
पालकमंत्री, पुणे जिल्हा

# मा.ना.अजितदादा पवार वाढदिवस अभिष्टचिंतन

खंबीर नेतृत्व, जबरदस्त कर्तृत्व, उत्तम वक्तृत्व ।
आदर्श स्फुर्तीस्थान, सर्वार्थाने आशास्थान ... म्हणजे आमुचे दादा ।।

शासनाची शान, प्रशासनाला ध्यान, जनतेला मान ।
आदर्श प्रेरणास्थान, विकासासाठी बेभान ... म्हणजे आमुचे दादा ।।

संस्कारित शिक्षण, नैतिक मुल्ये, वैचारिकता, विकास, औद्योगिकता,
सचोटी व कसोटीकरिता झपाटलेलं व्यक्तीमत्व ... म्हणजे आमुचे दादा ।।

युवकांच्या गळ्यातील ताईत, गरिबांचा तारणहार,
सर्वांचं आशास्थान, कार्यकर्त्यांचं बलस्थान ... म्हणजे आमुचे दादा ।।

संत गाडगेबाबा अभियान, स्वच्छतेचं भान, त्यांना सामाजिक आरोग्याची जाण ।
निर्मलग्राम गावाला त्यांच प्रथमस्थान ... म्हणजे आमुचे दादा ।।

अखंड महाराष्ट्रात राबविला एडस् अभियान, हिच त्यांची वैचारिक शान ।
हाच ज्यांचा खरा बहुमान ... ते म्हणजे आमुचे दादा ।।

तेजस बुध्दीमत्ता, डोळस विद्वत्ता, चौकस वृत्ती ।
विकासात स्वारस्य, विकास कामात, सातत्य ... म्हणजे आमुचे दादा ।।

दहशतवादाला विरोध, विकासाला खतपाणी ।
विद्या, विज्ञान, आधुनिकतेला प्राधान्य म्हणजे आमुजे दादा ।।

**अशा सर्वगुणसंपन्न, सर्व स्पर्शी, अष्टपैलू असणाऱ्या अजितदादांना उत्तम आयुरारोग्य लाभो ही त्यांच्या ४८ व्या वाढदिवसानिमित्त प्रार्थना व त्यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा !**

**(शब्दांकन : प्रताप खांडेभराड)**

खासदार



मा.सौ.सुप्रियाताई सुळे

आमदार खेड



मा.श्री.दिलीपशेठ मोहिते

आमदार हवेली



मा.श्री.विलासशेठ लांडे

उद्योजक



मा.श्री.प्रताप खांडेभराड


※ शुभेच्छुक ※

**मे.प्रताप खांडेभराड अर्थमुव्हर्स, चाकण**

जिव्हाळा बिल्डींग, छत्रपती शिवाजी चौक, चाकण, ता.खेड, जि.पुणे ४१०५०१
मो.९८२२०९१५३९ फोन : (०२१३५) २५२७४८ फॅक्स : २५२७४९
ई-मेल : pkem2006@yahoo.co.in

# अजितदादा कठोरपणा आणि वात्सल्याचा सुरेल संगम



बारामती तालुक्यातील काटेवाडी येथील शेतकरी कुटूंबात जन्माला येवून आपले कर्तृत्व, नेतृत्वशैली, स्पष्टवक्तेपणा, काम करण्याची विशेष पद्धत या गुणांच्या आधारे अवघ्या महाराष्ट्रातील युवा पिढीवर अधिराज्य गाजविणारे महाराष्ट्रातील एक कार्यक्षम मंत्री म्हणजेच मा.ना.अजित पवार होय. आज त्यांचा वाढदिवस त्यानिमित्ताने ....

निसर्ग चक्राप्रमाणे माणसं जन्माला येतात नि कालप्रवाहाबरोबर वाहून जातात. पण काही माणसं नव्हे असामान्य व्यक्ति कालप्रवाहाबरोबर वाहून न जाता आपल्या कार्यकर्तृत्वाद्वारे अजरामर होतात, इतरांच आशास्थान बनतात, बलस्थान होतात, स्वत:च एक दंतकथा बनून जातात. इतरांच्या मनमंदिरात घर करुन बसतात अगदी कायमचं, एक अजरामर चिरंतन, शाश्वत सत्य बनतात. अशा आपल्यासर्वाच प्रेरणास्थान असणाऱ्या अष्टपैलू लोकनेते, जाणता राजा, केंद्रीय कृषि, अन्न व नागरी पुरवठा मंत्री मा.ना. शरदचंद्रजी पवार साहेब यांनी अर्थात् आपल्या साहेबांनी शिक्षण, सहकार, उद्योग, राजकारण, समाजकारण, कृषी अशा सर्व क्षेत्रातील ना भुतो ना भविष्यती अशी कामगिरी करुन समस्त महाराष्ट्राला भारतातच नव्हे तर जगाच्या नकाशावर स्थान प्राप्त करुन दिले. अशा शांत, संयमी, मुत्सद्दी, विवेकी, खेळाडू वृत्ती जोपासणाऱ्या साहेबांचा वारसा नि वसा घेतलेले, साहेबांसारखीच अफाट स्मरणशक्ति लाभलेले, प्रचंड इच्छाशक्ति असलेले, आपले लाडके, हरहुन्नरी, गतिमान युवा नेते मा. ना. अजितदादा पवार (जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य व पालक मंत्री पुणे जिल्हा) हे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली, स्वकर्तुत्वावर गगनभरारी घेवून कार्य कर्तृत्वाचा हिमालय उभा करत आहे.

महाराष्ट्रातील शासकिय, प्रशासकिय, कर्मचारी व अधिकारी ते अगदी कुठल्याही खात्याचे असोत. दादांची गतिमान व शिस्तप्रिय कार्यपध्दती, स्पष्ट व कडक बोलणे, सांगणे, शिकवणं यामुळे सरकारी, निमसरकारी, स्वायत्त स्थानिक स्वराज्य संस्था इ. सर्वच ठिकाणी कामकाजात होणारी गोर–गरिबांची, सर्वसामान्य माणसांची विनाविलंब काम यामुळे दादांच्या कार्यपध्दतीवर सर्वसामान्याकडून कृतज्ञता व्यक्त केली जाते. तरी काही अपवादात्मक ठिकाणी काही अन्याय होत असल्यास केवळ दादांचे नाव घेताच संबंधित ठिकाणावर येतात. तेही विनाअट, विनाविलंब, वाकडा, सरळ अगदी दोरी आणि ओळंब्यात. केवळ दादांच्या साध्या सरळ पण आदरयुक्त धाकामुळे सर्वसामान्य माणसांची कामे होतात. दादांचे विचार – आचार, आदर्श असामान्य असून समाज हिताचे आहेत. समाज हिताला व सुधारणेला प्रथम प्राधान्य देणारी दादांची विचारधारा स्वतंत्र असून अफलातून आहे.

नावात काय आहे असे म्हणतात खरं तर नावात प्रेम व धाकासह सर्वकाही आहे. कारण सध्या राज्यात घराघरात एक दादा आहे. तरी अखंड महाराष्ट्रात दादा म्हणताच नजरेसमोर येतात ते फक्त केवळ अजित दादाच

राज्य मंत्रिमंडळात काम करीत असताना विरोधक अथवा गट–तट न मानता काम करण्याच्या पद्धतीमुळे दादांनी विरोधकांनाही आपलेसे केले आहे. अजित दादांची कामाची पद्धत व विकास कामांचा

झपाटा पाहून अनेक विरोधकांनी दादांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सामील होणे पसंत केले आहे. स्वत:च्या नशिबापेक्षा कर्तृत्वावर, भाग्यापेक्षा परिश्रमावर दादांनी विश्वास ठेवला बोलण्यापेक्षा प्रत्यक्ष कृती करण्यावर त्यांचा भर असतो.

वडिलोपार्जित आदर्शापेक्षा वास्तव परिस्थितीचे व आधुनिकतेचे भान ठेवणाऱ्या दादांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर एक वेगळा ठसा उमठविला आहे. स्पष्टवक्तेपणा, तत्वावरील अढळ निष्ठा, मानसिक औदार्य, संघटन चातुर्य, कार्य कुशलता, विकास कामांचा प्रचंड झपाटा, अफलातून अशी जबरदस्त निर्णयक्षमता, निर्भिडपणा या अष्टपैलू गुणांनी परिपुर्ण असणाऱ्या अजितदादांनी खऱ्या अर्थाने राज्याचा विकास करण्याचा संकल्प केलेला आहे. शिक्षण व सहकारी तसेच खाजगी उद्योग क्षेत्राचा विकास, सिंचनाच्या सोयी, संगणक, जैव तंत्रज्ञान या सर्व क्षेत्रांमधे नवीन क्षितीजे निर्माण करण्याचे महत्वपूर्ण काम दादांनी केले आहे.

केवळ सत्तेसाठी राजकारण न करता समाजाचा विकास व्हावा या हेतूनेच दादा राजकारणात अत्यंत प्रभावीपणे काम करित आहेत. गेल्या अनेक वर्षामध्ये राजकीय क्षेत्राबरोबरच सहकार, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रातील विविध प्रश्न सोडविण्याबरोबरच त्या-त्या क्षेत्राचा पुर्ण अभ्यास त्यांनी केला आहे. त्याचा वापर त्यांना मंत्रिमंडळात काम करताना होतो. गेली कित्येक वर्षापासून राज्याचे प्रतिनिधीत्व करताना दादांनी केवळ विकास हेच ध्येय नजरेसमोर ठेवून राज्यात विविध योजनांच्या माध्यमातून विकासाची अनेक कामे पूर्ण केली आहेत. आगामी काळात जास्तीत-जास्त प्रगती करण्याचा दादांचा मानस आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात वावरताना परंपरा आणि आधुनिकतेचा सुरेल संगम साधत आपल्या अफाट कार्यशैलीने अवघ्या महाराष्ट्रातील जनतेबरोबरच तमाम तरुणांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ना. अजितदादांना आगामी काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपदी काम करण्याची संधी मिळावी हिच जनतेची इच्छा आहे. अशा या सर्वगुणसंपन्न, आधुनिकतेचे भान असणाऱ्या व कार्यकर्तृत्वामुळे राज्यातील युवकांच्या हृदयसिंहासनावर विराजमान झालेल्या मा.ना.अजितदादांना दिर्घायुष्य लाभो तसेच त्यांच्या कार्याचा आलेख दिवसें दिवस वाढत राहो याच त्यांना या वाढदिवसाच्या शुभेच्छा !

**- प्रतापराव खांडेभराड**






# जे मिळाले ते हरवू नका

प्रत्येक माणूस जन्माला येतो ते निसर्गाचे आणि नियतीचे काही दान घेऊनच. पण या निसर्ग कृपेकडे कोणाचे लक्ष जात नाही. डोळ्यांनी पाहता येणे, कानांनी ऐकता येणे, वाटेवरुन पावले पडत राहणे ही निसर्गव्यवस्था अनेकदा आपण विसरुन जातो. जे सहज लाभते त्यांची नकळत उपेक्षा घडते. निसर्गाच्या दातृत्वाबरोबरच एक कठोर न्याय निसर्ग राबवत राहतो. ज्या शक्तीचा उपयोग केला जात नाही, ती घटत जाते. उदा. जो चालत नाही त्याच्या पायतले बळ कमी होते. जो हाताने काही करीत नाही त्याचे बाहूबळ ओसरते. जो गणित आणि शास्त्र अभ्यासत नाही त्याच्या प्रज्ञेला पैलू पडत नाहीत.

लोकमान्य टिळक बालवयातही स्वतंत्र विचार करीत, गुंतागुंतीची गणिते सोडविण्याचा प्रयत्न करीत. त्यांना एखादे पुस्तक आवडले तर वडिलांकडे त्याची मागणी करीत. कधी हट्ट पण धरीत. वडील हा बलाहट्ट पुरा करीत तो एका अटीवर मुलाने एखादे अवघड गणित स्वत: सोडवले पाहिजे. एखाद्या शब्दाची व्युत्पत्ती स्वत: शोधली पाहिजे. टिळक या आज्ञेचे पालन करीत. ती आज्ञा हे त्यांना एक आव्हान वाटे.

डेमॉस्थेनिस हा एक जगप्रसिध्द वक्ता झाला. वक्ता होणे त्याचे स्वप्न होते. पण हे घडणार कसे ? वक्तृत्वाचे मूलघटक त्याने विचारात घेतले. वक्त्याची भाषा सुंदर हवी. हे सौंदर्य येणार कोठून ? त्यासाठी त्याने त्याच्या आवडीचा एक इतिहासग्रंथ आठ वेळा अक्षरश: उतरुन काढला. तो शब्दाशब्दाजवळ थांबला. त्याने प्रत्येक शब्द आत्मसात केला. थुसिडिडिज या लेखकाचा तो ग्रंथ होता.

बुध्दीला पैलू पाडावे लागतात. भाषा ही प्रसन्न करुन घ्यावी लागते. पण एवढ्यावरच भागते का ? पल्लेदार वाक्ये सहज पेलता यावीत म्हणून त्याने दीर्घश्वसनाचा व्यायाम सुरु केला. तो चार–दोन मैल धावत राहत असे. वाणी संस्कारित व्हावी व मुद्रा भावपूर्ण असावी यासाठी त्याने काही नाटके पाहिली व अभिनेत्यांचे बोलणे ऐकले, अभ्यासले.

जीवन हे आपल्या अंगभूत सामर्थ्यांचे जागरण व संवर्धन असते. जे उदास, हताश व आळशी असतात, ते नेभळे होतात.

सर विश्वेश्वरय्या हे जागतिक कीर्तीचे आणि शतायुषी असे स्थापत्यशास्त्रज्ञ झाले. शंभराव्या वर्षीसुध्दा ते आनंदाने काही अंतर चालत. एखाद्या योजनेचे चिंतन करीत. त्यांचे जीवन हा एक सामर्थ्ययोग होता. ही सामर्थ्ये ही त्यांची कमाई होती. या साऱ्यांतून शिकायचे काय ? तर,आपल्या अंगची सामर्थ्ये प्रयत्नपूर्वक वाढवली तर जीवन ही कर्तृत्वाची पौर्णिमा ठरेल.

# PK Mission for Handicapped

## पी.के.फाऊंडेशन संचलित
# पी.के.स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रन (एम.आर.)
## (मतिमंद मुलांची निवासी शाळा)

मु.कडाचीवाडी, पो.चाकण, ता.खेड, जि.पुणे ४१०५०१



# एकच प्याला ! (अपंगांच्या अवस्थांकडे सर्वांचे लक्ष वेधण्यासाठी)

अपंग व्यक्तीमध्ये कित्येकांना हात आहे तर पाय नाही, पाय आहे तर हात नाही, कित्येकांना तर जागेवरुन नीट हलतासुध्दा येत नाही. कान असुन ऐकता येत नाही, डोळे आहे तर दृष्टी नाही. मतिमंदाना तर मन आणि मेंदू असला तरी त्यात वैचारिक प्रगल्भता नाही.

अशा अवस्थेत याचं मन थाऱ्यावर कसं राहणार ? नैसर्गिकपणे ज्यांच मन थाऱ्यावर नसतं त्यांच सर्वस्व वाऱ्यावर जाण्याची शक्यता असते. मग सुजाण, सुज्ञ समाजाने यांना वाऱ्यावर सोडायचं? अजिबात नाही। उलट त्यांना सर्वतोपरी मदत करुन, त्यांच्या मनाला उभारी देवून, आत्मविश्वास वाढवून त्यांच मन खंबीर बनविलं पाहिजे. मग शरीर अपंग असलं तरी ते कर्तृत्ववान होऊन सर्वकाही करु शकतील.

मुळात माणूस हा सुखात जगण्यासाठी तनाने, मनाने व धनाने समर्थ असावा लागतो. यांच्याकडे यातील विशेष असं काहीच नाही. समोर आहेत अनंत अडी अडचणी आणि फक्त दु:ख. दु:खाचा काठोकाठ भरले

आर्थिक, राजकीय, सामाजिक समृध्दी वाढविण्यात रममाण झालेल्या माणसांकडून जीवनामध्ये भावनांचे रंगी-बेरंगी असंख्य प्यालेच्या प्याले रिचविले जातात पण यांच्या प्याल्यातील एक घोट ही पचविला जात नाही हे त्यांच दुर्दैवातील दुर्दैव !

मतिमंद हा तर माडी, बंगला व ऐश्वर्य यांची कधीही, कुणाकडेही, काहीही मागणी नसलेला जगातील एकमेव घटक असावा.

यांना कसल्याही संपत्तीची, श्रीमंतीची तसेच कुणाकडुनही सर्वस्व दानाची अजिबात गरज नाही.

**खरी गरज आहे ती फक्त वैयक्तिक व सामाजिक योगदानाची !**

**अपंग व्यक्तीप्रती जिव्हाळा ठेवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.**

**ते मानवतावादी व राष्ट्रीय कार्य असुन भारतीय संस्कृतीचे भूषण आहे.**

✲ शब्दांकन : प्रतापराव खांडेभराड



श्री.प्रतापराव बामनराव खांडेभराड
(उपाध्यक्ष-पुणे जिल्हा अर्थमुव्हर्स असो.पुणे)
(संस्थापक/अध्यक्ष-पी.के.फाऊंडेशन

PK Group of Companies

- मे.प्रताप खांडेभराड अर्थमुव्हर्स
- पी.के.इन्फ्राप्रोजेक्ट ॲन्ड रिॲलिटी (इं) प्रा.लि.
- पी.के.रेडीमिक्स कॉंक्रीट प्लॅन्ट
- पी.के.फाऊंडेशन, चाकण
- पी.के.स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रन (एम.आर.)
- पी.के.इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट (एम.बी.ए.,एम.सी.ए.) प्रस्तावित

ऑफीस : गट नं.३२१, पी.के.स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रन (एम.आर.) शाळेजवळ, चाकण-शिक्रापूर रोड, कडाचीवाडी, चाकण, ता.खेड, जि.पुणे.
फोन : ०२१३५-२७८८७६ फॅक्स : ०२१३५२८६३६६ E-mail : pkiripl2009@yahoo.com Website : www.pkgoc.com

# संगणक सख्य आणि मोबाईल मैत्री

संगणक हे एक नवल आहे. संगणक मैत्री हा एक नवीन भावबंध अस्तित्वात आला आहे. हवी असणारी माहिती क्षणात मिळते व क्षणार्धात जगाचे टोक गाठता येते. हा आकलनाचा वेग विलक्षण आहे. एखादी गोष्ट कळल्यानंतर तिचे पुढे काय करावयाचे हे लक्षात येण्यापूर्वी नवेच काही कळू लागते. या वाढत्या माहितीचे व्यवस्थापन करण्यापूर्वी नव्या माहितीचा लोट अंगावर येतो. ज्ञानाच्या या झोतात हेलपाटणारी मुले मनाशी, स्वतःचा असा विचार करीत नाहीत.

घरी आलेल्या पाहुण्याला तीन तासानंतर परत जायचे असेल तर त्याचे आगतस्वागत करावे कसे याचे गणित मांडता येत नाही. पेरलेले उगवायला व उगवलेले वाढायला काही वेळ लागतो त्यात अंतर्भूत असणाऱ्या प्रक्रियांना एक अवकाश लागते. ते या त्वरित जीवनात भेटत नाही.

माणूस लहानाचा मोठा होतो. त्याची वाढ निसर्गक्रमाने घडते. हा निसर्गक्रम किती प्रमाणात बदलावा ? वयसापेक्ष असे विकसन योग्य त्या व स्वाभाविक गतीने होणे हिताचे ठरेल.

समाजसुधारणेसाठी जी मानसिकता लागते ती या त्वराबध्द उपकरणांनी निर्माण होईल काय ?

संगणकाचा वापर करण्यासाठी आवश्यक ते वृत्तीचे प्रौढत्व अंगी येण्यापूर्वी तो हाताळण्याची सवय लागली तर मुलांचे वेडात दौडणे वाढीस लागेल. संगणकाचा सलग सहवास मुलांना काही बाबतीत पंगुत्व आणतो. त्यांचे डोळे बिघडतात. त्यांच्या लेखनशक्तीला ओहोटी लागते. तोंडी व उभाउभी गुणाकार – भागाकार करण्याची उभारी कमी होते.


जसा संगणक तसाच मोबाईल फोन हा एक नवीन मित्र मुलांना लाभला आहे. खिशात जग बाळगण्याची ही चटक व्यसनासारखी वाढत चालली आहे. हातात गाडीचे चाक, कानाशी मोबाईल, तोंड चालू, विचार नाही, फक्त 'आम्ही जवळ आलो आहोत... लवकर पोहोचू' हे वर्तमान कानी घालावयाचे. ज्याच्या कानी ते पडावयाचे त्याने आपले मन समोरच्या कामातून काढून घ्यावयाचे व कानात प्राण गोळा करावयाचे. घरात मुले – माणसे असतात त्यांच्याशी गप्पागोष्टी, विनोद करण्याऐवजी आगगाडीच्या डब्यातून केलेला मोबाईल एकलव्याच्या एकाग्रतेने ऐकावयाचा. ही सामाजिक बधिरताच नव्हे काय ? या आधुनिक सुविधांमुळे तत्परता आणि व्यग्रता एका वेळी वाढत चालली आहे. माणूस हा निसर्गाचा एक भाग आहे. त्याच्या जीवनातली नैसर्गिकता कमी करणारी साधने ही शेवटी माणसाने स्वास्थ्य आणि विकास यांना बाधक ठरण्याची शक्यता आहे. ती नाकारता येणार नाही.




असे साधन हाती देताना त्याचा संयमाने कसा वापर करावा हेही मुलांना शिकवले पाहिजे. मोबाईलमुळे कान तयार होईल पण मन थाऱ्यावर राहणार नाही. अशा वेळी मुलांना मनाचे श्लोक ऐकवले पाहिजेत संगणकावर उमटणारी मैत्रीची चित्रे जिवाभावाचा स्नेह कसा निर्माण करणार ? सहवासाशिवाय घडणारा हा भावनिक सहभाग जीवनात एक आकर्षक पोकळी निर्माण करुन ठेवतो. हे सगळे चित्रविचित्र वाटते.

# नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठानला रौप्य महोत्सवी वर्षाबद्दल हार्दिक शुभेच्छा !

## विद्यार्थ्यांकरितां ...



उज्वल भविष्याची आस बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांनी/तरुणांनी उघड्या डोळ्यांनी जे दिसेल ते सारं नीट बघितलं. जे-जे मिळेल ते एकाग्रतेने वाचलं, जे बघीतलं जे वाचलं त्याचं नीट निरीक्षण केलं, त्यावर विचार केला आणि त्याचचं चिंतन-मनन केलं तरी तुम्हाला सारं ज्ञान प्राप्त होईल. आपलं भविष्य उज्वल करण्याकरिता प्राप्त ज्ञानाबरोबर चारित्र्य, नीतीमुल्ये व अमुल्य असणारी वेळ या बाबीसुद्धा जीवनात अत्यंत महत्वाच्या ठरतात. म्हणून त्यांचं महत्व जाणून-मानून त्यांचा अंगिकार करा.


निरीक्षणाने व वाचनाने मनुष्य घडतो तसा तो बिघडतोसुद्धा.म्हणून काय वाचायचं? आणि काय बघायचं? हे ठरवून समाजमान्य समाज संकेतानुसार जे-जे अयोग्य आहे ते बघण्याचा व वाचण्याचा मोह टाळा. जे योग्य आहे त्याचा पुरेपूर आस्वाद व आनंद घ्या. निश्चितच

निश्चितच तुमच्या मनात एका नवीन चैतन्य शक्तीचा, महत्वकांक्षेचा, जिद्दीचा, चिकाटीचा आणि अत्यावश्यक असणाऱ्या भव्य दिव्य स्वप्नाचा जन्म होईल.

आपोआपच एका अनामिक पण ठाम विचाराने तुमच्या ध्येयसिद्धीचा खरा प्रवास सुरु होईल. प्राप्त ज्ञानाच्या आणि अंगभूत कला गुणांच्या बळावर येणाऱ्या प्रत्येक अडी-अडचणीवर, संकटांवर मात करीत तुमचा प्रवास अखंडीतपणे तुमच्या अपेक्षित, नियोजित उदिष्ठ प्राप्तीपर्यंत चालूच राहील. तुमच्या कार्य आणि कर्तृत्वाच्या जोरावर यशाचं शिखर बघता-बघता सर होईल. अशीच यशाची, किर्तीची आणि वैभवाची अनेक शिखरे सर होतील.

आयुष्याचा सुर्य कलण्यापुर्वी मध्यान्हातच तुमच्या श्रमाचं-घामाचं सार्थक होईल. तुम्ही एका दैदिप्यमान यशाचे धनी होवुन यशवंत, गुणवंत, किर्तीवंत आणि सामर्थ्यवंत कधी व्हाल हे तुमचे तुम्हालाही समजणार नाही.

शब्दांकन - प्रतापराव खांडेभराड



श्री.प्रतापराव वामनराव खांडेभराड
(उपाध्यक्ष-पुणे जिल्हा अर्थमुव्हर्स् असो.पुणे)
(संस्थापक/अध्यक्ष-पी.के.फाऊंडेशन)

PK Group of Companies

शुभेच्छुक

मे.प्रताप खांडेभराड अर्थमुव्हर्स
पी.के.इन्फ्राप्रोजेक्ट अँन्ड रिऑलिटी (इं) प्रा.लि.
पी.के.रेडीमिक्स काँक्रिट प्लॅन्ट
पी.के.फाऊंडेशन, चाकण
पी.के.स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रन (एम.आर.)
पी.के.इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट (एम.बी.ए.,एम.सी.ए.) प्रस्तावित

ऑफीस : गट नं.३२१, पी.के.स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रन (एम.आर.) शाळेजवळ, चाकण-शिक्रापूर रोड, कडाचीवाडी, चाकण, ता.खेड, जि.पुणे.
फोन : ०२१३५-२५८८७६ फॅक्स : ०२१३५२८६३६६ E-mail : pkiripl2009@yahoo.com Website : www.pkgoc.com

# वागावे कसे


नाना वस्तू, व्यक्ती, प्रसंग आणि घटना यांनी गजबजलेल्या या जगाल जगावे कसे ? सुखी व्हावे कसे ? पहावे त्याकडे लक्ष जाते मिळेत ते घ्यावे वाटते. हाव संपत नाही. धाव थांबत नाही. धावाधाव करुनही मनाचे समाधान होत नाही. काय करावे ते कळत नाही. काहीच न करता भागत नाही. पण करावे काय आणि टाळावे काय ?

जे. कृष्णमूर्तींनी एक साधे वर्तनसूत्र सांगितले. ते म्हणाले, 'ॲक्ट बट डू नॉट रिॲक्ट' (Act but do not react) भुक लागली तर अन्न खा. कोणी परिचित भेटला तर हसतमुखाने त्याच्याकडे पहा. काम आनंदाने करा. असंबधित गोष्टीत चित्त गुंतवू नका. अनाठायी प्रतिक्रिया करू नका जरुर तेवढीच क्रिया करा. काम संपले की आपोआप थांबणे घडू द्या. यालाच पतंजली चित्तवृत्तींचा निरोध म्हणतात. हाच संदर्भ विचारात घेऊन स्वामी विवेकानंद आपल्या एका शिष्याला म्हणाले, 'तू तटस्थ रहा, स्वस्थ रहा. वस्तुस्थिती नीट पहा. जे उचित ते घडत राहील. उगाच उसने अवसान आणू नको. चेवाचेवाने काही करु नको. जीवनप्रवाह सहज वाहू दे.'

गीतेने स्थितप्रज्ञदर्शन घडविले आहे. अंतरात कामना नसावी. कर्तव्यात अगत्य असावे. हे तसे सोपे आहे. पण तसेच ते अवघडही आहे. आपल्या मनावर व्यग्रतेचे सतत अभ्र येते. ते येऊ न देता अंतर्यामी निरभ्र असावे. आपणास बोलता येते व बोलावे लागते. पण कधी वृथा बोलू नये. आपल्या बोलण्याकडे आपले लक्ष असावे. पाय आहेत म्हणून अकारण भरकटत राहू नये. डोळ्यांना दिसू शकते म्हणून दिसेल ते पाहत राहू नये. कर्मेंद्रिये आणि ज्ञानेंद्रिये यांचा संयमाने वापर करावा. अवेळी टी.व्ही. पहात बसणे, रेकॉर्ड लावणे, कुठे तरी सहज चक्कर मारणे, चौकात चार माणसे दिसली की आपणही तेथे हजेरी लावणे, कामाचे कागदपत्र वाचत असताना शेजाऱ्याशी चर्चा करणे, इतर व्यक्तींविषयी कारणाशिवाय त्यांच्या पश्चात बोलणे अशा सैरभैर दिशाहीन हालचालींमुळे मनाच्या शक्तींना ओहोटी लागते. त्यांचा क्षय होतो. हा जीवनशक्तीचा ऱ्हास नव्हे का ?

हे सगळे टाळणे अवघड नाही.

सदैव शांत, प्रसन्न आणि तणाव रहित राहावे. उमलत्या फुलाची आणि उगवत्या सूर्याची स्वाभाविकता आपल्या जगण्या वागण्यात असावी. आवश्यक ते उत्स्फूर्तपणे घडावे. अनावश्यक ते तत्परतेने टाळावे.



# योगदान

(अपंगांच्या समस्यांकडे सर्वांचे लक्ष वेधण्यासाठी)



श्री.प्रतापराव वामनराव खांडेभराड
(उपाध्यक्ष-पुणे जिल्हा अर्थमुव्हर्स असो पुणे)
(संस्थापक/अध्यक्ष-पी.के.फाऊंडेशन)

अपंग व्यक्तींमध्ये कित्येकांना हात आहे तर पाय नाही, पाय आहे तर हात नाही, कित्येकांना तर जागेवरुन नीट हलतासुध्दा येत नाही. कान असून ऐकता येत नाही, डोळे आहे तर दृष्टी नाही. मतिमंदांना तर मन आणि मेंदू असला तरी त्यात वैचारिक प्रगल्भता नाही.

अशा अवस्थेत त्यांच मन थाऱ्यावर कसं राहणार ? नैसर्गिकपणे ज्यांच्र मन थाऱ्यावर नसतं त्यांच सर्वस्व वाऱ्यावर जाण्याची शक्यता असते. मग सुजाण व सूज्ञ समाजाने त्यांना वाऱ्यावर सोडायचं का? तर, अजिबात नाही. उलट त्यांना सर्वतोपरी मदत करुन, त्यांच्या मनाला उभारी देऊन, आत्मविश्वास वाढवून त्यांच मन खंबीर बनविलं पाहिजे. मग शरीर अपंग असलं तरी ते कर्तृत्ववान होऊन सर्वकाही करु शकतील.

मुळात माणूस हा सुखात जगण्यासाठी तनाने, मनाने व धनाने समर्थ असावा लागतो. त्यांच्याकडे यातील विशेष असं काहीच नाही. समोर आहेत अनंत अडी अडचणी आणि फक्त दु:ख. दु:खाचा काठोकाठ भरलेला प्याला.

आर्थिक, राजकीय, सामाजिक समृध्दी वाढविण्यात रममाण झालेल्या माणसांकडून जीवनामध्ये भावनांचे रंगी-बेरंगी असंख्य प्यालेच्या प्याले रिचविले जातात पण त्यांच्या प्याल्यातील एक घोट ही पचविला जात नाही हे त्याचं दुर्दैवातील दुर्दैव !

मतिमंद हा तर गाडी, बंगला व ऐश्वर्य यांची कधीही, कुणाकडेही, काहीही मागणी नसलेला जगातील एकमेव घटक असावा. त्यांना कसल्याही संपत्तीची, श्रीमंतीची तसेच कुणाकडूनही सर्वस्वदानाची अजिबात गरज नाही.

**खरी गरज आहे ती फक्त वैयक्तिक व सामाजिक योगदानाची !**

शब्दांकन : श्री.प्रतापराव वामनराव खांडेभराड










।। विद्याप् एवम् सर्व सिध्दी ।।

PK Foundation

P K Group of Companies

मे.प्रताप खांडेभराड अर्थमुव्हर्स
पी.के.इन्फ्राप्रोजेक्ट ॲन्ड रिॲलिटी (इं) प्रा.लि.
पी.के.रेडीमिक्स काँक्रिट प्लॅन्ट

Phone : 02135-278876
Fax : 02135-286366
E-mail : pkiripl2009@yahoo.com
Website : www.pkgoc.com

पी.के.फाऊंडेशन, चाकण
पी.के.स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रन (एम.आर.)
पी.के.इंटरनॅशनल स्कूल
पी.के.टेक्निकल कॅम्पस् (एम.बी.ए.,एम.सी.ए.)

Phone : 02135-619100
E-mail : info@pkgroup.edu.in
Website : www.pkinstitute.edu.in

ऑफीस : गट नं.३२१, पी.के.स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रन (एम.आर.) शाळेजवळ, चाकण-शिक्रापूर रोड, कडाचीवाडी, चाकण, ता.खेड, जि.पुणे.

# शिक्षण - किती व कशासाठी ...

अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या प्रत्येक व्यक्तीच्या मूलभूत गरजा मानल्या जातात. सुखाने जगण्यासाठी या सर्वांची यथाप्रमाण पूर्तताही व्हावी लागते.

शिक्षण ही सतत उंचावत जाणारी अनेक मजली इमारत आहे. तिचे बांधकाम कधी संपत नाही. पण संपूर्ण इमारतीची आवश्यकता कोणालाच भासत नाही. गरजेएवढी जागा मिळाली म्हणजे पुरे असे वाटते.

या वास्तूत प्रवेश करण्यापूर्वी परिसरात पोहोचावे लागते, मग वास्तुप्रवेशासाठी निकटच्या प्रांगणात पदार्पण करावे लागते. त्यानंतर वास्तूच्या दारातून आत जाता येते. तिच्यात असणारी दालने अनेक असली तरी त्यांची रचना सारखीच वाटते. अधिक परिचयाने त्यातले बारकावे कळू लागतात.

प्रत्येकाने किमान व पायाभूत शिक्षण हे घेतलेच पाहिजे. अक्षरे, शब्द, संख्या, प्रमाण ही समज सुरुवातीला आल्याशिवाय पुढे जाता येत नाही.

कोणी किती पुढे जावे हे ज्याची त्याची कुवत, इच्छाशक्ती व एकूण परिस्थिती यावर अवलंबून असते.


यापैकी कुवत किंवा शिक्षणक्षमता व शिकण्याची इच्छा हे मानसिक घटक महत्वाचे ठरतात. अभिरुचीला तेवढेच महत्व आहे. अनेकदा असे घडते की, मुलांच्या इच्छेविरूध्द त्यांना एखाद्या शाखेत प्रवेश द्यावा किंवा घ्यावा लागतो. अनिच्छेने अंगीकारलेल्या कामात यश येण्याची शक्यता कमी असते. मुलांची झेप ही कमी अधिक असू शकते. ती विचारात घेऊन त्यांना शिकवावे हे बरे.

अनेकदा परिस्थिती मार्गात आडवी येते. संबंधित संस्थेत किंवा शाळेत पुरेसा व पात्र शिक्षकवर्ग नसतो. शिक्षण ही एक जोखीम आहे अशी जाण असणारी माणसे निवडली जात नाहीत. अनेक अशैक्षणिक बाबींचे पारडे जड होते व शिक्षण थोडे बाजूला पडते.

'शैक्षणिक वातावरण' हा महत्त्वाचा घटक होय. शिक्षणात डोळे आणि कान यांना फार महत्व असते. मुलांच्या नजरेसमोर काय यावे व कानावर काय पडावे याविषयीची तरल संवेदना शिक्षण क्षेत्रातील संचालकांना असावी. शाळेजवळ हॉटेल, थिएटर, बिअरबार, पानपट्टीची दुकाने नसावीत. शाळेच्या वास्तूत राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांचा संचार नसावा. लोकनेत्यांनी शिक्षण ही लोकसेवा मानावी.

सगळ्यात महत्त्वाचा आणि मूलभूत घटक म्हणजे शिकणारी व्यक्ती ! तिला शिक्षणाची ओढ असावी.

शिकणाराने प्रसंगी सकळ सुखांचा त्याग करावा, पण ज्ञानोपासनेत खंड पडू देऊ नये. शिक्षण हे तप आहे, संस्कारसाधना आहे हा भाव विद्यार्थ्यांच्या अंतर्यामी असावा. त्याने वाचन, लेखन आणि विचार यावर भर द्यावा. वळणदार अक्षर हे ज्ञानाचे वस्त्र असते हे विसरु नये. वाणी शुध्द असावी. अपशब्दांचा स्पर्श जिव्हेला घडू देऊ नये. शिक्षणाची परिणती चारित्र्यसंवर्धनात व्हावी. आदर्श शिक्षण हे 'मॅन मेकिंग, कॅरेक्टर बिल्डिंग' असे असावे, असे विवेकानंदांनी म्हटले आहे. शिक्षणाची सफलता त्यात आहे.



# यशाचा राजमार्ग

जागतिकीकरणातील स्पर्धेच्या या गतिमान युगात नोकरी व उद्योगधंद्यांच्या हजारो संधी उपलब्ध असताना, केवळ इंग्रजी भाषेच्या अभावामुळे आपण मागे पडतो. हातच्या संधी जातात. पदरी निराशा येते. तसेच व्यक्तिमत्व विकासाकरीता देखील इंग्रजी लिहिता, वाचता व बोलता येणे यालाही विशेष महत्त्व आहेच म्हणून विशेष यश संपादन करण्याकरीता इंग्रजी भाषेला पर्याय नाही.

इंग्रजी भाषा म्हणजे महत्वाकांक्षी आणि उज्वल भवितव्याची आस बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी **'यशाचा राजमार्ग'** ठरते. म्हणून या भाषेवर प्रभुत्व मिळविण्याकरीता मनातील आशावाद, इच्छाशक्ती आणि उत्साह वाढविणे महत्वपूर्ण ठरते.

संत ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी, तुकोबांची गाथा, समर्थांचा दासबोध तसेच भगवत्‌गीता हे मानवाच्या संपूर्ण कल्याणासाठी असणारे साहित्य, हे मानवी जीवनाचे सार आहे तरी देखील सबंध विश्वाला पुरुन उरणारे हे तत्त्वज्ञान केवळ भाषेच्या अभावामुळे जगापर्यंत पोहचू शकले नाही. इतकेच नव्हे तर काही शतके राष्ट्रीयच नव्हे, तर प्रांतीक सिमादेशील ओलांडू शकले नाही.

संत ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी, त्यांचे विचार म्हणजेच साक्षात ज्ञानाचा ईश्वर जर या भाषेच्या अभावामुळे जगभर पोहचू शकले नाहीत. तर सर्व सामान्य माणूस जगाची संपर्क भाषा ठरलेल्या इंग्रजीविना कसा जगापर्यंत पोहोचणार ?

म्हणून आपली इच्छा असो किंवा नसो काळाची गरज म्हणून आपल्याला ही भाषा परकीय असली, तरीही शिकावीच लागेल.

इंग्रजीबद्दलची भीती, मनातील न्यूनगंड, मरगळ घालवून आत्मविश्वास, सकारात्मकता व चैतन्य वाढवून इंग्रजीचा अंगिकार करणे गरजेचे ठरते.

उपलब्ध संगणकाची, विज्ञानाची व जगभरातील बहुतेक व्यवहाराची भाषा इंग्रजीच असल्याने इंग्रजीविना विश्वसंचार करणे व विश्वजीत होणे, ही कल्पनाच अशक्यप्राय वाटते.

आपण आपले सर्व कौशल्य व कल्पनाशक्ती पणाला लावून जरी ही भाषा आत्मसात केली, तरी आपण आपली राष्ट्रभाषा हिंदी व मातृभाषा मराठी यांचा विसर पडू देता कामा नये. तसेच, राष्ट्रभाषा हिंदी व मातृभाषा मराठी यांचे किमान अस्तित्व अबाधित राहील, याचे प्रत्येकाने भान ठेवायला हवे.

शब्दांकन : श्री.प्रतापराव वामनराव खांडेभराड












श्री.प्रतापराव वामनराव खांडेभराड
(खजिनदार,पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस)
(संस्थापक/अध्यक्ष-पी.के.फाऊंडेशन)
(उपाध्यक्ष-पुणे जिल्हा अर्थमुव्हर्स असो.पुणे)


॥ विद्यात् एवम् सर्व सिध्दी ॥

PK Foundation
Mission of Pratap Khandebharad
P K Group of Companies

मे.प्रताप खांडेभराड अर्थमुव्हर्स
पी.के.इन्फ्राप्रोजेक्ट अँन्ड रिअॅलिटी (इं) प्रा.लि.
पी.के.रेडीमिक्स काँक्रीट प्लॅन्ट
पी.के.फाऊंडेशन, चाकण
पी.के.स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रन (मतीमंद मुलांची शाळा)
पी.के.इंटरनॅशनल स्कूल (सी.बी.एस्.ई.)
पी.के.टेक्निकल कॅम्पस् (इंजिनिअरींग,डिप्लोमा,मॅनेजमेंट)

Phone : 02135-619100
E-mail : info@pkgroup.edu.in
pkiripl2009@yahoo.com
Website : www.pkinstitute.edu.in
www.pkgoc.com

ऑफीस : गट नं.३२१, पी.के.स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रन (एम.आर.) शाळेजवळ, चाकण-शिक्रापूर रोड, कडाचीवाडी, चाकण, ता.खेड, जि.पुणे.

# मुलावर प्रेम 'यासाठी' आणि 'असे' करावे


**पालकांचे मुख्य तीन प्रकार बेफिकिर, रागीट आणि लाडाऊ**

पहिल्या प्रकारच्या बेफिकिर पित्याबद्दल, त्या पित्याच्या दुर्बल आणि म्हाताऱ्या वयात, पुत्रही बेफिकिरी दाखवतात. दुसऱ्या प्रकारच्या रागीट मातापित्यांच्या अतिरागीटपणामुळे, लहानपणी भ्यायलेली मुले, मातापित्यांनाही त्यांच्या म्हातारपणी भिववतात. तिसऱ्या प्रकारचे म्हणजे मुलांचे अतिलाड करणारे पालक, (जे स्वतःच्या पित्याकडे दुर्लक्ष करुन आपल्या मुलावर प्रेम करणारे असतात.) त्यांची मुले, तोच कित्ता गिरवतात. म्हणजे अशी मुले मागे वळून पित्यावर प्रेम करण्यापेक्षा, स्वतःच्या मुलांवर प्रेम करतात. अतिलाड करणाऱ्या पित्यांचे विश्रांतीचे वय, पुन्हा प्रेमशून्यच राहते.

हे तर्कशुध्द निष्कर्ष आहेत. बव्हंशी असे होते. पण माणसाचे मन, भावनांच्या प्रांतात केवळ तर्काच्या आसऱ्याने रहात नसते. म्हणून काही उलटसुलटही होते. छळ सोसलेली मुले, पालकांना म्हातारपणी बळ देतात. पण त्याच अपवादाचे दुसरे टोक म्हणजे, लहानपणी काही प्रेम मिळालेली मुले, पालकांच्या अखेरच्या दिवसांचा उकिरडा करु शकतात.

या सगळ्या गोंधळातून बाहेर येण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे मुळात प्रत्येक मुलाला लहानपणी न्यायाचे वागवणे. एकदा न्याय म्हटल्यावर, त्यात एका बाजूने प्रेम आले, तसे दुसऱ्या बाजूने शिस्तीपुरते कष्टही आले. हाच तर्कशुध्द मानदंड पुढे ठेवून, 'मनशक्ती' प्रयोगकेंद्राने, मुलांच्या सर्वांगीण आवश्यकतांच्या शोधासाठी, अनेक तऱ्हेचे प्रयोग उभारले. कॉम्प्युटर्स, यंत्रे, साहित्य, तज्ञ, इत्यादी विविध सहाय्य घेतले. मेंदूशास्त्र, शरीरशास्त्र, पदार्थविज्ञान शास्त्र, सूक्ष्म विज्ञान म्हणजे क्वॉंटम्शास्त्र, मानसशास्त्र यांच्या अभ्यासाचे तटबंद बांधले, बालकल्याणाच्या कामाचे डोंगर उभारले. त्या डोंगराच्या यशनिष्कर्षाची माहिती देणारे हे अत्युच्च शिखर, म्हणजे 'यशशिखर'.

मुलांच्या अवघड परीक्षाकाळात शरीराच्या मनाच्या, बुध्दीच्या तक्रारी समजून घेऊन, त्यांना हसरे ठेवण्याची जिद्द, 'मनशक्ती' ने इथे एका उंच पातळीवर नेली आहे. त्या उंचीवर तुमच्या मुलाचे, आणि पर्यायाने तुमचे स्वतःचे भविष्य आकार घेईल. पालकांनी स्वतःचा विश्रांतीकाळ निरामय ठेवण्यासाठी मुलावर प्रेम करावे; आणि ते कसे करावे याचे अनेक प्रयोग आणि उपाय सांगण्यासाठी, यशशिखर तुम्हाला सादर होत आहे.



# स्वाभिमान

स्वाभिमान ही छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्राची परंपरा आहे. सह्याद्रीच्या कुशीत जन्मलेला आणि येथील मातीत वाढलेला प्रत्येक माणूस स्वाभिमानच आहे. माणसांना आपापल्या जाती-धर्माचा, आपल्या भाषेचा, राज्याचा मान स्वाभिमान साहजिक असायलाच हवा. कारण ती स्वाभिमानी राजांची व त्यांच्या स्वराज्याची ची परंपराच आहे.

स्वाभिमानी राजे त्यांच्या प्रजाहितार्थ कार्य-कर्तृत्वामुळे तेहतीस कोटी देवांच्या पंक्तीत अधिक उठुन दिसतात. कारण कसल्याही भेदभावाला थारा न देता जात-पात, पंथ-प्रदेश यांचं बंधन नसलेला सर्वधर्मसमभाव त्यांनी जोपासला होता.

राजे शिवछत्रपतींनंतर त्यांच्या विचारांचा वसा आणि वारसा गांधी, शाहू, फुले, आंबेडकर, यशवंतराव चव्हाण अशा काही थोर महापुरुषांनी चालविला. देशाला न्याय, समता, बंधुता, आर्थिक स्थैर्य देण्यासाठी आयुष्य वेचले. त्यामुळे ही माणसे राजांप्रमाणेच देवत्वाला पोहोचली. कारण अखंड समाजकारणाचाच ध्यास घेणाऱ्या या महात्म्यांना कधीही राजकारणाची बाधाच झाली नव्हती.

राजकारणविरहीत समाजकारण करुन कुठल्याही लौकीकाची अपेक्षा न ठेवता समर्पित भावनेने जीवन जगुन समाजापुढे हिमालया सारखा उतुंग आदर्श ठेवणाऱ्या आमच्या युगपुरुषांचा वारसा आजकाल आम्ही का विसरत चाललो आहोत ? हेच कळत नाही.

स्वाभिमानाचं (मतलबाचं) असं कोणतं किल्मीष आमच्यात भिनलयं, की ज्यामुळे आम्ही आमच्या सोईनुसार युगपुरुषांच्या वाटण्या करुन आम्ही आमच्याच घरात भेदा-भेदीच्या भींती उभ्या करु लागलोय? खरंतर हा अधिकार आम्हाला दिलाच कुणी? वैश्विक विचारधन असणारी ही देवत्वाला पोहोचलेली माणसे त्यांच्या वाटण्या करण्याच्या योग्यतेचे आम्ही आहोत का? नेमकं काय चाललयं हेच कळनासं झालयं !

स्वाभिमानी बाणा असणाऱ्या आमचा हा कोता विचार आहे, हा आत्मघातकी विचार आहे. ज्यांनी एकात्मतेसाठी अक्षरश: उत्सव सुरु केले त्या एकात्मतेला बाधा आणणारा विचार आहे. हे हुशार असणाऱ्या आणि आधुनिक युगात वावरणाऱ्या आम्हाला केव्हां कळणार?

माणूस स्वाभिमानी असलाच पाहिजे पण तो त्याचा खोटा अहंकार अथवा मतलब असता कामा नये. एवढं तत्व प्रमाण मानून आपण आपला विचार आणि आचार तसा ठेवला तर तो आपला खरा स्वाभिमान ठरेल, कि ज्याला कुणीही कधीही धक्का लावण्याचे धाडस करणार नाही.

शब्दांकन : श्री.प्रतापराव वामनराव खांडेभराड












श्री.प्रतापराव वामनराव खांडेभराड
(अभिनवार,पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस)
(संस्थापक/अध्यक्ष-पी.के.फाऊंडेशन)
(उपाध्यक्ष-पुणे जिल्हा अर्बोपुरबर्स असो.पुणे)


|| विद्यार्थ एवम् सर्व सिध्दी ||

PK Foundation
P K Group of Companies

मे.प्रताप खांडेभराड अर्थमुव्हर्स
पी.के.इन्फ्राप्रोजेक्ट ॲन्ड रिॲलिटी (इं) प्रा.लि.
पी.के.रेडीमिक्स कॉंक्रीट प्लॅन्ट
पी.के.फाऊंडेशन, चाकण
पी.के.स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रन (एम.आर.)
पी.के.इंटरनॅशनल स्कूल
पी.के.टेक्निकल कॅम्पस्

Phone : 02135-278876
Fax : 02135-286366
E-mail : pkiripl2009@yahoo.com
Website : www.pkgoc.com

Phone : 02135-619100
E-mail : info@pkgroup.edu.in
Website : www.pkinstitute.edu.in

ऑफीस : गट नं.३२१, पी.के.स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रन (एम.आर.) शाळेजवळ, चाकण-शिक्रापूर रोड, कडाचीवाडी, चाकण, ता.खेड, जि.पुणे.

# शाळा कॉलेजमधले तास

शाळा – कॉलेजमधले तास ही वस्तुत: एक पर्वणी ठरावयास हवी. उमलत्या बुध्दीची मुले आणि मुली ! ओथंबलेल्या मनाने वर्गात बरसत रहाणारे अध्यापन मेघ ! सुंदर मजकुराने सजलेला फळा. अवघा वर्ग म्हणजे एक लेणे वाटावयास हवे. पण तसे दिसत नाही.

उदास वृत्तीचे शिक्षक ! कसलीही साधना, पूर्वचिंतन न करता वर्गात प्रकट होणारे व्यवस्थापनाचे दूत ! आपल्या आवडीप्रमाणे घडणारी माणसांची निवड ! त्यांनी भर वर्गात काढलेले ज्ञानाचे वाभाडे आणि मुलांच्या बुध्दीवर काढलेले ओरखडे !

मुलांच्या तरी जीवनात व मनात ओढ असावी ना ? अनेक विद्यार्थी हॉटेल आणि थिएटर याकडे सहज बुध्दीने ओढले जातात. टी.व्ही. टक लावून पाहतात पण चांगल्या अध्यापकांचे शब्द एकाग्रतापूर्वक, विचारपूर्वक ऐकत नाहीत.

चांगल्या शिक्षकाच्या एका तासाला जे मिळते जे जगभर फिरुनही मिळणार नाही. सरांनी आणि बाईंनी खूप विचार केलेला असतो, अभ्यास केलेला असतो. मुलांनी प्रतिसाद दिला तर ते वर्गात बहरत रहातात मुलांनी हे रहस्य जाणावयास हवे.

अध्यापक किंवा प्राध्यापक हा कोणी अभिनयकुशल नट किंवा प्रभावी वक्ता असला पाहिजे, असे नाही. आपला विषय समजलेला व मुलांना तो तन्मयतेने समजावून देणारा त्यांचा वर्गमित्र म्हणूनही शोभला पाहिजे.

अनेक शिक्षक अशैक्षणिक उलाढालीत रमतात. राजकारणाची चव चाखतात. थोरामोठ्यांच्या, अधिकाऱ्यांच्या आसपास कामाशिवाय घोटाळतात. हळूहळू ते योग्यतेपासून ढळतात. जे शिक्षणसंस्था काढतात व चालवतात ते शिक्षणप्रेमी असतीलच असे नाही. त्यांच्या व्यक्तिगत आकांक्षांच्या परिपूर्तीचे एक हुकमी साधन म्हणून ते शाळा–कॉलेज काढतात व चालवतात. पुण्या–मुंबईतील अनेक शिक्षणसंस्था हाडाच्या शिक्षकांनी काढल्या व चालवल्या. डॉ. आंबेडकर, कर्मवीर भाऊराव हे बहुजन समाजाचे ज्ञानदूत याच भावनेने प्रेरित झाले होते.

तो काळ मागे पडत चालला. पण तो विचार मुलांनी व शिक्षकांनी सोडावा. आपला प्रत्येक तास हे सुंदर ज्ञानस्वप्न मानावे आणि या स्वप्नातच रहावे.

# संस्कार, शिक्षण आणि बेकारी

शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार सर्वत्र झाला. शिक्षणाची गंगा खेड्या-पाड्यापर्यंत पोहचली. माणसं शिक्षीत-उच्चशिक्षीत झाली. जोडीला संगणक शिक्षणाने क्रांती घडविली. संगणकावर एका क्लिकमधे विश्वसंचार सहज शक्य झाला. संपुर्ण जग माणासाच्या मुठीतं आल.

एका बाजुला बुध्यांक वाढला, दुसऱ्या बाजूला संवेदना क्षीण होत चालल्या, भावना बोथट होवू लागल्या. माणसे कार्पोरेट झाली पण त्यांच्यातील को ऑप-रेटीव्हनेस नाहिसा होत चालला. शिष्टाचाराची जागा भ्रष्टाचाराने घेतली. माणसाला सर्वार्थाने यशस्वी करणारे संस्कारधन फक्त नावाला उरलं.

पद, पत, प्रतिष्ठा, पैसा, श्रीमंतीच्या लोभापायी लाज, भीड, निती, प्रामाणिकपणा, कष्टाळूपणा सुटला. प्राप्त परिस्थितीमध्ये शिक्षण घेणारा अथवा काम करणारा आधुनिक एकलव्य अभावालाच उरला. सर्वच क्षेत्रात उपलब्ध मनुष्यबळ हजारो-लाखोंच्या घरात गेलं पण उत्तम मेहनती, कुशल, कर्तबगार कारागीर मात्र शोधूनही सापडेना.

आज सर्वच क्षेत्रात बेकारी-बेकारी म्हणून पुर्ती बोंबा-बोंब चालू आहे. यांमध्ये अशिक्षितांबरोबर शिक्षित-उच्चशिक्षितांचीही संख्या कमी नाही. सर्व प्रकारच्या योग्यता, पात्रता आणि क्षमता असतानाही असे का व्हावे ? मला वाटते श्रम आणि चांगली सवय हे देखील संस्कारच आहेत. आपल्यामधे शिक्षण असले तरी संस्कारांचा अभाव जाणवतो, म्हणून बेकारी (विशेषत: शिक्षितांमधील) म्हणजे दुसरं-तिसरं काही नसुन संस्कारापुढं झालेला शिक्षणाचा पराभव वाटतो. म्हणून आपणाला श्रम आणि शिष्टाचार यांना महत्व द्यावचं लागेल. त्यातून अनेक समस्या आपोआप सुटू शकतील.

आपली इच्छा असो वा नसो<br>
संस्कारांची हेळसांड थांबवुन<br>
संस्काराची कास धरावीच लागेल.<br>
कारण मानवी जीवनाचं सारं संस्कारात दडलयं !

शब्दांकन : श्री.प्रतापराव खांडेभराड












श्री.प्रतापराव वामनराव खांडेभराड<br>
(खजिनदार-पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस)<br>
(संस्थापक / अध्यक्ष-पी.के. फाऊंडेशन)<br>
(उपाध्यक्ष-पुणे जिल्हा अर्थमुव्हर्स असो.पुणे)


।। विद्यया एव सर्वं सिध्दी ।।

PK Foundation

Mission of Pratap Khandebharad

P K Group of Companies

मे.प्रताप खांडेभराड अर्थमुव्हर्स

पी.के.इन्फ्राप्रोजेक्ट ॲन्ड रिॲलिटी (इं) प्रा.लि.

पी.के.रेडीमिक्स काँक्रीट प्लॅन्ट

पी.के.फाऊंडेशन, चाकण

पी.के.स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रन (मतीमंद मुलांची शाळा)

पी.के.इंटरनॅशनल स्कूल (सी.बी.एस्.ई.)

पी.के.टेक्निकल कॅम्पस् (इंजिनिअरींग,डिप्लोमा,मॅनेजमेंट)

Phone : 02135-619100<br>
E-mail : info@pkgroup.edu.in<br>
pkirlpl2009@yahoo.com<br>
Website : www.pkinstitute.edu.in<br>
www.pkgoc.com

ऑफिस : गट नं.३२१, पी.के.स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रन (एम.आर.) शाळेजवळ, चाकण-शिक्रापूर रोड, कडाचीवाडी, चाकण, ता.खेड, जि.पुणे.



# वडिलधाऱ्यांनी व्यास व्हावे

प्रत्येक घरात एखादे आजोबा असतात. एखादा नातूपण असतो. आजोबांचे जग मागे पडलेले असते. नातवाचे जग नव्याने उदयाला आलेले असते. आजोबा विवेकानंदांवर व्याख्याने देतात. नातू टी.व्हि. वर चित्रपटात अमिताभला पाहतो. विवेकानंद आणि अमिताभ या दोघांत मोठे कोण ? कधी तरी गंमत म्हणून हे सांस्कृतिक प्रश्नचिन्ह पुढे उभे ठाकते. लहानांना अमिताभ आवडतो. अमिताभला विवेकानंद आवडतो हे कोणाला माहीत नसते. पण दोन पिढ्यांची एक लुटीपुटीची लढाई घराघरात घडते. मोठे कोण ? अमिताभ की विवेकानंद ? काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत, न्यूयॉर्कपासून लंडनपर्यंत घरोघरी पोहोचलेला अमिताभ मोठा, की शिकागोच्या धर्मपरिषदेत प्रभाव पाडणारे व चरित्रग्रंथरुपाने मागे उरणारे विवेकानंद मोठे ? अमिताभच्या लोकप्रियतेचे पारडे जड होते. एवढ्यात अनेक पावसाळे पाहणारे आजोबा विचारतात, असे जर एखादा चित्रपट काढावयाचा झाला, तर तो कोणाच्या जीवनावर काढावा लागेल? विवेकानंदांच्या की अमिताभच्या ? अर्थात चित्रपट हा स्वामींच्या जीवनावर काढता येईल. त्या चित्रपटात अभिनेता म्हणून कोण काम करील ? स्वतः स्वामीजी की अमिताभ ? याचे सहज उत्तर हे की 'अमिताभच' हे करील म्हणजे स्वामीजींची भूमिका अमिताभला करावी लागेल. अमिताभ पूर्वी होऊन गेला असता आणि स्वामीजी आज असते तर काय घडले असते? जाणती नातवंडे हे मान्य करतील की काहीही झाले असते तरी ती विवेकानंदांची महत्ता कमी झाली नसती. ते इतिहासपुरुष ठरले असते. अमिताभचे तेज त्याच्या भूमिकेत प्रकट झाले असते. जर हसत खेळत, नातवंडांशी संवाद साधत, घराघरातील वडिलधारे बाळगोपाळांच्या जगात रमले तर किती बरे होईल ? जी बाळे उद्या रामायण घडवतील त्यांच्या जीवनाचे महाभारत वडीलधाऱ्यांनी अभ्यासावे व त्यांच्या जीवनात व्यासांचे स्थान मिळवावे.

# मा.श्री.प्रतापराव खांडेभराड यांना
# वाढदिवसानिमित्त सादर अर्पण ....



आली जीवना शान आमुच्या आली जीवना शान ।। धृ ।।
माता-पिता बघ जन्मा कारण पालन-पोषणा तुझेच अंगण ।।१।।

होतो आम्ही मुले शेंबडी, कुणी दिली ना अक्कल कवडी
जीवन जगण्याचे आम्हाला तूच दिले रे भान ।।२।।

सकलाप्रती तव एकच भाषा, थारा ना तव मनात द्वेषा
तप आपुले करिशी पूर्ण साहुनीया अपमान ।।३।।

दारा तव ना कुलुन काठी, जेवणातही नसते दाटी
गृहस्थींच्या जीवनातही संतांचा तव मान ।।४।।

मेज-खुर्चीची नसते आस, संसाराचा मनी न ध्यास
दोन वाकडे शयन मंदिरी घेशी निद्रा सान ।।५।।

कल्पवृक्षावर जीवन नवे, घरटी करिती पक्षी थवे
फळा-फुलांनी बहरुन फांद्या मुकुटी हिरवे पान ।।६।।

## हार्दिक शुभेच्छा

झरा मायेचा झुळझुळणारा, सदैव हृदयी पाझरणारा
बाधा नसते अवर्षणाची ऋतु तुकविती मान ।।७।।

सदाचरणाचे गाऊन पाळे, जनजीवनी टाकून सडे
सडे टाकिता प्रबोधनाचे क्रांतीवर तव ध्यान ।।८।।

नीती तुझी रे आहे निर्मळ, सुधारणेची उरात तळमळ
तळमळणाऱ्या हृदयाशी तव नसे गर्व अभिमान ।।९।।

शून्यातूनी तू विश्व घडविता, विना मशागत रजा न घेता
दिर्घायू तव जीवनवेलीची होवो पूर्ण ''कमान'' ।।१०।।

श्री. दिलपाक एम.डी. (प्रकाश)
(पी के ग्रुप ऑफ कंपनीज)

# थोरांचे विचार

आमच्या घरी धन म्हणजे शब्दांची रत्ने आणि शस्त्रे आहेत, त्यांच्याच आधारे आम्ही जिंकण्याचा प्रयत्न करु. शब्दांमुळेच आमच्या जीवाला आहार मिळतो. आम्ही जनसमुदायाला शब्दांचे द्रव्य वाटू लागते. शब्द हा आमचा देव आहे, ज्याच्या आधारे आम्ही ईश्वराची पूजा करु.

– संत तुकाराम



ज्याला नीट वाचता येत नाही आणि ज्याला पुस्तकाची नीट काळजी घेता येत नाही, असा माणूस मूर्ख असतो.

– संत रामदास



मी स्वर्गापेक्षा चांगल्या पुस्तकांचे स्वागत करीन, कारण ज्या ठिकाणी चांगली पुस्तके असतात, त्या ठिकाणी स्वर्ग आपोआप निर्माण होतो.

– लोकमान्य टिळक



वाचनाची कला शिकून घेण्यासाठी उपाशी शोध घेणारे, तहानलेले मन जोपासावे लागते. त्यात तुमच्या मनातील प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतात. वाचताना ज्ञानाची अनेक दालने उघडतात. चांगल्या पुस्तकाशिवाय एखादे घर म्हणजे दुसरे स्मशानच आहे.

– स्वामी विवेकानंद




बहूजन समाजाला उच्च वर्गीयांच्या धार्मिक आणि सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी विषमता आणि जातीयता मिटवण्यासाठी वाचन करा आणि शिकत रहा.

– राजर्षी शाहू महाराज



अज्ञानी असणे हा गुन्हा नाही, पण ते अज्ञान दूर करण्यासाठी धडपड न करणे, हा एक गुन्हाच आहे.

– साने गुरुजी



# पी के फाऊंडेशन

संचलित -

पी के स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रेन्स (एम.आर.)

पी के इंटरनॅशनल स्कूल (सी.बी.एस्.ई.)

पी के कॉमर्स अॅन्ड सायन्स ज्युनिअर कॉलेज

पी के टेक्नीकल कॅम्पस्

(इंजिनिअरींग, डिप्लोमा, मॅनेजमेंट)



## Vision - स्वप्न



लोक, समाज आणि राष्ट्र यामधील मानवता, वैशिष्टे आणि कौशल्ये यांचा भविष्यातील प्रगतीकरिता विचार करणारी व स्व:ताच्या वर्तनामध्ये व्यक्ती व समाजहित, राष्ट्रप्रेम व मानवतावाद जपणारी विलक्षण बुद्धीमान, सुसंस्कृत, प्रामाणिक, कष्टाळू तरुणाई घडविणे, की जी स्व:ताच्या ज्ञानाच्या माध्यमातून समाजाच्या आर्थिक उन्नतीकरिता सतत कार्यमग्न राहुन नवीन ध्येये, नवीन संकल्पना यांचा उपयोग समाज, राष्ट्र आणि मानव उत्पन्नाकरिता करतील.

## Mission - ध्येय

लाज, भीड, नीती, प्रामाणिकपणा, कष्टाळूपणा सुटून देणारा नागरिक तसेच स्वयंरोजगार व उद्योजक घडविण्यांसाठी तरुणांची सुशिक्षीत, सुसंस्कृत पीढी तयार करणे. त्याचबरोबर, त्यांच्या व समाजाच्या/ देशाच्या सर्वांगीण विकास व आरोग्याकरिता तरुणांना सांस्कृतिक दृष्ट्या सक्षम व समृदध बनविणे.



**भेट अंत:करणापासून**

**प्रिय विद्यार्थी, शिक्षक, पालक .......................... यांस सप्रेम नमस्कार !**

मानवी जीवनामध्ये सर्वार्थाने यशस्वी होण्यासाठी व आनंदी जीवन जगण्यासाठी अत्यावश्यक गोष्ट कोणती ? कि जी जीवनात यशपुर्ती ध्येयपुर्ती, कार्यसिद्धी करता मदत करते. तर ती गोष्ट म्हणजे दुसरे – तिसरे काही नसून 'शिक्षण' ही होय. उत्तम शिक्षण हेच समाज, राष्ट्र आणि मानवतेसाठीची उत्तम सेवा आहे. तसेच सर्व सुधारणा व सर्व समस्यांचं निराकरण करण्याच सामर्थ्य शिक्षणातच दडलयं. म्हणून आम्ही पी.के. फाउन्डेशन अंतर्गत चालणाऱ्या शिक्षण शाखांच्या माध्यमांतून, मुलांचा शैक्षणिक पाया मजबूत करत प्राथमिक ते तंत्रशिक्षणासह पदव्युत्तर स्तरापर्यंतचे दर्जेदार शिक्षण समाजातील विविध घटकांपर्यंत पोहचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करित आहोत. तसेच या सुसंस्कृत देशाची सांस्कृतीक सिद्धता ही उपेक्षित–दुर्लक्षित,अंध,अपंग,मतिमंद,गतीमंदांसह तत्सम घटकांच्या उन्नतीमधे सामावलेली आहे. म्हणूनच संस्थेमार्फत मोफत स्वरुपात मतिमंद मुलांची निवासी/अनिवासी शाळा चालवून त्यांना त्यांचा हरवलेला आनंद मिळवून देण्याचा प्रयत्न करित आहोत. अशा उद्दिष्टांकरिताच पी.के. फाऊंडेशन या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.

शिक्षणाने माणसाच्या पोटापाण्याचा प्रश्न मिटतो. पण यशाच अतिउच्च शिखर गाठण्यासाठी शिक्षणाबरोबर संस्कार अतिमहत्वाचे असतात. 'संस्काराशिवाय शिक्षणाला अर्थ नाही' या तत्वाशी मी संपूर्ण सहमत असून, विद्यार्थ्यांना अध्यापकांच्या माध्यमातून संस्कार, व्यावसायीक कौशल्य, समयसुचकतेच ज्ञान, देण्याचा प्रयत्न करतो आहे. मला केवळ पोशाखी विद्यार्थी बनविण्यात अजिबात स्वारस्य नाही. म्हणून येथे शिकणारा प्रत्येक विद्यार्थी ज्ञान व संस्काराच्या बाबतीत परिपुर्ण होवून, असेल त्या क्षेत्रात, त्याने जीवनातील यशाचे अतिउच्च शिखर गाठावे. हे एकमेव ध्येय मी माझ्या नजरेसमोर ठेवले आहे. येथील विद्यार्थ्यांच्या अंगी फक्त तांत्रीक ज्ञान व सर्जनशील स्वभावच नाही तर त्याही पुढे तो एक उत्कृष्ट माणूस झाला पाहिजे. त्याला कर्तव्याची परिपूर्ण जाण व सामाजिक भान असायला हवे. ही माझी अपेक्षा आहे.

**आजचं गतीमान जीवन. कमी होत चाललेलं आर्युमान यांमुळे**
**संधीची वाट बघणारा नव्हे तर संधी निर्माण करणारा युवक निर्माण करणे.**
**तसेच**
**नैतिकतेचे अधिष्ठाण असणारा अत्यंत प्रामाणिक/सुसंस्कृत माणूस होण्यातच आपल्या**
**जीवनाची सार्थकता आहे. अशा उच्च ध्येयाने झपाटलेले विद्यार्थी घडविणे**
**त्याचबरोबर**
**बांधीलकी असणारे. समर्पीत वृत्तीचे शिक्षक बनविणे हे मी माझ्यासमोरील सर्वात मोठे आव्हान समजतो.**

यातूनच व्यक्तिचा व समाजाचा उत्कर्ष साधणे सहजशक्य आहे. यावर माझा संपूर्ण विश्वास असुन, अशा उच्च ध्येयांसाठी, सर्व सोयी–सुविधांयुक्त असणारी, आमुची संस्था शैक्षणिक विश्वात सक्षमपणे वाटचाल करित आहे. मनाच्या गाभाऱ्यात पेटुन ज्वाळा बाहेर पडलेल्या या शैक्षणिक यज्ञाविषयी अधिक जाणून घ्यावयाचे असल्यास आपण कधीही आमुच्या शैक्षणिक संकुलांस आवश्य भेट घ्यावी.

**संस्थापक-अध्यक्ष**
**पी के फाऊंडेशन**

# पी.के.स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रेन्स (एम.आर.)

मतीमंद मुलांची निवासी/अनिवासी शाळा




पी.के.स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रेन्स (एम.आर.)



एम.आर.स्कुलमधील विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण सुरु असताना ...



एम.आर.स्कुलमधील विद्यार्थी खेळाचा आनंद घेताना ..



एम.आर.स्कुलमधील विद्यार्थी खेळाचा आनंद घेताना ..



एम.आर.स्कुलमधील विद्यार्थ्यांची जेवणाची सोय



एम.आर.स्कुलमधील विद्यार्थ्यांची राहण्याची सोय

# पी. के. इंटरनॅशनल स्कूल

सी.बी.एस.ई.अभ्यासक्रम



पी.के.इंटरनॅशनल स्कूल (सी.बी.एस.ई.) मधील विद्यार्थी वर्ग



पी.के.इंटरनॅशनल स्कूल (सी.बी.एस.ई.) विद्यार्थ्यांचे कराटे प्रशिक्षण ...




पी.के.इंटरनॅशनल स्कूल (सी.बी.एस.ई.) विद्यार्थी सहल



पी.के.इंटरनॅशनल स्कूल (सी.बी.एस.ई.) एकत्रित फोटो



पी.के.इंटरनॅशनल स्कूल (सी.बी.एस.ई.) विद्यार्थी कंपनी सहल



पी.के.इंटरनॅशनल स्कूल (सी.बी.एस.ई.) विद्यार्थ्यांचे क्रिडागंणावर खेळ

# पी. के. कॉमर्स ॲन्ड सायन्स ज्युनिअर कॉलेज



पी.के.कॉमर्स ॲन्ड सायन्स ज्युनिअर कॉलेजचे विद्यार्थी



पी.के.कॉमर्स ॲन्ड सायन्स ज्युनिअर कॉलेजचे विद्यार्थी

# पी.के.टेक्नीकल कॅम्पस्

## (इंजिनिअरींग, मॅनेजमेंट ॲन्ड अर्किटेक्चर)



सुसज्ज कॉलेज कॅम्पस्



पी.के.टेक्नीकल कॅम्पस् - कॅन्टीन



पी.के.टेक्नीकल कॅम्पस् - कॉम्प्युटर सेंटर



पी.के.टेक्नीकल कॅम्पस् - कॉम्प्युटर लॅब



पी.के.टेक्नीकल कॅम्पस् - क्लास रुम



पी.के.टेक्नीकल कॅम्पस् - सेमीनार हॉल



पी.के.टेक्नीकल कॅम्पस् - ग्रंथालयपी.के.टेक्नीकल कॅम्पस् - ग्रंथालय




पी.के.टेक्नीकल कॅम्पस् - वर्कशॉप



पी.के.उत्सव २०१२




पी.के.उत्सव २०१३



indira gandhi sadbhavna award

Presented to

Pratap W. Khandebharad

For Outstanding Individual Achievements
& Distinguished Services to the Nation
by
Hon'ble Dr. Bhishma Narain Singh
Former Governor of Tamil Nadu & Assam
on the 92nd Birth Anniversary of
Late Smt. Indira Gandhi
18th November, 2010 - New Delhi

S.P. Singh
Secretary

CITIZENS INTEGRATION PEACE SOCIETY (REGD.)




इंदिरा गांधी सद्‌भावना अवार्ड - नवी दिल्ली येथे स्विकारताना
पी.के.फाऊंडेशनचे संस्थापक प्रताप खांडेभराड

# भावपूर्ण श्रध्दांजली



## हिंदुहृदयसम्राट


## स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे

# भावपूर्ण श्रध्दांजली



## उद्योगपती
## स्वर्गीय निळकंठ कल्याणी

# भावपूर्ण श्रध्दांजली



## वृक्षमित्र

# स्वर्गीय मोहन धारीया

# भावपूर्ण श्रध्दांजली



## अंधश्रध्दा निर्मुलन समिती चे

## स्वर्गीय नरेंद्र दाभोळकर

# पसायदान

आतां विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें।
तोषोनि मज द्यावें। पसायदान हें ॥ १॥

जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो।
भूतां परस्परें पडो। मैत्र जीवांचें ॥ २॥

दुरितांचें तिमिर जावो। विश्व स्वधर्मेसुर्ये पाहो।
जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात ॥ ३॥

वर्षत सकळमंगळीं। ईश्वरनिष्ठांची मांदिआळी।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां॥ ४॥

चला कल्पतरुंचे आरव। चेतना चिंतामणीचे गांव।
बोलते जे अर्णव । पीयुषाचे ॥ ५॥

चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन।
ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु ॥ ६॥

किंबहुना सर्वसुखीं। पूर्ण होऊनि तिहीं लोकीं।
भजिजो आदिपुरुखीं। अखंडित ॥ ७॥

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं इयें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवें जी ॥ ८॥

येथ म्हणे श्री विश्वेशरावो । हा होईल दानपसावो।
येणे वरें ज्ञानदेवो। सुखिया झाला ॥ ९॥

**ॐ शांती: शांती: शांती :**



# महत्वाच्या नोंद